लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ च्या महसुली जमा क्षेत्र अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४, ४.२, ६.४, ७.२), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३) व गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ७.३) यावरील

सदतिसावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक मार्च २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.

फेब्रुवारी/मार्च, २०१८

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२- २०१३ च्या महसुली जमा क्षेत्र अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४, ४.२, ६.४, ७.२), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३) व गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ७.३) यावरील

सदतिसावा अहवाल

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

*(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

निमंत्रित

(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रविंद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून **भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२- २०१३ च्या महसुली जमा क्षेत्र अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४, ४.२, ६.४, ७.२), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३) व गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ७.३)** यावर विचार करून लोकलेखा समितीचा सदतिसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ८, १६, २३ व २४ जानेवारी, २०१८ रोजी अपर मुख्य सचिव, गृह (परिवहन), गृह विभाग तसेच प्रधान सचिव, महसूल व वन (वन) विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट " अ " मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट " ब " मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २० मार्च, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर,
दिनांक २० मार्च २०१८.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	पाच
(१)	**महसुल विभाग**	१
	(परिच्छेद क्र. ३.४)	१
	(परिच्छेद क्र. ४.२)	२१
	(परिच्छेद क्र. ६.४)	४५
	(परिच्छेद क्र. ७.२)	५९
(२)	**गृह (परिवहन) विभाग**	७४
	(परिच्छेद क्र. ५.३)	७६
(३)	**गृह विभाग**	९०
	(परिच्छेद क्र. ७.३)	९०

महसूल व वन (महसूल) विभाग

१.१. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ३.४ " अधिनियम व नियम यांच्या तरतूदीचे पालन न करणे " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

परिच्छेद क्र. ३.४. अधिनियम/नियम यांच्या तरतुदीचे पालन न करणे.

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, शासकीय अधिसूचना आणि अनुदेश यानुसार पुढील कार्यवाही आवश्यक आहे.

(I) मुद्रांक शुल्काची आकारणी मालमत्तेच्या बाजार मूल्यावर करणे,

(II) मुद्रांक शुल्काची आकारणी विहित दराने करणे; आणि

(III) मुद्रांक शुल्काची आकारणी व्यवहाराच्या सारांशप्रमाणे आणि वास्तव्य स्वरुपाप्रमाणे करणे.

आमच्या असे आढळून आले की, नोंदणी करणाऱ्या प्राधिकाऱ्यांनी परि.३.४.१ ते ३.४.८ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये वरीलपैकी काही तरतुदींचे दस्तऐवजाचे नोंदणी करतेवेळी पालन केले नाही.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

याबाबत अभिप्राय देण्याची आवश्यकता नाही.

१.२. परिच्छेद क्र. ३.४.१ दस्तऐवजांच्या चुकीच्या वर्गीकरणामुळे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्कांची कमी आकारणी.

सह दुय्यम निबंधक हवेली XVII पुणे

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुसूची १ मध्ये अनुच्छेद ४८ (d) नुसार एखादया व्यक्तीला एकापेक्षा जास्त व्यवहार करण्यासाठी प्राधिति करण्यासाठी अथवा अन्य कारणासाठी मुखत्यारनामा देण्यात येतो तेव्हा मुद्रांक शुल्क रु. १०० आकारणी असेल आणि अनुच्छेद ४८(g) च्या सुधारीत तरतुदी ज्या ५ जून, २००८ पासून लागु आहे त्याप्रमाणे जेव्हा मुखत्यारनामा प्राधिकार प्रवर्तक अथवा विकासक यांना ज्या कुठल्याही नावाने ओळखली जाते यांना स्थांवर संपत्तीचे विकास, बांधकाम, विक्री अथवा हस्तांतरण (कुठल्याही प्रकारची) करण्याकरीता दिला असेल अनुच्छेद २५ प्रमाणे खंड (b) (c) अथवा (d) प्रमाणे अभिहस्तांतरणावर आकारणी असलेल्या मालमत्तेच्या बाजारमुल्यावर, ज्या क्षेत्रात जी मालमत्ता असेल तिला लागू असलेल्या दराप्रमाणे आकारणी असेल हे दर वार्षिक मूल्यदर विवरणपत्रामध्ये (ASR) विहित आहे.

फेब्रुवारी, २०१० मधील अभिलेखांच्या चाचणी तपासणीत आमच्या असे आढळले की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या जमिनीचा मुखत्यारनामा दस्तावेज ६ जून, २००८ ला निष्पादित करण्यात आला, ज्यामध्ये विकासकाला, सदर मालमत्तेची विक्री, विक्री पत्र/ अभिहस्तांतरण खरेदीदाराला /सहकारी संस्थेला करून देण्याचे अधिकार देण्यात आले. यासाठी अंमलबजावणीदाराने फेब्रुवारी, १९९४ मध्ये भूधारकाकडून जमिनीच्या विकासाचे व इतर अधिकार मुखत्यारनाम्याद्वारे प्राप्त केले होते. त्यामुळे हा अभिलेख अनुच्छेद ४८ (g) अंतर्गत वर्गीकृत व्हावयास पाहिजे होता व रु. १.९५ कोटी बाजारमूल्यावर रु.९.७५ लाख एवढे मुद्रांक शुल्क आकारावयास हवे होते. तसेच नोंदणी तसेच नोंदणी शुल्क रु. ०.३० लाख देखील आकारणीय होते. परंतु विभागाने दस्ताऐवजाचे ४८ (d) अंतर्गत चुकीचे वर्गीकरण केले आणि मुद्रांक शुल्क फक्त रु. १०० आणि नोंदणी फी रु. १०० आकारली परिणामी, मुद्रांक शुल्क रु. ९.७५ लाख आणि नोंदणी फी रु. ०.३० लाख कमी आकारण्यात आली.

आम्ही हे प्रकरण फेब्रुवारी, २०१० मध्ये निदर्शनास आणल्यावर सह जिल्हा निबंधक आणि जिल्हाधिकारी मुद्रांक, पुणे यांनी अभिक्षण मान्य केले (एप्रिल, २०११) आणि सह दुय्यम निबंधक हवेली XVII पुणे, यांना मुद्रांक शुल्काच्या फरकाची वसुली करण्याच्या सूचना दिल्या. ही बाब शासनाला मे, २०१३ मध्ये कळविण्यात आली; त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या परिच्छेदात सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१७ या कार्यालयातील दस्त क्र.५८७६/०८ या कुल मुख्यत्यारपत्राच्या दस्तऐवजाचा समावेश आहे.

दु.नि.का.	दस्त क्र.	आक्षेपीत रु.	वसूली रु.
हवेली-१७	५८७६/०८	१०.०५(९.७५ + ०.३०)	१०.०

तपासणी पथकाचा आक्षेप मान्य करून वसुलीचे आदेश दिले असता, पक्षकार यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर यांचे आदेशाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ९९१०/१५ मे याचिका दाखल केली होती. सदर प्रकरणात मा. न्यायालयाने असा निर्णय दिला की, या आदेशाचे दिनांकापासून ४ आठवड्यामध्ये रक्कम भरणा करावी. त्याप्रमाणे संबंधित पक्षकाराने रु.१० लाख इतकी मुद्रांक शुल्काची रक्कम दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी ई-चलनाने भरली आहे. सबब सदर प्रकरणात वसुलीची कार्यवाही पूर्ण झाली असल्याने सदर प्रकरण निर्लेखित करण्यात यावा.

१.३. परिच्छेद क्र. ३.४.२ चुकीचे मुद्रांक शुल्क दर लावल्यामुळे मुद्रांक शुल्क आणि दंडाची कमी आकारणी जिल्हाधिकारी मुद्रांक, बोरीवली

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अनुसूची १ च्या अनुच्छेद ३४ आणि २५ (b) (vi) (a) च्या तरतूदीनुसार बक्षिस विलेख (जे समझोता किंवा मृत्यूपत्र किंवा हस्तांतरण नसेल) जर नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या स्थावर संपत्तीच्या संबंधात असेल तर त्या संपत्तीच्या जी त्या बक्षिसपत्राची विषय वस्तु आहे. बाजारमूल्यावर १०% दराने मुद्रांक शुल्क आकारणी आहे. परंतु जर ही मालमत्ता घरातील सदस्याला म्हणजेच नवरा, बायको, भाऊ किंवा बहिणीला दात्याने भेट दिली असेल किंवा दात्याच्या पुढच्या किंवा मागच्या पिढीतील असेल तर बाजारमूल्याच्या २% दराने मुद्रांक शुल्क आकारणी योग्य असेल तसेच मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ कलम ३४ (a) (ii) च्या तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क तुटीच्या रक्कमेच्या २% प्रतिमहाप्रमाणे दंड विलेख निष्पादित केलेल्या तारखेपासून आकारणी असेल तर परंतु कोणत्याही प्रकारे दंडाची रक्कम मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या रक्कमेपेक्षा दुप्पट नसावी.

डिसेंबर, २०१० मध्ये अभिनिर्णित झालेल्या प्रकरणाच्या चाचणी तपासणीत आमच्या असे निदर्शनास आले की, दिनांक २२ ऑक्टोबर, १९९६ ला दाता म्हणून धार्मिक घटकाशी आणि आदाता म्हणून दोन व्यक्तीसोबत रु. ७५ च्या स्टॅम्प पेपरवर एक सलोखा ज्ञापन एवं बक्षीसपत्र निष्पादित करून त्याची नोटरी करण्यात आली. दात्याने आदात्यास मुंबई उपनगरी जिल्ह्याच्या महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या २,७८२.८० चौरस फुट क्षेत्र असलेल्या तीन खोल्या भेट दिल्या. विभागाने एप्रिल- २००९ मध्ये अभिलेखावर अभिनिर्णय दिला आणि व अदाता यांच्यात कौटुंबीय नाते असल्याचे चुकीने गृहित धरून मुद्रांक शुल्कात सवलत दिली व रु. ४४.५२ लाख बाजार मूल्यावर दोन टक्के दराने रु. ०.८९ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. १.७८ लाख दंड आकारण्याची अनुमती दिली. आमच्या असे निदर्शनास आले की दाता आणि आदाता एकाच कुटूंबाचे सदस्य नव्हते, त्यामुळे मुद्रांक शुल्क १० टक्के दराने रु. ४.४५ लाख आकारावयास हवे होते. अशाप्रकारे चुकीचे मुद्रांक शुल्क दर लावल्यामुळे रु. ३.५६ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली. तसेच, प्रति माह दोन टक्के दराने मुद्रांक शुल्क तुटीच्या दुप्पट रक्कम रु. ७.१२ लाख एवढी दंडाची रक्कम आकारणीय होती. अशा प्रकारे एकूण रु. १०.६९ लाख कमी आकारण्यात आले.

आम्ही हे प्रकरण डिसेंबर, २०१० मध्ये निदर्शनास आणल्यावर जिल्हाधिकारी मुद्रांक, बोरीवली यांनी अभिक्षण मान्य केले (फेब्रुवारी, २०११) आणि कलम 53-A प्रमाणे कारवाई करण्यासाठी प्रकरण नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांचेकडे पाठविण्यात आल्याचे कळविले.

ही बाब शासनाला मे, २०१३ मध्ये कळविण्यात आली; त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या परिच्छेदात मुद्रांक जिल्हाधिकारी, बोरीवली यांनी अभिनिर्णीत केलेल्या अभि. प्र. क्र. ADJ/B/651/2009 चा समावेश आहे.

प्रस्तुतचा दस्त अभिनिर्णीत असल्याने सदर प्रकरण कलम ५३ अ खाली पुर्नविलोकनासाठी घेऊन संबंधितांना सुनावणीची संधी देऊन वसुलीबाबत अंतिम निर्णय पारित करण्यात आला असून वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

१.४. परिच्छेद क्र. ३.४.३ मालमत्तेच्या बाजारमुल्याचे निर्धारण चुकीचे केल्याने मुद्रांक शुल्काची कमी आकारणी.

सह दुय्यम निबंधक VI, नागपूर

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, अनुच्छेद २५ (b)(V) अनुसार मालमत्तेचे खरे बाजारमूल्य जे अभिहस्तांतरणाचे विषय वस्तु आहे अथवा विलेखामध्ये नमूद मोबदला यापैकी जे जास्त असेल त्यावर पाच टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारावयास हवे हे दर ASR मध्ये विहीत केले आहेत. नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्तेच्या खऱ्या बाजारमूल्यावर अर्धा टक्का दराने उपकर आकारणीय आहे.

नोव्हेंबर, २०११ मध्ये अभिलेखांच्या चाचणी तपासणीत आमच्या असे निदर्शनास आले की, नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील ६,१७०.२४ चौ. मीटर जमिनीच्या विक्रीसाठी दिनांक ३१ डिसेंबर, २००९ ला दोन विक्रीपत्र निष्पादित करण्यात आले. विभागाने मालमत्तेचे बाजारमूल्य रु. १.२२ कोटी निर्धारित केले होते, परंतु त्यापेक्षा विक्री मोबदला रु. २.०९ कोटी जास्त असल्यामुळे त्यावर ११.४७ लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले.

आमच्या असे निदर्शनास आले की, मालमत्ता ज्या क्षेत्रात स्थित आहे त्या क्षेत्राच्या दरानुसार जमिनीचे योग्य बाजार मूल्य रु. ४ कोटी इतके येते व त्यावर रु. २२.०१ लाख एवढे मुद्रांक शुल्क आकारणीय आहे. मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या चुकीच्या निर्धारणेमुळे रु. १०.५४ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली.

आम्ही ही प्रकरणे नोव्हेंबर, २०११ मध्ये निदर्शनास आणल्यावर, सह जिल्हा निबंधक आणि जिल्हाधिकारी मुद्रांक, नागपूर यांनी अभिक्षण मान्य केले (एप्रिल, २०१२) आणि सह दुय्यम निबंधक-VI, नागपूर यांना मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ कलम 32A नुसार वसूलीची कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

ही बाब शासनाला मे, २०१३ मध्ये कळविण्यात आली; त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या परिच्छेदामध्ये सह दुय्यम निबंधक नागपूर क्र. ६ दस्त क्र.१६७२/०९ व १६७३/०९ या २ दस्तांचा समावेश आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(आकडे लाखांत)

दु.नि.का.	दस्त क्र.	आक्षेपित रु.	वसूली रु.
नागपूर ६	१६७२/०९	५.४४	५.४४
नागपूर ६	१६७३/०९	५.१०	५.१०
एकूण		१०.५४	१०.५४

वरीलप्रमाणे दोन्ही दस्तातील वसुली झालेली असल्याने आक्षेप निर्लेखित करण्यात यावा.

१.५. परिच्छेद क्र. ३.४.४ मालमत्तेचे न्युन मुल्यांकन केल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी

मालमत्तेचे बाजारमूल्य ज्या क्षेत्रात मालमत्ता स्थित असेल त्या क्षेत्राला लागू असणाऱ्या ASR दर लावून काढण्यात येते.

नोंदणीकृत अभिलेखाच्या (जून, २००८ ते सप्टेंबर, २०१० च्या दरम्यान) चाचणी तपासणीत (जून, २०१० आणि डिसेंबर, २०११ च्या दरम्यान) आमच्या निदर्शनास आले की विभागाने मालमत्तेचे न्यून मूल्यांकन केल्यामुळे रु. १०६.६४ लाख मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले. त्याचे वर्णन खालील तक्त्यात दिले आहे.

अ.क्र.	दुय्यम निबंधकाचे नाव	दस्तावेज क्रं. आणि निष्पादनाचा/ नोंदणीचा दिनांक	ASR नुसार बाजार मूल्य (कोटी)	आकारावयाचे मुद्रांक शुल्क (लाख)	आकारले मुद्रांक शुल्क (लाख)	कमी आकारलेले मुद्रांक शुल्क
१	दु.नि.१ बोरीवली	१७९/२४-१२-०८	२२.५४	११२.८९	१००.५५	१२.१४
२	स.नि.दु.४ ठाणे	५३६७ २१-६-०८	२.७६	१३.७९	५.०१	८.७८
३	स.नि.दु.४ ठाणे	५५१८ २६-०६-०८	३.९७	१९.८५	१३.९०	५.९५
४	स.नि.दु.४ ठाणे	९५०५ ०७-११-०८	४.३८	२१.३१	८.१२	१३.७९
५	स.नि.दु.४ ठाणे	५०५७ ११-०६-०८	४.२२	२१.९१	८.१२	१३.७९
६	स.नि.दु.४ ठाणे	९७२७ १४-११-०८	७.३३	३६.८४	११.८५	२४.९९
७	स.नि.दु.४ ठाणे	६५७७ २-८-२००८	१५.०८	७५.४१	५२.७९	२२.५२
८	स.नि.दु.४ नागपूर	२८५१ १३-५-०८	१.५२	८.३८	१.७४	८.८२
९	स.नि.दु.५ ठाणे	१०१७८ २३-९-१०	७.६८	१५.३६	९.३२	५.४४
	एकूण		६९.४८	३२५.०८	२१८.४४	१०६.६४

आम्ही ही प्रकरणे निदर्शनास आणल्यावर विभागाने त्रुटी मान्य केल्या (जानेवारी, २०१२ आणि जानेवारी, २०१३ मध्ये) मुद्रांक शुल्काचा फरक वसूल करण्यात मान्य केले.

ही बाब शासनाला मे-जून, २०१३ मध्ये कळविण्यात आली; त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४) तथापि सह दुय्यम निबंधक — IV नागपूर यांनी कळविले की अनुक्रमांक ८ मध्ये दर्शविलेल्या प्रकरणात पूर्ण वसुली करण्यात आली आहे. आणि सह दुय्यम निबंधक-V, ठाणे यांनी कळविले की अनुक्रमांक ९ मध्ये दर्शविलेल्या प्रकरणात रु. ५.३२ लाखाची वसूली करण्यात आली आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या परिच्छेदामध्ये दुय्यम निबंधक बोरिवली येथील १ प्रकरण व सह दुय्यम निबंधक ठाणे क्र.४ येथील ६ प्रकरण, ठाणे क्र. ५ मधील १ प्रकरण तसेच नागपूर क्र.४ मधील १ व अशा एकूण ९ प्रकरणांचा समावेश आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :—

(आकडे लाखांत)

दु.नि.का.	दस्त क्र.	आक्षेपित रु.	वसूली रु.
बोरिवली १	१७९/०८	१२.१४	
ठाणे-४	५३६७/०८	८.७८	८.५३
ठाणे-४	५५१८/०८	५.९५	
ठाणे-४	९५०५/०८	१३.७९	१३.७९
ठाणे-४	५०५७/०८	६.३१	
ठाणे-४	९७२७/०८	२४.९९	२४.९९
ठाणे-४	६५७७/०८	२२.६२	२२.६१
ठाणे-५	१०१७८/१०	५.४४	५.३२
नागपूर-४	२६५१/०८	६.६२	६.६१
एकूण		१०६.६४	८१.८५

वरीलप्रमाणे एकूण ९ दस्तांपैकी ६ दस्तामध्ये वसुली पूर्ण झाली आहे.

(१) दुय्यम निबंधक बोरीवली क्र.१ येथील दस्त क्र.१७९/०९ हा दस्त मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी क्र.१ यांनी अभिनिर्णित केला असल्याने प्रकरण महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ५३ अ नुसार पुनर्विलोकनासाठी घेऊन सुनावणी नंतर वसुलीचा निर्णय दिनांक १०.८.२०१६ घेतली असता या निर्णयाविरुद्ध संबंधित पक्षकार यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन नं.११०२/२०१६ ने याचिका दाखल केली आहे. मा. न्यायालयाने वसुलीसाठी स्थगिती दिलेली आहे.

(२) दुय्यम निबंधक ठाणे क्र.४ येथील दस्त क्र. ५५१८/२००८ या प्रकरणात मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे शहर यांनी वसूलीची कार्यवाही केली असता वसूलीस प्रतिसाद न मिळाल्याने मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर बोजा नोंद केला आहे. पक्षकार यांनी या कार्यवाही विरुद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन नं. १२९२३/२०१७ ने याचिका दाखल केली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

१.६. परिच्छेद क्र. ३.४.५ बाजार मूल्यांची संगणना चुकीची केल्याने मुद्रांक शुल्काची कमी आकारणी :—

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, अनुसूची I च्या अनुच्छेद 36(ii) आणि (iv) अनुसार भाडेपट्टा हा (a) दहा वर्षांपेक्षा जास्त पण २९ वर्षांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीसाठी नुतनीकरण खंडासह किंवा अन्यथा असेल आणि (bb) २९ वर्षांपेक्षा जास्त किंवा कायम स्वरुपात असेल अथवा एखाद्या निश्चित अवधीसाठी नसेल किंवा २९ वर्ष कालावधीच्या भाडेपट्ट्यावर नूतनीकरण खंडासह किंवा अन्यथा असेल तर मुद्रांक शुल्क अभिहस्तांतरणासारखे अनुच्छेद २५(b)(v) अनुसार बाजारमूल्याच्या अनुक्रमे ५० टक्के/९० टक्के आकारणीय असते. मालमत्तेचे बाजारमूल्य ज्या क्षेत्रात ती मालमत्ता असेल तिला लागू असणाऱ्या सिध्द गणकानुसार दर लावून काढले जाते.

नोव्हेंबर-डिसेंबर, २०११ मधील अभिलेखांच्या चाचणी तपासणीत आमच्या असे निर्दशनास आले की, मालमत्तेच्या बाजार मूल्याची संगणना चुकीची केल्याने रु. ११.९३ शुल्क कमी आकारण्यात आले. त्याचे वर्णन खालील तक्त्यात दिलेले आहे ;

अ.क्र.	दुय्यम निबंधकाचे नाव	दस्तावेज क्र. आणि निष्पादनाचा दिनांक	आकारावयाचे मुद्रांक शुल्क (लाख)	आकारलेले मुद्रांक रु. शुल्क (लाख)	कमी आकारलेले मुद्रांक शुल्क	अनियमितता संक्षिप्त मध्ये
१	स.दु.नि.शहर २ नागपूर	१५२२ १३-०४-१०	९.४७	३.०१	६.४६	व्यावसायिक इमारतीच्या भाडेपट्टाविलेखावर जरी ASR मध्ये व्यावसायिक इमारतीच्या मूल्यांकनाचे वेगळे दर दिले असले, तरी सुद्धा मोकळ्या जागेचे आणि बांधकामाचा किंमत वरुन बाजारमूल्यांची संगणना बाजार-मूल्य चुकीचे निर्धारित करण्यात आले.
२	स.दु.नि.,शहर-६ नागपूर	२१६८/ ३१-०३-१०	६.५१	२.३०	४.३१	इमारतीच्या १० वर्षांच्या भाडेपट्टा विलेखावर ज्याचे परंतु १० वर्षाप्रमाणे दोन वेळा नुतनीकरण होऊ शकते, मुद्रांक शुल्क मालमत्तेच्या बाजार मुल्याच्या ९० टक्के ऐवजी २५ टक्के आकारण्यात आले होते.
३	स.दु.नि.,शहर-६ नागपूर		१८.४०	६.४७	११.९३	

आम्ही ही प्रकरणे नोव्हेंबर, २०११ मध्ये निदर्शनास आणल्यावर विभागाने (एप्रिल आणि ऑगस्ट, २०१२ दरम्यान) त्रुटी मान्य केल्या आणि मुद्रांक शुल्काच्या फरकाची वसुली करण्याचे मान्य केले.

ही बाब शासनाला मे, २०१३ मध्ये कळविण्यात आली ; त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे. तथापि, दुय्यम निबंधकाने कळविले की अनुक्रमांक १ आणि २ प्रकरणी पूर्ण वसूली करण्यात आली आहे आणि अनुक्रमांक ३ मधील प्रकरणात मालमत्ता पत्रकात अडवणुकीबाबत नोंद घेण्यात आली. वसुलीचे तपशील प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या परिच्छेदामध्ये सह दुय्यम निबंधक नागपूर क्र.२ व ६ कार्यालयातील तीन दस्तांचा समावेश आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे.–

दु.नि.का.	दस्त क्र.	आक्षेपित रु.	वसूली रु.
नागपूर २	१५२२/१०	६.४६	६,४५,७७५
नागपूर ६	२२६८/१०	४.३१	४,२१,०७५
नागपूर ६	४७२६/१०	१.६	१,१६,२५०

वरील सर्व दस्तांमध्ये कमी आकारलेले मुद्रांक शुल्क वसुलीची कार्यवाही पुर्ण झाली आहे.

१.७. परिच्छेद क्र. ३.४.६ बाजार मूल्य निर्धारणेसाठी भाडेदारीचा चुकीचा लाभ दिल्यामुळे मुद्रांक शुल्क आणि दंडाची कमी आकारणी.

जिल्हाधिकारी मुद्रांक, मुंबई

ASR च्या सूचना २२ अनुसार भाड्याने दिलेल्या मालमत्तेवर भाडेकरू लाभ फक्त तेव्हाच उपलब्ध असेल जेव्हा भाडेकरु मागील पाच वर्षांपासून भाडेकरु असल्याच्या पुराव्यादाखल विहीत असलेल्या आठ पैकी दोन दस्तऐवज उपलब्ध करून देवू शकेल आणि ते त्या विलेखाचा भाग असावयास पाहिजे तसेच विलेखात भाडेकरूने कब्जा केलेल्या क्षेत्राचा विस्तृत तपशील विलेखात दाखवावयास हवा. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८, कलम ३४ (a) (ii) च्या तरतूदीनुसार मुद्रांक शुल्क तुटीच्या रकमेच्या दोन टक्के प्रतिमास याप्रमाणे शास्ति विलेख निष्पादित केल्याच्या तारखेपासून आकारणीय आहे. परंतु कोणत्याही प्रकारे दंडाची रक्कम मुद्रांक शुल्क तुटीच्या रकमेपेक्षा दुप्पट नसावी.

एप्रिल, २०१२ मध्ये अभिलेखांच्या चाचणी तपासणीत, आमच्या असे निदर्शनास आले की मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीतील ताडदेव विभागात स्थित असलेल्या ४,२२७.३१ चौ.मीटर क्षेत्राचा दिनांक ५ जून, २००८ ला निष्पादित करण्यात आलेला विकास करारनामा विलेख जिल्हाधिकारी मुद्रांक, मुंबई यांच्या द्वारे फेब्रुवारी, २०११ मध्ये अभिनिर्णीत करण्यात आला.

जरी मालमत्ता भाडेतत्वावर दिली असे नमूद केले होते तरी विलेखाच्या मसुद्यात भाडेकरूने व्यापलेले क्षेत्र, वसूल केलेले भाडे, भाडेदारीचा पुरावा आणि नवीन इमारतीत भाडेकरूंना दयावयाच्या जागेचा उल्लेख नव्हता. विभागाने भाडेदारीचा लाभ देऊन मालमत्तेचे रु. १.०९ कोटी एवढे चुकीचे बाजार मूल्य निर्धारीत केले आणि रु. ५.४४ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. ३.४८ लाख दंड आकारला. आमच्या असे लक्षात आले की ६७,७०० प्रति चौ.मीटर या दराने मालमत्तेचे अचूक बाजार मूल्य रु. २८.६२ कोटी होते आणि त्यावर रु. १.४३ कोटी मुद्रांक शुल्क आणि जून, २००८ ते मार्च, २०१३ पर्यंतच्या अवधीसाठी रु. १.५९ कोटी दंड आकारावयास पाहिजे होती. त्यामुळे रु. १.३८ कोटी मुद्रांक शुल्क आणि रु. १.५६ कोटी दंड (मार्च, २०१३ पर्यंत) कमी करण्यात आला.

आम्ही हे प्रकरण एप्रिल, २०१२ मध्ये निदर्शनास आणल्यावर जिल्हाधिकारी मुद्रांक, मुंबई यांनी रु. १.३८ कोटी मुद्रांक शुल्क तुट आणि वसुली योग्य रु. ०.८५ कोटी दंडाचे (जून, २००८ ते जानेवारी, २०११) अभिक्षण मान्य केले (सप्टेंबर, २०१२) आणि संबंधित व्यक्तींना लेखापरीक्षेद्वारा आक्षेपित केलेल्या रकमेच्या वसुलीबाबत मागणी पत्र निर्गमित करण्याचे मान्य केले.

ही बाब शासनाला जून, २०१३ मध्ये कळविण्यात आली ; त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या परिच्छेदामध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई यांनी अभिनिर्णित केलेल्या प्र. क्र. ADJ/M/109/2011 चा समाविष्ट आहे.

(आकडे लाखांत)

दु.नि.का.	दस्त क्र.	आक्षेपित रु.	वसूली रु.
मु.जि.मुंबई	ADJ/M/१०९/२०११	२९०.०	-

सदर दस्त मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई यांनी अभिनिर्णीत केला असल्याने प्रकरण महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ५३अ नुसार पुर्नविलोकनासाठी घेऊन सुनावणी नंतर वसूलीचा निर्णय दिनांक २४ ऑगस्ट २०१६ घेतली असता या निर्णयाविरुद्ध संबंधीत पक्षकार यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन नं. १०४४/२०१७ मे याचिका दाखल केली आहे. मा. न्यायालयाने वसुलीसाठी स्थगिती दिलेली आहे.

१.८. परिच्छेद क्र. ३.४.७.१ विलेख कार्यान्वित करण्याच्या तारखेचे मालमत्तेचे बाजार मूल्य विचारात न घेतल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी.

सह दुय्यम निबंधक VII, हवेली, पुणे

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम 2(na) नुसार कोणतीही मालमत्ता जी एखाद्या विलेखाची विषय वस्तु आहे, तिचे बाजारमूल्य म्हणजे ती किंमत जी विलेख निष्पादीत होण्याच्या तारखेला खुल्या बाजारात विकली असता मिळेल. तसेच, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, अनुसुची अनुच्छेद 25(b) (vi) अनुसार मालमत्ता, जी अभिहस्तांतरणाची विषय वस्तु आहे. तिचे खरे बाजारमूल्य अथवा विलेखात नमूद मोबदला यापैकी जे जास्त असेल त्यावर पाच टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारणीय आहे.

फेब्रुवारी, २०१० मध्ये अभिलेखांच्या चाचणी तपासणीत आमच्या असे निदर्शनास आले की दिनांक २३ डिसेंबर २००८ ला पुणे महानगरपालिका क्षेत्रातील बानेर येथे स्थित ५,६५० वर्ग मीटर जमिनीचा अभिहस्तांतरण विलेख खरेदीदार आणि विक्री करणारा यांच्यात रु. ३३.९० लाख मोबदला बदल्यात निष्पादित करण्यात आला. विभागाने मालमत्तेचे बाजार मूल्य रु. ४३.९० लाख निर्धारित केले व त्यावर रु. २.२० लाख मुद्रांक शुल्क आकारले बाजार मूल्य संगणनेचे तपशिल अभिलेख्यांवर उपलब्ध नव्हते.

आमच्या असे लक्षात आले की २००८ च्या वार्षिक मूल्य दर विवरण तक्त्यानुसार (ASR) मालमत्तेचे अचूक बाजार मूल्य रु. २.६१ कोटी होते त्यावर ५% दराने रु. १३.०६ लाख मुद्रांक शुल्क आकारणीय होते. त्यामुळे रु. १०.८६ लाख मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले. आम्ही हे प्रकरण फेब्रुवारी, २०१० मध्ये निदर्शनास आणल्यावर, सह-जिल्हा निबंधक आणि मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे यांनी अभिक्षण मान्य केले (जानेवारी, २०१३) आणि सह दुय्यम निबंधक-VII, हवेली, पुणे यांना मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, कलम 32-A नुसार वसुलीची कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या परिच्छेदामध्ये सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. ७ या कार्यालयातील दस्त क्र. ८३८१/०८ या खरेदीपत्राच्या दस्ताचा समावेश आहे.

(आकडे लाखांत)

दु.नि.का.	दस्त क्र.	आक्षेपित रु.	वसुली रु.
हवेली-७	८३८१/०८	१०.८६	१०.८६

सदर आक्षेप मान्य करून कमी पडलेले मुद्रांक शुल्क रुपये १०,८६,००० ई-चलन क्र. GRN No. MH 005821879201415 M, दिनांक १८ फेब्रुवारी २०१५ व दंड रुपये १६,०८,०२० ई-चलन क्र. GRN No. MH 005822817201415 M, दिनांक १८ फेब्रुवारी २०१५ अन्वये शासन जमा करण्यात आली आहे.

१.९. परिच्छेद क्र. ३.४.७.२

फेब्रुवारी, २०१० अभिलेखांच्या चाचणी तपासणीत, आमच्या असे निदर्शनास आले की दिनांक २१ ऑगस्ट २००८ ला पुणे महानगरपालिका क्षेत्रातील घोरपडी स्थित १५,२९०.९७ चौ. मीटर जमिनीचा अभिहस्तांतरण विलेख, खरेदीदार आणि विक्री करणारा यांच्यात रु. ३.५० कोटी मोबदला बदल्यात निष्पादित करण्यात आला. विभागाने मालमत्तेचे बाजार मूल्य रु. ३.३१ कोटी निर्धारित केले परंतु मोबदला रक्कम जी बाजार मूल्यापेक्षा जास्त आहे, त्यावर रु. १७.५० लाख मुद्रांक शुल्क आकारले.

आमच्या असे लक्षात आले की २००८ च्या ASR नुसार मालमत्तेचे अचूक बाजार मूल्य रु. ५.०९ कोटी होते त्यावर पाच टक्के दराने रु. २५.४४ लाख मुद्रांक शुल्क आकारणीय होते. त्यामुळे रु. ७.९४ लाख मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले.

आम्ही हे प्रकरण फेब्रुवारी, २०१० मध्ये निदर्शनास आणल्यावर, सह जिल्हा निबंधक आणि जिल्हाधिकारी मुद्रांक पुणे यांनी अभिक्षण मान्य केले (जानेवारी, २०१३) आणि सह दुय्यम निबंधक VII, पुणे यांना वसुलीची कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. ही बाब शासनाला जून, २०१३ मध्ये कळविण्यात आली ; त्याचे उत्तर प्रतीक्षित आहे (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या परिच्छेदामध्ये सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. ७ या कार्यालयातील दस्त क्र. ५८५५/०८ या खरेदीपत्राच्या दस्ताचा समावेश आहे.

(आकडे लाखांत)

दु.नि.का.	दस्त क्र.	आक्षेपित रु.	वसूली रु.
हवेली-७	५८५५/०८	७.९४	७.९४

सदरचा आक्षेप मान्य करून कमी पडलेले मुद्रांक शुल्क रु.७,९३,५५० ई-चलन क्र. GRN No. MH 005821879201415 M दिनांक १८/२/१५ व दंड रु.१६,०८,०२० ई-चलन क्र. GRN No.MH00425 (नंबर दिसत नाही), दिनांक ३/१२/२०१४ अन्वये शासन जमा करण्यात आली आहे.

१.१०. परिच्छेद क्र. ३.४.८ करारनाम्यात अंतर्भुत असलेल्या विविध बाबींबाबत चुकीचे बाजारमूल्य निर्धारण केल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी.

सह दुय्यम निबंधक, (शहर)-II, मुंबई

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८, च्या कलम ५ अनुसार निरनिराळ्या बाबींचा समावेश असलेला किंवा विविध बाबींशी निगडीत असलेल्या कोणत्याही विलेखावर प्रत्येक बाबींशी निगडीत असलेल्या शुल्काची मिळून एकूण शुल्क आकारणी होईल. कलम ३४ (a) (ii) प्रमाणे मुद्रांक शुल्क तुटीच्या रकमेच्या दोन टक्के प्रतिमाह या दराने दंडसुद्धा आकारणीय आहे, जी कोणत्याही प्रकारे तुटीच्या रकमेच्या दुप्पटीपेक्षा जास्त नसावी.

एप्रिल, २००८ मध्ये नोंदणी झालेल्या दस्ताऐवाजांच्या पडताळणी दरम्यान आमच्या असे निदर्शनास आले की, मुंबई क्रिकेट असोसिएशन (BCA) आणि गरवारे क्लब हाऊस, मुंबई यांच्यात मार्च, २००५ मध्ये खालील चार निरनिराळ्या बाबीवर समझोता ज्ञापन आणि संमती अटी निष्पादित करण्यात आल्या;

(१) ५८,३९८.३६४ चौ.फुट क्षेत्राचा अनिश्चित कालावधीसाठी उप-भाडेपट्टा,

(२) गरवारे क्लब हाऊसच्या सभासदासाठी रु. १.२० कोटीच्या प्रदानानंतर ६,००० आसन कायम आरक्षीत रु. ठेवण्याचे हक्क हस्तांतरण,

(३) १,००,००० चौरस फुट FSI वर बांधकाम आणि

(४) लान चा वापर मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांनी या मालमत्तेची रु. ५.५३ कोटी इतकी किंमत काढली आणि त्यावर ५ टक्के दराप्रमाणे रु. २७.६४ लाख मुद्रांक शुल्क आकारले.

तथापि, या प्रकरणामध्ये विविध बाबी अंतर्भुत असल्यामुळे मुद्रांक शुल्क आकारण्यासाठी स्थावर मालमत्तेची किंमत रु. १२.२४ कोटी एवढी येते आणि त्यावर ५% दराने रु. ६१.२० लाख मुद्रांक शुल्क आकारणीय आहे. जंगम संपत्तीचे मूल्य रु. १.२० कोटी एवढे येते व त्यावर तीन टक्के दराने रु. ३.६० लाख मुद्रांक शुल्क आकारणीय आहे. अशाप्रकारे, एकूण आकारणीय मुद्रांक शुल्क रु. ६४.८० लाख इतके आहे. याशिवाय रु. १७.८३ लाख दंडाची रक्कम सुद्धा आकारणीय आहे. परंतु, या ऐवजी रु. २७.६४ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. ४.४२ लाख दंड आकारून वसूल करण्यात आले. ज्याचा परिणाम रु. ३७.१५ लाख एवढे मुद्रांक शुल्क आणि रु. १३.४१ लाख एवढी दंड रक्कम कमी आकारण्यात झाला.

आम्ही हे प्रकरण एप्रिल, २००८ मध्ये निदर्शनास आणल्यावर, नोंदणी महानिरीक्षक (Inspector General of Registration) आणि मुख्य महसूल नियंत्रण अधिकारी (म.रा.), पुणे यांनी अभिक्षण मान्य केले (एप्रिल, २०१३) ही बाब शासनाला जून, २०१३ मध्ये कळविण्यात आली; त्याचे उत्तर प्रतीक्षित आहे (जानेवारी, २०१४). तथापि, नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांनी या प्रकरणात पूर्ण वसुली झाली असल्याचे कळविले आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—

सदर परिच्छेदात सह दुय्यम निबंधक, मुंबई शहर क्र.२ कार्यालयातील ४२१९/०७ चा समावेश आहे.

(आकडे लाखांत)

दु.नि.का.	दस्त क्र.	आक्षेपित रु.	वसुली रु.
मुंबई-२	४२१९/०७	३७.१५ व दंड रु.१३.४०	३७.१५ व दंड रु.१३.४०

प्रस्तुत प्रकरणातील दस्त सह दुय्यम निबंधक, मुंबई शहर क्र.२ कार्यालयातील नोंदणी करण्यापुर्वी सदरचा दस्त मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांनी अभिनिर्णीत केलेले आहे. या परिच्छेदावरील आक्षेप मान्य करून दस्त अभिनिर्णीत असल्याने सदरचे प्रकरण महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ५३ अ खाली पुर्नविलोकन करून दिलेल्या निर्णयाप्रमाणे कमी पडलेले मुद्रांक शुल्क रु. ३७,१५,१७५ व दंड रु. १३,४०,९७४ इतकी रक्कम मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांनी वसूल केलेली आहे.

साक्ष :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

१.११. परिच्छेद क्रमांक ३.४.१ दस्तऐवजांच्या चुकीच्या वर्गीकरणामुळे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्काची कमी आकारणी :—

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सदरहू परिच्छेदात दर्शविण्यात आलेली वसुली पूर्ण केलेली असल्याचे समितीस अवगत केले.

५ हजार रुपयांच्या वसुलीबाबत महसूल विभागाने कोणते प्रयत्न केलेले आहेत तसेच रुपये १०.०५ लाख इतकी वसुली झाली. विभागाने ५ हजार रुपये निर्लेखित केले आहेत किंवा प्रलंबित आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, रुपये दहा लाख दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी वसूल झालेले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने तपासून घ्यावे आणि जर योग्य असेल तर वसूली करावी यामध्ये जे आहे, ते नोंदणी शुल्क आहे असे समितीने नमूद केले असता याच्यामध्ये ९.७५ लाख रुपयांचा जो ब्रेक-अप दिलेला आहे, ते मुद्रांक शुल्क आहे आणि ३० हजार रुपये नोंदणी शुल्क असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

रुपये १० लाख इतकी वसुली केलेली असून ५ हजार रुपये शिल्लक आहेत, ती जर योग्य वसुली असेल तर ती पण करावी तरच १०० पर्सेंटचा उच्चांक गाठता येईल असे समितीने विभागास अवगत केले असता, कोर्टामध्ये हे प्रकरण गेले होते आणि कोर्टामध्ये त्यांनी ॲप्रोच केले. न्यायालयाने त्यांना इंटर्नल रिलीफ देताना सांगितले होते की, " Petitioners are directed to deposit a sum of Rs.10 lakhs with the Office of Joint District Registrar." त्याअनुषंगाने त्यांनी ही रक्कम भरली म्हणून त्यांनी दहा लाख रुपयेच भरलेली आहे. ही जी त्यांनी भरणा केलेली आहे रक्कम ती कोर्टाच्या निर्देशानुसार भरणा केलेली आहे आणि कोर्टाने जी अमाऊंट दिलेली होती आदेशामध्ये तीच त्यांनी जमा केलेली आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

आता ५००० रुपये आपल्या अकाऊंटमध्ये शिल्लक असतील. विभागाने हे व्हेव्ह करावे किंवा निर्लेखित करावे अन्यथा त्याची अन्यप्रकारे विल्वेवाट लावावी अकाऊंट क्लियर पाहिजे असे समितीने विभागास सूचित केले असता, आपली डिमांड असून कोर्टाचा निर्देश केवळ दहा लाख रुपयांचा असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

१.१२. परिच्छेद क्र. ३.४.२.चुकीचे मुद्रांक शुल्क दर लावल्यामुळे मुद्रांक शुल्क आणि दंडाची कमी आकारणी :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, या प्रकरणामध्ये आयजीआर असून त्यांनी कलम ५३/ए अंतर्गत रिव्ह्यू करून वसुलीचे आदेश दिनांक २ जानेवारी २०१८ रोजी दिलेले आहेत. त्यानुसार दिनांक ३ जानेवारी २०१८ रोजी डिमांडची नोटीस दिली गेली होती. त्यांनी दहा दिवसांमध्ये पैसे न भरल्यामुळे दिनांक १५ जानेवारी रोजी पुन्हा नियम ३६ अन्वये कारवाई करण्याची नोटीस दिलेली आहे. १४,२४,८०० रुपये वसूल करण्याची नोटीस दिलेली आहे त्याच्या अनुषंगाने पुढील कारवाई होणार आहे.

निर्णय झाला की, १४ लाख रुपये वसूल करायचे आहेत का अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये ५३-ए आयजीआरने निर्णय केला, त्यांनी सांगितले पाहिजे १४ लाख रुपये वसूल केले पाहिजे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

त्याचे नातेवाईक नव्हते, ते त्याच्या नात्यांमधले ही नव्हते तरी ही चूक कशी झाली अशी समितीने विचारणा केली असता, या केसमध्ये त्यांचा समज झाला होता की, हे नात्यामध्ये होते मात्र प्रत्यक्षात नाते नव्हते, त्याचमुळे आजच्या बैठकीमध्ये हा मुद्दा आलेला आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

कोणतेही कागदपत्रे रेकॉर्डवर न घेता त्यांनी कोणत्या आधारावर रिलेशन स्वीकारले आणि रिलेशन स्वीकारून त्यांनी दहा टक्क्यांच्या ऐवजी २ टक्के रेट लावलेला आहे ? सन २०१० ची केस आहे सन २०१८ मध्ये आपण याचा निर्णय घेतो, तो पण महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपांमुळे घेत आहोत. अशा अनेक इतर केसेस असू शकतात ज्यांनी ही चूक केली त्यांच्यावर काहीतरी कारवाई केली आहे का? यासाठी काहीतरी मेकॅनिझम आपल्याकडे आहे का ? त्याकरिता विभागाने सुरुवात केली आहे का किंवा करणार आहात का अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये अद्यापपर्यंत संबंधितांविरुद्ध कोणतीही कारवाई केलेली नसून वसुली पूर्ण करण्यावर फोकस केला होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

कोणतीही कागदपत्रे नसताना चुकीचे नाते प्रस्थापित केले त्यावरून दहा टक्क्यांच्या ऐवजी दोन टक्के घेतले. सॅम्पल केसमध्ये महालेखाकारांच्या असे लक्षात आले की, हा निर्णय चुकीचा झालेला आहे त्या व्यक्तीवर ज्यांनी अशा प्रकारचा पुरावा न घेता नाते प्रस्थापित केले असेल तर त्यांच्यावर विभागाने पाच वर्षांपासून कारवाई का प्रस्तावित केली नाही ? महालेखाकारांनी आक्षेपित केल्यानंतरही विभागाने संबंधितांवर कारवाई का केली नाही ? आता विभागामार्फत यावर कोणती कारवाई करणार आहे, याकरिता कोणता मेकॅनिझम वापरणार आहात, ज्यामुळे पुढील कालखंडामध्ये अशी कोणतीही चूक होऊ नये अशी विचारणा समितीने केली. तसेच जेथे जेथे अधिकाऱ्यांना त्यांचे डिस्क्रीशनरी पॉवर्स वापरुन ठरवायचे अधिकार दिलेले आहेत तेथे तेथे हा सर्व विषय येत आहे काही गोष्टीमध्ये अपवाद असू शकतात. अधिकाऱ्यांना देखील विशिष्ट बाबींसंदभर्रात डिस्क्रीशनरी पॉवर्स असणे आवश्यक आहे. येथे मात्र कोणतीही विशिष्ट बाब नाही म्हणून समितीचे असे म्हणणे आहे की, जे काही लुप पॉईंट असतील त्याच्यावर आक्षेप महालेखाकारांनी काढलेला आहे. शासनाची भूमिका ही आहे की, आपल्याकडे पैसे जमा झाले की, अधिकाऱ्यांनी जे केले ते सोडून द्या. आपली प्रायोरिटी आपण सांगितली की, पहिले आपल्याला ते रेव्हेन्यूचे जे प्रकरण आहे, त्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. रिव्हेन्यू तर मिळालाच पाहिजे पण असे जे धंदे करणारे लोक आहेत ज्यांच्यामुळे हे होत आहे त्याला बंधन घालणे गरजेचे आहे. स्पीड मेकॅनिझम म्हणाल तर विभाग याबाबत काय करणार आहे व किती दिवसांमध्ये करणार आहे. बऱ्याचशा गोष्टींसंबंधीचे अधिकार हे संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. मुद्रांक शुल्काची रक्कम निश्चित करण्याचे अधिकार त्या त्या अधिकाऱ्यांना ज्या ज्या ठिकाणी ते बसलेले आहेत, त्यांना दिलेले आहेत, त्याचा फुलप्रुफ मेकॅनिझम जे आतापर्यंत जेवढ्या घटना झाल्या, जेवढे अध्यक्ष झालेले आहेत, जेवढे तुमच्याकडे झालेले आहेत. आपण या विषयामध्ये सखोल माहिती घेऊन किती दिवसांमध्ये समितीची तर मागणी आहे की, विभाग माहे एप्रिलपासून शुल्काचा रेशिओ जाहीर करणार आहे त्याच्यामध्ये या सर्वांचा समावेश करणार आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, विभागाचा फोकस ही फरकाची रक्कम वसूल करण्याचा होता. हा एकदा ड्यूरिकेट झाला होता यामध्ये वसूल करावे किंवा कसे याच्याकरिता याचे पुर्नविलोकन करण्याची आवश्यकता होती, त्याच्यामुळे हा पहिल्यांदा आयजीआरकडे ५३ ए अंतर्गत त्यामध्ये आयजीआरने यामध्ये एक आदेश दिलेले आहेत की, या केसमध्ये वसूल केले पाहिजे, त्याच्या अनुषंगाने आता वसुलीची प्रक्रिया आता सुरू केलेली असून आता पूर्व फोकस यामध्ये होता की वसुली कशी होईल. आता ज्या अर्थी हा निर्णय झालेला आहे, यामध्ये वसुली करावयाचे कारण की, ही प्रक्रिया जी आहे, ती आता दिनांक २ जानेवारी २०१८ रोजी झालेली आहे, यापूर्वी रिव्ह्यू झाला नव्हता, त्याच्यामुळे वसुली करावयाची किंवा कसे हे निश्चित करण्यात आले नव्हते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २०१२-२०१३ मध्ये हे लक्षात आणून दिले होते विभागाने पाच-पाच वर्षे लक्ष दिले नाही असे समितीने अवगत केले असता, जो कायदेशीर टप्पा या प्रकरणाला प्राप्त झाला होता, तो असा होता की यामध्ये जर वसुली करावयाची असेल तर पुर्नविलोकन करण्याची आवश्यकता होती. कारण की हे मॅटर ऑलरेडी ॲडज्युरीकेशन झालेले होते त्यामुळे जोपर्यंत पुर्निविलोकन होऊन रिकव्हरी करावयाची असे सिद्ध होत नाही तसा निर्णयच होत नाही तोपर्यंत जबाबदारी निश्चित करणे शक्य होत नाही. आता हे दिनांक २ जानेवारी २०१८ रोजी पुर्नविलोकन झालेले आहे त्याप्रमाणे जबाबदारी निश्चित होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता पुर्नविलोकनाची ऑर्डर सन २०१७ मध्ये आलेली आहे. सन २०१३ मध्ये ज्या गोष्टी पुर्नविलोकनासाठी पाठविल्या होत्या, त्याचे सन २०११ ते सन २०१३ हा तो कालावधी असल्याचे समितीने अवगत केले असता, या प्रकरणामध्ये ॲडज्यूडिकेशन झाले होते त्यामुळे त्याचे पुर्नविलोकन होण्याची आवश्यकता होती. ते सीसीआरए यांच्या लेव्हलवर असते चीफ कंट्रोलिंग रेव्हेन्यू ऑथॉरिटी म्हणतात म्हणजे आयजीआर होय. आयजीआरच्या स्तरावर हे पुर्नविलोकन होते हे राज्य सरकारच्या अंतर्गत असून ते शासनाचे अधिकारी आहेत. पुर्नविलोकनानंतर त्यांनी रिकव्हरी करण्याचा आदेश दिला तर मग त्या केसमध्ये रिकव्हरीची प्रक्रिया हाती घेतली जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

महालेखाकारांचे आक्षेप आल्यानंतर ऑलरेडी ॲडज्युरिकेशन झालेले असल्यामुळे त्यावर पुन्हा पुर्नविलोकन करणे आवश्यक होते. आक्षेप आल्यानंतर पुर्नविलोकन करण्याचा निर्णय कधी घेतला, त्यांचा निर्णय कधी आला हा खरा यामधील मुद्दा असल्याचे समितीने सूचित केले असता, तेथील अधिकाऱ्यांना खूप विशेष अधिकार आहेत हे विशेषाधिकार कमी करण्याकरिता विभाग कोणती कार्यवाही करणार आहे काय अशी पृच्छा समितीने केली असता, या प्रकरणी पुर्नविलोकनाचा आदेश दिनांक २ जानेवारी २०१८ रोजी दिलेला असल्याचा पुनरुच्चार विभागीय सचिवांनी केला.

त्यांनी किती दिवसात सादर केले आहे त्याबाबत समितीस सांगावे. दुसरा मुद्दा असा आहे की, आपण पुर्नविलोकन कशासाठी करीत आहात. ॲडज्युडीकेशन झालेले आहे, आता यावर पुन्हा लेव्ही करता येईल का. त्यांनी चूक केली आहे की, चुकीचे रिलेशन त्यांनी गृहीत धरले आहे हा मुळ दोष आहे हा दोष झाला नसता तर आपणास पुर्नविलोकन करण्यासाठी पाठविण्याची गरजच नव्हती. तुम्ही केलेले ॲडज्युडीकेशन योग्यच होते. प्रथमदर्शनी fault on the part of that person who was adjudicating त्यावर इतक्या वर्षांपर्यत कारवाई का झाली नाही अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये दोन मुद्दे असून पहिला मुद्दा मुळ उप निबंधकांच्या स्तरावर कारवाई होते. या प्रकरणी ॲडज्युरीकेशनचीसुद्धा कारवाई झाली होती. ज्या ॲडज्युरीकेशन झाले होते, त्या अर्थी पुर्नविलोकन झाल्याखेरीज आपण वसूल करू शकत नव्हतो. ॲडज्युरीकेशनमध्ये हे मान्य झाले होते की, २ टक्के रिकव्हरी या प्रकरणी करणे योग्य राहिले. ॲडज्युरीकेशनसुद्धा त्या बाजूने झाला होता. आता आयजीआर यांचे

स्तरावर आपण याचे पुर्नविलोकन केलेले आहे, आणि ठरवले आहे की, १० टक्के प्रमाणे वसूल केले पाहिजेत. ही कारवाई दिनांक २ जानेवारी २०१८ रोजी झालेली आहे त्या अनुषंगाने विभागाने वसुलीची कारवाई सुरू केलेली असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले. तसेच माहे फेब्रुवारी, २०११ मध्ये याचे ॲडज्युरीकेशन झाले होते. महालेखाकारांचा आक्षेप सन २०१२ मध्ये आला आहे. सन २०१३ मध्ये पक्षकार त्यांच्याकडे गेले होते, मात्र पक्षकार हजर रहात नव्हते शेवटी या प्रकरणी एकतर्फी निकाल द्यावा लागला असेही समितीस अवगत केले.

ज्यांना जास्त पैसे भरावे लागतात, ते कशाला येतील ? महालेखाकाराचं आक्षेप आल्यानंतर ॲडज्युरीकेशन झाल्यानंतर पुर्नविलोकन करण्याची कायद्याप्रमाणे आवश्यकता आहे. महालेखाकारांचे आक्षेप व पुर्नविलोकन करण्याचा निर्णय यामधील अंतर किती दिवसाचे आहे असे समितीने विचारले असता, सन २०१३ मध्ये रिव्ह्यूमध्ये निर्णय घेतला गेला होता. मात्र पक्षकार हजर राहात नव्हते शेवटी एकतर्फी निकाल झाला की, या प्रकरणामध्ये वसुली केली पाहिजे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वसुलीबाबत विभागीय सचिवांनी सांगितले आहे. पण चुकीचे रिलेशन दाखविले, म्हणजे हा फौजदारी गुन्हा झाला आहे. वसुलीसंदर्भात त्यांची बाजू बरोबर आहे पण चुकीचे किंवा जे नव्हते ते रिलेशन दाखविले म्हणजे हा कलम ४२० अन्वये फौजदारी गुन्हा होतो. त्यामुळे ही सर्व प्रक्रीया पूर्ण झाल्यावर त्यावर कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल करणार आहात काय अशी विचारणा समितीने केली असता, आता या प्रकरणामध्ये निर्णय झालेला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले. तसेच ज्या अर्थी अशा प्रकारचा निर्णय दिनांक २ जानेवारी २०१८ रोजी पुर्नविलोकनामध्ये देण्यात आलेला आहे की, त्यामध्ये रिकव्हरी केली पाहिजे. त्यात सुरुवातीस चुक झाली आहे की, तो कुटुंबाचा सदस्य नसताना त्यास गिफ्ट डीडद्वारे देण्याचा निर्णय झाला. ती चुक हेतूपुरस्सर झाली की अनावधाने झालेली आहे, त्यात कोणाचा काय रोल होता याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात येईल असेही समितीस अवगत केले.

या विषयाशी समिती सहमत नसल्याचे समितीने सांगितले. समितीचे असे मत आहे की, पुर्नविलोकनाकरिता आपण सादर केलेले आहे म्हणजे त्यांच्यामध्ये रक्ताचे नाते नाही चुकीचे नाते दाखविले आहे रक्ताच्या नात्याचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी यांच्याकडून घ्यावे लागते. त्यानंतर रजिस्ट्रारला रक्ताचे नाते ॲडज्युरीकेशनमध्ये मान्य करता येते. त्याबाबत काहीच कारवाई न करता ॲडज्युरीकेशनच्या वेळी सर्व बाबी केवळ गृहीत धरल्या आहेत. त्यांनी चूक केल्यानंतर आपणास पुर्नविलोकनाकरिता जावे लागले. त्यानंतर आपण सन २०१८ मध्ये रिकव्हरी सुरू करीत आहात. समितीची भूमिका आहे की, मुळ कामात चुक झालेली आहे. ज्या अधिकाऱ्यांनी ही बाब बघितली नाही त्यांची देखील चूक आहे. अद्यापही या दोघांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केलेला नाही तो गुन्हा दाखल करणार काय अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणी आम्ही जबाबदारी निश्चित करून आवश्यक असेल तर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यांनी रक्ताचे नाते असल्याबाबत खोटे सांगितले व तशी खोटी कागदपत्रे दिली, त्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे अशी पृच्छा समितीने केली असता, यामध्ये कोणाला वाचविण्याचा प्रयत्न केला जाणार नाही. याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात येईल व दोषींवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सचिवांनी त्याबाबत आदेश दिले पाहिजेत कारण या प्रकरणी जबाबदारी निश्चित झालेली आहे. दिनांक २ जानेवारी २०१८ च्या आदेशाप्रमाणे वसुली करण्याचे निर्देश त्यामध्ये आलेले आहेत यानंतर आपण कोणती जबाबदारी निश्चित करणार आहात. या संदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने माहिती दिली असेल आणि सदर माहिती स्वीकारुन ज्या अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली असेल अशा दोन्ही प्रकारच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कलम ४२० अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे. कोणतेही कागदपत्रे न घेता अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली असल्यास या बाबतीत अधिकाऱ्यांची चूक आहे. अशा प्रकारे बोगस कागदपत्रे देऊन सूट मिळवली असेल आणि ही नंतर विभागाच्या निदर्शनास आली असल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हा तसेच विभागीय कारवाई केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले तसेच What is the improvement in mechanism अशी विचारणा समितीने केली असता, व्हॅल्यूएशनमध्ये वस्तुनिष्ठता यावी याकरिता व्हॅल्यूएशन मॉडेल विकसित करण्यात आले आहे. त्या मॉडेलचा वापर करून ह्युमन एरर कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे जेणेकरून व्हॅल्यूएशन वस्तुनिष्ठ होऊ शकेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सचिवांनी दिलेली माहिती खरी असून मालमत्तेचे सीटी सर्व्हेनुसार व्हॅल्यूएशन ठरवायचे होते. त्याचे संगणीकरण करून त्यानुसार त्याची रक्कम काढून दिली जात असल्यामुळे त्याप्रमाणे सदर कार्यवाही केली जात आहे. या संदर्भात अधिकाऱ्यांना दिलेल्या डिस्क्रिशनरी पॉवरच्या बाबतीत कोणती फुलप्रुफ योजना तयार करणार आहात ? या संदर्भात आपण फुलप्रुफ सिस्टीम करणार नसल्यास ही समिती ३-३ लाख वसूल करण्यासाठी नाही. विभागाने समितीला असे आश्वासन दिले पाहिजे की, दिनांक १ एप्रिल २०१८ पासून नवीन मुद्रांक शुल्काचा फॉर्मूला आणि त्यासाठी असलेली रक्कम जाहीर करणार असून व त्यासंबंधी आतापर्यंत आलेल्या अनुभवाच्या आधारावर फुलप्रुफ सिस्टीम लागू करणार आहोत असे समितीने विभागास सूचित केले असता, कोणताही नवीन कायदा तयार करीत असताना जे इंटरप्रिटेशन असते त्यात काही अंशी क्षेत्रीय यंत्रणेकडे डिस्क्रिशनरी पॉवर असतात. प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्याकडून योग्य इंटरप्रिटेशन होईल अशी आपली अपेक्षा असते. सदर प्रकरणी

तो कुटुंबातील सदस्य आहेत किंवा कसे ? कायद्यात कुटुंबातील सदस्याची व्याख्या सुस्पष्ट आहे त्यामुळे कायद्यात कोणत्याही प्रकारचा वेगळा बदल करण्याची किंवा कोणत्याही प्रकारच्या वेगळया सूचना देण्याची आवश्यकता नाही. फक्त सदर सूचनांची व्यवस्थितपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. ही कार्यवाही बेसिकली सुपरव्हीजनच्या माध्यमातून साध्य करता येते. त्यामुळे सुपरव्हायझरी ऑफिसरांनी व्यवस्थीतपणे सुपरव्हीजन करावे अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

या संदर्भात ज्या अधिकाऱ्यांनी असत्य स्वरुपाची माहिती दिली आणि ज्या अधिकाऱ्यांनी ती माहिती स्वीकारली अशा दोन्ही प्रकारच्या अधिकाऱ्यांच्या संदर्भात परिपत्रक काढून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत त्यांच्या मनात भिती निर्माण करण्याची गरज आहे या संदर्भात फुलप्रुफ सुपरव्हाईझरी सिस्टीम ठेवल्यास त्यात ही बाब लक्षात येऊ शकते असे समितीने विदित केले असता, फुलप्रुफ सिस्टीमसंबंधी समितीला माहिती दिली आहे. व्यवस्थेमध्ये दिलेल्या सूचना व कायद्यातील तरतुदींमुळे फुलप्रुफ सिस्टीममध्ये कोणताही संभ्रम नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

In this there are two rates for two different identities. One rate for the relations and another rate for the general. अशाप्रकारे रिलेशन असल्यास २ टक्के आणि रिलेशन नसल्यास १० टक्के आहे. माझ्या माहितीनुसार रिलेशनच्या व्याख्येचे सर्टिफिकेटशन करण्याचे अधिकार फक्त जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. ॲडज्युडीकेशन करणाऱ्या व्यक्तींनी जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राधिकृत पत्र घेतले पाहिजे. त्यानुसार त्यांना २ टक्क्यांची सूट दिली पाहिजे. परंतु या संदर्भात कोणतीही कार्यवाही न करता परस्पर २ टक्क्यांची सूट मिळवून घेतली अशाप्रकारे यात चूक झाली असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता, ज्या केसमध्ये असे डिस्क्रीशन आहे की, तेथे सर्टिफिकेट बघून १० टक्के ठेवायचे की २ टक्के ठेवायचे. Wherever such power is being used, तसेच रिलेशन असल्यामुळे प्रमाणपत्राच्या आधारे कार्यवाही करून १० टक्क्यावरुन २ टक्क्यावर आणत आहे. In computerised system, such cases should automatically go for confirmation to the higher level असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २०१० मध्ये ही बाब त्यांच्या लक्षात आल्यानंतर सन २०११ मध्ये त्यांनी ही बाब मान्य करून सन २०१३ मध्ये सादर केली आहे.अशा प्रकरणांमध्ये ५-५ वर्षांचा कालावधी लागत आहे. सीएजीने यासंबंधी कार्यवाही केली नसती तर या संदर्भात ५ वर्षात सुध्दा कोणतीही कार्यवाही झाली नसती. हा विषय साक्षीला येणार असल्यामुळे यासंबंधी कार्यवाही करण्यात आली आहे. अन्यथा विभागाने स्वतः अशा प्रकारच्या केसेस काढून त्याची प्रोसेस सुरु केली असल्यास १०-१० वर्षे त्यासंबंधी कार्यवाही होणार नाही. म्हणून यासंबंधी सुध्दा कालमर्यादा ठरविली पाहिजे हा सिस्टीमचा भाग असून शासन आणि अधिकारी त्यासाठी काम करीत असतात असे समितीने अवगत केले असता, कालावधीच्या संदर्भात आयजीआर यांच्यासमवेत चर्चा करण्यात आली होती. महसूल अधिकाऱ्यांच्या स्तरावर प्रलंबित असलेले अपिल किंवा रिव्हीजन्सच्या संदर्भात शासनाने कालमर्यादा ठरवून दिली आहे. तसेच मूळ प्रश्न असा आहे की, ५३(ए) खालील रिव्ह्यूसंबंधी आपण कालमर्यादा घालू शकतो का यासंबंधी आयजीआरसमवेत चर्चा केली आहे. राज्य स्तरावर फक्त एकमेव अधिकारी कार्यरत असून त्यांच्यासमोर अशा प्रकारचे रिव्ह्यू होतात. या संदर्भात त्या अधिकाऱ्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, त्यांचेकडे अनेक केसेस प्रलंबित आहेत. त्यामुळे खूप प्रयत्न केले तरी ठराविक कालावधीत किंवा एक वर्षात सदर प्रकरणे निकाली काढू शकेल असे वाटत नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या संदर्भात २ वर्षांमध्ये कार्यवाही करावी याकरिता ५ वर्षांचा कालावधी घेऊ नये काही रिजनेबल टाईम करून द्यावा. या संदर्भात डेप्युटी रजिष्ट्रार किंवा रजिष्ट्रारकडे कामे द्यावीत सर्व प्रकरणे पुण्यापर्यंत पाठविण्याची गरज नाही. या संदर्भात काही तरी सिस्टीम डेव्हलप करावी अशी समितीची भूमिका असल्याचे समितीने अवगत केले असता, सदर केसमध्ये कशा प्रकारची कालमर्यादा घालू शकतो यासंबंधी आयजीआरसमवेत चर्चा करून अशा प्रकारे व्यवहारिक कालमर्यादा घालण्यासंबंधी शासनाकडून विचार केला जाईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

चुकीची माहिती देणारा आणि ती माहिती गृहीत धरणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे असे समितीचे मत असल्याचे सांगितले. आपण यामध्ये व्याजाच्या रकमेचा समावेश करु शकत नाही कारण, आता आपण ५-१० वर्षानंतर व्याजाच्या रकमेचा समावेश करीत आहोत असेही समितीने विदित केले असता आम्ही त्यांना जी रक्कम सांगितलेली आहे त्यामध्ये नियमानुसार दंड वगैरे इन्क्ल्युड केलेला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. याअनुषंगाने समितीने ज्या सूचना दिलेल्या आहेत त्या प्रमाणे कार्यवाही करावी असेही विभागास अवगत केले असता विभागीय सचिवांनी सकारात्मक असल्याचे सांगितले.

१. १३. परि. क्र. ३.४.४ : मालमत्तेचे न्युन मुल्यांकन केल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, ८१ लाख ८५ हजार रुपयांची वसुली केलेली आहे. या व्यतिरिक्त एका केसमध्ये कोर्टाने स्थगिती दिलेली आहे. आपण दोन केसमध्ये ७/१२ च्या उताऱ्यावर शासनाचे नाव इन्क्ल्युड केल्याचे सांगितले आहे. समितीचे या दोन केसबाबत असे म्हणणे आहे की, आपण महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यू कोड १९६६ च्या कलम १८० आणि १८२ अन्वये ही केस जिल्हाधिकारी यांच्याकडे रेफर करून त्यांच्याकडून कार्यवाही का करून घेत नाही ? आपण जिल्हाधिकाऱ्यांकडून कार्यवाही करून घेतली पाहिजे असे समितीने सूचित केले असता, एकूण ९ प्रकरणे असून त्यापैकी पहिल्या केसमध्ये हायकोर्टाकडून स्थगिती मिळाली आहे उर्वरित ८ केसेसमध्ये वसुली झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

वसुली झालेली आहे, परंतु समितीची अशी भूमिका आहे की अशा केसेस समोर आल्या तर ७/१२ च्या उताऱ्यावर नाव नोंद न करता विभागाने महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यू कोड १९६६ च्या कलम १८० व १८२ अंतर्गत अशी प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्याकडे रेफर करून कार्यवाही करणे जास्त प्रभावकारी होईल. म्हणून विभागाने या दृष्टीने पुढे कार्यवाही करावी. आता पैसे वसूल झाल्यामुळे या दोन्ही केसचा विषय संपलेला असल्याचे समितीने विदित केले असता आमच्याकडे दोन्ही केसमध्ये धनाकर्ष आलेले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

म्हणजे ९ प्रकरणांपैकी ८ प्रकरणांमध्ये वसुली झालेली आहे आणि एका प्रकरणामध्ये हायकोर्टाने स्थगिती दिलेली आहे. लेखी माहितीमध्ये ज्या रकमा दर्शविण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये किरकोळ फरक दिसत आहे. दुसऱ्या क्रमांकाच्या केसमध्ये २५ हजार रुपये कमी प्राप्त झालेले आहेत. त्यानंतर १ हजार रुपये कमी प्राप्त झालेले आहेत. त्यानंतर ५,२६५/- ऐवजी रुपये ५,२६१/- प्राप्त झालेले आहेत या आकडेवारीमध्ये जी तफावत आहे ती आपण वाईप-आऊट करावी असे समितीने विभागास सुचित केले.

१.१४. परि. क्र. ३.४.५ बाजार मुल्यांची संगणना चुकीची केल्याने मुद्रांक शुल्काची कमी अकारणी

उपरोक्त परिच्छेदासंदर्भातील वसुली झालेली आहे. परंतु, नागपूर येथील एका प्रकरणामध्ये १० हजार रुपयांची कमी वसुली झालेली आहे. रुपये ४.३१ लाख ऐवजी रुपये ४,२१,०७५ वसुली झालेली आहे या संदर्भात विभागाने खुलासा करावा असे समितीने सांगितले असता आम्ही तफावतीची जी कारणे आहेत त्याची शहानिशा करून घेऊन उर्वरित काही रक्कम राहिली असेल, काही रक्कम देय असेल तर ती वसूल करून घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

१.१५. परि. क्र. ३.४.६ बाजारमुल्य निर्धारणेसाठी भाडेदारीचा चुकीचा लाभ दिल्यामुळे मुद्रांक शुल्क आणि दंडाची कमी आकारणी :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी असे विदित केले की, या प्रकरणामध्ये जी वसुली आहे त्यासाठी मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी स्थगिती दिलेली आहे.

१.१६. परि. क्र. ३.४.७ विलेख कार्यान्वित करण्याच्या तारखेचे मालमत्तेचे बाजार मूल्य विचारात न घेतल्यामुळे शुल्काची कमी आकारणी :—

१.१७. ३.४.७.१ :

~~सदरहू परिच्छेदाबाबत~~ विभागीय सचिवांनी दिनांक १६ फेब्रुवारी २०१५ रोजी वसुली झाली असल्याचे समितीस अवगत केले.

१.१८. ३.४.७.२ :

~~सदरहू परिच्छेदाबाबत~~ विभागीय सचिवांनी दिनांक १६ फेब्रुवारी २०१५ रोजी वसुली झाली असल्याचे समितीस अवगत केले

१.१९. परि. क्र. ३.४.८ : करारनाम्यात अंतर्भुत असलेल्या विविध बाबींबाबत चुकीचे बाजारमूल्य निर्धारण केल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी :-

उपरोक्त परिच्छेदामध्ये सुद्धा वसुली झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले असता, बाजार मूल्य कमी ठरविल्यामुळे मुद्रांक शुल्क अपेक्षेपेक्षा कमी ठरविण्यात आले आहे. बाजार मूल्य कमी ठरविल्यामुळे मुद्रांक शुल्क कमी आकारले गेले आहे याबाबत समितीने विचारणा केली यावर विभागीय सचिवांनी प्रत्येक परिच्छेदामध्ये त्याची वेगवेगळी कारणे असल्याचे समितीस अवगत केले.

व्हॅल्यूएशन संदर्भात विभागाने सर्व कॉम्प्युटराईज्ड केलेले आहे या सर्व गोष्टी त्यामध्ये कव्हर होणार आहेत काय अशी पृच्छा समितीने केली असता, त्यांनी काही केसमध्ये जी मार्केट व्हॅल्यू घेतली ती चुकीच्या झोनची घेतली त्यामुळे व्हॅल्यूएशन चुकले आता व्हॅल्यूएशन मॉड्यूल वापरतो. त्यामुळे आता अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आपण मुद्रांक शुल्क कमी घेतल्यामुळे आता ते वसूल करीत आहात. परंतु, काही केसेस अशा आहेत की, त्यामध्ये जास्त मुद्रांक शुल्क आकारण्यात आले आहे. विभागाने सांगितले की, आम्ही जास्त मुद्रांक शुल्क घेतले. परंतु, मुंबईतील अशा केसेस पुणे येथे ९ महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे समितीने अवगत केले. तसेच परताव्या संदर्भातील मुद्याबाबत जर निर्णय झाला तर परतावा केला पाहिजे असे समितीने विदित केले.

ती प्रकरणे ९ महिन्यांपासून प्रलंबित आहेत. आता विभागाकडून सांगण्यात येते की,या संदर्भात नवीन धोरण निश्चित होणार आहे त्यानंतर आम्ही करु. विभागाने सांगितले की, जास्त रक्कम घेण्यात आली आहे चूक झालेली आहे. मुंबई येथील केस परतावा (Refund) मिळावा यासाठी पुणे येथे प्रलंबित आहे. आता त्यासाठी ९ महिने झालेले आहेत. आता आपण जे नवीन मॉड्यूल करणार आहात त्यांचा या प्रकरणाशी काही संबंध आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणाशी त्याचा काही संबंध नसून सन्मा. सदस्यांनी स्पेसिफिक प्रकरण नजरेस आणून दिले तर आम्ही त्याला एक्स्पीडाईट करु असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आपण रक्ताच्या नात्यामध्ये २ टक्के मुद्रांक शुल्क चार्ज करतो. तत्कालिन महसूल मंत्री यांनी १०० किंवा ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर रक्ताच्या नात्यातील जमिनींचे व्यवहार होतील असा निर्णय घेतला होता. आता रक्ताच्या नात्यातील जमिनींचे व्यवहार २ टक्के मुद्रांक शुल्क आकारुन होतात का १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर होतात अशी विचारणा समितीने केली असता, तो निर्णय अजूनही लागू असून तो निर्णय अतिशय स्पष्ट आहे. तो निर्णय ॲग्रीकल्चरल जमीन आणि रहिवाशी जमीन यापुरताच मर्यादित आहे तो निर्णय वाणिज्यिक प्रॉपर्टी किंवा औद्योगिक प्रॉपर्टीसाठी लागू नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्र.३.४ मधील सर्व मुद्दे शॉर्ट रिकव्हरिचे आहेत हे लक्षात आले म्हणून वसुली होते. परंतु, हे लक्षात आले नाही तर वसुली होत नाही. यासाठी इंटरनल ऑडिटची सिस्टीम आहे किंवा नाही, हे सुद्धा महत्त्वाचे आहे. कारण, महालेखाकारांनी हे लक्षात आणून दिल्यानंतर आपण ९५ टक्के वसुली केलेली आहे. आपण यासाठी जनरल इंटरनल ऑडिट सिस्टीम उभारली आहे किंवा काय वस्तुस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता इंटरनल ऑडिटचा वेगळा विंग नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

मग हे कोण बघणार आहे ? It is a very big flaw असे समितीने विदित केले तसेच असे होत असेल तर मोक्काच लावला पाहिजे. It is organized crime असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाकडे दोन डेस्क आहेत आणि इन्स्पेक्शन करणे हेच त्यांचे काम आहे. ते अशा प्रकारचे इन्स्पेक्शन करतात आणि अशा प्रकारे कोठे शॉर्ट लेव्ही झाली असेल तर ते नजरेस आणून देतात. यासाठी दोन डेस्क आहेत आणि ते आयजीआर यांच्या कार्यालयात असून डिव्हीजन आणि जिल्हा स्तरावर देखील अशा प्रकारचे विंग्ज आहेत आणि ते इन्स्पेक्शन करतात असे विभागीय सचिवांनी सांगितले

समितीची अशी सूचना आहे की, जेथे १ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे व्यवहार होतात, आपण कंपनी ॲक्ट अनुसार शासनाच्या बऱ्याच कंपन्या चालवितो, त्यासाठी ऑडिटर कम्पल्सर. आपण १० कोटी, १५ कोटी अशी ठराविक रक्कम निश्चित करावी. ज्या डिपार्टमेंटमध्ये १० कोटी, १५ कोटी रुपये वार्षिक रेव्हेन्यू मिळतो तेथे आपण बाहेरचे ऑडिटर नेमून त्यांच्याकडून ऑडिट करून घेण्याबाबत काही व्यवस्था करणार आहात काय ? आपल्याला यासाठी जास्त खर्च येणार नाही असे केले तर शासनाचा खूप मोठा फायदा होणार आहे ? आपल्याकडे आता जी कॉम्प्युटराईज्ड सिस्टीम आहे त्यामध्ये जे दर निश्चित केलेले आहेत त्या व्यतिरिक्त रजिस्ट्रार स्वीकारत नाहीत. आता रजिस्ट्रीची नवीन सिस्टीम आलेली आहे त्यामुळे घोळ होण्याचा प्रश्नच नाही. त्यांनी कोणत्या झोनमध्ये किती दर राहणार आहेत, दर कसे राहणार आहेत याबाबत नवीन सिस्टीम तयार करून घेतलेली आहे. ते नियमानुसार काम करतात परंतु, त्यावर कोठे तरी चेक असला पाहिजे. यासंदर्भातील अधिकार त्यांना आहेत, ते लोक ऑक्युपाईड आहेत किंवा नाहीत, ते ब्लड रिलेशनमध्ये आहेत किंवा नाहीत. या इमारती अतिक्रमित आहेत, भाडेकरु तेथे राहत आहेत, त्यांची व्हॅल्यूएशन अमुक इतकी आहे. या इमारतीची जमीन सीआरझेडमध्ये आहे त्यांची किंमत अमुक आहे या सर्व बाबी तपासण्यासाठी खाजगी ऑडीटर नियुक्त करण्यात यावा असे समितीने विदित केले असता, आयजीआर कार्यालय, विभागीय स्तर व क्षेत्रीय स्तरावर अशा प्रकारची यंत्रणा आहे, ही यंत्रणा अतिशय प्रभावीपणे वापरण्याची आवश्यकता आहे. याबाबत सविस्तर आढावा घेण्यात येईल ही यंत्रणा सक्षम करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

रुपये १० कोटी पेक्षा जास्त महसूल कलेक्शन मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून जेथे होते तेथे खाजगी ऑडीटर किंवा अकाऊन्टट यांच्या माध्यमातून तपासणी करण्यात यावी अशी शिफारस समितीने शासनाकडे करावी असे मत समितीने व्यक्त केले. तसेच समितीने केलेल्या सूचनेचा विचार विभागाने करावा असेही विभागास सूचित केले.

अभिप्राय व शिफारशी :—

१.२०. ३.४.१ " दस्तऐवजांच्या चुकीच्या वर्गीकरणामुळे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्कांची कमी आकारणी "

अभिप्राय

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या जमिनीचा मुखत्यारनामा दस्तावेज दि.६ जून,२००८ ला निष्पादित करण्यात आला, ज्यामध्ये विकासकाला, सदर मालमत्तेची विक्री, विक्री पत्र/अभिहस्तांतरण खरेदीदाराला/सहकारी संस्थेला करून देण्याचे अधिकार देण्यात आले, यासाठी अंमलबजावणीदाराने फेब्रुवारी, १९९४ मध्ये भूधारकाकडून जमिनीच्या विकासाचे व इतर अधिकार मुखत्यारनाम्याव्दारे प्राप्त केले होते. त्यामुळे हा अभिलेख अनुच्छेद ४८ (जी) अंतर्गत वर्गीकृत व्हावयास पाहिजे होता व रु. १.९५ कोटी बाजार मूल्यावर रु. ९.७५ लाख एवढे मुद्रांक शुल्क आकारावयास हवे होते. तसेच नोंदणी शुल्क रु. ०.३० लाख देखील आकारणीय होते. परंतु विभागाने दस्तावेजाचे ४८ (डी) अंतर्गत चुकीचे वर्गीकरण केले आणि मुद्रांक शुल्क फक्त रु. १०० आणि नोंदणी फी रु. १०० आकारली परिणामी, मुद्रांक शुल्क रु. ९.७५लाख आणि नोंदणी फी रु. ०.३० लाख कमी आकारण्यात आली असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

सदरहु आक्षेप निर्गमन परिषदेत विभागाने मान्य देखील केले व या आक्षेपाअंतर्गत वसुलीचे आदेश देखील दिले व त्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असता निकाल शासनाच्या बाजूने लागला व ही रक्कम शासनाकडे जमा करण्याचा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिला असून त्याप्रमाणे दि.६.९.२०१७ रोजी रु.१० लाख भरण्यात आले असून या प्रकरणी कारवाई पुर्ण झाल्याचे समितीसमोर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. यासंदर्भात समितीने असेही नमूद केले की, एकूण वसुलपात्र रक्कम ही रु.१०.०५ लाख इतकी असताना पक्षकाराने केवळ रु.१० लाख भरले असून यात अद्यापही रु.५ हजाराची तफावत आहे. मा.उच्च न्यायालयाने रु.१० लक्ष वसुलीचे आदेश दिले म्हणून शिल्लक रु.५०००/- बद्दल कारवाई झाली नाही. आक्षेपातील आकड्यांचा ताळमेळ योग्यरित्या होणेकरिता याबाबत शासनस्तरावरुन योग्य तो निर्णय घ्यावा असेही समितीने सूचित केले.

१.२१. शिफारस

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुसूची १ मध्ये अनुच्छेद ४८(डी) नुसार एखाद्या व्यक्तीला एकापेक्षा जास्त व्यवहार करण्यासाठी प्राधिकृत करण्यासाठी अथवा अन्य कारणासाठी मुखत्यारनामा देण्यात येतो तेव्हा मुद्रांक शुल्क रु. १०० आकारणी असेल आणि अनुच्छेद ४८(जी) च्या सुधारीत तरतूदी ज्या दि. ५ जून, २००८ पासून लागू आहे त्याप्रमाणे जेव्हा मुखत्यारनामा प्राधिकार प्रवर्तक अथवा विकासक यांना ज्या कुठल्याही नावाने ओळखली जाते यांना स्थावर संपत्तीचे विकास, बांधकाम, विक्री अथवा हस्तांतरण (कुठल्याही प्रकारचे) करण्याकरिता दिला असेल तर अनुच्छेद २५ च्या खंड (बी) (सी) अथवा (डी) प्रमाणे अभिहस्तांतरणावर आकारणीय असलेल्या मालमत्तेच्या बाजारमुल्यावर, ज्या क्षेत्रात ती मालमत्ता असेल तिला लागू असणाऱ्या दराप्रमाणे आकारणीय असेल. हे दर वार्षिक मूल्यदर विवरण पत्रामध्ये (ASR) विहित आहे. सदरहू तरतूद अतिशय सुस्पष्ट असताना विभागाने त्याची अंमलबजावणी न केल्यामुळे मुद्रांक शुल्काची आकारणी कमी झाली. न्यायालयाच्या आदेशानंतर सदरहु रक्कम आता भरण्यात आली आहे. परंतु ही आकारणी सदोषरित्या करणाऱ्या व चुकीचे वर्गीकरण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर अद्यापही विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविले नसते तर विभागाने याकडे लक्ष देखील दिले नसते व शासनाच्या महसुलाचे निश्चितच नुकसान झाले असते. अतः याप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२२. परिच्छेद क्र. ३.४.२ " चुकीचे मुद्रांक शुल्क दर लावल्यामुळे मुद्रांक शुल्क आणि दंडाची कमी आकारणी.

अभिप्राय

दिनांक २२ ऑक्टोबर, १९९६ ला दाता म्हणून धार्मिक घटकाशी आणि आदाता म्हणून दोन व्यक्ती सोबत रु. ७५ च्या स्टॅम्प पेपरवर एक सलोखा ज्ञापन एवं बक्षीस पत्र निष्पादित करून त्याची नोटरी करण्यात आली. दात्याने आदात्यास मुंबई उपनगरी जिल्ह्याच्या महानगर पालिकेच्या हद्दीत असलेल्या २७८२.८० चौरस फुट क्षेत्र असलेल्या तीन खोल्या भेट दिल्या. विभागाने एप्रिल, २००९ मध्ये अभिलेखावर अभिनिर्णय दिला आणि दाता व आदाता यांच्यात कौटुंबीय नाते असल्याचे चुकीने गृहित धरून मुद्रांक शुल्कात सवलत दिली व रु. ४४.५२ लाख बाजार मूल्यावर दोन टक्के दराने रु. ०.८९ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. १.७८ लाख दंड आकारण्याची अनुमती दिली. परंतु दाता आणि आदाता एकाच कुटूंबाचे सदस्य नव्हते, त्यामुळे मुद्रांक शुल्क १० टक्के दराने रु. ४.४५ लाख आकारावयास हवे होते. अशाप्रकारे चुकीचे मुद्रांक शुल्क दर लावल्यामुळे रु. ३.५६ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली. तसेच, प्रती माह दोन टक्के दराने मुद्रांक शुल्क तुटीच्या दुप्पट रक्कम रु. ७.१२ लाख एवढी दंडाची रक्कम आकारणीय होती. अशा प्रकारे एकूण रु. १०.६९ लाख कमी आकारण्यात आले. सदरहु आक्षेप निर्गमन परिषदेत विभागाने मान्य देखील केले.

सदरहु परिच्छेदात नमूद आक्षेप हे अत्यंत गंभीर आहेत. या परिच्छेदातील सर्व प्रकरणांचा दस्त अभिनिर्णीत असल्याने सदर प्रकरणी कलम ५३ अ खाली पुर्नविलोकनासाठी घेऊन संबंधितांना सुनावणीसाठी संधी देऊन वसुलीचे आदेश दि. २ जानेवारी,२०१८ रोजी दिले असून दि. ३ जानेवारी, २०१८ रोजी डिमांड नोटीस देण्यात आली. त्यांनी दहा दिवसांमध्ये पैसे न भरल्यामुळे पुन्हा नियम ३६ अन्वये नोटीस दिलेली असून

वसुलीची कारवाई सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. याअनुषंगाने रु.१४,२४,८००/- इतकी रक्कम वसुलपात्र आहे. या प्रकरणांमध्ये अधिक गंभीर बाब म्हणजे घरातील सदस्य व रक्ताच्या नात्यातील संबंध असेल तर बाजारमुल्याच्या २ टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारणीच्या तरतूदीची सवलत घेण्यासाठी त्यांच्यातील रक्ताचे नातेसंबंध प्रस्थापित करणारा कोणताही दस्तावेज नसताना वा तो न तपासता ही सवलत देण्यात आली. ही आकारणी अत्यंत सदोषरित्या केलेली असताना व ती विभागाने मान्य करून त्याची वसुली देखील काढलेली असताना अद्यापपर्यंत कोणत्याही संबंधित अधिकाऱ्यांवर यासंबंधीची कारवाई करण्यात आली नाही. अधिकाऱ्यांना प्राप्त स्वेच्छाधिकारांचा गैरवापर केल्याचे सदरहु प्रकरणी सकृतदर्शनी दिसून येते. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई न करण्याची कारणे काय ? अशी समितीने विचारणा केली असता महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यानंतर या प्रकरणांचे पुर्नविलोकन झाले नव्हते त्यामुळे वसुली करायची किंवा कसे हे देखील निश्चित नव्हते. आता जानेवारी,२०१८ मध्ये हे पुर्नविलोकन झालेले असून प्रथम ही वसुली प्राधान्याने करणेवर प्रथम भर देण्यात आला व यासंदर्भातील जबाबदारी देखील निश्चित करण्यात येईल. तसेच शिस्तभंगाची कारवाई देखील करण्यात येईल असे समितीसमोर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले असता अशाप्रकारे नाते लपवून अथवा खोटी कागदपत्रे सादर करून ही सवलत मिळविणे तसेच कोणतीही अधिकृत कागदपत्रे न तपासता अधिकाऱ्यांनी ही सवलत अथवा सूट देणे या प्रकरणी कलम ४२० अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता आहे असेही मत समितीने नोंदविले.

१.२३. शिफारस

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ अनुसूची १ च्या अनुच्छेद ३४ आणि २५ (b) (vi) (a) च्या तरतूदी नुसार बक्षिस विलेख (जे समझोता किंवा मृत्यूपत्र किवा हस्तांतरण नसेल) जर नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या स्थावर संपत्तीच्या संबंधात असेल तर त्या संपत्तीच्या जी त्या बक्षिस पत्राची विषय वस्तु आहे. बाजारमूल्यावर १०% दराने मुद्रांक शुल्क आकारणीय आहे. परंतु जर ही मालमत्ता घरातील सदस्याला म्हणजेच नवरा, बायको, भाऊ किंवा बहिणीला दात्याने भेट दिली असेल किंवा दात्याच्या पुढच्या किंवा मागच्या पिढितील असेल तर बाजारमूल्याच्या २% दराने मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असेल तसेच मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ कलम ३४ (a) (ii) च्या तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क तुटीच्या रक्कमेच्या २% प्रतीमहा प्रमाणे दंड विलेख निष्पादित केलेल्या तारखेपासून आकारणी असेल तर परंतु कोंणत्याही प्रकारे दंडाची रक्कम मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या रक्कमेपेक्षा दुप्पट नसावी अशी तरतूद असताना व असे व्यवहार करताना रक्ताचे नाते प्रस्थापित करणारा कोणताही दस्तावेज नसताना अथवा तो न तपासता ही सवलत देण्यात आली. परिणामी शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यातील अधिक आक्षेपार्ह बाब म्हणजे या गंभीर बाबी स्वतःहून विभागाच्या निदर्शनास अंतर्गत लेखापरिक्षणाचेवेळी आल्या तर नाहीच, पण सन २०१२-१३ या वर्षात महालेखाकारांनी हे लेखे तपासून आक्षेप नोंदविल्यानंतर व विभागाने हे आक्षेप मान्य केल्यानंतरही विभागाने हा विषय गांभीर्याने घेऊन याची वसुली केली नाही. केवळ समितीने या प्रकरणी साक्ष लावल्यामुळे या प्रकरणांचे घाईघाईने पुर्नविलोकन करून वसुलीची नोटीस देण्यात आली आहे. या प्रकरणांची विभागाने अमर्याद कालावधीत कोणतीही दखल न घेतल्यामुळे ही वसुली आता अधिकच कठीण झालेली आहे व त्याहूनही गंभीर व आक्षेपार्ह बाब म्हणजे या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर विभागाने आजतागायत कोणतीही कारवाई केली नूसन या सर्व अधिकाऱ्यांना सेवेचे सर्व लाभ घेण्याची संधी उपलबध करून दिली. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

अतः या सर्व प्रकरणांची तपासणी करून तसेच महसूलीस्तरावर प्रलंबित असलेले अपिल किंवा पुर्नविलोकनाची प्रकरणे तात्काळ कालबध्द पध्दतीने निकाली काढण्यात यावीत. तसेच महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल काही प्रकरणांची तपासणी केली असता या गंभीर बाबी निदर्शनास आल्या. राज्यात अन्यत्र देखील अशी प्रकरणे आढळून येण्याची शक्यता आहे. अतः आजतागायतची अशी सर्व प्रकरणे देखील तपासण्यात यावीत व वसुलपात्र रक्कम तात्काळ वसुल करण्यात यावी व सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२४. परिच्छेद क्र. ३.४.३ " मालमत्तेच्या बाजारमुल्याचे निर्धारण चुकीचे केल्याने मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

अभिप्राय

नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीतील ६१७०.२४ चौ.मीटर जमिनीच्या विक्रीसाठी दिनांक ३१ डिसेंबर, २००९ ला दोन विक्रीपत्र निष्पादित करण्यात आले. विभागाने मालमत्तेचे बाजार मूल्य रु. १.२२ कोटी निर्धारित केले होते, परंतु त्यापेक्षा विक्री मोबदला रु. २.०९ कोटी जास्त असल्यामुळे त्यावर रु. ११.४७ लाख मुद्रांक शुल्क आकारण्यात आले.

परंतु मालमत्ता ज्या क्षेत्रात स्थित आहे त्या क्षेत्राच्या दरानुसार जमिनीचे योग्य बाजार मूल्य रु. ४ कोटी इतके येते व त्यावर रु. २२.०१ लाख एवढे मुद्रांक शुल्क आकारणीय आहे. मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या चुकीच्या निर्धारणेमुळे रु. १०.५४ लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महालेखाकारांनी सदरहु आक्षेप निदर्शनास आणल्यावर सह जिल्हा निबंधक आणि जिल्हाधिकारी मुद्रांक, नागपूर यांनी अभिक्षण मान्य केले आणि सह दुय्यम निबंधक-VI, नागपूर यांना मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ कलम ३२A नुसार वसूलीची कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. उपरोक्त आक्षेपित दोन्ही दस्तातील वसुली झालेली असल्याचे समितीच्या साक्षीदरम्यान विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

१.२५. शिफारस

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८, अनुच्छेद २५ (b) (V) अनुसार मालमत्तेचे खरे बाजार मूल्य जे अभिहस्तांतरणाचे विषय वस्तु आहे अथवा विलेखामध्ये नमूद मोबदला यापैकी जे जास्त असेल त्यावर पाच टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारावयास हवे. हे दर ASR मध्ये विहीत केले आहेत. नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीतील मालमत्तेच्या खऱ्या बाजारमूल्यावर अर्धा टक्का दराने उपकर आकारणीय आहे. परंतु या तरतूदीची अंमलबजावणी न केल्यामुळे मालमत्तेच्या बाजारमुल्याचे निर्धारण चुकीचे करण्यात आले व मुद्रांक शुल्काची कमी आकारणी केल्याचे विभागाने मान्य केले व ही वसुली देखील करण्यात आली. परंतु या सदोष आकारणीसाठी जबाबदार कोणत्याही अधिकाऱ्यावर विभागाने कारवाई केली नाही. वास्तविकतः यासंबंधी कारवाई करूनच विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर येणे आवश्यक होते. परंतु तसे न करता केवळ वसुली झाल्याचे सांगून हे आक्षेप निर्लेखित करण्याची विनंती विभाग समितीला करते ही बाब अतिशय आक्षेपार्ह आहे. केवळ वसुली करून हा विषय संपू शकत नाही. उपरोक्त तरतूद स्वयंस्पष्ट असताना त्याकडे दुर्लक्ष करून शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणाऱ्या अथवा गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना विभागाने पाठीशी घालण्याचे कोणतेही कारण नाही. तसेच महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल काही प्रकरणांची छाननी केली असता या गंभीर बाबी लक्षात आल्या आहेत. परंतु राज्यात अन्य कार्यालयांमध्ये देखील अशा अनियमितता निश्चितच असणार. तसेच उपरोक्त लेखापरिक्षण कालावधी व्यतिरिक्त आजतागायत अशी अनेक प्रकरणे झालेली असण्याची पुर्ण शक्यता आहे. अतः या सर्व प्रकरणांची विभागाने छाननी व तपासणी करून त्यातील वसुली तात्काळ करावी. तसेच विभागाने या सर्व प्रकरणी संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२६. परिच्छेद क्र. ३.४.४ " मालमत्तेचे न्युन मुल्यांकन केल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

अभिप्राय

विभागाने मालमत्तेचे न्यून मूल्यांकन केल्यामुळे रु. १०६.६४ लाख मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले. ही प्रकरणे निदर्शनास आणल्यावर विभागाने त्रुटी मान्य केल्या व मुद्रांक शुल्काचा फरक वसूल करण्याचे देखील मान्य केले व काही वसुली करण्यातही आली.

१.२७. शिफारस

मालमत्तेचे बाजारमूल्य ज्या क्षेत्रात मालमत्ता स्थित असेल त्या क्षेत्राला लागू असणाऱ्या ASR दर लावून काढण्यात येते. असे असतानाही या मालमत्तेचे न्युन मुल्यांकन केल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली व शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यानंतर एकूण ९ प्रकरणांपैकी एका प्रकरणात कोर्टाची स्थगिती आहे. दोन प्रकरणांत ७/१२ च्या उताऱ्यावर शासनाचे नाव चढविण्यात आले आहे व उर्वरित ६ प्रकरणांमधील रु.८१.८५ लाख एवढी रक्कम वसुल करण्यात आलेली असल्याचे समितीस सांगण्यात आले. महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल तपासलेल्या प्रकरणांमध्ये या गंभीर बाबी निदर्शनास आल्या. परंतु राज्यात अन्य ठिकाणी देखील अशी सदोष आकारणी केल्याची पुर्ण शक्यता आहे. तसेच लेखापरिक्षण झालेल्या कालावधीच्या नंतरही आजतागायत अशी प्रकरणे असल्याची निश्चितच पुर्ण शक्यता आहे. अतः विभागाने अशा सर्व प्रकरणांची तपासणी करावी व वसुलपात्र रक्कम तात्काळ वसुल करावी. तसेच ही आकारणी अधिकाऱ्यांकडून मॅन्युअली होत असल्यामुळे त्यात अनेक ठिकाणी गंभीर चुका झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. किंबहुना यात गैरव्यवहार देखील झालेला असण्याची पूर्ण शक्यता आहे. अतः ही संपुर्ण मुद्रांक शुल्क आकारणी संगणकीय आज्ञावलीच्या माध्यमातून अद्ययावत पध्दतीने करण्याबाबतच्या यंत्रणेची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी व यात स्वेच्छाधिकार मानवी हस्तक्षेप टाळावा. तसेच सदरहु आक्षेपित परिच्छेदासंदर्भात जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२८. परिच्छेद क्र. ३.४.५ " बाजारमुल्यांची संगणना चुकीची केल्याने मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

अभिप्राय

मालमत्तेच्या बाजार मूल्याची संगणना चुकीची केल्याने रु. ११.९३ लाख मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले. महालेखाकारांनी निदर्शनास आणल्यावर विभागाने सदरहू त्रुटी मान्य केल्या आणि मुद्रांक शुल्काच्या फरकाची वसुली करण्याचेही मान्य केले असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

१.२९. शिफारस

बाजारमुल्याची संगणना चुकीची केल्याने मुद्रांक कमी आकारणी केल्याप्रकरणी महालेखाकारांनी हे आक्षेप निदर्शनास आणल्यावर विभागाने या त्रुटी मान्य केल्या आणि मुद्रांक शुल्काच्या फरकाची वसुली करण्याचे देखील मान्य केले. त्याअनुषंगाने वसुली केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु साक्षीदरम्यान आक्षेपित रक्कम व वसुल केलेल्या रकमेत तफावत दिसून आल्यामुळे या तफावतीची रक्कम व त्यामागील कारणांची शहानिशा करून उर्वरीत देय रक्कम वसुली करणेबाबत समितीस

आश्वासित करण्यात आले. त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी. परंतु केवळ वसुली केली म्हणजे विषय संपला असे नसून व सदरहु आक्षेप सन २०१२-१३ या वर्षासाठी नोंदविलेले असताना अशाप्रकारे बाजारमुल्याच्या कमी निर्धारणेसाठी समितीच्या साक्षीला येईपर्यंत संबंधितांवर कोणतीही जबाबदारी विभागाकडून निश्चित करण्यात आली नाही ही देखील गंभीर बाब आहे. महालेखाकारांनी सदरहु सर्व परिच्छेदांमध्ये नोंदविलेल्या आक्षेपांमध्ये मुद्रांक शुल्काची आकारणी कमी झाल्याबाबत आक्षेप नोंदविण्यात आले आहेत व विभागाने ते मान्यही केले व रक्कम वसुलही केली. परंतु कोणत्याही प्रकरणांमध्ये अधिकाऱ्यांवर कारवाई केली नाही, ही देखील अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह बाब आहे. विभागाने या सर्व अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे कोणतेही कारण नाही. अतः या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल काही निवडक प्रकरणांची तपासणी केली असता या गंभीर बाबी निदर्शनास आल्या व कोट्यावधी रुपयाच्या महसूलाची वसुली झाली. अतः अशाप्रकारे सदोष आकारणी केलेल्या अन्य सर्व प्रकरणांची देखील तपासणी करावी व वसुली करून अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.३०. परिच्छेद क्र. ३.४.६ " बाजारमुल्य निर्धारणेसाठी भाडेदारीचा चुकीचा लाभ दिल्यामुळे मुद्रांक शुल्क आणि दंडाची कमी आकारणी "

अभिप्राय :—

मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीतील ताडदेव विभागात स्थित असलेल्या ४२२७.३१ चौ.मीटर क्षेत्राचा दिनांक ५ जून, २००८ ला निष्पादित करण्यात आलेला विकास करारनामा विलेख जिल्हाधिकारी मुद्रांक, मुंबई यांच्या व्दारे फेब्रुवारी, २०११ मध्ये अभिनिर्णीत करण्यात आला. जरी मालमत्ता भाडेतत्वावर दिली असे नमूद केले होते तरी विलेखाच्या मसुदयात भाडेकरूने व्यापलेले क्षेत्र, वसूल केलेले भाडे, भाडेदारीचा पुरावा आणि नवीन इमारतीत भाडेकरूंना दयावयाच्या जागेचा उल्लेख नव्हता. विभागाने भाडेदारीचा लाभ देऊन मालमत्तेचे रु. १.०९ कोटी एवढे चुकीचे बाजार मूल्य निर्धारीत केले आणि रु. ५.४४ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. ३.४८ लाख दंड आकारला. परंतु रु.६७,७०० प्रति चौ.मीटर या दराने मालमत्तेचे अचूक बाजार मूल्य रु. २८.६२ कोटी होते आणि त्यावर रु. १.४३ कोटी मुद्रांक शुल्क आणि जून, २००८ ते मार्च, २०१३ पर्यंतच्या अवधीसाठी रु. १.५९ कोटी दंड आकारावयास पाहिजे होता. त्यामुळे रु. १.३८ कोटी मुद्रांक शुल्क आणि रु. १.५६ कोटी दंड कमी करण्यात आला.

१.३१. शिफारस

ASR च्या सूचना २२ अनुसार भाडयाने दिलेल्या मालमत्तेवर भाडेकरू लाभ फक्त तेव्हाच उपलब्ध असेल जेव्हा भाडेकरु मागील पाच वर्षापासून भाडेकरु असल्याच्या पुराव्यादाखल विहीत असलेल्या आठ पैकी दोन दस्तऐवज उपलब्ध करून देवू शकेल आणि ते त्या विलेखाचा भाग असावयास पाहिजे तसेच विलेखात भाडेकरूने कब्जा केलेल्या क्षेत्राचा विस्तृत तपशील विलेखात दाखवावयास हवा. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८, कलम ३४ (a) (ii) च्या तरतूदीनुसार मुद्रांक शुल्क तुटीच्या रकमेच्या दोन टक्के प्रतिमास याप्रमाणे शास्ति विलेख निष्पादीत केल्याच्या तारखेपासून आकारणीय आहे. परंतु कोणत्याही प्रकारे दंडाची रक्कम मुद्रांक शुल्क तुटीच्या रकमेपेक्षा दुप्पट नसावी. सदरहू तरतूद स्वयंस्पष्ट असताना ही आकारणी सदोष करून कमी वसुली करण्यात आली. सदर दस्त मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांनी अभिनिर्णीय केला असल्याने प्रकरण महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ५३ अ नुसार पुर्नविलोकनासाठी घेऊन सुनावणी नंतर वसुलीचा निर्णय दि.२४ ऑगस्ट २०१६ रोजी घेतली असता या निर्णयाविरुध्द संबंधित पक्षकार यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन नं.१०४४/२०१७ ने याचिका दाखल केली आहे. मा.न्यायालयाने वसुलीसाठी स्थगिती दिलेली आहे. अतः या प्रकरणाचा विभागाने योग्य तो पाठपुरावा करावा. तसेच एकूण रु.२.९४ कोटीची वसुलीचा प्रश्न असल्याने या प्रकरणी सुनावणीसाठी निष्णात विधीतज्ञाची नेमणूक करावी व न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून योग्य तो निर्णय घेण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.४.७.१ " विलेख कार्यान्वित करण्याच्या तारखेचे मालमत्तेचे बाजार मुल्य विचारात न घेतल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

१.३२. अभिप्राय

दिनांक २३ डिसेंबर,२००८ ला पुणे महानगरपालिका क्षेत्रातील बाणेर येथे स्थित ५६५० वर्ग मीटर जमिनीचा अभिहस्तांतरण विलेख खरेदीदार आणि विक्री करणारा यांच्यात रु. ३३.९० लाख मोबदला बदल्यात निष्पादित करण्यात आला. विभागाने मालमत्तेचे बाजार मूल्य रु. ४३.९० लाख निर्धारित केले व त्यावर रु. २.२० लाख मुद्रांक शुल्क आकारले. बाजार मूल्य संगणनेचे तपशिल अभिलेख्यांवर उपलब्ध नव्हते. जेव्हा की, सन २००८ च्या वार्षिक मूल्य दर विवरण तक्त्यानुसार (ASR) मालमत्तेचे अचूक बाजार मूल्य रु. २.६१ कोटी होते त्यावर ५% दराने रु. १३.०६ लाख मुद्रांक शुल्क आकारणीय होते. त्यामुळे रु. १०.८६ लाख मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले.

१.३३ परिच्छेद क्र. ३.४.७.२ तसेच दिनांक २१ ऑगस्ट, २००८ ला पुणे महानगरपालिका क्षेत्रातील घोरपडी स्थित १५२९०.९७ चौ. मीटर जमिनीचा अभिहस्तांतरण विलेख, खरेदीदार आणि विक्री करणारा यांच्यात रु. ३.५० कोटी मोबदला बदल्यात निष्पादित करण्यात आला. विभागाने मालमत्तेचे बाजार मूल्य रु. ३.३१ कोटी निर्धारित केले परंतु मोबदला रक्कम जी बाजार मूल्यापेक्षा जास्त आहे, त्यावर रु. १७.५० लाख मुद्रांक शुल्क आकारले. जेव्हा की, सन २००८ च्या ASR नुसार मालमत्तेचे अचूक बाजार मूल्य रु. ५.०९ कोटी होते त्यावर पाच टक्के दराने रु. २५.४४ लाख मुद्रांक शुल्क आकारणीय होते. त्यामुळे रु. ७.९४ लाख मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले.

१.३४ शिफारस

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम २ (na) नुसार कोणतीही मालमत्ता जी एखाद्या विलेखाची विषय वस्तू आहे, तिचे बाजारमूल्य म्हणजे ती किंमत जी विलेख निष्पादीत होण्याच्या तारखेला खुल्या बाजारात विकली असता मिळेल. तसेच, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अनुसुची अनुच्छेद २५ (b) (vi) अनुसार मालमत्ता, जी अभिहस्तांतरणाची विषय वस्तू आहे. तिचे खरे बाजारमूल्य अथवा विलेखात नमूद मोबदला यापैकी जे जास्त असेल त्यावर पाच टक्के दराने मुद्रांक शूल्क आकारणीय आहे अशी स्पष्ट तरतूद असताना अधिकाऱ्यांनी विलेख कार्यान्वित करण्याच्या तारखेचे मालमत्तेचे बाजारमुल्य विचारात न घेतल्यामुळे मुद्रांक शुल्काची आकारणी कमी होऊन शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले आहे. सदरहू दोन्ही प्रकरणांतील वसुली पूर्ण झालेली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

परंतु, या सदोष आकारणीसाठी जबाबदार कोणत्याही अधिकाऱ्यावर विभागाने कारवाई केली नाही. वास्तविकतः यासंबंधी कारवाई करूनच विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर येणे आवश्यक होते. परंतु तसे न करता केवळ वसुली झाल्याचे सांगून हे आक्षेप निर्लेखित करण्याची विनंती विभाग समितीला करते ही बाब अतिशय आक्षेपार्ह आहे. केवळ वसुली करून हा विषय संपू शकत नाही. उपरोक्त तरतूद स्वयंस्पष्ट असताना त्याकडे दुर्लक्ष करून शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणाऱ्या अथवा गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना विभागाने पाठीशी घालण्याचे कोणतेही कारण नाही. तसेच महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल काही प्रकरणांची छाननी केली असता या गंभीर बाबी लक्षात आल्या आहेत. परंतु राज्यात अन्य कार्यालयांमध्ये देखील अशा अनियमितता निश्चितच असणार. तसेच उपरोक्त लेखापरिक्षण कालावधी व्यतिरिक्त आजतागायत अशी अनेक प्रकरणे झालेली असण्याची पूर्ण शक्यता आहे. अतः या सर्व प्रकरणांची विभागाने छाननी व तपासणी करून त्यातील वसुली तात्काळ करावी. तसेच विभागाने या सर्व प्रकरणी संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.३५ परिच्छेद क्र. ३.४.८ " करारनाम्यात अंतर्भूत असलेल्या विविध बाबींबाबत चुकीचे बाजारमूल्य निर्धारण केल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी "

अभिप्राय

मुंबई क्रिकेट असोसिएशन (BCA) आणि गरवारे क्लब हाऊस, मुंबई यांच्यात मार्च, २००५ मध्ये पुढील चार निरनिराळया बाबीवर समझोता ज्ञापन आणि संमती अटी निष्पादित करण्यात आल्या. १) ५८३९८.३६४ चौ.फुट क्षेत्राचा अनिश्चित कालावधीसाठी उप-भाडेपट्टा, २) गरवारे क्लब हाऊसच्या सभासदासाठी रु. १.२० कोटीच्या प्रदानानांतर ६००० आसन कायम आरक्षीत रु. वण्याचे हक्क हस्तांतरण, ३) १,००,००० चौरस फुट FSI वर बांधकाम आणि, ४) लॉनचा वापर मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांनी या मालमत्तेची रु. ५.५३ कोटी इतकी किंमत काढली आणि त्यावर ५ टक्के दराप्रमाणे रु. २७.५४ लाख मुद्रांक शुल्क आकारले. तथापि, या प्रकरणामध्ये विविध बाबी अंतर्भूत असल्यामुळे मुद्रांक शुल्क आकारण्यासाठी स्थावर मालमत्तेची किंमत रु. १२.२४ कोटी एवढी येते आणि त्यावर ५% दराने रु. ६१.२० लाख मुद्रांक शुल्क आकारणीय आहे. जंगम संपत्तीचे मूल्य रु. १.२० कोटी एवढे येते व त्यावर तीन टक्के दराने रु. ३.६० लाख मुद्रांक शुल्क आकारणीय आहे. अशाप्रकारे, एकूण आकारणीय मुद्रांक शुल्क रु. ६४.८० लाख इतके आहे. याशिवाय रु. १७.८३ लाख दंडाची रक्कम सुद्धा आकारणीय आहे. परंतु या ऐवजी रु. २७.६४ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. ४.४२ लाख दंड आकारून वसूल करण्यात आले. ज्याचा परिणाम रु. ३७.१५ लाख एवढे मुद्रांक शुल्क आणि रु. १३.४१ लाख एवढी दंड रक्कम कमी आकारण्यात झाला.

१.३६ शिफारस

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, च्या कलम ५ अनुसार निरनिराळया बाबींचा समावेश असलेला किंवा विविध बाबींशी निगडीत असलेल्या कोणत्याही विलेखावर प्रत्येक बाबींशी निगडीत असलेल्या शुल्काची मिळून एकूण शुल्क आकारणी होईल. कलम ३४ (a) (ii) प्रमाणे मुद्रांक शुल्क तुटीच्या रकमेच्या दोन टक्के प्रतिमाह या दराने दंडसुध्दा आकारणीय आहे, जी कोणत्याही प्रकारे तुटीच्या

रकमेच्या दुप्पटीपेक्षा जास्त नसावी अशी स्पष्ट तरतूद असताना अधिकाऱ्यांनी करारनाम्यात अंतर्भूत असलेल्या विविध बाबींबाबत चुकीचे बाजारमुल्य निर्धारण केल्यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली. परिणामी शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाची हानी झाली. परंतु समितीसमोर साक्षीदरम्यान सदरहू वसुली झाल्याचे सांगण्यात आले. परंतु सदरहू प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई विभागाने केली नाही. वास्तविकतः वसुलीप्रमाणेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करूनच विभागाने समितीसमोर साक्षीसाठी येणे आवश्यक असताना विभागाने अशा गंभीर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली नाही ही बाब अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह आहे. अतः या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देयात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.३७ सर्वसाधारण शिफारस

१) महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेल्या सर्व परिच्छेदांची समितीने विस्तृत छाननी केली आहे. या सर्वच प्रकरणांमध्ये नियमानुसार आकारणी होणे अपेक्षित असताना त्याची आकारणी कमी करण्यात आली. त्यामुळे शासनाच्या महसूलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसानही झाले होते. महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदविल्यानंतर विभागाने या सर्व प्रकरणी कोट्यवधी रुपयांची वसुली केलेली आहे. तसेच या आक्षेपांची व्याप्ती ही महालेखाकारांनी नोंदविलेल्या कालावधीपुरती व आक्षेपांपुरती मर्यादीत न राहता ती राज्यभर अन्य कार्यालयांमध्ये देखील अशाच आक्षेपार्ह पद्धतीनेआकारणी होत असण्याची पूर्ण शक्यता आहे. अतः या सर्व प्रकरणांची छाननी करणेसाठी विशेष पथकाद्वारे धडक कृती कार्यक्रम कालबद्धरित्या करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. शासनाच्या अधिकाऱ्यांनी शासनास प्राप्त होणाऱ्या महसुलाबाबत सतर्क व सजग राहणे आवश्यक असताना या सर्व प्रकरणांमध्ये कराची आकारणी चुकीची करण्यात आली. यात संबंधित अधिकाऱ्यांचे संगनमत, हातमिळवणी व गैरव्यवहार झालेला असल्याची पूर्ण शक्यता आहे. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविले नसते तर ही वसुली देखील झाली नसती. अतः याबाबत समिती तीव्र नाराजी व नापसंती व्यक्त करीत आहे. शासनाने याची गंभीर दखल घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.३८ २) विभागामध्ये अंतर्गत लेखापरिक्षण यंत्रणा कमकुवत व सक्षम नसल्यामुळे या गंभीर अनियमितता घडल्या आहेत व हे आक्षेप नोंदविण्यात आले आहे. ही आकारणी कमी झाल्याची बाब प्रथम विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षणामध्येच निदर्शनास येणे आवश्यक व अभिप्रेत होते. तरीही या गंभीर बाबी विभागाच्या निदर्शनास न आल्यामुळे गैरव्यवहाराची शंका घेण्यास पूर्ण वावा आहे. अंतर्गत लेखापरिक्षणासाठी स्वतंत्र कक्ष विभागात अस्तित्वात असताना या मालमत्तेचे मुल्यांकन, कराची आकारणी व वसुलीबाबत निश्चितच विभागांतर्गत नियंत्रणाचा अभाव दिसून येतो. अशावेळी या अंतर्गत लेखापरिक्षणाबाबतची विश्वासार्हताच प्रश्नांकीत झालेली आहे. विभागाने आता या मुल्यांकन व आकारणीच्या कार्यपद्धतीचे संगणकीकरण झालेले असल्यामुळे भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता फार कमी आहे. तरीही ही कार्यप्रणाली अत्यंत अद्ययावत, पारदर्शक व मानवी हस्तक्षेप विरहीत करण्यात यावी व त्याची सक्षमरित्या अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच अंतर्गत लेखापरिक्षण पद्धती अधिक सक्षम व गुणवत्तापूर्ण करण्यात यावी. तसेच भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विभागाने रु. १० कोटी पेक्षा जास्त मुद्रांक शुल्काची वार्षिक महसुली उलाढाल असलेल्या विभागासाठी बाह्य लेखापरीक्षकाकडून हे लेखापरिक्षण करून घेण्याची यंत्रणा निर्माण करण्यात यावी व ती प्रभावीपणे अंमलात आणण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.१ परिच्छेद क्र. ४.२ " वाटप केलेल्या शासकीय जमिनींचे भोगवटा मूल्य, भाडेपट्टयाचे दर आणि अनर्जित उत्पन्न यांची आकारणी करण्याकरिता बाजार मूल्य निर्धारण "

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ४.२ " वाटप केलेल्या शासकीय जमिनींचे भोगवटा मूल्य, भाडेपट्टयाचे दर आणि अनर्जित उत्पन्न यांची आकारणी करण्याकरिता बाजार मूल्य निर्धारण " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

२.२ परिच्छेद क्र. ४.२.४.१ भोगवटा मूल्य कमी आकारणे किंवा आकरणी न करणे.

सप्टेंबर, २००९ मध्ये महसूल व वन विभाग व्दारे मौजे चितापूर, ता. व जि. भंडारा ४४.६८ हे. जमिनीचे वाटप २०६ COBRA बटालियनच्या कॅम्पच्या बांधकाम करण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दलास (CRPF) आगाऊ ताबा देऊन करण्यात आली. R&FD ने अंतिम आदेश दिले. (मार्च, २०१०) ज्यामधील अटीनुसार भोगवटा मूल्याची वसुली चालू बाजार भावाप्रमाणे करून आगाऊ ताबा द्यावयाच्या वेळी भरलेली भोगवटा मूल्याची रक्कम वजा करून भोगवटा मूल्याची वसुली करावयाची होती.

जिल्हाधिकारी भंडारा यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत (जानेवारी, २०१३) असे आढळून आले की, जमिनीचा आगाऊ ताबा सप्टेंबर, २००९ मध्ये देण्यात आला होता. जिल्हाधिकारी भंडारा यांनी अंतिम आदेश एप्रिल, २०११ मध्ये निर्गमित करून त्याच दिवशी भोगवटा मूल्य रु.६०.३२ लाख भरण्याचे मागणी पत्र निर्गमित केले. परंतु सदर रक्कम CRPF यांनी जमा केली नाही. (जानेवारी २०१३)

ही जमीन २०६ CoBRA बटालियनाच्या कॅम्प बांधकामासाठी म्हणजेच अकृषक कामासाठी वापरल्यामुळे भोगवटा मूल्याचे निर्धारण ASR मध्ये अकृषक जमिनीसाठी विहित केलेल्या दराच्या ५० टक्के दराने व्हावयास पाहिजे होते. परंतु लेखापरिक्षणात असे आढळून आले की, मागणी केलेली रु.६०.३२ लाख एवढी रक्कम ASR मधील कृषक कामासाठी वापरण्यासाठी लागू असणाऱ्या प्रति हेक्टर कृषक दरानुसार होती. अकृषक कामासाठी ASR मध्ये दर प्रति चौरस मीटर (चौ.मी.) प्रमाणे विहित केलेला होता म्हणजे अकृषकचा दर लावून जमिनीचे बाजारमूल्य रु.२.०८ कोटी इतके काढावयास हवे होते. परिणामतः रु.१.४८ कोटीची कमी मागणी करण्यात आली व पूर्वीची वसूल न झालेली व भरणा केलेली रु.६०.३२ लाख रक्कम गृहित धरुन, एकूण २.०८ कोटीची वसूली झाली नाही. सदर जागेवर युनिटचे बांधकाम पूर्णत्वाच्या मार्गावर होते (जानेवारी, २०१३).

हे निदर्शनास आणून दिल्यावर, अतिरिक्त मुख्य सचिव (ACS), R&FD यांनी (ऑक्टोबर, २०१३) अभिक्षण मान्य केले. तथापि, पुढील केलेली कारवाई कळविण्यात आली नाही (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मौजा चितापूर, ता. जि. भंडारा येथील एकूण ४४.६८ हे. आर जागा, मंजुरी आदेशामध्ये समाविष्ट अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व शासन निर्धारीत करेल ती रक्कम (कब्जेहक्काची रक्कम) भरण्यास तयार असल्याबाबतचे अभिप्रमाणित लेखी हमीपत्र पोलीस उप महानिरीक्षक, केंद्रीय रिझर्व्ह पोलीस दल, नागपूर यांच्याकडून घेऊन, उक्त जमिनीचा आगाऊ ताबा एक विशेष बाब म्हणून पोलीस उप महानिरीक्षक, केंद्रिय रिझर्व्ह पोलीस दल, नागपूर यांना क्रोबा बटालियनकरिता देण्याबाबत, शासनाचे पत्र क्र. जमीन ५००९/ प्र. क्र. १९०/ ज-८, दि.२५ सप्टेंबर २००९ अन्वये मंजुरी देण्यात आली. त्यानुसार, जिल्हाधिकारी, भंडारा यांनी क्र. कार्या-३/जमीन-/कावि/२०३०/०९, दि.२५ सप्टेंबर २००९ अन्वये उक्त जागेचा काही अटी व शर्तीच्या अधीन आगाऊ ताबा देण्याबाबत आदेश पारित केले आहेत.

उक्त जागेची रु. ६०,३१,८०० इतकी कब्जेहक्काची किंमत जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या क्र.रा.मा.क्र.२/एलएन-२२/२०१०-११, दि. १८ एप्रिल २०११ च्या आदेशान्वये निश्चित करण्यात आली होती. सदर जागेची रु. ६०,३१,८०० ऐवजी रु. १,९०,७४,००० (एक कोटी नव्वद लक्ष चौऱ्याहत्तर हजार) इतकी कब्जेहक्काची किंमत निर्धारीत करून तसे सुधारीत आदेश जिल्हाधिकारी, भंडारा यांनी क्र.कार्या-३/जमीन/सीआर/३५/१३/कावि-१/१६, दि.०४ जानेवारी २०१६ अन्वये पारित केले आहेत. व त्या अनुषंगाने कब्जेहक्काची रक्कम रुपये १,९०,७४,००० तसेच सदर कब्जेहक्काच्या रकमेवर जमिनीचा आगाऊ ताबा दिलेल्या दिनांकापासून ते तिचा भरणा करण्याच्या दिनांकापर्यंत थकित रकमेवर व्याजाची वसुली अर्जदाराकडून करण्याबाबतच्या सूचना उप विभागीय अधिकारी, भंडारा यांना दिल्या आहेत.

पोलीस उप महानिरीक्षक, केंद्रीय रिझर्व्ह पोलीस दल, नागपूर यांना उक्त जागेची कब्जेहक्काची रक्कम रु. १,९०,७४,००० व त्यावरील नियमानुसार व्याजाची रक्कम तात्काळ शासनजमा करण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच सदर रक्कम जमा करेपर्यंत व्याजाची आकारणी करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी, असे शासन पत्र क्र.-जमीन-२०१६/प्र.क्र.१५६/ज-८, दि. ८ मार्च २०१६ अन्वये त्यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार सदर रक्कम व्याजासहित वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

२.३ परिच्छेद क्र. ४.२.४.२ भोगवटा मुल्याची कमी वसुली :-

भोगाधिकारावर वितरित केलेल्या जमिनीच्या ३४ प्रकरणांच्या चाचणी तपासणीत असे अढळून आले की जिल्हाधिकारी अहमदनगर व सांगली यांनी ऑगस्ट, २००७ आणि ऑगस्ट, २००९ दरम्यान, सहा प्रकरणांत अकृषक कारणासाठी जमिनीचे वाटप केले आणि दुय्यम निबंधक/सह जिल्हा निबंधक यांनी कळविलेल्या बाजार मूल्यावर आधारित रु ४५.७९ लाख एवढे भोगवटा मुल्य आकारले. तथापि, जमीन वाटपाच्या रोजी लागू असलेल्या ASR दाराने व सूचनांचे पालन न करता बाजार मूल्याचे निर्धारण करण्यात आले. भोगवटा मूल्याची अचूक किंमत ८५.४६ लाख होती. यामुळे परिशिष्ट - **VI** मध्ये **(विवरण पत्र क्र. १)** दर्शविल्यानुसार रु ३९.६७ लाख एवढी भोगवटा मूल्याची कमी आकारणी झाली.

ACS, R&FD यांनी लेखापरीक्षा अभिक्षण मान्य (ऑक्टोबर, २०१३) केले तथापि, पुढील कार्यवाही प्राप्त झाली नाही (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

परिच्छेदामध्ये उल्लेख केलेल्या परिशिष्ट **VI** (विवरण पत्र १) मध्ये दर्शविलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील प्रकरणांतील भोगवटा मूल्याची कमी वसुलीबाबतच्या तीन प्रकरणातील वसुलीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

जमीन प्रदान केलेल्या संस्थेचे नाव	वसुलीची रक्कम	वसूल केलेली रक्कम	शिल्लक रक्कम	शेरा
प्रवरा फळे बागायात उत्पादन प्रकिया संस्था, लोणी खुर्द.	४,८८,२५०	४,८८,३०१	निरंक	महालेखापालांनी काढलेल्या परिच्छेदाच्या अनुषंगाने प्रवरा फळे बागायत उत्पादन प्रक्रिया संस्था, लोणी खुर्द यांच्याकडून कब्जा हक्क मुल्याची कमी आकारणी करण्यात आलेली रक्कम रु.१,००,००० +१,००,००० +२,८८,००० +३०१ अशी एकूण रक्कम रु. ४८८२०१ एवढी चलनाने शासनाकडे भरणा करण्यात आलेली आहे. महालेखाकारांनी नमूद केलेली संपूर्ण रक्कम प्रवरा फळे बागायात उत्पादन प्रक्रिया संस्था, लोणी खुर्द यांच्याकडून पूर्णतः वसूली झाली असल्याने सदरचे स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यात यावे, अशी विनंती आहे.
कार्यकारी अभियंता, एमएसईबी संगमनेर, (मौजे येसगांव, ता. कोपरगांव)	७२,०००	७२,०००	निरंक	महालेखापालांनी काढलेल्या परिच्छेदाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, एमएसईबी, संगमनेर यांच्याकडून कब्जा हक्क मुल्याची कमी आकारणी करण्यात आलेली रु.७२,००० एवढी रक्कम चलनाने शासनाकडे भरणा करण्यात आलेली आहे. महालेखाकारांनी नमूद केलेली संपूर्ण रक्कम कार्यकारी अभियंता, एमएसईबी, संगमनेर यांच्याकडून पूर्णतः वसूली झाली असल्याने सदरचे स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यात यावे, अशी विनंती आहे.
कार्यकारी अभियंता एमएसईबी संगमनेर, (मौजे येसगांव, ता. कोपरगांव)	१,८०,०००	१,८०,०००	निरंक	महालेखापालांनी काढलेल्या परिच्छेदाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता एमएसईबी, संगमनेर यांच्याकडून कब्जा हक्क मूल्याची कमी आकारणी करण्यात आलेली रु.१,८०,००० एवढी रक्कम चलनाने शासनाकडे भरणा करण्यात आलेली आहे. महालेखाकारांनी नमूद केलेली संपूर्ण रक्कम कार्यकारी अभियंता, एमएसईबी, संगमनेर यांच्याकडून पूर्णतः वसूली झाली असल्याने सदरचे स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यात यावे, अशी विनंती आहे.

२.४ परिच्छेद क्र. ४.२.४.२ भोगवटा मुल्याची कमी वसुली :-

भोगाधिकारावर वितरित केलेल्या जमिनीच्या ३४ प्रकरणांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की जिल्हाधिकारी अहमदनगर व सांगली यांनी ऑगस्ट, २००७ आणि ऑगस्ट, २००९ दरम्यान, सहा प्रकरणांत अकृषक कारणासाठी जमिनीचे वाटप केले आणि दुय्यम निबंधक/सह जिल्हा निबंधक यांनी कळविलेल्या बाजार मूल्यावर आधारित रु ४५.७९ लाख एवढे भोगवटा मुल्य आकारले. तथापि, जमीन वाटपाच्या रोजी लागू असलेल्या ASR दराने व सूचनांचे पालन न करता बाजार मूल्याचे निर्धारण करण्यात आले. भोगवटा मूल्याची अचूक किंमत ८५.४६ लाख होती. यामुळे **परिशिष्ट - VI** (विवरण पत्र १) मध्ये दर्शविल्यानुसार रु. ३९.६७ लाख एवढी भोगवटा मूल्याची कमी आकारणी झाली.

ACS, R & FD यांनी लेखापरीक्षा अभिक्षण मान्य (ऑक्टोबर २०१३) केले तथापि, पुढील कार्यवाही प्राप्त झाली नाही (जानेवारी, २०१४).

जमीन प्रदान केलेल्या संस्थेचे नाव	वसुलीची रक्कम	वसूल केलेली रक्कम	शिल्लक रक्कम	शेरा
एपीएमसी (कृषी उत्पन्न बाजार समिती पलूस)	१३,९५,०००	०	१३,९५,०००	शासन आदेश दि.१३ मे २००९ अन्वये दिलेल्या निदेशांनुसार जिल्हाधिकारी, सांगली यांनी दि.२ सप्टेंबर२००९ रोजीच्या आदेशाने कृषी उत्पन्न बाजार समिती पलूस यांना गट क्र.२७९/१ मधील ३ हे. ९६ आर. जमिनीपैकी २ हे. जमीन बाजार समितीच्या विस्तारीकरणासाठी वाटप केली आहे. जमिनीचा ताबा देतेवेळी कृषी उत्पन्न बाजार समिती, पलूस यांचेकडून रु. ४.७५ लाख भरून घेऊन ताबा देण्यात आला होता. महालेखापालांनी सदरच्या परिच्छेदामध्ये अकृषक कारणासाठी जमिनीचे वाटप केले असल्याने रु. १३.९५ लाख अधिकची रक्कम वसूल करण्याबाबत नमूद केले आहे. त्यानुसार कृषी उत्पन्न बाजार समिती, पलूस यांनी दि.०१ जानेवारी २०१८ रोजी रक्कम रु. ५.०० लाखाचा धनादेश बँकेत जमा केलेला असून उर्वरीत रु. ८.९५ लाखाचा धनादेश दि.०१ जानेवारी २०१८ रोजी तहसिलदार, पलूस कार्यालयाकडे जमा केला आहे. महालेखाकारांनी नमूद केलेली रक्कम कृषी उत्पन्न बाजार समिती कडून पूर्णतः वसूल झाली असल्याने सदरचे स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यात यावे.
एमएसआरटीसी पलूस (एस.टी. महामंडळ पलूस)	११,५८,५००	११,५८,५००	०	शासन आदेश दि.०७ मार्च २००९ रोजीच्या ज्ञापनानुसार जिल्हाधिकारी, सांगली यांच्या दि.११ मार्च २०१० रोजीच्या आदेशाने राज्य परिवहन महामंडळाच्या आगाराकरिता मौ.पलूस येथील गट क्र.१६० मधील १ हे. ५० आर. जमीन वाटप करतेवेळी राज्य परिवहन महामंडळाने कब्जेहक्काची रक्कम म्हणून रु. २,८६,५०० जमा केली होती. महालेखापालांनी सदरच्या परिच्छेदामध्ये नमूद केल्यानुसार रु. ११,५८,५०० एवढी रक्कम दि.२६ मे २०१६ रोजी चलनाने शासनजमा केली आहे. सदरच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेली रक्कम पूर्णतः वसूल झाली असल्याने सदरचे स्पष्टीकरण मान्य व्हावे.
बीएसएनएल तासगांव (भारतीय दूरसंचार निगम तासगांव).	६,७३,५५०	०	६,७३,५५०	शासन ज्ञापन दि.२३ ऑगस्ट २००७ नुसार मौ. तासगांव येथील सर्व्हे नं.१२९/ऐ/१ मधील ४००० चौ. मी. इतकी जमीन भारतीय दूरसंचार निगम तासगांव यांना प्रचलित बाजारभावाची किंमत आकारून आदेशाच्या दिनांकास असलेली किंमत आकारून देण्यात आली होती. बीएसएनएल यांनी रु. ६,५४,४०० इतकी रक्कम दि.३० मार्च २००२ रोजी भरणा केली आहे. तथापि, उर्वरीत कब्जेहक्काची रक्कम अधिक त्यावरील व्याज याचा भरणा केलेला नाही. उर्वरीत रु. ६,८१,३५० इतक्या रकमेचा भरणा करण्याबाबत

उपमंडळ अभियंता, बीएसएनएल यांना कळविले असता, सदर रक्कम भरण्यास त्यांनी टाळाटाळ केली आहे. म्हणून सदरची रक्कम वसूल होण्यासाठी उपमंडळ अभियंता, बीएसएनएल, तासगांव यांचे कार्यालय दि.०१ जानेवारी २०१८ रोजी सिल करण्यात आले आहे. सबब सदरचे स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यात यावे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

परिच्छेदामध्ये उल्लेख केलेल्या **परिशिष्ट " VI " (विवरण पत्र १)** मध्ये दर्शविलेल्या सांगली जिल्ह्यातील प्रकरणांतील भोगवटा मुल्याची कमी वसुली वसूलीबाबतच्या तीन प्रकरणातील वसुलीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहेच :–

२.५ परिच्छेद क्र. ४.२.४.३ भाडेपट्टा दराची वसुली न करणे/कमी वसुली.

मे २००६ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, जेथे कुठल्याही शासकीय जमिनींचे भाडेतत्त्वावर वाटप केले जाते, तेथे भाडेपट्टादर ज्या तारखेस आदेश दिले गेले त्या तारखेस ASR मध्ये विहीत केलेल्या दराप्रमाणे आकारले जाते. तसेच जुलै १९९९ च्या शासन निर्णयानुसार वार्षिक भाडेपट्टादराची परिगणना, भारतीय स्टेट बँकेने वेळोवळी जाहीर केलेल्या प्रधान सावकारी दराने (PLR) जमिनीच्या पूर्ण बाजारमूल्यावर केली जाईल.

कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) तासगांव, जिल्हा सांगलीच्या बाजार इमारतीच्या बांधकामासाठी महसूल व वन विभागाने १,२०,००० चौ.मी. जमिनीचे वाटप ३० वर्षांसाठी भाडेपट्टा जमिनीच्या बाजारमूल्यावर PLR दराने काढावयाचा होता.

जिल्हाधिकारी, सांगली कार्यालयातील अभिलेखांच्या तपासणीत (जून २०१३) असे आढळून आले की, जिल्हाधिकारी, सांगली यांनी सदर जागेच्या वाटपाचे आदेश भाडेपट्टादर प्रति वर्ष रु. ८.०३ लाख प्रमाणे रु. ६२.९६ लाख एवढ्या बाजारमूल्यावर म्हणजेच जमीन अकृषक वापरासाठी देण्यात आली असतानाही त्या भागातील अकृषक दराऐवजी प्रति हेक्टर कृषि दर लावून निर्गमित केले (नोव्हेंबर, २००८). तथापि, डिसेंबर २००८ मध्ये हस्तांतरीत केलेल्या १,१७,७०० चौ.मी. जमिनीच्या भाडेपट्ट्याची वसुली हस्तांतरणापासून APMC कडून झालेली नाही. वर्ष २००८-१३ साठी रु. ६१.८४ लाख एवढे भाडेपट्टादर वसूल करावयाचे होते.

तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, (MSRTC) पलूस, जि. सांगली यांना त्यांच्या पूर्वीच ताब्यात असलेली ३५० चौ.मी. जमीन वापरण्याची परवानगी महसूल व वन विभागाने (जून २००९) दिली. सदर जमिनीचा वापर ३० वर्षांसाठी व्यवसायिक कामासाठी जमिनीच्या बाजार मूल्यावर PLR दराने भाडेपट्टादर आकारून करण्याची परवानगी होती.

जिल्हाधिकारी, सांगली यांनी अंतिम परवानगी (ऑगस्ट, २००९) दिली आणि वर्ष २००९ साठी भाडेपट्टा दर रु. ०.२९ लाख वसूल केले परंतु त्यापुढील वर्षांसाठी भाडेपट्टा दराची वसूली करण्यात आली नाही. वर्ष २००९ साठी ही भाडेपट्ट्याची कमी वसूली झाली. एकूण रु. ४.३७ लाख एवढी रक्कम वसुलीयोग्य होती.

दोन्ही प्रकरणात भाडेपट्ट्याची वसूली न करण्यामुळे / कमी वसुलीमुळे **परिशिष्ट- VII (विवरण पत्र क्र.२)** मध्ये दर्शविल्यानुसार रु. ६५.९२ लाख एवढे भाडेपट्टादर वसूल झाले नाही.

जिल्हाधिकारी, सांगली यांनी नमूद केले (जून २०१३) की, संबंधित पट्टाधारकास नोटीस बजावून भाडेपट्टादर वसूल करण्याची कारवाई करण्यात येईल.

ACS, R & FD यांनी जिल्हाधिकाऱ्यांद्वारे भाडेपट्टा दराची वसूली केली जाईल असे मान्य केले (ऑक्टोबर २०१३) पुढील उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :–

जमीन प्रदान केलेल्या संस्थेचे नाव	वसुलीची रक्कम	वसूल केलेली रक्कम	शिल्लक रक्कम	शेरा
भोगवटा मुल्याची कमी वसुली	६१८४३८९	२००००००	४१८४३८९	कृषी उत्पन्न बाजार समिती, तासगाव यांना प्रदान केलेल्या सुमारे ३० एकर जागेबाबत भाडेपट्टा निश्चित करताना अकृषिक मुल्यऐवजी कृषक मुल्य विचारात घेऊन भाडेपट्टा दर ठरविण्याबाबत महालेखापाल यांनी आक्षेप घेतला आहे. सन २००९ ते २०१३ पर्यंत अकृषक दराने भाडेपट्ट्याची वसुली केल्यास रु. ६१,८४,३८९ इतक्या रक्कमेची थकबाकी असल्याचे परिच्छेदामध्ये नमूद केले आहे. या संदर्भात अेपीएमसी तासगाव यांनी दि. ५ ऑक्टोबर २०१७ रोजी रु. २०,००,००० रक्कम चलनाने तहसीलदार, तासगाव यांचेकडे जमा केली आहे. तद्नंतर उर्वरित रकमेसाठी सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचा अनुक्रमे रु. २०,००,००० चा धनादेश क्र. ००००८७, दि. २८ फेब्रुवारी २०१८ व रु. २१,८४,००० चा धनादेश क्र ००००८८, दि. ३१ मार्च २०१८ तहसीलदार तासगाव यांचेकडे जमा केले आहेत. अकृषक दराने सन २०१३ पर्यंतची भाडेपट्ट्याची रक्कम भरण्याची संस्थेने मान्य केले असल्याने सदरचे स्पष्टीकरण मान्य होणेस विनंती आहे.
भोगवटा मुल्याची कमी वसुली	४०८०८४	४०८०८४	०	महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला यापुर्वी वाटप केलेल्या जमिनीमधील ३५० चौ.मी. जागा ३० वर्षांसाठी व्यावसायीक वापर करण्यासाठी जमिनीच्या बाजार मुल्यावर आधारित PLR दराने भाडेपट्टा आकारून देण्यात आली होती. त्याबाबत महालेखापालानी नमूद केलेल्या रु. ४,०८,०८४ थकीत भाडेपट्ट्यांच्या रकमेबाबत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने रक्कम रु. ४,०८,०८४ इतकी रक्कम चलनाने दिनांक २६ मे २०१६ रोजी शासनाने जमा केली आहे. वरीलप्रमाणे सन २०१३ पर्यंतची थकीत भाडेपट्टीची रक्कम महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने भरली असल्याने सदरचे स्पष्टीकरण मान्य व्हावे.

२.६ परिच्छेद क्र. ४.२.५ - अधिमुल्याची कमी वसूली

“ महसूल व वन विभागाच्या दिनांक २१ नोव्हेंबर १९५७ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार अकृषिक भूखंडाचे भूधारणा पद्धतीत परिवर्तन करताना विद्यमान बाजारमूल्य आणि प्रथमतः भरणा केलेले भोगवटा मूल्य अधिक अनुदानग्राहीद्वारा जमीन विकासासाठी खर्च केलेले मूल्य यामधील फरकाच्या ५० टक्के अधिमूल्य आकारणीय असेल.”

“ आम्हाला चाचणी तपासणीत असे आढळून आले की, महसूल व वन विभागाने ५२२.१८ चौ.मी. वर्ग-II प्रकारच्या जमिनीच्या वापराबाबत बदल करून व्यावसायिक उपयोगास, जमीन मूल्याच्या ५० टक्के ऐवजी १० टक्के एवढे अधिमूल्य भरून परवानगी दिली (ऑगस्ट २००९). जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी जमिनीच्या उपयोगाबाबत बदलाला परवानगी दिली (फेब्रुवारी २०१०). परंतु, आकारणीय रु. २३.८३ लाख म्हणजे रु. ४७.६६ लाखांच्या ५० टक्केऐवजी फक्त रु. ४.७६ लाख वसूल केले यामूळे रु. १९.०७ लाख कमी आकारणी झाली. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी नमूद केले (मार्च २०१३) की, महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या (ऑगस्ट २००९) ज्ञापनानुसार १० टक्के अधिमूल्य वसूल केले गेले. त्यांनी हे सुद्धा नमूद केले की, सदर प्रकरण शासनाकडे उचित आदेशासाठी पाठविले जाईल. ही कृती १९५७ च्या शासन निर्णयाच्या विरूद्ध आहे व ऑगस्ट २००९ च्या ज्ञापनास मंत्रीमंडळाची मान्यता नव्हती. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांनी अभिक्षण मान्य केले. (ऑगस्ट, २०१३).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अर्जदार श्री. आनंदराव कोंडिबा देसाई यांना निवासी प्रयोजनार्थ मंजूर केलेल्या कोल्हापूर शहर ई वॉर्ड येथील सिटी सर्व्हे नं.११८२/७३, ई वॉर्ड क्षेत्र ५२२-१८ चौ. मी. जागेवर व्यापारी संकुल बांधण्यास परवानगी देण्याबाबत शासनाकडे केलेल्या मागणीबाबत शासन ज्ञापन क्र. जमीन-३८०४/४१४/प्र. क्र. को. २४६/ज-५, दि. १२ ऑगस्ट २००९ अन्वये वापरातील बदलासाठी जागेच्या प्रचलित बाजारमूल्याच्या किमतीच्या १० टक्के अधिमूल्य घेऊन अर्जदारांना निवासी प्रयोजनार्थ मंजूर केलेल्या जागेवर व्यापारी संकुल बांधण्यास परवानगी देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर जमीनीवर वापरातील बदलासाठी जागेच्या प्रचलित बाजारमूल्याच्या किमतीच्या १० टक्के अधिमूल्य आकारणी करून व्यापारी संकुल बांधण्यासाठी मान्यतेबाबतचे शासन ज्ञापन दि. १२ ऑगस्ट २००९ हे नगर विकास विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाने प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या आर्थिक शक्तींचा अधिकार वापरून तसेच शासन स्तरावरील मान्यतेनंतर निर्गमित करण्यात आलेले आहे.

रहिवाशी प्रयोजनाकरिता दिलेली जमीन वाणिज्यीक प्रयोजनासाठी वापरण्याकरिता किती अधिमुल्य आकारण्यात यावे, याविषयी कोणतेही शासनाचे स्वतंत्र धोरण अस्तित्वात नाही. दिनांक २१ नोव्हेंबर १९५७ चा शासन निर्णय हा नवीन शर्तीवर दिलेल्या जमिनीच्या हस्तांतरणाशी निगडीत आहे, त्यात वापर बदलापोटी अधिमुल्य आकारण्याची तरतूद नाही. म्हणून शासन ज्ञापन दिनांक १२ ऑगस्ट २००९ हे नगर विकास विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट १९९२ अन्वये प्रदान अर्थिक शक्तींचा वापर करून निर्गमित करण्यात आले आहे. सबब सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती आहे.

विभागाच्या स्पष्टीकरणावर महालेखापालांचे अभिप्राय :

As there is no provision for recovery of premium towards change in use of Non Agricultural land without change in ownership, Department may issue necessary orders to deal in such type of cases.

महालेखापालांचे अभिप्रायावरील शासनाचे अभिप्राय :

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३७ A अन्वये सुधारणा करून वापरातील बदलासाठी अधिमुल्य आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुषंगाने रहिवास वापरासाठी देण्यात आलेल्या शासकीय जमिनीचे वाणिज्य कारणासाठी वापर करण्याचे धोरण करण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रस्तावित आहे.

२.७ परिच्छेद क्र. ४.२.६ जमिनीचे अनियमित वाटप

महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ च्या नियम ६ प्रमाणे जेथे जमिनीचा वापर लाभरहीत जागेसाठी उदा. शाळा, रुग्णालय, दवाखाने आणि इतर सार्वजनिक कामाकरिता होणार असेल तर तेथे जिल्हाधिकारी भोगवटा मूल्य न आकारता जमिनीचे वाटप करू शकतात. अशा प्रकरणात रुपये २.५० लाख पर्यंत बाजारमूल्य असलेल्या जमिनीबाबत मंजुरी प्रदान करू शकतात आणि रु. ६.२५ लाख पर्यंतची मंजुरी विभागीय आयुक्त प्रदान करू शकतात. तसेच नियम ८ मध्ये असे नमूद आहे की नियम ६ अतर्गत केलेल्या प्रत्येक जमीन वाटपाचे हस्तांतरण राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येऊ शकत नाही. आम्हाला चाचणी तपासणीत (फेब्रुवारी २०१३) असे आढळून आले की जिल्हाधिकारी, भंडारा यांनी शहर क्षेत्रातील रु. २८.३९ लाख बाजारमूल्य असलेली १८०० चौ.मी. जमीन सचिव, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, भंडाऱ्याला इमारतीच्या बांधकामासाठी हस्तांतरित केली. (एप्रिल, २०१२) जमीनीचा ताबा जून, २०१२ मध्ये मोबदल्याशिवाय देण्यात आला. जिल्हाधिकारी यांनी वाटप केलेल्या जमीनीचे बाजारमूल्य रु. २८.३९ लाख निर्धारित करण्यात आले होते, ज्याचे वाटप करण्यास जिल्हाधिकारी सक्षम नव्हते. जिल्हाधिकरी यांनी शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय जमिनीचे हस्तांतरण केले जे, अनियमित होते. जिल्हाधिकारी सोसायटीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. ACS, R & FD यांनी अभिक्षण मान्य (ऑक्टोबर, २०१३) केले.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

जिल्हाधिकारी, भंडारा, यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २२ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकराचा वापर करून मौजा भंडारा येथील भंडारा/ नझूल शिट क्र. १२१/१ मधील १८०० चौ.मी जागा रा.मा.क्र. ०१/ एल.एन.ए–२२/२०१२-१३, दिनांक १९ एप्रिल २०१२ अन्वये रेड क्रॉस संस्था, जिल्हा शाखा-भंडारा यांना भवन निर्मिती करीता अभिहस्तांकित करण्याचे आदेश पारित केले होते.

तथापि, सचिव, इंडीयन रेड क्रॅास संस्था, जिल्हा शाखा-भंडारा यांनी विषयांकित जागेवर जाण्याचा रस्ता नसल्यामुळे गैरसोईची असून उक्त जागा शासनाला परत करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ३० जानेवारी २०१६ रोजीच्या संस्थेच्या कार्यकारिणी सभेत पारित केल्याचे कळविले. त्यानुसार सचिव, इंडीयन रेड क्रॅास संस्था, जिल्हा शाखा-भंडारा यांना भवन निर्मिती करीता मौजा भंडारा येथील भंडारा /नझूल शिट क्र. १२१/१ मधील १,८०० चौ.मी. अभिहस्तांकित करण्यात आलेली जागा जिल्हाधिकारी, भंडारा यांनी क्र. कार्या-३/जमीन/सीआर/०२/१४/कावि -२१९/ १६, दिनांक २४ फेब्रुवारी २०१६ च्या आदेशान्वये सरकार जमा करण्याबाबत आदेश निर्गमित केले. त्यानुसार सदर जागा शासन जमा करण्यात आली असून तशी नोंद आखीव पत्रिकेमध्ये घेण्यात आली आहे.

२.८ परिच्छेद क्र. ४.२.७.१

विभागीय आयुक्तालय, कोकण क्षेत्र यांच्या कार्यालयातील विक्री परवानगीच्या प्रकरणांच्या चाचणी तपासणीत (एप्रिल २०१३) आम्हाला असे आढळले की, विक्रीच्या परवानगी संबंधी दोन प्रकरणांत **(परिशिष्ट-VIII) (विवरण पत्र क्र.३)** वर्ग दोन प्रकारच्या जमिनीची विक्रीची परवानगी देण्यात आली. मे. झाफझा मुंबई बिझनेस पार्क (इंडिया) प्रा.लि. यांनी १५ भुधारकांकडून वर्ग-२ ची जमीन खरेदी केली आणि कर्नाळा महिला रेडिमेड गारमेंट व वस्त्रोद्योग इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी यांनी वर्ग-२ ची जमीन श्री. मधुकर महादेव भोईर यांचेकडून खरेदी केली. कोणत्याही भूधारकाकडून अनर्जित उत्पन्नाची वसुली केली गेली नाही.

दुय्यम निबंधकाकडून प्राप्त केलेल्या विक्री पत्रानुसार या व्यवहारात रुपये ६.८७ कोटी मोबदला होता. भुधारकांना रु.५.१५ कोटी (रु.६.८७ कोटीच्या ७५ टक्के) भरावयाचे होते. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांनी पुढील परिच्छेदात नमूद केलेले, चुकीचे स्पष्टीकरण निर्गमित केल्यामुळे अनर्जित उत्पन्नाची भुधारकाकडून वसुली केली गेली नाही.

अनर्जित उत्पन्नाची वसुली करण्यास जबाबदार असलेले विभागीय आयुक्त यांनी वरील मालमत्तेच्या अनर्जित उत्पन्नाचे निधारण करण्यसाठी स्पष्टीकरण मागविले (जुलै, २००९) अवर सचिव, R & FD यांनी स्पष्टीकरण दिले. (फेब्रुवारी, २०१०) की विक्री किंमतीच्या फक्त २% रक्कम खरेदी दाराकडून वसूल करावी आणि सप्टेंबर, १९८३ च्या शासन निर्णयातील तरतुदी अकृषिक जमिनीस लागू आहेत. त्यामुळे भुधारकाकडून अनर्जित उत्पन्नाची वसुली करण्यात आली नाही.

अवर सचिवांनी निर्गमित केलेले स्पष्टीकरण योग्य नव्हते. कारण शासन निर्णय हा, कृषी व अकृषक या दोन्ही हेतूसाठी कृषी जमीन विक्री झाल्यास लागू आहे. निर्गमित केलेले स्पष्टीकरण शासन निर्णयाविरुद्ध होते. ज्या मध्ये जमीन जर कृषी किंवा अकृषक हेतू करिता विक्री केली असेल तर, अनुक्रमे ५०% आणि ७५% अनर्जित उत्पन्न वसुली योग्य आहे. चुकीचे स्पष्टीकरण निर्गमित केल्यामुळे रु.५.१५ कोटी रुपयांची वसुली झाली नाही. जेव्हा की, वर्ग-२ विक्रीच्या इतर प्रकरणांमध्ये ही वसुली करण्यात आली. शिफारस करण्यात येते की, या विभागाने याबाबत सुधारित स्पष्टीकरण निर्गमित करून आधीचे स्पष्टीकरण रद्द करण्याबाबत विचार करावा.

A.C.S., R & FD यांनी (ऑक्टोबर, २०१३) असा खुलासा केला की, शासनाकडून स्पष्टीकरण मागविण्यात येईल. पुढील उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

लेखा परिक्षणामध्ये नमुद Annexure ३ मध्ये नमुद दोन प्रकरणांमध्ये मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांनी आदेश पारित केलेल्या प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ५.१५ करोड कमी अनर्जित रक्कम वसूल केलेली असलेबाबत नमूद केले आहे.

" महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३-एक-अ (दोन) मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे :—

" पोट-कलम (१) अन्वये खरेदी करण्यात येत असलेली जमीन वर्ग-२ च्या भोगवटादाराने धारण केलेली असेल त्या बाबतीत, अशा जमिनीची भूधारणापद्धती कोणतीही असली तरी खरेदीदार विक्री-विलेख करून देण्यात आल्यापासून १ महिन्याच्या आत [जमीन खरोखर औद्योगिक वापरासाठी असेल आणि ५०टक्के खेरदी किमतीवर जर ती जमीन विशेष नगर योजनेखाली असेल तर] २ टक्क्याने इतकी रक्कम जिल्हाधिकाऱ्यास देईल. हे प्रदान करतेतेळी नजराण्याऐवजी किंवा अशा वर्ग-२ च्या भोगवटादराकडून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या तरतुदीद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा देय असतील अशा इतर आकाराऐवजी असेल, त्याशिवाय अशा जमिनीचा खरेदीदार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याची कलमे ६७ व ११५ या अन्वये जिल्हाधिकारी बसविल अशा अकृषिक आकारणीची रक्कम देईल."

सदर लेखापरिच्छेदामध्ये खालील दोन प्रकरणे नमूद आहेत :—

१. मे. जाफजा मुंबई बिझनेस पार्क (इंडिया लि.) या प्रकरणात संबंधितांनी खरेदी केलेली जमीन ही १० हे. पेक्षा जास्त असल्याने विकास आयुक्त यांची परवानगी घेण्यात आलेली आहे.

२. अध्यक्ष, कर्नाळा रेडीमेड गारमेंट व वस्त्रोद्योग औद्योगिक को ऑप. सोसा., पनवेल या प्रकरणात संबंधितांनी खरेदी केलेली जमीन ही १० हे. पेक्षा कमी असल्याचे विकास आयुक्त यांची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

सदर दोन्ही प्रकरणात खरेदी केलेली जमीन खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी विभागीय आयुक्त यांचे आदेशान्वये दोन टक्के नजराणा आकार सरकारजमा करून विक्री परवानगी देण्यात आलेली आहे. प्रस्तुत आदेशात नमूद केलेली प्रकरणे ही भोगवटा वर्ग-२ च्या जमिनीबाबत असून सदर विक्री परवानगी ही खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी देण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक एनएन. १०२/प्र. क्र. २१६/ल-९, दिनांक ५ डिसेंबर २००५ नुसार खरेदीदराने खरेदी किमतीच्या दोन टक्के नजराणा रक्कम जिल्हाधिकारी यांचेकडे खरेदी दस्तापासून एक महाच्या कालावधीमध्ये जमा करण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच ही दोन टक्के रक्कम ही महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदींअन्वये देय असलेल्या नजराणाऐवजी असेल व त्याव्यतिरिक्त खरेदीदारास अशा जमिनीवर जिल्हाधिकारी जी अकृषक आकारणी करतील ती रक्कम देण्याबाबत नमूद आहे.

प्रस्तुत प्रकरणात महालेखाकार यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपाप्रमाणे ७५ टक्के रक्कम वसुली करणे महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ (दोन) मधील वरील तरतुदी पाहता नियमोचित ठरणार नाही. त्यामुळे सदरचा परिच्छेद स्वीकृत होण्यास विनंती आहे.

२.९ परिच्छेद क्र. ४.२.७.२-अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली

विभागीय आयुक्तालयांच्या वर्ग-II विक्री परवानगी प्रकरणांच्या चाचणी तपासणीत (एप्रिल २०१३) आम्हांला असे आढळले की, २५१ विक्री परवानगी प्रकरणामधील ३७ प्रकरणांत कृषि व अकृषक वापरासाठी ऑगस्ट २००७ ते सप्टेंबर २०१२ दरम्यान वर्ग-II जमीन विक्रीस परवानगी देण्यात आली व रु.२.३८ कोटी अनर्जित उत्पन्नाची वसुली झाली. विभागीय आयुक्तांनी बाजारमूल्य व विक्री किंमत यातील जास्त असलेल्या किमतीचा अनर्जित उत्पन्नाच्या निर्धारणेसाठी विचार केला नाही. अनर्जित उत्पन्नाची रक्कम ठरविताना बाजार मूल्य किंवा विक्री किंमत या पैकी जास्त किंमत विचारात घेतली असती तर रु.६.२१ कोटी रक्कम वसूली योग्य असती, परिणामतः **परिशिष्ट-IX (विवरण पत्र क्र.४)** मध्ये दर्शविल्यानुसार रु.३.८३ कोटी कमी वसूल झाले.

लेखापरीक्षेत हे निदर्शनास आणल्यावर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी जिल्हाधिकारी रायगडला अनर्जित उत्पन्नाची वसुली करण्याचे आदेश (जून २०१३) दिले. विभागीय आयुक्त, पुणे यांनी नमूद केले (जून २०१३) की अनर्जित उत्पन्नाची वसुली २९ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार करण्यात आली होती, ज्यात अनर्जित उत्पन्नाचे निर्धारण विक्रीच्या परवानगी/आदेश निर्गमनाच्या दिवशीच्या बाजार मूल्यानुसार केले होते. विक्रीच्या परवानगी नंतरच जमीन विक्रीचा व्यवहार करावयाचा होता. त्यामुळे बाजारमूल्य किंवा मोबदला यापैकी जे जास्त त्यानुसार अनर्जित उत्पन्नाची वसुली निर्धारण करणे हे शक्य नव्हते.

ACS, R&FD यांनी अनर्जित रक्कम वसूल करण्याचे मान्य केले (ऑक्टोबर २०१३). पुढील उत्तर प्रतीक्षित आहे. (जानेवारी २०१४).

शासनाने अशी पद्धती अवलंबण्याचा विचार करावा ज्यात वर्ग-II प्रकारच्या जमिनीच्या विक्री पत्राची प्रत दुय्यम निबंधकाने जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवावी. तहसीलदाराने नामांतरणाच्या अर्जावर कारवाई करण्यापूर्वी विक्रीसाठी दिलेल्या परवानगी आदेशांची पडताळणी करावी व विभागीय आयुक्तांनी वर्ग-II प्रकारच्या जमीन विक्रीच्या परवानगीच्या प्रकरणाचा योग्य पाठपुरावा करावा.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

(१) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडील वर्ग-II विक्री परवानगी प्रकरणांच्या चाचणी तपासणीत (एप्रिल २०१३) मा. महालेखापाल, नागपूर यांचेकडील तपासणी पथकाद्वारे सदरचा परिच्छेद उपस्थित केलेला आहे.

(२) उक्त परिच्छेदामध्ये नमुद केलेनुसार अनर्जित उत्पन्नामध्ये रक्कम रु. ३.८३ कोटी रक्कम कमी वसूल झालेबाबत शक उपस्थित करणेत आला असून सदर शकातील **परिशिष्ट IX** (विवरणपत्र) मधील अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली दर्शविणाऱ्या विवरणपत्रातील पुणे विभागातील कोल्हापूर जिल्ह्याशी निगडीत एकूण ३० (करवीर तालुका-२७ व गडहिंग्लज तालुका-३) प्रकरणांमध्ये बाजारमूल्य व विक्री किंमत यापैकी जास्त किंमत विचारात घेऊन परिशिष्ट IX मधील विवरणपत्रातील रकाना नं.१३ मध्ये सदर रक्कम दर्शविणेत आलेली आहे. सदर प्रकरणी संबंधित धारकाकडून देय फरकाची अनर्जित रक्कम वसूल करणेकामी व प्रस्तुत सर्व प्रकरणांत प्रत्यक्ष खरेदी-विक्रीचे दस्ताऐवज तपासून त्याप्रमाणे तहसीलदार, करवीर व तहसीलदार, गडहिंग्लज यांचेमार्फत विवरणपत्रातील ३० प्रकरणांमध्ये वसुलीबाबतची नोटीस संबंधित धारकांना बजावणेत येत आहे व त्याप्रमाणे संबंधितधारकांकडून ३ महिन्यांत वसुलीची कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे.

" दोन विभागीय आयुक्तालयांच्या वर्ग-२ विक्री परवानगी प्रकरणांच्या चाचणी तपासणीत (एप्रिल २०१३) आम्हांला असे आढळले की, २५१ विक्री परवानगी प्रकरणामधील ३७ प्रकरणात कृषि व अकृषक वापरासाठी ऑगस्ट २००७ ते सप्टेंबर २०१२ दरम्यान वर्ग-२ जमीन विक्रीस परवानगी देण्यात आली व रु.२.३८ कोटी अनर्जित उत्पन्नाची वसुली झाली विभागीय आयुक्तांनी बाजार मुल्य व विक्री किंमत यातील जास्त असलेल्या किंमतीच्या अनर्जित उत्पन्नाच्या निर्धारणेसाठी विचार केला नाही. अनर्जित उत्पन्नाची रक्कम ठरविताना बाजारमूल्य किंवा विक्री किंमत या पैकी जास्त किंमत विचारात घेतली असती तर रु.६.२१ कोटी रक्कम वसुलीयोग्य असती. परिणामतः **परिशिष्ट-IX (विवरण पत्र क्र.४)** मध्ये दर्शविल्यानुसार रु.३.८३ कोटी कमी वसूल झाले.

लेखापरीक्षेत हे निदर्शनास आणल्यावर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी जिल्हाधिकारी रायगडला अनर्जित वसुली करण्याची आदेश (जून २०१३) दिले. विभागीय आयुक्त, पुणे यांनी नमूद केले (जून २०१३) की अनर्जित उत्पन्नाची वसुली २९ मे २००६ च्या शासन निर्णयानुसार करण्यात आली होती. ज्यात अनर्जित उत्पन्नाचे निर्धारण विक्रीच्या परवानगी/आदेश निर्गमनाच्या दिवशीच्या बाजार मूल्यानुसार केले होते. विक्रीच्या परवानगी नंतरच जमीन विक्रीचा व्यवहार करावयाचा होता. त्यामुळे बाजार मूल्य किंवा मोबदला यापैकी जे जास्त त्यानुसार अनर्जित उत्पन्नाची वसुली निर्धारण करणे हे शक्य नव्हते.

ACS, R & FD यांनी अनर्जित रक्कम वसूल करण्याचे मान्य केले (ऑक्टोबर २०१३) पुढील उत्तर प्रतीक्षित आहे (जानेवारी २०१४).

शासनाने अशी पद्धती अवलंबण्याचा विचार करावा ज्यात वर्ग-II प्रकारच्या जमिनीच्या विक्री पत्राची प्रत दुय्यम निबंधकाने जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवावी. तहसीलदाराने नामांतरणाच्या अर्जावर कारवाई करण्यापूर्वी विक्रीसाठी दिलेल्या परवानगी आदेशांची पडताळणी करावी व विभागीय आयुक्तांनी वर्ग-II प्रकारच्या जमीन विक्रीच्या परवानगीच्या प्रकरणाचा योग्य पाठपुरावा करावा.

आक्षेप :

अनेक्झर **IX (विवरण पत्र क्र.४)** मध्ये रायगड जिल्ह्यातील अ.क्र.३१-३७ अशा एकूण ७ प्रकरणांमध्ये अनर्जित रक्कम कमी वसूल करण्यात आल्याबाबत.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अनेक्झर IX (विवरण पत्र क्र. ४) मध्ये रायगड जिल्ह्यातील अ.क्र.३१-३७ अशा एकूण ७ प्रकरणांमध्ये लेखा परिक्षण अहवालातील अनर्जित रक्कम कमी वसूल करण्यात आल्याबाबत नमूद केले आहे. शासन निर्णय दिनांक ३०.०९.२००६ नुसार रेडीरेकनर दर व बाजारमुल्य दर यामधील जास्त असलेली रक्कम धरून अनर्जित रक्कम वसूल करणेबाबत सूचित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने फरक नमूद केलेल्या एकूण ७ प्रकरणांमधील अनर्जित फरकाची वसुली करण्यात आली असून चलनाची प्रत सोबत सादर करण्यात आली आहे.

२.१० परिच्छेद क्र.४.२.८ करार नोंदणीबाबतच्या शासकीय नियमांचे पालन न करणे.

३१ ऑक्टोबर २००६ च्या शासन निर्णयानुसार, शासकीय जमिनीचे विविध संस्था, व्यक्ती इत्यादींना भोगवटा अधिकार किंवा भाडेपट्ट्याने वाटप करण्याच्या सर्व प्रकरणांत वाटपग्रही बरोबर एक करारनामा निष्पादित केला पाहीजे आणि तो मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अंतर्गत नोंदणीकृत केला पाहिजे. यात असेही नियम आहे की करारनामा निष्पादित आणि नोंदणीकृत झाल्याशिवाय जमिनीचा ताबा देण्यात येणार नाही.

कोल्हापूर व सांगली कार्यालयातील जमीन वाटप प्रकरणांच्या तपासणीत (जानेवारी ते जून २०१३) आम्हांला असे आढळले की भोगवटा अधिकारावर केलेल्या जमीन वाटपाच्या ३४ पैकी २७ प्रकरणांत जिल्हाधिकाऱ्यांनी करारनाम्याची नोंदणी न करता जमिनीचे हस्तांतरण केले. याखेरीज दस्तऐवज निष्पादित आणि पंजीकृत करण्याविषयीची नोंद अभिलेख्यात नव्हती. या प्रकरणात मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी वरील महसुलाची रक्कम रु. ४०.०२ लाख येते. **(परिशिष्ट--X) (विवरण पत्र क्र.५).** अशा प्रकारे शासन नियमांचे पालन न केल्यामुळे रु. ४०.०२ लाख महसुलाची हानी झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की संबंधित वाटपग्रहींना दस्ताऐवजांच्या नोंदणीबाबत पत्राचार केला जाईल.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

परिच्छेदामध्ये उल्लेख केलेल्या **परिशिष्ट " X " (विवरण पत्र क्र.५)** मध्ये दर्शविलेल्या कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील प्रकरणातील आकारणीय मुद्रांक शुल्क व नोंदणी फी दंडासह एकूण रक्कम व त्यानुसार प्रत्यक्षात करण्यात आलेली वसुलीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

प्रकरण	आकारावयाचे मुद्रांक व नोंदणी शुल्काची एकूण रक्कम रु.	प्रत्यक्षात करण्यात आलेल्या वसुलीची रक्कम रु.
कोल्हापूर—		
ओम सहकारी गृहनिर्माण सोसायटी	२४,६४१	रु.२०,५३४ मुद्रांक शुल्क + रु.४,१०७ नोंदणी फी,व दंड रु.४४,८०० यासह एकूण रु. ६९,४४१ एवढी रक्कम दि.२७/०९/२०१७ रोजी शासन जमा केली आहे.
ज्योतिर्लिंग सहकारी दुग्ध व्यवसायिक संस्था हणबरवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर (हणबरवाडी गट १०४/अ)	३३०	रु. २२० मुद्रांक शुल्क + रु. ११० नोंदणी फी व दंड रु. ३०० यासह एकूण रु. ६३० एवढी रक्कम दि. १५/५/२०१७ रोजी शासन जमा केली आहे.
श्री सदगुरु विश्वनाथ महाराज रुकडीकर ट्रस्ट, (करवीर सीटीएस ६९७/अ व ६९७/ब).	१,२७,५७६	रु. १,०७,८२५ मुद्रांक शुल्क + २१,५७० नोंदणी फी एकूण रु. १,२९,३९५ दिनांक १५.५.२०१३ रोजी जमा केली आहे.
अपंग पुनर्वसन संस्था कोल्हापूर (उचगाव गट क्र.२६४/अ)	५,२८०	८,८०० मुद्रांक शुल्क + १७६० नोंदणी फी एकूण रु.१०,५६० रक्कम दिनांक २९.०६.२०१३ रोजी शासन जमा केली आहे.
सांगली :-		
भारती विद्यापीठ, येडावी पलूस सन १९७६	४,९५०	रु.४९५० मुद्राक शुल्क शासन जमा दिनांक ३/११/२०१७ रोजी करण्यात आले आहे.

" पाच जिल्हाधिकारी कार्यालयातील जमीन वाटप प्रकरणांच्या तपासणीत (जानेवारी ते जून २०१३) आम्हांला असे आढळले की भोगवटा अधिकारावर केलेल्या जमीन वाटपाच्या ३४ पैकी २७ प्रकरणांत जिल्हाधिकारी करारनाम्याची नोंदणी न करता जमिनीचे हस्तांतरण केले. याखेरीज दस्तऐवज निष्पादित आणि पंजीकृत करण्याविषयीची नोंद अभिलेखात नव्हती. या प्रकरणात मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी वरील महसुलाची रक्कम रु.४०.०२ लाख येते **(परिशिष्ट-X) (विवरण पत्र क्र. ५)** अशाप्रकारे शासन नियमांचे पालन न केल्यामुळे रु.४०.०२ लाख महसुलाची हानी झाली.

चार जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की संबंधित वाटपग्रहींना दस्ताऐवजाच्या नोंदणीबाबत पत्राचार केला जाईल आणि जिल्हाधिकारी भंडारा यांनी नमूद केले की, संबंधित तहसिलदारांना वाटपग्रहींची नोंदणी करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

ACS R & FD यांनी अभिक्षण मान्य केले (ऑक्टोबर २०१३) आणि असे सांगितले की २००६ पासूनच्या करारनामा नोंदणीचा मुद्दा सखोल तपासण्यात येईल आणि जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील कारवाई करीता आदेश निर्गमित करण्यात येईल. पुढील उत्तर प्रतीक्षित आहे (जानेवारी २०१४) अंमलबजावणी अधिकाऱ्यांद्वारे शासनाने खातरजमा करावी ".

आक्षेप :

अनेक्झर X (विवरण पत्र क्र.५) मध्ये रायगड जिल्ह्यातील अ.क्र.९-१४ अशा एकूण ६ प्रकरणांमध्ये मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी वरील वसुली न झाल्याने महसुलाची हानी झाल्याबाबत.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अनेक्झर X (विवरण पत्र क्र. ५)मध्ये रायगड जिल्ह्यातील नमूद अ.क्र.९-१४ अशा एकूण ६ प्रकरणांमध्ये करारनामा निष्पादित करणेचे अनुषंगाने मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क शासन जमा करण्यात आले असून चलनाच्या प्रतीसोबत सादर करण्यात आली आहे.

३१ ऑक्टोबर २००६ च्या शासन निर्णयानुसार, शासकीय जमिनीचे विविध संस्था, व्यक्ती इत्यादींना भोगवटा अधिकार किंवा भाडेपट्टयाने वाटप करण्याच्या सर्व प्रकरणांत वाटपग्रही बरोबर एक करारनामा निष्पादित केला पाहीजे आणि तो मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अंतर्गत नोंदणीकृत केला पाहिजे. यात असेही नियम आहे की करारनामा निष्पादित आणि नोंदणीकृत झाल्याशिवाय जमिनीचा ताबा देण्यात येणार नाही.

पाच जिल्हाधिकारी (अहमदनगर, भंडारा, कोल्हापूर, रायगड आणि सांगली) कार्यालयातील जमीन वाटप प्रकरणांच्या तपासणीत (जानेवारी ते जून २०१३) आम्हांला असे आढळले की भोगवटा अधिकारावर केलेल्या जमीन वाटपाच्या ३४ पैकी २७ प्रकरणांत जिल्हाधिकाऱ्यांनी करारनाम्याची नोंदणी न करता जमिनीचे हस्तांतरण केले. याखेरीज दस्तऐवज निष्पादित आणि पंजीकृत करण्याविषयीची नोंद अभिलेख्यात नव्हती. या प्रकरणात मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी वरील महसुलाची रक्कम रु. ४०.०२ लाख येते. **(परिशिष्ट-X) (विवरण पत्र क्र.५).** अशा प्रकारे शासन नियमांचे पालन न केल्यामुळे रु. ४०.०२ लाख महसूलाची हानी झाली. अहमदनगर, कोल्हापूर, रायगड व सांगली जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की संबंधित वाटपग्रहींना दस्ताऐवजांच्या नोंदणीबाबत पत्राचार केला जाईल आणि जिल्हाधिकारी, भंडारा यांनी नमूद केले की, संबंधित तहसिलदारांना वाटपग्रहींची नोंदणी करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

ACS, R & FD यांनी अभिक्षण मान्य केले. (ऑक्टोबर २०१३) आणि असे सांगितले की २००६ पासूनच्या करारनामा नोंदणीचा मुद्या सखोल तपासण्यात येईल आणि जिल्हाधिकाऱ्यांना पुढील कारवाईकरिता आदेश निर्गमित करण्यात येईल. पुढील उत्तर प्रतिक्षित आहे. (जानेवारी २०१४) अंमलबजाणी अधिकाऱ्याद्वारा शासन नियमांच्या प्रभावी पालनाविषयी शासनाने खातरजमा करावी.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

परिच्छेद क्र. ४. २. ८ **परिशिष्ट- X (विवरण पत्र क्र. ५)** मधील विवरणपत्रात भंडारा जिल्ह्याशी संबंधित ३ प्रकरणे आहेत. सदर प्रकरणी नोंदविलेल्या आक्षेपांबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

(१) परिच्छेद क्र. ४.२.८ **परिशिष्ट X (विवरण पत्र क्र.५)** मधील अ.क्र. ६ मौजा परसटोला, ता. साकोली येथील गट क्र. ८७, क्षेत्र ८००० चौ.मी. जागा MSECD परसटोला, ता. साकोली यांना मंजूर करण्यात आली आहे. सदर जागेच्या रु. १३,२०,००० इतक्या किंमतीवर नियमानुसार येणारी रु. ६८,८००/- स्टॅम्प डयुटी व रजिस्ट्रेशन फी रु. १७,१९० सदर विभागाकडून वसूल करून करारनामा निष्पादित करण्यात आला आहे असा अहवाल जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दिलेला आहे.

(२) परिच्छेद क्र. ४.२.८ **परिशिष्ट X (विवरण पत्र क्र.५)** अ.क्र. ७ मौजा वळद, ता. साकोली येथील गट क्र. १७६ - क्षेत्र ८,००० चौ.मी. जागा MSECDL वळद, ता. साकोली यांना, मंजूर करण्यात आली आहे. सदर जागेच्या रु. १३,२०,००० इतक्या किमतीवर नियमानुसार येणारी रु. ६८,८०० स्टॅम्प डयुटी व रजिस्ट्रेशन फी रु. १७१९० सदर विभागाकडून वसूल करून करारनामा निष्पादित करण्यात आला आहे असा अहवाल जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दिलेला आहे.

(३) परिच्छेद क्र. ४.२.८, **परिशिष्ट X (विवरण पत्र क्र.५),** अ. क्र. ८ मौजा पिंगलाई, ता. भंडारा येथील गट क्र. ५८६ एनपी येथील ८,३०० चौ.मी. जागा **MSECDL,** पिंगलाई, ता. भंडारा यांना मंजूर करण्यात आली आहे. सदर जागेची रु. ८४,९९,००० इतकी किंमत जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या क्र.कार्या-३/जमीन/सीआर १/१४/कावि/२०२/२०१५, दि.२७/०२/२०१५ च्या सुधारीत आदेशानुसार निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार प्राथमिक करारनामा निष्पादित करण्याबाबत व त्यावर रु. ३,३९,९६० इतकी स्टॅम्प ड्युटी व रु. ८४,९९० इतकी रजिस्ट्रेशन फी अशी एकूण रु. ४,२४,९५० इतकी रक्कम देय असल्याबाबत तहसिलदार, भंडारा यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी भंडारा यांना दि. १८/०८/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १६ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिव तसेच इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

२.११ परिच्छेद क्र. ४.२.४.१ भोगवटामूल्य कमी आकारणे/आकारणी न करणे

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने भंडाऱ्याच्या प्रकरणात कोबरा बटालियनला जागा दिली त्याचे भोगवटा मूल्य महालेखाकार यांच्या आक्षेपानंतर वसूल केले तरी ते कमी वसूल केले आहेत. याबाबत महालेखाकार यांचे म्हणणे असे आहे की, ५० व ६० च्या रेट ऐवजी ६० आणि ७० चा रेट अप्लाय केला पाहिजे तसे विभागाने केलेले नाही. शासन निर्णय व सरकारी ऑडीटनुसार ६० व ७० टक्के अप्लीकेबल स्लॅब आहे. आरएनएफडीच्या २९ एप्रिल, २००८ च्या शासन निर्णयाप्रमाणे ७० आणि ६० टक्के अप्लाय करायला पाहिजे होते. त्या ठिकाणी आपण ५० व ६० चा रेट अप्लाय केला आहे. यामुळे जो फरक पडला तो रुपये १.९० कोटी ऐवजी १८ लाख रुपये जास्त घ्यावा लागणार आहे, ही रक्कम विभागाने घेतलेली नाही असे समितीने विदित केले असता ऑडिट ने यह मुद्दा निकाला था उस समय कॅल्क्युलेशन में २.०८ करोड रुपये का फिगर निकाला गया था जो कि विभाग ने अक्तुबर,२०१३ में स्वीकार कर लिया था. लेकिन सन २०१६ में जो कॅल्क्युलेशन किया है उसके हिसाब से १.०९ करोड़ रुपये का यह फिगर कर दिया गया. हम यह जानना चाहते है कि पहले इसको स्वीकार किया गया था, अब यह फिगर १.०९ करोड़ रुपये का है असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. तसेच दिनांक २९ एप्रिल, २००८ च्या शासन निर्णयानुसार शासनाने टप्पा पध्दती विहित केली होती. महालेखाकारांचे असे मत आहे की, शासन निर्णयात जे टप्पे दिले आहेत त्यानुसार टप्पे लावले पाहिजेत. त्यानुसार व्हॅल्यूएशन केले पाहिजे. प्रत्यक्षात जे व्हॅल्यूएशन करण्यात आले ते रेडीरेकनर मध्ये व्हॅल्यूएशनची जी पद्धत आहे त्यानुसार करण्यात आले आहे. रेडीरेकनरची टप्पा पद्धत वेगळी होती. दिनांक २९ एप्रिल २००८ च्या शासन निर्णयाची पद्धत वेगळी होती. एजींचा आग्रह असा आहे की, शासन निर्णयाप्रमाणे वसुली करा रेडीरेकनर प्रमाणे वसूल करू नका. जी वसुली करण्यात आली ती सहनिबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडून व्हॅल्यूएशन रिपोर्ट घेऊन व्याजासह रक्कम वसूल केली असल्याचेही समितीस सांगितले.

शासननिर्णयामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, एएसआरप्रमाणे वसुली करू नका, स्लॅबप्रमाणे वसुली करा याबाबत समितीने विचारणा केली असता वसुली केल्यानंतर महालेखाकार यांनी हा मुद्दा पुन्हा काढला त्यानुसार जिल्हाधिकारी, भंडारा यांना कळविण्यात आले आहे की, स्लॅबप्रमाणे वसुली करावी. व्हॅल्यूएशन करण्याकरिता रेडीरेकनरच्या गाईडलाईन्स अंतिम असतात शासनाने दिनांक २० फेब्रुवारी २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सन २००८ चा शासन निर्णय रद्द केला आहे. रेडीरेकनरमध्ये ज्या गाईडलाईन्स असतात त्यानुसार व्हॅल्यूएशन केले पाहिजे असे विभागीय सचिवांनी विदित केले. तसेच सन २००८ च्या शासननिर्णयामध्ये व्हॅल्यूएशनचे वेगळे टप्पे देण्यात आले होते असेही समितीस अवगत केले.

सन २००८ चा शासन निर्णय कोणासाठी काढण्यात आला होता. सन २०१६ चा शासननिर्णय पूर्वलक्षीप्रभावाने लागू होणार की, ज्या तारखेला काढला त्याच तारखेपासून लागू होईल अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणात महालेखाकारांच्या म्हणण्यानुसार पुन्हा पैसे वसूल करा असे जिल्हाधिकारी यांना अगोदरच कळविण्यात आले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. तसेच As far as this case is concerned**.,** सन २००८ च्या शासननिर्णयाचा उल्लेख महालेखाकार करीत आहेत तो शासनाने अधिक्रमित करून दिनांक २० फेब्रुवारी २०१६ नुसार गाईडलाईन्स इश्यू केल्या आहेत. त्यामध्ये असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, रेडीरेकनरच्या व्हॅल्यूएशन गाईडलाईन्सप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे असे समितीस सांगितले.

हा पुढील टप्पा झाला आहे माहे फेब्रुवारीला जो शासननिर्णय काढला तो प्रॉस्पेक्टिव्ह आहे. It is not retrospective and that is why they have given instructions to collect the money on the basis of २००८ GR**.** रेडीरेकनरचे दर कायदा व नियमानुसार ठरविण्यात येतात. त्यासंदर्भातील शासननिर्णय आहेत अधिकाऱ्यांनी घेतलेले निर्णय विचारात घेऊन शासननिर्णय जारी करतात. शासन निर्णय अंतिम असतो की, कायद्यानुसार तयार केलेला नियम अंतिम असतो सर्वोच्च व बंधनकारक काय असते. अशी पृच्छा समितीने केली असता सुरुवातीला कायदा, त्यानंतर नियम व नियमानंतर शासकीय आदेश अशा प्रकारे क्रम असतो. या प्रकरणात एक विरोधाभास होता दिनांक २९ एप्रिल २००८ चा शासन निर्णय व रेडीरेकनरच्या व्हॅल्यूएशनमध्ये तफावत होती. अशी तफावत यापुढे राहू नये याकरिता शासनाने ऑलरेडी पावले उचलली आहेत. त्यासाठी शासन निर्णय जारी केला आहे. त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, रेडीरेकनरप्रमाणे जे व्हॅल्यूएशन होते त्याच्या गाईडलाईन्स फॉलो केल्या पाहिजेत. या प्रकरणात महालेखाकार यांनी हा मुद्दा काढला होता, त्यामुळे महालेखाकार यांच्या निदेशानुसार जिल्हाधिकारी यांना वसुली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २०१६ चा शासन निर्णय समितीला सादर करावा असे समितीने सूचित केले असता सदरहू शासन निर्णय समितीस प्राप्त झाला आहे. **(विवरण पत्र क्र. ६)**

रेडीरेकनरनुसार मूल्यांकन केले जात असताना शासन निर्णय काढण्याची गरज का पडली आहे. सन २००८ मध्ये जो शासननिर्णय काढण्यात आला होता तो रद्द करण्यात आला आहे. त्यावेळी अधिकाऱ्यांसमोर ऑलरेडी रेडीरेकनर नव्हते काय शासन निर्णय काढून गोंधळ निर्माण करण्याचे कारण काय होते. सन २००८ चा शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार होता की, शासननिर्णयाच्या तारखेपासून लागू होणार होता. सन २००८ व सन २०१६ च्या शासन निर्णयामध्ये काय फरक आहे अशी विचारणा समितीने केली तसेच सन २००८ मध्ये त्यांनी वेगळा स्लॅब केला होता विभागीय सचिवांनी सांगितले आहे की, व्हॅल्यूएशन रेडीरेकनर प्रमाणे करावे. सुरुवातीला जिल्हाधिकारी यांनी व्हॅल्यूएशन रेडीरेकनर प्रमाणे केले होते. त्यावेळी सदर जीआर होता त्यामुळे या प्रकरणात त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना सचिवांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. सन २००८ चा जीआर आता रद्द केलेला आहे. आता त्यांचे म्हणणे असे आहे की, व्हॅल्यूएशन रेडीरेकनर प्रमाणेच करण्यात यावे असे समितीने विदित केले. यामध्ये ऑक्युपन्सी डिपॉजिट ६०.३२ लाख रुपये भरण्यास सांगितले होते ते देखील त्यांनी भरलेले नाहीत त्यांनी ती रक्कम का भरली नाही अशी विचारणा प्रधान महालेखाकारांची केली. तसेच शासनाला त्यांनी ॲडव्हान्समध्ये दिले असेल त्यावेळी पैसे भरले नाहीत. ते कॅल्क्युलेशन चुकीचे होते महालेखाकारांनी काढलेल्या परिच्छेदानंतर त्यांनी २.८ काढले असे समितीने अवगत केले. हे महालेखाकारांना मान्य आहे काय अशी विचारणा समितीने केली.

समितीने पुढे असे विदित केले की, त्यांनी ६० लाख रुपये घेतले नाहीत तर ॲडव्हान्स पझेशन शासन ते शासन देता येते, त्याला काहीही अडचण नाही, प्रत्येकाला द्यावे लागते. ६० लाख रुपये काढण्यात आले, विभागाने जिल्हाधिकाऱ्यांनी किंमत सांगितली, ती किंमत चुकीची होती, नंतर ते लक्षात आले. विभागाने यांच्या म्हणण्यावर १ कोटी ९० लाख रुपये ठरविले तेही महालेखाकारांच्या म्हणण्याप्रमाणे २.८ पाहिजेत असे समितीने निदर्शनास आणले.

२.१२ परिच्छेद क्रमांक ४.२.४.२ भोगवटामूल्याची कमी वसुली

उपरोक्त परिच्छेदाअंतर्गत ६ केसेसपैकी १ केसमध्ये वसुली बाकी आहे. विभागाने वसुलीचा धनादेश घेतला आहे वसुलीमध्ये धनादेश घेण्याची पद्धत आहे का? तेही पुढच्या तारखांचे धनादेश घेतले आहेत असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. तसेच समितीला शिल्लक रक्कम शून्य असल्याचे सांगितले आहे. धनादेश देखील माहे जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, २०१८ चे असल्याचे समितीने अवगत केले असता त्यामध्ये एक धनादेश दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ चा आहे आणि एक धनादेश दिनांक ३१ मार्च २०१८ चा असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशाप्रकारे धनादेश घेऊन पैसे मिळाले नसल्याचे समितीने अवगत केले असता, वसुलीच्या संदर्भात प्रत्यक्षात धनादेश शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात येतील तेव्हाच ते धरता येईल, तोपर्यंत वसुली धरता येणार नाही. फक्त समितीच्या माहितीकरिता सांगितले आहे की, संस्थेने त्यांचे पुढच्या तारखांचे (postdated) धनादेश जमा केले आहेत.

आपण असे पोस्टडेटेड चेक घेतो का, असे पोस्टडेटेड चेक घेण्याची पॉलिसी आहे का? जर एखादी व्यक्ती मुद्रांक शुल्क भरण्यासाठी किंवा इतर भरणा करण्यासाठी आली आणि तिने पोस्टडेटेड चेक दिला तर तो घेणार आहात का अशी विचारणा समितीने केली असता, आपल्याला त्यांना वसुली म्हणून धरता येणार नाही जोपर्यंत क्रेडिट करीत नाही, तोपर्यंत आपल्याला ते वसुली म्हणून धरता येणार नाही शासनाची पोस्टडेटेड चेक घेण्याबाबतची कोणतीही पॉलिसी नसल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

मग असे असतानाही हा निर्णय कोणी घेतला, हे धनादेश घेणारा अधिकारी कोण आहे, कोणत्या अधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्राखाली पोस्टडेटेड चेक घेतले. पॉलिसी नसताना असे कसे केले आहे? ही बाब गंभीर असून अधिकाऱ्यांना दिले, असे ते सांगत आहेत. कोणत्या अधिकारक्षेत्राखाली त्यांनी ते चेक घेतले आहेत आणि ते अधिकारी कोणत्या पदावर आहेत? तसेच समितीला ही सांगण्यात येत आहे की शिल्लक निरंक आहे याबाबत समितीने पृच्छा केली असता, बऱ्याच काळापासून ही वसुली प्रलंबित होती ते पैसे भरत नव्हते. त्यामुळे सुरुवातीला ३ चेक घेतले होते, त्यापैकी १ चेक रिलिज झाला आहे, आपल्याला २० लाख रुपयांचा चेक मिळालेला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

एपीएमसी, पलूस संदर्भातील रुपये १३.९५ वसूल झाले आहेत का अशी विचारणा समितीने केली असता, रुपये १३.९५ वसूल झाले आहेत, त्यामध्ये एक वेळ ५ लाख रुपये जमा केले असून शिल्लक काही नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

२.१३ परिच्छेद क्रमांक ४.२.४.३ भाडेपट्टा दराची वसुली न करणे/कमी करणे :

सदरहू परिच्छेद एपीएमसी, तासगाव संदर्भात आहे विभागाने एपीएमसीकडून दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजीचा २० लाख रुपयांचा चेक आणि दिनांक ३१ मार्च २०१८ रोजीचा २१ लाख रुपयांचा चेक घेतला आहे याबाबत समितीने विचारणा केली असता, एकूण ३ चेक घेतले होते, त्यातील २० लाख रुपयांचा चेक ऑलरेडी जमा झालेला आहे आणि २० लाख रुपयांचा चेक आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

पोस्टडेटेड चेक घेण्याची शासनाची पॉलिसी नाही, असे आताच विभागाच्या सचिवांनी सांगितले आहे. मग शासनाची अशी पॉलिसी नसताना पोस्टडेटेड चेक घेण्याचा निर्णय कोणत्या अधिकाऱ्यांनी घेतला आहे अशी विचारणा समितीने केली असता, तहसिल कार्यालयाच्या स्तरावर हे चेक घेतले आहेत. त्याचे कारण असे आहे की, निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्टमधील कलम १३८ अन्वये जर एखादा चेक वटला नाही तर त्यावर आपल्याला फौजदारी स्वरूपाची कारवाई करता येते. त्यामुळेच ते चेक घेतले असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

खूप दिवसांपासून वसुली होत नव्हती, म्हणून चांगल्या भावनेतून किमान वसुली व्हावी म्हणून तुम्ही चेक घेतले असे होऊ शकते असे समितीने विदित केले असता, त्यांच्याकडे कमिटमेंट रहावी की त्या काळातच त्यांनी पैसे द्यावेत, या भावनेने ते चेक तहसीलदारांनी घेतले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाची ही भूमिका बरोबर आहे. खूप दिवसांपासून वसुली होत नाही, किमान चेक तरी आपल्या जवळ असावा असे असल्याने विभागाने चेक घेतले असल्याचे समितीने नमूद केले असता, विभागीय सचिवांनी त्यामुळेच चेक घेतलेले आहेत असा खुलासा केला.

आता हे धनादेश वटले नाहीत तर आपण कलम १३८ अन्वये कारवाई करावी, अशी समितीची अपेक्षा राहणार आहे. कारण पुढच्या परिच्छेदामध्ये कलम १३८ ची कारवाई देखील केलेली नाही. धनादेशामुळे पैसे मिळाले नाहीत तरीही कलम १३८ ची कारवाई केलेली नाही. हे प्रकरण सन २००८ ते सन २०१३ च्या काळातील आहे सन २०१३ नंतरची कोणती प्रकरणे त्यामध्ये आहेत हे सन २००८ पासून सन २०१३ पर्यंतचे प्रलंबित पैसे ६१ लाख रुपये होते. सन २०१३ पासून सन २०१७ संपेपर्यंत काय परिस्थिती आहे, त्यांना असोसिएट पट्ट्याचे पैसे भरायचे होते, ते एपीएमसी, तासगांव यांनी भरले आहेत की नाहीत सन २०१३ नंतरची वसुली प्रलंबित आहे का ? कारण हा भाडेपट्टा आहे भाडेपट्टा दराची वसुली आहे यामध्ये काही लॅण्ड रेंटही आहे का अशी विचारणा समितीने केली असता भोगवटा मूल्य असल्यामुळे तेवढी रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. वसूल करण्यात आलेली रक्कम भोगवटामूल्याची आहे. ती विशिष्ट कालावधीची नसून त्या जमिनीचे भोगवटा मूल्य आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

दुसरा मुद्दा असा आहे की, त्यांनी जी काही किंमत घेतली, ती सन २०१३ ची होती आतापर्यंत त्यावर व्याज सुरुच होते. आपण ते व्याजही त्यामध्ये कॅल्क्युलेट केले आहे का अशी विचारणा समितीने केली असता जब रिपोर्ट के समय हमने कॅल्क्युलेशन किया था तो सन २०१३ तक का ब्याज लेविएबल कॅल्क्युलेट किया था असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. त्यावर समितीने पेमेंट आजही मिल रहा है असा खुलासा केला याअनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, अब वह अपडेट होकर दुबारा कॅल्क्युलेट होगा और अमाऊंट रिवाईज हो जाएगी स्पॉट लेवी बढ़ गया है.

सन २०१३ ची आक्षेपित रक्कम घेत आहात, ती विलंबाने मिळत असेल तर त्यावर लागणारे व्याजही संस्थेकडून घ्यावे लागणार आहे, ते घेण्याचे नियोजन केले आहे का तशी घेण्याची तरतूद आहे का? महालेखाकारांनी त्या दिवसाची रक्कम काढली आहे तुम्ही त्यावर स्टिक अप आहात आता त्यांनी ५ वर्षांनी पेमेंट केले आहे नियमाप्रमाणे त्यावर व्याज गृहीत धरावे लागणार आहे असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी पूर्वीच्या विधानात सुधारणा करून असे अवगत केले की, एपीएमसी, तासगाव प्रकरणात आतापर्यंत २००९ ते २०१३ पर्यंत अकृषिक दराने भाडेपट्ट्याची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. त्यापूर्वी कृषिक दराने वसुली केली होती. परंतु त्या वसुलीस महालेखाकार यांचा आक्षेप होता. महालेखाकार यांनी सुचविले होते की, सदरहू वसुली अकृषिक दराने करावयास पाहिजे. त्यानुसार रुपये ६१,८४,३८९ एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे तसेच २०१३ नंतरची भाडेपट्ट्याची रक्कम वसूल करावी लागणार असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मुळात भोगवटादाराचा भाडेपट्टा हा वेगळा विषय आहे. एपीएमसी, तासगावला जमीन दिली तेव्हापासून महालेखाकार यांच्या लक्षात येईपर्यंत it is for agriculture products sale purpose अंतर्गत दाखवतील म्हणून त्या जमिनीला कृषिक दर लावण्यात येत होते परंतु प्रत्यक्षात ती कृषिक जमीन नव्हती. कारण त्या जमिनीवर अकृषिक कार्यवाही सुरु होती. त्या ठिकाणी सर्व शेतमालाचे ट्रेडींग होत होते. त्यामुळे त्या जमिनीवर अकृषिक दरच लावावयास पाहिजे होता, ही बाब महालेखाकार यांनी निदर्शनास आणून दिली. त्यानुसार २००८ ते २०१३ पर्यंत अकृषिक दर लावण्यात आला. त्या दराचे व्याजासह कॅल्क्युलेशन केले तर ते रुपये ६१,८४,३८९ होते. यामध्ये भोगवट्याचा विषय जोडलेला नाही. रुपये ६१,८४,३८९/- ही रक्कम २०१३ पर्यंत व्याजासह झालेली आहे. या संदर्भातील पेमेंट सप्टेंबर, २०१७ पर्यंत २० लाख रुपये झाले. माहे मार्च, २०१८ पर्यंत बाकीचे पैसे पूर्ण भरणार. याचाच अर्थ २०१३ पासून मार्च, २०१८ पर्यंतचे व्याज आकारावयास पाहिजे. तसेच जो अकृषिक दर लावलेला आहे तो २०१३ नंतरही लावण्यात आला आहे काय, असल्यास, तो वसूल झाला आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, सध्या या संदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध नाही. परंतु समितीने सुचविल्यानुसार दर आकारून त्याप्रमाणे वसुली करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सन २०१३ मध्ये जी रक्कम देय होती किंवा त्यानंतर जी रक्कम वसूल केली आहे किंबहुना वसूल करणार आहात त्यावर व्याज आकारुन उक्त रक्कम व्याजासह वसूल करावी. तसेच २०१३ नंतरची वसुली नियमित अकृषिक दराने करावी यासंदर्भातील कॅल्क्युलेशन करून समितीला एक महिन्यात माहिती सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले असता, विभागीय सचिवांनी माहिती देण्याबाबत आश्वासित केले.

२.१४ परिच्छेद क्र. ४.२.५ अधिमुल्याची कमी वसुली :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, या परिच्छेदाच्या अनुषंगाने महालेखापालांच्या अभिप्रायामध्ये नमूद करण्यात आले आहे की, " As there is no provision for recovery of premium towards change in use of Non-Agricultural land without change in ownership..... " महालेखापालांच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या अभिप्रायामध्ये नमूद केले आहे की, " रहिवास वापरासाठी देण्यात आलेल्या शासकीय जमिनीचे वाणिज्य कारणासाठी वापर करण्याचे धोरण करण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रस्तावित आहे." या बाबतची सद्य:स्थिती काय आहे याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, या बाबतीत महालेखाकार यांना कळविले होते. महालेखाकार यांचा परिच्छेद दि.२१ नोव्हेंबर १९५७ च्या शासन निर्णयावर वर आधारित

होता. तो शासन निर्णय केवळ " transfer of new tenure land " एवढ्यापुरता आहे. तो शासन निर्णय चेंज ऑफ युजबद्दल नव्हता. त्यामुळे त्या शासन निर्णयामध्ये प्रिमियम घेण्याची तरतूद नव्हती. विभागाने महालेखाकार यांच्या निदर्शनास आणून दिले की, १९५७ च्या शासन निर्णयाचा आधार घेऊन ५० टक्के वसुलीचा आग्रह धरू शकत नाही. या विशिष्ट प्रकरणामध्ये शासनाने नगरविकास विभाग आणि वित्त विभागासोबत विचार विनिमय करून आरआय व्हॅल्यूच्या १० टक्के प्रिमियम वसूल केला होता. महालेखाकार यांचा आग्रह होता की, यामध्ये १९५७ च्या शासन निर्णयानुसार ५० टक्के वसुली केली पाहिजे. विभागाने महालेखाकारांच्या निदर्शनास आणून दिले की, १९५७ चा शासननिर्णय अशा प्रकारच्या प्रकरणाला कव्हर करीत नाही. शासनाने वित्त व नगरविकास विभागाच्या सहमतीने १० टक्के वसुलीचा जो निर्णय घेतला आहे तो शासनाचा त्या वेळचा निर्णय आहे. तसेच चेंज ऑफ युजसाठी प्रिमियम आकारण्याची तरतूद शासनाने अलीकडेच प्राप्त केलेली आहे पूर्वी हे अधिकार शासनाला नव्हते. परंतु या प्रकरणात शासनाने कार्यवाही केली आहे. शासनाने या संदर्भातील कायदेशीर अधिकार २०१५ मध्ये प्राप्त केले. त्यानुसार कायद्यामध्ये सेक्शन ३७ (A) चा अंतर्भाव केला आहे. त्या अनुषंगाने चेंज ऑफ युजसाठी प्रिमियम आकारु शकतो अशा प्रकारचे अधिकार आता शासनाला प्राप्त झालेले आहेत. शासन विहित करेल त्या दरानुसार प्रिमियम आकारु शकतो यापूर्वी कायद्यामध्ये या संदर्भात विशेष तरतूद नव्हती असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

परंतु आता तरतूद करण्यात आलेली आहे. शासन प्रकरणनिहाय कार्यवाही करणार आहे की ठराविक नियमान्वये कार्यवाही करणार आहे या समितीच्या प्रश्नाला, शासनाने सन २०१५ मध्ये प्रिमियम आकारण्याची तरतूद केल्यानंतर औद्योगिक वापराचा रहिवासी किंवा वाणिज्यिक हेतुसाठी वापर केला जातो म्हणून या संदर्भातील चेंज ऑफ युजसाठी मंत्रिमंडळासमोर जाऊन धोरण ठरविलेले आहे. औद्योगिक हेतुसाठी घेतलेली जमीन चॅरिटेबल पर्पजसाठी वापरावयाची असेल तर त्यासाठी सुद्धा धोरण आखलेले आहे. या प्रकरणात रहिवासी ते वाणिज्यिक असा वापर आहे. परंतु या संदर्भातील धोरण तयार केलेली नाही. परंतु या प्रकरणी स्टेक होल्डरशी चर्चा करून लवकरच धोरण निश्चित करणार असल्याच विभागीय सचिवांनी सांगितले.

२.१५ परिच्छेद क्र. ४.२.६ जमिनीचे अनियमित वाटप :

भंडारा येथे इंडियन रेड क्रॉस सोसायटीला जागा दिली होती त्यांनी ती जागा सरेंडर केली या जागेचा ताबा विभागाने घेतला आहे की नाही अशी विचारणा समितीने केली असता जिल्हाधिकारी भंडारा यांनी दि.२४ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या आदेशान्वये सदरहू जागा सरकार जमा करण्याचे आदेश निर्गमित केले होते. त्यानुसार सदरहू जागा सरकार जमा करण्यात आलेली आहे आणि त्या बाबतची नोंद आखीव पत्रिकेमध्ये घेण्यात आलेली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, विभागाने स्पेसिफिक एवढेच सांगावे की, या जागेचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात आला आहे काय नसल्यास, आपण या जागेचा ताबा घेऊन समितीला कळविण्यात यावे. याअनुषंगाने विभागीय सचिवांनी या बाबत समितीला कळविण्यात येईल असे अश्वासित केले.

२.१६ परिच्छेद क्र.४.२.७.१ भूधारकाकडून अनर्जित उत्पन्नाची वसुली न करणे :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात महाराष्ट्र कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ६३-एक-अ(दोन) अन्वये ७५ टक्के रक्कम वसूल करणे योग्य होणार नाही या बाबतीत विभागाचे काय म्हणणे आहे अशी पृच्छा समितीने केली असता, या परिच्छेदाच्या अनुषंगाने नमूद केलेल्या उत्तरातून समितीचे आणि महालेखाकार यांचे लक्ष एका कायदेशीर तरतुदीकडे वेधलेले आहे. कूळवहिवाट कायद्यामध्ये कलम ६३ (एक) (अ) ही कायदेशीर तरतूद आहे. त्यामध्ये नमूद करण्यात आले आहे की, एखाद्या व्यक्तीने खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी वर्ग-२ ची जागा घेतली असेल तर महिन्याभरात २ टक्क्यानुसार नजराणा शुल्क वसूल केले पाहिजे. ही रक्कम एमएलआरसी वा अन्य कायद्यांतर्गत जी देय असेल त्याला पर्याय म्हणून असेल, अशी स्पष्ट तरतूद त्या कायद्यात करण्यात आलेली आहे. या प्रकरणामध्ये सदरहू जमीन खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी घेण्यात आली होती, त्यामुळे या प्रकरणात २ टक्केच नजराणा शुल्क देय आहे. महालेखाकर यांचा आग्रह आहे की, १९८३ च्या शासन निर्णयाच्या आधारे ७५ टक्के वसुली करावी परंतु ते योग्य होणार नाही कारण कायद्यातील तरतूद ही श्रेष्ठ असते. कायद्यातील तरतुदीनुसारच या प्रकरणामध्ये नजराणा शुल्क वसूल करावे लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सध्या जमिनीवर सुरू असलेली अकारणी अकृषिक दरानुसार सुरु आहे काय अशी समितीने विचारणा केली असता अकृषिक दरानुसार आकारणी सुरुच राहणार असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले. याचाच अर्थ वर्ग-२ ची जमीन औद्योगिक प्रयोजनासाठी वापरली तर केवळ २ टक्के नजराणा शुल्क भरावयाचे काय अशी विचारणा समितीने केली असता, होय, परंतु हा निकष कलम ६३ (१)(अ) खाली खरेदी केलेल्या जमिनीपुरता असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.१७ परिच्छेद क्रमांक ४.२.७.२—अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे अवगत केले की, माहे ऑगस्ट, २००७ ते ऑक्टोबर, २०१२ या दरम्यान एकूण ३७ प्रकरणांमध्ये जमीन विक्रीची परवानगी देण्यात आली होती. मात्र अनर्जित रक्कम रेडीरेकनर दरानुसार वसूल करण्यात आली होती. अे.जीं.चा आक्षेप आहे की, अनर्जित रक्कम रेडीरेकनर दर किंवा व्यवहारातील दर यापैकी जी रक्कम जास्तीची असेल त्यानुसार रक्कम वसूल केली पाहिजे. ३७ प्रकरणांपैकी ३० प्रकरणे ही कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत तर ७ प्रकरणे रायगड जिल्ह्यातील आहेत. रायगड जिल्ह्यात फरकाची वसुली १०० टक्के पूर्ण झालेली आहे. कोल्हापूरमध्ये वसुलीची प्रक्रिया सुरु आहे. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी नोटीसेस इश्यू केलेल्या आहेत वसुली लवकरात लवकरात करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरु आहेत.

सन २०१२ मधील हे प्रकरण आहे. जी जास्तीची किंमत असेल त्याप्रमाणे ती आकारावी असे शासनाचे धोरणच आहे. तेव्हा रक्कम कमी आकारण्याचे कारण काय ? अधिकाऱ्यांकडे मार्केट व्हॅल्यूची माहिती असते. जी जास्तीची किंमत असते ती आकारण्यात येते ही एक-दोन प्रकरणे नसून तब्बल ३० प्रकरणे असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता, त्यावेळी हे अधिकार विभागीय आयुक्तांना होते विभागीय आयुक्तांनी विक्री परवानगी दिलेल्या आहेत. शासनाने जे रेडीरेकनर दर ठरविलेले आहेत त्याप्रमाणे वसुली झाली असल्याने विभागीय सचिवांनी सांगितले.

आपला नियम काय आहे ? अनर्जित रकमेची वसुली करताना ती बाजार मूल्य आणि रेडीरेकनर दर यापैकी जी जास्तीची रक्कम असेल ती विचारात घेतली पाहिजे. त्यावेळी तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडून विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात आला काय अशी पृच्छा समितीने केली असता, हे अधिकार विभागीय आयुक्तांना होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. याअनुषंगाने समितीने त्यांना शेवटचा अधिकार असतो याबाबत विचारणा केली. विभागीय आयुक्त स्वतः सु-मोटू काही करीत नाही. काही प्रकरणांमध्ये विभागीय आयुक्तांची मान्यता घ्यावी लागते. जिल्हाधिकारी यांची मान्यता घ्यावी लागते. तालुका करवीर आणि तालुका गडहिंग्लज अशा दोन तालुक्यांतील केसेस आहेत. तहसीलदारांनी प्रांत अधिकाऱ्यांकडे प्रकरण सादर केले. प्रांत अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केले. जिल्हाधिकारी यांनी शिफारशींसह विभागीय आयुक्तांकडे सादर केले आणि शेवटी विभागीय आयुक्तांनी त्यावर शिक्कामोर्तब केले. तेव्हा आपण विभागीय आयुक्तांना अधिकार होते असे का म्हणता ? आपण केस पुट-अप करून सचिवांकडे पाठवितो. खालपासून वरपर्यंत शिफारस असेल तर वरचे अधिकारी प्रत्येक गोष्ट सूक्ष्मदर्शकाप्रमाणे पाहू शकत नाही तसेच विभागीय आयुक्तांकडे आलेली फाईल ही खालच्या स्तरावरून आलेली आहे असे समितीने विदित केले असता, आम्ही ३० प्रकरणी वसुलीच्या नोटीसेस काढलेल्या आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

तहसीलदार किंवा जे कोणी अधिकारी असतील ते फाईल पुट-अप करतात. त्यांच्या माध्यमातून फाईल वरपर्यंत जाते. लीज देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत कधी कधी ते अधिकार डेलिगेट करतात. हे आयुक्तांनी केले, आम्ही केले नाही असे आपण सांगत आहात, ते योग्य नसल्याचे समितीने सांगितले. तसेच जिल्हाधिकारी यांनी सुरूवातीलाच सांगितले की, हे विभागीय आयुक्तांनी घेतलेले निर्णय आहेत समितीने त्याचवेळी सांगितले की, विभागीय आयुक्तांना साक्षीसाठी बोलवावे असे समितीने विभागास अवगत केले असता, समितीसमोर दिनांक २० फेब्रुवारी २०१६ रोजीचा शासन निर्णय सादर केलेला आहे त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, रेडीरेकनर दर किंवा व्यवहारातील प्रत्यक्ष दर यापैकी जी रक्कम जास्त असेल त्यानुसार अनर्जित रक्कम वसूल करावी. अशी स्पष्टता शासन निर्णयामध्ये आणलेली आहे. तेव्हा यापुढे अशाप्रकारच्या गोष्टी होणार नाहीत. येथून अशाप्रकारच्या गोष्टी होऊ नयेत असे शासन निर्णयामध्ये नमूद केलेले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. पूर्वी देखील असाच नियम होता पूर्वी अशी स्पष्टता नव्हती म्हणून आता स्पष्टता आणलेली असल्याचे समितीस अवगत केले.

विभागाने वसुलीची कार्यवाही केव्हापासून सुरु केली आहे या समितीच्या प्रश्नाला दिनांक ३० डिसेंबर २०१७ रोजी नोटीस काढलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतरही कार्यवाही करण्यात आलेली नाही. साक्ष लावण्यात आली म्हणून १५ दिवसांपूर्वी कार्यवाही केलेली आहे. आपण महालेखाकार यांनी काढलेला आक्षेप मान्य करता. परंतु पाच-पाच वर्षे काहीही कार्यवाही करीत नाही. लोकलेखा समितीने साक्ष लावल्यावर आपण सबधितांना नोटीस काढत आहात खरे तर यापूर्वीच कारवाई होणे आवश्यक होते. आयजीआरकडे प्रलंबित आहे समजू शकतो. परंतु आपण पाच वर्षे कोणतीही कारवाई केली नाही. एकूण सर्व व्यवहारातील १० टक्के तपासणी महालेखाकार कार्यालय करते आणि त्यांच्या तपासणीतील १० टक्के तपासणी समिती करते म्हणजे एक टक्का कामांवर येथे चर्चा होते खरे म्हणजे ०.५ टक्के काम होते असे समितीने विभागास अवगत केले असता, तीन महिन्यांत ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

आपण एप्रिल, २०१७ पासून जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत काही महिन्यापूर्वी जिल्हाधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारलेला आहे. परंतु आपल्या पूर्वी जे कोणी जिल्हाधिकारी होते ते यास जबाबदार आहेत. They should take action according to the remarks

of the A.G. आपण पाच-पाच वर्षे कोणतीही कार्यवाही करावयाची नाही. साक्ष लागल्यानंतर त्या गोष्टीस गती द्यावयाची आणि साक्ष संपल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष करावयाचे हे योग्य नसल्याचे समितीने विदित केले. तसेच वसुली होण्यामध्ये का उशीर झाला, त्याची कारणे काय आहेत ? तसेच हा विषय आपल्यापुढे आणण्याची जबाबदारी कोणाची होती अशी विचारणा समितीने केली असता, लँड ब्रँचचे कर्मचारी यांची जबाबदारी होती असा खुलासा जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी केला.

आपली समितीसमोर साक्ष होणार आहे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपणापुढे ही गोष्ट आणली नाही म्हणून आपणास ती समजली नाही. आपणास दहा महिन्यांपासून फाईल दाखविली नाही म्हणून आपणास संबंधितांवर कारणे दाखवा नोटीस किंवा अन्य काही कारवाई केली आहे काय अशी पृच्छा समितीने केली तसेच सन २०१२-२०१३ ची ३ कोटी ८३ लक्ष रुपये इतकी वसुली आहे. विभाग पाच-पाच वर्षे कोणत्याही प्रकारची कार्यवाही प्रस्तावित करीत नाही. जिल्हाधिकारी यांनी सात-आठ महिन्यांपूर्वी कार्यभार स्वीकारला. त्यांच्याकडे एका दिवशी हजारो फाईल्स येणार नाहीत. हा विषय साक्षीसाठी आला म्हणून त्यांच्याकडे ती फाईल आली तेव्हा त्यांच्या लक्षात आले असेल की, वसुली झालेली नाही. ही फाईल जिल्हाधिकारी यांना दाखवून त्यावर कार्यवाही करणे ही जबाबदारी कोणत्या स्तरावरील अधिकाऱ्यांची होती अशी विचारणा समितीने केली असता, उप जिल्हाधिकारी यांची जबाबदारी होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

उप जिल्हाधिकारी यांच्यावर कारवाई प्रस्तावित करावी. महालेखाकार यांनी आक्षेप काढल्यानंतर सहा महिन्याच्या आत कारवाई होणे अपेक्षित होते. वसुली झाली हे समजू शकतो, परंतु त्या संदर्भात काही निर्णय केला नाही. समितीने साक्ष लावल्यावर दिनांक ३० डिसेंबरला नोटीस काढली. मागील वर्षातील अधिकाऱ्यांनी त्यांची कर्तव्ये बजावली नाहीत.

जिल्हाधिकारी दर महिन्याला प्रांत, तहसीलदार यांची बैठक घेतात त्यात हे विषय येत नाहीत काय अशी विचारणा समितीने केली असता, वसुलीचे सगळे विषय त्यात असतात त्यात महालेखाकारांचे परिच्छेद देखील असतात काही वसुली देखील झालेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

एन.ए. ची फाईल तीन आठवड्यांमध्ये क्लिअर होत असेल तर वसुलीच्या फाईलची जिल्हाधिकाऱ्यांवरील जबाबदारी सर्वात जास्त असते. ेया संबंधात शासनाचे प्रतिनिधी म्हणून विभागीय सचिवांचे काय म्हणणे आहे अशी विचारणा समितीने केली असता, याच यादीतील रायगड जिल्ह्यातील ७ प्रकरणे होती त्यांची वसुली झालेली आहे. त्यामुळे कोल्हापूर येथे देखील पूर्णपणे वसुली व्हावयास पाहिजे होती तेथे वसुली झाली नाही. आता जिल्हाधिकारी कार्यालय जबाबदारी घेत आहे. पुढील तीन महिन्यामध्ये पूर्णपणे वसुली होईल असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

या प्रकरणी जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांविरूद्ध कारवाई देखील करावी. ज्या ज्या अधिकाऱ्यांनी महालेखाकारांच्या आक्षेपानुसार कारवाई प्रस्तावित केली नाही त्या सर्वांवर आपण कारवाई प्रस्तावित करावी, विभागीय चौकशी करावी. तसेच दंडात्मक कारवाई करावी कारण ४ कोटी रूपयांचा विषय आहे. लोकलेखा समितीची साक्ष निश्चित झाल्यानंतर देखील विभाग काहीच इनिशिएटीव्ह घेत नाही. जिल्हाधिकारी कार्यालय देखील काहीच कारवाई करीत नाही. तेव्हा ही सर्व बाब अक्षम्य आहेत ही एका जिल्ह्यातील स्थिती आहे मग संपूर्ण राज्यात काय स्थिती असेल असे समितीने विदित केले. तसेच समिती कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी एवढेच आपणास सांगत आहोत. ज्यांनी प्रस्ताव प्रस्तावित केला आहे मग त्यात जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी देखील असतील. त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. त्यांनी देखील नियमांचा भंग केला आहे. समिती वसुलीसंबंधात सांगत असून ज्यांनी प्रस्ताव कमी करण्याचे प्रस्तावित केले आहे त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. प्रस्ताव कमी करण्यासाठी नेमकी काय कारणे होती? एकूण ३० प्रकरणे आहेत. ज्यांनी ३० प्रकरणांमध्ये पाच वर्षात कारवाई प्रस्तावित केली नाही त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. दुसरा मुद्दा चुकीचे प्रस्ताव सादर करणे याबाबतचा आहे. त्यावेळी ते स्पष्ट नव्हते असे सचिव महोदयांनी सांगितले आहे. त्यांनी सांगितले की, आम्ही आता सन २०१६ मध्ये स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता पूर्णपणे स्पष्ट केले आहे असे ते म्हणत आहेत. पूर्वी स्पष्टता नव्हती म्हणजे नेमके काय नव्हते त्याबाबत सचिवांनी समितीला अवगत करावे असे समितीने सूचित केले असता, कृषी प्रयोजनार्थ विविध शासकीय जमिनी देण्यात येत होत्या. त्याचे मूल्यांकन कसे करायचे याबद्दल फार संभ्रम होता. तो दूर व्हावा याकरिता शासनाने दिनांक २० फेब्रुवारी २०१६ चा शासन निर्णय निर्गमित केला. त्यात शासनाने स्पष्ट केले आहे की, अन अर्नड् इन्कम वसूल करतो तेव्हा ज्या दिवसाचा व्यवहार असेल त्या दिवसापासूनच किमतीचे मूल्यांकन केले पाहिजे. प्रत्यक्षात व्यवहारातील रक्कम किंवा रेडिरेकनरची रक्कम असेल यात जी रक्कम जास्त असेल ती यंत्रणांकडून वसूल केली पाहिजे अशा प्रकारची तरतूद दिनांक २० फेब्रुवारी २०१६ रोजीच्या शासननिर्णयामध्ये करण्यात आली आहे. पूर्वीच्या शासननिर्णयामध्ये असा उल्लेख नाही असे नाही. याबद्दलचा उल्लेख होता उदा. आपल्या १९८३ चा शासन निर्णय आहे त्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, अन अर्नड रक्कम आहे ती वसूल केली जाईल. या शासननिर्णयामध्ये " 50% of the difference between current market value or the price realised by way of sale, whichever is higher." असे नमूद केले आहे. तेव्हा अशा प्रकारचा उल्लेख पूर्वी देखील होता. मात्र, आता आम्ही त्यात अधिक स्पष्टता आणली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

त्यावेळी महालेखाकार यांनी एक शिफारस केली आहे. “Government may consider putting in place a system whereby the Sub-Registrars are required to forward a copy of Sale Deed in respect of sale of Class-II land to Collector.” म्हणजे सेल डीडची एक कॉपी सब रजिस्ट्रारने जिल्हाधिकारी यांना पाठविली पाहिजे अशा प्रकारची शिफारस त्यावेळी ए.जी. यांनी केली होती. “The Order granting permission to sale is verified before taking action on application for mutation of such land by Tehsildars and there is proper follow-up by Commissioner granting permission for sale of Class-II land.” अशी पण शिफारस ए.जी. यांनी केली आहे. याचा अर्थ सब रजिस्ट्रारने सेल डीड जिल्हाधिकारी यांना पाठविणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिल्यानंतर तहसीलदारांनी म्युटेशन केले पाहिजे. त्यानंतर “The proper follow-up should be made by Commissioner granting permission for sale of Class-II land.” अशी देखील शिफारस ए.जी. यांनी केली होती ती विभागाने मान्य केली आहे. तेव्हा यासंबंधात आपण पुढील कारवाई प्रस्तावित केली आहे किंवा कसे याबाबत समितीने विचारले असता, ग्रामीण भागामध्ये आम्ही ई-फेरफार नावाच्या आज्ञावलीची अंमलबजावणी केली आहे. त्यात सब रजिस्ट्रार व्यवहार नोंदवितो त्याच्या आधारावर तातडीने म्युटेशन तयार होऊन तहसीलदार कार्यालयात जातो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२.१८ परि.क्र. : ४.२.८ करार नोंदणीबाबतच्या शासकीय नियमांचे पालन न करणे :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, लिज होल्डवर ज्या जमिनी दिल्या आहेत त्यासंबंधातील हा परिच्छेद आहे. करार नोंदणी झाली नाही त्यामुळे वसुलीची रक्कम वसूल झाली नाही अशा प्रकारचा आक्षेप होता.यात जेवढ्या केसेस दाखविण्यात आल्या आहेत त्यापैकी ७ केसेस सोडून बाकी केसेस झालेल्या आहेत असे महालेखाकार यांनी त्याचे व्हेटिंग करताना मान्य केले आहे. ज्या ७ केसेस होत्या त्यांचा अनुक्रमांक परिशिष्ट-१० मध्ये यादी दिली आहे त्यानुसार १, ८, १५, १६, १७, १८, १९ या ७ या प्रकरणांमध्ये वसुलीची कार्यवाही झालेली नव्हती. याबाबत १५ आणि १६ क्रमांकाच्या दोन प्रकरणांमध्ये वसुली झालेली आहे. उर्वरित ५ प्रकरणांमध्ये वसुली व्हावयाची आहे. ती वसुली करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत आणि लवकरात लवकर ही वसुली पूर्ण करून घेऊ.

यामध्ये भंडाऱ्याची एक केस शिल्लक असल्याचे समितीने अवगत केले असता, या प्रकरणामध्ये भंडाऱ्यातील एमएसईडीसीएलची पिंगलाईची केस शिल्लक आहे. उर्वरित चार प्रकरणे एमटीडीसीची एक केस आहे. १७, १८ व १९ या क्रमांकाच्या तीन केसेसमध्ये २ केसेस नाशिकच्या व १ संगमनेरची केस आहे या केसेस एमएसईबीच्या आहेत म्हणजे शासकीय यंत्रणांशी निगडित केसेस आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली असता, ही सर्व वसुली तीन महिन्यांच्या आत करावी आणि समितीला कळविण्यात यावे असे समितीने विभागास सूचित केले.

अभिप्राय व शिफारशी :

२.१९ परिच्छेद क्र. ४.२.४.१ " भोगवटा मुल्य कमी आकारणी/आकारणी न करणे "

अभिप्राय :

महसूल व वन विभागाद्वारे मौजे चितापूर, जि. भंडारा स्थित ४४.६८ हे. जमिनीचे वाटप २०६ COBRA बटालियनच्या कॅम्पचे बांधकाम करण्यासाठी केंद्रीय राखीव पोलिस दलास (CRPF) आगाऊ ताबा देऊन करण्यात आली. महसूल व वन विभागाने अंतिम आदेश दिले. ज्यामधील अटीनुसार भोगवटा मूल्याची वसूली चालू बाजार भावाप्रमाणे करून आगाऊ ताबा द्यावयाच्या वेळी भरलेली भोगवटा मूल्याची रक्कम वजा करून भोगवटा मूल्याची वसूली करावयाची होती. परंतु जमिनीचा आगाऊ ताबा ऑक्टोबर, २००९ मध्ये देण्यात आला होता. जिल्हाधिकारी, भंडारा यांनी अंतिम आदेश एप्रिल, २०११ मध्ये निर्गमित करून त्याच दिवशी भोगवटा मूल्य रु. ६०.३२ लाख भरण्याचे मागणी पत्र निर्गमित केले. परंतु सदर रक्कम CRPF यांनी जमा केली नाही.

ही जमीन २०६ COBRA बटालियनच्या कॅम्प बांधकामासाठी म्हणजेच अकृषक कामासाठी वापरल्यामुळे भोगवटा मूल्याचे निर्धारण ASR मध्ये अकृषक जमिनीसाठी विहित केलेल्या दराच्या ५० टक्के दराने व्हावयास पाहिजे होते. परंतु मागणी केलेली रु. ६०.३२ लाख एवढी रक्कम ASR मधील जमीन कृषक कामासाठी वापरण्यासाठी लागू असणाऱ्या प्रति हेक्टर कृषक दरानुसार होती. अकृषक कामासाठी ASR मध्ये दर प्रती चौ.मी. प्रमाणे विहित केलेला होता. म्हणजे अकृषकचा दर लावून जमिनीचे बाजारमूल्य रु.२.०८ कोटी इतके काढावयास हवे होते. परिणामतः रु.१.४८ कोटीची कमी मागणी करण्यात आली व पूर्वीची वसूल न झालेली व न भरणा केलेली रु. ६०.३२ लाख रक्कम गृहित धरून, एकूण रु.२.०८ कोटीची वसूली झाली नाही. सदर जागेवर युनिटचे बांधकाम पूर्णत्वाच्या मार्गावर होते.

सदरहु आक्षेप निर्गमन परिषदेत विभागाने मान्य देखील केले व ती रक्कम वसूल केल्याचे समितीसमोर साक्षीदरम्यान सांगण्यात आले. परंतु ती रक्कम कमी वसूल केल्याचे आक्षेप महालेखाकारांनी साक्षीदरम्यान घेतले. महसूल व वन विभागाच्या दि. २९ एप्रिल २००८ च्या शासन निर्णयाप्रमाणे ६० आणि ७० टक्क्याचा दर अवलंबिण्याची आवश्यकता असताना याठिकाणी ५० आणि ६० हा दर लागू करण्यात आल्यामुळे महालेखाकारांच्या आक्षेपानुसार रु.२.०८ कोटीची वसुली करणे आवश्यक असताना केवळ रु. १,९०,७४,००० एवढी रक्कम वसूल केल्यामुळे जवळजवळ रु.१८ लाखाची वसुली कमी झालेली आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता, सन २००८ च्या शासन निर्णयामध्ये शासनाने टप्पा पद्धती विहित केली होती व त्यानुसार महालेखाकारांनी ही आकारणी केली आहे. परंतु विभागाने जी प्रत्यक्षात आकारणी केली ती रेडिरेकनरमध्ये नमूद पद्धतीनुसार केलेली आहे. त्यामुळे ही तफावत दिसून येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. सदरहु सन २००८ च्या शासन निर्णयामध्ये ही आकारणी ASR प्रमाणे न करता स्लॅबप्रमाणे करा असे स्पष्ट नमूद असताना रेडिरेकनरप्रमाणे आकारणी का करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता, कराची आकारणी करताना रेडिरेकनरमधील विहित पद्धती ही अंतिम असते. तसेच शासनाने आता सन २००८ चा शासन निर्णय दि.२० फेब्रुवारी २०१६ रोजी रद्द करून रेडिरेकनरच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे ही आकारणी करण्याचे निश्चित केले असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित शासनाने सन २०१६ मध्ये काढलेला शासन निर्णय हा पूर्वलक्षी प्रभावाने लागू आहे काय? जर तो नसेल तर या शासन निर्णयाचा लाभ व तरतूदी विभागाला सदरहु प्रकरणाला लागू करता येणार नाही अशी भूमिका समितीने घेतली असता, फरकाची रक्कम वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना याअगोदरच कळविण्यात आले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

शिफारशी :

२.२० मे, २००६ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कब्जा हक्क तत्त्वावर किंवा भाडेपट्टा तत्वावर शासकीय जमिनीचे वाटप करण्याकरिता आणि जेथे शासकीय जमिनीचे मूल्यांकन करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये मूल्यांकन ज्या तारखेला शासकीय जमिनीच्या वाटपाचे आदेश दिले गेले किंवा मूल्यांकन करण्याकरिता आदेश दिले गेले त्या तारखेला वार्षिक मूल्य दर विवरण तक्त्यामध्ये (ASR) विहित केलेल्या दरांप्रमाणे ठरविले जाईल. ASR च्या अनुदेशानुसार जर ग्रामीण क्षेत्रात असलेली शासकीय जमीन, अकृषक कारणाकरिता वाटप केली गेली तर तिचे बाजार मूल्य ASR मध्ये त्या विभागाकरिता विहित केलेल्या अकृषक दराच्या (NA) ५० टक्के दराप्रमाणे ठरविले जाईल, अशी सुस्पष्ट तरतूद असताना भोगवटा मुल्याची कमी आकारणी करण्यात आली व सदरहू आक्षेपित रक्कम वसुलही करण्यात आली. या रकमेत तफावत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असता महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे दि.२९ एप्रिल २००८ च्या शासन निर्णयानुसार काढण्यात आलेले आहे. तर विभागाने वसुली ही रेडिरेकनरमध्ये नमूद विहित पद्धतीनुसार केली. कोणत्याही विषयासंदर्भात प्रथम कायदा अस्तित्वात येतो त्यानंतर नियम व त्यानंतर शासकीय आदेश असे असतानाही सन २००८ चा शासन निर्णय व रेडिरेकनरच्या परिगणनेच्या पद्धतीमध्ये तफावत असण्याचे कारण काय? जर रेडिरेकनरमधील पद्धत अंतिम होती तर विसंगत शासन निर्णय काढून गोंधळ निर्माण करण्याची आवश्यकता काय? तसेच सन २००८ च्या शासन निर्णयामुळे ही आकारणी ASR प्रमाणे न करता स्लॅबप्रमाणे करणेबाबत स्पष्टपणे नमूद आहे. असे असताना रेडिरेकरनरप्रमाणे आकारणी का करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता, सदरहू सन २००८ च्या शासन निर्णय आता दि.२० फेब्रुवारी २०१६ रोजी रद्द करण्यात आला असून त्यात रेडिरेकनरच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे ही आकारणी करण्याचे निश्चित

करण्यात आले असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु सदरहु शासन निर्णय हा भूतलक्षी प्रभावाने लागू नसल्यामुळे या सुधारीत शासन निर्णयाचा लाभ सदरहू प्रकरणास विभागाला देता येणार नाही असे समितीने स्पष्ट केले असता सदरहु वसुलीचे आदेश देण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले. अतः या प्रकरणी विभागाने तात्काळ ही फरकाच्या रकमेची वसुली करावी. तसेच भोगवटा मुल्य कमी आकारण्यासबधी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस १ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२१ परिच्छेद क्र. ४.२.४.२ " भोगवटा मुल्याची कमी वसुली "

अभिप्राय :

भोगाधिकारावर वितरित केलेल्या जमिनीच्या ३४ प्रकरणांपैकी जिल्हाधिकारी, अहमदनगर व सांगली यांनी सहा प्रकरणांत अकृषक कारणासाठी जमिनीचे वाटप केले आणि दुय्यम निबंधक/सह जिल्हा निबंधक यांनी कळविलेल्या बाजार मूल्यावर आधारित रु.४५.७९ लाख एवढे भोगवटा मुल्य आकारले. तथापि जमीन वाटपाच्या रोजी लागू असलेल्या ASR दराने वसुलीचे व सूचनांचे पालन न करता बाजार मूल्याचे निर्धारण करण्यात आले. भोगवटा मूल्याची अचूक किंमत रु. ८५.४६ लाख होती. यामुळे रु.३९.६७ लाख एवढी भोगवटा मूल्याची कमी आकारणी झाली.

२.२२ शिफारशी :

सदरहु आक्षेप विभागाने मान्य केले व आक्षेपातील सहा प्रकरणांपैकी पाच प्रकरणांची वसुली झालेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. उर्वरित एक प्रकरणात वसुली शिल्लक असल्यामुळे तसेच कृषि उत्पन्न बाजार समिती, तासगाव यांनी रक्कम भरण्यास टाळाटाळ केल्यामुळे दिनांक १ जानेवारी २०१८ रोजी त्यांचे कार्यालय सील करण्यात आल्याचे विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे. यावर समितीने आक्षेप नोंदवित वसुली झालेल्या पाच पैकी कृषि उत्पन्न बाजार समिती, पलूस यांचे एका प्रकरणात पुढील दिनांकाचे धनादेश विभागाने घेतले व त्यांचेकडून वसुली पूर्णतः झालेली असल्याने स्पष्टीकरण ग्राह्य धरण्याची विनंती करण्यात आली आहे. ही अतिशय गंभीर बाब असून वास्तविक शासनस्तरावर धनादेश स्वीकारण्याचे कोणतेही धोरण नसताना अशाप्रकारे धनादेश स्विकारणे व वसुली पुर्ण झाल्याचे समितीसमोर सांगणे ही अत्यंत गंभीर, आक्षेपार्ह व समितीचा अवमान करणारी बाब आहे. जोपर्यंत पुर्ण रक्कम शासनखाती जमा होत नाही तोपर्यंत ती रक्कम वसुल झाल्याचे विभागाने समजण्याचे कोणतेही कारण नाही तसेच असे विभाग समितीला देखील सांगू शकत नाही. ज्या अधिकाऱ्यांनी अशाप्रकारे धनादेश घेतला त्यांचेवर देखील कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने सांगितले. याचाच अर्थ समितीने केवळ साक्ष लावली व महालेखाकारांनी घेतलेल्या गंभीर आक्षेपाच्या अनुषंगाने विभाग समितीला उत्तरदायी आहे या भावनेतून धनादेश घेऊन वसुली झाल्याचे दाखवून समितीची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न आहे असे समितीने नाराजीने मत नोंदविले असता, या प्रकरणी बऱ्याच दिवसांपासून ही वसुली होत नव्हती, त्यामुळे वसुली करण्याच्या दृष्टीने काहीतरी दस्तावेज तयार असावा व काहीतरी कायदेशीर बांधिलकी असावी, जेणेकरून धनादेश वटले गेले नाहीत तर निदान निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वये कारवाई करण्याचे अधिकार तरी विभागाकडे राहतील या उद्देशाने धनादेश घेतलेले असून त्यातील एक धनादेश वटलेला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. याबाबत विभागाची भूमिका जरी काहीही असली तरीही असा धोका पत्करण्याची व समितीची दिशाभूल करण्याची विभागाला आवश्यकता नव्हती. जी वसूली देय आहे ती केलीच पाहिजे. महालेखाकारांनी हे आक्षेप सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी नोंदविलेले असतानाही विभागाने या आक्षेपांची, त्यातील वसुलीची व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची कोणतीही दखल समितीची साक्ष लागेपर्यंत घेतली नाही. केवळ समितीने साक्ष लावल्यानंतर या वसुलीबाबतची कार्यवाही करण्यात आली. ही देखील अतिशय गंभीर बाब आहे. अतः कृषि उत्पन्न बाजार समिती, पलूस व भारतीय दूरसंचार निगम, तासगाव या दोन प्रकरणी प्रलंबित असलेली रक्कम व्याजासह तातडीने वसुल करण्यात यावी व या सर्व प्रकरणी भोगवटा मुल्याच्या कमी वसुलीबाबत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच महालेखाकारांनी नमुन्यादाखल काही जिल्ह्यांमध्ये ही तपासणी केली असता, अशा गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. राज्यात अन्यत्र देखील अशी सदोष आकारणी असण्याची पूर्ण शक्यता आहे. विभागाने याची संपूर्ण तपासणी करून त्याअनुषंगाने वसुली व संबंधितांवर कार्यवाही करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२३ ४.२.४.३ "भाडेपट्टादराची वसुली न करणे/कमी करणे

अभिप्राय :

कृषी उत्पन्न बाजार समिती तासगांव, जिल्हा सांगलीच्या बाजार इमारतीच्या बांधकामासाठी महसूल व वन विभागाने १,२०,००० चौ.मी. जमिनीचे वाटप ३० वर्षासाठी भाडेपट्टा जमिनीच्या बाजारमूल्यावर प्रधान सावकारी (PLR) दराने काढावयाचा होता. परंतु जिल्हाधिकारी, सांगली यांनी सदर जागेच्या वाटपाचे आदेश भाडेपट्टा दर प्रति वर्ष रु. ८.०३ लाख प्रमाणे रु. ६२.९६ लाख एवढया बाजारमूल्यावर म्हणजेच जमीन अकृषक

वापरासाठी देण्यात आली असतानाही त्या भागातील अकृषक दराऐवजी प्रति हेक्टर कृषि दर लावून निर्गमित केले. तथापि, डिसेंबर,२००८ मध्ये हस्तांतरित केलेल्या १,१७,७०० चौ.मी. जमिनीच्या भाडेपट्ट्याची वसूली हस्तांतरणापासून APMC कडून झालेली नाही व वर्ष २००८-१३ साठी रू. ६१.८४ लाख एवढे भाडेपट्टा दर वसूल करावयाचे होते.

तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, (MSRTC), पलूस, जि. सांगली यांना त्यांच्या पूर्वीच ताब्यात असलेली ३५० चौ.मी. जमीन वापरण्याची परवानगी महसूल व वन विभागाने (जून २००९) दिली. सदर जमिनीचा वापर ३० वर्षांसाठी व्यावसायिक कामासाठी जमिनीच्या बाजार मूल्यावर प्रधान सावकारी (PLR) दराने भाडेपट्टा दर आकारून करण्याची परवानगी होती.

तरीही जिल्हाधिकारी, सांगली यांनी अंतिम परवानगी (ऑगस्ट,२००९) दिली आणि वर्ष २००९ साठी भाडेपट्टा दर रु. ०.२९ लाख वसूल केले परंतू त्यापुढील वर्षांसाठी भाडेपट्टा दराची वसूली करण्यात आली नाही. वर्ष २००९ साठी ही भाडेपट्ट्याची कमी वसूली झाली. एकूण रू.४.३७ लाख एवढी रक्कम वसुलीयोग्य होती. परिणामी दोन्ही प्रकरणात भाडेपट्ट्याची वसूली न करण्यामुळे/कमी वसुलीमुळे रु. ६५.९२ लाख एवढे भाडेपट्टा दर वसूल झाले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

या प्रकरणी विभागाने हे आक्षेप मान्य करून ही वसुली निश्चित केलेली आहे व त्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पलुस, जि.सांगली यांची पूर्ण वसुली झालेली आहे. परंतु कृषि उत्पन्न बाजार समिती, तासगाव यांचेकडून रु.२० लाख एवढी रक्कम चलनाने जमा केली व उर्वरित सर्व रकमेचे पुढील दिनांकाचे दोन धनादेश घेण्यात आलेले असून भाडेपट्ट्याची रक्कम संस्थेने भरण्याचे मान्य केल्याचे समितीस सांगण्यात आले.

२.२४ शिफारस :

मे, २००६ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, जेथे कुठल्याही शासकीय जमिनींचे भाडेतत्त्वावर वाटप केले जाते, तेथे भाडेपट्टादर ज्या तारखेस आदेश दिले गेले त्या तारखेस ASR मध्ये विहित केलेल्या दराप्रमाणे आकारले जाते. तसेच जुलै १९९९ च्या शासन निर्णयानुसार वार्षिक भाडेपट्टा दराची परिगणना, भारतीय स्टेट बँकेने वेळोवळी जाहीर केलेल्या प्रधान सावकारी दराने (PLR) जमिनीच्या पूर्ण बाजारमूल्यावर केली जाईल अशी तरतूद असताना भाडेपट्टादाराची कमी वसुली करण्यात आली. सदरहू आक्षेपित दोन प्रकरणांपैकी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, पलुस यांचेकडून रक्कम वसुली झालेली असून कृषि उत्पन्न बाजार समिती, तासगाव यांचेकडून पुढील दिनांकाचे धनादेश घेण्यात आले.

पुढील दिनांकाचे धनादेश स्वीकारण्याचे कोणतेही धोरण शासनाचे नसताना अशाप्रकारे धनादेश स्वीकारून वसुली झाल्याचे विभागाने दर्शविणे ही बाब निश्चितच आक्षेपार्ह आहे. जर हा धनादेश वटला नाही तर निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वये फौजदारी कार्यवाही करण्याची मुभा विभागाला राहावी यासाठी हे धनादेश घेतल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. असे असले तरीही समिती हे स्पष्टीकरण मान्य करू शकत नाही. विभागाने ही वसुली करणे आवश्यक असताना त्यासाठी अन्य कायदेशीर अडचणी उद्‌भवू नयेत याची काळजी घेतली पाहिजे. कारण याअगोदरही अशा अनेक परिच्छेदांमध्ये महालेखाकारांनी धनादेश आहरित न झाल्यामुळे आक्षेप नोंदविलेले आहेत व कुठेही कलम १३८ अन्वये कोणतीही कार्यवाही विभागाने केली नाही. तसेच सदरहु आक्षेपात महालेखाकारांनी निश्चित केलेली वसुलीची रक्कम ही सन २०१३ ची होती. परंतु आजच्या तारखेपर्यंत ही गणना केली असता, या वसुलीच्या रकमेत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. अतः विभागाने तात्काळ ही रक्कम सुधारित व्याजासह वसुल करावी. तसेच दिलेले धनादेश न वटल्यास निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वये तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच सन २०१३ नंतरची वसुली नियमित अकृषिक दराने करावी. तसेच सदरहू परिच्छेदान्वये सदोष आकारणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२५ परिच्छेद क्र. ४.२.५ “ अधिमुल्याची कमी वसुली ”

अभिप्राय :

महसूल विभागाने ५२२.१८ चौ.मी. वर्ग-II प्रकारच्या जमिनीच्या वापराबाबत बदल करून व्यावसायिक उपयोगास, जमीन मूल्याच्या ५० टक्के ऐवजी १० टक्के एवढे अधिमूल्य भरून जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी जमिनीच्या उपयोगाबाबत बदलाला परवानगी दिली. परंतू आकारणीय रु. २३.८३ लाख (म्हणजे रु. ४७.६६ लाखाच्या ५० टक्के) ऐवजी फक्त रु. ४.७६ लाख वसूल केले यामूळे रू. १९.०७ लाख कमी आकारणी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

२.२६ शिफारस :

महसूल व वन विभागाच्या दिनांक २१ नोव्हेंबर १९५७ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार अकृषिक भूखंडाचे भूधारणा पद्धतीत परिवर्तन करताना विद्यमान बाजारमूल्य आणि प्रथमतः भरणा केलेले भोगवटा मूल्य अधिक अनुदानग्राहीद्वारा जमीन विकासासाठी खर्च केलेले मूल्य यामधील फरकाच्या ५० टक्के अधिमूल्य आकारणीय असेल अशी सुस्पष्ट तरतूद आहे तरीही सन १९५७ चा उपरोक्त शासन निर्णय नवीन कालावधीकरिता हस्तांतरित करावयाच्या जमिनीपूरता असून जागेच्या वापरातील बदलाला लागू नाही. त्यामुळे शासनाने वित्त व नगरविकास विभागाच्या सहमतीने १० टक्के वसुलीचा जो निर्णय घेतला आहे तो शासनाचा त्यावेळचा निर्णय आहे. आता शासनाला सन २०१५ मध्ये जागेच्या वापरातील बदलासाठी प्रिमियम आकारण्याचे कायदेशीर अधिकार कलम ३६ (अ) अन्वये प्राप्त झाले आहेत. त्याअनुषंगाने रहिवास वापरासाठी देण्यात आलेल्या शासकीय जमिनींचे वाणिज्य कारणासाठी वापर करण्याचे धोरण करण्याची कार्यवाही शासनस्तरावर प्रस्तावित असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. यावर समिती व महालेखाकारांनी सहमतीदेखील दर्शविली. अतः शासनाने उपरोक्तप्रमाणे धोरण लवकरात लवकर अंतिम करावे व अशा प्रकरणांमध्ये अधिक सुस्पष्टता आणावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२७ परिच्छेद क्र. ४.२.६ " जमिनीचे अनियमित वाटप "

अभिप्राय :

जिल्हाधिकारी, भंडारा यांनी शहर क्षेत्रातील रु.२८.३९ लाख बाजारमूल्य असलेली १८०० चौ.मी. जमीन सचिव, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, भंडाऱ्याला इमारतीच्या बांधकामासाठी हस्तांतरित केली व जमिनीचा ताबा मोबदल्याशिवाय देण्यात आला. जिल्हाधिकारी यांनी वाटप केलेल्या जमीनीचे बाजारमूल्य रु.२८.३९ लाख निर्धारित करण्यात आले होते, ज्याचे वाटप करण्यास जिल्हाधिकारी सक्षम नव्हते. जिल्हाधिकारी यांनी शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय जमीनीचे हस्तांतरण केले, जे अनियमित होते व यास विभागीय प्रतिनिधींनी मान्यही केले.

२.२८ शिफारस :

महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनीची विल्हेवाट) नियम, १९७१ च्या नियम ६ प्रमाणे जेथे जमिनीचा वापर लाभरहीत जागेसाठी उदा. शाळा, रुग्णालय, दवाखाने आणि इतर सार्वजनिक कामाकरिता होणार असेल तर तेथे जिल्हाधिकारी भोगवटा मूल्य न आकारता जमिनीचे वाटप करु शकतात. अशा प्रकरणात रुपये २.५० लाखपर्यंत बाजारमूल्य असलेल्या जमिनीबाबत मंजुरी प्रदान करू शकतात. आणि रु. ६.२५ लाख पर्यंतची मंजुरी विभागीय आयुक्त प्रदान करू शकतात. तसेच नियम ८ मध्ये असे नमूद आहे कि नियम ६ अतर्गत केलेल्या प्रत्येक जमीन वाटपाचे हस्तांतरण राज्य शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय करता येऊ शकत नाही. तरीही जमिनीचे अनियमितरित्या वाटप करण्यात आले. परंतु याप्रकरणी इंडीयन रेड क्रॉस सोसायटी, भंडारा यांनी त्यांना अभिहस्तांकित केलेली जागा शासनजमा केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने जमिनीचा वस्तुतः ताबा घेतला की केवळ शासन खाती नाव चढविण्यात आले अशी विचारणा केली असता, या प्रकरणी ताबा घेतला काय? याची माहिती समितीस १ महिन्यात सादर करण्याबाबत समितीस आश्वासित करण्यात आले. परंतु माहिती अद्यापही अप्राप्त आहे. अतः विभागाने जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतला नसल्यास तात्काळ ताबा घेण्यात यावा. तसेच अशाप्रकारे जमिनीचे अनियमित वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२९ परिच्छेद क्र. ४.२.७.१ " भूधारकाकडून अनर्जित उत्पन्नाची वसूल न करणे "

अभिप्राय :

विभागीय आयुक्तालय, कोकण क्षेत्र यांच्या कार्यालयातील विक्री परवानगीच्या प्रकरणांच्या चाचणी तपासणीत विक्रीच्या परवानगी संबंधी दोन प्रकरणांत वर्ग दोन प्रकारच्या जमिनीची विक्रीची परवानगी देण्यात आली. मे.झाफझा मुंबई बिझनेस पार्क (इंडिया) प्रा.लि. यांनी १५ भूधारकांकडून वर्ग-२ ची जमीन खरेदी केली आणि कर्नाळा महिला रेडिमेड गारमेंट व वस्त्रोद्योग इंडस्ट्रियल को-ऑप. सोसायटी यांनी वर्ग-२ ची जमीन श्री.मधुकर महादेव भोईर यांचेकडून खरेदी केली. कोणत्याही भूधारकाकडून अनर्जित उत्पन्नाची वसुली केली गेली नाही.

दुय्यम निबंधकाकडून प्राप्त केलेल्या विक्री पत्रानुसार या व्यवहारात रु.६.८७ कोटी मोबदला होता. भूधारकांना रु.५.१५ कोटी (रु.६.८७ कोटीच्या ७५ टक्के) भरावयाचे होते.

अनर्जित उत्पन्नाची वसुली करण्यास जबाबदार असलेले विभागीय आयुक्त यांनी वरील मालमत्तेच्या अनर्जित उत्पन्नाचे निर्धारण करण्यासाठी स्पष्टीकरण मागविले असता, अवर सचिव, महसूल विभाग यांनी स्पष्टीकरण दिले की, विक्री किमतीच्या फक्त २% रक्कम खरेदी दाराकडून वसूल करावी आणि ऑक्टोबर, १९८३ च्या शासन निर्णयातील तरतुदी अकृषिक जमिनीस लागू आहेत. त्यामुळे भुधारकाकडून अनर्जित उत्पन्नाची वसूली करण्यात आली नाही. सदरहू चुकीचे स्पष्टीकरण निर्गमित केल्यामुळे अनर्जित उत्पन्नाची भूधारकाकडून वसुली केली गेली नाही.

अवर सचिवांनी निर्गमित केलेले स्पष्टीकरण योग्य नव्हते. कारण शासन निर्णय हा, कृषी व अकृषक या दोन्ही हेतूसाठी कृषी जमीन विक्री झाल्यास लागू आहे. निर्गमित केलेले स्पष्टीकरण शासन निर्णयाविरुद्ध होते. ज्या मध्ये जमीन जर कृषी किंवा अकृषक हेतूकरिता विक्री केली असेल तर, अनुक्रमे ५०% आणि ७५% अनर्जित उत्पन्न वसुली योग्य आहे. चुकीचे स्पष्टीकरण निर्गमीत केल्यामुळे रु.५.१५ कोटी रुपयांची वसुली झाली नाही. जेव्हा की, वर्ग-२ विक्रीच्या इतर प्रकरणांमध्ये ही वसुली करण्यात आली.

२.३० शिफारस :

दिनांक ८ ऑक्टोबर, १९८३ च्या शासन निर्णयानुसार निव्वळ अनर्जित उत्पन्नाच्या ५० टक्के रकमेचा भरणा केल्यास वर्ग-II भोगवटादारास धारण केलेली कृषी जमीन विकण्याची परवानगी दिली जाते. कृषी जमीन अकृषक कारणाकरिता विकण्यास परवानगी देण्याच्याबाबतीत अनर्जित उत्पन्न ७५ टक्के राहील. अनर्जित उत्पन्न म्हणजे जमिनीचे प्रचलित बाजार मूल्य किंवा विक्री करून मिळालेले मूल्य यापैकी जे जास्त असेल ते व वाटपाच्यावेळी भरणा केलेले भोगवटा मूल्य अधिक जमीन विकासासाठी आलेला खर्च यातील फरक. तसेच शासन निर्णय दिनांक २९ मे, २००६ नुसार अनर्जित उत्पन्नाची वसुली करण्याकरिता ज्या तारखेला विक्रीची परवानगी दिली त्या दिवशीचे ASR मधील दर बाजारमूल्य काढण्याकरिता विचारात घेतले जातील. महसूल व वन विभागाने स्पष्ट (ऑक्टोबर,२००६) केले की, जर निर्धारित बाजारमूल्य प्रत्यक्षातल्या विक्री किंमतीपेक्षा कमी असेल तर अनर्जित उत्पन्नाची गणना विक्री किमतीवर केली जाईल. या तरतुदीच्या आधारे हे आक्षेप नोंदविले. परंतु साक्षीदरम्यान विभागीय प्रतिनिधींनी या परिच्छेदासंदर्भात महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ६३ (१) (अ) (दोन) अन्वये ७५ टक्के रक्कम वसूल करणे योग्य होणार नाही. ज्यात असे नमूद आहे की, एखाद्या व्यक्तीने खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी वर्ग-२ ची जागा घेतली असेल तर महिन्याभरात २ टक्के नुसार नजराणा शुल्क वसूल केले पाहिजे. ही रक्कम एमएलआरसी वा अन्य कायद्यांतर्गत जी देय असेल त्याला पर्याय म्हणून असेल अशी स्पष्ट तरतूद त्या कायद्यात करण्यात आली आहे. या प्रकरणांमध्ये सदरहू जमीन खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी घेण्यात आली होती. त्यामुळे या प्रकरणी २ टक्केच नजराणा शुल्क देय असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले व हा निकष कलम ६३ (१) (अ) अंतर्गत खरेदी केलेल्या जमिनीपूरता आहे. विभागाची सदरहू भूमिका समिती व महालेखाकारांनी मान्य केल्यामुळे या प्रकरणी कोणतीही शिफारस करण्यात येत नाही व सदरहू आक्षेप निकाली काढण्यात येत आहे.

२.३१ परिच्छेद क्र. ४.२.७.२ " अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली "

अभिप्राय :

दोन विभागीय आयुक्तालयांच्या वर्ग-२ विक्री परवानगी प्रकरणांच्या २५१ विक्री परवानगी प्रकरणामधील ३७ प्रकरणात कृषि व अकृषक वापरासाठी वर्ग-२ जमीन विक्रीस परवानगी देण्यात आली व रु. २.३८ कोटी अनर्जित उत्पन्नाची वसुली झाली. विभागीय आयुक्तांनी बाजार मूल्य व विक्री किंमत यातील जास्त असलेल्या किमतीचा अनर्जित उत्पन्नाच्या निर्धारणेसाठी विचार केला नाही. अनर्जित उत्पन्नाची रक्कम ठरवितांना बाजार मूल्य किंवा विक्री किंमत या पैकी जास्त किंमत विचारात घेतली असती तर रु. ६.२१ कोटी रक्कम वसुली योग्य असती. परिणामतः रु. ३.८३ कोटी कमी वसूल झाले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहे.

ऑगस्ट, २००७ ते ऑक्टोबर, २०१२ दरम्यान एकूण ३६ प्रकरणांमध्ये जमीन विक्रीची परवानगी देण्यात आली होती. मात्र रक्कम रेडीरेकनर दरानुसार वसूल करण्यात आली. परंतु महालेखाकार यांच्या आक्षेपानुसार अनर्जित रक्कम रेडीरेकनर दर किंवा व्यवहारातील दर यापैकी जी रक्कम जास्तीची असेल त्यानुसार रक्कम वसूल केली पाहिजे. अशा एकूण ३७ प्रकरणांपैकी रायगड येथील ६ प्रकरणांची पूर्ण वसुली झालेली असून कोल्हापूर येथील ३० प्रकरणांमध्ये वसुलीची प्रक्रिया सुरु असल्याचे समितीस सांगण्यात आले. जी रक्कम जास्त आहे ती आकारावी असे शासनाचे धोरण असतानाही तब्बल ३७ प्रकरणांमध्ये ही कमी आकारणी करण्यात आली. यावर त्यावेळी विभागीय आयुक्तांनी यास विक्री परवानगी दिलेल्या असून त्यावेळी हे अधिकार आयुक्तांना होते. आता दिनांक २० फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार रेडीरेकनर दर किंवा व्यवहारातील प्रत्यक्ष दर यापैकी जी रक्कम जास्त असेल त्यानुसार अनर्जित रक्कम वसूल करावी अशी स्पष्टता शासन निर्णयामध्ये आणलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले असता, अगोदरही हाच नियम होता. परंतु त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक होते. महालेखाकारांनी हे आक्षेप सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी नोंदविले असताना केवळ समितीने सदरहू बैठक लावल्यानंतर ही वसुलीची कार्यवाही विभागाने सुरू केली. विभागाने वेळेत वसूली सुरू केली असती तर आजपर्यंत ही वसुली पूर्ण झाली असती. विभागाने या प्रकरणी पाच-पाच वर्षे काहीच केले नाही. महालेखाकारांच्या या गंभीर आक्षेपांची कोणतीही दखल विभागाने आतापर्यंत घेतली नव्हती. साक्ष लागेपर्यंत ही सर्व आक्षेपित वसुलीची प्रलंबित प्रकरणे इतकी वर्षे संबंधितांनी ही प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांना दाखवून याबाबतची कारवाई होणे अपेक्षित होते. परंतु उपजिल्हाधिकारी अथवा त्याखाली अधिकाऱ्यांनी या बाबी वरिष्ठांच्या निदर्शनासदेखील आणल्या नाहीत. जिल्हाधिकारी स्तरावर दर महिन्याला आढावा बैठक होत असते त्यात सर्व प्रलंबित व वसुलीचे निर्णयदेखील घेण्यात येतात. या परिच्छेदातील रायगड येथील ७ प्रकरणी वसुली पूर्ण होऊ शकते तर कोल्हापूर येथील प्रकरणांचीही वसूली होणे आवश्यक होते असे समितीने विचारले असता, ३ महिन्यात ही वसुली करण्याचे समितीला आश्वासित करण्यात आले.

२.३२. शिफारस :

महसूल विभागाने स्पष्ट केले (ऑक्टोबर,२००६) की, वर्ग-II विक्रीच्या प्रकरणात जर जमीन विक्री करून मिळालेली किंमत प्रचलित बाजार मूल्यापेक्षा जास्त असेल तर अनर्जित उत्पन्नाची किंमत विक्रीच्या किमतीवर ठरविण्यात यावी. असे असतानाही अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली झालेली आहे व विभागाने ही अनर्जित रक्कम वसुल केल्याचे मान्यही केले. महालेखाकारांनी या प्रकरणी

नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून यात अनर्जित उत्पन्नाची कमी आकारणी व वसुली न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच ही प्रलंबित वसुली तात्काळ करण्यात यावी. तसेच ज्या अधिकाऱ्यांनी महालेखाकारांच्या आक्षेपानंतर वसुलीची कारवाई केली नाही त्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून तात्काळ कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

तसेच वर्ग-II प्रकारच्या जमिनीच्या विक्री पत्राची प्रत दुय्यम निबंधकाने जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवावी. तहसिलदाराने नामांतरणाच्या अर्जावर कारवाई करण्यापूर्वी विक्रीसाठी दिलेल्या परवानगी आदेशांची पडताळणी करावी व विभागीय आयुक्तांनी वर्ग-II प्रकारच्या जमीन विक्रीच्या परवानगीच्या प्रकरणाचा योग्य पाठपुरावा करावा अशी समितीची शिफारस आहे.

२.३३ परिच्छेद क्र. ४.२.८ " करार नोंदणी बाबतच्या शासकीय नियमांचे पालन न करणे "

अभिप्राय :

पाच जिल्हाधिकारी (अहमदनगर, भंडारा, कोल्हापूर, रायगड आणि सांगली) कार्यालयातील जमीन वाटप प्रकरणांच्या तपासणीत आढळून आले की, भोगवटा अधिकारावर केलेल्या जमीन वाटपाच्या ३४ पैकी २७ प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी करारनाम्याची नोंदणी न करता जमिनीचे हस्तांतरण केले. याखेरीज दस्तऐवज निष्पादित आणि पंजीकृत करण्याविषयीची नोंद अभिलेख्यात नव्हती. अशा प्रकारे शासन नियमांचे पालन न केल्यामुळे रु.४०.०२ लाख महसुलाची हानी झाली.

२.३४ शिफारस :

दि. ३१ ऑक्टोबर, २००६ च्या शासन निर्णयानुसार, शासकीय जमिनीचे विविध संस्था, व्यक्ती इत्यादींना भोगवटा अधिकार किंवा भाडेपट्ट्याने वाटप करण्याच्या सर्व प्रकरणांत वाटपग्रही बरोबर एक करारनामा निष्पादित केला पाहीजे आणि तो मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अंतर्गत नोदणीकृत केला पाहिजे. यात असेही नियम आहे की करारनामा निष्पादित आणि नोंदणीकृत झाल्याशिवाय जमिनीचा ताबा देण्यात येणार नाही अशी स्पष्ट तरतूद असतानाही त्याचे पालन करण्यात आले नाही.

(१) सदरहू परिच्छेदात आक्षेपित एकूण २७ प्रकरणांपैकी ५ प्रकरणे सोडून उर्वरीत प्रकरणांमध्ये वसुली झालेली असून या ५ प्रकरणांबाबत लवकरात लवकर वसुली सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः या प्रकरणी सर्व प्रलंबित वसुली तात्काळ करण्यात यावी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (MLR संहिता) कोणत्याही प्रकारच्या शासकीय जमिनीचे शासनास योग्य वाटेल अशा अटी व शर्तीवर वाटप करण्याची मुभा शासनास प्रदान करते. वाटप करावयाच्या जमिनीमध्ये महसूल मुक्त वाटप, भोगवटा मुल्याची (बाजार मुल्य असेही म्हणता येईल) भरणा केल्यावर झालेले वाटप, भाडेपट्ट्यावर अधिकार देऊन केलेले वाटप यांचा समावेश असतो व त्यांचे वाटप शासनाद्वारे अंगीकृत केलेले धोरण आणि त्या अंतर्गत आखलेले याविषयीचे नियम यांना अनुसरुन वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय विचारात घेऊन करण्यात यावे. असे असताना यासाठी विहित तरतुदींचे योग्यरित्या व नियमानुसार पालन न झाल्यामुळे महालेखाकारांनी हे गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. सदरहु आक्षेप महालेखाकारांनी सन २०१२-१३ या वर्षासाठी नोंदविलेले असताना समितीची साक्ष लागेपर्यंत काही प्रकरणांची पुर्ण वसुली देखील झालेली नव्हती. एवढेच नव्हेतर या आक्षेपांमधील कमी आकारणीसंदर्भात कोणत्याही अधिकाऱ्यांवर विभागाने कारवाई केली नाही. ही अत्यंत आक्षेपार्ह बाब आहे. वास्तविक विभागाने सबधितांवर कारवाई करूनच समितीसमारे साक्षीसाठी येणे आवश्यक होते. परंतु विभागाने तसे केले नाही. विभागाने अशा अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे अथवा संरक्षण देण्याचे कोणतेही कारण नाही. या सर्व आक्षेपांमधील बाबी अतिशय गंभीर असून विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षणामध्ये या अनियमितता लक्षात येणे आवश्यक होते. परंतु त्या विभागाच्या निदर्शनास आल्या नाही ही बाब विभागाचे अंतर्गत लेखापरिक्षण कमकुवत असल्याचे द्योतक आहे. एवढेच नव्हेतर केवळ नमुन्यादाखल महालेखाकारांनी केलेल्या तपासणीमध्ये ही प्रकरणे निदर्शनास आली. परंतु आक्षेप नोंदविलेल्या कालावधी व्यतिरिक्त व परिच्छेदाव्यतिरिक्त राज्यात अन्यत्र अशा बाबींची पुनरावृत्ती झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. अतः या सर्व प्रकरणांची विभागाने कालबद्ध पद्धतीने छाननी करून वसुली करावी व सबधितांवर कारवाई करावी. तसेच अंमलबजावणी अधिकाऱ्यांद्वारा शासन नियमांच्या प्रभावी पालनाविषयी शासनाने खातरजमा करावी. तसेच अंतर्गत लेखापरिक्षण यंत्रणा अधिक सक्षम करण्यात यावी. तसेच ही आकारणी करणेसाठी अद्ययावत संगणकीय प्रणालीचा वापर करावा व यात मानवी हस्तक्षेप टाळावा. तसेच लेखापरिक्षण हे शासकीय जमिनीचे भोगवटा मुल्य/भाडेपट्ट्याचे दर/अनर्जित उत्पन्न यांची आकारणी करण्याकरिता प्राधिकाऱ्यांद्वारे बाजार मुल्य निर्धारण योग्यप्रकारे केलेले आहे. करांची आकारणी आणि वसुली शासन नियमांतर्गत आणि मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन केली आहे. याची खातरजमा करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१ परिच्छेद क्र. ६.४.१ " केबल चालकांकडून वसुली न होणे/कमी होणे "

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.४.१ "केबल चालकांकडून वसुली न होणे/कमी होणे " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

३.२ परिच्छेद क्र. ६.४.१ केबल चालकांकडून वसूली न होणे/कमी होणे :

BED अधिनियमाच्या कलम ३ (४) अन्वये, केबल चालकाने महानगरपालिका "अ" व "ब" वर्ग नगरपालिका किंवा इतर क्षेत्रानुसार जून २००६ पासून प्रत्येक दूरचित्रवाणी संचावर दरमहा अनुक्रमे रु. ४५, रु. ३० किंवा रु. १५ या दराने करमणूक शुल्कची वसुली (DTH प्रकरण सेवांवर आकारणीय असलेल्या करमणूक शुल्कासह) जाहीर लिलाव नियम २००३ च्या नियम १४ अन्वये केबल चालकांचे निर्धारण आणि करमणूक शुल्काची वसुली जिल्हाधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे. या केबलचालकांनी करमणूक शुल्क भरण्याबरोबरच प्रपत्र "इ" मध्ये मासिक विवरणपत्र जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. BED अधिनियमाच्या कलम ४ (ब) (४) नुसार, विवरणपत्र विहीत मुदतीत सादर न केल्यास, केबल चालकास पुरेसा अवधी दिल्यानंतर राज्य शासनाने केबल चालकांकडून देय असलेल्या करमणूक शुल्काचे एकतर्फी निर्धारण करून करमणूक शुल्काचे आणि लागू झाल्यास, दंडाचे प्रदान करण्यास त्यांना निर्देशित करावे कलम ४ २ (ब) च्या तरतुदींचे पालन न झाल्यास कलम ५ अ अंतर्गत सहा महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा रु. ५००० पर्यंत दंड किंवा दोन्ही अशाप्रकारे शिक्षेची तरतूद आहे. कर प्रदानात कसून झाल्यास BED अधिनियमाच्या कलम ९ब नुसार, पहिल्या ३० दिवसांकरिता वार्षिक १८ टक्के दराने आणि आकारणीय असते.

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०११ रोजी संपलेल्या वर्षाच्या अहवालातील (महसूली जमा) चे परिच्छेद क्रमांक ७.३ मध्ये केबल चालकाकडून करमणूक शुल्काचे प्रदान होत नसल्याचे नमूद केले होते. शासनाने असे नमूद केले की, सर्व विभागीय आयुक्तांना करमणूक शुल्क वसूल करण्याच्या वतीने तसेच वसुली होत असल्याचे खात्री करण्यासाठी कार्यतंत्र प्रस्थापित करण्यास सुरूवात करण्याचे निर्देश दिले होते. तथापि, करमणूक शुल्काच्या वसूलीचे प्रमाण सातत्याने कमीच होते जे खाली दर्शविले आहे. फेब्रुवारी, २०११ ते जानेवारी, २०१३ दरम्यान ३५ कार्यालयाच्या (आठ DC, आठ RDC, चार ENT. Dos. आणि १५ TMs) वसुली नोंदवह्यांच्या चाचणी, तपासणी दरम्यान, आमच्या निदर्शनास आले की, २००८-०९ ते २०११-१२ दरम्यान, निरनिराळ्या कालावधीत ५३६ केबल चालकांनी रु. २.३६ कोटी करमणूक शुल्क भरले नव्हते. या केबल चालकांनी "इ" मध्ये विवरणपत्रे देखील सादर केली नव्हती. संबंधित अधिकाऱ्यांनी प्राप्त न झालेल्या प्रपत्र " इ " मधील विवरणपत्रांचा पाठपुरावा केला नव्हता व वसुली नोंदवहीचा आढावा ही घेतला नव्हता. परिणामी ५३६ केबल चालकांकडून एकूण रु. २.३६ कोटी करमणूक शुल्काची वसुली झाली नाही. या शिवाय विहीत दराने व्याज देखील आकारणीय होते. ही प्रकरणे आम्ही निदर्शनास आणुन दिल्यावर विभागाने अभिक्षणे मान्य करून ऑगस्ट, २०११ ते मार्च, २०१३ दरम्यान ६९ केबल चालकांकडून रु. २९.२२ लाखाची वसूली केल्याचे कळविले. उर्वरित रकमेच्या वसुलीचा अहवाल अद्याप प्रतिक्षित आहे ही बाब शासनास मे, २०१३ मध्ये कळविली, त्याचे उत्तर प्रतिक्षित आहे. (जानेवारी, २०१४)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरचा परिच्छेद हा कोकण, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभागाशी संबंधित आहे.

(१) कोकण विभागातील ४ जिल्ह्यातील एकूण थकीत रक्कम रुपये १,९७,८९,५४५ पैकी रक्कम रुपये १,७५,२७,००० (८९%) वसूल करण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम रुपये २२,६२,५४५ यापैकी पालघर जिल्ह्याची रक्कम रुपये १,४३,००० इतकी रक्कम वसूल पात्र नसल्याने सदर रक्कम निर्लेखित करणे आवश्यक आहे. उर्वरीत रक्कम रुपये २१,१९,५४५ इतकी रक्कम वसूल करण्याची कार्यवाही संबंधित अपर जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

(२) सदर परिच्छेदात नमुद पुणे विभागातील थकीत करमणूक शुल्काच्या एकूण रक्कम रुपये २६,१५,००० यापैकी १००% रकमेची वसुली पूर्ण झाली आहे.

(३) औरंगाबाद विभागातील बीड जिल्ह्यातील थकीत करमणूक शुल्काच्या रु.३,३०,००० इतक्या संपुर्ण रक्कमेची (१००%) वसुली पूर्ण झाली आहे.

(४) परिच्छेदात नमुद अमरावती विभागातील अमरावती जिल्ह्यातील ३० प्रकरणात थकीत करमणूक शुल्काच्या एकूण रु.६,७१,००० इतक्या रक्कमेपैकी रु. ३,६३,००० इतक्या रक्कमेची (५४%) वसुली पूर्ण झाली आहे. उर्वरीत रक्कम रु. ३,०८,००० वसूल करणेची कार्यवाही संबंधीत अपर जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

(५) परिच्छेदात नमुद नागपूर विभागातील २ जिल्ह्यातील थकीत करमणूक शुल्काच्या एकूण रु. १,९४,०१० इतक्या रक्कमेपैकी संपुर्ण रक्कमेची (१००%) वसुली पूर्ण झाली आहे.

सदर परिच्छेदातील राज्यातील एकूण आक्षेपित रक्कम रु.२,३६,००,००० यापैकी एकूण रु.२,१०,२९,०१० इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

सदरच्या परिच्छेदातील वसूल करण्यात आलेली सदर रक्कम ही आक्षेपित रकमेच्या ९०% इतकी आहे. त्यामुळे, सदरचा खुलासा मान्य करून सदर परिच्छेद निकाली काढण्यात यावा, अशी शिफारस करण्यात येत आहे.

३.३ परिच्छेद क्र. ६.४.२ प्रत्यक्ष वाद्यवृंद असलेल्या परमिट रुम/बिअर बार यांच्याकडून करमणूक शुल्काची वसूली न करणे :

महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या १७ ऑक्टोबर, २०१० च्या आदेशान्वये BED अधिनियमाच्या कलम ३ (११) च्या तरतुदीन्वये, २० जानेवारी, २०१० पासून महानगरपालिका क्षेत्रातील (MC) प्रत्यक्ष वाद्यवृंद असलेल्या परमिट रुम/बीअर बार कडून दरमहा रु. ५०,००० या दराने करमणूक शुल्क वसूल करावयाचे आहे. हे शुल्क ज्या महिन्याशी संबंधित असते त्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत ते आगाऊ वसूल करायचे असते आणि प्रत्यक्ष वाद्यवृंदांकडून वसूली नोंदवही द्वारे त्यावर लक्ष ठेवायचे असते. BED अधिनियमाच्या कलम ९ब नुसार शुल्क प्रदानात कसूर झाल्यास पहिल्या ३० दिवसांसाठी १८ टक्के प्रतिवर्षे आणि त्यानंतर २४ टक्के प्रतिवर्ष या दराने व्याजही आकारावयाचे असते. शुल्काच्या प्रदाकरीता मागणी सुचना जारी केली जाते आणि मागणी सुचनेस प्रतिसाद न दिल्यास त्यासाठी सहा महिने पर्यंत किंवा रु. ५००० पर्यंत दंड किंवा दोन्ही अशाप्रकारे शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

मे, २०१२ ते मार्च, २०१३ दरम्यान १२ कार्यालयांच्या (सहा ११ DC आणि सहा १२ TM) प्रत्यक्ष वाद्यवृंद वसुली नोंदवहीच्या चाचणी तपासणीत आमच्या निदर्शनास आले की, २०१०-११ ते २०११-१२ यामधील निरनिराळ्या कालावधीमध्ये प्रत्यक्ष वाद्यवृंद असलेल्या ५९ परमिट रुम/बिअर बार कडून रु. २.२६ कोटी रकमेचे करमणुक शुल्क वसूल केले नव्हते. अशाप्रकारे, संबंधित अधिकाऱ्यांनी नोंदवहीचा आढावा न घेतल्यामुळे एकंदर रु. २.२६ कोटी करमणुक शुल्काची वसुली झाली नाही. शिवाय विहीत दराने व्याज देखील आकारणीय होते. आम्ही ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यावर विभागाने अभिक्षणे मान्य केली आणि जून २०१२ ते जुलै, २०१३ दरम्यान ३२ कसूरदारांकडून रु. १.०५ कोटी वसूल केल्याचे कळविले. उर्वरित रक्कमेच्या वसुलीचा अहवाल प्रतिक्षित आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरचा परिच्छेद हा कोकण विभागाशी संबंधित आहे. सदर परिच्छेदात आक्षेपित रक्कम ही रुपये २,२६,००,००० इतकी नमुद करण्यात आली आहे.

त्यानुसार कोकण विभागातील सदर आक्षेपित रकमेपैकी रुपये २,२०,००,००० इतकी रक्कम वसूल करणेत आली आहे (९७.५%).

तथापि, उक्त आक्षेपित रक्कम रुपये २,२६,००,००० पैकी उर्वरीत रु. ६,००,००० इतक्या रकमेची वसुली प्रलंबित आहे.

त्यामुळे, सदरच्या परिच्छेदातील आक्षेपित रकमेची ९७.५% इतकी झालेली वसुली लक्षात घेता, सदर परिच्छेद निकाली काढण्यात यावा, अशी शिफारस करण्यात येत आहे.

३.४ परिच्छेद क्र. ६.४.३ न वटलेल्या धनादेशांच्या बाबतीत करमणुक शुल्काची वसुली न होणे :

BED अधिनियमाच्या तरतुदीनुसार, करमणुक शुल्क रोखीने अथवा धनादेशाद्वारे भरता येते. तसेच, जर कोणत्याही कारणाने, करमणुक शुल्क ज्या धनादेशाद्वारे भरले आहे तो धनादेश वटविला गेला नाही तर विभागाने कसूरदारांकडून व्याजासह अंतर्भुत रक्कम रोखीने त्वरीत वसूल करावी व परक्राम्य लेख अधिनियम (सुधारित), १९८८ NI अधिनियम) च्या कलम १३८ मधील तरतुदीन्वये कार्यवाही देखील करावी.

२०१० ते जुलै, २०१२ दरम्यान नऊ कार्यालयांच्या (तीन DC एक, एक EDO आणि चार TM) अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीमध्ये, धनादेश/न वटलेले धनादेश यांच्या नोंदवहीवरुन आमच्या निदर्शनास आले की, २००८-०९ आणि २०११-१२ दरम्यान ५० प्रकरणांत, रु.१३.०३ लाख रक्कमेच्या करमणुक शुल्काच्या प्रदानाकरीता केबल चालकांनी दिलेले धनादेश वटले नव्हते. या रकमा व्याजासह रोखीने वसूल करावयाच्या होत्या. संबंधित अधिकाऱ्यांनी कसुरदारांकडून रक्कम वसूल करण्याची कोणतेही कार्यवाही केली नाही व NI अधिनियमांतर्गत अपेक्षित कायदेशीर कारवाईही केली नाही. यामुळे रु. १३.०३ लाख करमणुक शुल्क व त्यावरील व्याजाची वसुली होऊ शकली नाही. आम्ही एप्रिल, २०११ आणि मार्च, २०१३ दरम्यान ३८ कसुरदारांकडून रु. ९.९६ लाखांची रक्कम वसूल केल्याचे कळविले. उर्वरित रकमेच्या वसूली अहवाल प्रतिक्षित आहे. आम्ही ही बाब शासनास मे, २०१३ मध्ये कळविली, त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरचा परिच्छेद हा कोकण विभाग व पुणे विभाग यांच्याशी संबंधित आहे.

(१) पुणे विभागतील एकूण थकीत रक्कम रुपये १,५१,२६० पैकी संपूर्ण (१००%) रक्कम वसूल करण्यात आली असून जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या पत्र क्र.ऑडिट/कावि/१६/२०१७, दिनांक ०४/३/२०१७ अन्वये यासंदर्भातील अहवाल महालेखाकार कार्यालय, मुंबई यांना सादर करण्यात आला आहे.

(२) कोकण विभागातील ३ जिल्ह्यातील एकूण आक्षेपित थकीत रक्कम रुपये ११,५२,१७३/- पैकी ०९,७५,७५८/- (८५%) वसूल करण्यात आली आहे. उर्वरीत थकीत रक्कम रुपये १,७६,४१५/ वसुली करणेची कार्यवाही संबंधित अपर जिल्हाधिकारी स्तरावर चालू आहे.

सदर परिच्छेदात नमूद करण्यात आलेल्या आक्षेपित रकमेपैकी मोठ्या प्रमाणावरील आक्षेपित रक्कम ही केबल चालकांची असून त्यातील काही केबल चालकांनी त्यांचे व्यवसाय बंद केले आहेत. तसेच, काही केबल चालकांचे पत्ते आढळून येत नाहीत आणि काही केबल चालकांनी त्यांचा व्यवसाय हस्तांतरीत केलेले आहे. सदरहू थकीत करमणूक शुल्काच्या रकमेची वसुली करण्यामध्ये क्षेत्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत.

करमणूक शुल्कासंदर्भातील प्रस्तुत परिच्छेदामध्ये वसूल करण्यात आलेल्या रुपये ११,२७,०१८ इतक्या रकमेबाबतच्या चलनांच्या प्रती व त्याबाबतचा गोषवारा सोबत जोडला आहे. त्यामुळे सदरच्या परिच्छेदातील आक्षेपित रकमेची ८६% इतकी झालेली वसुली लक्षात घेता, सदर परिच्छेद काढण्यात यावा, अशी शिफारस करण्यात येत आहे.

३.५ परिच्छेद क्र. ६.४.४. करमणुक शुल्काच्या विलंबित प्रदानावर दंडनीय व्याजाची आकारणी न करणे :

BED अधिनियमाच्या ३ (१५) च्या तरतुदींनुसार, केबल चालकाने करमणुक शुल्क आकारून ते पुढील महिन्याच्या दहा तारखेपर्यंत भरायचे असते आणि कलम ३ (११) आणि (१७) अनुसार, डान्स बार/डिस्कोथेकच्या मालकाने करमणुक शुल्क आकारून प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत आगाऊ भरायचे असते. तसेच, कलम ९ब अनुसार, करमणुक उपलब्ध करून देणारा मालक, कलम ३ खाली विहीत केलेल्या कालावधीत किंवा कलम ९अ अंतर्गत ठरवलेली करमणुक शुल्काची composition रक्कम भरण्यास अपयशी ठरला तर तो, शासनास करमणुक शुल्क किंवा ठरविलेल्या रकमेसह अशा रकमेवर ज्या तारखेपासून रक्कम देय होती त्या तारखेपासून ती रक्कम आणि व्याज पूर्ण भरेपर्यंत पहिल्या ३० दिवसांसाठी वार्षिक १८ टक्के दराने आणि त्यानंतर वार्षिक २४ टक्के दराने दंडनीय व्याज भरण्यास जबाबदार असतो.

DC (झोन I—ऑगस्ट, २०१२ मध्ये तीन कार्यालयांतील वसुली नोंदवही, चलान आणि ब विवरणांच्या चाचणी तपासणीमध्ये आम्हाला असे आढळुन आले की, २००७-०८ ते २०११-१२ या कालावधीतील १८ प्रकरणांत जरी करमणुक शुल्काचे प्रदान करण्यास १६ ते ३९० दिवसांचा विलंब झाला होता तरी रु. ५.९१ लाख दंडनीय व्याज आकारले गेले नव्हते. आम्ही ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर, DC आणि RDC नी अभिक्षणे मान्य केली आणि ऑक्टोबर, २०१२ ते मार्च, २०१३ दरम्यान पाच कसुरदारांकडून रु.३.४९ लाख वसूल केल्याचे कळविले. TM अंबरनाथ यांनी असे सांगितले की, ह्याबाबत पडताळणी केली जाईल आणि नंतर मागणी सुचना जारी केल्या जातील. आम्ही ही बाब शासनास मे, २०१३ मध्ये कळविली, त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे.(जानेवारी, २०१४)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरच्या परिच्छेद हा कोकण व पुणे विभागशी संबंधित आहे

(१) कोकण विभागातील आक्षेपित थकीत रक्कम रुपये ५,०१,६९३ पैकी रुपये ४,३९,९७३ (८८%) इतक्या रकमेची वसुली करण्यात आली आहे. उर्वरीत थकीत रक्कम रुपये ६०,००० वसूल करणेची कार्यवाही संबंधित अपर जिल्हाधिकारी स्तरावर चालू आहे.

(२) पुणे विभागातील सोलापूर जिल्ह्यातील एकूण आक्षेपित थकीत रक्कम रुपये ८९,२९१/ (१००%) इतक्या रकमेची वसूल करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचेकडील पत्र क्र.करमणुक/आर आर-१९०-१३ दिनांक २९.६.२०१३ अन्वये महालेखाकार कार्या., मुंबई यांना अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

त्यामुळे, सदरच्या परिच्छेदातील आक्षेपित रकमेची ९०% इतकी झालेली वसुली लक्षात घेता, सदर परिच्छेद निकाली काढण्यात यावा, अशी शिफारस करण्यात येत आहे.

३.६ परिच्छेद क्र. ६.४.५ थेट घरपोच (DTH) सेवा पुरवठादारांवर दंडनीय व्याजाची आकारणी न करणे :

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने दिनांक ४ सप्टेंबर, २००८ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अन्वये अधिकृत खात्यात करमणूक शुल्काचा भरणा प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला किंवा त्यापूर्वी करणे आवश्यक आहे. मालकाने ही रक्कम विहीत कालावधीत भरली नाही, तर शुल्काच्या रकमेव्यतिरिक्त ही रक्कम पूर्ण भरेपर्यंतच्या कालावधीसाठी या रकमेवर पहिल्या ३० दिवसांसाठी १८ टक्के प्रतिवर्ष या दराने व त्यानंतर २४ टक्के प्रतिवर्ष या दराने दंडनीय व्याज भरणे मालकावर बंधनकारक राहील.

जानेवारी आणि फेब्रुवारी, २०१३ मध्ये देयक तथा धनादेश नोंदवही बरोबर करमणूक शुल्काच्या मासिक विवरणपत्राच्या छाननी दरम्यान आमच्या निदर्शनास आले की, चार सेवा पुरवठादारांकडून एप्रिल, २०११ ते फेब्रुवारी, २०१२ दरम्यान रु.२३.३६ कोटीचा करमणूक शुल्काच्या प्रदानात एक ते ९४ दिवसांचा विलंब झाला होता. विभागाने या सेवा पुरवठादारांकडून व्याज आकारणी किंवा व्याजाची मागणी न केल्यामुळे रु.४२.५० लाख दंडनीय आकारणी झाली नाही. ही बाब मार्च, २०१३ मध्ये आम्ही निदर्शनास आणून दिल्यावर विभागाने अभिक्षण मान्य केले. वसुलीबाबत अहवाल प्रतिक्षित आहे. आम्ही ही बाब शासनास मे, २०१३ मध्ये कळविली, त्याचे उत्तर प्रतिक्षित आहे. (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सदरचा परिच्छेद हा कोकण विभागाशी संबंधित आहे. सदरच्या परिच्छेदात नमूद कोकण विभागातील संपूर्ण आक्षेपित रक्कम रुपये ४२.५० लाख (१००%) वसूल करण्यात आली आहे.

त्यामुळे, सदरच्या परिच्छेदातील आक्षेपित रकमेची १००% इतकी झालेली वसुली लक्षात घेता, सदर परिच्छेद निकाली काढण्यात यावा, अशी शिफारस करण्यात येत आहे.

३.७ परिच्छेद क्र. ६.४.६ सुरक्षा अनामत ठेव रक्कम जप्त न करणे :

मुंबई करमणूक कर नियम, १९५८ च्या नियम १४ व्या तरतुदींनुसार, प्रत्येक संयोजकाने विनिर्दिष्ट अधिकाऱ्याकडे, अधिकारी ठरवेल त्याप्रमाणे सुरक्षा अनामत ठेव जमा करणे आवश्यक आहे. जर एखाद्या संयोजकाने करमणुकीच्या कार्यक्रमाच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत अथवा एक महिन्यापेक्षा कमी वाढीव मुदतीत नियम १६ अथवा २१ अंतर्गत विवरणपत्र सादर केले नाही, तर संबंधित अधिकाऱ्याने संयोजकास एका आठवड्याची नोटीस देऊन सुरक्षा अनामत ठेव जप्त करावी.

उप जिल्हाधिकारी (सुट), मुंबई आणि MSD फेब्रुवारी, २०१२ आणि मार्च, २०१३ मध्ये स्वीय प्रंपजी लेखा (PLA) व रोख नोंदवहीच्या चाचणी तपासणी दरम्यान आमच्या असे निदर्शनास आले की, ऑगस्ट, २०१० ते मार्च, २०१२ दरम्यान ४८ आयोजकांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाकरिता घेतलेली एकूण रु. ४९.८४ लाख रकमेची सुरक्षा अनामत ठेव अद्याप राज्याच्या एकत्रिकृत निधीबाहेर म्हणजेच PLA मध्ये पडून होती. संयोजकांनी विहीत शर्तीचे पालन केले नसतानाही, उप जिल्हाधिकाऱ्यांनी विवरणपत्रे सादर न होण्याचा मागोवा घेतला नाही तसेच सुरक्षा अनामत ठेवी जप्त करण्याबाबत सुचनापत्रेही निर्गमित केली नाहीत. परिणामी ४८ संयोजकांची एकूण रु. ४९.८४ लाख रकमेची सुरक्षा अनामत ठेव जप्त झाली नाही. येथे असे नमूद करता येईल की, ज्याअर्थी करमणूक कार्यक्रम आयोजकांनी विभागास देय ED पेक्षा अधिक सुरक्षा अनामत ठेवीच्या परताव्याची विनंती केली नाही, त्याअर्थी विभागाने गोळा केलेल्या सुरक्षा अनामत ठेवीपेक्षा प्रत्यक्ष प्रदान करण्याचा ED जास्त असण्याच्या शंकेला वाव आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या (महसुली जमा) ३१ मार्च, २००९ व ३१ मार्च, २०१२ रोजी संपलेल्या वर्षाच्या लेखापरीक्षा अहवालाच्या अनुक्रमे परिच्छेद ६.२.१९ आणि ६.३.६ मध्येही अशीच अभिक्षणे नोंदविली होती ज्यात अशी सुद्धा शिफारस केली होती की, विशेष कार्यक्रमांच्या संयोजकांनी लेखे वेळेवर सादर करण्याच्या सुनिश्चितीसाठी यंत्रणा सुरू करावी. जेणेकरून देय ED ची योग्य रक्कम निर्धारित केली जाईल. सुरक्षा अनामत रक्कम वाढविली जाईल आणि लेखे सादर न केल्यास दंडाची तरतूद केली जाईल.याबाबत शासनाने केलेली कार्यवाही अद्याप प्राप्त झालेली नाही. मार्च, २०१२ मध्ये आम्ही ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यावर विभागाने अभिक्षणे स्वीकारली आणि नमूद केले की, सुरक्षा अनामत ठेव जप्त करून ती शासकीय खात्यात जमा करण्याकरिता आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. या प्रकरणातील पुढील कार्यवाही करण्यात येईल. या प्रकरणातील पुढील कार्यवाही प्रतिक्षित आहे. यावरुन असे स्पष्ट दिसून येते की, आम्ही निदर्शनास आणून देईपर्यंत कार्यवाही करण्यात आली नव्हती म्हणजेच नियंत्रण व्यवस्था कमकुवत होती. हे प्रकरण शासनाच्या निदर्शनास आणून दिले (जून, २०१२) त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे. (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

कोकण विभागातील मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यांची शासन जमा करणेची एकूण रक्कम रु.४९,८३,९२० आहे. त्यापेकी मुंबई शहर जिल्ह्याची रक्कम रु. ५,५८,००० रुपये शासन जमा करणेत आलेली आहे. मुंबई उपनगर जिल्ह्याची रक्कम रु.१३,२२,७७९ रुपये संबंधित व्यक्तींना परतावा देणेत आलेला आहे. उर्वरीत रक्कम रु.३१,०३,१४१ शासन जमा करणेची कार्यवाही सुरू आहे. ती कार्यवाही ३१ जानेवारी, २०१८ अखेर पूर्ण करणेची कार्यवाही संबंधित अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावर सुरू आहे.

तरी झालेली कार्यवाही विचारात घेवून आक्षेप वगळणेस विनंती आहे.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २४ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिव तसेच इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

३.८ परिच्छेद क्र. ६.४.१ “ केबल चालकाकडून वसुली न होणे/कमी होणे ” :

उपरोक्त मुद्यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर परिच्छेद हा कोकण, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागाशी संबंधित आहे. एकूण ४ विभागांकडून रक्कम वसूल करावयाची होती. कोकण विभागात तीन-चार जिल्ह्यांतील एकत्र १ कोटी ९७ लाख ८९ हजार ३४५ रुपये वसूल करावयाचे होते. ८९ टक्के रक्कम वसूल केलेली असून त्यामध्ये पालघरचे १ लाख ४५ हजार रुपये निर्लेखित करावयाचे होते. या रकमेचे योग्य परिगणना (कॅलक्युलेशन) केली नव्हती. २१ लाख १९ हजार ५४५ रुपये शिल्लक राहिले होते ते वसूल केलेले आहेत. पुणे, औरंगाबाद या जिल्ह्यात १०० टक्के रक्कम वसूल झालेली आहे. समितीने पुढे विचारणा केली की, व्याज वसूल करण्याची तरतूद आहे. कोकण विभागात ८९ टक्के मूळ रकमेची वसुली झालेली आहे. प्रलंबित असलेल्या रकमेवर व्याजाची आकारणी करण्यात आली आहे काय? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, मूळ रक्कम वसूल झालेली असून व्याजाची वसुली करावयाची आहे. व्याजाची रक्कम वसूल करण्याबाबत नोटीस दिलेली आहे. डिमांड नोटीस दिलेली आहे.

अमरावती जिल्ह्यामध्ये ७ प्रकरणांमध्ये रक्कम शिल्लक राहिली आहे. अमरावती जिल्ह्यातील ३० प्रकरणांमध्ये ६ लाख ७१ हजार रुपये वसूल करावयाचे होते ; त्यापैकी ३ लाख ६३ हजार रुपये वसूल केले होते. यानंतर आणखी काही रक्कम वसुली झालेली आहे. साधारणपणे ६० टक्के रक्कम वसूल झाली आहे. ७ प्रकरणांमध्ये पत्ते सापडत नसल्यामुळे रक्कम वसूल होऊ शकली नाही. या अनुषंगाने समितीने सुचित केले की, अमरावती जिल्ह्यामध्ये वसुलीबाबत ज्या ७ प्रकरणांत पत्ते सापडत नाही. त्याबाबत समितीसमोर विभागाने काही माहिती दिली तर स्थानिक लोकप्रतिनिधी विभागाला पत्ते शोधण्यास मदत करु शकतील यावर विभागीय सचिवांनी सदर माहिती समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासित केले.

विभागाला पत्ते सापडत नाही ही आश्चर्याची बाब आहे. याबाबत तहसिलदारांना पत्र देऊन पाठपुरावा केला होता. अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे जबाबदारी आहे. त्यानुसार तहसीलमध्ये कोणावर जबाबदारी आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, नगरविकास विभागाचे इन्स्पेक्टर्स असतात. त्यांच्याकडून वसुलीकरिता पाठपुरावा केला जाते. त्यांनी या ७ प्रकरणांत पाठपुरावा केला आहे. आता ही प्रकरणे जुनी झालेली असून त्यांचे पत्ते सापडत नाही. तरी देखील ते प्रयत्न करण्यात येत आहेत.

नगरविकास विभागाचे किती इन्स्पेक्टर्स असतात ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्याचा आकृतीबंध तयार केलेला आहे. करमणूक शुल्क आकारण्याकरिता वेगळा कर्मचारी वृंद आहे. राज्य स्तरावर करमणूक कराशी निगडित ४२९ पदे आहेत. दि. १ जुलै २०१७ पासून जीएसटीची अंमलबजावणी झाल्यानंतर करमणूक कराची वसुली बंद झालेली आहे. यामुळे हा कर्मचारी वर्ग आता उर्वरित कामाकरिता वापरला जात आहे.

करमणूक निरीक्षकांची ४२९ पदे आहेत. ही पदे महसूल विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहेत का? का त्यांना मागील वसुलीचे काम देण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, करमणूक कराशी निगडीत कामकाज पूर्ण करणे ही पहिली प्राथमिकता आहे. ते काम पूर्ण केल्यानंतर त्या पदांचा जिल्हाधिकारी कार्यालयातील अन्य शाखांमध्ये जेथे आवश्यकता आहे तेथे कसा वापर करण्यात येऊ शकतो विभागाकडून विचार करण्यात येणार आहे. याबाबत त्यासाठी वित्त विभागाच्या पूर्व अनुमतीने तो प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची बाब विचाराधीन आहे.

केबल चालकाकडून वसूलीसंदर्भात असलेल्या प्रकरणाबाबत समितीला जिल्हावाईज माहिती द्यावी. असे निदेश समितीने दिले असता, विभागीय सचिवांनी होकारात्मक उत्तर दिले.

दि. ३१.३.२०११ पर्यंत रक्कम वसूल झालेली आहे. २ कोटी ३६ लाख रुपये एवढ्या मोठया प्रमाणात करमणूक शुल्क प्रलंबित होते. आता पर्यंत टप्प्या-टप्प्याने ९० टक्के वसुली झालेली आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, ही वसुली नियमानुसार होणे अपेक्षित आहे. त्या नुसार ही वसुली झालेली नाही हे स्पष्ट आहे. वसुली करण्याचा प्रयत्न सुरु आहे. पण यामध्ये काही अडचणी येत आहेत. काही प्रकरणामध्ये केबल चालकांचा पत्ता सापडत नाही. तर काही जणांनी आपला व्यवसाय इतर व्यक्तीला विकलेला आहे. ही वसुली यापूर्वीच नियमित केली असती तर अशी अडचण आली नसती. दि. १ जुलै, २०१७ पासून करमणूक शुल्क बंद झालेले आहे. त्यामुळे यामध्ये काही सुधारणा करण्यास आता वाव नाही. ही वसुली लवकरात लवकर करून खाते बंद करण्याच्या सूचना विभागाने दिलेल्या आहेत.

केबल वायर्स टाकण्याबाबत राज्य शासनाचे काही धोरण आहे काय ? कारण राज्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हॅलिकॉप्टरला केबल वायरमुळे अडचण आली होती. या संबंधी काही धोरण तयार केले जाणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, केबल टीव्ही रेग्युलेशनबाबत केंद्र शासनाचा वेगळा कायदा आहे. समिती समोरील विषय करमणूक कराच्या वसुलीबाबतचा आहे. यासंबंधी अद्याप राज्य शासनाने कोणतीही पॉलिसी तयार केलेली नाही.

पण अजूनही काही केबल चालक इलेक्ट्रीक पोलवरून वायर टाकतात. विभागाने ज्या अटी व शर्ती घालून दिल्या आहेत त्यांचे पालन होते की नाही हे पाहण्याचे काम इन्स्पेक्टरचे नाही काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, करमणूक कर वसुलीसंबंधी वेगळा कायदा आहे तसेच केबल टीव्ही रेग्युलेशन ॲक्ट आहे. राज्य शासनाच्या स्तरावरून केबल वायर कशा टाकाव्यात याबाबत पॉलिसी तयार केलेली नाही.

या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, केबल रेग्युलेशन ॲक्ट केंद्र शासनाचा आहे पण त्याबाबत अंमलबजावणी करण्याचे काम राज्य शासनाचे नाही काय ? यावर विभागीय होकारार्थी उत्तर दिले.

केंद्र शासनाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी होत आहे की नाही, हे पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, केबल टीव्ही रजिस्ट्रेशनचा कायदा वेगळा आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडे जबाबदारी सुपूर्द केली आहे. त्यांच्याकडून हे कामकाज पाहिले जाते. हा विषय वेगळा आहे. केबल टीव्हीचे लाईन्स कंट्रोल करण्यासाठी काही धोरण आखले जाणार काय असा प्रश्न आहे. महसूल विभागाने अद्याप यासंबंधी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

याबाबत वित्त सचिवांनी समितीस अवगत केले की, केंद्र शासनाच्या अंतर्गत राज्य शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने राईट ऑफ वे अंतर्गत पॉलिसी अपग्रेड केलेली आहे. महापालिका त्याकरिता तरतूद देते. सध्या शासनाकडे राईट ऑफ वे पॉलिसी अस्तित्वात नाही. आता ती पॉलिसी तयार करण्याची आवश्यकता आहे.

यासंबंधी राज्य शासनाने पॉलिसी तयार करावयास हवी होती असे समितीने सुचित केले व जीएसटी अंतर्गत करमणूक कराचे समायोजन केलेले आहे ही बाब निदर्शनास आणली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक १ जुलै, २०१७ पासून जीएसटी लागू झालेला आहे. करमणूक करासबधी राज्य शासनाचे अधिकार संपले असून आता राज्य शासन या कराची वसुली करीत नाही.

राज्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महसूल विभागाने केबल संदर्भातील धोरणाबाबत विचार करावा असे समितीने सूचित केले.

३.९ परिच्छेद क्र. ६.४.२ प्रत्यक्ष वाद्यवृंद असलेला परमिट रुम /बीअर बार यांच्याकडून करमणूक शुल्काची वसूली न करणे :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने विचारणा केली की, विभागाने व्याजाची मागणी केली आहे काय, एकुण रकमेपैकी किती वसुली झालेली आहे, ६ लाख रुपयांवर स्टे आणलेला आहे. उर्वरित रकमेची वसुली झालेली आहे. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मूळ रक्कम २ कोटी २६ लाख रु. होती. त्यापैकी २ कोटी २० लाख रुपयांची वसुली झाली असून ६ लाख रुपयांसबंधी कोर्टात दावा प्रलंबित आहे. महसूल विभागाने अपील दाखल केलेला आहे. अंतिम आदेश आल्यानंतर त्यानुसार निर्णय घेतला जाईल. व्याज वसूल करण्याबाबत नोटीस दिलेली आहे. अद्याप या रकमेची वसुली व्हावयाची आहे. कोकण विभागात मुंबई व मुंबई उपनगरे मिळून ७४.२ लाख रुपये वसूल करावयाचे आहेत. ७४ हजार रुपये वसूल केलेले आहेत. ७३.४६ लाख रुपयांची वसुली करावयाची आहे.

सन २०११ पर्यंतच्या वसुलीची ही रक्कम आहे. आतापर्यंत ही रक्कम वसूल होत नसेल तर आरसीसी काढण्यात यावी. असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया अवलंबण्यात यावी, अशा सूचना दिलेल्या आहेत.

पण जो ६ लाख रुपयांचा वाद आहे तो कोर्टासमोर नाही. मंत्री महोदयांनी या संदर्भात सुनावणी घ्यावी, असे कोर्टाने सांगितले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, आता मंत्री महोदयांकडे अपील प्रलंबित आहे. ज्या ठिकाणी परमीट रुममध्ये ऑर्केस्ट्रा असतो त्यांना प्रती माह ५० हजार रुपये भरावयाचे असतात. संबंधित व्यक्तीने त्याला चॅलेंज केलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार ही रक्कम देय नाही. त्यामुळे त्यांनी अपील केलेले आहे.

या प्रकरणात व्याजाची रक्कम लवकरात लवकर वसूल करण्यासाठी अत्यावश्यक कडक कार्यवाही करण्यात यावी, असे समितीने सूचित केले.

३.१० परिच्छेद क्र. ६.४.३ न वटलेला धनादेशांच्या बाबतीत करमणूक शुल्कांची वसुली न होणे :

सदर परिच्छेद हा धनादेश न वटल्याच्या संदर्भातील आहे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये पुणे व कोकण विभागाचा संबंध आहे. पुणे विभागातील रक्कम १,५१,२६० रुपये होती आणि ती संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली आहे. कोकण विभागातील ३ जिल्ह्यांतील एकूण रक्कम ११,५२,१७३ रुपये होती. यापैकी ८५ टक्के रक्कम वसूल करण्यात आली आहे. आता १,७६,४१५ रुपये वसूल करावयाचे आहेत. ही रक्कम मुंबई शहरातील आहे. अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्यामार्फत वसुलीची प्रक्रिया सुरु आहे. तसेच त्यामध्ये व्याजाच्या रकमेची मागणी करण्यात आली आहे.

Why action has not been taken under Section 138 ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या प्रकरणामध्ये वसुली झालेली आहे त्या प्रकरणामध्ये अपर जिल्हाधिकारी यांनी कारवाई केलेली नाही. आता मुंबई शहरातील १,७६,४१५ रुपये वसुलीची प्रकरणे शिल्लक आहेत. या प्रकरणांमध्ये अपर जिल्हाधिकारी यांना Negotiable Instrument Act च्या कलम १३८ अन्वये कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

आता ८ वर्षे झालेली आहेत. मग आता कलम १३८ नुसार कारवाई कशी करता येईल ? Within a period of 3 months or 6 months action has to be taken. It is not applicable forever. त्यावेळी कलम १३८ अन्वये कारवाई करावयास पाहिजे होती. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले. त्यावेळी कलम १३८ अन्वये कारवाई केलेली नाही.

मग त्यावेळी कारवाई केली नाही यासाठी कोण जबाबदार आहे. त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. शासनाकडे धनादेश आल्यानंतर ते क्लिअर झालेले नाहीत. संबंधीत अधिकाऱ्यांनी आपली डयुटी योग्यरित्या पार पाडलेली नाही त्यामुळे शासनाचे पैसे अडकलेले आहेत. विभागाला वाटते की, कसूरदाराने चेक दिला त्यामुळे विषय संपला आणि चेक बाऊन्स झाल्यानंतर विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाबाबत जे संबंधीत अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे होती. कलम १३८ अन्वये कारवाई का करण्यात आली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, अपर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कलम १३८ च्या अनुषंगाने प्रयत्न केले होते.

समितीच्या बैठकीस अपर जिल्हाधिकारी, मुंबई हे देखील उपस्थित होते. त्यांनी सदर रक्कम वसूल झाली असे सांगितले. त्यामुळे समितीने कलम १३८ चा मुद्दा मागे (विथ ड्रॉ) घेतला.

व्याजाच्या रकमेबाबत नोटीस देण्यात आलेली नाही, हे चुकीचे आहे. You should raise the demand immediately and report it to this Committee. कॅल्क्युलेशन करून शासन खाती जी रक्कम विलंबाने आलेली आहे त्यावरील व्याजाच्या रकमेबाबत नोटीस द्यावी आणि त्यानंतर वसुलीची कार्यवाही करावी. ५-७ वर्षे व्याज वसुली संदर्भात विभाग उदासिन आहे, हे चुकीचे आहे. आता उर्वरित १,७६,४१५ रुपये वसूल करण्यात आले आहेत. ही रक्कम नंतर वसूल करण्यात आलेली आहे काय ? सद्यःस्थितीत व्याजाची काय परिस्थती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, लेखी उत्तरात १,७६,४१५ रुपये वसुली बाकी असल्याचे नमूद केलेले आहे. परंतु, सद्यःस्थितीत सदर रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

सदर रक्कम कोणत्या तारखेला वसूल करण्यात आली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, खरे म्हणजे ती रक्कम पूर्वीच वसूल करण्यात आलेली आहे. परंतु, ते रेकॉर्डवर आलेली नव्हते. जेव्हा ही प्रकरणे शोधून काढल्यानंतर तेव्हा चलनाच्या प्रती मिळालेल्या आहेत.

या अनुषंगाने समितीने सूचित केले की, विलंबाने झालेल्या वसुलीच्या व्याजाची परिगणना करून नोटीसेस इश्यू कराव्यात. यावर विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, त्याचे कॅल्क्युलेशन सुरु आहे. मार्च महिन्यापर्यंत व्याजाची रक्कम वसूल करण्यात येईल.

आता सुद्धा चेकद्वारे रिकव्हरी अलाऊड आहे काय ? असा मुद्दा महालेखाकारांनी उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, आता १ जुलै पासून वसुली होत नाही. परंतु, त्यापूर्वी ग्रास प्रणालीचा वापर करण्यात येत होते. राज्य शासनाची जी वसुली होती ती ग्रास प्रमाणालीच्या माध्यमातून होते.

३.११ परि.क्र.६.४.४ " करमणूक शुल्काच्या विलंबित प्रदानावर दंडनिय व्याजाची आकारणी न करणे " :

कोकण विभागातील अपेक्षित थकीत रक्कम ८८% व पुणे विभागातील अपेक्षित थकीत रक्कम १००% वसुली झाली आहे. म्हणजे सदर परिच्छेदामधून अपेक्षित रकमेची ९० टक्के वसुली झालेली आहे. आता याबाबत सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सद्यःस्थिती अशी आहे की, आता ९८.४ टक्के वसुली झालेली आहे. एकूण रक्कम ५ लाख ९१ हजार रुपये होती. त्यापैकी ५,८१,५१० रुपये म्हणजे जवळपास ९८.४ टक्के वसुली झालेली आहे.

यामध्ये सुद्धा व्याजाच्या रकमेची परिगणना करुन घ्यावी. असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, ही व्याजाचीच रक्कम आहे. आता मुंबई शहरातील ८,३०० रुपये वसुली बाकी आहे. संबधित अधिकारी ही रक्कम वसूल करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

३.१२ परि.क्र.६.४.५ " थेट घरपोच (DTH) सेवा पुरवठादारांवर दंडनीय व्याजाची आकारणी न करणे " :

या परिच्छेदांतर्गत विभागीय सचिवांनी समितीने अवगत केले की, कोकण विभागातील ४२ लाख ५० हजार रुपये एवढी आक्षेपित रक्कम होती. ही संपूर्ण रक्कम वसूल झालेली आहे.

याबाबत समितीने विचारणा केली की, व्याजाची मागणी केलेली आहे काय ? कारण महसूल विभागामध्ये व्याजाची रक्कम वसूल करण्याची पद्धतच दिसून येत नाही. यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, ही व्याजाची रक्कम आहे. त्यामुळे यावर पुन्हा व्याज लागणार नाही.

३.१३ परि.क्र.६.४.६ " सुरक्षा अनामत ठेव रक्कम जप्त न करणे " :

उपरोक्त परिच्छेदा संदर्भात विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले की, सदर परिच्छेदामध्ये असा आक्षेप आहे की, सुरक्षा अनामत ठेवीची जी रक्कम होती ती जप्त करण्यात आली नाही. कोकण विभागातील मुंबई शहर आणि उपनगर या जिल्ह्याची शासन जमा करणेची एकूण ४९,८३,९२० रुपये एवढी होती. आजची स्थिती अशी आहे की, यापैकी ४६,०५,२१९ रुपये एवढी रक्कम शासन जमा केलेली आहे आणि ४,०३,७०१ रुपये परत केलेले आहेत.

तथापि, स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात मुंबई उपनगर जिल्ह्याची रु. १३ लाख २२ हजार ७९९ रुपये संबधित व्यक्तीना परतावा देणेत आलेले आहे असे नमूद केले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, ही या प्रकरणामधली सुधारीत माहिती आहे. एकूण रक्कम ४९,८३,९२० रुपये एवढी शासन जमा व्हावयाची होती. यापैकी ४६,०५,२१९ रुपये शासन जमा केलेले आहेत आणि उर्वरित रक्कम परत करण्यात आली आहे.

महालेखाकारांचे असेही निदर्शनास आणले आहे की, जे लोक आपली अनामत रक्कम घेण्यासाठी आले नाहीत त्याची कारणे अशी असावीत की, त्या लोकांना जास्तीचे पैसे द्यावयाचे होते म्हणून ते आले नाहीत किंवा त्यांचा काही डिफॉल्ट असेल किंवा एन्टरटेन्मेंट ड्युटीचे जास्तीचे पैसे असतील. परंतु, ते ज्यावेळी अनामत रक्कम घ्यायला येतील त्यावेळी विभागाला ते पैसे द्यावे लागतील. या प्रकरणांमध्ये ज्यांनी आपले पैसे परत घेतले नाहीत ते शासन जमा करावे लागले. कारण या प्रकरणामध्ये आयोजकाकडून जास्तीचे पैसे घेणे होते असे महालेखाकारांचे ऑब्झर्वेशन आहे. विभागाने केस टू केस व्हेरिफाय केलेले आहे काय ? जेवढी अनामत रक्कम आहे तेवढीच रक्कम पॅनल्टी किंवा एंटरटेन्मेंट ड्युटीची आहे किंवा त्यापेक्षा जास्तीची रक्कम आहे हे व्हेरिफाय केलेले आहे काय ? कारण याबाबत विभागाकडे यासंदर्भात काही सिस्टीम सुद्धा नाही. म्हणून विभागाने या सर्व गोष्टींचा विचार केलेला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, महालेखाकारांनी या परिच्छेदाबाबत आशंका व्यक्त केलेली आहे की, ज्याअर्थी ते लोक (आयोजक) आपली अनामत रक्कम सोडतात, विवरणपत्र दाखल करीत नाहीत, रक्कम जप्त होऊ देतात म्हणजेच त्यावेळी कदाचित एंटरटेन्मेंट ड्युटीची रक्कम जास्त असावी. पण अशा प्रत्येक कार्यक्रमाला संबधित एंटरटेन्मेंट ड्युटी इन्स्पेक्टर स्वतः भेट देतात. ते व्हेरिफाय करतात आणि त्यांच्या अहवालानुसारच पैसे परत केले जातात.

आयोजक ४६ लाख रुपये परत घेण्यासाठी आले नाहीत. पण त्यांच्याकडे जर रक्कम देय नसेल तर ते पैसे का सोडून देतील ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, एंटरटेन्मेंट ड्युटी इन्स्पेक्टरच्या अहवालाप्रमाणे एवढीच रक्कम देय होती. याबाबत अधिक माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. ज्यावेळी कार्यक्रमाला परवानगी देण्यात येते त्यावेळी त्या कार्यक्रमाची शंभर टक्के कॅपॅसिटी विचारात घेऊन डिपॉझीट घेण्यात येते. एंटरटेन्मेंट ड्युटी इन्स्पेक्टर प्रत्येक कार्यक्रमाला भेट देतात. जी परवानगी कार्यक्रमाच्या आयोजकांना दिलेली आहे त्यापेक्षा जास्त प्रेक्षक तेथे आढळून आले तर ते लगेच रिपोर्ट करतात आणि कमी प्रेक्षक आढळून आले तर काही प्रश्न नाही. प्रेक्षक कमी असतील तर आयोजक सीएचा रिपोर्ट देतात की, त्याचे एवढे प्रेक्षक कमी होते त्यामुळे त्यांना तेवढी एंटरटेन्मेंट ड्युटी (ED) पुन्हा द्यावी. अशा वेळी एंटरटेन्मेंट ड्युटी इन्स्पेक्टर यांच्याकडून रिपोर्ट सादर झाल्यानंतर स्क्रुटीनी करून संबधित आयोजकाला रिफंड करण्यात येतो.

या ४६ लाख रुपयांमध्ये एवढीच एंटरटेन्मेंट ड्युटी होती काय ? का कमी होती ? अशी विचारणा समितीने केली विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कॅपॅसिटी प्रमाणे शंभर टक्के ॲडव्हान्स घेण्यात येते व तेवढीच रक्कम शासन जमा करण्यात आलेली आहे.

विभागाने ही रक्कम एवढी वर्षे पीएलए खात्यामध्ये ठेवली. ती रक्कम ७-७ वर्षे पीएलए खात्यामध्ये ठेवण्याचे कारण काय आहे ? ज्यावेळी सन २०१२-१३ मध्ये महालेखाकारांनी परिच्छेद काढला त्याच वेळी ही रक्कम शासन खाती जमा केली असती तर ती रक्कम विकास कामासाठी वापरता आली असती किंवा कन्सॉलिटेडेट फंडामध्ये जमा करावी. परंतु, ती रक्कम पीएलए खात्यामध्ये ठेवली जाते, त्यावर लवकर निर्णय घेतला जात नाही. यावर काही तरी तोडगा काढला पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असून विभागीय सचिवांनी सांगितले की, खरे म्हणजे पीएलएची रक्कम शासनाचा तिजोरीचा भाग आहे.

पीएलएची रक्कम शासनाच्या तिजोरीचा भाग आहे. परंतु, वित्त विभाग त्या रकमेचा विनियोग करु शकत नाही. ती रक्कम एकत्रित निधीमध्ये जमा करता आलेली नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, वित्त विभागास सचिवाने याबाबत खुलासा केला की, आता पीएलए खात्यावर पूर्ण व्हिजिबिलिटी असते की, पीएलए खात्यामध्ये किती रक्कम आहे. परंतु, ती रक्कम पीएलए खात्यामध्येच पडून राहते. ती रक्कम वापरता येत नाही.

विभागाने ती रक्कम वेळेवर शासन जमा केली असती तर शासनाला त्या रकमेचा कोठे तरी विनियोग करता आला असता, समजा विशिष्ट कालावधातीपर्यंत ती रक्कम विभागाकडे मागितली नाही तर ती रक्कम जमा करण्याबाबत नियम किंवा कायदा आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, कार्यक्रमाच्या दिनांकांपासून १० दिवसाच्या आत किंवा जास्तीत जास्त १ महिन्याच्या आत संबधितांनी नियम १६ किंवा २१ अंतर्गत विवरणपत्र सादर केले पाहिजे, असा नियम आहे. परंतु, त्यांनी विवरणपत्र सादर केले नाही तर त्यांना एक आठवड्याची नोटीस देऊन ती रक्कम जप्त करण्यात येऊ शकते अशी तरतूद आहे आणि त्या अनुषंगाने कार्यवाही केली जाते.

परंतु, या प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिले असे विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून ००४५ या हेड अंतर्गत एंटरटेन्मेंट ड्युटीची रक्कम करण्यात येते. आता त्यामध्ये ४६,०५,२१९ रुपये जमा करण्यात आलेले आहेत.

आयोजकांनी १० दिवसाच्या आत विवरणपत्र सादर करावयास पाहिजे. त्यानंतर त्यांनी कॅल्क्युलेशन करून डिमांड केली पाहिजे नाही तर ती रक्कम शासन जमा केली पाहिजे. या सर्व गोष्टींसाठी ७ वर्षाचा विलंब झालेला आहे. महालेखाकारांनी सन २०१३ मध्ये या सर्व गोष्टी विभागास निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. संबधित अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार न पाडल्यामुळे एवढा विलंब झालेला आहे. त्यामुळे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

महालेखाकारांचा आक्षेप असा होता की, विभागाने आयोजकाकडून वेळेवर रिटर्नस मागवून घेत नाहीत त्यामुळे पीएलए खात्यामध्ये डिपॉझीट पडून राहते. ही नियमित प्रोसेस आहे. त्यामुळे यामध्ये काही सुधारणा करण्यात येणार आहे का अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले. आता दिनांक १ जुलै २०१७ पासून एंटरटेन्मेंट ड्युटीची रिकव्हरी बंद झालेली आहे. त्यामुळे आता येथे सुधारणेचा काही स्कोप नाही.

समितीने पुढे विचारणा केली की, विभागाकडे दिनांक १ जुलै २०१७ पूर्वीचे आणि १ एप्रिल २०११ नंतरचे पैसे शिल्लक आहेत काय ? याबाबत काही निर्णय विभागाने घेतलेला नाही, ती रक्कम पीएलए खात्यात जमा आहे अशी काही रक्कम आहे काय ? आपण त्याबाबत केव्हा निर्णय घेणार आहात ? त्याबाबत विभागाने निर्णय घेतला पाहिजे, सिस्टीम डेव्हलप केली पाहिजे. हे सर्व कशासाठी थांबवून ठेवले आहे ? असे समितीने नमूद केले असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. जी रक्कम शिल्लक आहे त्याबाबत ३१ मार्च पूर्वी निर्णय घेऊन ती शासन जमा करण्यात येईल.

दिनांक १ एप्रिल २०११ ते १ जुलै २०१७ पर्यंतची जेवढी रक्कम आहे त्याची सविस्तर माहिती व प्रलंबित रक्कम समायोजित केल्याबाबतची समितीला सादर करावी. कारण महालेखाकारांनी हे सन २०१२-१३ मध्ये निदर्शनास आणून दिलेले आहे. आता यामध्ये ५-६ वर्षे विलंब झालेला आहे, हे योग्य नाही. विभागाचे १ जुलै पूर्वीची प्रलंबित रक्कम तरी शासन खाती जमा करावी. असे निदेश समितीने दिले असता, मागील रक्कम मार्च २०१८ पर्यंत पूर्णतः समायोजित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

अभिप्राय व शिफारशी :

३.१४ परिच्छेद क्र. ६.४.१ " केबल चालकाकडून वसूली न होणे/कमी होणे "

अभिप्राय :

सन २००८-०९ ते २०११-१२ दरम्यान ५३६ केबल चालकांनी रु.२.३६ कोटी करमणूक शुल्क भरले नव्हते. या केबल चालकांनी प्रपत्र " इ " मध्ये विवरणपत्रे देखील सादर केली नव्हती. संबधित अधिकाऱ्यांनी प्राप्त न झालेल्या प्रपत्र " इ " मधील विवरणपत्रांचा पाठपुरावा केला नव्हता व वसुली नोंदवहीचा आढावाही घेतला नव्हता. परिणामी ५३६ केबल चालकांकडून एकूण रु.२.३६ कोटी करमणूक शुल्काची वसूली झाली नाही. या शिवाय विहीत दराने व्याज देखील आकारणीय होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

साक्षीदरम्यान समितीसमोर सांगण्यात आले की, कोकण, पुणे, औरंगांबाद, अमरावती, नागपूर विभागांशी संबधित केबल चालकांकडून करण्यात येणाऱ्या वसुली संदर्भातील एकूण वसुलपात्र रकमेपैकी सद्यःस्थितीत पुणे, औरंगांबाद व नागपूर विभागाची १०० टक्के वसुली पूर्ण झाली आहे व केवळ अमरावती विभागातून रु.२१,१९,५४५/- इतक्या रकमेची वसुली प्रलंबित असून त्यातील एकूण वसुलपात्र रकमेपैकी केवळ रु.३,०८,०००/- रकमेची वसुली प्रलंबित असून ती वसुल करण्याची कार्यवाही सुरु असून ७ प्रकरणांमध्ये पत्तेच सापडत नसल्यामुळे ही वसुली होऊ शकली नाही असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारशी :

३.१५ (१) मुंबई करमणूक शुल्क अधिनियमाच्या कलम ३ (४) अन्वये, केबल चालकाने महानगरपालिका " अ " व " ब " वर्ग नगरपालिका किंवा इतर क्षेत्रानुसार जून,२००६ पासून प्रत्येक दूरचित्रवाणी संचावर दरमहा अनुक्रमे रु.४५, रु. ३० किंवा रु.१५ या दराने करमणूक शुल्काची वसूली (DTH प्रकरण सेवांवर आकारणीय असलेल्या करमणूक शुल्कासह) जाहीर लिलाव नियम २००३ च्या नियम १४ अन्वये केबल चालकांचे निर्धारण आणि करमणूक शुल्काची वसूली जिल्हाधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे. या केबलचालकांनी करमणूक शुल्क भरण्यांबरोंबरच प्रपत्र " इ " मध्ये मासिक विवरणपत्र जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच या अधिनियमाच्या कलम ४ (ब) (४) नुसार, विवरणपत्र विहीत मुदतीत सादर न केल्यास, केबल चालकास पुरेसा अवधी दिल्यानंतर राज्य शासनाने केबल चालकांकडून देय असलेल्या करमणूक शुल्काचे एकतर्फी निर्धारण करून करमणूक शुल्काचे आणि लागू झाल्यास, दंडाचे प्रदान करण्यास त्यांना निर्देशित करावे व कलम ४ (ब) च्या तरतुदींचे पालन न झाल्यास कलम ५ अ अंतर्गत सहा महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा रु. ५००० पर्यंत दंड किंवा दोन्ही अशाप्रकारे शिक्षेची तरतूद आहे. कर प्रदानात कसूर झाल्यास मुंबई करमणूक शुल्क अधिनियमाच्या कलम ९ ब नुसार, पहिल्या ३० दिवसांकरिता वार्षिक १८ टक्के दराने व्याजदेखील आकारणीय असते अशी स्पष्ट तरतूद असतानाही त्याची अंमलंबजावणी न केल्यामुळे ही वसुली प्रलंबित आहे.

विभागाने आता टप्प्याटप्प्याने यातील ९० टक्के वसुली केलेली असून फार थोडी वसुली शिल्लक राहिलेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच विभागाने केवळ कराची वसुली केलेली असून त्यावर अद्यापही व्याजाची आकारणी व वसुली केलेली नाही. विहित वेळेत भरणा न केलेल्या करावर व्याज आकारण्याची तरतूद देखील असूनही त्यात केबल चालकांचा पत्ता सापडत नसणे व काही जणांनी आपला व्यवसाय इतर व्यक्तींना विकणे अथवा बंद करणे अशा अडचणी येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः विभागाने ही वसुली नियमानुसार नियमितपणे करणे आवश्यक व अभिप्रेत असताना ती वेळेत न केल्यामुळे अशाप्रकारे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत व वसुलीस अडचणी येत आहे. महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहु आक्षेप हे केवळ सन २०१२-१३ च्या आर्थिक वर्षापर्यंत मर्यादित आहेत. परंतु सन २०१३ ते २०१७ (जीएसटी लागू होईपर्यंत) या कालावधीत देखील या कराची रक्कम मोठ्या प्रमाणात थकीत असणार आहे. अतः विभागाने या सर्व कराची आकारणी, वसुली व त्यावरील व्याजाची वसुली तातडीने करावी व यासाठी स्थानिक महसूली यंत्रणा, पोलीस तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींशी संपर्क साधून त्यांची देखील मदत घेण्यात यावी. तसेच विहित वेळेत नियमानुसार अशी वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी. तसेच दि. १ जुलै, २०१७ पासून जीएसटी कायद्याची अंमलंबजावणी सुरु झाल्यानंतर करमणूक कराची वसुली आता बंद झालेली असल्यामुळे भविष्यात या प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यास आता कोणताही वाव व गरज राहिलेली नाही. अतः विभागाने आता जीएसटी लागेपर्यंतची सर्व प्रलंबित वसुली तात्काळ करून हे खाते बंद करण्याची समितीची शिफारस आहे.

३.१६ (२) केबलच्या व्यवसायाची राज्यात असलेली व्याप्ती पाहता व यातील स्थानिक स्पर्धा व यातून वेळोवेळी उद्‌भवणारी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती पाहता या व्यवसायावर शासनाचे कटाक्षाने देखरेख व नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. तसेच या केबल जोडणीसाठी टाकण्यात येणाऱ्या वायर यासंबधात कोणतेही धोरण अस्तित्वात नसल्यामुळे यातून अनेकवेळी अपघात देखील होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने या बाबी धोकादायक आहेत. केबल टि.व्ही.रेग्युलेशन ॲक्ट हा केंद्र शासनाचा कायदा असून त्यावर राज्य शासनाचे काहीही नियंत्रण नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु या केबलच्या वायरींगमुळे स्थानिकस्तरावर नागरिकांना होणारा मोठ्या प्रमाणात त्रास लक्षात घेता शासनाने यासंदर्भात विशेष लक्ष घालून प्रसंगी केंद्रीयस्तरावर पाठपुरावा

करुन या केबल वायर संदर्भात योग्य तो निर्णय होण्याच्यादृष्टीने आवश्यकती कार्यवाही करावी व राज्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने महसूल विभागाने केबल वायर संदर्भातील धोरणांबाबत योग्य ते नियोजन करावे वा केंद्राकडे पाठपुरावा करावा अशी समितीची शिफारस आहे.

३.१७ परिच्छेद क्र. ६.४.२ " प्रत्यक्ष वाद्यवृंद असलेला परमिट रुम/बीअर बार यांच्याकडून करमणूक शुल्काची वसुली न करणे "

अभिप्राय

सन २०१० ते २०१२ या कालावधीत प्रत्यक्ष वाद्यवृंद असलेल्या ५९ परमिट रुम/बिअर बार कडून रु.२.२६ कोटी रक्कमेचे करमणुक शुल्क वसूल केले नव्हते. अशाप्रकारे, संबधित अधिकाऱ्यांनी नोंदवहीचा आढावा न घेतल्यामुळे एकंदर रु.२.२६ कोटी करमणुक शुल्काची वसूली झाली नाही. शिवाय विहीत दराने व्याज देखील आकारणीय होते असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

शिफारशी :

३.१८ महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या दि.१७ ऑक्टोबर २०१० च्या आदेशान्वये मुंबई करमणूक शुल्क अधिनियमाच्या कलम ३ (११) च्या तरतुदीन्वये, २० जानेवारी २०१० पासून महानगरपालिका क्षेत्रातील (MC) प्रत्यक्ष वाद्यवृंद असलेल्या परमिट रुम/बीअर बार कडून दरमहा रु.५०,००० या दराने करमणुक शुल्क वसूल करावयाचे आहे. हे शुल्क ज्या महिन्याशी संबधित असते त्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत ते आगाऊ वसूल करायचे असते आणि प्रत्यक्ष वाद्यवृंदांकडून वसूली नोंदवही द्वारे त्यावर लक्ष ठेवायचे असते. उपरोक्त अधिनियमाच्या कलम ९(ब) नुसार शुल्क प्रदानात कसूर झाल्यास पहिल्या ३० दिवसांसाठी १८ टक्के प्रतिवर्ष आणी त्यानंतर २४ टक्के प्रतिवर्ष या दराने व्याजही आकारावयाचे असते. शुल्काच्या प्रदानाकरिता मागणी सूचना जारी केली जाते आणि मागणी सुचनेस प्रतिसाद न दिल्यास त्यासाठी सहा महिने पर्यंत किंवा रु.५००० पर्यंत दंड किंवा दोन्ही अशाप्रकारे शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे. असे असतानाही या महत्वाच्या तरतूदींची प्रभावी अंमलंबजावणी न झाल्यामुळे उपरोक्त आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत व कोट्यावधी रुपयांची वसुली प्रलंबित आहे. साक्षीदरम्यान यासंदर्भातील एकूण वसुली ही रु.२.२६ कोटी इतकी असून त्यापैकी समितीच्या बैठकीपर्यंत रु.२.२० कोटी वसुल झाले असून उर्वरित रु.६ लाखासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दावा दाखल असल्यामुळे ती वसुली प्रलंबित असल्याचे समितीला सांगण्यात आले. अतः न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून या रु. ६ लाखाच्या वसुलींबाबत योग्य तो निर्णय शासनाने घेवून आवश्यक ती कारवाई करावी. तसेच सदरहु आक्षेपाधीन परिच्छेदामध्ये केवळ करमणुक शुल्काची वसुली झालेली असून त्यावरील व्याजाची आकारणी व वसुली अद्यापही झालेली नाही. ही व्याजाची वसुली तात्काळ करण्यात यावी. तसेच महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप ही सन २०१२-१३ या वर्षाचे आहेत. परंतु त्यापुढील आर्थिक वर्षाची वसुलपात्र रक्कम व त्यावरील व्याज ही देखील मोठ्या प्रमाणात निश्चितच थकीत असणार. ही सर्व वसुली विभागाने तातडीने करावी व अशी वसुली करण्यास काही अडचणी येत असल्यास कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करण्यात यावा. तसेच विहित वेळेत ही वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.१९ परिच्छेद क्र. ६.४.३ " न वटलेल्या धनादेशांच्या बाबतीत करमणूक शुल्कांची वसुली न होणे "

अभिप्राय :

सन २००८ ते २०१२ या कालावधीत रु.१३.०३ लाख रक्कमेच्या करमणुक शुल्काच्या प्रदानाकरिता केबल चालकांनी दिलेले धनादेश वटले नव्हते. या रक्कमा व्याजासह रोखीने वसूल करावयाच्या होत्या. संबधित अधिकाऱ्यांनी कसुरदारांकडून रक्कम वसूल करण्याची कोणतीही कार्यवाही केली नाही व यासाठी अधिनियमांतर्गत अपेक्षित कायदेशिर कारवाईही केली नाही. यामुळे रु.१३.०३ लाख करमणुक शुल्क व त्यावरील व्याजाची वसुली होऊ शकली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

करमणूक शुल्काचा धनादेश न वटल्यासंदर्भात हे आक्षेप नोंदविण्यात आलेले असून यातील पुणे विभागाची १०० टक्के वसुली झालेली असून केवळ मुंबईतील एकूण वसुलपात्र रकमेपैकी रु.१,७६,४१५/- इतकी रक्कम वसुलीची प्रक्रिया सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारशी :

३.२० (१) मुंबई करमणूक शुल्क अधिनियमाच्या तरतुदीनुसार, करमणुक शुल्क रोखीने अथवा धनादेशाद्वारे भरता येते. तसेच, जर कोणत्याही कारणाने, करमणुक शुल्क ज्या धनादेशाद्वारे भरले आहे तो धनादेश वटविला गेला नाही तर विभागाने कसूरदारांकडून व्याजासह अंतर्भूत रक्कम रोखीने त्वरीत वसूल करावी व परक्राम्य लेख अधिनियम (सुधारित), १९८८

(Negotiable Instrument Act) च्या कलम १३८ मधील तरतुदीन्वये कार्यवाही देखील करावी अशी तरतूद असताना त्याची अंमलबजावणी विभागाने केली नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात ही कराची वसुली प्रलंबित राहिली.

या प्रकरणी पुणे विभागातील वसुली पुर्ण झालेली असून मुंबईतील केवळ रु.१,७६,४१५ एवढी रक्कम वसूल करणे प्रलंबित आहे. काही केबल चालकांनी व्यवसाय बंद केल्यामुळे तसेच काही ठिकाणी पत्ते सापडत नसल्यामुळे या थकीत रकमेच्या वसुलीमध्ये क्षेत्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात अडचणी येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यासंदर्भात क्षेत्रीय महसूल यंत्रणा, स्थानिक पोलीस व स्थानिक लोकप्रतिनिधी यांची मदत घेऊन ही वसुली तात्काळ करण्यात यावी. तसेच यावरील व्याजाची आकारणी व वसूली देखील करण्यात यावी. तसेच समितीची बैठक लागेपर्यंत अशाप्रकारे व्याजाची आकारणी करुन संबंधितांना नोटीस देखील देण्यात आली नव्हती ही देखील गंभीर बाब आहे. विहित वेळेत नियमानुसार ही वसुली करण्यात आली असती तर या अडचणी निश्चितच उद्भवल्या नसत्या. अतः विहित वेळेत ही वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२१ (२) करमणूक शुल्काचे धनादेश न वटण्यासंदर्भात त्या त्या केबल चालकांवर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टमधील कलम १३८ अन्वये कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. याबाबत समितीने विचारणा केली असता, कलम १३८ अन्वये कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले असता, सदरहु आक्षेप हे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे असताना आता ५-६ वर्षानंतर विभागाला ही कारवाई करता येईल काय, याबाबतही समिती साशंक आहे. परंतु आता ही रक्कम बऱ्यापैकी वसुल झालेली देखील असल्यामुळे आता या कारवाईस फारसा अर्थ शिल्लक राहात नाही. परंतु विभागाची ही कृती व निष्काळजीपणा निश्चितच समर्थनीय नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. विभागाने हा कायदेशीर व आर्थिक धोका पत्करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. विभागाने ही कारवाई विहित वेळेत करणे आवश्यक होते परंतु ती करण्यात आली नाही. ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी त्यांची जबाबदारी पार पाडली नाही त्यांचेवरदेखील कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२२ परिच्छेद क्र. ६.४.४ " करमणूक शुल्काच्या विलंबित प्रदानावर दंडनीय व्याजाची आकारणी न करणे "

अभिप्राय

सन २००७ ते २०१२ या कालावधीतील १८ प्रकरणांत जरी करमणूक शुल्काचे प्रदान करण्यास १६ ते ३९० दिवसांचा विलंब झाला होता तरी रु.५.९१ लाख दंडनीय व्याज आकारले गेले नव्हते. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यानंतर ही अभिक्षणे विभागाने मान्य केली आणि ऑक्टोबर, २०१२ ते मार्च, २०१३ दरम्यान पाच कसूरदारांकडून रु.३.४९ लाख वसूल केले.

शिफारशी :

३.२३ मुंबई करमणूक शुल्क अधिनियमाच्या ३ (१५) च्या तरतुदींनुसार, केबल चालकाने करमणुक शुल्क आकारून ते पुढील महिन्याच्या दहा तारखेपर्यंत भरायचे असते आणि कलम ३ (११) आणि (१७) अनुसार, डान्स बार/डिस्कोथेकच्या मालकाने करमणूक शुल्क आकारून प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत आगाऊ भरायचे असते. तसेच, कलम ९ब अनुसार, करमणुक उपलब्ध करून देणारा मालक, कलम ३ खाली विहित केलेल्या कालावधीत किंवा कलम ९अ अंतर्गत ठरवलेली करमणूक शुल्काची composition रक्कम भरण्यास अपयशी ठरला तर तो, शासनास करमणूक शुल्क किंवा ठरविलेल्या रकमेसह अशा रक्कमेवर ज्या तारखेपासून रक्कम देय होती त्या तारखेपासून ती रक्कम आणि व्याज पूर्ण भरेपर्यंत पहिल्या ३० दिवसांसाठी वार्षिक १८ टक्के दराने आणि त्यानंतर वार्षिक २४ टक्के दराने दंडनीय व्याज भरण्यास जबाबदार असतो. या दंडनीय व्याजाच्या आकारणीबाबत स्पष्ट तरतूद असताना महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदवेपर्यंत ही आकारणी व वसुली करण्यात आलेली नव्हती. ही देखील गंभीर बाब आहे. विभागाने ही वसुली नियमानुसार विहित मुदतीत करणे आवश्यक व अभिप्रेत होते.

सद्य:स्थितीत या दंडनीय व्याजाची पुणे विभागातील १०० टक्के वसुली झालेली असून कोकण विभागातील ९८.४ टक्के वसुली झालेली असून मुंबईतील केवळ रु.८,३०० एवढी वसुली बाकी आहे असे समितीच्या निदर्शनास आले. अतः ती देखील वसुली तातडीने करण्यात यावी. तसेच महालेखाकारांनी हे आक्षेप सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी नोंदविलेले असताना ही वसुली करण्यात आली आहे. परंतु त्यानंतरच्या कालावधीतदेखील ही वसुली मोठ्या प्रमाणात निश्चितच थकीत असणार त्याचा देखील विभागाने आढावा घ्यावा व ती देखील वसुली करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२४ ६.४.५ " थेट घरपोच (DTH) सेवा पुरवठारांवर दंडनीय व्याजाची आकारणी न करणे "

अभिप्राय :

सन २०११-१२ दरम्यान रु.२३.३६ कोटीचा करमणुक शुल्काच्या प्रदानात एक ते ९४ दिवसांचा विलंब झाला होता. विभागाने या सेवा पुरवठारांकडून व्याज आकारणी किंवा व्याजाची मागणी न केल्यामुळे रु.४२.५० लाख दंडनीय आकारणी झाली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहे.

शिफारशी :

३.२५ महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने दिनांक ४ सप्टेंबर २००८ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अन्वये अधिकृत खात्यात करमणुक शुल्काचा भरणा प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला किंवा त्यापूर्वी करणे आवश्यक आहे. मालकाने ही रक्कम विहित कालावधीत भरली नाही, तर शुल्काच्या रकमेव्यतिरिक्त ही रक्कम पूर्ण भरेपर्यंतच्या कालावधीसाठी या रक्कमेवर पहिल्या ३० दिवसांसाठी १८ टक्के प्रतिवर्ष या दराने व त्यानंतर २४ टक्के प्रतिवर्ष या दराने दंडनीय व्याज भरणे मालकावर बधनकारक राहील अशी स्पष्ट तरतूद असताना देखील याची अंमलबजावणी न झाल्यामुळे ही आकारणी करण्यात आली नाही. सद्यःस्थितीत या परिच्छेदासंदर्भात १०० टक्के वसुली झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु, त्यावरील व्याजाची आकारणी व वसुली मात्र करण्यात आली नाही. महालेखाकारांनी आक्षेपित केलेल्या प्रकरणांमध्ये विभाग केवळ कराची रक्कम वसूल करण्यासंदर्भातच कार्यवाही करीत असून त्यावरील व्याज आकारणीकडे व वसुलीकडे विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे व याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अशाप्रकारे व्याजाची वसुली विहित वेळेत न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच महालेखाकारांनी हे आक्षेप सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी नोंदविलेले असताना ती वसुली करण्यात आली आहे. परंतु त्या नंतरच्या कालावधीतदेखील ही वसुली मोठ्या प्रमाणात थकीत असण्याची निश्चितच शक्यता आहे. त्याचा देखील विभागाने आढावा घेऊन ती वसुली करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२६ ६.४.६ " सुरक्षा अनामत ठेव रक्कम जप्त न करणे "

अभिप्राय :

सन २०१०-१२ दरम्यान ४८ आयोजकांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाकरिता घेतलेली एकूण रु. ४९.८४ लाख रकमेची सुरक्षा अनामत ठेव अद्याप राज्याच्या एकत्रिकृत निर्धीबाहेर म्हणजेच PLA मध्ये पडून होती. संयोजकांनी विहित शर्तींचे पालन केले नसतानाही, उप जिल्हाधिकाऱ्यांनी विवरणपत्रे सादर न होण्याचा मागेवा घेतला नाही तसेच सुरक्षा अनामत ठेवी जप्त करण्याबाबत सुचनापत्रेही निर्गमित केली नाहीत. परिणामी ४८ संयोजकांची एकूण रु.४९.८४ लाख रकमेची सुरक्षा अनामत ठेव जप्त झाली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

कोकण विभागातील मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील सुरक्षा अनामत ठेव रक्कम जप्त करून शासनजमा करणेसंदर्भात अंशतः कारवाई पुर्ण झालेली असून त्यातील काही रक्कम संबंधित व्यक्तींना परत करण्यात आलेली आहे व उर्वरित रक्कम शासनजमा करण्याची कारवाई सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. ज्याअर्थी करमणूक कार्यक्रम आयोजकांनी विभागास देय करमणूक शुल्का (ED) पेक्षा अधिक सुरक्षा अनामत ठेवीच्या परताव्याची विनंती केली नाही, त्याअर्थी विभागाने गोळा केलेल्या सुरक्षा अनामत ठेवीपेक्षा प्रत्यक्ष प्रदान करण्याचे करमणूक शुल्क (ED) जास्त असण्याच्या शंकेला वाव आहे किंवा आयोजकांचा अन्य काही तरी डिफॉल्ट असल्याशिवाय कुठलाही व्यक्ती ही रक्कम सोडणार नाही. निश्चितच त्या आयोजकाकडून जास्त पैसे घेणे अपेक्षित असल्यामुळे त्यांनी सुरक्षा अनामत रकमेची मागणी केली नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. याची शहानिशा करण्याची विभागाकडे काय यंत्रणा आहे अशी समितीने विचारणा केली असता, अशा प्रत्येक कार्यक्रमाला संबधित ड्युटी इन्स्पेक्टर स्वतः भेट देऊन येणाऱ्या लोकांची संख्या निश्चित करून त्याची तपासणी करण्यात येते व त्यांच्या अहवालानुसारच हे पैसे परत करण्यात येतात असे समितीसमोर सांगण्यात आले. ज्यावेळी कार्यक्रमाला परवानगी देण्यात येते त्यावेळी त्या कार्यक्रमाची उपस्थितीची १०० टक्के क्षमता विचारात घेऊनच ही सुरक्षा अनामत रक्कम घेण्यात येते व त्यानंतर संबधित अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार ही प्रेक्षक संख्या कमी असल्यास आयोजकाला त्याचा परतावा देण्यात येतो असेही समितीसमोर सांगण्यात आले. नियमानुसार कार्यक्रमाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत किंवा जास्तीत जास्त १ महिन्याच्या आत संबधितांनी नियम १६ किंवा २१ अंतर्गत विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे व असे विवरण पत्र त्या मुदतीत सादर केले नाही तर १ आठवड्याची नोटीस देऊनही अनामत रक्कम जप्त करता येते. परंतु ही कार्यवाही विभागाने केल्याचे दिसून येत नाही.

शिफारशी :

३.२७ मुंबई करमणूक कर नियम, १९५८ च्या नियम १४ व्या तरतुदींनुसार, प्रत्येक संयोजकाने विनिर्दिष्ट अधिकाऱ्याकडे, अधिकारी ठरवेल त्याप्रमाणे सुरक्षा अनामत ठेव जमा करणे आवश्यक आहे. जर एखाद्या संयोजकाने करमणुकीच्या कार्यक्रमाच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत अथवा एक महिन्यापेक्षा कमी वाढीत मुदतीत नियम १६ अथवा २१ अंतर्गत विवरणपत्र सादर केले नाही तर संबधित अधिकाऱ्याने संयोजकास एका आठवड्याची नोटीस देऊन सुरक्षा अनामत ठेव जप्त करावी अशी स्पष्ट तरतूद असताना त्याची अंमलबजावणी करण्यात न आल्यामुळे ही रक्कम मोठ्या प्रमाणात PLA लेख्यामध्ये पडून राहिली.

अतः आयोजकाने या तरतुदींचे पालन केलेले नसल्यास ही रक्कम जप्त करून तातडीने शासनजमा करण्यात यावी. तसेच ज्या संबधित अधिकाऱ्यांनी त्यांची जबाबदारी पार पाडली नाही त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील आहेत. विभागाने दि.१ एप्रिल २०११ ते १ जुलै २०१७ पर्यंत अशाप्रकारे जेवढी रक्कम प्रलंबित आहे त्याची सविस्तर माहिती तसेच रक्कम समायोजित केली असल्यास त्यासंबधीची माहिती समितीला सादर करणेबाबत समितीने निदेशित केले असता, ती माहिती समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले. परंतु अद्यापही ती माहिती अप्राप्त आहे. अतः ती माहितीदेखील समितीला १ महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. सद्य:स्थितीत जीएसटीमुळे आता या अडचणी शिल्लक राहिलेल्या नाही. तरीही विभागाने विशेष कार्यक्रमांच्या माध्यमाने संयोजकांनी लेखे वेळेवर सादर करण्याच्या सुनिश्चितीसाठी यंत्रणा सुरू करावी, जेणेकरुन देय रकमेची योग्य निर्धारणा केली जाईल व आवश्यकतेनुसार सुरक्षा अनामत रक्कम वाढविली जाईल आणि लेखे सादर न केल्यास दंडाची तरतूद केली जाईल व त्याची वसुलीदेखील नियमानुसार व विहित वेळेत केली जाईल यासाठीचे योग्य नियोजन व उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.

४.१ परिच्छेद क्र. ७.२ " गौण खनिजांकरिता स्वामित्वधनाची वसूली "

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ७.२ " गौण खनिजांकरिता स्वामित्वधनाची वसुली " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

परिच्छेद क्र. ७.२ " गौण खनिजांकरिता स्वामित्वधनाची वसुली "

४.२ परिच्छेद क्र. ७.२.४ स्वामित्वधनाची कमी आकारणी :—

R & FD ने निर्गमित केलेल्या अधिसूचनेप्रमाणे (डिसेंबर २००६) उत्खनन केलेल्या आणि स्थानांतरित केलेल्या सामान्य मातीकरिता स्वामित्वधनाचे दर रु.१०० प्रति ब्रास होते जे ११ फेब्रुवारी २०१० पासून रु.२०० प्रति ब्रास प्रमाणे सुधारण्यात आले.

परभणी तहसील येथे लेखापरीक्षणात असे आढळून आले (जून २०१३) की कार्यकारी अभियंता (EE) माजलगांव कालवे विभाग क्र.१० परभणी ने तहसीलदार, परभणीला एप्रिल २०१० ते जुलै २०१० दरम्यान मातीकामाच्या उत्खनन आणि भरणा करण्याकरिता प्रदान केलेल्या स्वामित्वधनाबद्दल कळविले. नंतरच्या छाननीत असे उघडकीस आले की, EE ने स्वामित्वधन जुन्या दराने प्रदान केले. याप्रकारे, रु. ६२ लाख स्वामित्वधनाचे कमी प्रदान झाले. शिवाय DMO रायगडयेथील दोन प्रकरणात अस्थायी परवाने निर्गमित केले होते (फेब्रुवारी, २०१०) आणि १,००० ब्रास गौण खनिजांवर स्वामित्वधन जुन्या दराने प्रदान करण्यात आले, ज्याचा परिणाम स्वामित्वधनाच्या रु. एक लाख कमी अकारणीत झाला.

ACS, R&FD यांनी वस्तुस्थिती स्वीकारली आणि नमूद केले (ऑक्टोबर, २०१३) की वसुली केली जाईल. पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

परभणी–निम्न दुधना प्रकल्प डावा कालवाचे मातीकाम व अस्तरीकरणाची कामे सन २००७-०८ च्या दरसूचीनुसार करण्यात आली होते. तथापि, प्रत्यक्ष काम सन २०१०-११ मध्ये झाले असून त्या वर्षात स्वामित्व शुल्क दरामध्ये वाढ झाल्याने अशा वाढीव स्वामित्व शुल्क दर गृहित धरून त्याप्रमाणे मान्यतेची कार्यवाही कार्यकारी अभियंता, माजलगाव कालवा क्र. १०, परभणी यांचेकडे प्रगतीपथावर आहे. मान्यतेनंतर स्वामित्वधनाच्या शुल्काच्या फरकातील रकमेचा भरणा त्यांचेमार्फत करण्यात येणार आहे.

रायगड :— संबधित दोन प्रकरणांमध्ये फरकाची रक्कम रु.१,००,०००/- दिनांक २७.९.२०१७ रोजी शासनजमा करण्यात आली आहे. चलनाची प्रत सोबत जोडली आहे.

यावर मा.महालेखापाल यांचे अभिप्राय :—

The Reasons for delay in recovery of Rs.62 lakh as royalty till date even though the additional chief Secretary, R & FD had accepted the audit findings in October 2013.

४.३ परिच्छेद क्र. ७.२.५ विभागांमध्ये समन्वयनाचा अभाव :—

बॉम्बे गौण खनिज उत्खनन नियम (BMME) १९५५ च्या नियम १८ अनुसार खाणीतून खनिज काढणारा प्रत्येक पट्टेदार, पट्ट्याच्या क्षेत्रातून पाठविलेल्या गौण खनिजांवर, नियमात विनिर्दिष्ट केलेल्या दराप्रमाणे, स्वामित्वधनाचे प्रदान करेल. गौण खनिजांवर स्वामित्वधन प्रति ब्रास रु.१०० व ११ फेब्रुवारी २०१० पासून रु. २०० प्रति ब्रास या दराने वसूलीयोग्य होते.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभाग (WRD) च्या यंत्र शाखेने दिलेल्या माहिती प्रमाणे, विविध प्रकल्पांचे मातीकाम, पाटबंधारे विकास महामंडळाच्या पाच पाटबंधारे विभागांतर्गत २००७-१२ या कालावधीत केले गेले, ज्यासाठी रु. १२७.१४ कोटी स्वामित्वधन प्रदानायोग्य होते. यंत्र शाखेने नागरी विभागास पाठविलेल्या नावे (डेबिट) नोट मध्ये प्रकल्पाचे मातीकाम निष्पादित केल्यावर स्वामित्वधनाचे प्रदान करण्याचे दर्शविले नव्हते.

हे निदर्शनास आणल्यानंतर, ACS, R & FD यांनी नमूद केले (ऑक्टोबर, २०१३) की जलसंपदा विभागाशी चर्चा केल्यानंतर अंतिम उत्तर दिले जाईल.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सहा. मुख्य अभियंता (यां) जलससंपदा विभाग, नाशिक यांनी या प्रकरणात यांत्रिकी संघटनेमार्फत फक्त सयंत्रांचे भाडे आकारले आहे. सर्व प्रकल्प स्थापत्य विभागाच्या अधिपत्याखाली असून त्यावरील दुरूस्ती व इतर कामांवर स्थापत्य विभागानेचे नियंत्रण असते. त्यामुळे यांत्रिकी संघटनेमार्फत स्थापत्य विभागास पाठविलेल्या डेबिट नोटमध्ये प्रकल्प कामावर वापरलेल्या यंत्रसामग्रीचे केवळ भाडे आकारले जात असल्याने वरील कामे निष्पादित केल्यावर स्वामित्वधनाचे प्रदान करण्यात आलेले नाही. त्यामुळे यांत्रिकी संघटनेमार्फत (गौण खनिज) स्वामित्वधन आकारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे कळविण्यात आले आहे. सहा. मुख्य अभियंता (बां) जलससंपदा विभाग, नाशिक यांच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

यावर मा.महालेखापाल यांचे अभिप्राय :—

The Reply is not acceptable as Rule 18 of Bombay Minor Mineral Extraction (BMME) Rules, 1955 stipulates that any quarrying lessee shall have to pay royalty and in the instant case if Mechanical Division being the agency executing works for civil Division on behalf of Water Resources Department is liable to pay Royalty charges as accrued therein.

४.४ परिच्छेद क्र. ७.२.६ चुकीच्या वर्गीकरणामुळे स्वामित्वधनाची चुकीची आकारणी :—

कोळसा विभागाच्या ११ एप्रिल, १९९७ च्या अधिसूचनेनुसार, स्टोईंग करता वाळूच्या बाबतीत, स्वामित्वधनाचा दर रु.३ प्रति मेट्रिक टन निश्चत केला होता. R & FD च्या १५ डिसेंबर २००६ च्या अधिसूचनेनुसार माती, मुरुम, बोल्डर आणि स्थानिक खाणीकरिता स्टोईंगकरिता वापरल्या जाणारी वाळू सोडून इतर वाळूकरिता स्वामित्वधनाचा दर रु.१०० प्रति ब्रास आणि ११ फेब्रुवारी २०१० पासून सुधारित दर रु.२०० प्रति ब्रास निश्चित केला होता.

DMO, चंद्रपूर यांच्या अभिलेखांच्या छाननीत (जून, २०१३) असे उघडकीस आले की वेस्टर्न कोलफिल्डस लिमिटेड (WCL) जवळ उघड्या (ओपनकास्ट) तशाच भूमिगत कोळसा खाणी होत्या आणि उघड्या खाणीमध्ये ओव्हर बर्डन चे अवाढव्य परिमाण निर्माण होत होते. ओव्हरबर्डन साहित्याचे परिमाण, भूमिगत कोळसा खाणीमध्ये स्टोईगसाठी वाळूकरिता लागू असणाऱ्या रु. ३ प्रति मेट्रिक टन स्वामित्वधनाचे प्रदान करून एका खाणी मधून दुसऱ्या खाणीमध्ये तात्पुरता परवाना प्राप्त करून, परिवहन करून स्टोईंग हेतू करीता वापरल्या जात होते.

या ओव्हर बर्डनला वाळू असे म्हणता येणे शक्य नाही आणि खाणी आणि खनिजे (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९५७ च्या दुसऱ्या अनुसूचित त्याचे वर्गीकरण केलेले नाही. परिवहन केलेल्या आणि स्टोईंग करता वापरलेल्या या साहित्याच्या परिमाणावरील स्वामित्वधनाच्या प्रदानाचे नियमन गौण खनिजे उत्खनन (विदर्भ क्षेत्र) नियम १९६६ प्रमाणे होते आणि त्याकरीता ११ फेब्रुवारी २०१० पासून स्वामित्वधनाचा दर माती/मुरूम/ बोल्डर यांना लागू असणारा रू. २०० प्रति ब्रास हा आहे. तथापि, जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी या स्टोईंगकरता वापरलेल्या साहित्यावर रु. १३.९२ प्रतिब्रास या दराने स्वामित्वधन आकारले याचा परिणाम स्वामित्वधनाच्या रू. १.११ कोटी कमी आकारणीत झाला.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल), विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी वेर्स्टन कोलफिल्डस लि. यांचेकडून रु. १,०९,०८,२७४ एवढी फरकाची रक्कम वसूल केली आहे. चलनाची प्रत सोबत जोडली आहे. उर्वरित रक्कम रु. ३,२८,६१७ वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

यावर मा.महालेखापाल यांचे अभिप्राय :

No remarks.

४.५ परिच्छेद क्र. ७.२.७ " स्वामित्वधनावरील व्याज " :

खनिज नियमावलीनुसार प्रमुख खनिजांवर, स्वामित्वधन, प्रत्येक वर्षी मार्च, जून, ऑक्टोबर व डिसेंबरला संपणाऱ्या प्रत्येक तिमाहीकरिता आगाऊ देय आहे. प्रत्येक तिमाहीकरिता स्वामित्वधनाच्या आगाऊ अधिदानाची रक्कम DMO कडून मागील तीनही तिमाहीतील प्रत्येक खाणीच्या क्षमतेच्या आधारावर ठरविल्या जाते आणि अशी निश्चित केलेली आगाऊ अधिदानाची रक्कम नंतर त्या तिमाहीत उत्पादित झालेल्या खनिजांच्या/ धातुकांच्या परिमाणात समायोजित करण्यात येते. प्रमुख खनिजांच्या बाबतीत खनिजांच्या देय रकमेच्या विलंबाने प्रदानाकरिता प्रतिवर्ष २४ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल.

सप्टेंबर १९९० चे शासकीय आदेश आणि खनिज नियमावलीनुसार DMO, चंद्रपूर यांनी प्रत्येक तिमाहीकरिता गेल्या तीन तिमाहीत केलेल्या कामगिरीच्या आधारावर स्वामित्वधनाच्या आगाऊ प्रदानाची रक्कम निश्चित केली नाही. DMO, चंद्रपूर यांच्या अभिलेख्यांच्या छाननीत (जून २०१३) असे उघडकीस आले की, WCL, चंद्रपूर यांनी ५५ ते १२० दिवसांच्या विलंबाने २००८-१३ या कालावधीत रु.४९१.१७ कोटी स्वामित्वधनाचे प्रदान केले. **(परिशिष्ट XV) (विवरण क्र.७).** त्यामुळे स्वामित्वधनाच्या प्रदानातील विलंबाकरिता, रु.२८.१० कोटी व्याज WCL चंद्रपूर ने देय होते. तिमाहीकरिता प्रदान केलेले स्वामित्वधन हे त्या तिमाहीकरिता अदत्त मानले गेले व त्याप्रमाणे व्याज काढले गेले.

PS, IE & LD यांनी शासनाच्या १ ऑक्टोबर, १९९० च्या आदेशाच्या संदर्भाने वस्तुस्थिती मान्य केली (ऑक्टोबर, २०१३). वसुलीची पुढील प्रगती प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग), विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—

लेखापरीक्षणामध्ये नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी त्यांच्या दिनांक ३०.११.२०१३, १३.०८.२०१४ आणि २३.०१.२०१४ च्या पत्रान्वये सदर रक्कम जमा करण्याबाबत मे.वेस्टर्न कोल फिल्डस लि., चंद्रपूर क्षेत्र यांना कळविण्यात आले होते. परंतु सदर रक्कम जमा न केल्यामुळे त्याचेवर जमीन महसूल थकबाकी नियम १९६७ च्या कलम १७ (२) अन्वये वसूली करण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दि.२२.०१.२०१५ रोजीचे मे.वेस्टर्न कोल फिल्डस लि., चंद्रपूर क्षेत्र पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तथापि, वेस्टर्न कोल फिल्डस लि., चंद्रपूर क्षेत्र यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, गोहाटी North Eastern Coalfields Ltd. *V/s* Union of India and Ors यांचे दि.२५.०६.२००४ चे आदेश, तसेच खनिज सवलत नियम, १९६० चे नियम ६४ (अ) च्या आधारे कोळसा निर्गमन पासून ३० दिवसांच्या आत Royalty जमा केली असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांना कळविले आहे. तसेच कोळशाच्या स्वामित्वधनाची रक्कम अग्रिम भरण्याविषयी कायदेविषयक बाबींची माहिती मागणी केलेली होती. त्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक एमएनजी-१०८९/ ३२८०५०/ ५३८९/उद्योग-९, दि.०१.०९.१९९० (शासन परिपत्रक) वेस्टर्न कोल फिल्डस लि., चंद्रपूर क्षेत्र यांना जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडून पाठविण्यात आलेले आहे. प्रस्तूत विषयी पाठपुरावा संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, यांचेमार्फत चालू आहे. दि.२२.०१.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना महसूल वसूली प्रमाणपत्र (Revenue Recovery Certificate) सादर करून आवश्यक कार्यवाहीची विनंती केली असून त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून दि.२२.०१.२०१८ रोजी जमीन महसूल थकबाकी नियम, १९६७ च्या कलम १७ (२) अन्वये वेस्टर्न कोलफिल्डस लि., चंद्रपूर यांना (R.R.C.) बाबत कार्यवाही करण्याची सूचना देण्यात आली आहे.

४.६ परिच्छेद क्र. ७.२.८ शास्ती न आकारणे :

खनिजांच्या विनियमनाप्रमाणे, तहसीलदारांना त्यांच्या अधिकारितेच्या मर्यादेत, गौण खनिजांच्या १०० ब्रास पेक्षा जास्त नसणाऱ्या उत्खननाकरिता परवाना निर्गमित करण्याकरिता प्राधिकार आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या खंड ४८ (७) प्रमाणे एखाद्या व्यक्तीने जो कायदेशीर प्राधिकाराशिवाय, खाणी, दगडखाणी, नाले, नदी-काठ यांमधून कुठल्याही खनिजांचे उत्खनन करेल, त्यांना स्थानांतरित करेल किंवा त्याची विल्हेवाट लावेल, तो जिल्हाधिकारी यांच्या लिखित आदेशावर शास्ती प्रदान करेल, जी उत्खनन केलेल्या, स्थानांतरित किंवा विल्हेवाट लावलेल्या खनिजांच्या बाजार मूल्याच्या तीन पटीपेक्षा जास्त नसेल.

लेखापरीक्षणात, तहसील, परभणी, मध्ये असे आढळून आले (जून, २०१३) की जिल्हाधिकारी यांच्या गौण खनिजांचे उत्खननाकरिताच्या आदेशाशिवाय स्वामित्वधन परस्पर चलनाने कोषागारात प्रदान केले. या पध्दतीचा अवलंब करून, १२८ प्रकरणांमध्ये २००८-१२ या कालावधीत रु. १३.९९ लाख वसूल केले गेले. खनिजांच्या उत्खननाकरीता उचित आदेश/परवाना निर्गमित केला नसल्याने रु. ४१.९७ लाख शास्ती सर्व प्रकरणांमध्ये आकारणीय होती.

ACS, R & FD यांनी अभिद्राण स्वीकारले आणि नमूद केले (ऑक्टोबर २०१३) की वसूली केली जाईल. पुढील प्रगती प्रतिक्षित आहे (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—

जिल्हाधिकारी, परभणी यांनी कळविल्यानुसार १०० ब्रासचे वरचे अधिकार उप विभागीय अधिकारी यांना आहेत. तथापि, आदेश काढण्यात विलंब होऊ नये याकरीता मौखिक मंजूरी घेऊन तलाठ्यांना सूचित केल्याप्रमाणे माती, दगड व मुरूम या गौण खनिजाची स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी गौण खनिजाचे उत्खनन अनधिकृतरित्या करण्यात आलेले नसून तहसील कार्यालयात आदेश/परवाना निर्गमित करण्याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे. त्यामुळे परिच्छेदात नमूद केलेली अनियमितता अनावधानाने झालेली असल्याने आकारण्यात आलेली शास्ती क्षमापीत करून परिच्छेद वगळण्यात यावा.

यावर मा.महालेखापाल यांचे अभिप्राय :

The reply is not acceptable as no rule/provision authenticating oral permits for sand extraction exists under Regulation of Minerals wherein Tahsildar were permitted to issue only written permits.

४.७ परिच्छेद क्र. ७.२.९ वाळू घाटांच्या लिलावाकरता ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेचा परतावा :

R & FD ने राज्यात वाळू घाटांचा लिलावा करण्याकरिता धोरण जाहीर केले (ऑक्टोबर, २०१०). या धोरणाच्या अट क्र. C (15) अनुसार वाळू घाटाचा लिलाव रद्द झाल्यास, बोली रकमेच्या प्रमाणानुसार परतावा अनुज्ञात आहे. परताव्याकरिता धोरणाच्या अट क्र. C (२२) मध्ये असे म्हटले आहे की, जर कोणत्याही कारणाने सांगितलेले वाळूचे परिमाण उपलब्ध नाही, पोचमार्ग उपलब्ध नाही. वाळू घाटाच्या क्षेत्रात पाणी तुंबवणे, मानवनिर्मित कारणांसाठी किंवा नैसर्गिक आपत्तीसाठी, वेळेची मुदतवाढ किंवा कामाच्या जागेतील बदल विचारात घेतले जाणार नाही/अनुज्ञात नाही.

DMO कोल्हापूर यांच्या अभिलेख्यांच्या छाननीत (मे, २०१३) लेखापरीक्षणात असे आढळून आले की,—

(*i*) R & FD ने एका कंत्राटदाराला २०१०-११ या वर्षाकरिता मौजे राजापूर तहसील, शिरोल येथील वाळू घाटाच्या बाबतीत, तिथे वाळूच्या परिवहनाची शक्यता नाही या अटीच्या पूर्ततेच्या अधीन राहून रु.२२.९४ लाखाचा परतावा दिला (सप्टेंबर २०१२) तहसीलदार, शिरोळ यांनी कळविले (डिसेंबर, २०१२) की गट क्र. १४४ च्या दक्षिणेकडील बाजूकडून वाळूचे परिवहन करण्यात कोणताही अडथळा नव्हता, यास्तव कंत्राटदाराला देण्यात आलेला रु.२२.९४ लाखाचा परतावा अनियमित होता.

(*ii*) R & FD ने एका कंत्राटदाराला, मौजे कोठाळी, तहसील शिरोल येथील वाळू घाटाच्या बाबतीत, २०११-१२ या वर्षाकरिता रु.११.७५ लाखाचा परतावा दिला (जानेवारी, २०१३) हा परतावा कंत्राटदाराच्या शाखा अभियंता, वडगाव पाटबंधारे विभाग यांच्या दोणाली के. टी. बंधाऱ्यातून अत्याधिक पाणी सोडल्याच्या खरांबीमुळे पर्यायी वाळू घाट देण्याच्या विनंतीवरून देण्यात आला.

अभिलेखांवरून पाहिले असता, १५१ पैकी ७७ वाळू घाटांचा लिलाव २०११-१२ मध्ये करण्यात आला व उर्वरीत ७४ घाट लिलावावाचून राहिले कंत्राटदाराला पर्यायी वाळू घाट देणे शक्य होते. तथापि, शासनाने परताव्याकरिता मंजूरी दिली. याप्रकारे, रु.३४.६९ लाखाचा परतावा वाळू घाट धोरणाच्या अटींचे उल्लंघन करून देण्यात आला.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन (महसूल), विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—

मौजे राजापूर तहसिल, शिरोळ येथील वाळू गटांबाबत तहलिसदार, शिरोळ यांनी कर्नाटक हद्दीतील जुगूळ, मंगावती व शहापूर या ग्रामपंचायतीकडे पाणी शुध्दीकरण यंत्रणा नसल्याने वाळू उपसा केल्यामुळे पाणी अशुध्द होऊन पाणी प्यायल्याने आरोग्य बिघडणार आहे व वाळू वाहतुकीमुळे रस्ते खरांब होणार आहेत असे नमूद केले होते. तहसिलदार शिरोळ यांनी गट नं.१४४ लगत नदीपात्रातील वाळू उपसा करुन ती वाळू राजापूर हद्दीतील गट नं.१७४ व १७५ मध्ये साठा करता येऊ शकेल असे कळविले होते. तथापि, वाळू उपसा सुरू होताच दुसऱ्या दिवशी शाखाधिकारी, पाटबंधारे शाखा नृसिंहवाडी यांनी राजापूर बधाऱ्यावरुन वाळू वाहतूकीस बंदी केली होती. तसेच शासनाच्या ज्ञापनामध्ये लिलावधारकास गट नं. १४४ च्या नदीपात्रातील दक्षिण बाजू वाळू वाहतूक करणे शक्य होते किंवा कसे ही बाब तपासूनच रक्कम परत करण्यास मान्यता देण्यात आली होती.

त्याचप्रमाणे तहसीलदार शिरोळ यांनी खातरजमा करून जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना अहवाल सादर केला व त्यानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी रक्कम अदा तहसीलदार, शिरोळ यांना कळविले.

यावर मा.महालेखापाल यांचे अभिप्राय :

The grant of refund of Rs.22.94 lakh to contractor for sand ghat at Mauje Rajapur, Taluka Shirol was irregular as condition for grant was that in २०१०-११ there was no possibility of transportation of sand However, Tahsildar Shirol had reported (December २०१२) that there was no hurdle in transportation of sand from south side of gut no.144 which itself contradicts the grant of refund appears to be irregular.

साक्ष :

४.८ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

४.९ परिच्छेद क्रमांक ७.२.४ " स्वामित्वधनाची आकारणी " :

या परिच्छेदाबाबत माहिती देताना परभणी जिल्ह्यातील या प्रकरणामध्ये ६२ लाखाची रक्कम १० जानेवारी, २०१८ रोजी वसूल करण्यात आली आहे. या परिच्छेदाची वसुली पूर्ण झालेली आहे असे महसूल विभागाचे विभागीय अधिकारी यांनी अवगत केले.

४.१० परिच्छेद क्रमांक ७.२.५ " विभागामध्ये समन्वयाचा अभाव " :

या परिच्छेदाबाबत माहिती देताना जलसंपदा विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जलसंपदा विभाग पूर्ण महाराष्ट्रामध्ये कालवा स्वच्छतेची कामे करण्यात येतात. कालव्यातील गाळ काढण्याचे काम सुरू असते. मागील ५ वर्षापासून सर्व मशिनरी यासाठीच वापरली जाते. त्यावर रॉयल्टी देय नाही असे जलसंपदा विभागाचे म्हणणे आहे. ज्या ठिकाणी जलसंपदा विभागाकडून कामे करण्यात येतात तेथील मटेरियल कुठे नेले जात नाही. तेथील माती किंवा गाळ तेथेच असतो. यासाठी महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू कोड, १९६६ मधील सेक्शन ४८(७) नुसार स्वामित्वधन भरण्याची आवश्यकता नाही असा नियम आहे. गाळ काढणे, जलयुक्त योजनेत शेतकऱ्यांच्या शेतात गाळ टाकला जातो यामध्येसुध्दा सूट दिली आहे. एखाद्या ठिकाणी आपण काम करून तेथील मटेरियल तेथेच वापरले जात असेल, जमीन सपाटीकरण असेल, पुनर्वसनाचे काम असेल अशाकरिता महाराष्ट्र शासनाचा अधिनियम ६७, महसूल विभाग ११.५.२०१५ नुसार रॉयल्टी द्यायची नाही असे असल्यामुळे देण्यात आलेली नाही**.**

या परिच्छेदाबाबत माहिती देताना, यामध्ये रॉयल्टी शासनाच्याच एका खात्याकडून दुसऱ्या खात्याला देण्याचा विषय आहे. जलसंपदा विभागाने महसूल विभागाकडे रॉयल्टीचा भरणा केला नाही असा महालेखापालांचा आक्षेप आहे असे महसूल विभागाच्या सचिवांनी सांगितले.

गाळ काढण्यासाठी रॉयल्टी देय होते का? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणामध्ये महालेखापाल यांनी आक्षेप घेतला होता की, पाटबंधारे विभागामार्फत २००७ ते २०१२ या काळात विविध प्रकल्पांच्या ठिकाणी माती काम करण्यात आले, त्याबाबत १२७ कोटी रुपये स्वामित्व धन देय होते. त्यांबद्दल जलसंपदाची विभागाची भूमिका आहे की, त्यांनी फक्त या कालव्यांमधून गाळ काढलेला आहे, तो गाळ काढून कालव्याच्या दोन्ही बाजूला टाकलेला आहे, तो कुठे नेलेला नाही. त्याचा कुठेही त्यांनी मिनरल म्हणून वापर केलेला नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापाल यांचे मत काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, एग्जीस्टिंग रुल के हिसांब से रॉयल्टी पेएंबल है, चाहे वह सिविल विंग की हो या मेकॅनिकल विंग की हो, उसमें हमें जाना नहीं है. मेन आर्ग्यूमेंट यह है कि सरकार का एक विभाग दूसरे विभाग को पे कर रहा है. उदाहरण के तौर पर कोल के एलोकेशन है. उसमें कोल इंडिया ही अगर मायनिंग के लिए खरीदता है तो क्या उसको भी फ्री में हो जाना चाहिए ? रॉयल्टी पर रेवेन्यू जनरेट हो रहा है. असे महालेखापालांनी समितीस सांगितले.

या प्रकरणी जलसंपदा विभागाचे मत आहे की, ते सील्ट काढतात. गाळ काढून ते दोन्ही बाजूला ठेवतात असे महसूल विभागाच्या सचिवांनी सांगितले.

समितीचे स्पष्ट मत आहे की, जलसंपदा विभागाचे कर्मचारी कालव्याची दुरुस्ती करतात, सील्ट काढतात, त्याचे मेन्टेनन्स करतात. हे सर्व काम जलसंधारण विभागाने मेन्टेनन्ससाठी केले असेल तर महालेखापाल यांचा आक्षेप चुकीचा आहे. जर जलसंधारण विभागाने नवीन कालवा बांधला असेल तरच रॉयल्टी द्यावी लागेल. या परिच्छेदांतर्गत विभागाने जे काही काम केले आहे त्यानुसार विभागाने फक्त गाळ काढला असेल आणि मेन्टेनन्स केले असेल तर यासाठी स्वामित्वधन घेण्याचे कोणतेही कारण नाही. हा मेकॅनिकल विभाग आहे. एका विभागाने दुसऱ्या विभागाचे काम केले असेल तर त्याला स्वामित्वधन द्यावी लागेल हे महालेखापाल यांचे म्हणणे बरोंबर आहे. पाटबंधारे विभाग नवीन कालवा बांधणार असेल तर स्वामित्वधन द्यावे लागेल. परंतु जुन्या कालव्याची दुरुस्ती असेल तर त्यासाठी स्वामित्व धन देण्याची आवश्यकता निर्माण होत नाही. त्यामुळे महालेखापाल यांचा परिच्छेदातील आक्षेप योग्य वाटत नाही. त्यांनी त्यात दुरुस्ती करावी असे मत समितीने व्यक्त केले.

विभागाने गाळ काढून बाजूला ठेवला, तो कोणत्याही कारणासाठी वापरला असता किंवा विकला असता, तर मग स्वामित्वधन देता आले असते. कालव्यातील गाळ हा काढलाच पाहिजे. शेतकऱ्यांना गाळ काढण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येते की, गाळ काढा आणि घेऊन जा. हा गाळ मोफत नेण्यास सांगितल्यास बऱ्याच वेळा तहसीलदार अडवतात व त्या गाळावर स्वामित्वधनाची मागणी करतात. तो गाळ जर काढून ठेवला तर तो काही तिथेच राहत नाही तर बाजूच्या शेतात पसरत असतो. त्यामुळे शेतकरी जर तो गाळ घेऊन जात असतील तर त्यावर त्यांना स्वामित्वधन आकारण्यात येऊ नये. एका बाजूला डिझेलचे पैसे मोफत देण्यात येतात पण गाळ घेऊन जाण्यासाठी तहसिलदार अडवतात त्यामुळे महसूल विभागाचा एक मुद्दा स्पष्ट झालेला नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, या विषयांबद्दल यापूर्वीच शासन निर्णय काढलेला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

The project earth work includes construction of earthen dam, gorge filling. यामध्ये चीफ इंजिनियर, वॉटर रिसोर्स, नाशिक यांचे एक पत्र आहे की, "The project works also includes silt removing from projects where quarry material is not required. " यांबद्दल हे सर्व विभागाने लिहिले आहे. त्या आधारावर स्वामित्वधन मागितले आहे. How can this be project? It is maintenance work. It is not new project, it is only maintenance of the project. Silt removing is maintenance of the project. For new project royalty will be applicable. या विषयाबाबत अधिक माहिती द्यावी. जो मेंटेनन्स करतो तो इस्टिमेट तयार करतो काय? अशी विचारणा समितीने केली असता, हे विभाग करत नाही. कारण मशिनच्या तासावर डिंबेट असते ते सिव्हिलला देण्यात येते आणि ते फक्त ट्रान्झेक्शन ॲडजेस्टमेंट होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याचा अर्थ ड्रायव्हर आणि मशिनरीदेखील विभागाची आहे तर मग गाळ किती काढायचा याचे अंदाजपत्रक हे विभाग तयार करीत असेल? हे सर्व काम ते करतात आणि त्यांच्या मशिनरीचे चार्ज समाविष्ट करतात आणि ते त्याच्या लाभ क्षेत्राला ट्रान्सफर करतात आणि त्यातुन मग त्यांचे पैसे निघतात. अंदाजपत्रकामध्ये विभाग गाळाची काही तरतूद ठेवण्यात येते काय? अशी विचारणा समितीने केली असता, ही बाब विभागीय सचिवांनी मान्य केली व यासाठी वर्षभरासाठी तरतूद करण्यात येते असे समितीस अवगत केले.

समितीचा आक्षेप चुकीचा नाही पण विभागीय सचिवांनी बरोंबर उत्तर दिलेले नाही. विभागाच्या अनुपालनाने हा अहवाल बरोंबर आलेला नाही त्यामुळे हा विषय उपस्थित झालेला आहे. त्यामुळे समितीचे मत आहे की, Removing silt is not a new project, it is maintenance of the cannal आणि यासाठी रॉयल्टी देणे हे योग्य नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, कालव्याच्या डि-सिल्टींगचा जो विषय आहे त्यांबद्दल विभागाकडून स्पष्टता करून देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

४.११ परिच्छेद क्र. ७.२.६ " चुकीच्या वर्गीकरणामुळे स्वामित्वधनाची चुकीची आकारणी " :

या परिच्छेदासंदर्भात जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी वेर्स्टन कोलफिन्डस लि. यांचेकडून रु.१०९०८२७४ एवढी रक्कम वसूल केली आहे व उर्वरीत रककम रु.३.२८,६१७ वसुलीबाबत काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये दिनांक ४ जानेवारी २०१८ रोजी डब्लू.सी.एल. या कंपनीने रक्कम भरलेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

४.१२ परिच्छेद क्र. ७.२.७ " स्वामित्वधनावरील व्याज " :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१२ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ७.२.७ " गौण खनिजाकरिता स्वामित्वधनाची वसुली " यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने उद्योग विभागाचे सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी माहिती देताना, लेखा परीक्षणात नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी त्यांच्या दिनांक ३०/११/२०१३, २३/०१/२०१४ आणि १३/०८/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दंडाची २८.१ कोटी रुपये इतकी रक्कम जमा करण्याबाबत मे.वेस्टर्न कोल फिल्डस लि.चंद्रपूर क्षेत्र यांना कळविले होते. परंतु त्यांनी सदरहू रक्कम जमा न केल्यामुळे एमएलआरसी कोडखाली त्यांना २०१५ मध्ये नोटीस दिली होती. वेस्टर्न कोल फिल्डस लि. कंपनीने North Eastern Coal fields Ltd., V/S Union of India and Ors या न्यायालयीन प्रकरणाचा संदर्भ दिला होता. सध्या वेस्टर्न कोल फिल्डस लि., चंद्रपूर क्षेत्र यांच्यासोबत या रकमेच्या संदर्भात वाटाघाटी करण्यात येत आहेत. हा केंद्र सरकारचा उपक्रम आहे. विभागाने व्याजाची जी गणना केलेली आहे ती उक्त कंपनीला मान्य नाही. वास्तविक पाहता नियमातील तरतुदीनुसार after extraction of minerals हे ६० दिवसांच्या आतमध्ये जमा करावयास पाहिजे. परिपत्रकामध्ये नमूद केले आहे की, कंपनीने प्रत्येक तिमाहीमध्ये अग्रीम रॉयल्टी द्यावयास पाहिजे. परंतू कंपनीने जसजसे उत्खनन केले किंवा डिस्पॅचमेंट केले त्यानुसार रॉयल्टी भरलेली आहे असे विभागीय अधिकारी यांनी अवगत केले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये नमूद केले आहे की, वेस्टर्न कोल फिल्डस लि.चंद्रपूर यांनी माननीय उच्च न्यायालय खंडपीठ, गोहाटीच्या प्रकरणाचा संदर्भ देऊन तसेच खनिज सवलत नियम १९६० चे नियम ६४ (अ) च्या आधारे कोळसा निर्गमन पासून ३० दिवसांच्या आत रॉयल्टी जमा केल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांना कळविले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, रॉयल्टी जमा करण्यास ३० ते ६० दिवसांची मुभा असते असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केले आहे की, दि.२२/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना महसूल वसुली प्रमाणपत्र सादर करुन आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली असून त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्याकडे दि.२२/०१/२०१८ रोजी जमीन महसूल थकबाकी नियम, १९६७ च्या कलम १७ (२) अन्वये वेस्टर्न कोल फिल्डस लि., चंद्रपूर यांना (आर.आर.सी.) कार्यवाही करण्याची सूचना दिली आहे. परंतु कंपनीचे म्हणणे आहे की, सदरहू रॉयल्टी विभागाला देय नाही. What is the legal position? या संदर्भातील कायदेशीर प्रक्रिया काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाची मागणी कंपनीकडे नमूद करण्यात आलेली आहे. परंतु कंपनीने या प्रकरणी चर्चा करण्यासाठी वेळ मागितलेला आहे. कंपनीसोबत बैठक पार पडल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल असा खुलासा विभागीय अधिकाऱ्यांनी केला.

या प्रकरणी १५ दिवसांच्या आत विभागाच्या सचिवांनी कंपनीबरोबर चर्चा करुन उचित निर्णय घ्यावा तसेच जो निर्णय घेण्यात येईल त्या बाबतची माहिती समितीला अवगत करून द्यावी, असे निदेश समितीने दिले.

हा परिच्छेद १९९० च्या परिपत्रकावर आधारित आहे असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व परिपत्रकापेक्षा नियमामध्ये जी तरतूद असते ती अधिक वैध असते असे अवगत केले.

राज्य सरकारने केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या मे वेस्टर्न कोल फिल्डस लि. च्या विरोधात जाऊन आर.आर.सी. काढण्यापेक्षा दोघांनी यातून सामोपचाराने मार्ग काढला पाहिजे. दोघांचीही कायदेशीर बाजू ऐकून निर्णय करावयास पाहिजे. कारण या प्रकरणी आर.आर.सी. काढून काही उपयोग होणार नाही असे मत व्यक्त करुन विभागाकडे रॉयल्टीपोटी कंपनीची अनामत रक्कम जमा असते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, रॉयल्टीची अनामत रक्कम घ्यावी अशा प्रकारचे परिपत्रक आहे. परंतु Integrated Lease Management System असल्यामुळे जसजसे उत्खनन होते त्या प्रमाणात कंपनी रॉयल्टी भरत असतात. पण अग्रीम रॉयल्टी भरण्यास त्यांचा विरोध आहे. किंबहुना त्यांना ते शक्य होत नाही असे विभागीय अधिकाऱ्यांनी विदित केले.

सन १९९० च्या शासन निर्णयानुसार प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी एक्झिट कॉन्फरन्सच्या वेळी महालेखापाल यांना लेखी कळविले होते की, विभागाकडून कंपनीकडे जी मागणी करण्यात आलेली आहे ती योग्य आहे. परंतु आता विभागाकडून सांगण्यात येत आहे की, कंपनीबरोबर मागणी रकमेच्या बाबतीत वाद आहे. सन १९९० च्या शासन परिपत्रकानुसार त्यांना ही रक्कम देय आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, शासन परिपत्रक आणि मिनरल कन्सेशन रुल्स यातील तरतुदी थोड्याशा परस्पर विरोधी आहेत.तमिनरल कन्सेशन रुलमध्ये अशी तरतूद आहे की, उत्खनन केल्यानंतर ६० दिवसांत अग्रीम रकमेचा भरणा केला पाहिजे. परंतु दुसऱ्या बाजूला परिपत्रकानुसार त्यांच्यावर बधन घालण्यात येते की, तिमाहीचे जे अंदाजित उत्खनन करणार आहे त्याची अग्रीम रॉयल्टी भरावयास पाहिजे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Is it १००% advance? ही रक्कम अंदाजित असावी म्हणूनच शासनाने ठरविले होते की, त्यांनी अग्रीम भरणा करावा. नंतर ज्यावेळी मूल्यांकन होईल तेव्हा ती रक्कम अंतिम करावी असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, It is advance of the estimated amount. इतर खाजगी खाणपट्टाधारक अशा प्रकारचा भरणा करतात. परंतु पब्लिक लिमिटेड कंपनीच्या बाबतीत थोडीशी अडचण येते. त्यामुळे त्यांनी पत्राद्वारे अगोदर कळविले होते की, शासनाने त्यांच्यासाठी ही पध्दत अद्ययावत करावी असे विभागीय अधिकाऱ्यांनी समितीस अवगत केले.

एका बाजूला १९९० च्या परिपत्रकाचा संदर्भ दिला जातो आणि दुसऱ्या बाजूला गोहाटी उच्च न्यायालयातील दि.२५/०६/२००४ रोजीच्या निर्णयाचा संदर्भ दिला जाते. या दोन्ही बाबींची कारणमिमांसा तपासून, तसेच या प्रकरणी निर्णय घेऊन योग्य शासन निर्णय काढावयास पाहिजे. तसेच या प्रकरणी तोडगा काढून, संबधितांबरोंबर बैठक घेऊन किंबहुना विधी व न्याय विभागाचे मत मागवून विभागाची मागणी योग्य आहे काय, नसल्यास, या बाबत सरकार फेरविचार करणार काय, तसेच हा विषय संपेल या दृष्टीने नियम तयार करणार काय, इत्यादी सर्व बाबतीत निर्णय घेऊन १५ दिवसांत या परिच्छेदाबाबतची माहिती समितीला पाठवावी असे समितीने सुचित केले असता, विभागाला उक्त माहिती सादर करण्यासाठी ६० दिवसांची मुदत द्यावी. कारण सध्या विभागाकडे "Advantage Maharashtra" या कार्यक्रमाची तयारी सुरू आहे अशी विनंती विभागीय अधिकाऱ्यांनी केली. त्यास समितीने मान्यता दर्शवून उक्त माहिती १ महिन्यात समितीकडे पाठवावी असे समितीने सुचित केले.

या प्रकरणी विभागाने पब्लिक सेक्टरसाठी वेगळे नियम आणि प्रायव्हेट सेक्टरसाठी वेगळे नियम असे करता कामा नये. सर्वांसाठी एकच नियम ठेवावयास पाहिजे असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

४.१३ परिच्छेद क्र. ७.२.८ " शास्ती न आकारणे " :

या परिच्छेदाबाबत विभागाने दिलेले उत्तर मान्य करण्यासारखे नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, या विषयामध्ये आम्ही तीन तहसिलदारांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचा खुलासा मागविण्यात आला आहे. तो खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गौण खनिजाचे उत्खननाकरिताच्या आदेशाशिवाय स्वामित्वधन परस्पर कोषागारास प्रदान केले. या पध्दतीचा अवलंब करून १२८ प्रकरणांमध्ये २००८-१२ या कालावधीत १३ लाख ९९ हजार रुपये वसूल केलेले आहेत परंतु खनिजांच्या उत्खननाकरिता उचित आदेश/परवाना निर्गमित केला नसल्याने ४१ लाख ९७ हजार रुपये वसूल करण्याचे बाकी होते तर ती वसुली केलेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणात तहसीलदारांनी त्यांच्या स्तरावर पैसे भरून घेतलेले होते. मात्र परमिटचे आदेश काढलेले नव्हते. यापैकी कोणत्याही प्रकरणामध्ये परमिटचे आदेश काढलेले नाहीत. ज्याअर्थी आदेश काढलेले नाहीत त्याअर्थी त्यामध्ये पुढचे पैसे वसूल करण्याचा प्रसंग आलेला नाही. कारण त्यामध्ये प्रथम आदेश निर्गमित होणे आवश्यक आहे. ज्याअर्थी पैसे भरलेले आहेत आणि उत्खनन झालेले आहे तर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्तरावर याला कार्योत्तर मान्यता द्यावी लागेल. कारण जोपर्यंत कार्योत्तर मान्यता दिली जात नाही तोपर्यंत पैसे भरून घेतले तरी उत्खननाकरिता अधिकारीता प्राप्त होत नाही म्हणून सक्षम प्राधिकाऱ्यांकडून कार्योत्तर मान्यतेचे आदेश पारित करून घ्यावे लागतील. त्यावेळी जी रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले जातील ती रक्कम वसूल केली जाईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

पण समितीचा आक्षेप असा आहे की, त्यावेळीच जर आदेश पारित केले असते तर ४१.९७ लक्ष एवढया रुपयांची आकारणी झाली असती. आदेश न दिल्यामुळे कमी आकारणी झालेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, तो आक्षेप असा आहे की, तहसीलदार यांना एका प्रकरणी १०० ब्रास पर्यंत उत्खननास परवानगी देण्याचे अधिकार होते मात्र त्यांनी त्यापेक्षा अधिक क्वॉंटीटीचे उत्खनन करण्याबाबत त्यांनी तोंडी आदेश दिले, त्याचे पैसे भरुन घेतले आणि त्यानंतर त्याचे आदेश पारित केले नाहीत. ते अधिकार एस.डी.ओ. किंवा त्यांच्या वरच्या स्तरावरिल अधिकाऱ्यांचे असतील. मात्र प्रत्यक्षामध्ये त्यांच्या स्तरावर आदेश पारित करण्याच्याऐवजी त्यांनी पैसे भरुन घेतले आहेत. पहिला मुद्दा असा आहे की, या केसमध्ये ज्याअर्थी उत्खनन झाले आहे त्याअर्थी याला कार्योत्तर मान्यतेचे प्रत्यक्षात आदेश पारित करावे लागतील. मग त्या आदेशामध्ये जी रक्कम अधोरेखित होईल त्यानुसार ती वसूल करावी लागेल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २०१३ च्या केसला विभाग सन २०१८ मध्ये कार्योत्तर मान्यता देणार आणि त्यानंतर त्यांच्याकडून दंड वसुलीची कारवाई करणार आहे. हे सर्व करण्यासाठी महालेखाकारांचा परिच्छेद आला तरी विभागाने कोणतीही कार्यवाही का केली नाही ? गेल्या पाच वर्षांच्या पुढची कारवाई कोणी करीतच नाही. हे प्रकरण कोणत्या जिल्ह्याचे आहे त्या जिल्ह्याचे कोणी अधिकारी आले आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता, ही केस परभणी जिल्ह्याची आहे. या प्रकरणामध्ये महालेखाकारांचा दृष्टीकोन असा आहे की, हे जे उत्खनन झालेले आहे ते बेकादेशीर आहे. त्यामुळे त्याला दंडात्मक कारवाई झाली पाहिजे म्हणून त्यांनी ४१.९७ लाख रुपये एवढी रक्कम आकारली आहे. मात्र यासाठी रितसर परवानगी दिली तर दंडात्मक कारवाईचा प्रश्नच उद्‌भवणार नाही. या सर्व व्यक्तींनी पैसे भरलेले आहेत आणि या विषयामध्ये जनतेच्या दृष्टीकोनातून बघितले तर ज्या व्यक्तिने उत्खनन केले आहे, त्या व्यक्तिने पैसे भरलेले आहेत. सक्षम प्राधिकाऱ्याने यासाठी परवानगी नाही दिली तर तो विभागाचा अंतर्गत विषय आहे. कारण जनतेने पैसे भरलेले आहेत त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे योग्य वाटत नाही. या प्रकरणामध्ये विभागाला अंतर्गतरित्या नियोजन करावे लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यांनी या सर्व चुका केल्या आहेत त्यांच्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यांनी पैसे भरले असले तरी ते कशाच्या आधारावर भरले आहेत, त्यामध्ये किती क्वॅान्टीटी होती ? अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भात चुकीची कार्यवाही केल्यामुळे संबधितांना कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत.तअसे विभागीय सचिवानी यांनी सांगितले.

विभागाने ज्ञापनाच्या शेवटच्या ओळीमध्ये नमूद केले आहे की, “ अनियमितता अनावधानाने झाली “ असे म्हणण्याची गरज काय होती ? अशी काही परिस्थिती होती काय की विभागाला ही अनियमितता करावीच लागली आहे. कारण हे हेतूपूर्वक झाले आहे. It was not done bonafidely असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

४.१४ परिच्छेद क्र. ७.२.९ वाळू घाटांच्या लिलावाकरिता ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेचा परतावा :

या परिच्छेदाबाबत माहिती देताना, या प्रकरणी शासन स्तरावर रिफन्ड मंजूर करताना जी अट टाकली होती की, यामध्ये दक्षिण बाजूस वाहतूक करण्याकरिता परिस्थिती आहे किंवा नाही याची शहानिशा जिल्हा स्तरावर करावी आणि त्यानंतर हा रिफन्ड द्यावा. मात्र याची शहानिशा न करता हा रिफन्ड करण्यात आला. या अनुषंगाने संबधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यांबद्दल विभागीय आयुक्त, पुणे यांना विभागाकडून नुकतेच कळविण्यात आले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणी शहानिशा झाली आहे. सन २०१०-११ या वर्षाकरिता मौजे राजापूर, तहसील शिरोळ येथील कंत्राटदाराला देण्यात आलेल्या अनियमित परताव्याचे रु.२२ लाख रुपयांचे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, शासनाने रिफन्ड केले आहे. त्यामुळे त्यांनी रिफन्ड मंजूर केला आहे. शासनाने रिफन्ड सशर्त मंजूर केला होता असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

त्या अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे विभागाच्या शर्तीचे पालन न केल्यामुळे शासनाचे २२ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. यामध्ये तहसीलदाराचा अहवाल आहे की त्या ठिकाणी वाहतूक करणे शक्य आहे. तो दुसऱ्या तहसीलदाराचा अहवाल होता. पूर्वीच्या तहसीलदाराने सांगितले की रस्ता नाही. नंतर दुसऱ्या तहसीलदाराने अहवाल देताना सांगितले की, रस्ता आहे. रस्ता असल्यामुळे जो निधी रिफन्ड केला तो चुकीचा आहे. त्यामुळे कार्यवाही प्रस्तावित होणे आवश्यक आहे ती अद्यापही केलेली नाही. त्याचंबरोंबर २२ लाख रुपये जे आपण रिफन्ड केले ते सशर्त केले होते. परंतु रस्ता नाही असे गृहीत धरुन हा निधी रिफन्ड केला आहे. त्यामुळे या पैशांची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी माहिती देताना, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शिरोळ तालुका आहे. तेथून कृष्णा नदी वाहते. कृष्णा नदीच्या पलिकडील काठावर महाराष्ट्रातील २ गावे आहेत. इतर आजुंबाजूची गावे कर्नाटक राज्यातील आहेत.तत्या पलिकडच्या २ गावातील वाळूचा गट एका कंत्राटदाराला २५ लाख ५० हजार रुपयांना मंजूर झाला होता. परंतु कर्नाटक राज्यातील त्या आजुंबाजूच्या गावातील लोकांनी तेथील वाळू उचलण्यास विरोध केला. ती गावे म्हणजे दिगूळ, मंगावती आणि शहापूर होत. त्यांचे असे म्हणणे होते की, या वाहतुकीमुळे त्यांच्या गावातील रस्ते खरांब होतात. तसेच ते तेथूनच पाणी उचलतात व त्यांच्या गावात पिण्याचे पाणी शुध्दीकरणाची यंत्रणा नाही. कारण सक्शन पंपाने वाळू काढल्यामुळे तेथील पाणी गढूळ होते. परिणामी आरोग्यास हे पाणी अपायकारक होते. त्यामुळे त्या लोकांनी विरोध केला. वाळूचे काही प्रमाणात उत्खनन केल्यानंतर कंत्राटदाराला वाळू काढता आली नाही म्हणून, त्याने रिफन्ड मागितला. त्यामुळे जिल्हाधिकारी स्तरावरुन हा प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनाकडे पाठविण्यात आला होता. शासनाने तो प्रस्ताव मंजूर केला असे समितीला विदित केले.

विभागाने आता तेथील जी वस्तुस्थिती सांगितली ती समितीला समजणे शक्य आहे. पण शासनाने जी अट घातली आहे ती म्हणजे रस्ता नसेल तर सदर रक्कम कंत्राटदाराला रिफन्ड करावी. रस्ता असेल तर रिफन्ड करण्यात येऊ नये. **The Tehsildar says that there was no hurdle in transportation of sand from south side of Gat No-145, १४४ which itself contradicts the grant of refund.** पाणी गढूळ होईल, रस्ते खरांब होतील किंवा लोकांनी इतर आक्षेप घेतल्याचे समितीस सांगण्यात आले, या सर्व बाबींचा शासनाने विचार केला असेल. वाळूच्या वाहतुकीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील रस्ते खरांब होतात. तरीही विभागाकडून वाळूच्या सर्व घाटांची विक्री करण्यात येते. त्यामुळे हे कारण होऊ शकत नाही. जोपर्यंत ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळत नाही तोपर्यंत लिलाव होत नाही. या प्रकरणामध्ये इतर कारणे न पाहता एकच अट टाकली होती की, त्या ठिकाणी जर रस्ता नसेल तरच रिफंड करावे. विभागाच्या तहसीलदारांनी " रस्ता होता. " असे सांगितले आहे. जर रस्ता असेल तर रिफंड का करण्यात आले ? अशी विचारणा समितीने केली असता, याप्रकरणी विभागीय आयुक्त यांना चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

याबाबतची वस्तुस्थिती समितीसमोर आलेली आहे. ज्या अटीवर रिफंड करण्याची परवानगी शासनाने दिली ती अट पूर्ण होत असेल तर रिफंड करण्यात यावे. जर ती अट पूर्ण होत नसेल तर करु नये. लोकांचा विरोध आहे किंवा लोक रस्त्यावरुन जाऊ देत नाहीत, अशी काही नवीन परिस्थिती उद्‌भवली असेल तर त्याबाबत वेगळी मान्यता घ्यावी. द्वरस्ता नसेल तर पैसे परत करा या एकाच अटीवर शासनाने मान्यता दिली होती. रस्ता आहे, असे तहसीलदारांनी सांगितले आहे. असे असतानाही पैसे का परत करण्यात आले, याबाबत जबाबदारी निश्चित करणार आहेत काय ? याची वसुली कशी केली जाणार आहे ? तहसिलदार यांनी पहिल्यांदा ज्यावेळी प्रस्ताव दिला त्यावेळीच रस्ता आहे किंवा नाही याबाबत विचार केला असेल. कारण हा प्रस्ताव खालच्या पातळीवरुनच वरच्या रस्त्यावर येत असतो, थेट शासनाकडे येत नाही. कदाचित हा प्रस्ताव शासनाकडे येण्यापूर्वी तत्कालिन तहसिलदार यांनी रस्ता नसल्याबाबत माहिती दिली असेल असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये अलीकडील काठावर रस्ता असल्याबाबत सांगितले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले. त्यावर रेती कोणत्या काठावर आहे ? अशी विचारणा समितीने केली त्याबाबत रेती पलीकडील काठावर आहे, परंतु रस्ता अलीकडील काठावर आहे असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

असे असतानाही महसूल विभागातील तहसिलदारांनी असा चुकीचा निर्णय कसा घेतला ? शासनाने स्पष्ट निर्देश दिले की, जो प्रस्ताव सादर केला असेल त्याबाबत शासनाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे. अगोदर याबाबत स्पष्टीकरण मागितले व शासनाने कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले. कोणत्या स्तरावर हा निर्णय झाला प्रत्यक्षात वाळुचा उपसा झाला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, वाळूचा उपसा झाला नाही. वाळू पलीकडील काठावर आहे व त्याभोवती कर्नाटक राज्यातील गावे आहेत. तहसिलदार यांनी जो रस्ता असल्याचे सांगितले आहे तो अलीकडील काठावर आहे. वाळू काढल्याशिवाय ट्रान्सपोर्ट करता येणार नाही, परंतु ही वाळू काढण्यासाठी देखील कर्नाटक राज्यातील गावांचा विरोध होता. वाळू काढण्यामुळे पाणी दूषित होत आहे असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे वाळू काढता आली नाही व पर्यायाने ट्रान्सपोर्टचा देखील प्रश्न येत नाही असे विभागीय अधिकाऱ्यांनी अवगत केले.

किती घनफुटांपर्यंत वाळू काढली जाते हे देखील सर्वांना माहिती आहे. परंतु याला स्पेशल बेनिफिट का मिळाला ? यामध्ये शासनाने स्पष्ट निर्देश दिलेले होते. संबधिताने वाळू काढली किंवा न काढली तो रिस्क फॅक्टर त्याचा आहे. वाळू एका तिरावर व विभागाचे तहसीलदार दुसऱ्या तिरावरील रस्ता दाखवत आहेत, हे पटत आहे का ? Does the Secretary agree with this logically? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणामध्ये शासनाने सशर्त परवानगी दिली होती. शासनाला ग्राउंड रिॲलिटी माहिती नाही. असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागीय अधिकारी सांगत आहेत की, वाळू एका तिरावर आहे व दुसऱ्या तिरावर रस्ता असल्याचे तहसीलदारांनी सांगितले आहे. कोणतेही तहसिलदार असे सांगतील काय ? वाळूचे ठेकेदार हे वर्षानुवर्षे तेच काम करीत असतात. कोणत्या ठिकाणावरुन कुठे वाळू आणता येते किंवा नाही हे त्यांना समजते. छोटासा ठेका घेण्यापूर्वी देखील लोक १० वेळा विचार करतात. मग संबधिताने ही बाब पाहिली नसेल का ? जो माणूस २२ लाख रुपये भरतो तो असेच भरतो का? यामध्ये रिपोर्टींग चुकीचे होत असल्याचे वाटत आहे. दिनांक १३.०९.२०१२ रोजी याबाबत आदेश देण्यात आले. त्यामध्ये रस्त्याची अट टाकण्यात आली. त्यानंतर दिनांक ०१.१२.२०१२ रोजी तहसीलदार, शिरोळ यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र पाठविलेले आहे. या पत्राच्या शेवटच्या ओळीमध्ये नमूद केले आहे की, "तथापि लिलाव धारकास गट नंबर १४४ च्या नदी पात्रातील दक्षिण बाजूस वाळू वाहतूक करण्यास दिलेल्या परवानगीनुसार दक्षिण बाजूकडून वाळू वाहतूक करण्यास कोणतीच अडचण नव्हती. त्यामुळे सदर ठिकाणावरुन वाळू वाहतूक करणे शक्य होते. " ही माहिती तहसिलदार यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेली आहे. असे असतानाही विभागाने संबधिताला पैसे परत केले आहेत. आताच अधिकाऱ्यांनी ग्राउंड रिॲलिटींबाबत सांगितले. ही ग्राउंड रिॲलिटी तर तहसिलदार यांनाच माहिती आहे. जिल्हाधिकारी किंवा शासनाला ती माहिती नाही. तहसिलदारांनी रिॲलिटी सांगितली तेथेच हा विषय संपतो. यामध्ये दोन वेगवेगळे तहसिलदार आहेत. टेंडर झाले त्यावेळचे तहसिलदार वेगळे होते. शासनाच्या आदेशानंतर जो अहवाल आला त्यामध्ये रस्ता उपलब्ध आहे. पैसे रिफंड करण्याबाबत दिनांक १३.०९.२०१२ रोजीचे शासन आदेश आहेत. हे टेंडर जुने आहे. टेंडर झाल्यानंतर संबंधिताने दोन-तीन वर्षानंतर पैसे परत मागितले आहेत. टेंडर झाले त्यावेळचे व पैसे मागितले त्यावेळचे तहसिलदार वेगळे होते. त्यामुळे नंतरच्या तहसीलदारांनी ज्यावेळी पाहणी केली त्यावेळी कदाचित परिस्थिती बदललेली असेल. संबंधित व्यक्ती त्याच्या ओळखीचा नाही की किंवा असेल. सन २०१०-११ मध्ये लिलाव झाला. सन २०१२ मध्ये ठेकेदाराने सांगितले की, त्या ठिकाणी रस्ता नसल्यामुळे त्यांना पैसे परत करण्यात यावेत. ऑक्टोबर, २०१२ मध्ये निर्णय आला की, रस्ता नसेल तर पैसे जमा करावेत. त्या ठिकाणी रस्ता उपलब्ध असल्याबाबत तहसीलदारांनी सांगितले. असे असताना पैसे परत करण्याची गरज नव्हती, हेच महालेखापरीक्षकांच्या सर्व फाईल्सवरुन दिसत आहे. यादृष्टीने कारवाई प्रस्तावित केल्याबाबत विभागाने उत्तर दिले. शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही असे झाल्यामुळे संबधित अधिकाऱ्यांकडून पैसे देखील वसूल करावेत अशी समितीची भूमिका राहणार आहे. याबाबत शासनाच्या आदेशाप्रमाणे वस्तुस्थिती पाहून जिल्हाधिकारी यांनी निर्णय घेणे

आवश्यक होते. तहसीलदार यांनी रस्ता उपलब्ध असल्याचे सांगितले होते. असे असतानाही पैसे परत करण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणी शासनाच्या आदेशांची व्यवस्थित अंमलंबजावणी झाली नाही. शासनाने ज्या अटी व शर्तींच्या अधीन राहून रिफंड मंजूर केला होता त्यांची पूर्तता होण्याची खात्री न करता व त्या विरोधात रिपोर्ट असताना हा रिफंड मंजूर करण्यात आलेला आहे. सकृतदर्शनी ही बाब गंभीर असल्यामुळे याबाबत पूर्ण शहानिशा करुन जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचे निर्देश विभागाने विभागीय आयुक्त, पुणे यांना दिले आहेत. रिकव्हरीचा विषय देखील शिस्तभंगाच्या कारवाईशी निगडीतच आहे. शासनाचे झालेले नुकसान हा देखील शिस्तभंगाच्या कारवाईमधील आरोपाचा मुद्दा असेल. ज्यावेळेस शिस्तभंगाची कारवाई होईल त्यानुषंगाने वसुली होईल. कारण यामध्ये शिस्तभंगाच्या कारवाईमध्ये शासनाचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येईल असा खुलासा विभागीय अधिकाऱ्यांनी केला.

या प्रकरणामधील ज्यांच्यावर जबाबदारी निर्धारित करण्यात आलेली आहे, त्यांच्याकडून वसुली करण्यात यावी असे समितीने सुचित केले असता, हा दोषारोपाचाच भाग असेल असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

सिल्लोडमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाईदेखील आहे. तेथील नगरपालिकेने एक पत्र दिले की, ज्या ठिकाणी रेतीचे उत्खनन होणार आहे त्याठिकाणी रेतीचे उत्खनन केल्यामुळे पिण्याच्या पाण्यावर परिणाम होत असल्याने नगरपालिकेने सांगितले की, रेती उत्खनन बद करण्यात येणार आहे. रेती उत्खनन करणाऱ्या कंत्राटदाराने यासाठीचे डिपॉझिट नगरपालिकेकडे जमा केलेले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये कंत्राटदाराने काय करावयाचे ? अशी विचारणा समितीने केली असता, अशा परिस्थितीमध्ये काही अडचणी असतील तर जिल्हाधिकाऱ्यांकडे संबधित कंत्राटदाराने फिर्याद नोंदविली पाहिजे. यासाठी जिल्हास्तरीय समिती असते. सदर समिती ही त्या गावांना भेट देत असते. त्या समितीने भेट दिल्यानंतर अशा प्रकरणांची संपूर्ण शहानिशा करण्यात येते. जर त्या समितीला असे वाटले की, याठिकाणी उत्खनन करणे शक्य होणार नाही, त्यावेळेस समिती जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल देते. सदर अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्तांमार्फत तो अहवाल शासनाला सादर करतात. यावर शासन अंतिम निर्णय घेत असते अशी माहिती विभागीय अधिकाऱ्यांनी दिली.

आतापर्यंत अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी त्या कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. त्या कंत्राटदाराने त्यांच्याकडे नोंद केलेली आहे. समितीच्या माहितीप्रमाणे यासाठीचे टेंडर ४० लाख रुपयांचे असावे. त्यामुळे त्या कंत्राटदाराला आता रेती उपसण्यावर बदी घालण्यात आलेली आहे. सदर कंत्राटदार पुढील पैसे भरत नाही. त्यामुळे त्या कंत्राटदाराने काय करावयास पाहिजे ? या समितीच्या प्रश्नांबाबत, जर त्याने पुढील पैसे भरले नसतील, जो पर्यंत तो कंत्राटदार संपूर्ण पैसे भरत नाही, तो पर्यंत त्या कंत्राटदारास रेती उत्खननाचा कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही असे विभागीय अधिकाऱ्यांनी अवगत केले.

त्या कंत्राटदाराने जिल्हाधिकाऱ्यांकडे यासंदर्भात अर्ज देखील केलेला आहे. मराठवाडयामध्ये दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे आणि आणेवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी असल्यामुळे रेती उत्खननास विरोध केला. परंतु त्या कंत्राटदाराचे असे म्हणणे आहे की, त्याने भरलेल्या पैशांचे काय करणार ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, जर त्या कंत्राटदाराने एक चतुर्थांश पैसे भरले असतील आणि उर्वरित पैसे भरले नसतील तर त्या कंत्राटदाराने भरलेली जी रक्कम असेल ती जप्त होण्याची शक्यता आहे असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

ऑनलाईन टेंडर भरल्यामुळे तो कंत्राटदार तांबा देण्याची मागणी करीत आहे. याबाबत अंतिम निर्णय काय होईल ? अशी विचारणा समितीने केली असता, ज्यावेळेस तो संपूर्ण रक्कम जमा करेल तेव्हा तांबा देण्यात येतो असे विभागीय अधिकाऱ्यांनी अवगत केले.

ज्या ठिकाणी दुष्काळी परिस्थिती असते त्याठिकाणी रेती उत्खनन करता येत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, मुलतः यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये यासाठी जी समिती असते त्या समितीने त्या ठिकाणी भेट दिल्यानंतर, जर समजा त्या कंत्राटदाराने आठ लाख रुपये भरलेले असतील आणि त्याला आणखी पैसे नंतर भरावयाचे असतील परंतु तेथील अधिकाऱ्यांना जर माहिती असेल की, त्या कंत्राटदाराने पैसे भरल्यानंतर देखील रेती उत्खनन करणे शक्य होणार नाही, त्यामुळे त्या कंत्राटदाराने आणखी पैसे भरुन अडचणीत येऊ नये. तसेच त्या कंत्राटदाराने एक चतुर्थांश रक्कम भरलेली आहे. उर्वरित रक्कम भरलेली नाही. त्यामुळे सर्वप्रथम त्याने उर्वरित रक्कम न भरल्यामुळे त्यांची भरलेली रक्कम शासनाच्या धोरणानुसार जप्त होऊ शकते. जर त्याने एक चतुर्थांश रक्कम भरलेली असेल तर उर्वरित रक्कम पंधरा दिवसांच्या आत भरणे आवश्यक असते असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

याबाबतचा ठराव नगरपालिकेने तयार करुन तो जिल्हाधिकारी यांच्याकडे दिलेला आहे असे समितीने अवगत केले असता, अशा परिस्थितीमध्ये त्या कंत्राटदारानाने एक चतुर्थांश रक्कम परत मिळण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करावा. सदरचा अहवाल जिल्हाधिकारी यांनी शासनाला सादर करावा. त्यानंतर विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

There is no fault on the part of the Contractor. नगरपालिका जर त्या कंत्राटदाराला रेती उत्खनन करु देत नसेल आणि त्याचे भरलेले पैसेदेखील जप्त होत असतील तर यावर गंभीरतेने विचार करावा. अशा परिस्थितीमध्ये जिल्हाधिकारी कंत्राट रद्द का करीत नाहीत ? अशा परिस्थितीमध्ये जर काम करता येत नसेल तर, ते काम शासन रद्द करु शकते असे मत समितीने व्यक्त केले असता, जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबतचा परिपूर्ण अहवाल सादर केल्यानंतर शासन याबाबत योग्य तो निर्णय घेईल असा खुलासा विभागीय अधिकाऱ्यांनी केला.

अभिप्राय व शिफारशी :

४.१५ ७.२.४ " स्वामित्वधनाची कमी आकारणी "

अभिप्राय :

कार्यकारी अभियंता, माजलगांव कालवे विभाग क्र.१० परभणी ने तहसीलदार, परभणीला एप्रिल २०१० ते जुलै २०१० दरम्यान मातीकामाच्या उत्खनन आणि भरणा करण्याकरीता स्वामित्वधन जुन्या दराने प्रदान केले. त्यामुळे रू. ६२ लाख स्वामित्वधनाचे कमी प्रदान झाले.

शिवाय जिल्हा खनिकर्म अधिकारी, रायगड येथील दोन प्रकरणात अस्थायी परवाने निर्गमित केले होते. (फेब्रुवारी, २००९) आणि १,००० ब्रास गौण खनिजांवर स्वामित्वधन जुन्या दराने प्रदान करण्यात आले, ज्याचा परिणाम स्वामित्वधनाच्या रु. १ लाख कमी आकारण्यात आला.

४.१६ शिफारशी :

सदरहू परिच्छेदान्वये परभणी व रायगड या जिल्ह्यात गौण खनिजावर जुन्या दराने स्वामित्वधनाची आकारणी केल्यांबद्दल आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. समितीच्या साक्षीदरम्यान परभणी जिल्ह्यातील रु.६२ लाखाची वसुली दि.१०.१.२०१८ रोजी तसेच रायगड जिल्ह्यातील रु.१ लाख इतकी वसुली दि.२७.९.२०१७ रोजी करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. महालेखाकारांनी सदरहू आक्षेप सन २०१२-१३ या वर्षाकरिता नोंदविलेले असतानाही विभागाने या परिच्छेदामधील आक्षेप गांभीर्याने घेतले नाहीत व गत ३ ते ४ वर्षात ही वसुली देखील केली नाही. केवळ समितीने यासंदर्भात साक्ष घेण्याचे निश्चित केल्यानंतर ही वसुली विभागाने केली आहे. ही देखील अतिशय गंभीर बाब असून मुळात स्वामित्वधनाची आकारणी व वसुली हे शासनाच्या महसूल वाढीचे अनेक स्त्रोतापैकी एक महत्वाचे स्त्रोत असून व शासनाला प्राप्त होणाऱ्या महसूलांबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी कायम सतर्क व सजग असणे आवश्यक असताना त्यात अनियमितता वा निष्काळजीपणा यामुळे या महसूलाची आकारणी कमी व सदोष करण्यात येते. केवळ त्यावर महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतरही विभाग अशी प्रकरणे गांभीर्याने घेत नाही व केवळ समितीची साक्ष लागल्यानंतर ही वसुली विभागाकडून केली जाते ही बाब निश्चितच समर्थनीय नसून याकडे राज्यात अस्तित्वात असलेल्या महसुली यंत्रणेचे दुर्लक्ष अथवा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच महालेखाकारांनी नमुन्यादाखल तपासणी केलेल्या काही जिल्ह्यांपुरते हे आक्षेप मर्यादित आहेत. परंतु राज्यात अन्य जिल्ह्यांमध्ये देखील हीच कार्यपध्दती अस्तित्वात असण्याची पुर्ण शक्यता आहे. अतः विभागाने अन्य जिल्ह्यातील स्वामित्वधनाच्या आकारणींबाबत विस्तृत छाननी करावी व त्यात तफावत आढळल्यास वसुली देखील करावी व या स्वामित्वधनाची आकारणी सदोषरित्या करण्यास जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व या सर्व केलेल्या कारवाईंबाबत समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावे व भविष्यात अशाप्रकारचे आक्षेप टाळावेत अशी समितीची शिफारस आहे.

४.१७ ७.२.५ " विभागांमध्ये समन्वयनाचा अभाव "

अभिप्राय :

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या यंत्र शाखेने दिलेल्या माहिती प्रमाणे, विविध प्रकल्पांचे मातीकाम, पाटबंधारे विकास महामंडळाच्या पाच पाटबंधारे विभागांतर्गत सन २००७ ते २०१२ या कालावधीत केले गेले, ज्यासाठी रू. १२७.१४ कोटी स्वामित्वधन प्रदानायोग्य होते. यंत्र शाखेने नागरी विभागास पाठविलेल्या नावे (डेबिट) नोट मध्ये प्रकल्पाचे मातीकाम निष्पादित केल्यावर स्वामित्वधनाचे प्रदान करण्याचे दर्शविले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविले.

सदरहू आक्षेपांबाबत विभागाने समितीसमोर सांगितले की, हे कालव्यातील डिसील्टींग म्हणजेच कालवा स्वच्छ करणे व त्यातील गाळ काढण्याचे काम असून हे नवीन काम नसून कालव्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम असल्यामुळे यावर स्वामित्वधनाची आकारणी होऊ शकत नाही. कालव्यातील गाळ काढल्यानंतर त्याचा कोठेही अन्यत्र वापर करण्यात येत नसल्यामुळे यावर स्वामित्वधनाची आकारणी करता येणार नाही असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारशी :

४.१८ जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) नुसार कालव्यातील गाळ काढणे हे देखभाल दुरुस्तीचे काम असल्यामुळे याबाबत स्वामित्वधन भरण्याची आवश्यकता नाही. जुन्या कालव्याची देखभाल दुरुस्ती असेल तसेच त्यातून माती अथवा गाळ काढण्याचे काम असेल जे नियमित स्वरुपाचे देखभाल दुरुस्तीचे काम असून त्या गाळाचा वापर अन्यत्र कोठेही करण्यात येत नाही अशावेळी जमीन महसूल संहितेन्वये यासाठी स्वामित्वधन आकारण्याची आवश्यकता नाही असे समितीचे देखील मत आहे. असे असताना महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविण्याचा आधार काय? अशी विचारणा समितीने महालेखाकारांना केली असता, महालेखाकारांनी त्यांचे नस्तीमधील मुख्य अभियंता, नाशिक यांचे पत्र समितीच्या निदर्शनास आणले ज्यात " The project work also include silt removing form project where quarry material not required" असे नमूद असल्यामुळे या आधारावर महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदवून स्वामित्वधनाची वसुली करण्याचे आवश्यक असल्याचे आक्षेप नोंदविले आहेत. सदरहु पत्राचे अवलोकन केले असता, विभागाचेच जर असे म्हणणे आहे तर विभागाच्या अधिकाऱ्यांच्या व येथे साक्षीसाठी उपस्थित असणाऱ्या विभागीय प्रतिनिधींच्या भूमिकेमध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे या पत्राच्याआधारे महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप योग्य आहेत. यावर स्पष्टता करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने सांगितले. यावर विभागीय प्रतिनिधींनी हे कालव्याचे देखभाल व दुरुस्तीचे काम असून त्यावर स्वामित्वधनाची आकारणी होत नाही असे समितीसमोर पुन्हा स्पष्ट केले. विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मांडलेली ही भूमिका समिती ग्राह्य धरीत असून शासनस्तरावर कालव्याच्या डिसील्टींगबाबत स्वामित्वधनाची आकारणी करावी किंवा कसे ? याबाबत अधिक स्पष्टता येण्याच्यादृष्टीने विभागाने यासंदर्भात सुधारीत परिपत्रक काढावे अशी समितीची शिफारस आहे.

४.१९ ७.२.६ " चुकीच्या वर्गीकरणामुळे स्वामित्वधनाची चुकीची आकारणी "

अभिप्राय :

जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांच्या अभिलेखांच्या छाननीत असे उघडकीस आले की वेस्टर्न कोलफिल्डस लिमिटेड (WCL) जवळ उघड्या (ओपनकास्ट) तशाच भूमिगत कोळसा खाणी होत्या आणि उघड्या खाणीमध्ये ओव्हर बर्डन चे अवाढव्य परिमाण निर्माण होत होते. ओव्हरबर्डन साहित्याचे परिमाण, भूमिगत कोळसा खाणी मध्ये स्टोईंगसाठी वाळूकरिता लागू असणाऱ्या रु. ३ प्रति मेट्रिक टन स्वामित्वधनाचे प्रदान करून एका खाणी मधून दुसऱ्या खाणीमध्ये तात्पुरता परवाना प्राप्त करून, परिवहन करून स्टोईंग हेतू करीता वापरल्या जात होते. या ओव्हर बर्डनला वाळू असे म्हणता येणे शक्य नाही आणि खाणी आणि खनिजे (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९५७ च्या दुसऱ्या अनुसूचीत त्याचे वर्गीकरण केलेले नाही. परिवहन केलेल्या आणि स्टोईंग करता वापरलेल्या या साहित्याच्या परिमाणावरील स्वामित्वधनाच्या प्रदानाचे नियमन गौण खनिजे उत्खनन (विदर्भ क्षेत्र) नियम, १९६६ प्रमाणे होते आणि त्याकरीता दि. ११ फेब्रुवारी, २०१० पासून स्वामित्वधनाचा दर माती/मुरूम/बोल्डर यांना लागू असणारा रू. २०० प्रति ब्रास हा आहे. तथापि, जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी या स्टोईंगकरता वापरलेल्या साहित्यावर रु. १३.९२ प्रति ब्रास या दराने स्वामित्वधन आकारले याचा परिणाम स्वामित्वधनाच्या रु. १.११ कोटी कमी आकारणीत झाला.

४.२० शिफारशी :

या परिच्छेदातील आक्षेपित सर्व वसुली मे.वेस्टर्न कोल फिल्डस यांचेकडून वसूल केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. महालेखाकारांनी सदरहू आक्षेप सन २०१२-१३ या वर्षाकरिता नोंदविलेले असतानाही विभागाने या परिच्छेदामधील आक्षेप गांभीर्याने घेतले नाहीत व गत ३ ते ४ वर्षात ही वसुली देखील केली नव्हती. केवळ समितीने यासंदर्भात साक्ष घेण्याचे ठरविल्यानंतर ही वसुली विभागाने केली आहे. ही देखील अतिशय गंभीर बाब असून मुळात या सर्व बाबींवर व शासनाला प्राप्त होणाऱ्या महसूलांबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सजग असणे आवश्यक असताना याकडे विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झालेले आहे. त्यातही यासंदर्भात महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतरही विभाग अशी प्रकरणे गांभीर्याने हाताळत कारवाई करीत नाही व समितीची साक्ष लागल्यानंतर ही वसुली जर विभाग करीत असेल तर ही बाब निश्चितच समर्थनीय नसून यासाठी राज्यात अस्तित्वात असलेल्या महसूली यंत्रणेचे दुर्लक्ष अथवा गैरव्यवहार कारणीभूत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. अतः या स्वामित्वधनाची आकारणी सदोषरित्या करण्यास जे अधिकारी जंबांबदार आहेत त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईबाबत समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावे व भविष्यात अशाप्रकारचे आक्षेप टाळावेत अशी समितीची शिफारस आहे.

४.२१ ७.२.७ " स्वामित्वधनावरील व्याज "

अभिप्राय :

खनिज नियमावलीनुसार प्रमुख खनिजांवर स्वामित्वधन प्रत्येक वर्षी मार्च, जून, ऑक्टोबर व डिसेंबरला संपणाऱ्या प्रत्येक तिमाही करता आगाऊ देय आहे. प्रत्येक तिमाहीकरिता स्वामित्वधनाच्या आगाऊ अधिदानाची रक्कम जिल्हा खनिकर्म अधिकारी (DMO) यांचेकडून मागील तीनही तिमाहीतील प्रत्येक खाणीच्या क्षमतेच्या आधारावर ठरविल्या जाते आणि अशी निश्चित केलेली आगाऊ अधिदानाची रक्कम नंतर त्या तिमाहीत उत्पादित झालेल्या खनिजांच्या/धातुकाच्या परिमाणात समायोजित करण्यात येते. प्रमुख खनिजांच्याबाबतीत खनिजांच्या देय रकमेच्या विलंबाने प्रदानाकरिता प्रतिवर्ष २४ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविले आहेत.

समितीने सदरहु विषयावर साक्ष घेतेवेळी उक्त आक्षेप जरी महसूल विभागांतर्गत नोंदविलेले असले तरी प्रमुख खनिजे हा विषय उद्योग विभागाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे या परिच्छेदासंदर्भातील साक्ष उद्योग विभागाच्या सचिवांसमवेत घेण्यात आली. मे.वेस्टर्न कोल फिल्डस (WCL) यांचेकडून स्वामित्वधनाची रक्कम विलंबाने भरल्यामुळे आकारण्यात आलेल्या दंडनीय व्याजाची रु.२८.१० कोटीची वसुली विभागाने केली काय? अशी विचारणा समितीने केली असता, मे.वेस्टर्न कोल फिल्डसला आतापर्यंत ३ ते ४ वेळा यासंबधी पत्रव्यवहार करुनही ही रक्कम जमा न करण्यात आल्यामुळे आता महसुली थकबाकीची नोटीस काढण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले. याबाबतच्या सद्य:स्थितीची माहिती समितीने विचारली असता, मे.वेस्टर्न कोल फिल्डस सोबत वाटाघाटी करण्यात येत असून (WCL) ही व्याजाची गणना व आकारणी मान्य नाही त्यामुळे या कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन त्यानंतरच कार्यवाही करण्याचेही विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले.

४.२२ शिफारशी :

शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दि. १ ऑक्टोबर, १९९० च्या परिपत्रकानुसार स्वामित्वधनापोटी करावयाचा भरणा विलंबाने केल्यास त्यावर दंडात्मक व्याजाची आकारणी करण्याची तरतूद असल्यामुळे महालेखाकांरानी मे.वेस्टर्न कोल फिल्डस, चंद्रपूर (WCL) यांचेवर रु.२८.१० कोटीची वसुली निश्चित केली. परंतु WCL ने ही वसुली अमान्य करुन मा.उच्च न्यायालय, खंडपीठ गोहाटी यांच्या निर्णयाचा संदर्भ देऊन तसेच खनिज सवलत नियम १९६० चे नियम ६४(अ) अन्वये कोळसा निर्गमन पासून ३० दिवसांच्या आत ही स्वामित्वधनाची रक्कम भरलेली असल्यामुळे या दंडनीय व्याजाची रक्कम त्यांनी मान्य केली नाही. यासंदर्भात बराच पत्रव्यवहार झाला असून आता ही वसुली जमीन महसूल थकबाकी म्हणून करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना विभागाने दिलेल्या आहेत असे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः सन १९९० चे परिपत्रक व खनिज सवलत नियम यातील तरतुदी एकमेकांशी सुसंगत नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. एकीकडे हे नियम उत्खनन केल्यानंतर ६० दिवसात अग्रिम भरण्याची मुभा देणे व दुसरीकडे परिपत्रकानुसार ही रक्कम प्रत्येक तिमाहीकरिता आगाऊ देय ठरवितो व त्यास विलंब झाल्यास दंडात्मक व्याज आकारतो. वास्तविकतः प्रत्येक खाणीच्या क्षमतेच्या आधारावर ही आगाऊ रक्कम घेण्यात येते व ती नंतर तिमाहित उत्पादीत झालेल्या खनिजांच्या/धातुकाच्या परिमाणात समायोजित करण्यात येते व विलंब झाल्यास त्यावर दंडनीय व्याज आकारण्याची तरतूद असल्यामुळेच महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविले आहे. WCL हा केंद्र शासनाचाच उपक्रम असून त्यांचेविरुध्द ही वसुली जमीन महसूल थकबाकी म्हणून नोटीस काढणे आणि राज्य व केंद्र शासनाच्यास्तरावर हा थकबाकी वसुलीचा अंतिम पर्याय अवलंबिणे नक्कीच समर्थनीय नाही असे समितीला वाटते. अतः हा प्रश्न विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या कंपनीशी चर्चा करुन सोडविण्याचा प्रयत्न करुन सामोपचाराने यातून मार्ग काढावा व दोघांचीही कायदेशीर बाजू ऐकून निर्णय घ्यावा. तसेच या सर्व परिपत्रक, नियम, न्यायालयाचे निर्णय या सर्व बाबींची तपासणी करावी. याबाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात यावा व या प्रकरणाचा निर्णय घेऊन घेतलेल्या निर्णयानुसार जर WCL कडून ही रक्कम वसूल करणे क्रमःप्राप्त ठरत असेल तर ती वसुली निश्चित करण्यात यावी. तसेच या सर्व विहित तरतुदीमध्ये सुसंगतपणा आणण्याच्यादृष्टीने आवश्यक असल्यास सुधारीत आदेश काढण्यात यावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

४.२३ ७.२.८ " शास्ती न आकारणे "

अभिप्राय :

तहसील परभणी येथे जिल्हाधिकारी यांच्या गौण खनिजांचे उत्खननाकरीताच्या आदेशाशिवाय स्वामित्वधन परस्पर चलनाने कोषागारात प्रदान केले. या पध्दतीचा अवलंब करून, १२८ प्रकरणांमध्ये सन २००८ ते २०१२ या कालावधीत रु. १३.९९ लाख वसूल केले गेले. खनिजांच्या उत्खननाकरीता उचित आदेश/परवाना निर्गमित केला नसल्याने रु. ४१.९७ लाख शास्ती सर्व प्रकरणांमध्ये आकारणीय होती.

सदरहु आक्षेप हे अतिशय गंभीर असून परभणी येथे १०० ब्रासपर्यंतचे खनिज उत्खननाचे अधिकार तहसीलदार यांना होते, परंतु १०० ब्रासवरील उत्खननाचे अधिकार उपविभागीय अधिकारी यांना असतानाही त्यांचे आदेश न घेता १०० ब्रासपेक्षा अधिक खनिजाचे उत्खनन करण्याचे तोंडी आदेश तहसीलदार यांनी दिले व त्यासाठी देय असलेली रक्कम संबधित ठेकेदाराकडून घेतली. परंतु लेखी आदेश निर्गमित करण्यात आले नाहीत. या बाबी गंभीर असून यातील ३ तहसीलदारांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांचेकडून खुलासा मागविण्यात आलेला असून खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे समितीस सांगण्यात आले.

शिफारशी :

४.२४ सदरहू आक्षेप हे अतिशय गंभीर स्वरूपाचे असून तहसीलदार यांना १०० ब्रासच्या वरचे गौण खनिजाच्या उत्खननाचे अधिकार नसताना त्यांनी मौखिक आदेश देऊन हे उत्खनन करण्यास परवानगी दिली. तसेच यासाठीच्या स्वामित्वधनाची आकारणी करून ही रक्कम कोणत्याही आदेशाविना परस्पर चलनाने कोषागारात भरली. त्यामुळे खनिजाच्या उत्खननासाठी उचित आदेश परवाना नसल्याने रु.४१.९७ लाख एवढी शास्ती या सर्व प्रकरणांमध्ये आकारणीय होती. यासाठी संबधित ३ तहसिलदारांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांचेकडून खुलासा प्राप्त झाल्यावर नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले. या प्रकरणी मौखिक आदेश देवून खनिजाचे उत्खनन झालेले असल्यामुळे या प्रकरणांना कार्योत्तर मंजूरी देऊन आदेश पारित करणे आवश्यक असून त्या आदेशामध्ये जी रक्कम अधोरेखित होईल त्यानुसार ती वसूल करावी लागेल असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित महालेखाकारांनी सन २०१३ मध्ये हे आक्षेप नोंदविल्यानंतर विभागाने या प्रकरणी कोणतीही कारवाई केली नाही तसेच या आक्षेपांची साधी दखलही घेतली नाही व आता समितीने याबाबत साक्ष लावल्यानंतर यास कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक असल्याचे समितीसमोर सांगण्यात येत आहे. ही बाब अतिशय गंभीर व आक्षेपार्ह असून विभागाच्या एकंदरीत कामकाज व नियंत्रणावर प्रश्नचिन्ह उभे करणारी आहे. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. विनापरवानगी हे उत्खनन झालेले असल्यामुळे ते बेकायदेशीर असल्याचे समजण्यात येऊन त्यावर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे व शास्तीची रु.४१.९७ लाख इतकी वसुली होणे आवश्यक असल्याचे महालेखाकारांनी समितीसमोर सांगितले असता, यास जर रीतसर परवानगी दिली तर दंडात्मक कारवाईचा प्रश्न उद्‌भवणार नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. तसेच त्या ठेकेदाराने खनिज उत्खननाचे पैसे विभागाकडे रितसर भरलेले असून त्यांचेवर दंडात्मक कारवाई करणे योग्य नसून हा आता केवळ विभागाचा अंतर्गत मान्यतेचा प्रश्न आहे असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. त्यामुळे याला आता अंतर्गतरित्या नियमानुकूल करणे आवश्यक राहील असे समितीसमोर सांगण्यात आले. या कार्यपध्दतीवर समितीन तीव्र नाराजी व नापसंती व्यक्त करीत आहे व विभागाने या प्रकरणी कार्योत्तर मान्यतेबाबत नियमानुसार योग्य तो निर्णय घ्यावा परंतु ज्या अधिकाऱ्यांनी हे उल्लंघन केलेले आहे त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

४.२५ ७.२.९ " वाळू घाटांच्या लिलावाकरीता ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेचा परतावा " :

अभिप्राय :

महसूल व वन विभागाने एका कंत्राटदाराला सन २०१०-११ या वर्षाकरिता मौजे राजापूर तहसील शिरोल येथील वाळू घाटाच्या बाबतीत, तिथे वाळूच्या परिवहनाची शक्यता नाही या अटीच्या पुर्ततेच्या अधीन राहून रु.२२.९४ लाखाचा परतावा दिला (सप्टेंबर,२०१२) तहसीलदार, शिरोळ यांनी कळविले (डिसेंबर, २०१२) की गट क्र. १४४ च्या दक्षिणेकडील बाजूकडून वाळूचे परिवहन करण्यात कोणताही अडथळा नव्हता, यास्तव कंत्राटदाराला देण्यात आलेला रु.२२.९४ लाखाचा परतावा अनियमित होता.

महसूल व वन विभागाने एका कंत्राटदाराला, मौजे कोठाळी, तहसील शिरोल येथील वाळू घाटाच्या बाबतीत, सन २०११-१२ या वर्षाकरिता रु.११.७५ लाखाचा परतावा दिला. हा परतावा कंत्राटदाराच्या शाखा अभियंता, वडगाव पाटबंधारे विभाग यांच्या दोणाली के.टी.बधाऱ्यातून अत्याधिक पाणी सोडल्याच्या खरांबीमुळे पर्यायी वाळू घाट देण्याच्या विनंतीवरून देण्यात आला. परंतु १५१ पैकी ७७ वाळू घाटांचा लिलाव सन २०११-१२ मध्ये करण्यात आला व उर्वरीत ७४ घाट लिलावावाचून राहिले कंत्राटदाराला पर्यायी वाळू घाट देणे शक्य होते. तथापि, शासनाने परताव्याकरिता मंजूरी दिली. याप्रकारे, रु.३४.६९ लाखाचा परतावा वाळू घाट धोरणाच्या अटींचे उल्लंघन करून देण्यात आला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारशी :

४.२६ महालेखाकारांचे सदरहू आक्षेप हे अतिशय गंभीर असून वाळूच्या परिवहनाची शक्यता नाही या अटीच्या पूर्ततेच्या अधिन राहून कंत्राटदाराला परतावा करणे आवश्यक असतानाही त्या ठिकाणी रस्ता आहे किंवा कसे याची कोणतीही शहानिशा न करता हा परतावा करण्यात आला. सदरहू रु.२२.९४ लाखांचा परतावा अनियमितरित्या कंत्राटदारास करण्यामागील कारणे काय? अशी समितीने

विचारणा केली असता, कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यामधून वाहणाऱ्या कृष्णा नदीच्या अलिकडील काठावर महाराष्ट्रातील २ गांवे असून पलिकडे कर्नाटक राज्यातील काही गावे आहेत. सदरच्या वाळूच्या वाहतूकीमुळे गावातील रस्ते खरांब होतात. तसेच याच घाटातून पिण्याचे पाणी ग्रामस्थ वापरत असून व तेथे पाणी शुध्दीकरणाची यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे रेती काढल्यामुळे हे पाणी गढूळ होते. त्यामुळे हे उत्खनन करण्यास कंत्राटदाराला विरोध करण्यात आला. लोकांच्या विरोधामुळे वाळूचे उत्खनन कंत्राटदाराला करता आले नाही. त्यामुळे कंत्राटदाराने हा परतावा मागितला व शासनाने तो मंजूर केला. यावर समितीने आक्षेप नोंदवित ज्यावेळी रेती घाटाचा लिलाव होतो त्यानंतर तेथून वाळू उपसाची पूर्ण जबाबदारी व त्यातील उत्खनन न झाल्यास होणाऱ्या तोट्याचा धोका हा संबधित कंत्राटदाराने पत्करणे क्रमप्राप्त असताना तसेच परताव्यासाठी केवळ रस्त्याची उपलब्धता नसेल तरच परतावा देण्याची अट असताना या अन्य स्थानिक कारणांसाठी असा परतावा देणे नक्कीच नियमंबाह्य आहे. एवढेच नव्हेतर १ तहसिलदार त्या ठिकाणी रस्ता नव्हता असे नमूद करतो, तर तीनच महिन्यांनी नवीन येणारे तहसिलदार लिलावधारकास गट क्र.१४४ च्या नदीपात्रातील दक्षिण बाजूस वाळू वाहतूक करण्यास दिलेल्या परवानगीनुसार दक्षिण बाजूकडून वाळू वाहतूक करण्यास कोणतीही अडचण नसून त्याठिकाणावरुन वाळू वाहतूक करणे शक्य असल्याचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना देतो. अतः या प्रकरणी शासनाच्या आदेशांची व्यवस्थित व नियमानुसार अंमलंबजावणी झाली नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. शासनाने ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून परतावा मंजूर केला होता त्याची पूर्तता होण्याची खात्री न करताच किंबहुना त्याविरोधात तहसिलदाराचा अहवाल असताना हा परतावा मंजूर करण्यात आलेला आहे. सकृतदर्शनी ही बाब गंभीर असल्यामुळे याबाबत पूर्ण शहानिशा करुन जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचे निर्देश विभागीय आयुक्त, पुणे यांना नुकतेच कळविण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. अतः या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, दिलेला परतावा लिलावधारकाकडून वसुल करण्यात यावा व तो लिलावधारकाकडून वसूल न झाल्यास संबधित दोषी अधिकाऱ्यांकडून त्याची वसुली करण्यात यावी. तसेच या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

४.२७ (२) महसूल विभागाने मौजे कोठाळी, तहसील शिरोळ येथील वाळू घाटाच्या बाबतीत दिलेल्या रु.११.७५ लाखाच्या परताव्यासंर्दभातदेखील पुर्ण चौकशी व शहानिशा करुन योग्य तो निर्णय शासनस्तरावरून घेण्यात यावा व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

गृह (परिवहन) विभाग

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ५.३ " अधिनियम व नियम यांच्या तरतूदीचे पालन न करणे " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.—

५.२ परिच्छेद क्र. ५.१ प्रस्तावना :

५.३ परिच्छेद क्र. ५.१.१ कर प्रशासन :

मोटार वाहने विभागांतर्गत करांची व इतर जमांची अकारणी व संकलन यांचे, केंद्रीय मोटार वाहन अधिनियम, १९८८ मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ आणि मुंबई मोटार वाहने उतारुंचे परिवहन अधिनियम, १९५८ व त्या अंतर्गत केलेले नियम याव्दारे नियमन केले जाते. शासनाच्या गृह विभागाच्या प्रधान सचिवांच्या (परिवहन) सर्वकष नियंत्रणाखाली परिवहन आयुक्त व त्यांना सहाय्य करणारे अतिरिक्त आयुक्त, सह आयुक्त व उपायुक्त आणि प्रादेशिक परिवहन व उप परिवहन अधिकारी यांच्याकडून या अधिनियम व नियमांची अंमलबजावणी होते. मोटार वाहन जमा यांत प्रामुख्याने मोटार वाहनांवरील कर व माल व उतारू यांवरील कर यांचा समावेश होतो.

परिच्छेद क्र. ५.१.२ जमा रकमांचा कल

२००८-०९ ते २०१२-१३ या वर्षातील मोटार वाहन कर इत्यादीव्दारे प्राप्त झालेल्या प्रत्यक्ष जमा व याच कालावधीतील राज्याची एकूण कर जमा खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

वर्ष	अर्थसंकल्पीय अंदाज	प्रत्यक्ष जमा	तफावत अधिक्य (+) तुट (-)	तफावतीची टक्केवारी	राज्याची एकूण कर जमा	एकूण कर जमेच्या तुलनेत प्रत्यक्ष जमेची टक्केवारी
२००८-०९	२,४२६.१८	२,२२०.२२	(-)२०५.९६	(-)८.४९	५२,०२९.९४	४.२७
२००९-१०	२,६००	२,६८२.३०	(+)८२.३०	(+)३.१७	५९,१०६.३३	४.५४
२०१०-११	२,८६०	३,५३२.९०	(+)६७२.९०	(+)२३.५३	७५,०२७.०९	४.७०
२०११-१२	४,०००	४,१३७.४२	(+)१३७.४२	(+)३.४४	८७,६०८.४६	४.७२
२०१२-१३	४,२००	५,०२७.४२	(+)८२७.४२	(+)१९.७०	१,०३,४४८.५२	४.८६

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००८-०९ शी तुलना करता, २०१२-१३ मध्ये मोटार वाहनांतर्गत महसूल वसुली १२६.४४ टक्क्यांनी वाढली. ही वाढ प्रामुख्याने राज्य मोटार वाहन कराधान अधिनियमांतर्गत झालेल्या प्राप्तीमुळे होती.

५.४ परिच्छेद क्र. ५.१.३ वसुलीचा खर्च :

२०१०-११ आणि २०१२-१३ या वर्षात मोटार वाहन कराची एकूण वसूली, वसुलीवर केलेला खर्च आणि एकूण वसुलीशी अशा खर्चाची टक्केवारी व ह्या आधीच्या वर्षाच्या एकूण वसुलीची, वसुलीच्या खर्चाशी असलेली अखिल भारतीय सरासरी टक्केवारी ही खालील तक्त्यात दिलेली आहे :---

रु.कोटीत

वर्ष	एकूण वसुली	वसूलीवरील खर्च	एकूण वसुलीशी खर्चाची टक्केवारी	संबधित मागील वर्षाची अखिल भारतीय सरासरी टक्केवारी
२०११-११	३,५३२.९०	९०.६२	२.५६	३.०७
२०११-१२	४,१३७.४२	९२.२२	२.२८	३.७१
२०१२-१३	५,०२७.४२	१०५.७६	२.१३	२.९६

वरील तक्त्यावरुन असे दिसून आले की, वर्ष २०१०-११ ते २०१२-१३ या वर्षाकरिता मोटार वाहनांवरील कर वसुलीवरील सर्वकष खर्च हा संबधित मागील वर्षाच्या अखिल भारतीय सरासरीपेक्षा कमी आहे.

५.५ परिच्छेद क्र. ५.१.४ लेखापरीक्षा अहवालाचा प्रभाव :

महसुलावरील प्रभाव :

मागील पाच वर्षात, म्हणजे २००७-०८ ते २०११-१२ आम्ही रुपये ११.०५ कोटी महसूली प्रभाव असलेल्या ६,१५३ प्रकरणांत न्यून निर्धारण, महसुलाची हानी, आकारणी/वसुली न होणे/कमी होणे व इतर अनियमितता निदर्शनास आणल्या. विभागाने रु.८.९५ कोटीचा अंतर्भाव असलेल्या ५,५२९ प्रकरणांतील लेखापरीक्षा अभिक्षणे मान्य करुन १,३२५ प्रकरणात रु.१.८० कोटी वसूल केले. तपशील खालील तक्यात दिला आहे.

रू. कोटीत

वर्ष	आक्षेपित रक्कम		मान्य रक्कम		वसुल रक्कम	
	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम	प्रकरणांची संख्या	रक्कम
२००७-०८	६३३	०.९१	६३३	०.९१	२००	०.१६
२००८-०९	१.०८०	१.४७	१.०८०	१.४७	३३५	०.३३
२००९-१०	३,१९६	४.५	२,७०३	४.१५	३२९	०.६७
२०१०-११	७६५	३.२५	६३५	१.६१	२३१	०.३०
२०११-१२	४७९	०.९२	४७८	०.८१	२३०	०.३४
एकूण	६,१५३	११.०५	५,५२९	८.९५	१,३२५	१.८०

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, वसुलीचे प्रमाण कमी होते कारण मान्य केलेल्या प्रकरणांत केलेली वसुली ही २० टक्केच होती.

मान्य केलेल्या प्रकरणांत अंतर्भूत असलेली रक्कम प्राधान्याने वसुली करण्यास विभागास सूचना देण्याचा शासनाने विचार करावा.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :----

सदर परिच्छेदात दर्शविलेल्या एकूण ५,५२९ प्रकरणांतील रु.८,९५ कोटी एवढ्या रक्कमेपैकी दिनांक २२.०१.२०१५ पर्यंत ४,२७८ प्रकरणांत रु.५.४७/- कोटी इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून, उर्वरित १२५१ प्रकरणातील रु.३,४८ कोटी इतक्या रक्कमेची वसूली तातडीने करणेबाबत सर्व संबधित प्रापका/उपप्रापका कार्यालयास कळविण्यात आले आहे. (कार्यालयानिहाय व वसुलीचा तपशिल-विवरण **क्र. ८.**)

५.६ परिच्छेद क्र. ५.१.५ लेखापरिक्षणाचे परिणाम :

२०१२-१३ या वर्षात केलेल्या मोटार वाहनांवरील करांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीच्या आधारे, आम्ही खाली दर्शविल्याप्रमाणे, २,९०९ प्रकरणांतील रु.४५.२३ कोटींच्या महसुलांची न्यून निर्धारण, न/कमी आकारणी/वसुली न करणे इ.व अशीच प्रकरणे नमूद केली आहेत.

रु.कोटीत

अ.क्र.	प्रवर्ग	प्रकरणांची संख्या	रक्कम
१	चुकीचे दर लावल्यामुळे कराची आकारणी कमी/न करणे	२.११४	४१.६२
२	चुकीची सूट/वर्गीकरण यांमुळे कराची कमी आकारणी	६७	०.७१
३	ज्यादा परतावा/किरकोळ	७२८	२.९०
	एकूण	२,९०९	४५.२३

वर्ष २०१२-१३ मधील तसेच त्या पूर्वीच्या वर्षातील स्थानिक लेखापरीक्षा अहवालांतील आमच्या अभिरक्षणांच्या प्रतिक्रियेदाखल संबधित विभागाने न्यून निर्धारण, कमी आकारणी इ.मान्य करुन ७३० प्रकरणांत रु.१.०१ कोटी वसुल केले, ज्यापैकी रु.१४.५३ लाखाचा अंतर्भाव असलेली ११४ प्रकरणे वर्ष २०१२-१३ या वर्षात व उर्वरित पूर्वीच्या वर्षात निदर्शनास आणली होती.

२.७२ कोटीचा अंतर्भाव असलेली काही लेखापरीक्षा अभिक्षणे पुढील परिच्छेदांत समाविष्ट केली आहेत.

५.७ परिच्छेद क्र. ५.२ लेखापरिक्षा अभिरक्षणे

प्रादेशिक परिवहन कार्यालये (RTOs) उपप्रादेशिक परिवहन कार्यालये (Dy, RTOs) यांच्या अभिलेख्याच्या छाननीत, या प्रकरणाच्या पुढील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ च्या तरतुदींचे पालन न करण्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली. ही प्रकरणे उदाहरणादाखल दिली असून ती लेखापरीक्षणात केलेल्या चाचणी तपासणीवर आधारलेली आहेत. अश्या त्रुटी लेखापरीक्षणात दरवर्षी निदर्शनास आणल्या जातात. परंतु अनियमितता सातत्याने राहतातच व लेखापरिक्षण होईपर्यंत त्या लक्षात येत नाहीत. शासनाने अंतर्गत नियंत्रण व्यवस्था सुधारणे आवश्यक आहे जेणेकरुन अशा प्रकरणाची पुनरावृत्ती टाळणे शक्य होईल.

५.८ परिच्छेद क्र. ५.३ अधिनियम/नियम यांच्या तरतुदींचे पालन न करणे :

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ मध्ये मोटार वाहनांवरील करांची आकारणी व वसुली यांकरिता तरतूद केलेली आहे. वाहन नोंदणी अधिकाऱ्यांनी अधिनियम, इत्यादी मध्ये विहीत केलेल्या तरतुदींचे व वाहनांची नोंद ठेवण्याच्या विहीत पद्धतीचे पालन ज्या प्रकरणात केले नव्हते. अशी प्रकरणे पुढील ५.३.१ ते ५.३.५ या परिच्छेदात नमूद केली आहेत.

५.९ परिच्छेद क्र. ५.३.१ मोटार वाहन कराची (MVT) वसुली न करणे :

आठ RTOs व १५ उप RTOs :

BMV, १९५८ चे कलम ४ व त्याअंतर्गत केलेल्या नियमांच्या अन्वये, राज्यातील, वापरात असलेल्या व वापरासाठी ठेवलेल्या सर्व वाहनांवर, त्यांच्या नोंदणीकृत भारीत वजन (Registered laden weight-RL W) किंवा आसन क्षमतेनुसार विहीत दराने कर देय असतो. वाहन मालकांकडून करावयाची वसुली, मागणी आदेशांचे निर्गमन इत्यादींचा तपशील रोख शिल्लक आढावा नोंदवही (CBRR) मध्ये ठेवला जातो.

डिसेंबर, २००८ ते डिसेंबर, २०१२ दरम्यान उपरोक्त कार्यालयातील केलेल्या CBRR च्या चाचणी तपासणीत, आमच्या असे निदर्शनास आले की, ९,०३३ परिवहन वाहनमालकाकडून, फेब्रुवारी, २००६ ते फेब्रुवारी, २०१३ दरम्यान तीन ते ३३ महिन्यांच्या कालावधीकरिता परिवहन मालिकेतील वाहनांच्या बाबतीत रु.१.७२ कोटीचा मोटार वाहन कर वसूल केला गेला नव्हता. विभागाने, जुलै, २०१३ मध्ये कारवाई करुन एका कार्यालयातील दोषींची यादी भरारी पथकास दिली तर इतर कार्यालयांनी असे सांगितले की, (जुलै, २०१३), या प्रकरणांचा पाठपुरावा संबधित मोटार वाहन विभागाच्या निरीक्षकांकडून केली जात आहे. परिणामी रु.१.७२ कोटीचा मोटार वाहन कर जमा झाला नव्हता. तसेच, विहीत दराने व्याजदेखील आकारणीय होते. या बाबी आम्ही निदर्शनास आणून दिल्यावर, विभागाने अभिक्षणे मान्य केली आणि २७९ वाहनमालकांकडून जानेवारी, २००९ ते एप्रिल, २०१३ दरम्यान रु.३४.६७ लाखाची रक्कम वसुल केल्याचे कळविले उर्वरित रक्कमेच्या वसुलीचा अहवाल प्रतिक्षीत आहे.

वरील बाब आम्ही मे आणि जून, २०१३ मध्ये शासनास कळविली, त्यांचे उत्तर प्रतिक्षीत आहे. (जानेवारी, २०१४)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर परिच्छेदात दर्शविलेल्या एकूण १०३ प्रकरणांतील रु.१,७१,९५,५१३ एवढ्या रक्कमेपैकी दिनांक ८.६.२०१५ पर्यंत ४८५ प्रकरणांत रु.६९,६१,२५५ इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून, उर्वरित ५४८ प्रकरणातील रु.१,०२,३४,२८५ इतक्या रक्कमेची वसुली तातडीने करणेबाबत सर्व संबधित प्रापका/उपप्रापकांस कळविण्यात आले आहे. **(**कार्यालयनिहाय वसुलीचा तपशिल **विवरण क्र. ९.)**

५.१० परिच्छेद क्र. ५३.२ आयात वाहनावरील एकरकमी कराची (OTT) कमी आकारणी :

प्रादेशिक परिवहन कार्यालय कोल्हापूर, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बारामती, पुणे :

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ मध्ये तरतुदीनुसार, भारतात आयात करुन राज्यात वापरावयाच्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार गाड्यांवर आकारावयाच्या OTT चे दर हे देशी वाहनांसाठी लागू होणाऱ्या दराच्या दुप्पट आहेत.

प्रपत्र २० व संगणीकृत अर्ज प्रणाली " वाहन " (वाहनांची नोंदणी करण्याचे सॉफ्टवेअर), यामधील उपलब्ध माहितीच्या आधारे, जानेवारी, २०१२ आणि एप्रिल, २०१२ दरम्यान केलेल्या चाचणी तपासणीत आमच्या निदर्शनास आले की, २०१०-२०११ ते २०११-२०१२ या वर्षात परिवहनेतर प्रवर्गातर्गंत नोंदणी केलेली सहा वाहने ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाने (ARAI) आयात वाहने म्हणून घोषित केली होती. परंतु, या सहा वाहनांच्या मालकांनी, आयात वाहनांना लागू होणाऱ्या दराने एक रकमी कर भरला. यामुळे रु.१६.४८ लाखाचा एकरकमी कर कमी वसूल केला गेला.तसेच विहीत दराने व्याज देखील आकारणीय होते.

ही बाब आम्ही फेब्रुवारी, २०१२ व मे, २०१२ मध्ये विभागाच्या निदर्शनास आणून दिली. याबाबतीतील पुढील प्रगतीचा अहवाल प्रतिक्षीत आहे.

ही बाब आम्ही शासनास मे, २०१३ मध्ये कळविली. त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे. (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

दिनांक २२.१.२०१५ रोजीची सद्यःस्थिती.

एकूण आक्षेपित ०६ प्रकरणांतील रु.१६,४७,६३४ इतक्या रक्कमेची वसूली तातडीने करणेबाबत प्रापका/उपप्रापकांस कळविण्यात आले आहे. **(कार्यालयनिहाय वसुलीचा तपशिल-विवरण क्र. १०.)**

५.११ परिच्छेद क्र. ५.३.३ महसुलाचा भरणा करण्यातील विलंबामुळे व्याजाची हानी :

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ८(१) नुसार, महाराष्ट्र राज्याच्या महसुलापोटी शासकीय कार्यालयांनी जमा केलेला किंवा त्यांना मिळालेला सर्व पैसा कोणताही अवाजवी विलंब न करता व कोणत्याही परिस्थितीत पैसे मिळाल्यापासून दोन दिवसांत पूर्णपणे कोषागारात किंवा बँकेत भरून कोषागाराच्या लेख्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्गमित केलेल्या सूचनांनुसार (फेब्रुवारी, २००६) शासकीय महसूल जमा करण्यास प्राधिकृत केलेल्या बँकांनी हा गोळा केलेला महसूल तो मिळाल्यापासून तीन दिवसांत शासकीय लेख्यात जमा करणे आवश्यक आहे. तसेच न केल्यास बँकेच्या दरापेक्षा दोन टक्के अधिक दराने (सहा टक्के) वार्षिक व्याज आकारले जाते. RBI ने जारी केलेल्या " अनुदेश ज्ञापन " लेखा आणि ताळमेळ-राज्य शासनाचे व्यवहार यातील परिच्छेद ५.११(ब) नुसार, विलंबाने भरणा केलेल्या रक्कमेवर दंडात्मक व्याजाची मागणी करण्याची जबाबदारी अधिदान व लेखा कार्यालय, कोषागारे यांची आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षातील महसुली जमांच्या अहवालावर भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या अहवालातील परिच्छेद ५.३.३ मध्ये शासकीय लेख्यात शासकीय महसूल विलंबाने भरणा करण्यावर भाष्य केले होते. ही अनियमितता कायम राहूनही ह्यांबाबत कुठलीही कारवाई केली गेली नाही. (जानेवारी, २०१४), जे खाली चर्चिले आहे.

सप्टेंबर, २०१२ मध्ये RTO (अंधेरी), मुंबई यांच्या स्वीय प्रपंजी लेखे (PLA) व रोकड पुस्तिका यांची वर्ष २०११-१२ च्या ताळमेळ विवरणपत्रांबरोंबर केलेल्या छाननी दरम्यान आमच्या निदर्शनास आले की, १३७ प्रकरणात स्टेट बँक ऑफ इंडियाकडून मोटार वाहन कराप्रित्यर्थ रु.८९.०३ कोटीचा महसूल भरणा करण्यात, दोन ते २१ दिवसांचा विलंब झाला होता. RBI च्या सूचनांनुसार, कसूरदार बँकेकडून अशा विलंबाकरिता विहित दराने व्याज वसूल करावयाचे होते.

वर्ष २०११-१२ साठी बँकेकडून आठ टक्के दराने रु.१५.९६ लाख वसूलीयोग्य व्याजाचे गणना झाले होते. कसूरदार बँकेकडून या रकमेच्या आकारणी व वसुलीसाठी विभागाने कोणतीही कार्यवाही केली नव्हती. परिणामी रु.१५.९६ लाखाच्या व्याजाची वसुली झाली नाही.

आम्ही ही बाब ऑक्टोबर, २०१२ मध्ये विभागाच्या निदर्शनास आणून दिली. त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे.

आम्ही ही बाब मे, २०१३ मध्ये आम्ही शासनास कळविली, त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे. (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर परिच्छेदात दर्शविलेल्या एकूण १३७ प्रकरणांतील रु.१५,५९,६६६ एवढ्या रक्कमेपैकी ८ प्रकरणांत रु.९३,७५७ इतकी रक्कम दिनांक २२,०१,२०१५ पर्यंत वसूल करण्यात आली असून, उर्वरित १२९ प्रकरणांतील रु.१५,०९,९०९ इतक्या रक्कमेची वसूली तातडीने करणेबाबत सर्व संबधित प्रापका/उपप्रापकांस कळविण्यात आले आहे. (कार्यालयनिहाय वसुलीचा तपशिल **विवरण क्र. १०)**

५.१२ परिच्छेद क्र. ५.३.४ न वटलेल्या धनादेशांच्या प्रकरणात मोटार वाहन कराची न झालेली वसुली

RTOs अंधेरी (पश्चिम), वाशी (नवी मुंबई) आणि ठाणे, उप. RTO कल्याण

BMV अधिनियम, १९५८ च्या कलम ३ सह कलम ४ मधील तरतूदींनुसार शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या दराप्रमाणे कर आकारणी आणि कराची आगाऊ वसुली करून तो शासनाच्या खात्यात जमा करावा. पुढे, महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८, नियम १००(ब) च्या तरतुदींतर्गत

जर कुठल्याही कारणाने जमाकर्ता बँकेने धनादेश वटविला नाही तर विभागाने कसूरदारांकडून देय रक्कम व्याजासह रोख वसुल करावी आणि Negotaiable Instrument Act (Amended), १९८८ (NI Act) च्या कलम १३८ च्या तरतुदींतर्गत कारवाईस सुरूवात करावी. म्हणजे दोन वर्षापर्यंत कारावास आणि/किंवा धनादेशाच्या रक्कमेच्या दुप्पट रक्कमेइतका दंड वसुल करावा.

नाव्हेंबर, २०१० ते ऑक्टोबर, २०१२ दरम्यान उपरोक्त चार कार्यालयांच्या धनादेश/न वटलेल्या धनादेशांच्या नोंदवहीच्या तपासणी दरम्यान असे आढळून आले की, २००९-१० ते २०११-१२ दरम्यान १४८ प्रकरणात वाहन मालकांनी मोटार वाहन करासाठी जारी केलेले रु.५३.२९ लाखाचे धनादेश संबधीत बँकानी वटविले नाहीत. ह्या रक्कमांची व्याजासह रोखीने वसुली करावयाची होती. विभागाने कसुरदारांकडून ह्या रक्कमा वसुल करण्यासाठी कुठलीही कारवाई केली नाही किंवा परक्राम्य लेख अधिनियमाखाली (NI अधिनियम) कुठल्याही कार्यवाहीला सुरूवात केली नाही. परिणामी, रु.५३.२९ लाख महसूल आणि त्यावरील व्याजाची वसुली झाली नाही.

अभिरक्षणे मान्य करुन आठ प्रकरणांमध्ये जानेवारी, २०११ ते एप्रिल, २०१३ दरम्यान रु.२.०८ लाखाची वसुली केल्याचे आम्ही ही बाब मे, २०१३ मध्ये शासनास कळविली, त्यांचे उत्तर प्रतिक्षीत आहे. (जानेवारी, २०१४)

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर परिच्छेदात दर्शविलेल्या न वटलेल्या धनादेशांच्या एकूण १४८ प्रकरणांतील रुपये ५३,२९,००७ इतक्या रक्कमेपैकी दिनांक २२/९/२०१५ पर्यंत ०९ प्रकरणांत रु.१०,१३,८८७ रक्कमेची वसुली करण्यात आली आहे. उर्वरित १३९ प्रकरणांतील रु.४३,१५,१२० रक्कमेची तात्काळ वसूली करणेबाबत संबधित प्रापका/उपप्रापकांस, कळविण्यात आले आहे. (कार्यालयनिहाय वसुलीचा तपशिल **विवरण क्र. १०)**

५.१३ परिच्छेद क्र. ५.३.५ शासकीय महसुलाचा दुर्विनियोग

RTO धुळे

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ९८(२) अनुसार (i) शासनाच्या वतीने रक्कम प्राप्त करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याने प्रपत्र ४ मध्ये एक रोकड पुस्तिका ठेवावयास हवी आणि (ii) प्रत्येक आर्थिक व्यवहार घडल्यानंतर त्वरीत त्याची नोंद रोकड पुस्तिकेत घ्यावयास हवी तसेच ही तपासणी केल्याचे निश्चित करण्यासाठी कार्यालय प्रमुखाने ती स्वाक्षांकित करावी.

अनु क्र.	मोटार वाहन क्रमांक	पावती क्र.	दिनांक	रक्कम (रु.)
१	MH१८W ५५२०	५,७०,३८८	२५/३/२०११	४६,२७९
२	MH१८W ५९३३	५,०४,८५६	१२/५/२०११	८४,०२७
३	MH१८W ६१८१	५,५९,२१६	१४/७/२०११	२९,५१०
			एकूण	१,५९,८१६

पुढे फेब्रुवारी, २०१२ मध्ये केलेल्या तपासणीत असे आढळून आले की, प्रपत्र २० मधील आवेदनांबरोंबर जोडलेल्या संगणकीय पावत्या प्रत्यक्षात रद्द केल्या होत्या आणि तेच पावत्यांचे क्रमांक हाती तयार केलेल्या पावत्यांसाठी पुन्हा वापरले होते ज्याची रोकड पुस्तिकेत नोंद घेतली नव्हती.

विभागाच्या हे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने अभिरक्षण मान्य केले. (फेब्रुवारी, २०१३) आणि रु.१,५९,८१६ इतक्या पूर्ण रक्कमेची वसुली केली. तसेच विभागाकडून संबंधित रोखपालावर कारवाईची सुरूवात करण्यात आली होती. विभागाने पुढे असेही कळविले आहे की, लेखापरिक्षण अभिरक्षणाच्या पार्श्वभूमीवर जानेवारी, २००९ ते मार्च, २०११ दरम्यानच्या सगळ्या हाती केलेल्या नोंदीची पडताळणी करण्यात आली आणि त्यामध्ये रु.१२.५६ लाख रक्कमेच्या १९ अधिक प्रकरणांचा शोध लागला आणि त्याची वसूली केली गेली.

आम्ही हे प्रकरण शासनाला ऑगस्ट, २०१३ मध्ये कळविले, त्यांचे उत्तर प्रतिक्षीत आहे (जानेवारी, २०१४).

शासनाने अशा रद्द केलेल्या संगणकीय पावत्यांचा पुनर्वापर प्रतिबधीत करण्यासाठी सुयोग्य कार्यतंत्र विकसित करावे आणि महाराष्ट्र राज्यातील सगळ्या RTO कार्यालयांमध्ये अशा प्रकारच्या चाचण्यांचा वापर करावा जेणेकरून अशा प्रकारच्या गैरव्यवहार आणि अपहारांच्या प्रकरणांचा शोध घेऊन त्यास प्रतिबंध करता येईल.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सुविधा नाही. त्यामध्ये बदल करून कराधान प्राधिकाऱ्यामार्फत पावती रद्द करण्याची तरतूद प्रणालीमध्ये करण्याकरिता एन.आय.सी., पुणे यांना विनंती करण्यात आली आहे. रद्द होणाऱ्या पावत्यांचे तसेच हस्तलिखित पावत्यांचे दुय्यम रोजकिर्द दररोज तयार करण्याच्या दृष्टीने एन.आय.सी., पुणे यांना सुचित करण्यात आले आहे.

वाहन प्रणालीमध्ये रद्द केलेल्या पावत्यांचा पुनर्वापर टाळण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक बदल सुचविण्यात आले आहेत.

(४) प्रापका, धुळे येथील महसूल हानींबाबत जा.क्र. १६०७०, दिनांक २४.११.२०१४ पत्र पाठविण्यात आले आहे. सदर अहवाल अप्राप्त आहे.

वरील विषयासंदर्भातील सद्यःस्थिती.

१. वाहन प्रणालीतील सॉफ्टवेअर अद्ययावत करण्याबाबत.

अ. रद्द केलेल्या पावत्यांचे प्रमाणीकरण कराधान प्राधिकाऱ्यामार्फत करणे.

ब. रद्द होणाऱ्या पावत्यांचे तसेच हस्तलिखित पावत्यांचे दुय्यम रोजकिर्द दररोज वाहन प्रणालीवर तयार करणे याबाबत **NIC,** पुणे यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

२. **NIC** मार्फत नविन वाहन प्रणाली लवकरच उपलब्ध करुन देण्यात येत असून ती सद्यःस्थिती Test Mode मध्ये आहे. वरील दोन्ही विषयांबाबत नवीन वाहन प्रणालीमध्ये काळजी घेण्यात आलेली आहे.

(कार्यालयानिहाय वसुलीचा तपशिल-**विवरण क्र. १०**)

साक्ष :

५.१४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ८ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिव तसेच इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, एकुण १०३३ प्रकरणांतील १ कोटी ७१ लाख ९५ हजार ५१३ रुपयांपैकी आतापर्यंत १ कोटी १ लाख ६६ हजार ७४६ रुपये एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. उर्वरित २९९ प्रकरणांतील ७० लाख २८ हजार रुपये एवढया रकमेची वसुली चालू आहे. एकूण १००३ प्रकरणांपैकी ७३४ प्रकरणांची वसुली केलेली आहे.

महाराष्ट्रात एकूण आर.टी.ओ. ऑफिस किती आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, आर.टी.ओ. ऑफिस १५ आहेत आणि डेप्युटी आर.टी.ओ. ऑफिस मिळून एकूण ५० आहेत.

मग ही १०३३ प्रकरणे कोणत्या आर.टी.ओ. आणि डेप्युटी आर.टी.ओ. च्या कार्यालयात आहेत यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ५० आरटीओ कार्यालयापैकी ८ कार्यालयांतील प्रकरणे आहेत.

महालेखाकारांनी हा आक्षेप काढला तो ८ (आरटीओ) आणि १५ डेप्युटी आरटीओ यांच्या संबधित आहे. ही बाब सन २०१२-१३ ची महालेखाकारांनी जेव्हा लक्षात आणून दिली त्यानंतर विभागाने बाकीच्या आर.टी.ओ.ची माहिती घेतली होती काय ? जर घेतली असेल तर अशा प्रकारची किती प्रकरणे विभागाच्या लक्षात आली आणि त्यांनी त्यावर काय कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये असा विषय होता की, जेवढया जड वाहनांची नोंदणी करण्यात येतात त्यात कर वसूल करण्यात येतो. नोंदणीकृत भारीत वजना (आर.एल.डब्लू) वर आधारीत असतो. त्यामध्ये स्लॅब असतो. काही मॉडेल्समध्ये गैरसमज असल्यामुळे स्लॅब चुकला होता. वाहन आल्यानंतर या सर्व प्रक्रिया मॅन्युएल व्हायच्या पण सन २०१६-१७ पासून मॅन्युएल पद्धत गेलेली आहे आणि डीस्क्रीशन नाही. आता त्या सिस्टिममध्ये इम्प्रुव्हमेंट झालेली आहे.

ही सर्व प्रकरण सन २००८-१२ दरम्यानच्या कालावधीतील आहेत.तसन २००८-०९ ची सर्व प्रकरणे महालेखाकारांनी सन २०१२ मध्ये लक्षात आणून दिली. ती केवळ ८ आर.टी.ओ. कार्यालयाची आहेत. In this only 8 R.T.Os have been audited by the A.G. These are sample cases. बाकीच्या आर.टी.ओ.कार्यालयाची तपासणी विभागाने स्वतःच्या ऑडिट टीमकडून करून घेतली आहे काय ? तपास केला असेल तर किती प्रकरणे आढळली व त्यावर काय कारवाई केली आणि कारवाई केली नसेल तर ती का नाही केली ? हा पहिला मुद्दा आहे आणि दुसरा मुद्दा असा आहे की, १०३३ प्रकरणाच्या मान्य केलेल्या प्रकरणांपैकी १ कोटी १ लाख रुपये वसूल केलेले आहेत आणि बाकीचे ७० लाख रुपये वसूल न होण्याचे काय कारण आहे ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाचे अंतर्गत लेखापरीक्षण असते.

५.१५ विभागाकडे अंतर्गत लेखापरीक्षणाची पद्धत असतानासुद्धा सन २०१२-१३ पर्यंत या वसुलीसंदर्भात विभागाच्या लक्षात आले नाही. याचा अर्थ असा आहे की, हे अंतर्गत लेखापरीक्षण विभागाच्या सोयीप्रमाणे आहे. सन २००८-०९ ची प्रकरणे सन २०१२-१३ मध्ये लक्षात आणून दिली मग बाकीच्या आर.टी.ओ.च्या संदर्भात विभागाने चौकशी केली काय, अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, याचे नियमित तपासणी (रेग्यूलर इन्स्पेक्शन) केले आहे पण यासंदर्भातला निश्चित आकडा समितीला काढून देण्यात येईल.

याचा अर्थ ही चौकशी विभागाने केलीच नाही. जर ही चौकशी विभागाने केली असती तर अशी प्रकरणे अजून किती आर.टी.ओ. ऑफिसमध्ये झाली हे सर्व समोर आले असते. विभागाने अंतर्गत लेखापरीक्षण हे काही कामाचे नाही कारण जर अंतर्गत लेखापरीक्षण योग्यरित्या झाले असते तर सन २०१३ पर्यंत हे प्रकरण महालेखाकारांना विभागास लक्षात आणून देण्याची आवश्यकता नव्हती. परिवहन विभाग केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठी आहे. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले व या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, सन २०१६-१७ पर्यंत महाराष्ट्रातील सर्व आर.टी.ओ.च्या कार्यालयातील व्यवहार किती दिवसात तपासून पाहणार आणि त्याचा अहवाल समितीला किती दिवसात सादर करण्यात येईल? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, जेव्हा जेव्हा अंतर्गत लेखापरीक्षण होते तेव्हा अशी प्रकरणे आढळून येतात. असे काही चुकलेले प्रश्न अंतर्गत लेखापरीक्षणमध्ये आढळून आल्यानंतर ते वसूल करून घेण्यात येतात. अंतर्गत लेखापरिक्षणामध्ये निश्चित किती आकडा सापडला याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

महालेखाकारांनी आक्षेप घेतलेल्या आरटीओ कार्यालयाव्यतिरिक्त अजून किती आरटीओ कार्यालयात असा व्यवहार झाला आहे याची तपासणी विभागाने केली आहे का ? असा प्रश्न समिती वारंवार विचारीत आहे. पण विभागाकडून या प्रश्नाचे योग्य उत्तर प्राप्त होत नाही. याचाच अर्थ विभागीय सचिव हे समितीने विचारणा केलेल्या बगल देत आहे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

सन २००८ पासून सन २०१६-१७ पर्यंत विभागाच्या अंतर्गत लेखापरीक्षणाशिवाय हे लेखापरीक्षण महालेखाकारांनी काढले. विभागाचे सर्व चोपडे तपासण्याचे काम महालेखाकारांचे नाही. अंतर्गत लेखापरीक्षणाने दिलेल्या अहवालाशिवाय सर्वांशी शहानिशा करून १०३३ प्रकरणे केवळ ८ आर.टी.ओ.मध्ये निघाले तर आर.टी.ओ.आणि डेप्युटी आर.टी.ओ.ची मिळून ५० कार्यालयामध्ये जेवढी प्रकरणे आहेत त्याची चौकशी करण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात यावे. यासाठी चार्टर अकाऊँटंटची प्रायव्हेट एजन्सी नेमण्यात यावी. कारण ८ आरटीओ कार्यालयातील

१०३३ प्रकरणांमध्ये १.७५ कोटी रुपयाचा फरक येतो तर इतर कार्यालयातील आणखी ५ ते १० कोटी रुपयांचा फरक मिळेल. त्यामुळे या कामासाठी जर खाजगी एजन्सीची नियुक्ती केली आणि त्यांना १ ते २ कोटी द्यावे लागले तरी हरकत नाही. कारण त्यामुळे सुध्दा शासनाला फायदा होणार आहे. विभागाकडून खाजगी एजन्सीच्या माध्यमातून हे सर्व चोपडे तपासून ती प्रकरणे काढून किती दिवसात देणार आहात आणि त्याची वसूलीची काय व्यवस्था करणार आहात ? यावर विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले की, एक म्हणजे सन २००८-०९ पासून आतापर्यंत दरवर्षी अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये किती प्रकरणे आढळली आणि किती वसुली आहे आणि किती वसूली झाली आहे याचे आकडे सादर करण्यासाठी विभागाला ६ महिन्याचा वेळ द्यावा विभागाकडून याचा अहवाल सादर करण्यात येईल. तसेच ७० लाख रुपयांची वसूली २ महिन्यात करण्यात येईल.

तथापि, यासंदर्भातला अहवाल समितीस आगामी अधिवेशनात सादर करावयाचा असल्यामुळे सदर माहिती लवकरात लवकर समितीस सादर करावी असे निदेश समितीने दिले.

आता तर सर्व प्रक्रीया ऑनलाईन आहे तर मग वाहन खरेदी करताना वन टाईम पे करतात काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, कमर्शियलमध्ये वन टाईम नाही करत.

मग वाहनधारकास प्रत्येक वर्षी कर भरावा लागतो का ? प्रत्येक वर्षी ते पैसे भरण्यासाठी कसे येतात किंवा विभागाकडून संबधित वाहनधारकांला काय कॉल करण्यात येतो ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्येक वर्षी वाहन फिटनेससाठी येत असते.

Till the time this came to your knowledge, was the truck plying without paying any tax? Should it be assumed like this ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, the truck was plying by paying lower tax than the tax it should have paid. हा यामध्ये फरक आहे. हे काही पूर्ण १०० टक्के चुकवलेले नाही.

५.१६ The issue is not just regarding short recovery of tax but also regarding the procedure of issuing of annual permits. जेव्हा वाहन मालक परमीट घ्यायला येतात तेव्हा आरटीओ ऑफिसने कोणता रजिस्ट्रर व्हेइकल रेट बघितला होता आणि नंतर हा फरक कसा आढळला. या प्रकरणामध्ये विभागाने कारवाई केल्यानंतर भरारी पथकाला (फ्लाईंग स्कॉड) दोषीची यादी दिली होती काय ? यातील काही प्रकरणामध्ये महालेखाकार कार्यालयाने ॲक्शन घेतली आणि काही प्रकरणे प्रलंबित आहे. तर हा फरक का येतो आणि या प्रकरणानंतर नंतर विभागाकडून वाहनास देण्यात येणाऱ्या परमीटच्या प्रोसिजरमध्ये काही सुधारणा होणार आहेत काय ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, पूर्वी मॅन्युएल होते त्यामुळे तेव्हा डिस्क्रीशन असायचे. आता ऑनलाईन असल्यामुळे ते सर्व सिस्टिममध्ये फिड केलेले आहे म्हणून आता डिस्क्रीप्शन राहिलेले नाही. गाडीचे मॉडेल टाकल्यानंतर त्याचे भारीत वजन (लोडन वेट) कोणी बदलू शकत नाही. पूर्वी हे सर्व माणसे करायची तेव्हा ८ टनच्या आहे ते लोअर स्लॅबमध्ये करुन टाकण्यात यायचे.

आठ टनच्या नोंदणीकृत भारीत वजन (आर.एल.डब्ल्यू) केले तर त्यांना कसे तपासण्यात येते? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, हे सर्व रिझल्ट रेकॉर्डमधून दिसून येते.

आता सर्व नवीन सिस्टिम विभागाने केलेली आहे पण त्यावेळची चूक जर विभागाला नंतर आढळली तर ही सर्व माहिती विभागाला कशी प्राप्त झाली ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, या तपासणीत ओरिजनल मॅन्युफॅक्चरचे प्रमाणपत्र पाहिले की, इथे एक वेट असतो पण वसूली दुसऱ्या वेटप्रमाणे होते. हे सर्व क्रॉस रेकॉर्ड करुन काढले. तसेच हे अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये पण सापडते. अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये ते किती सापडले हे समितीला सादर करण्यात येईल असे देखील विभागीय सचिवांनी समितीस अश्वस्त केले.

समितीने पुढे विचारणा केली की, सर्व वाहनाचे अंतर्गत लेखापरीक्षण केलेले आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, all the offices have internal audit.

Whatever we have pointed out in the audit is based on cash balance review register, which maintains the issue of demand notices and original details of the vehicle owner. रोख शिल्लक आढावा रोखवही (सी.बी.आर.आर.) वरुनच हा फरक पॉईंट आऊट केलेला आहे. The issue is then why the RTOs are not able to find out the difference. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, Any one who will do १००% check will find it out.

The point is that when the vehicle owner comes for the permit the details are available with the department. असे महालेखाकारांनी नमूद केले असता, विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले.

जेव्हा मॅन्युएली फॉर्म भरायचे तेव्हा त्यावर वाहनाचे मॉडेल लिहून नंबर लिहायचे. पण तेव्हा विभागाचे अधिकारी आर.टी.ओ.च्या ऑफिसमधून बाहेर पडून ती वाहन बघायला जायचे नाही. बाहेर तिकडे दलाल असायचे. गाड्या वेटवर आल्यानंतर त्याचे वेट २४ टन असेल आणि त्याला १६ किंवा १७ टनाची स्लीप देणार आणि त्याचे सर्व क्लियर करुन वाहनधारकाकडून तेवढे पैसे घेणार. ही सर्व आजची स्थिती आहे.

आणि हे सर्व आरटीओ स्टाफला देखील माहित आहे. त्यांची लिंक कशी साबूत करायची, त्याचे कोडवर्ड काय आहेत याचा ही मार्ग आहेत. यामध्ये असे दिसून येते की, त्यावेळी जे आर.टी.ओ. होते त्यांनी डोळे झाकून जे लिहून दिलेले त्यालाच मान्यता दिली. अधिकाऱ्यांनी काहीही कागदपत्रे तपासली नाही. अंतर्गत लेखापरीक्षणा अंतर्गत विभागाने सर्व तपासण्या केल्या आणि त्यानंतर हे सर्व फरकाचे पैसे घेण्याचे काम विभागाकडून करण्यात येईल. आता तर नवीन सिस्टिम सुरु केली आहे. पण सन २००८-०९ पासून जी काही थकबाकी आहे त्याची वसूली काढली पण त्याची काहीही तपासणी केली नाही. ते सर्व गृहीत धरुन रिसिप्ट फाडून टाकली आणि तिथेच विषय संपला. जेव्हा हे लक्षात आले तेव्हा ते दुरुस्त केले आणि डिमांड केली. त्यामुळे या विषयावर कोणावर जबाबदारी निश्‍चित केली आहे काय किंवा ती करणे योग्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, ही सर्व वसूली केलेली आहे पण आणखी कोणावर काही कारवाई करण्यात आलेली नाही.

५.१७ वाहनाच्या नोंदणीकृत भारीत वजनावर किती पैसे भरायचे हे ठरलेले आहे. त्यावर अधिकाऱ्यांची सही आहे पण नंतर ते वाहन अतिभार (ओव्हर लोड) आहे हे सिध्द झाले त्याचा अर्थ असा झाला की ज्या अधिकाऱ्यांनी त्याची वहन क्षमता किती आहे यावर सही केली तर तोच यासाठी जबाबदार आहे. कारण अधिकारी ऑफिसमध्ये बसूनच कागदपत्रांवर सह्या करतात. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हा ओव्हरलोड संदर्भातील विषय आहे आणि जे आधुनिकीकरण झालेले आहे त्यामध्ये सेवा पुरवठादारामार्फत स्वतंत्रपणे वाहनांची तपासणी त्यांच्या कॉम्पूटराईज वे ब्रीजवर केली जाते तेव्हा त्याची नोंद कुठल्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय संगणकाद्वारे केली जाते. त्या नोंदीआधारे त्याचा दंड वसूल केला जातो. आधुनिकीकरण बॉर्डर चेकपोस्ट हे सन २०१३ रोजी सुरु झालेले आहे. त्यानंतर राज्याच्या महसूलात नेहमी वाढच झालेली आहे हे दिसून येते. कराच्या विषयामध्ये गाडीचा नोंदणीकृत भारीत वजन (आर.एल.डब्ल्यू) नोंद करताना वेगवेगळे मॉडेल्स असतात. प्रत्येक मॉडेलपैकी कोणाचा ६ टन लोड असतो तर काहींचा ५०० टन पर्यंत असतो. हे मॉडेलप्रमाणे डिफर होते. त्यावेळी नजरचुकीने कदाचित झाले असेल.

५.१८ पण ही १०३३ प्रकरणे फक्त ८ आर.टी.ओ. अंतर्गत आली आहेत. एवढी प्रकरणे कदाचित नजरचुकीने झाली आहेत काय ? असे समितीने नमूद केले असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यामध्ये वन टाईम टॅक्स वसूल केलेला आहे. कारण दोन प्रकारच्या गाड्या आहेत. ७.५ टनापर्यंत ज्या गाडया आहेत त्यांचा एक रकमी कर वसूल करण्यात येतो आणि ७.५ टनच्या वरच्या ज्या गाड्या आहेत त्यावर दर ३ महिन्यानंतर कर वसूल केला जातो आणि त्याचे लेखापरीक्षण नियमीतपणे होत असते. एक रकमी कराच्या संदर्भातील जे विषय आहेत त्या गाड्यांची फेरतपासणी करण्यात येत आहे. यामध्ये १५ आर.टी.ओ. पैकी ७ आर.टी.ओ. सन १९९५ पासूनच संगणकीकृत झालेले आहेत. त्यामध्ये जास्तीत जास्त ट्रान्सपोर्ट वाहने ७ आर.टी.ओ. मध्ये पुणे, कोल्हापूर किंवा ठाणे यापैकी जिथे संगणकीकरण झालेले आहे तिथे हा प्रश्न निर्माण होत नाही.

वाहनांच्या वहन क्षमतेप्रमाणे पैसे आकारण्याचे निश्‍चित करण्यात आले होते. वाहनाचे निरीक्षण केल्यानंतर अधिकाऱ्याने सही केली असणार. पण या १०३३ प्रकरणांमध्ये चूक आढळून आली आहे. आयशर वाहनांची, टाटा वाहनांची क्षमता किती असते हे वाहन बघितल्यानंतर लगेचच लक्षात येते. हे वाहन चालवित नसताना देखील वाहनांची वहन क्षमता किती आहे हे समजते. आरटीओकडे नियमित वाहने येत असतात. याचा अर्थ अधिकाऱ्यांनी वाहन न बघता सह्या केल्या आहेत हे विभागीय सचिव मान्य करणार का ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता, यात चूक झालेली आहे असे विभागीय सचिवांनी मान्य केले.

यात ज्यांनी चूक केली आहे त्यांच्यावर किती दिवसात कारवाई करण्यात येणार आहे ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाचे असे म्हणणे आहे की, यात बोनाफाईड चूक असू शकते. यात मालाफाईड चूक दिसत नाही.

प्रत्येक मॉडेलची क्षमता ही कंपनीच्या चार्टवर असते. तो चार्ट ठेवला तर त्या वाहनाची क्षमता लक्षात येते. ईडब्ल्यू १२१०, आयशर, आयशर ईएक्स, या वाहनांची किती क्षमता असते हे लिहिलेले असते. विभागाने फक्त आयशर ईएक्स आहे किंवा नाही एवढेच बघावयाचे आहे. टाटा, अशोक लेलँडचे अमूक एक वाहन आहे किंवा नाही एवढेच बघावयाचे आहे. ते पाहिल्यानंतर देखील सही करताना चूक केली असेल तर ती चूक जाणूनबुजून केली आहे हे स्पष्ट होते. विभागीय सचिवांनी नजरचुकीने झाले असेल असा उल्लेख केला. तसेच मालाफाईड चूक नसून बोनाफाईड चूक आहे अशा प्रकारचा उल्लेख देखील केला आहे. पण समितीचे एवढेच म्हणणे आहे की, सर्व रेकॉर्डवर असताना चूक कशी काय करण्यात आली आहे ? शेवटी कर वसुली झाली नाही तर त्याची जबाबदारी ही संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर निश्‍चित केली पाहिजे. तो पैसा त्यांच्याकडून वसूल केला पाहिजे किंवा त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. असे समितीने सुचित केले असता, विभागीय सचिवांनी समितीस अश्वस्त केले की, येत्या दोन महिन्याच्या आत रक्कम वसूल करण्यात येईल.

वसूल रक्कम ७० लाख रूपये ही फार मोठी रक्कम आहे. तेव्हा ही रक्कम वसूल केली पाहिजे. ती रक्कम वसूल केली नाही तर अधिकाऱ्यांमध्ये भीती निर्माण होणार नाही. तेव्हा ज्यांनी चूक केली आहे त्याच्याविरूद्ध दंडात्मक कारवाई केली पाहिजे. असे समितीने सुचित केले असता, विभागीय सचिवांनी समितीस अश्वस्त केले की, यात सिस्टीमॅटीकली चूक करण्यात आली आहे हे निदर्शनास आले तर संबंधितांविरूद्ध निश्‍चितच कारवाई करण्यात येईल. टेस्ट रिपोर्ट बघितले आहे. त्यात कन्फ्युजन दिसून येत आहे. पण एकाच व्यक्तीने सिस्टीमॅटीकली चूक केली असेल तर निश्‍चितच कारवाई करण्यात येईल. तसेच अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये किती प्रकरणे दिसून आली आहेत व त्यापैकी किती वसुली झाली आहे हे देखील विभागाकडून तपासण्यात येणार आहे. अशी अजून प्रकरणे निघाली तर त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात येईल.

५.१९ परिच्छेद क्र. ५.३.२ " आयात वाहनांवरील एक रकमी कराची (OTT) कमी आकारणी " :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले की, सदर परिच्छेद हा इम्पोर्टेड गाड्यांसंबधातील असून त्या एकूण ६ गाड्या आहेत. या ६ गाड्यांपैकी ५ गाड्या ह्या इंडियन मेक होत्या. त्यावर्षी बीएमडब्ल्यू X1 हे मॉडेल भारतात तयार झाले. त्यामुळे ड्युटीचा प्रश्न येत नाही. १ गाडी इंडियन कस्टम विभागाने सिझ केली होती. या गाडीचा लिलाव कस्टम विभागाने केला आहे. लिलावात जी बोली लागली त्यावर टॅक्स आकारला आहे. महालेखाकार यांचे म्हणणे आहे की, इम्पोर्टेड गाडी होती त्यामुळे वेगळा टॅक्स वसूल करावयास पाहिजे होता. सदर वाहन हे दीड वर्ष कस्टम विभागामध्ये उभी होते. त्यामुळे ते वाहन इम्पोर्टेड म्हणून ट्रीट करता येणार नाही. त्यामुळे विभागीय सचिवांनी समितीस विनंती केली की, हा परिच्छेद वगळण्यात यावा. तसेच सन २०१० मध्ये कस्टम विभागाचे स्पष्टीकरण देखील आले आहे.

आरटीओकडे ही वाहने रजिस्टर्ड होतात. त्यावेळी जी कागदपत्रे सादर करण्यात आली होती. त्याबाबत स्पष्टीकरणे विभागाने दिले तर अधिक योग्य होईल. The confusion has been created due to the certificate given by the Automative Research Association of India which perhaps said that these vehicles were imported. This was the basis of our Para. यात तातडीने वसुली करण्याबाबतचे निदेश विभागाने आरटीओंना दिले होते. तसे उत्तर देखील विभागाने महालेखाकारांना देण्यात आले होते. ही बाब महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळी विभागाने वसुली करावी असे सांगितले होते. पण जेव्हा दुसऱ्या पार्टीने त्यांचे म्हणणे सांगितले तेव्हा समजले की, या गाड्यांचे उत्पादन भारतात झाले आहे. त्यावेळी बीएमडब्ल्यूचे भारतात उत्पादन करण्याचे पहिलेच वर्ष होते. त्याच वर्षी बीएमडब्ल्यूने भारतात उत्पादन करण्यास सुरूवात केली होती. आता जे प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे त्यात देखील इंग्रजीमध्ये " मॅन्युफॅक्चरिंग इंडियन " असा शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे. यात जे एक इम्पोर्टेड वाहन होते त्याच्या कराची वसुली देखील पूर्ण झालेली आहे. ही कर वसुली परदेशी चलनाद्वारे दुप्पट दराने करण्यात आलेली आहे.

पण एका बाजूला विभाग प्रमाणपत्राचा आधार घेत आहात, तर दुसऱ्या बाजूला दुप्पट वसुली करीत आहात असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, ५ भारतीय बनावटीच्या गाड्या होत्या, तर १ गाडी परदेशी बनावटीची होती. परदेशी बनावटीची १ गाडी भारतीय कस्टमच्या ताब्यात जवळ जवळ दीड वर्ष होती.

त्यावर विभागाने लिलावात लावलेल्या बोलीची किंमत घेतली आहे. आणि त्यावर १८% कर लावला आहे काय ? (You have taken the bid price and charged the tax @ १८%) अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, ९ टक्के कर भारतीय बनावटीच्या वाहनांवर आकारला आहे. परदेशी बनावटीच्या वाहनावर लिलावात जी बोली लावण्यात आली आहे त्या रकमेवर १८ टक्के टॅक्स आकारण्यात आला आहे.

५.२० परि.क्र.५.३.३ " महसूलाचा भरणा करण्यातील विलंबामुळे व्याजाची हानी " :

उक्त परिच्छेदाबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सप्टेंबर २०१२ मध्ये RTO (अंधेरी), मुंबई यांच्या स्वीय प्रपंजी लेखे (PLA) व रोकड पुस्तिका यांची वर्ष २०११-१२ च्या ताळमेळ विवरणपत्रांबरोबर केलेल्या छाननी दरम्यान आमच्या निदर्शनास आले की, १३७ प्रकरणात स्टेट बँक ऑफ इंडियाकडून मोटार वाहन कराप्रित्यार्थ रु.८९.०३ कोटीचा महसूल भरणा करण्यात, दोन ते २१ दिवसांचा विलंब झाला होता. RBI च्या सूचनांनुसार, कसूरदार बँकेकडून अशा विलंबाकरिता विहित दराने व्याज वसूल करावयाचे होते. या एकूण १३७ प्रकरणातील १५ लाख ५९ हजार ६६६ रूपये वसुलीचे होते. त्यापैकी ९३ हजार ७५७ रूपये परत आलेले आहेत.

पण समितीचा मुद्दा असा आहे की, if it is delayed due to the fault of the bank, then who should suffer? यावर विभागीय सचिवांनी यात बँकेची चूक आहे हे विभागाने मान्य केले व याबाबत खुलासा केला की, एका शाखेने पैसे परत केलेले आहेत. दुसऱ्या शाखा टाळाटाळ करीत आहे. विभागाने भारतीय स्टेट बँकेला पैसे जमा करावे असे सांगितले आहे. बँकेचे म्हणणे आहे की, त्यांनी पैसे जमा केले आहेत. बँकेने विभागाचे पैसे २२ दिवस ठेवले होते. त्यावर बँक व्याज देण्यास तयार नाही. बँकेचे असे म्हणणे आहे की, या रकमेवर व्याज देण्याची तरतूद नाही. बँकेने दोन दिवसाच्या आत शासनाचे पैसे शासनाच्या खात्यावर जमा करावेत असे नियम आहेत. दोन दिवसाच्या आत आरंबीआयकडे पैसे जमा झाले पाहिजेत. पण भारतीय स्टेट बँकेने १८ ते २० दिवस पैसे स्वतःकडे ठेवून घेतले आहेत.

याबाबत आरंबीआयचे नियम असल्यामुळे हे प्रकरण आरबीआयकडे रेफर का करण्यात आले नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, हे प्रकरण आरबीआयकडे रेफर केले आहे. भारतीय स्टेट बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील कळविण्यात आले आहे.

There are instructions that the amount has to be credited within ३ days. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या मॅनेजरमुळे ही चूक झाली आहे त्या प्रकरणी भारतीय स्टेट बँकेने कारवाई केली पाहिजे.

विभागाला व्याज देण्यासाठी जर एसबीआय सहकार्य करीत नसेल तर वित्त विभागाकडे हे प्रकरण रेफर करावे असे समितीने सुचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास होकारार्थी उत्तर दिले.

आता देखील अशा प्रकरणांमध्ये एसबीआयकडून सातत्याने विलंब करण्यात येत आहे काय ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, The RBI is supposed to take action on them. आता ऑनलाईनद्वारे व्यवहार करण्यात येतो.

५.२१ परि.क्र.५.३.४ “ न वटलेल्या धनादेशाच्या प्रकरणात मोटार वाहन कराची न झालेली वसूली ” :

उक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, नोव्हेंबर, २०१० ते ऑक्टोबर, २०१२ दरम्यान अंधेरी (प.) वाशी (नवी मुंबई) ठाणे आणि उप RTO कल्याण या चार कार्यालयांच्या धनादेश/ न वटलेल्या धनादेशांच्या नोंदवहीच्या तपासणी दरम्यान असे आढळून आले की, २००९-१० ते २०११-१२ दरम्यान १४८ प्रकरणांत वाहन मालकांनी मोटार वाहन करासाठी जारी केलेले रु. ५३.२९ लाखाचे धनादेश संबंधित बँकांनी वटविले नाहीत. या १४८ प्रकरणातील रूपये ५३ लाख २९ हजार इतक्या रकमेचे नुकसान झाले आहे. त्यापैकी आता पर्यंत ११ लाख ५८ हजार रूपये वसूल करण्यात आले आहेत. अद्याप पर्यंत रूपये ४० लाख इतक्या रकमेची वसुली झालेली नाही. यात अंधेरी, वाशी, कल्याण, ठाणे येथील ४ आरटीओ ऑफिसर्स गुंतलेले आहेत. त्यामुळे या प्रकरणातील जबाबदारी ही काही जणांवर निश्चित करावी लागेल.

असे असेल तर संबधितांवर जबाबदारी निश्चित का करण्यात आली नाही ? खर तर विभागीय सचिवांनी संबधित दोषीवर जबाबदारी निश्चित करूनच समितीसमोर यायला पाहिजे होते व त्यांना कोणती शिक्षा करण्यात येणार आहे हे समितीसमोर सांगितले पाहिजे. त्यामुळे आता विभागीय चौकशीचा पाठ सोडून टाकावा. कारण या प्रकरणामध्ये शासनाचे स्पष्टपणे नुकसान झालेले आहे. त्यामुळे संबधितांना कठोर शिक्षा केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

समितीने पुढे विचारणा केली की, विभागाने केवळ धनादेशावर सर्व परमिट तयार करून दिलेले आहे. पण त्याचे पेमेंट आले नाही. सर्व धनादेश बाऊन्स झाले आहेत. ज्यावेळी ज्याच्याकडून या चुका झाल्या त्या संबधितांवर १३८ अनुसार कारवाई झाली आहे काय ? निगोशिबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्ट अनुसार संबंधितांवर कारवाई का केली नाही ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, टाईम बार झाल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही. पण आता जबाबदारी निश्चित करावी लागणार आहे. काही धनादेश बाऊन्स देखील करण्यात आले आहेत. त्याची वसुली ही व्हावयास पाहिजे. ती वसुली देखील करण्यात येणार आहे.

पण ज्यांनी या प्रकरणासंदर्भात कारवाई केली नाही त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले की, या प्रकरणी संबधित शासकीय कर्मचारी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

संबधित दोषी शासकीय कर्मचाऱ्याकडून शासनाचे नुकसान भरून घ्यावे आणि अशांना ऑपरेटींग पोस्टवर बसविण्यात येऊ नये. व त्यांना तात्काळ त्या ऑपरेटींग पोस्टवरून काढून टाकण्यात यावे. त्या अधिकाऱ्यांना नॉन ऑपरेटींग पोस्टवर ठेवावे. आणि जर विभागाने यावर काहीच ॲक्शन घेतली नाही तर विभागीय सचिवांना पुन्हा साक्षीसाठी बोलवावे लागेल असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकरणी ॲक्शन घेण्यात येत आहे. अंधेरी, ठाणे, वाशी, कल्याण, या आरटीओ कार्यालयांमध्ये अशाप्रकारची प्रकरणे सर्वात जास्त झाली आहेत.

पण काही धनादेश हे तीन महिन्याचा कालावधी उलटून गेल्यानंतर क्लिअरिंगसाठी पाठविण्यात आले. गेल्या ५ वर्षात वसुली केली नाही. त्यामुळे वसुली करण्यात येईल असे सांगून हा विषय विभागाकडून संपविण्यात येणार आहे असे समितीला वाटते. या प्रकरणी अधिकाऱ्यांसह उच्च अधिकारी देखील जंबांबदार आहेत. वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांनी फक्त रिपोर्ट तपासण्याचेच काम करायचे काय ? संबधित अधिकाऱ्यांनी प्रत्येक ठिकाणी आपली जबाबदारी पूर्ण केली नाही हे सकृतदर्शनी दिसते आहे. नियम १३८ अनुसारची कारवाई देखील लॅप्स झालेली आहे. चेक बाऊन्स झाल्यावर त्या वाहनाविरूद्ध वसुलीची कारवाई करण्यासाठी विभागाकडून कोणता पुढाकार घेण्यात आला आहे ? ज्यांच्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे अशांविरूद्ध जबाबदारी निश्चित करावी. तसेच त्यांच्याकडून व्याजासहित पैसे वसूल करण्यात यावे, असे समितीने सुचित केले.

शासकीय कोषागरामध्ये धनादेशाद्वारे पैसे घेण्याचे केव्हापासून सुरू करण्यात आले आहे ? आणि ही पद्धत आता पण सुरू आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, आता सर्व आर्थिक व्यवहार हे ऑनलाईन होतात. डी.डी. घेण्यात येतो पण चेक घेण्यात येत नाही.

अंधेरी, ठाणे, वाशी, कल्याण येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय आहे. आता त्यांची विभागीय कार्यालये वाढविण्यात आली आहेत. समितीने उदाहरण दाखल हरियाणा राज्याबाबत सांगितले की, हरियाणा राज्य महाराष्ट्र राज्यापेक्षा लहान आहे पण तेथे HR-50 चालू आहे. महाराष्ट्राकडे देखील MH-50 आहे. याचा अर्थ हरियाणा राज्यात महाराष्ट्र राज्यापेक्षा उप प्रादेशिक कार्यालये जास्त आहेत. महाराष्ट्र राज्याचे दोन-तीन जिल्हे मिळून हरियाणा राज्य आहे. विदर्भ तर फार मोठा झाला. आज हरियाणामध्ये ५० उप प्रादेशिक परिवहन कार्यालये आहेत आणि महाराष्ट्रातपण फक्त ५० उप प्रादेशिक परिवहन कार्यालये आहेत. हरियाणा राज्य वाहनांद्वारे मोठ्या प्रमाणावर महसूल गोळा करते. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांची संख्या वाढविली पाहिजे प्रत्येक तालुकानिहाय प्रादेशिक परिवहन कार्यालय दिले पाहिजे. आपल्याकडे १०० प्रकारचा महसूल गोळा होत असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करण्यात येते आहे असे दिसते असे मत समितीने व्यक्त केले.

५.२२ परिच्छेद क्र. ५.३.५ “ शासकीय महसूलाचा दुर्विनियोग ” :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर प्रकरणी १ लाख ५९ हजार ८१६ रुपये वसुली करायची होती. सदर वसुली करण्यात आली असून यामध्ये एकाच व्यक्तीचा समावेश होता. तो कर्मचारी कॅशिअर या पदावर कार्यरत होता. हा कर्मचारी सिस्टिममधून रिसिट नंबर जनरेट करुन संध्याकाळी ती कॅन्सल करायचा व पैसे स्वत:कडे ठेवायचा. त्यास बडतर्फ करण्यात आले आहे.

What is the assurance that it will not happen again? इतर जिल्हयांमध्ये असे प्रकार घडले किंवा नाही याबाबत तपासणी करणे आवश्यक होते. असे महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले.

रद्द करण्यात आलेले रिसीटस् पुन्हा न वापरण्याबाबत एन.आय.सी. चा प्रोग्राम अद्ययावत करायचा होता. तो अद्ययावत करुन झाला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर कार्यवाही झालेली आहे. सदर प्रकरणी किती लोकावर कारवाई करण्यात आली आहे व अशा प्रकारची किती प्रकरणे आहेत व त्यामध्ये किती रकमेचा अपहार झालेला आहे ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, हे एवढेच एक प्रकरण आहे.

सदर कर्मचाऱ्याने एकूण किती रुपयांचा अपहार केला आहे ? कारण यामध्ये दिलेले प्रकरण हे नमुना आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणले असता, यासंदर्भात महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले की, त्यांनी याव्यतिरिक्त आणखी १९ प्रकरणांमध्ये १२.५६ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे ट्रेस केले आहे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, एकूण २९ प्रकरणे निघाली आहेत. महालेखापरीक्षकांनी ३ प्रकरणे निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर विभागाच्या चौकशीमध्ये २९ प्रकरणे आढळून आली असून त्यामध्ये २५ लाख रुपयांचा अपहार केलेला आहे. ही सर्व रक्कम संबधिताकडून वसूल करण्यात आली असून त्याला बडतर्फ करण्यात आले आहे.

हे प्रकरण धुळे प्रादेशिक परिवहन कार्यालयातील आहे. अशा प्रकारची मॉडेस ऑपरेंडी सर्व ठिकाणी सुरुच असेल. अशा प्रकारचा अपहार दुसऱ्या कोणत्याही प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये झालेला नाही, अशा प्रकारची खात्री विभागाने समितीला द्यावी. कारण महालेखाकार कार्यालयाने त्यावेळीही सांगितले होते की, इतर प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये देखील असे प्रकार घडले आहेत किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात यावी. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००८-०९ पासून अशा प्रकारे किती प्रकरणे आढळून आली त्याबाबत अंतर्गत परीक्षणामध्ये तपासणी करण्यात येईल.

हे प्रकरण आढळून आल्यानंतर इतर प्रादेशिक परीवहन अधिकाऱ्यांना काही सूचना देण्यात आल्या होत्या का ? अशा प्रकारे कार्यालयामध्ये काही घडले आहे किंवा कसे याबाबत इतर प्रादेशिक परीवहन अधिकाऱ्यांना विचारणा करण्यात आली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, जेव्हा-जेव्हा असे प्रकार घडतात त्यावेळी परीपत्रक काढण्यात येते व याबाबत देखील परीपत्रक काढलेले आहे.

समितीच्या मते याबाबतचे परीपत्रक काढलेले नाही. जर आपल्या विभागामार्फत परीपत्रक काढण्यात आले असेल तर त्याची एक प्रत समितीस सादर करावी असे निदेश समितीने दिले असता, विभागीय सचिवांनी अश्वस्त केले की, परिपत्रकाची प्रत समितीला सादर करण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी :

५.२३ परिच्छेद क्र. ५.३.१ " मोटार वाहन कराची वसुली न करणे "

अभिप्राय :

मुंबई मोटार वाहन अधिनियम, १९५८ चे कलम ४ व त्याअंतर्गत केलेल्या नियमांन्वये, राज्यातील, वापरात असलेल्या व वापरासाठी ठेवलेल्या सर्व वाहनांवर, त्यांच्या नोंदणीकृत भारीत वजन किंवा आसन क्षमतेनुसार विहीत दराने कर देय असतो. वाहन मालकांकडून करावयाची वसुली, मागणी आदेशांचे निर्गमन इत्यादींचा तपशील रोख शिल्लक आढावा नोंदवहीमध्ये ठेवला जातो. परंतु

१०३३ परिवहन वाहनमालकाकडून सन २००६ ते २०१३ दरम्यान परिवहन मालिकेतील वाहनांच्या बाबतीत रु. १.७२ कोटीचा मोटार वाहन कर वसूल केला गेला नव्हता. विभागाने, जुलै, २०१३ मध्ये कारवाई करून एका कार्यालयातील दोषींची यादी भरारी पथकास दिली तर इतर कार्यालयांनी असे सांगितले की, (जुलै, २०१३), या प्रकरणांचा पाठपुरावा संबंधित मोटार वाहन विभागाच्या निरीक्षकांकडून केली जात आहे. परिणामी रु. १.७२ कोटीचा मोटार वाहन कर जमा झाला नव्हता. तसेच, विहीत दराने व्याजदेखील आकारणीय होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

सदरहू प्रकरणी एकूण १०३३ प्रकरणांमधील रु. १,७१,९५,५१३ एवढ्या रकमेपैकी ७३४ प्रकरणांमधील रु. १,०१,६६,७४६ एवढी वसुली झालेली असून उर्वरित २९९ प्रकरणांमधील रु. ७०,२८,००० एवढ्या रकमेची वसुली सुरू असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. राज्यात एकूण प्रादेशिक परिवहन कार्यालय १५ व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय ३५ असे एकूण ५० प्रादेशिक परिवहन कार्यालये कार्यरत असून महालेखाकारांनी नमुन्यादाखल केवळ ८ प्रादेशिक परिवहन कार्यालय व १५ उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांची तपासणी केली असता, हे गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. याचाच अर्थ राज्यातील अन्य प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये देखील निश्चितच हीच अवस्था असणार असे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपातील प्रकरणे ही सन २०१२-१३ यादरम्यानच्या कालावधीतील असून त्या कालावधीतील अन्य प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये तसेच त्यानंतरच्या कालावधीतील देखील प्रकरणे विभागाने तपासण्याची आवश्यकता आहे. महालेखाकारांच्या आक्षेपानंतर विभागाने अशी तपासणी केली काय व त्यात अशी किती प्रकरणे आढळली व त्यासंबंधी कोणती कारवाई विभागाकडून करण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता, याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले. यावरूनच विभागाकडे अंतर्गत लेखापरिक्षणाची पद्धत, व्यवस्था व यंत्रणा अस्तित्वात असतानाही ह्या गंभीर बाबी विभागाच्या लक्षात न येणे अथवा यासंदर्भात अंतर्गत लेखापरिक्षणादरम्यान कोणतेही आक्षेप नोंदविण्यात न येणे यावरूनच हे अंतर्गत लेखापरिक्षण किती सदोष आहे हे स्पष्ट होते. तसेच हे अधिकाऱ्यांचे संगनमताने देखील झालेले असल्याची शक्यता नाकारात येत नाही. हे अंतर्गत लेखापरिक्षण गुणवत्तेवर व योग्यरित्या झाले असते तर या बाबी वेळेतच विभागाच्या निदर्शनास आल्या असत्या. अतः सन २००८-०९ पासून आजतागायत दरवर्षी अंतर्गत लेखापरिक्षणामध्ये अशी किती प्रकरणे आढळली, किती वसुली झाली, किती वसुली प्रलंबित आहे व किती संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. तसेच या परिच्छेदान्वये असलेली उर्वरित रु. ७० लाखाच्या वसुलीबाबतची माहिती समितीस लवकरात लवकर सादर करण्यात येईल असे समितीला आश्वासित करूनही अद्यापही माहिती समितीस अप्राप्त आहे.

शिफारशी :

५.२४ मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ मध्ये मोटार वाहनांवरील करांची आकारणी व वसुली याकरिता तरतूद केलेली आहे. वाहन नोंदणी अधिकाऱ्यांनी अधिनियम, नियम इत्यादीमध्ये विहित केलेल्या तरतुदींचे व वाहनांची नोंद ठेवण्याच्या विहित पद्धतीचे पालन करणे बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी योग्यरित्या विभागाकडून न झाल्यामुळे शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यानंतर ही वसुली विभागाकडून करण्यात आली असून त्यातील प्रलंबित रु. ७० लाखांची वसुली तातडीने करण्यात यावी. तसेच महालेखाकारांनी केवळ सन २००८ ते २०१२ यादरम्यानच्या कालावधीतील नमुन्यादाखल ५० पैकी केवळ २३ प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची तपासणी केली असता, या गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. याचाच अर्थ सन २०१२ नंतरच्या कालावधीतील तसेच महालेखाकारांनी तपासणी केलेल्या कार्यालयाव्यतिरिक्त अन्य कार्यालयांमध्ये देखील अशाच गंभीर बाबी घडलेल्या असल्याची पूर्ण शक्यता आहे. समितीने साक्षीदरम्यान याबाबत तपासणी करून माहिती समितीस सादर करणेबाबत आश्वासित करण्यात आले असतानाही ती माहिती समितीस अद्याप प्राप्त झाली नाही. अतः जीएसटी लागू होईपर्यंत या सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांची तपासणी व चौकशी करण्यासाठी विभागाद्वारे विभागबाह्य विशेष पथक तयार करण्यात यावे व या सर्व प्रकरणांची तात्काळ चौकशी करण्यात यावी. त्यात मोटार वाहन कराची वसुली निघत असल्यास ती तात्काळ वसूल करण्यात यावी. तसेच यावरील व्याजाची देखील आकारणी व वसुली करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.२५ (२) प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांसंदर्भात असे गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले असतानाही व विभागाने ही रक्कम वसूलपात्र ठरत असल्याचे मान्य करून ती वसुली केल्यानंतरही या प्रकरणी कोणत्याही दोषी अधिकाऱ्यांवर विभागाने अद्यापही कोणतीही कारवाई केली नाही. इतक्या गंभीर बाबी अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय घडूच शकत नाहीत. सदोष

अंतर्गत लेखापरिक्षण, नियंत्रण व नियोजनाचा अभाव, निष्काळजीपणा, गैरव्यवहार या सर्व बाबींमुळे विभागाच्या कोट्यावधी रुपयांच्या महसूलाचे अशाप्रकारे नुकसान होत आहे. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यामुळे ही वसुली करण्यात आली आहे अन्यथा विभागाच्या लक्षात या बाबी न येणे या देखील बाबी गंभीर असून अंतर्गत नियंत्रणाचा अभाव दर्शविणारी आहे. वास्तविकतः समितीच्या साक्षीला येण्याअगोदर विभागाने या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करूनच साक्षीला येणे अभिप्रेत व आवश्यक होते. परंतु अशाप्रकारची कोणतीही कारवाई विभागाने केली नाही याचाच अर्थ अशा अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याची भूमिका विभाग स्वीकारत असल्याचे समितीचे स्पष्ट मत असून याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अतः या सर्व प्रकरणी जबाबदार असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.२६ परिच्छेद क्र. ५.३.२ " आयात वाहनांवरील एकरकमी करांची (OTT) कमी आकारणी "

अभिप्राय :

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ मध्ये तरतुदीनुसार, भारतात आयात करून राज्यात वापरावयाच्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार गाड्यांवर आकारावयाच्या OTT चे दर हे देशी वाहनांसाठी लागू होणाऱ्या दराच्या दुप्पट आहेत.

सन २०१०-२०११ ते २०११-२०१२ या वर्षात परिवहनेतर प्रवर्गांतर्गत नोंदणी केलेली सहा वाहने ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाने (ARAI) आयात वाहने म्हणून घोषित केली होती. परंतु, या सहा वाहनांच्या मालकांनी, आयात वाहनांना लागू होणाऱ्या दराने एक रकमी कर भरला. यामुळे रु.१६.४८ लाखांचा एकरकमी कर कमी वसूल केला गेला. तसेच विहीत दराने व्याज देखील आकारणीय होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात समितीसमोर सांगण्यात आले की, एकूण ६ गाड्यांबाबत हे आक्षेप असून यापैकी ५ गाड्या भारतीय बनावटीच्या होत्या व १ गाडी परदेशी बनावटीची होती जी भारतीय कस्टम विभागाने दीड वर्षे जप्त केलेली होती. त्यानंतर त्याचा लिलाव करून लिलाव झालेल्या दरावर १८ टक्के दराने कर आकारणी करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. बीएमडब्ल्यू गाड्या ह्या त्यावेळेस भारतातच तयार केलेल्या असल्यामुळे आयात वाहन कराची आकारणी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यानंतर संबंधित वाहन मालकास त्यासंदर्भात वसुलीची नोटीस देण्यात आली होती. परंतु वाहन मालकांनी केलेल्या खुलाशान्वये या गाड्यांचे उत्पादन भारतात झाल्याचे स्पष्ट झाल्यामुळे कराची आकारणी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

५.२७ महालेखाकारांनी सदरहु आक्षेपात एकूण ६ गाड्यांबाबत आक्षेप नोंदविलेले असून त्यापैकी ५ गाड्या या भारतीय बनावटीच्या असल्याचे निदर्शनास आले व १ गाडी परदेशी बनावटी असून ती कस्टम विभागाने जप्त करून त्याचा लिलाव केला असता, लिलावातील बोलीच्या किंमतीवर दुप्पट दराने आयात वाहन कर आकारणी केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु महालेखाकारांनी केवळ नमुन्या दाखल काही प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची तपासणी केली असता, हे गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. राज्यातील अन्य प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये देखील अशाप्रकारे आयात वाहनांवरील कराची कमी आकारणी झालेली असल्याची पूर्ण शक्यता आहे. अतः त्याची देखील विभागाने तपासणी करून वसुली करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.२८ परिच्छेद क्र. ५.३.३ " महसुलाचा भरणा करण्यातील विलंबामुळे व्याजाची हानी "

अभिप्राय :

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ८(१) नुसार, महाराष्ट्र राज्याच्या महसुलापोटी शासकीय कार्यालयांनी जमा केलेला किंवा त्यांना मिळालेला सर्व पैसा कोणताही अवाजवी विलंब न करता व कोणत्याही परिस्थितीत पैसे मिळाल्यापासून दोन दिवसांत पूर्णपणे कोषागारात किंवा बँकेत भरुन कोषागाराच्या लेख्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्गमित केलेल्या सूचनांनुसार (फेब्रुवारी, २००६) शासकीय महसूल जमा करण्यास प्राधिकृत केलेल्या बँकांनी हा गोळा केलेला महसूल तो मिळाल्यापासून तीन दिवसांत शासकीय लेख्यात जमा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास बँकेच्या दरापेक्षा दोन टक्के अधिक दराने (सहा टक्के) वार्षिक व्याज आकारले जाते. RBI ने जारी केलेल्या " अनुदेश ज्ञापन " लेखा आणि ताळमेळ-राज्य शासनाचे व्यवहार यातील परिच्छेद ५.११(ब) नुसार, विलंबाने भरणा केलेल्या रक्कमेवर दंडात्मक व्याजाची मागणी करण्याची जबाबदारी अधिदान व लेखा कार्यालय/कोषागारे यांची आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ३१ मार्च, २०१२ रोजी संपलेल्या वर्षातील महसुली जमांच्या अहवालावर भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या अहवालातील परिच्छेद क्र. ५.३.३ मध्ये शासकीय लेख्यात शासकीय महसूल विलंबाने भरणा करण्यावर भाष्य केले होते. ही अनियमितता कायम राहूनही ह्याबाबत कुठलीही कारवाई केली गेली नाही (जानेवारी २०१४).

तसेच १३७ प्रकरणात स्टेट बँक ऑफ इंडियाकडून मोटार वाहन कराप्रित्यर्थ रु. ८९.०३ कोटीचा महसूल भरणा करण्यात दोन ते २१ दिवसांचा विलंब झाला होता. रिझर्व्ह बँकेच्या सूचनांनुसार कसूरदार बँकेकडून अशा विलंबाकरिता विहित दराने व्याज वसूल करावयाचे होते. सन २०११-१२ साठी बँकेकडून आठ टक्के दराने रु. १५.९६ लाख वसुलीयोग्य व्याजाचे गणन झाले होते. कसूरदार बँकेकडून या रकमेच्या आकारणी व वसुलीसाठी विभागाने कोणतीही कार्यवाही केली नव्हती. परिणामी रु. १५.९६ लाखांच्या व्याजाची वसुली झाली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

समितीने या प्रकरणी छाननी केली असता, १३७ प्रकरणांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया यांचेकडून मोटार वाहन कराप्रित्यर्थची रु. ८९.०३ कोटीवरील व्याजाची रक्कम शासनाकडे जमा करण्यास २ ते २१ दिवसांचा विलंब झालेला असून त्यापैकी ८ प्रकरणांत रु. ९३,७५७ इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून उर्वरित १२९ प्रकरणांतील रु. १५,०१,९०९ इतक्या रकमेची वसुली करणेबाबत प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना कळविण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यामध्ये बँकेची चूक असल्याचे विभागाने मान्य केले व एका शाखेने पैसे दिले आहेत परंतु दुसऱ्या शाखा अशाप्रकारे व्याज देण्यास टाळाटाळ करीत असून या रकमेवर व्याज देण्याची तरतूद नसल्याचे या बँकांच्या शाखेंकडून सांगण्यात आले. बँकेने २ दिवसांच्या आत हे पैसे शासनाच्या खात्यावर जमा करावे असा नियम असतानाही त्याची अंमलबजावणी बँकेकडून झाली नाही व त्यावर व्याजही बँका देत नाहीत. त्यामुळे रिझर्व्ह बँकेकडे हे प्रकरण अग्रेषित करण्यात आले असून यासंदर्भात अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

५.२९ मोटार वाहन कराप्रित्यर्थची कोट्यावधीची रक्कम बँकांनी दोन दिवसांत शासन खात्यात जमा करण्याबाबत तरतूद असतानाही व रक्कम जमा करण्यास विलंब झाल्यास त्यावर व्याज देण्यासंदर्भात रिझर्व्ह बँकेच्या सूचना असतानाही बँकांकडून ही रक्कम विहित मुदतीत जमा न करण्यात आल्यामुळे त्यावर व्याजही देण्यात न आल्यामुळे विभागाच्या महसुलांचे निश्चितच नुकसान झाले आहे. हे प्रकरण विभागामार्फत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे देखील अग्रेषित करण्यात आलेले असून अद्यापही त्यावर काही निर्णय झालेला नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः विभागाने या प्रकरणाचा पाठपुरावा करावा. ज्या बँकांकडून ही चूक झाली आहे त्या बँकांकडून व्याज घेवून त्या बँकांवर कारवाई देखील होण्याच्यादृष्टीने हे प्रकरण वित्त विभागाकडे आवश्यक त्या पुढील कार्यवाहीकरिता अग्रेषित करण्यात यावे व त्यांच्या माध्यमातून या प्रकरणी संबंधित बँक व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेशी समन्वय करून योग्य तो पाठपुरावा करण्यात यावा व व्याजाची वसुली करण्याचा प्रयत्न करण्यात येवून त्याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची व वसुलीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.३० परिच्छेद क्र. ५.३.४ " न वटलेल्या धनादेशाच्या प्रकरणात मोटार वाहन कराची न झालेली वसुली "

अभिप्राय :

मुंबई मोटार वाहन अधिनियम, १९५८ च्या कलम ३ सह कलम ४ मधील तरतुदींनुसार शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या दराप्रमाणे कर आकारणी आणि कराची आगाऊ वसुली करून तो शासनाच्या खात्यात जमा करावा. तसेच महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८, नियम १००(ब) च्या तरतुदींतर्गत जर कुठल्याही कारणाने जमाकर्ता बँकेने धनादेश वटविला नाही तर विभागाने कसूरदारांकडून देय रक्कम व्याजासह रोख वसूल करावी आणि Negotiable Instrument Act (Amended), १९८८ च्या कलम १३८ च्या तरतुदींतर्गत कारवाईस सुरूवात करावी. म्हणजे दोन वर्षांपर्यंत कारावास आणि/किंवा धनादेशाच्या रक्कमेच्या दुप्पट रक्कमेइतका दंड वसूल करावा. परंतु सन २००९ ते २०१२ दरम्यान १४८ प्रकरणांत वाहन मालकांनी मोटार वाहन करासाठी जारी केलेले रु.५३.२९ लाखांचे धनादेश संबंधीत बँकानी वटविले नाहीत. त्यामुळे ह्या रक्कमांची व्याजासह रोखीने वसुली करावयाची होती. विभागाने कसूरदारांकडून ह्या रक्कमा वसूल करण्यासाठी कुठलीही कारवाई केली नाही किंवा परक्राम्य लेख अधिनियमाखाली (Negotiable Instrument Act) कलम १३८ अंतर्गत कुठल्याही कार्यवाहीला सुरूवात केली नाही. परिणामी, रु. ५३.२९ लाख महसूल आणि त्यावरील व्याजाची वसुली झाली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे अतिशय गंभीर असून विभागांतर्गत सदोष नियंत्रणाचे द्योतक आहे. सन २००९ ते २०१२ दरम्यान एकूण १४८ प्रकरणांमध्ये वाहन मालकांनी मोटार वाहन करासाठी जारी केलेले रु. ५३.२९ लाखांचे धनादेश न वटल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. सद्यःस्थितीत त्यातील केवळ रु. ११.५८ लाख इतक्या रकमेची वसुली झालेली असून जवळजवळ रु. ४१ लाखांची वसुली प्रलंबित असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच यात अंधेरी, वाशी, कल्याण व ठाणे या प्रादेशिक परिवहन व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी गुंतलेले असून त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्याबाबतही विभागीय प्रतिनिधींकडून समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

५.३१ महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे अतिशय गंभीर असून १४८ प्रकरणांमध्ये वाहन मालकांनी मोटार वाहन करासाठी जारी केलेले रु.५३.२९ लाखांचे धनादेश वटले नाहीत. तसेच महालेखाकारांनी केवळ नमुन्या दाखल काही कार्यालयांची छाननी केली असता, या गंभीर बाबी लक्षात आल्या. परंतु राज्यातील अन्य कार्यालयांमध्ये देखील हीच कार्यपद्धती अस्तित्वात असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच धनादेश न वटल्याबाबत निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट मधील कलम १३८ नुसार देखील विभागाने कोणतीही कारवाई विहित मुदतीत केली नाही. महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदवेपर्यंत या गंभीर बाबी विभागाच्या निदर्शनासही येवू नयेत हे देखील शंकास्पद आहे. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यानंतर विभागाने याची गंभीर दखल घेवून ही संपूर्ण वसुली करून व सर्व संबंधित अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा करून समितीसमोर येणे आवश्यक असतानाही लोकलेखा समितीची बैठक लागेपर्यंत या रकमेची पूर्ण वसुली देखील झालेली नाही. तसेच कोणत्याही अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात आली नाही. याचाच अर्थ विभाग या अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. या प्रकरणांमध्ये शासनाचे स्पष्टपणे नुकसान झाल्याचे दिसून येत असताना व संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता असताना विभाग केवळ औपचारीकता पार पाडण्याच्या भूमिकेत असून समितीच्या साक्षीदरम्यान हे गंभीर आक्षेप विभाग मान्य करतो व या प्रकरणी संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचेवर कारवाई करण्याचे देखील समितीला आश्वासित करते. परंतु जर समितीने साक्ष लावली नसती तर ही वसुली करण्याची व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची कोणतीही भूमिका विभागाची नव्हती. अतः या गंभीर प्रकरणी तात्काळ या रकमेची व्याजासह वसुली वाहन मालकांकडून करण्यात यावी. तसेच निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वये त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. तसेच या प्रकरणातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच वाहन कराची रक्कम वाहन मालकांकडून व्याजासह वसूल न झाल्यास ती संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावी. हे अधिकारी सद्यःस्थितीत विभागात कार्यरत असल्यास त्यांची अकार्यकारी पदावर नेमणूक करण्यात यावी. तसेच अन्य कार्यालयांमध्ये देखील निश्चितच अशी प्रकरणे असण्याची पूर्ण शक्यता आहे त्याची देखील तपासणी करून समितीस ३ महिन्यांत कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

५.३२ परिच्छेद क्र. ५.३.५ “ शासकीय महसूलाचा दुर्विनियोग ”

अभिप्राय :

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ९८(२) अनुसार (i) शासनाच्या वतीने रक्कम प्राप्त करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याने प्रपत्र ४ मध्ये एक रोकड पुस्तिका ठेवावयास हवी आणि (ii) प्रत्येक आर्थिक व्यवहार घडल्यानंतर त्वरित त्याची नोंद रोकड पुस्तिकेत घ्यावयास हवी तसेच ही तपासणी केल्याचे निश्चित करण्यासाठी कार्यालय प्रमुखाने ती स्वाक्षांकित करावी अशी तरतूद आहे. परंतु महालेखाकारांनी फेब्रुवारी, २०१२ मध्ये केलेल्या तपासणीत असे आढळून आले की, प्रपत्र २० मधील आवेदनांबरोबर जोडलेल्या संगणकीय पावत्या प्रत्यक्षात रद्द केल्या होत्या आणि तेच पावत्यांचे क्रमांक हाती तयार केलेल्या पावत्यांसाठी पुन्हा वापरले होते ज्याची रोकड पुस्तिकेत नोंद घेतली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस :

५.३३ सदरहू आक्षेप अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून यातील संपूर्ण रकमेची वसुली झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले असून धुळे येथील कार्यालयातील एका रोखपाल या व्यक्तीकडून अशाप्रकारे गैरव्यवहार झालेला असून त्यांना विभागाने बडतर्फ करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. महालेखाकारांनी यामध्ये केवळ तीन प्रकरणे निदर्शनास आणून दिली होती परंतु विभागाने त्यानंतर केलेल्या चौकशीमध्ये २९ प्रकरणे आढळून आलेली असून त्यात एकूण रु. २५ लाखांचा अपहार झालेला असून ही सर्व रक्कम वसूल करण्यात आल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले. केवळ धुळे प्रादेशिक परिवहन कार्यालयातील हे प्रकरण असून अन्य प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये देखील अशाप्रकारचा अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या सर्व कार्यालयांची तपासणी विभागाने करावी व अशी प्रकरणे निदर्शनास आल्यास वसुली संदर्भात कारवाई करून व जबाबदार अधिकाऱ्यांवर देखील कडक कारवाई करून समितीस ३ महिन्यांत कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. तसेच अशा बाबींची पुनरावृत्ती न होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी. सद्यःस्थितीत ही संपूर्ण प्रक्रिया संगणकीय आज्ञावलीच्या माध्यमातून अलंबिण्यात येत असल्यामुळे अशा बाबी घडण्याची शक्यता कमी आहे. परंतु तरीही विभागाने यासंदर्भात योग्य ती दखल घेवून उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.

गृह विभाग

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ७.३ " पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणावरील खर्चाची वसुली " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

परिच्छेद क्र. ७.३ " पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणावरील खर्चाची वसूली "

६.२ परिच्छेद क्र. ७.३.१ प्रस्तावना :

राज्यातील व्यक्ती/स्थानिक संस्था/सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/बँका/रेल्वे/यांना तसेच राज्याबाहेरील इतर प्रशासने/संबंधित व्यक्ती यांना त्यांच्या संरक्षणार्थ पुरविलेल्या पोलीस बळासाठी त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या रक्कमांचा समावेश पोलीस जमामध्ये होते. प्राप्त झालेल्या मागणीच्या आधारे जेथे लागू असेल तेथे त्याप्रित्यर्थ खर्च वसूल करून, पोलीस तैनात केले जातात.

महाराष्ट्र पोलीस नियम पुस्तिका (MPM) च्या खंड III मधील परिच्छेद ४८४(I) नुसार संरक्षणासाठी तैनात केलेल्या पोलिसांच्या खर्चामध्ये (COP), वेतन, महागाई भत्ता, विशेष वेतन, घरभाडे भत्ता आणि रजा वेतन, निवृत्तीवेतन अंशदान आणि वेळोवेळी विहित केलेल्या दराने देखरेख शुल्क यांचा समावेश होतो. अशा प्रत्येक तैनातीसाठी आठ तासांच्या सत्रावर COP च्या वसुलीचा दर आधारलेला असतो. त्याचे निर्धारण आणि वसुली विभागाने करायची असते.

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (BP Act) कलम ४७ आणि ४८ तसेच MPM च्या खंड III मधील परिच्छेद क्रमांक ४८४ नुसार व्यक्ती/खाजगी संस्था यांना सुरक्षेसाठी पुरविलेल्या पोलिसांवर झालेल्या खर्च आगाऊ वसूल करायचा असतो. तसेच १९९३ ते १९९८ दरम्यान जारी केलेल्या शासन निर्णयानुसार महापालिकांना पुरविलेल्या पोलीस सुरक्षेचा खर्चही आगाऊ वसूल करायचा असतो.

निवडणुका, धार्मिक कार्यक्रम, दंगली इत्यादी प्रसंगी कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी केंद्र सरकार/इतर राज्य सरकारे यांच्याकडून विनंती केली गेल्यास इतर राज्यांमध्ये पोलीस तैनात केले जातात. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य (DGP) यांनी जारी केलेल्या आदेशानुसार महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असलेल्या राज्य राखीव पोलीस दलामधून (SRPF) पोलीसांना इतर राज्यांत तैनात केले जाते. DGP यांनी १९ मे, २००३ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार राज्याबाहेरुन SRPF च्या समादेशकांनी तैनातीवरील COP चे खर्चाचे विवरणपत्र (SOE) तयार करणे आवश्यक असते. अशाप्रकारे प्राप्त झालेल्या SOE एकत्र करून प्रमाणन करण्यासाठी त्या राज्याच्या महालेखाकारांकडे त्या पाठवायच्या असतात. BP अधिनियम, MPM आणि वेळोवेळी जारी केलेल्या सूचना याद्वारे पोलीस जमांचे निर्धारण, प्राप्ती आणि लेखांकन शासीत केले जाते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

> " पोलीस जमा " या शिर्षाखाली पोलीस विभागाद्वारे खाजगी व्यक्ती, इतर संस्था, रेल्वे प्रशासन व इतर राज्यांना पुरविलेल्या संरक्षण खर्चाची मिळालेली प्रतिपूर्तीची रक्कम याचा समावेश असतो. ज्या खाजगी व्यक्ती, संस्थांना त्यांचे विनंतीनुसार पोलीस संरक्षण पुरविले जाते, त्याबाबतची खर्च प्रतिपूर्तीही प्रचलित शासन निर्णय/परिपत्रक व पोलीस विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचना या आधारे करण्यात येते.
>
> महाराष्ट्र पोलीस नियावली भाग-३, परि. ४८४ च्या आधारे संरक्षण खर्चाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही केली जाते. मुंबई पोलीस अधिनियम १९५१ कलम ४७ व ४८ नुसार खाजगी व्यक्ती/संस्था यांचे कडून संरक्षण खर्चाची रक्कम आगाऊ स्वरुपात वसूल करण्याची तरतूद आहे. तसेच १९९३ व १९९८ या दरम्यान निर्गमित झालेल्या शासन निर्णयांन्वये देखील महानगरपालिकांकडून संरक्षण खर्चाची रक्कम तीन महिने आगाऊ स्वरुपात वसूल करण्याची तरतूद आहे.
>
> केंद्र सरकार/इतर राज्य सरकार यांचे विनंतीनंतर निवडणूक, धार्मिक सण, उद्भवलेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती हाताळण्याकरिता महाराष्ट्र राज्याकडून रा.रा.पो.बल गटाच्या कंपन्या तात्पुरत्या स्वरुपात तैनात करण्यात येतात. संपूर्ण महाराष्ट्रात विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या रा.रा.पो.बल गटाच्या कंपन्या पोलीस महासंचालकांच्या आदेशाप्रमाणे संबंधित राज्यांमध्ये बंदोबस्तकरिता रवाना होतात. सदरहू राज्य बंदोबस्त पूर्ण होऊन, मूळ घटकात परतल्यानंतर एक महिन्याच्या आत संबंधित समादेशक कार्यालयाकडून योग्य त्या मार्फतीने पोलीस महासंचालक कार्यालयास खर्च विवरणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. संबंधित गट कार्यालयाकडून योग्य त्या मार्फतीने खर्च विवरणपत्रे या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही या कार्यालयाचे स्तरावरून शक्य होते. गट कार्यालयाने सादर केलेल्या खर्च विवरणपत्रामध्ये

काही प्रकरणी महालेखाकार कार्यालयाकडून त्रुटी दर्शविण्यात येतात. सदरहू त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर महालेखाकार कार्यालयाकडून संबंधित बंदोबस्त कालावधीची लेखा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येतात. सदरचे लेखा प्रमाणपत्र संबंधित राज्यास पाठवून खर्च प्रतिपूर्तीकरिता या कार्यालयाकडून विनंती करण्यात येते.

६.३ परिच्छेद क्र. ७.३.२ व्याप्ती आणि कार्यपद्धती :

संरक्षणासाठी पुरविलेल्या पोलीस बळाच्या खर्चाच्या वसुलीसंबंधी पोलीस विभागात असलेल्या यंत्रणा आणि कार्यपद्धती यांची पर्याप्तता पडताळण्याच्या हेतूने राज्यातील DGP, अतिरिक्त पोलीस महासंचालक (ADGP), रेल्वे, १० पैकी आठ पोलीस आयुक्त (CP), आणि ३५ पैकी आठ पोलीस अधिक्षक (SP) यांच्या कार्यालयात एप्रिल, २०१३ ते जून, २०१३ दरम्यान २००८-०९ ते २०१२-१३ या कालावधीचे या विषयावरील लेखापरिक्षण केले गेले. या लेखापरिक्षणातून व्यवस्था तसेच अनुपालनातील अनेक कमतरता निदर्शनास आल्या ज्याविषयी पुढील परिच्छेदात विश्लेषण केले आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००८-०९ ते सन २०१२-१३ या कालावधीतील बंदोबस्त खर्चप्रतिपूर्ती विषयक अभिलेखाचे निरिक्षण करण्याकरिता माहे एप्रिल, २०१३ व जून, २०१३ या कालावधीत महालेखाकार कार्यालयाने लेखापरिक्षण केले. पोलीस महासंचालक कार्यालय/अपर पोलीस महासंचालनाय लोहमार्ग, म. राज्य, मुंबई/आठ पोलीस आयुक्तालये/आठ पोलीस अधीक्षक कार्यालयांचे कडील उपलब्ध अभिलेखाचे लेखापरिक्षण करण्यात आले. लेखा परिक्षणामध्ये आढळलेल्या त्रुटी पुढील विविध परिच्छेदामध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत.

६.४ परिच्छेद क्र. ७.३.३.१ इतर राज्यांकडून तेथे तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची वसूली न होणे :

DGP कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार इतर राज्यांमध्ये तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची प्रलंबित रक्कम रु.३८.३२ कोटी होती ज्यापैकी वर्ष १९६८ ते २००८ यामधील वेगवेगळ्या कालावधीशी संबंधीत रु.२२.१२ कोटी रक्कम पाच वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित होतो.

संबंधित राज्यांकडून यापैकी रु. १४.५२ कोटीची मागणी केली गेली. उर्वरित रक्कमेचे लेखापरिक्षा प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्याने ती प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले. लेखापरिक्षा कार्यालयातील संबंधित शाखेत याबाबत पडताळणी केली असता, असे आढळून आले की पडताळणी केली असता, असे आढळून आले की विभागाने अपूर्ण माहिती सादर केल्यामुळे तसेच दस्तऐवज सादर न केल्यामुळे लेखापरिक्षा प्रमाणपत्रे दिली गेली नव्हती. तसेच, विभागाने वर्ष-निहाय आणि राज्य-निहाय अशाप्रकारे सादर केलेल्या आकडेवारीमध्येही तफावत होती. वर्षनिहाय विवरणपत्राप्रमाणे रु. २२.११ कोटी रक्कम प्रलंबीत होती. तर, राज्य-निहाय विवरणपत्र रु. २१.७४ कोटी प्रलंबित असल्याचे दर्शवित होते. आकडेवारीच्या या दोन संचांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

तसेच, खाली दिल्याप्रमाणे २००८-०९ ते २०१२-१३ दरम्यानच्या वेगवेगळ्या कालावधीत १२ राज्यांमध्ये तैनात केलेल्या SRPF जवानांवरील एकूण रु. १६.२० कोटी खर्चाची रक्कम वसुलीसाठी प्रलंबित होती.

क्षेत्रीय कार्यालय	कालावधी	वसूल करावयाची रक्कम (रु. कोटीत)
विशेष पो.म.नि. (SRPF) पुणे	२००८-१३	६.२२
विशेष पो.म.नि. (SRPF) नागपूर	२००८-१३	९.९८
एकूण . .		**१६.२०**

मुख्यालयात, म्हणजेच, DGP कार्यालयात माहिती संकलित केली जात नसल्याचे आढळून आले. म्हणूनच, पोलिसांवरील प्रलंबित खर्चाच्या तपशील DGP कार्यालयात सहज उपलब्ध नव्हता. जे, याबाबतील कमकुवत देखरेख दर्शविते, ज्यामुळे, वर उल्लेखिल्याप्रमाणे १९६८ पासूनच्या कालावधीशी संबंधित खर्च मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिला.

हे निदर्शनास आणून दिल्यावर, DGP नी असे नमूद केले की, माहितीचे संकलन करण्याची तसेच खर्चाचे विवरणपत्रे तयार करण्याची जबाबदारी अतिरिक्त DGP यांची होती. तथापि, इतर राज्यांमध्ये तैनात केलेल्या पोलिसांच्या खर्चाचे विवरणपत्र तयार करणे आणि त्याचे एकत्रिकरण करणे यासाठी विहित केलेल्या पद्धतीचा अवलंब न केल्याने आणि याविषयी पाठपुरावा न केल्याने इतर राज्यात तैनात केलेल्या पोलिसांवरील रु. ३८.३२ कोटी खर्च वसूल झाला नाही ही वस्तुस्थिती कायम राहते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७.३.३.१ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या इतर राज्यामध्ये बंदोबस्ताकरिता तैनात करण्यात येतात. आक्षेपा मधील नमूद सदरहू कंपन्यांवर झालेल्या खर्चाची प्रलंबित रक्कम रु. १६.२० करोड इतकी होती. सदरहू आक्षेपाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

राज्याचे नाव	बंदोबस्त कालावधी/गट क्र.	प्राप्त रक्कम रुपये
कर्नाटक (विधानसभा-२००८)	१ मे २००८ ते २८ मे २००८ (गट क्र. १,२,५,७,८,१०)	रु. २,१४,३७,१५८ इतक्या रकमेचे लेखाप्रमाणपत्र या कार्यालयाचे दिनांक ११ एप्रिल २०११, दिनांक २२ सप्टेंबर २०११, दिनांक २५ जुलै २०१२, दिनांक ११ जून २०१३, दिनांक २२ ऑगस्ट २०१३, दिनांक १२ मे २०१५ च्या पत्रान्वये कर्नाटक राज्यास पाठवून प्रतिपूर्तीची विनंती केलेली आहे. अ.मु.स.(गृह) शासन, गृह विभाग यांचे इंग्रजी पत्रक. MISC ०२११/CR ८१/SPL-१A, दिनांक १६ नोव्हेंबर २०११ अन्वये प्रधान सचिव (गृह), कर्नाटक यांना प्रतिपूर्ती करिता विनंती केली आहे. तसेच या प्रकरणी असेही सादर करण्यात येते की, शासनपत्र, दिनांक ३० डिसेंबर २०१४ चे अनुषंगाने कर्नाटक राज्याकडून महाराष्ट्र राज्यास किती येणे आहे व महाराष्ट्र राज्याकडून कर्नाटक राज्यास किती देणे आहे याबाबतचा सविस्तर एकत्रित प्रस्ताव या कार्यालयाचे क्र. पोमसं/३५/२८०१/असीओ/कर्नाटक/३४/२०१३, दिनांक १६ मार्च २०१५ चे पत्रान्वये शासनास आदेशार्थ सादर करण्यात आलेला आहे. अशा रितीने गोवा, आसाम, राजस्थान या राज्याचे देखील एकत्रित सविस्तर प्रस्ताव शासनास आदेशार्थ सादर करण्यात आलेले आहेत. तसेच इतर सर्व राज्यांचे एकत्रित (प्रलंबित रकमेचे) प्रस्ताव सादर करण्याची तजविज या कार्यालयाने ठेवली आहे.
पंजाब (निवडणूक २०१२)	७ जानेवारी २०१२ ते १ फेब्रुवारी २०१२ (गट क्र.११, १४, १५)	रु. १,६१,६०,०९८ इतक्या रकमेच्या खर्च विवरणपत्रांच्या आधारे लेखा प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता या कार्यालयाचे दिनांक १० डिसेंबर २०१४, दिनांक १३ जानेवारी २०१६, दिनांक १५ जुलै २०१६ च्या पत्रान्वये महालेखकार-१, मुंबई यांना विनंती केलेली आहे. अद्याप महालेखाकार कार्यालयाकडून लेखाप्रमाण पत्र अप्राप्त. लेखा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित राज्याकडे रकमेची मागणी करण्याची तजविज ठेवली आहे.
उत्तरप्रदेश (निवडणूक २०१२)	२ फेब्रुवारी २०१२ ते ८ फेब्रुवारी २०१२ (गट क्र. ११,१४,१५)	रु. २,२८,३१,७७६ इतक्या रकमेच्या खर्च विवरणपत्रांच्या आधारे लेखा प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता या कार्यालयाचे दिनांक १५/१२/२०१४, दिनांक १३/१/२०१६, दिनांक १५/७/२०१६ च्या पत्रान्वये महालेखाकार-१, मुंबई यांना विनंती केलेली आहे. अद्याप महालेखाकार कार्यालयाकडून लेखा प्रमाणपत्र अप्राप्त. लेखाप्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित राज्याकडे रकमेची मागणी करण्याची तजविज ठेवली आहे.
गुजरात (निवडणूक २०१२)	२ डिसेंबर २०१२ ते २१ डिसेंबर २०१२ (गट क्र. १५)	रु. १,६९,९४,३६५ इतक्या रकमेच्या खर्च विवरणपत्रांच्या आधारे लेखाप्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता या कार्यालयाचे दिनांक १२ ऑक्टोबर २०१५, दिनांक १३ जानेवारी २०१६, दिनांक १४ जुलै २०१६ च्या पत्रान्वये महालेखाकार-१, मुंबई यांना विनंती केलेली आहे. अद्याप महालेखाकार कार्यालयाकडून लेखा प्रमाणपत्र अप्राप्त. लेखाप्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित राज्याकडे रक्कमेची मागणी करण्याची तजविज ठेवली आहे.

सन २००८ ते २०१३ पर्यंतच्या कालावधीपैकी वर नमूद केलेल्या एकूण रु. ७,७४,२३,३९७ (रुपये सात करोड चौऱ्याहत्तर लाख ते वीस हजार तीनशे सत्त्याण्णव) इतक्या रकमेच्या प्रतिपूर्ती करिता या कार्यालयाच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे. तसेच माहे १०/२०१० या कालावधीमध्ये बिहार राज्यात पार पडलेल्या बंदोबस्त खर्चाची रु. २,२९,१६,६४९ (अक्षरी रुपये दोन करोड एकोणतीस लाख सोळा हजार सहाशे एकोणपन्नास फक्त) प्रतिपूर्ती बिहार राज्याने केलेली आहे. सदरहू रकमेचा डि डि दिनांक १ ऑगस्ट २०१५ रोजी शासन जमा करण्यात आलेला आहे. आक्षेपातील उर्वरित रु. ६.१६ कोटी इतक्या रकमेच्या प्रतिपूर्तीकरिता आवश्यक तो कार्यवाही करण्याची तजविज ठेवली आहे.

२. महाराष्ट्र राज्याकडून विविध राज्यांमध्ये रा.रा.पो. बलाच्या कंपन्या मागणीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेकरिता तैनात करण्यात येतात. खालील नमूद राज्यांकडून प्रतिपूर्तीच्या रक्कमा प्राप्त झालेल्या आहेत.

राज्याचे नाव	बंदोबस्त कालावधी/गट क्र.	प्राप्त रक्कम रुपये	अभिप्राय
मध्यप्रदेश	११/१९९८ (गट ३,४,९, १२, १३) सन २००३ (गट ३,४, ९, १३)	रु. १,२४,३७,१५४	सदरहू रकमेचा डि डि दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी शासन जमा करण्यात आलेला आहे.
पाँडिचेरी	सन २००६ (गट १,२,४,७,११)	रु. ९४,५४,१६४	सदरहू रक्कम दिनांक ९ जून २०१०, दिनांक १८ जून २०१२ रोजी शासन जमा करण्यात आलेली आहेत.
बिहार	१०/२०१० (गट १४)	रु. २,२९,१६,६४९	सदरहू रकमेचा डि डि दिनांक १ ऑगस्ट २०१५ रोजी शासन जमा करण्यात आलेला आहे. सदरहू रक्कम शासन जमा केल्याबाबत या कार्यालयाचे दिनांक १९ ऑगस्ट २०१५ च्या पत्रान्वये शासनास कळविले आहे.
तामिळनाडू	सन २००१ (गट १, २, ३, ४, ६, ७, ८, १०, ११, १२) सन २००६ (गट क्र. १, ३, ५, ६, १०)		
एकुण . .		**५,४९,१३,७८४**	

वर नमूद केल्याप्रमाणे सन २०१० तसेच २०१६ या कालावधी मध्ये मध्यप्रदेश, पाँडिचेरी, बिहार, तामिळनाडू या राज्यांकडून एकूण रु.५,४९,१३,७८४ इतकी रक्कम खर्च बंदोबस्त प्रतिपूर्तीपोटी महाराष्ट्र राज्यास प्राप्त झालेली आहे.

इतर राज्य बंदोबस्त खर्च प्रतिपूर्तीसाठी अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, म. राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाच्या मार्फतीने बंदोबस्त खर्च विवरणपत्रे एकत्रितरित्या या कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्याबाबतच्या सूचना वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत. तसेच इतर राज्य बंदोबस्त खर्च प्रतिपूर्ती प्रकरणी योग्य तो पाठपुरावा करण्याकरिता नोंदवही ठेवण्याबाबत देखील कळविण्यात आलेले आहे. संबंधित गट कार्यालयाकडून योग्य त्या मार्फतीने खर्च विवरणपत्रे या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही या कार्यालयाचे स्तरावरून शक्य होते. गट कार्यालयाने सादर केलेल्या खर्च विवरणपत्रामध्ये काही प्रकरणी महालेखाकार कार्यालयाकडून त्रुटी दर्शविण्यात येतात. सदरहू त्रुटीची पूर्तता झाल्यानंतर महालेखाकार कार्यालयाकडून संबंधित बंदोबस्त कालावधीची लेखा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येतात. सदरची लेखा प्रमाणपत्र संबंधित राज्यास पाठवून खर्च प्रतिपूर्ती करिता या कार्यालयाकडून विनंती करण्यात येते.

६.५ परिच्छेद क्र. ७.३.३.२ शासकीय रेल्वे पोलीस (GRP) प्रती खर्चाची मागणी न करणे :

भारतीय रेल्वे वित्तीय संहितेच्या खंड-I मधील परिच्छेद ८५६ आणि MPM खंड-II च्या नियम १३८, १३९ नुसार शासकीय रेल्वे पोलीस (GRP) बळाची एकूण संख्या रेल्वेच्या सहमतीने निर्धारित केली असल्यास रेल्वे मध्ये तैनात केलेल्या GRP कर्मचाऱ्यांवरील खर्च राज्य शासन आणि रेल्वे यांनी ५०:५० प्रमाणात विभागून करायचा होता.

ADGP (रेल्वे) यांच्या कार्यालयाने सादर केलेल्या माहितीमधून असे आढळून आले की, १ एप्रिल, २००८ ते ३१ मार्च, २०१३ दरम्यान पुरविण्यात आलेल्या GRP च्या खर्चाच्या ५० टक्के एवढी म्हणजेच एकूण रु.२७४.८१ कोटीची मागणी केली गेली होती ज्यापैकी फक्त रु. १२४.३९ कोटी वसूल करण्यात आले. (ज्या तारखांना मागणी केली गेली आणि वसुली करण्यात आली त्याची नोंद अभिलेख्यांमध्ये उपलब्ध नव्हती.) GRP च्या खर्चाचे विवरणपत्र ADGP (रेल्वे) यांनी तयार करणे अपेक्षित होते. पुण्यासाठी १ एप्रिल, २०१० ते ३१ मार्च, २०१३ आणि मुंबईसाठी २०१२-१३ या कालावधीची विवरणपत्रे तयार केली गेली नव्हती. म्हणूनच या क्षेत्रांकडून संबंधित कालावधीसाठी देय असलेली रक्कम विभागाला निश्चित करता आली नाही आणि तिची मागणीही करता आली नाही.

असेही निदर्शनास आले की, २००८-०९ पूर्वीच्या कालावधीकरिता (१९७९-८० पासून) GRP च्या तैनातीवरील खर्चापोटी एकुण रु. १९३.९० कोटीची मागणी वसुलीसाठी प्रलंबित होती. नस्तीच्या तपासणीत असे निदर्शनास आले की, थकबाकीच्या वसुलीसाठी पर्याप्त पाठपुरावा करण्यात आला नव्हता. अशा मोठ्या प्रमाणातील थकबाकीची कारणे आणि थकबाकीच्या वसुलीसाठी विभागाने केलेले प्रयत्न याविषयीची माहिती जरी मागवली होती तरी विभागाने ती सादर केली नव्हती.

उत्तरादाखल विभागाने सांगितले की, थकबाकीचा निपटारा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. तथापि, विभागाकडून एकजुटीने प्रयत्न केले जात नसल्याने रेल्वेकडून मोठ्या प्रमाणात थकबाकीची वसुली प्रलंबित आहे. ही वस्तुस्थिती कायम राहते. ही बाब रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यास राज्य शासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

खालील नमूद सर्व माहिती ही अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म. राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून प्राप्त पत्रांच्या आधारे सादर करण्यात येत आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७.३.३.२ मध्ये अपर पोमसं, लोहमार्ग, म. राज्य, मुंबई यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने रु. २७४.८१ करोड इतकी प्रतिपूर्तीची मागणी सादर केल्याचे आक्षेपामध्ये नमूद आहे. त्यापैकी रु. १२४.३९ करोड इतकी रक्कम वसूल झाल्याची देखिल नमूद आहे. तसेच, अपर पोमसं यांचे कार्यालय आणि त्यांची अधिनस्त असलेली कार्यालये यांचेकडून प्रतिपूर्तीकरिता योग्य तो पाठपुरावा करण्यात येत नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. तसेच सदरहू प्रलंबित रकमेकरिता राज्य शासनाच्या स्तरावरून प्राथम्याने कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे आक्षेपात नमूद केलेले ओह.

अपर पोमसं, लोहमार्ग, म.राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र दिनांक १२ जुलै २०१७ द्वारे या कार्यालयास सादर केलेला तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

लोहमार्ग पोलिसांच्या पदावर केलेल्या खर्चाची ५०% प्रतिपूर्ती ची रक्कम रेल्वे प्रशासन (केंद्र सरकार) यांचे कडून होते. प्रत्येक आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर सादर केलेल्या विहित विवरणपत्रातील खर्चाच्या अनुषंगाने महालेखाकार कार्यालयाकडून सदरहू प्रतिपूर्तीचे लेखा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते. सदरहू लेखा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच लोहमार्ग घटक कार्यालयांकडून संबंधित रेल्वे प्रशासनाकडे ५०% प्रतिपुर्ती करिता देयके सादर केली जातात. रेल्वे प्रशासन त्यांचेकडील उपलब्ध निधीनुसार व मंजूर पदानुसार प्रतिपूर्तीचे धनादेश संबंधित घटक कार्यालयांना परस्पर वितरित करतात. प्रतिपूर्ती केलेली रक्कमही कोणत्या कालावधीची आहे याचा तपशील रेल्वे प्रशासनाकडून कधीही दिला जात नाही. सबब, कोणत्या कालावधीपर्यंत प्रतिपूर्ती रक्कम अदा केली आहे हा तपशील या कार्यालयाकडे उपलब्ध नसतो.

दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर सन २०१०-११ पासूनचे लेखा प्रमाणपत्र प्राप्त नसल्याने प्रतिपूर्तीची देयके सादर करणे शक्य झाले नाही. तद्रंतर सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात महालेखापाल कार्यालयाकडून सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखा प्रमाणपत्रे रेल्वे कार्यालयास प्राप्त झाली आहेत. सदरहू लेखा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने रेल्वे प्रशासनाकडे सदरहू रकमेची मागणी करण्यात आलेली आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रेल्वे प्रशासनाकडून एकूण रु. ११९,३९,७६,६५७ इतकी रक्कम धनादेशाद्वारे व रु. ८,३५,८१,४३८ इतकी रक्कम रेल्वे प्रशासनाने भाडे इ. कारणांसाठी समयोजित करून अशी एकूण रु. १२७,७५,५८,०९५ इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या अखेरीस तिन्ही घटक कार्यालयांचे मिळुन रु. ३०१,०६,३८,६४० इतकी रक्कम रेल्वे प्रशासनाकडून मिळणे प्रलंबित आहे.

अपर पोमर्स, लोहमार्ग, मुंबई यांचे पत्र क्र. अपोमर्स/लोह/सालेअ/लेखाआक्षेप/२०१४/६८५, दिनांक ४ एप्रिल २०१५ अन्वये, पोलीस महासंचालक कार्यालयाचे क्र. पोमसं/२६ ब/परि.७,२.९/२०१३, दिनांक १३ मे २०१५ अन्वये, शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने शासन गृह विभाग यांचे पत्र क्र. MIS १०१२/C. R. No. ४५/Pol-३, दिनांक २७ जुलै २०१५ अन्वये रेल्वे प्रोटेक्शन फोर्स यांना पत्र सादर करण्यात आलेले आहे. अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग आस्थापनेवरील तिन्ही घटकात मिळून ६४० पदांची रेल्वे बोर्डाची मंजुरी प्राप्त नव्हती. त्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर केल्यानंतर रेल्वे मंत्रालयाचे दिनांक २८ जुलै २०१४ च्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई कार्यालयाच्या मध्य रेल्वे अंतर्गत १०० पदांना मंजुरी दिल्याबाबत कळविले आहे. सबब, ६६१३ पदांपैकी ५४० पदांना अद्याप रेल्वे प्रशासनाची मंजुरी प्राप्त झालेली नाही.

रेल्वे प्रशासनाकडून प्राप्त रकमांचे विवरण खालीलप्रमाणे :—

एकुण प्रलंबित वसुली	रक्कम प्राप्त	रक्कम समायोजित	निव्वळ प्रलंबित वसुली
१०२१,९६,३१,९२५	५५९,८९,७९,०७६	४१,६०,३७,५५२	४,२०,४६,१५,२९७

६.६ परिच्छेद क्र. ७.३.३.३ इंडियन प्रिमियर लीग (IPL) आणि इतर क्रिकेट स्पर्धा दरम्यान तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची वसुली :

IPL आणि इतर क्रिकेट स्पर्धांच्या ठिकठिकाणी सुरक्षा पुरविण्यासाठी आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी पोलीस तैनात केले जातात. DGP यांनी वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रक सुचनांनुसार अशा तैनातीसाठी आठ तासांचे एक सत्र या प्रमाणात पोलिसांवरील खर्चाच्या वसुलीचा दर आधारलेला असतो.

सादर केलेल्या माहितीनुसार खालील दर्शविल्याप्रमाणे रु. ४.३९ कोटी रक्कम प्रलंबित होती.

मागणी करणारे कार्यालय	संयोजक/कार्यक्रमाचे नाव	सुरक्षा पुरविलेल्या तारखा	देय वसूल रक्कम
पोलीस आयुक्त, मुंबई	BCCI मुंबई क्रिकेट संघटना/ विश्वचषक २०११	६ मार्च २०११, ७ मार्च २०११, १२ मार्च २०११, १३ मार्च २०११, १८ मार्च २०११, २८ मार्च २०११, १ एप्रिल २०११, २ एप्रिल २०११ आणि ४ एप्रिल २०११	रु. २.६५ कोटी
पोलीस आयुक्त, नागपूर	विदर्भ क्रिकेट संघटना/ IPL २०१०	५ एप्रिल २०१०, १० एप्रिल २०१० आणि १२ एप्रिल २०१०	रु. ०.२० कोटी/निरंक
पोलीस अधिक्षक, नागपूर (ग्रामीण)	विदर्भ क्रिकेट संघटना/ IPL २०१०	५ एप्रिल २०१०, १० एप्रिल २०१० आणि १२ एप्रिल २०१०	रु. १.५४ कोटी/निरंक
		एकूण . .	रु. ४.३९ कोटी/निरंक

अशाप्रकारे, वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, दोन ते तीन वर्षे उलटूनही आजतागायत रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

तसेच, वर्ष २००८ मध्ये मुंबई येथे घेतले गेलेल्या IPL स्पर्धांसाठी केलेल्या पोलीस तैनातीचा तपशील आणि खर्चाच्या मागणीचा तपशील लेखापरिक्षकांना सादरही करण्यात आला नाही किंवा तो अभिलेख्यांमध्येही आढळून आला नाही. म्हणूनच, पोलिसांवरील खर्चाची प्रलंबित रक्कम निश्चित करता येऊ शकली नाही.

अशा कार्यक्रमांच्या वेळी तैनात केलेल्या पोलिसांवर झालेला खर्च निश्चित करण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्याचा विभागाने विचार करावा अशी शिफारस केली जात आहे. जेणेकरून खर्चाची वसुली करण्यात येईल आणि योग्य स्तरावर त्याचा पाठपुरावा केला जाईल.

(ii) पुणे येथे IPL स्पर्धांच्या वेळी तैनात केलेल्या पोलिसांवर झालेला खर्च देण्यासाठी सहारा अडव्हेंचर स्पोर्टस लि.ही IPL फ्रॅन्चायझी जबाबदार आहे. CP, पुणे यांनी सत्रांच्या आधारावर रु. १.९४ कोटीची मागणी केली आणि नंतर फ्रॅन्चायझीने विनंती केल्यावर एका स्पर्धेसाठी केलेली संपूर्ण तैनात हि एकच सत्र असल्याचे गृहीत धरून केलेल्या तैनातीच्या प्रत्यक्ष कालावधी विचारात न घेता मागणीची रक्कम कमी करून रु. १.१२ कोटी एवढी निश्चित केली. परिणामी रु. ८२ लाख एवढी कमी मागणी केली गेली. पुढे असेही निदर्शनास आले की, तैनातीचे कमी तास दर्शवून विभागाने चुकीची मागणी निर्धारीत केली होती. परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार रु. ४.६४ कोटी प्रत्यक्ष खर्च झाला आहे. अशाप्रकारे, मार्गदर्शक सूचना न अनुसरल्यामुळे रु. ३.५२ कोटी रक्कम कमी प्राप्त झाली.

तसेच, २० डिसेंबर, २०१२ रोजी भारत आणि इंग्लंड संघांदरम्यान खेळले गेलेल्या क्रिकेटच्या ट्वेंटी-२० स्पर्धांकरिता SP, पुणे यांनी अतिरिक्त सत्रांसाठी तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची वसुली केली नव्हती. या प्रकरणात रु.१७.०२ लाखाची कमी वसुली झाली.

स्वतः तयार केलेल्या सूचनांचे विभागाकडून पालन होत नव्हते हे वरील वस्तुस्थितीवरून दिसुन येते. ही बाब निदर्शनास आणून दिल्यावर, (मे, २०१३) CP, पुणे यांनी नमूद केले की, अतिरिक्तरित्या तैनात केलेल्या पोलिसांवर खर्चाच्या वसुलीस कदाचित न्यायालयात आव्हान दिले जाईल.

हे उत्तर योग्य नाही कारण मुंबई येथे खेळले गेलेल्या IPL स्पर्धांच्या वेळी, परिपत्रकातील सुचनांनुसार, ज्या सत्रांमध्ये पोलीस प्रत्यक्ष तैनात केले गेले होते त्यांची संख्या विचारात घेऊन पोलिसांवरील खर्च वसूल करण्यात आला होता. याबाबतीत एकसमान पद्धत अनुसरणे महसूल वाढीसाठी हितावह आहे.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

खालील नमूद सर्व माहिती ही घटक कार्यालयांकडून प्राप्त पत्रांच्या आधारे सादर करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त, मुंबई :

रुपये २.६५ कोटी ही रक्कम सन २०११ मध्ये खेळविण्यात आलेल्या वर्ल्ड कप क्रिकेट सन २०११ च्या सामन्याकरिता पुरविण्यात आलेल्या बंदोबस्ताची असून पूर्ण रक्कम रुपये २,६५,४९,८८५ इतकी आहे. सदर रक्कम आयोजकाने अदा केली असून वसुली पूर्ण झालेली आहे. (सोबत चलनाची प्रत **विवरण क्र. ११ जोडण्यात** आलेली आहे.)

पो. आ. नागपूर :

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसूल जमा अहवालातील परि.७.३.३.३ मध्ये पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांची विदर्भ क्रिकेट असोसिएशन, आयपीएल-२०१० ची पोलीस संरक्षणाची प्रलंबित रक्कम रु.०.२० करोड इतकी होती. सदरहू रु.१९,६८,६५९ इतकी रक्कम धनादेश क्र. ०१५८८२, दिनांक २१ नोव्हेंबर २०१५ रोजी प्राप्त झाली आहे. मागणी करण्यात आलेली पूर्ण रक्कम वसूल झालेली आहे. आक्षेपामधील नमूद पूर्ण रक्कमेची वसुली झालेली आहे.

पो.अ. नागपूर-भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन२०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७.३.३.३ मधील पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांची दिनांक ५ एप्रिल २०१० ते दिनांक १० एप्रिल २०१० व दिनांक १२ एप्रिल २०१० या कालावधीची विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूरची रु. १.५४ कोटी इतकी रक्कम प्रलंबित होती. सदरहू रक्कम अद्याप वसूल झालेली नाही. संबंधित घटक कार्यालयाकडून वसुलीची कार्यवाही सुरू आहे. पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी त्यांचे पत्र क्रं. नाजिग्रा/डी-६/१००/२०१६, दिनांक २३ ऑगस्ट २०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नागपूर व विदर्भ क्रिकेट असोसिएशन यांना वसुलीबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. जिल्हाधिकारी यांनी त्यांचे दिनांक १२ सप्टेंबर २०१६ अन्वये तहसीलदार, नागपूर यांना सदर रक्कम वसूल करण्याबाबत कळविले आहे. पुढील प्रगती अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवली आहे.

पो.अ.पुणे ग्रामीण-भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७.३.३.३ मधील पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांची २० डिसेंबर २०१२ या कालावधीची रु. १७.०२ लाख इतकी रक्कम प्रलंबित होती. सन २०१२ मध्ये महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन गहुंजे, पुणे येथे टी-२० आयपीएल क्रिकेट मॅच झाली होती. त्यासाठी पुरविण्यात आलेल्या पोलीस बंदोबस्तासाठी रु.१,३२,९४,८७१ इतके शुल्क आकारणीची रक्कम देय होती. सदरहु बंदोबस्ताची रु. १,५०,९४,७३२ इतकी रक्कम वसूल झालेली आहे. सदरहू रकमेमध्ये आक्षेपातील रु.१७.०२ लाख या रकमेचाही समावेश आहे. आक्षेपातील संपूर्ण रक्कम वसूल झालेली आहे.

६.७ परिच्छेद क्र. ७.३.३.४ खाजगी व्यक्ती :

पुरविलेल्या पोलीस संरक्षणाविषयीची तपशीलवार नोंद संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये ठेवली जाते. MPM च्या परिच्छेद ४८४ नुसार जरी खाजगी व्यक्तींना संरक्षणासाठी पुरविलेल्या पोलिसांचा खर्च आगाऊ वसूल करावयाचा असतो तरीही अशाप्रकारे आगाऊ वसुली करण्यात आली नव्हती किंवा त्यासाठी कुठलीही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली नव्हती. खाजगी व्यक्तींना पुरविलेल्या पोलीस संरक्षणाचा तपशील चाचणी तपासणी केलेल्या सर्व कार्यालयांतून मागवला गेला. परंतु, मुंबई आणि ठाणे व्यतिरिक्त इतर एकाही कार्यालयाने ही माहिती सादर केली नाही.

ठाणे येथील CP आणि SP कार्यालयाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांच्या तपासणीत असे आढळून आले की, २००८-०९ ते २०१२-१३ दरम्यान वेगवेगळ्या कालावधीत १९ व्यक्तींना पुरविलेल्या पोलीस संरक्षणावरील खर्च आजतागायत वसूल करण्यात आलेला नव्हता. परिणामी, SP, ठाणे येथे रु.३.६३ कोटी आणि CP, ठाणे येथे रु.१.०९ कोटी एवढी COP ची वसुली झाली नाही.

तसेच, CP मुंबई मध्ये २००८-०९ ते २०१२-१३ दरम्यान वेगवेगळ्या कालावधीत १७ व्यक्तींना पुरविलेल्या पोलीस संरक्षणाप्रीत्यर्थ रु. १.२३ कोटी एवढ्या COP ची आजतागायत वसुली करण्यात आली नाही. (जानेवारी, २०१४) हे निदर्शनास आणून दिल्यावर, CP आणि SP ठाणे यांनी नमूद केले की, थकबाकीच्या वसुलीसाठी जिल्हाधिकाऱ्यांबरोबर पत्र व्यवहार चालू आहे. रक्कम वसूल केली जाईल असे CP मुंबई यांनी सांगितले. याबाबतीत पुढील प्रगतीची माहिती प्रतिक्षित आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई :

१. खाजगी व्यक्तींना सशुल्क तत्वावर पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाची थकीत रुपये १.२३ कोटी रक्कमेपैकी रुपये १०,३७,३६० इतकी एकूण वसुली या ७ संरक्षीत व्यक्तींकडून त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे थकीत रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. (१) श्री. मोहन रावले—रु. १,६६,८५६ (२) श्री. विरेश रायचंद शहा—रु. ८८,५५२ ३) श्री. मधुकर रुपजी—रु. १,९१,७०० (४) श्री. तेजस रुपजी—रु. १,५६,२०० (५) श्री. निजर गोरवानी रु. ८४,१८७ (६) श्री. इम्तीयाज खत्री—रु. १,८२,९१३ (७) श्री. इरफान खत्री—रु. १,६६,९५२ (८) श्री. शरद पवार—रु. ४,२०,२२९ (९) श्री. मधु संघवी—रु. ६,००,००० या ९ व्यक्तींकडून त्यांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे एकूण रुपये २०,५७,५८९ इतकी वसुली करण्यात आली आहे.

२. (१) श्री. माजिद मेमन—रु. ४५,१९,७९९ (२) श्री. सुनिल जैन—रु.२८,४६,२८५ (३) श्री. शरद एस. पवार—रु. ४,२४,०७१ (४) श्री. अबु फरान आझमी—रु. ३,४८,४१५ या ४ व्यक्तींचे त्यांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे एकूण रुपये ८१,३८,५७० इतकी वसुली रक्कम माफ करण्यात आली आहे.

३. (१) श्री. कलीमुद्दीन शरीफ—रु. २६,२२४ (२) श्री. नंदकुमार नाईक—रु. ५८,००४ (३) श्री. मधु संघवी—रु. २,९४,१७७ (४) श्री. विजय कांबळे—रु. ५,१४,१४३ (५) श्री. मिलींद निखारगे—रु. ३,४८,८८२ (६) श्री. राजेंद्र वाणी—रु. ८,३७,२५० इत्यादी व्यक्तींकडून एकूण रु. २०,७८,६८० इतके संरक्षण शुल्क थकीत आहे.

वसूल केलेले संरक्षण शुल्क	माफ केलेले संरक्षण शुल्क	थकीत असलेले संरक्षण शुल्क	एकूण
२०,५७,५८९	८१,३८,५७०	२०,७८,६८०	१,२२,७४,८३९

पो. आ. ठाणे शहर—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७.३.३.४ मध्ये पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांची २००९ ते २०१३ या कालावधीची खाजगी व्यक्तींची पोलीस संरक्षणाची रक्कम रु. १.०९ कोटी इतकी प्रलंबित होती.

पोलीस आयुक्त, ठाणे शहर कार्यालयाने एकूण ४ खाजगी व्यक्तींकडून बंदोबस्त शुल्क रक्कम रु. २०,८९,२०१ (बंदोबस्त शुल्क रु. १८,९७,५१६ + व्याज रु. १,९१,६८५) वसूल केले आहे.

तसेच, एकूण १३ खाजगी व्यक्तींना पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाची एकूण रक्कम रु. १०३,६२,२२८ पैकी रु. १६,६८,२२० इतकी रक्कम वसूल झाली असून उर्वरित रक्कम रु. ८६,९४,००८ वसूल होणे प्रलंबित आहे.

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी प्रलंबित रक्कमेबाबत दिनांक २२/०८/२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र व्यवहार केलेला आहे.

पो. अ. ठाणे ग्रामीण—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७.३.३.४ मध्ये पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांची खाजगी व्यक्तीची पोलीस संरक्षणाची प्रलंबित रक्कम रु. ३.६३ कोटी इतकी होती. सदरहू रकमेपैकी पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचेकडील काही प्रकरणे पोलीस अधीक्षक, पालघर यांचेकडे वर्ग केली आहेत. पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचेकडे श्री. शशी थंपी यांना पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाची थकीत रक्कम रु. २०,५९१ इतकी आहे. सदरहू रक्कम अद्याप वसूल झाली नाही. क्र. पोआ/ठाग्रा/सलेअ/६२/२०१७, दिनांक ४ ऑगस्ट २०१७ च्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी कार्यालयास सदरहू रकमेच्या वसुलीबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. सध्या संरक्षण बंद आहे.

पो. अ. पालघर—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७,३,३,४ मध्ये पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांची २००९ ते २०१३ या कालावधीची खाजगी व्यक्तींची पोलीस संरक्षणाची प्रलंबित रक्कम रु. ३.६३ कोटी इतकी होती. सदरहु रकमेपैकी पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचेकडील (१) श्री. गोविंदा यलप्पा गुंजाळकर (२) सुनिल चंद्रकांत भुसारा व श्री. सुधाकर भोजा शेट्टी ही प्रकरणे पोलीस अधीक्षक, पालघर यांचेकडे वर्ग केली आहेत.

श्री. गोविंदा गुंजाळकर यांना ठाणे ग्रामीण जिल्ह्याकडून दिनांक १८ डिसेंबर २००८ पासून भरपाई तत्त्वावर संरक्षण पुरविण्यात आलेले होते. सदरहु संरक्षणाचे शुल्काची प्रलंबित रक्कम रु. ३,४४,५३,३४७ इतकी होती. सदरहू रकमेवर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचेकडील परिपत्रक क्र. जिविशा/टी-४/संरक्षण/२००९-६०६८, दिनांक २८ जुलै २००९ मध्ये नमूद केल्यानुसार संरक्षित व्यक्ती यांचेकडे दरमहा ९.५ टक्के व्याजाची आकारणी केल्याने रकमेचा फुगवटा होऊन रकमेमध्ये अवाढव्य वाढ झाली होती. ही बाब पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या

निदर्शनास आल्यानंतर सदरहू शुल्काची नव्याने परिगणना होऊन रु. ६६,०८,५०० इतकी रक्कम प्रलंबित असल्याचे संबंधितास कळविण्यात आले आहे. त्यापैकी रु. ३३,०८,००० इतकी रक्कम आत्तापर्यंत वसूल करून शासन जमा केलेली आहे. तसेच रु. ३३,००,५०० इतकी रक्कम प्रलंबित आहे. पोलीस अधीक्षक, पालघर यांनी सदरहू रक्कम वसुलीसाठी मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना दिनांक २५ सप्टेंबर २०१७ रोजी पत्रव्यवहार केला आहे. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेला रिट अर्ज क्र. ८३३७/२०१५, दिनांक ११ फेब्रुवारी २०१६ च्या अनुषंगाने वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

श्री. सुधाकर भोजा शेट्टी यांचेकडील संरक्षण शुल्काची प्रलंबित रक्कम वसूल झालेली नाही. सदरहू प्रकरणी मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना पत्रव्यवहार केला आहे. सदरहू प्रकरणी तहसीलदार, वसई यांना महसुली कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यासंबंधी श्री. सुधाकर शेट्टी यांना नोटीस दिली आहे. तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांना पोलीस अधीक्षक, पालघर यांनी त्यांचे दिनांक ३० जुलै २०१६ चे पत्रान्वये जमीन महसूल संहिता, १९६६ प्रमाणे कार्यवाही होणे करिता पुन्हा विनंती केली आहे. कसुरदार यांनी वसई न्यायालयात मुख्य सचिव व पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी, नालासोपारा यांचे विरुद्ध वसई न्यायालयात दिवाणी दावा क्र. ४६/२०१६, दिनांक ११ एप्रिल २०१६ अन्वये दाखल केला असल्याचे पोलीस अधीक्षक, पालघर पोलीस महासंचालक कार्यालयास कळविले आहे. सदरचा दावा हा अद्यापपर्यंत न्यायप्रविष्ट आहे. श्री. सुनिल भूसारा यांची आक्षेपातील रु. ४,२५,८६३ इतकी पूर्ण रक्कम वसूल झालेली आहे.

सदरहू खाजगी व्यक्तींची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	खाजगी व्यक्तीचे नाव	बंदोबस्त शुल्काची रक्कम	वसूल केलेली रक्कम	प्रलंबित रक्कम	सध्या संरक्षण
१.	श्री. गोविंदा गुंजाळकर	६६०८५००	३०८०००	३३००५००	संरक्षण बंद
२.	श्री. सुधाकर शेट्टी	१७९८१८७	०	१७९८१८७	संरक्षण बंद
३.	श्री. सुनिल भुसारा	४२५८६३	४२५८६३	०	संरक्षण बंद
	एकूण . .	८८३२५५०	३७३३८६३	५०९८६८७	

सदरहू प्रकरणी वेळोवेळी वसुलीकरिता पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

६.८ परिच्छेद क्र. ७.३.३.५ महापालिका :—

तैनात केलेल्या पोलिसांचा प्रवर्गनिहाय तपशील, मागणी केलेला COP वसुलीची प्रलंबित रक्कम इत्यादी दर्शविणाऱ्या कुठल्याही नोंदवह्या विभागात ठेवण्यात आल्या नव्हत्या आणि COP च्या वसुलीस संगणकीकृतही करण्यात आले नव्हते. त्याचप्रमाणे COP वसुलीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी वरील तपशील असणारे कोणतेही नियतकालिक विवरणपत्र विहित केले नव्हते.

(*i*) २००८-२००९ ते २०१२-२०१३ दरम्यान वेगवेगळ्या कालावधीत महानगरपालिका कार्यालयांमध्ये तैनात केलेल्या पोलिसांविषयी आठ CP आणि दोन SP यांच्या कार्यालयातील नस्तीच्या तपासणीत असे आढळून आले की, तैनातीवरील रु. ४५.०१ कोटी एवढ्या COP ची वसुली करण्यात आली नव्हती ज्याची यादी परिशिष्ट XVI मध्ये दिली आहे.

(*ii*) CP, मुंबई यांच्या कार्यालयांतील नस्तीवरून असेही निदर्शनास आले की, २००८-०९ आधी बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये (MCGM) तैनात केलेल्या पोलिसांच्या खर्चाचा तपशील उपलब्ध नव्हता.

(*iii*) CP, सोलापूर यांच्या कार्यालयात, सोलापूर महानगरपालिकेमध्ये तैनात केलेल्या पोलिसांवर २०७-२००८ पर्यंत रु. २.९३ कोटी खर्चाची वसुली प्रलंबित होती.

(*iv*) SP नांदेड येथे, मार्च, २००७ ते फेब्रुवारी, २००८ दरम्यान नांदेड वाघाला महानगरपालिकेला पुरविलेल्या पोलिसांवरील रु.२१.३१ लाख खर्चाची वसुली प्रलंबित होती.

१९९३-१९९८ दरम्यान जारी केलेल्या शासन निर्णयांमधील COP ची आगाऊ वसुली करण्याविषयीच्या सुचनांचे जर पालन केले गेले असते तर स्थानिक संस्थांकडून मोठ्या प्रमाणात वसुली प्रलंबित राहण्याची जी परिस्थिती सध्या उद्‌भविली आहे. ती टाळता आली असती, याचा इथे उल्लेख करणे उचित ठरेल.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

खालील नमूद सर्व माहिती ही घटक कार्यालयांकडून प्राप्त पत्रांचय आधारे सादर करण्यात येत आहे.

पो. आ. अमरावती—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७.३.३.५ मधील पोलीस आयुक्त, अमरावती यांची जुलै, २००९ ते मार्च, २०११ या कालावधीची रु. ३५,९२,६७३ इतकी रक्कम प्रलंबित होती.

सदरहू रक्कम पूर्ण वसूल झालेली आहे.

अ. क्र.	महानगरपालिकेचे नाव	बंदोबस्त शुल्काची रक्कम	वसूल झालेली रक्कम	धनादेश क्र. व दिनांक
१.	अमरावती महानगरपालिका	३५,९२,६७३	९,६०,३५७	क्र. २१८१०२, दिनांक १३ जून २०१३
			२,६१,०००	क्र. २१८१०४, दिनांक १३ जून २०१३
			१८,१०,९४८	क्र. २१८१८०६, दिनांक २९ जुलै २०१३
			८,२१,३६८	क्र. २१८१८३१, दिनांक २७ डिसेंबर २०१३
		एकूण . .	३५,९२,६७३	

पो.आ.औरंगाबाद—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७.३.३.५ मधील पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांची मे, २०११ ते मार्च, २०१३ या कालावधीची रु. २,१०,३६,७३३ इतकी रक्कम प्रलंबित होती.

अ. क्र.	महानगरपालिकेचे नाव	बंदोबस्त शुल्काची रक्कम	वसूल झालेली रक्कम	धनादेश क्र. व दिनांक
१.	औरंगाबाद महानगरपालिका	२,१०,३६,७३३	२५,००,०००	क्र. १६४०१८, दि. २५ फेब्रुवारी २०१३
			५३,३३,३८०	क्र. १७२५५९, दि. २८ मार्च २०१३
			५०,००,०००	क्र. २४८०७२, दि. १६ फेब्रुवारी २०१५

तसेच उर्वरित रु. १,२८,२५,३९९ इतकी रक्कम औरंगाबाद महानगरपालिका यांचेकडे प्रलंबित आहे. सदरहू प्रलंबित रकमेबाबत महानगरपालिकेकडे वेळोवेळी पत्र व्यवहार करण्यात येतो. पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचे क्र. कक्ष ५ (१) महसूल जमा/२०१६/१३९७९, दि. २५ ऑगस्ट २०१६ अन्वये महानगरपालिका औरंगाबाद यांना वसुलीबाबत पत्र पाठविले आहे. वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई :

ऑक्टोबर, २००९ ते मार्च, २०१२ दरम्यान बृहन्मुंबई महापालिका कार्यालयांमध्ये अतिरिक्त तैनात केलेल्या पोलिसांच्या मनुष्यबळाच्या वेतन व भत्त्यापोटी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना रु. ४,१५,९०,००० इतकी रक्कम वसूल करणेबाकी आहे. सदर अतिरिक्त संरक्षण शुल्काची तसेच नोव्हेंबर, २०१७ पर्यंत प्रलंबित अतिरिक्त पोलीस संरक्षण शुल्काची तसेच नोव्हेंबर, २०१७ पर्यंत प्रलंबित अतिरिक्त पोलीस संरक्षण शुल्काची पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या अधिनस्त थकीत जलदेयकांच्या रुपये १८.४२ कोटी इतक्या मूळ आकाराशी पुस्तकी समायोजनाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. शासन मान्यतेनंतर सदर रक्कमेचे पुस्तकी समायोजन करण्यात येईल.

सन २००८-०९ ते २०१२-१३ दरम्यान बृहन्मुंबई महापालिका कार्यालयांमध्ये कायम स्वरुपी तैनात केलेल्या पोलिसांच्या मनुष्यबळाच्या वेतन व भत्त्यापोटी देय संरक्षण शुल्काचे पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना महानगरपालिकेकडून डिसेंबर, २०१४ पर्यंत देय असलेल्या एकूण रुपये ३४,४३,९,०८४ रक्कमेपैकी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तांच्या अखत्यारितील मालमत्ता कराच्या रु. २९,०४,३७,९२१ इतक्या रकमेचे कर निर्धारक व संकलक बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी पुस्तकी समायोजन केले असून त्यामुळे पोलीस आयुक्त, यांच्या विविध विभागातील मालमत्ता करांची दिनांक ३१ मार्च २०१५ पर्यंतची रक्कम समायोजित झालेली आहे. असे उप आयुक्त, (अतिक्रमण निर्मुलन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या पत्र क्र. उप आयुक्त/अनि/९१३, दिनांक २७ मे २०१५ अन्वये कळविले आहे. **(विवरण पत्र क्र. १२).**

सहायक आयुक्त, (अनि.) शहर यांच्या पत्र क्र. सआ/अनि/शहर/४९, दिनांक २८ एप्रिल २०१६ मध्ये नमूद समायोजनाच्या सआ/अनि/शहर/४९ दिनांक २८/०४/२०१६ मध्ये नमूद समायोजनाच्या विवरणपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये महालेखाकाराच्या आक्षेपातील रु. २७९३.२६ लाख इतक्या रकमेचे पूर्णतः पुस्तकी समायोजन झाल्याचे दिसून येते.

पो. अ. नागपूर—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ७.३.३.५ मधील पोलीस आयुक्त, नागपूर यांची ऑक्टोबर, २०११ ते मार्च, २०१३ या कालावधीची रु. १,५८,१४,००८ इतकी रक्कम प्रलंबित होती.

अ. क्र.	महानगरपालिकेचे नाव	बंदोबस्त शुल्काची रक्कम	वसूल झालेली रक्कम	धनादेश क्र. व दिनांक
१	नागपूर महानगरपालिका	१,५८,१४,००८	२४,६९,२९७	क्र. ५३१११७८, दिनांक २२ जुलै २०१४
			२४,६०,२९७	क्र. ५३१११८०, दिनांक २२ जुलै २०१४
		एकूण . .	४९,२९,५९४	

तसेच उर्वरित रु. १,०८,८४,४१४ इतकी रक्कम नागपूर महानगरपालिका यांचेकडे प्रलंबित आहे. पोलीस आयुक्त, नागपूर यांनी नागपूर महानगरपालिका यांचेकडे असलेल्या प्रलंबित रक्कम वसुलीसाठी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना दिनांक १ जुलै २०१७ रोजी पत्रव्यवहार केलेला आहे.

पो. आ. नाशिक—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७.३.३.५ मधील पोलीस आयुक्त, नाशिक यांची जानेवारी, २०११ ते मार्च, २०१३ या कालावधीची रु. १,०९,८९,१४७ इतकी रक्कम प्रलंबित होती. सदरहू रक्कम पूर्ण वसूल झालेली आहे.

अ.क्र.	महानगरपालिकेचे नाव	बंदोबस्त शुल्काची रक्कम	वसूल झालेली रक्कम	धनादेश क्र. व दिनांक
१	नाशिक महानगरपालिका	१,०९,८९,१४७	३७,०६,८९२	क्र. ८९३६४९, दिनांक २३ जुलै २०१३
			९५,५७,५५०	क्र. ९२३३७२, दिनांक १८ फेब्रुवारी २०१५
		एकूण . .	१,०९,८९,१४७	

पो. आ. पुणे—भारताचे नियंत्रक व महोलखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७.३.३.५ मधील पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची एप्रिल, २००९ ते मार्च, २०१३ कालावधीची रु.३,३६,४४,२६८ इतकी रक्कम प्रलंबित होती. सदरहू रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची नसून पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी यांची आहे. सदरहू रकमेची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	महानगरपालिकेचे नाव	बंदोबस्त शुल्काची रक्कम	वसूल झालेली रक्कम	धनादेश क्र. व दिनांक
१	पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी.	३,३६,४४,२६८	२,१८,१४२	क्र. ०१४४५८, दिनांक ३० नोव्हेंबर २०१२

तसेच उर्वरित रु. ३,३४,२६,१२६ इतकी रक्कम पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी यांच्याकडे प्रलंबित आहे.

पो. आ. सोलापूर—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७,३,३,५ मधील पोलीस आयुक्त, सोलापूर यांची एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ या कालावधीची रु.२,०७,६४,४६५ इतकी रक्कम प्रलंबित होती. सदरहु रक्कम पूर्ण वसूल झालेली आहे.

अ. क्र.	महानगरपालिकेचे नाव	बंदोबस्त शुल्काची रक्कम	वसूल झालेली रक्कम	धनादेश क्र. व दिनांक
१	सोलापूर महानगरपालिका	२,०७,६४,४६५	१,५०,००,०००	क्र. ५५०९३९, दिनांक ११ मार्च २०१४
			१,१२,००,०००	क्र. ५९२४२२, दिनांक ३१ मार्च २०१५
		एकूण . .	२,०७,६४,४६५	

पो. आ. ठाणे—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७,३,३,५ मधील पोलीस आयुक्त, ठाणे यांची एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ या कालावधीची रु. ५३,५२,०८१ इतकी रक्कम प्रलंबित होती.

अ.क्र.	महानगरपालिकेचे नाव	बंदोबस्त शुल्काची रक्कम	वसूल झालेली रक्कम	धनादेश क्र. व दिनांक
१	केडिएमसी	५३,५२,०८१	३०,७८५	क्र. १७/१२, दिनांक २ मे २०१३
		एकूण . .	३०,७८५	

उर्वरित रु.५३,२१,२९६ इतकी रक्कम केडीएमसी यांचेकडे प्रलंबित आहे. सदरहू रक्कम वसुलीकरिता दिनांक २५ ऑगस्ट २०१६ रोजी पत्र व्यवहार करण्यात आलेला ओह. वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

पो. अ. नांदेड—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७,३,३,५ मधील पोलीस अधीक्षक, नांदेड यांची मार्च, २००७ ते फेब्रुवारी, २००८ या कालावधीची रु. २१.३१ लाख व मार्च, २००८ ते फेब्रुवारी, २०११ या कालावधीची रु. ७९,०७,०६८ तसेच मार्च, २०११ ते फेब्रुवारी, २०१३ या कालावधीची रु.६५,८२,५३७ इतकी रक्कम प्रलंबित होती. सदरहू रक्कम अद्याप वसूल झाली नाही. वसुली कार्यवाही सुरू आहे.

पो. अ. ठाणे—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७,३,३,५ मधील पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांची मिरा-भाईंदर महानगरपालिकेची रु. ३५,०१,०६८ इतकी रक्कम प्रलंबित होती.

अ.क्र.	महानगरपालिकेचे नाव	बंदोबस्त शुल्काची रक्कम	वसूल झालेली रक्कम	धनादेश क्र. व दिनांक
१	मिरा-भाईंदर महानगरपालिका	३५,०१,०६८	१०,०९,५६१	क्र. ६१६७०९, दिनांक ३ सप्टेंबर २०१६

सदरहू धनादेश शासन जमा करण्याची तजविज ठेवली आहे. रु. ३५,०१,०६८ इतक्या रकमेपैकी रु. १०,०९,५६१ इतकी रक्कम वसूल झाली असून, रु. २४,९१,५०७ इतकी रक्कम प्रलंबित आहे. सदरहू प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडे वसुलीबाबत वेळोवेळी पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक २६ फेब्रुवारी २०१६ च्या पत्रान्वये पुन्हा वसुलीची रक्कम भरण्याकरिता विनंती केलेली आहे.

६.९ परिच्छेद क्र. ७.३.३.६ बँका तसेच इतर शासकीय/बिगर शासकीय संस्था :—

पाच CP आणि चार SP यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांची तपासणी केली असता, असे निदर्शनास आले की, २००८-०९ ते २०१२-१३ दरम्यान वेगवेगळ्या कालावधीत विविध बँका तसेच इतर शासकीय आणि बिगर शासकीय संघटनांकडे तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चापैकी एकूण रु. १६.७७ कोटी रक्कमेची वसुली मे, २०१३ पर्यंत प्रलंबित होती ज्याचा तपशील **विवरण क्र. १३ मध्ये** दिला आहे. या कार्यालयांनी वसुलीसाठी वेळोवेळी पाठपुरावा केला असल्याचे दर्शविणारी कुठलीही नोंद अभिलेख्यांमध्ये नव्हती. तसेच, जानेवारी, २०१३ ते जून, २०१३ या कालावधीत महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती महामंडळ लि. येथे तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाच्या प्रलंबित वसुलीची माहिती SP नागपूर यांच्याकडे उपलब्ध नव्हती. COP ची आगाऊ वसुली करणे आवश्यक होते. परंतु असे न केल्यामुळे मोठ्या प्रमाणात थकबाकीचा संचय झाला. हे निदर्शनास आणून दिल्यावर, बँक ऑफ महाराष्ट्र कडून रु.१.१७ कोटी वसूल करण्यात आल्याचे CP, ठाणे यांनी कळविले. (ऑगस्ट, २०१३)

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांची स्पष्टीकरणाची प्रत स्वतंत्र जोडली आहे.

सर्व संबंधित घटक कार्यालयांची माहिती ही त्यांच्या प्राप्त पत्रांच्या आधारे सादर करण्यात येत आहे.

लेखा आक्षेपातील परि.क्र. ७.३.३.६ मधील पोलीस आयुक्त, मुंबई/नागपूर/पुणे/सोलापूर/ठाणे व पोलीस अधीक्षक, नांदेड/नाशिक/सोलापूर/ठाणे यांची रु. १६७७.३८ लाख इतकी रक्कम प्रलंबित असल्याचे आक्षेपात नमूद आहे.

या कार्यालयाच्या अधिनस्त कार्यालयांची लेखा आक्षेपातील रु.६०४.६९ लाख इतक्या प्रलंबित असलेल्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

अ.क्र.	घटक कार्यालयाचे नांव	आक्षेपातील रक्कम (रुपये लाखात)	वसूल झालेली रक्कम	प्रलंबित रक्कम
१.	पो. आ. ठाणे	११७.४०	१,१७,४०,०००	-
२.	पो. आ. नागपूर	२६७.३४	२,०७,३४,६८५	४७,३३,४७९
३.	पो. आ. सोलापूर	५.१४	५,१४,०००	-
४.	पो. आ. पूणे शहर	६७.६५	४७,४३,६१०	२०,२१,९४०
५	पो. अ. नाशिक	१७.०७	१७,०६,८९४	-
६	पो. आ. नांदेड	१२५.३६	-	१,१९,५७,६०२
७	पो. अ. ठाणे ग्रा.	०.१०	१०,०७९	-
८	पो. अ. सोलापूर	४.६३	१,००,०००	३,६३,२७०
	एकूण . .	६०४.६९	३,९५,४९,२६८	१,९०,७६,२९१

एकूण २७ बँका तसेच इतर शासकीय/बिगर शासकीय संस्थाकडे तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाबाबतची माहिती सोबतच्या **विवरण पत्र क्र. १४** भरुन सादर करण्यात येत आहे.

	एकूण बँका	वसुली पूर्ण झालेल्या संस्था	कमी संरक्षण पुरविल्यामुळे कमी वसुली करण्यात आलेल्या संस्था	वसुली न झालेल्या एकुण संस्था
	२७	१३	३	११
एकूण वसुली रक्कम	१०७२.६९	२७५.५८	२६०.९५ च्या ऐवजी १४८.४१	५३६.१६

६.१० परिच्छेद क्र. ७.३.४ पोलिसांवरील खर्चाच्या सहाव्या वित्त आयोगाच्या थकबाकीची वसुली न करणे :—

१ जानेवारी २००६ पासून महाराष्ट्र शासनाने सहावा वित्त आयोग लागू केला. या संदर्भात १४ जानेवारी २०१० रोजी DGP नी जारी केलेल्या परिपत्रक सूचनांनुसार, खाजगी व्यक्ती आणि इतर संस्थांच्या सुरक्षेसाठी तैनात केलेल्या पोलिसांच्याबाबतीत सुधारित दरामुळे निर्माण झालेल्या रक्कमेतील फरकाची वसुली, १ जानेवारी २००६ पासून करण्याची कार्यवाही CP/SP च्या स्तरावर करायची होती.

CP पुणे, SP नाशिक, SP पुणे आणि SP सोलापूर यांच्या अभिलेख्यांच्या तपासणीत असे आढळून आले की, याबाबतीत कोणतीही कार्यवाही केली गेली नव्हती. तसेच, वसूल करायची फरकाची रक्कमही निश्चित करण्यात आली नव्हती. लेखापरिक्षणादरम्यान ती परिगणित केली असता, वसुलीयोग्य फरकाची रक्कम CP पुणे येथे रु. ५.८१ कोटी, SP नाशिक येथे रु. ९५.२९ लाख आणि SP पुणे येथे रु. १६.३८ लाख असल्याचे निदर्शनास आले. तैनात केलेल्या पोलिसांविषयीची आवश्यक माहिती उपलब्ध नसल्याने SP सोलापूर येथे फरकाची रक्कम परिगणित करता येऊ शकली नाही. हे निदर्शनास आणून दिल्यावर, योग्य प्रकारे पडताळणी केल्यावर फरकाची रक्कम वसूल केली जाईल असे संबंधित कार्यालयांनी सांगितले.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

खालील नमूद सर्व माहिती ही घटक कार्यालयाकडून प्राप्त पत्रांच्या आधारे सादर करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त, पुणे शहर :—यांचे क्र. लेशा ७(३)/लोकलेखा-५१७/२०१६/२२५१, दिनांक २८ सप्टेंबर २०१६ च्या पत्रांच्या आधारे खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७.३.४ मधील पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची रु. ५.८१ करोड इतकी रक्कम प्रलंबित होती. प्रलंबित येणे रकमेवर प्राधान्याने कार्यवाही घेण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडील स्वायत्त संस्थांकडील रु.५.८१ करोड इतक्या प्रलंबित रकमेचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

पो. अ. नाशिक ग्रामीण—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७.३.४ मधील पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांची रु. ९५.२९ करोड इतकी रक्कम प्रलंबित होती. खाजगी व्यक्ती व स्वायत्त संस्था यांना पोलीस संरक्षण देण्यात आलेले होते. त्यांचेकडील सहावे वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम वसूल करण्यात आलेले नाही. भारतीय खाद्य निगम, जिल्हा कार्यालय, मनमाड यांना संरक्षण पुरविल्याची रक्कम ही पूर्ण महिन्याचे दिवस धरल्याने सदरची रक्कम रु. ९५.२९ लाख अशी आहे. परंतु सहाव्या वेतन आयोग फरकाची रक्कम ही भारतीय खाद्य निगम यांना संरक्षण पुरविल्याचे हजेरी पटावरून कमी होऊन आकारण्यात येऊन ती रक्कम रु. ९५.२९ लाख ऐवजी रु. १६,२५,०७९ अशी आकारण्यात आली आहे व सदरची रक्कम चलनाद्वारे भरणा करण्यात आलेली आहे. सदर चलनात प्रत व इतर कागदपत्रे महालेखाकार, मुंबई यांना सादर केल्याने महालेखाकार, मुंबई यांनी सदर परिच्छेद निकाली काढलेला आहे.

पो. अ. पुणे ग्रामीण—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७.३.४ मधील पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांची रु. १६.३८ करोड इतकी रक्कम प्रलंबित होती. खाजगी व्यक्ती व स्वायत्त संस्था यांना पोलीस संरक्षण देण्यात आलेले होते. त्यांचेकडील सहावे वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती बाबत आदेश सन २००९ मध्ये झाले आहेत. पूर्वी दिलेल्या सशुल्क बंदोबस्ताची रक्कम त्यावेळी असलेल्या प्रचलित दराने संबंधित खाजगी व्यक्ती व स्वायत्त संस्थास यांनी भरणा केलेली आहे. मात्र आता ३ वर्षांनी पूर्वीचे दर सुधारित करून त्यांची फरकाची रक्कम संबंधित खाजगी व्यक्ती व स्वायत्त संस्था भरण्यास तयार नाहीत. तथापि, वसुलीबाबत पाठपुरावा करणेत आलेला आहे.

पो. अ. सोलापूर ग्रामीण—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि. ७.३.४ मधील पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेकडील खाजगी व्यक्ती व स्वायत्त संस्था यांना पोलीस संरक्षण देण्यात आलेले होते. त्यांचेकडील सहावे वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. सदरहू प्रकरणाबाबत पुरविण्यात आलेल्या बंदोबस्तापोटी प्रत्यक्ष वसूल केलेली रक्कम व सहाव्या वेतन आयोगानुसार वसूल करावयाची रक्कम याचा ताळमेळ घालून प्रत्यक्षात फरकाची रक्कम काढून वसुलीची कार्यवाही करीत आहोत.

मुद्या क्र.-७.३.४ लेखा आक्षेपामधील पुणे शहर यांची प्रलंबित रक्कम

अ.क्र.	स्वायत्त संस्थेचे नाव	२००६-०९ कालावधीतील प्रलंबित रक्कम	२००९-१० कालावधीतील प्रलंबित रक्कम	वसूल झालेली रक्कम	प्रलंबित रक्कम
१.	कॅनरा बँक, सेनापती बापट रोड, पुणे	२७२९८०४	१७३७३८२	०	४४६७१८६
२.	सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कॅम्प शाखा, पुणे	४२८०३४१	१५५५३३२	०	५८३५६७३
३.	बँक ऑफ इंडिया, पिंपरी शाखा, पुणे	२९०३१३०	५४५४९०	३४४८६२०	०
४.	बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड, पुणे	४२८०३४१	१३२०१८०	०	५६००५२१
५.	युनियन बँक ऑफ इंडिया, टिळक रोड, पुणे	६५९३०७५	१३२०१८०	०	७९१३२५५
६.	देना बँक, सदाशिवपेठ, पुणे	०	१३२०१८०	५८०४८६०	१३२०१८०
७.	बँक ऑफ इंडिया, शनिवार, पुणे	५९२३०११	१३२०१८०	०	१४३८३३१
८.	बँक ऑफ बडोदा, रास्ता पेठ, पुणे	६७७९९७८	१३२०१८०	०	८१००१५८
९.	बँक ऑफ महाराष्ट्र, पिंपरी शाखा, पुणे	०	१३२०१८०	०	१३२०१८०
१०.	स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखा, पुणे	४२८०३४१	०	०	४२८०३४१
११.	सिडिकेट बँक, रास्ता पेठ, पुणे	६५९३७५	०	६५९३७५	०
१२.	पंजाब नॅशनल बँक, अरोरा टॉवर्स कॅप, पुणे	६५९३०७५	१३२०१८०	०	७९१३२५५
	एकूण . .	४५०२२४७१	१३०७९४६४	९९१२८५५	४८१८९०८०

६.११ परिच्छेद क्र. ७.३.५ पोलिसांवरील खर्चाची चुकीची संगणना :—

परिच्छेद क्र. ७.३.५.१ पोलीस आयुक्त, पुणे शहर/ठाणे शहर

ऑगस्ट, २०११ मध्ये जारी झालेल्या शासन निर्णयानुसार अल्पोहार भत्त्याचा समावेश पोलीस कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये केला गेला होता. पोलिसांवरील खर्चाचा दर विहित करण्यासाठी जारी केलेल्या त्यानंतरच्या परिपत्रकात देखील खर्चाचा एक भाग म्हणून अल्पोपहार भत्त्याचा समावेश केला गेला होता.अशा प्रकारे ज्या दराने पोलिसांवरील खर्च वसूल करायचा होता त्यामध्ये अल्पोपहार भत्ताही समाविष्ट होता.

CP पुणे येथे, बँका आणि इतर शासकीय/निम-शासकीय संस्थांकडून पोलिसांवरील खर्च वसूल निमशासकीय संस्थांकडून पोलिसांवरील खर्च वसूल करताना रु.३३.५२ लाख एवढ्या अल्पोपहार भत्त्याची वसुली करण्यात आली नव्हती.

हे निदर्शनास आणून दिल्यावर, CP पुणे यांनी बँका आणि इतर शासकीय/निम शासकीय संस्थांकडून अल्पोपहार भत्त्यावरील खर्चाच्या वसुलीसाठी मागणी सुचना जारी केल्या (ऑगस्ट, २०१३)

७.३.५.२

३ जानेवारी २००० आणि १४ जानेवारी २०१० रोजी जारी केलेल्या परिपत्रक सूचनांनुसार, सरासरी वेतन (पदाच्या वेतनश्रेणी वर आधारित), श्रेणी वेतन, घरभाडे भत्ता, इतर भत्ते, रजा वेतन अंशदान, निवृत्ती वेतन अंशदान इत्यादीवर COP संगणित केला जातो. यावरून असे निदर्शनास येते की, एकाच वेतनश्रेणीतील परंतु भिन्न मूळ वेतन असणाऱ्या कोणत्याही दोन पोलिसांच्या बाबतीत पोलीस संरक्षणाचा खर्च एकच असणे आवश्यक आहे.

CP ठाणे येथील २००८-०९ ते २०१२-१३ या कालावधीच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला तैनातीसाठी पुरवण्यात आलेल्या पोलिसांनी प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या वेतनावर पोलिसांचा खर्च संगणित करण्यात आला होता, जे उपरोक्त परिपत्रकातील सुचनांशी सुसंगत नव्हते. तसेच, असेही आढळून आले की, प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या वेतनावर खर्चाची वसुली केली गेल्याने जे पोलीस कर्मचारी शासकीय निवासस्थानात वास्तव्य करत होते त्यांच्या संबंधात घरभाडे भत्ता वसूल करण्यात आला नव्हता. पोलिसांवर झालेल्या खर्चाच्या चुकीच्या संगणनेमुळे झालेली कमी वसुली, आवश्यक माहिती उपलब्ध नसल्याने निश्चित करता येऊ शकली नाही.

ही गोष्ट निदर्शनास आणून दिल्यावर, CP ठाणे कार्यालयाने असे प्रतिपादन केले की, कमी वसुलीच्या या प्रकरणात पडताळणी केली जाईल आणि करण्यात आलेल्या कारवाईविषयी लेखापरिक्षकांना कळविण्यात येईल.

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

७.३.५.१—पो. आ. पुणे शहर—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७.३.५ मधील पोलीस आयुक्त, पुणे यांचेकडील सहावे वेतन आयोगाच्या आहार भत्त्याच्या फरकाची रु.३३.५२ लाख इतकी रक्कम प्रलंबित होती. सदरहू रकमेपैकी (बँक ऑफ इंडिया, पिंपरी/शनिवार पेठ/पुणे महानगरपालिका/पिंपरी-चिंचवड महानगरपालिका) रु.१७,३७,८२० इतकी रक्कम वसूल झालेली आहे. तसेच उर्वरित रक्कम रु.१६,१४,००० इतकी रक्कम प्रलंबित आहे. पुरविण्यात आलेल्या पोलीस बंदोबस्तातील संबंधित संस्थांना आहार भत्ता रक्कम वसुलीबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला असून, रक्कम वसुलीबाबतची कार्यवाही प्राधान्याने घेवून पूर्तता अहवाल तात्काळ सादर करण्याची कार्यवाही घेण्यात आली आहे.

७.३.५.२.—पो. आ. ठाणे—भारताचे नियंत्रक व महोलखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७.३.५ मधील पोलीस आयुक्त, ठाणे यांचेकडील सहावे वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम प्रलंबित होती. सन २००८-०९ ते २०१२-१३ या कालावधीत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षण शुल्काची परिगणना अचूक करणेबाबत पोलीस आयुक्त, ठाणे यांनी दिनांक १२/५/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे. सन २०१२-१३ ची अंदाजे रक्कम रु.१,२६,९२३ असल्याचे दिसून येते या नुसार २००८-२०१२ पर्यंत अंदाजे रक्कम रु.१,२६,९२३ असल्याचे दिसून येते या नुसार २००८-२०१२ पर्यंत अंदाजित सरासरी रक्कम रु.५,०७,६९२ एवढी होवू शकते. सदर कालावधीची अचूक परिगणना करून पुढील २ ते ३ दिवसात पूर्तता करण्याची तजवीज ठेवलेली आहे. तसेच, परिगणना झाल्याबरोबर लगेचच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे फरकाच्या रकमेची मागणीबाबत देयके सादर करून रक्कम वसूल करण्यात येईल.

६.१२ परिच्छेद क्र. ७.३.६ पोलिसांवरील वसुली योग्य खर्चाचे समायोजन :—

CP ठाणे येथील अभिलेख्यांच्या तपासणीत असे आढळून आले की, ठाणे महानगरपालिकेला (TMC) पुरविलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा खर्च प्रदान करताना मार्च, २००९ ते मार्च, २०१२ दरम्यान त्यामधून रु. १.२९ कोटी मालमत्ता कराची रक्कम वजा करण्यात आली होती. तसेच, SP नागपूर येथे असे आढळून आले की, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (MSPGCL) यांना पुरविण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवरील खर्चाची प्रतिपूर्ती करताना १ एप्रिल २००८ ते ३१ डिसेंबर २०१२ दरम्यान पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानांच्या भाडे आणि वीज यावरील खर्चाप्रित्यर्थ रु. १५.३७ लाख वजा करून रक्कम प्रदान करण्यात आली होती. मुख्य लेखाशिर्ष ००५५ अंतर्गत पोलीस जमांमधून अशाप्रकारे वजावटीस मान्यता देण्यामुळे अंदाजपत्रकात खर्चाची विभागणी लेखांकित करताना विसंगती निर्माण होईल आणि पोलीस जमा कमी प्रमाणात दर्शविल्या जातील.

हे निदर्शनास आणून दिल्यावर, CP ठाणे यांनी सांगितले की, TMC बरोबर याविषयी चर्चा करण्यात येईल आणि वसुलीचा तपशील कळविण्यात येईल. SP, नागपूर यांनी सांगितले की, वसुलीसाठी सुधारित मागणी सूचना जारी केल्या जातील. वसुलीचा अहवाल प्राप्त झालेला नाही. (जानेवारी, २०१४).

ज्ञापन :

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

खालील नमूद सर्व माहिती ही घटक कार्यालयाकडून प्राप्त पत्रांच्या आधारे सादर करण्यात येत आहे.

पो. आ. ठाणे—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७.३.६ मधील पोलीस आयुक्त, ठाणे यांचेकडील १.२९ कोटी इतकी रक्कम थकीत होती. ठाणे महानगरपालिकेने रु. १,२९,०८,९८८ इतकी रक्कम मालमत्ता करापोटी परस्पर वळती केलेली आहे. सदरबाबत त्यांचेकडे पाठपुरावा केला असता, त्यांनी ठा.म.पा./अती.वि. १४८७, दिनांक २५ जुलै २०१३ अन्वये सदरहू कालावधीतील पोलीस सेवाशुल्कपोटी देय असलेल्या रकमांचा ठाणे महानगरपालिकेला देय असलेली रक्कम वजा केल्याचे कळविले आहे. सदर बाबत ठाणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरू आहे.

पो. अ. नागपूर ग्रामीण—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परि.७.३.६ मधील पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचेकडील रु. १५.३७ लक्ष इतकी रक्कम थकीत होती. औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा यांचेकडील विद्युत व घरभाडेच्या थकीत रकमेपैकी दिनांक ११ मे २०१७ रोजी रु. १९,७४,१४१ इतकी वसूल झाली आहे. उर्वरित रक्कम वसूल करण्याची तजविज ठेवली आहे.

६.१३ परिच्छेद क्र. ७.३.७ रोकड व्यवस्थापनातील अनियमितता :—

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम क्रमांक ८ (१) नुसार शासकीय अधिकाऱ्यांनी प्राप्त केलेली किंवा त्यांच्याकडे जमा करण्यात आलेली संपूर्ण रक्कम त्यांनी दोन दिवसात कोषागार/बँक यामध्ये जमा करणे आवश्यक होते. तसेच, नियम ९८(२) नुसार प्रत्येक आर्थिक व्यवहाराची नोंद रोकड पुस्तिकेत त्वरित घेणे आवश्यक असते आणि प्रत्येक दिवसाअखेर रोकड पुस्तिकेचा ताळेबंद घेऊन ते कार्यालय प्रमुखांकडून स्वाक्षांकित करून घेणे आवश्यक असते. चाचणी तपासणी केलेल्या कार्यालयातील अभिलेख्यांवरून खालील अनियमितता निदर्शनास आल्या.

SP, नागपूर आणि CP, अमरावती यांच्या कार्यालयात, सप्टेंबर, २०१० ते ऑगस्ट, २०१२ दरम्यानच्या वेगवेगळ्या कालावधीत, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (CVC) प्रदान करण्यासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कापोटी प्राप्त झालेले अनुक्रमे रु. १७,७०० आणि रु. १,०८० रुपयांचे धनाकर्ष (DD), निर्धारित बँकांमध्ये मुदत उलटून गेल्यावर जमा करण्यात आल्याने ते वटवता आले नव्हते. हे DD पुनर्विधिग्राह्यतेसाठी संबंधित व्यक्तींना पाठवले गेले नव्हते. (मे, २०१३).

संबंधित व्यक्तींकडून अप्राप्त रक्कम वसूल करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे SP नागपूर आणि CP अमरावती यांनी उत्तरात सांगितले.

CP नागपूर कार्यालयातील वाहतूक विभागात, ११ मार्च २०१३ ते ८ एप्रिल २०१३ दरम्यान चार प्रकरणांमध्ये वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींकडून वसूल केलेल्या रु.७५,००० रोकड रक्कमेचा भरणा करण्यात जवळजवळ ११७ दिवसांचा विलंब झाला होता. ज्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी रक्कमा प्रत्यक्षपणे स्वीकारली होती त्यांच्याकडून तिचा भरणा करण्यात विलंब झाल्यामुळे असे घडले होते.

संबंधित कर्मचाऱ्याची बदली करण्यात आली असून शासकीय महसुलाचा भरणा करण्यात झालेल्या विलंबाचे स्पष्टीकरण मागवण्यात आले असल्याचे CP नागपूर यांनी कळविले. पुढे असेही नमूद केले की, निर्धारित वेळेत शासकीय महसुलाचा भरणा करण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

CP अमरावती यांच्या कार्यालयात दोन प्रकरणांत २७ एप्रिल २०१२ व ५ जुलै २०१२ रोजी वसूल केलेल्या रु. ५६,२०३ रक्कमेची रोकड पुस्तिकेत नोंद घेण्यात अनुक्रमे तीन आणि सात दिवसांचा विलंब झाला होता. तसेच, नऊ प्रकरणांत रुपये ८९,४३१ रक्कमेचा शासकीय कोषागारात भरणा करण्यात सहा ते १७ दिवसांचा विलंब झाला होता. SP, अमरावतीच्या आशेगाव पोलीस ठाण्यात २३ ते २६ दिवसांच्या विलंबाने शासकीय कोषागारात रक्कमेचा भरणा करण्यात आल्याची प्रकरणे आढळून आली.

नजरचुकीमुळे विलंब झाला असल्याचे CP अमरावती यांनी सांगितले आणि भविष्यात अशा घटना टाळल्या जातील अशी ग्वाही दिली.

SP ठाणे यांच्या कार्यालयात मार्च, २०१३ मध्ये प्राप्त झालेल्या सर्व DD एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीनंतर कोषागारात भरणा करण्यात आला होता. तसेच, १७ फेब्रुवारी २०१२ ते २१ मार्च २०१३ दरम्यानच्या तारखांच्या रु. १,६०० किंमतीच्या १२ DD च्या बाबतीत संबंधित रक्कम कोषागारात भरण्यात आल्याच्या पुष्ट्यर्थ अभिलेख्यांमध्ये चलन उपलब्ध नव्हते. भाईंदर पोलीस ठाण्यात तीन ते २९ दिवसांच्या विलंबानंतर रक्कम शासकीय लेख्यांमध्ये भरण्यात आली होती.

उत्तरादाखल SP ठाणे यांनी कळविले की, चलनांच्या अनुपलब्धतेविषयी कोषागार कार्यालयाकडे पाठपुरावा केला जाईल आणि यथावकाश लेखापरिक्षेस त्याचा अहवाल सादर करण्यात येईल. तसेच, यापुढे शासकीय लेख्यांमध्ये रक्कमेचा भरणा करण्यातील विलंब टाळला जाईल असे कळविण्यात आले.

SP औरंगाबाद यांच्या कार्यालयात असे आढळून आले की, जून, २०१२ नंतर कोषागारात जमा करण्यात आलेल्या रक्कमेचे चलन जरी उपलब्ध होते तरी रोकड पुस्तिका ठेवली जात नव्हती. रोकड पुस्तिका उपलब्ध नसल्याने, संबंधित व्यक्तींकडून प्राप्त झालेले सर्व DD कोषागारात भरले गेले तसेच लेखांकित केले गेले अथवा नाही याची पडताळणी होऊ शकली नाही.

हे निदर्शनास आणून दिल्यावर असे कळविण्यात आले की, CVC साठीचे शुल्क रोखीने न घेता DD द्वारे प्राप्त होत असल्याने रोकड पुस्तिका ठेवली जात नव्हती.

विभागाने दिलेले उत्तर लेखापरिक्षकांना मान्य नाही कारण प्राप्त झालेले DD रोख रक्कम असल्याचे गृहीत धरून त्यांची रोकड पुस्तिकेत नोंद घ्यावयास हवी होती. अशाप्रकारे रोकड व्यवस्थापनाच्या महत्वपूर्ण बाबीकडे दुर्लक्ष केले गेले.

SP नांदेड यांच्या कार्यालयात CVC करीता प्राप्त झालेल्या DD चा शासकीय लेख्यांमध्ये भरणा करण्यात २९ ते १२९ दिवसांचा विलंब झाला होता.

उत्तरादाखल SP नांदेड यांनी असे कळविले की, DD जमा शाखेकडून लेखा शाखेकडे प्राप्त होण्यास विलंब होत होता. पुढे असेही कळविले की, भविष्यात विलंब टाळला जाईल.

SP, सोलापूर यांच्या कार्यालयातील चारित्र्य पडताळणी विभागात रोकड पुस्तिका, चलन नोंदवही आणि पावती पुस्तिका ठेवली जात नसल्यामुळे जमा केलेल्या रक्कमेचे योग्य प्रकारे लेखांकन केले जात नव्हते.

भविष्यात योग्य व्यवस्थेचा अवलंब केला जाईल असे SP सोलापूर यांनी उत्तरात सांगितले.

SP पुणे येथे जुलै, २०१२ ते सप्टेंबर, २०१२ दरम्यानच्या कालावधीत CVC जारी करण्यासाठी आकारलेल्या रु. ३.४९ लाख रक्कमेची नोंद रोकड पुस्तिकेत घेण्यात आली नव्हती. तसेच महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८, अंतर्गत अनिवार्य असल्याप्रमाणे रोकड पुस्तिकेतील रोख शिल्लकीची पडताळणी आणि प्रमाणीकरण एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ दरम्यान केले गेले नव्हते. त्याचप्रमाणे रोकड पुस्तिकेत काही ठिकाणी उपरिलेखन आणि खाडाखोड करण्यात आली होती ज्यास कार्यालय प्रमुखांनी स्वाक्षांकित केले नव्हते.

उत्तरादाखल SP पुणे यांनी सांगितले की, यापुढे रोकड पुस्तिकेत धनाकर्षाची नोंद घेतली जाईल, तसेच इतर रोकड पुस्तिकेत धनाकर्षाची नोंद घेतली जाईल, तसेच इतर अनियमिततेबाबतच्या सूचनांची नोंद घेतली गेली असून भविष्यात त्या टाळल्या जातील.

ही उदाहरणादाखल दिलेली प्रकरणे रोकड व्यवस्थापनातील त्रुटी दर्शवितात आणि अशा त्रुटीमुळे सार्वजनिक निधीत अफरातफर होण्याचा धोका संभावतो.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण

माहे ९/२०१० ते माहे ६/२०१२ या कालावधीत चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राच्या शुल्काकरिता प्राप्त झालेले रु. १७,७०० चे डीमांड ड्राफ्ट कोषागारात विहित मुदतीत आत जमा न केल्यामुळे वरील रक्कम प्राप्त करणे कामी संबंधित बँकेस कळविण्यात आले होते.

वरील संबंधाने उपरोक्त रक्कमेपैकी रु. १५,१०० दिनांक ६ ऑगस्ट २०१३ अन्वये तसेच रु. १,२०० चलन क्र. २२५२५१५, दिनांक ५ मे २०१४ व रु. १,४०० चलन क्र. ४१/१०५, दिनांक २३ ऑगस्ट २०१६ असे एकूण रु. १७,७०० चा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया येथे भरणा करण्यात आला आहे.

सदर बाबतीत झालेल्या दिरंगाईबाबत संबंधित लिपिकांना पो.अ, नागपूर कार्यालयाने दिनांक २३ ऑगस्ट २०१६ रोजी ज्ञापन देवून स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे. स्पष्टीकरण प्राप्त होताच संबंधितांवर पोलीस अधीक्षक, नागपूर यांच्याकडून शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त, अमरावती शहर

११/२०११ ते ८/२०१२ या कालावधीत चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राच्या शुल्काकरिता प्राप्त झालेले रु. १,०८० चे डिमांड ड्राफ्ट नुतनीकरण करून घेवून कोषागारात /बँकेत दिनांक २८ डिसेंबर २०१३ रोजी चलन क्र. २०१ अन्वये पोलीस आयुक्त, अमरावती शहर कार्यालयाने जमा केले आहेत. याबाबत चलनाची सत्यप्रत सोबत जोडली आहे. सदर बाबीमध्ये अनियमितता झाल्यामुळे याबाबत संबंधित रोखपालावर शिस्तभंग विषयक कार्यवाही पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी प्रस्तावित केली आहे. त्याबाबतच्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. सद्य:स्थितीत

भविष्यात सदर बाबींची पुनरावृत्ती होणार नाही, याबाबत कार्यरत रोखपाल व आहरण व संवितरण अधिकारी यांना दक्षता घेण्याबाबत पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी सूचना निर्गमित केल्या आहेत.

पोलीस आयुक्त, नागपूर शहर

तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. अ. दा. मोरे, वाहतुक, दक्षिण शाखा, नागपूर शहर यांनी या संदर्भात कसूरी केलेले पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे खुलासे घेवून त्यांचा कसुरी अहवाल सादर करण्याचे व आम्ही स्वतः लक्ष देवून असा प्रकार यापुढे घडणार नाही याची दक्षता घेत असल्याचे नमूद करून दिनांक ३० मे २०१३ रोजीचे पत्रान्वये आक्षेपाचा अंतरिम पूर्तता अहवाल परस्पर ऑडीट ऑफीसर, थेमेटीक ऑडीट/ एलएपीरोमन ३ यांना सादर केला होता. परंतु त्यांनी कोणताही कसूरी अहवाल सादर केला नसल्याचे निदर्शनास आल्याने व सद्या ते अहमदनगर येथे नेमणुकीस असल्याने त्यांचेविरुद्ध योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठी पोलीस अधीक्षक अहमदनगर यांना दिनांक ९/८/२०१६ रोजीचे पत्रान्वये पोलीस आयुक्त, नागपूर यांनी कसुरी अहवाल पाठविला आहे. या कार्यवाहीचे सुरू करण्यात आली आहे.

तसेच सदर प्रकरणात त्यावेळेस वाहतुक, दक्षिण शाखा येथे कार्यरत असलेले (१) सपोनि ए.आर.काळे (२) पोउपनि अजगर शेख व (३) सफौ/१५० कुदन खोटे हे ही कसुरदार असल्याचे दिसून येत आहे.

वरील कसुरदार पैकी अ.क्र.१ मधील सपोनि ए. आर. काळे यांची बदली ठाणे शहर येथे झाली असल्याने त्यांचे विरुद्ध योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना दिनांक २५ ऑगस्ट २०१६ रोजीचे पत्रान्वये पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी कसुरी अहवाल पाठविला आहे. व कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

अ. क्र. २ मधील पोउपनि अजगर शेख हे दिनांक ३१ मार्च २०१४ रोजी पोलीस आयुक्त, नागपूर शहर आस्थापनेवरून सेवानिवृत्त झाले असून पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी त्यांच्याकडून खुलासा मागविला आहे. खुलासा प्राप्त होताच त्यांचेविरुद्ध म.ना.से. (निवृत्तीवेतन) १९८२ मधील नियम क्रमांक २७ नुसार त्यांच्याकडून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

अ.क्र. ३ मधील सफौ/१५० कुदन खोटे हे सद्या नागपूर शहर पोलीस दलात कार्यरत असल्याने या संदर्भात पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी त्यांचा खुलासा मागविला आहे. त्यांचेविरुद्ध योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्याकडून सुरू करण्यात आलेली आहे. कारवाई नंतर घेण्यात येणाऱ्या निर्णयाबाबत अवगत करण्याची त्यांनी दक्षता घेतली आहे.

तसेच पुढील लेखा तपासणीत सदरहु प्रकारच्या आक्षेपाबाबत पुनरावृत्ती झालेली नाही व भविष्यात होणार नाही याची दक्षता पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्याकडून घेण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त, अमरावती शहर—

पोलीस आयुक्त, अमरावती शहर येथे प्राप्त झालेल्या शासकीय जमा रक्कमा (दोन बाबी/घटना) (१) शासकीय पावती क्र. (GN) पावती क्र. ५२०११०८ दिनांक २७ एप्रिल २०१२ रु. २,७९६ आणि (२) पावती क्र. (GN) पावती क्र. ५२०११६२ दिनांक ५ जुलै २०१२ रु. ५३,४०७ एकूण रकम रु. ५६,२०३ ही शासकीय कोषागारात पोलीस आयुक्त, अमरावती शहर कार्यालयाकडून जमा करण्यात आली असून त्याबाबतच्या जमा रक्कमांच्या नोंदी रोख नोंदवहीमध्ये अ.नं. घेण्यात आलेली आहे. म्हणजेच जमा रक्कमांच्या नोंदी रोख नोंदवहीमध्ये ३ ते ७ दिवस विलंबाने घेण्यात आल्याचे आढळून येते. तसेच शासकीय रकमा रु. ८९,४३१ चा भरणा ६ ते १७ दिवसांनी विलंबाने झाल्याचे आढळून येत असून तद्नंतर सदर रक्कमा शासकीय कोषागारात/बँकेत विहित मुदतीत भरल्या जातील याची दक्षता पोलीस आयुक्त, अमरावती शहर कार्यालयाकडून घेण्यात आलेली आहे. तसेच भविष्यात सदर बाबींची पुर्नरावृत्ती होणार नाही याबाबत रोखपाल आणि आहरण व संवितरण अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित तपशीलवार अहवाल सादर करण्याची दक्षता पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी घेतली आहे.

पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण—

झालेल्या विलंबाची यापुढे पुनरावृत्ती होणार नाही. याची दक्षता पोलीस अधीक्षक, अमरावती यांनी घेतली आहे तसेच पो.हवा./अरुण लांडे, ब.नं.६१६ यांनी बँकेत रक्कम उशिरा भरल्याबाबत त्यांच्याविरुद्ध पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांचे कार्यालयीन आदेश क्र.पोअग्रा/ प्रा.चौ./६१६/अरुण लांडे/९७४२/२०१६, दिनांक २४ ऑगस्ट २०१६ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण—

पोलीस अधीक्षक, ठाणे कार्यालयाकडून चारित्र्य पडताळणीचे धनाकर्ष मोठ्या प्रमाणात कोषागारात चलनाद्वारे भरणा करण्यात येतो. त्यामुळे चलनाचा नमुना मकोनि ०६ चा साठा संपल्याने व सदर चलनाचा नमुना उपलब्ध करून घेण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करून देखील त्यांना उपलब्ध न

झाल्याने धनाकर्ष कोषागारात जमा करण्यास विलंब झालेला आहे. तसेच यापुढे तातडीने धनाकर्षक भरणा कोषागारात करण्यात येत आहे व याबाबत उशिरा होणार नाही यासाठी पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण हे दक्षता घेत आहेत.

दिनांक १७ फेब्रुवारी २०१२ ते २१ मार्च २०१३ या कालावधीतील रु. १,६०० ची १२ धनाकर्ष पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण कार्यालयाकडून कोषागारात भरणा केली होती. सदर चलनांच्या दुय्यम प्रती बँकेतून लेखा परिक्षणाच्या कालावधीत प्राप्त न झाल्याने त्यावेळी त्यांना सादर करता आल्या नव्हत्या. सदर चलनाच्या दुय्यम प्रती पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण कार्यालयाने बँकेकडून प्राप्त करून घेतलेल्या असून त्यांच्या अभिलेख्यावर ठेवण्यात आलेल्या आहेत.

पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण—

सन २०१२ पासून संबंधित व्यक्तीकडून प्राप्त झालेले धनादेश व धनाकर्षांची रक्कम कोषागारात जमेबाबतची सविस्तर नोंद रोख किर्दवही मध्ये घेण्याची दक्षता पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण कार्यालयाकडून घेण्यात येत आहे. सन २०११ ते ३१ जुलै, २०१६ पावेतो कोषागार येथे जमा झालेली रक्कम (सोबत जोडलेल्या यादीनुसार) पुर्णतः संबंधीत कोषागारात चलनाद्वारे भरणा करण्यात आली असून त्याबाबतचे अभिलेखाची पडताळणी केली असता, आजपावेतो पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण कार्यालयाकडे काही एक रक्कम शिल्लक नसल्याचे त्यांना दिसुन आले आहे. सदरची भरणा करण्यात आलेली रक्कम ही संबंधीत उमेदवार यांनी स्वतः चलनाद्वारे बँकेत भरणा केली आहे.

सन २०१२ पासून रोखकिर्द वहीमध्ये नोंदीची कार्यवाही न केल्याने तत्कालीन आहरण व संवितरण अधिकारी श्री.व्ही.आर.चौहाण सध्या नेमणूक पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांना दिनांक २६ ऑगस्ट २०१६ रोजी पोलीस आयुक्त, नाशिक शहर मार्फतीने पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी पत्र दिले आहे. त्यांचा खुलासा प्राप्त होताच पुढील योग्य ती कार्यवाही पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांच्याकडून करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण कार्यालयामार्फत सादर करण्यात आलेल्या २०१२ च्या आक्षेपाच्या पूर्ततेच्या अहवालात डी.डी.म्हणजेच रोख रक्कम समजून त्याबाबतची रोखकिर्द वहीमध्ये नोंद घेण्याची आवश्यकता नाही असे त्यांनी नजरचुकीने नमूद केले होते. सध्या पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण शासनाच्या प्रचलीत नियमानुसार रोखकिर्दीतच रक्कम जमा येत आहेत.

पोलीस अधीक्षक, नांदेड—

सन २०१२ मध्ये पुर्वचारित्र्य पडताळणी संबंधाने वेगवेगळ्या बँकेचे डी.डी. अर्जदार व्यक्तींकडून येत होते. सदरचे डी.डी. जिल्हा विशेष शाखेकडून एकगठ्ठा विलंबाने प्राप्त झाल्यामुळे रक्कम बँकेत जमा करण्यास व चलन भरण्यास विलंब झालेला आहे.

आता सदरचा विलंब टाळण्यासाठी पुर्वचारित्र्य पडताळणीचे शुल्क जिईएन पावतीद्वारे रोखीने स्वीकारण्यात येत आहे. प्राप्त होणाऱ्या रक्कमा त्याच दिवशी रोखवहीत जमा बाजूस घेवून लगतच्या दुसऱ्या दिवशी चलनाद्वारे शासन जमा करण्यात येत आहेत. रोखवहीत जमा व खर्च दोन्हीही बाजू आहरण व संवितरण अधिकाऱ्याची स्वाक्षरी पोलीस अधीक्षक, नांदेड कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

पो.अ., नांदेड यांच्याकडून सदर विलंबास जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. कार्यवाही पूर्ण होताच अंतिम अहवाल त्यांच्याकडून या कार्यालयास सादर करण्यात येणार आहे.

पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण—

पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण कार्यालयाकडून दिनांक १/१/२०१६ रोजी पासून कॅशबुक व चलन रिसिप्ट बुक आणि चलन रजिस्टर ठेवण्यात आले नसल्याने त्यांच्याविरुद्ध पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे कार्यालयीन आदेश क्र.६५-ई/प्राचौ/कसुरी/२०१६-१०२५८, दिनांक ३० ऑगस्ट २०१६ अन्वये प्राथमिक चौकशी सुरू केली आहे.

तसेच सन २००८ ते २०१३ पासून आजतागायत आर्थिक व्यवहार योग्य असल्याबाबत पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी नमूद केले आहे.

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण—

चारित्र्य पडताळणी संदर्भात धनाकर्षद्वारे वसूल केलेल्या फि ची एकूण रक्कम रु.३,४९,२२८ हे त्याचवेळी पोलीस अधीक्षक, पुणे कार्यालयाकडून कोषागारात चलनाने भरणा करण्यात आली होती. या व्यतिरिक्त रक्कम चलनाने जमा करण्याचे प्रलंबित नाही. तथापि, संबंधित रोखपाल यांनी चारित्र्य पडताळणीसंदर्भात धनाकर्षाद्वारे प्राप्त झालेल्या रक्कमांच्या नोंदी त्यावेळी रोखीच्या नोंदवहीत घेतलेल्या नव्हत्या. आता सदरच्या नोंदी रोखीच्या नोंदवहीत घेतलेल्या आहेत. त्याचप्रमाणे सदर रक्कमेची चलन पडताळणी त्यांनी केली आहे.

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालयाकडून एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ या कालावधीत रोजकिर्दला घेण्यात आलेल्या नोंदी व शिल्लक रक्कम बरोबर असल्याचे प्रमाणित करण्यात आले आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही ही वेळीच करण्यात आलेली होती. मात्र चारित्र्य पडताळणीची रक्कम रोजकिर्दमध्ये घेण्यात आलेली नव्हती. त्याबाबत तत्कालिन कसुरदार असलेले रोखपाल व श्रे.लि.पी.आर.केणी सध्या नेमणूक पोलीस अधीक्षक, पश्चिम विभाग, व श्रे.लि.पी.आर.केणी सध्या नेमणूक पोलीस अधीक्षक, पश्चिम विभाग, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेविरुद्ध पो.अ., पुणे ग्रामीण कार्यालयाचे आदेश क्र. पशा-१०/नागरी अहवाल/साक्ष/१९५७६, दिनांक ३० ऑगस्ट २०१६ अन्वये प्राथमिक चौकशी आदेशित करण्यात आलेली आहे. चौकशी अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालयाकडून त्यांच्याविरुद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येत आहे.

६.१४ परिच्छेद क्र. ७.३.८ पावती पुस्तके पाठवणे आणि परत मिळवणे यावर अपुरे नियंत्रण :

प्रचलित पद्धतीनुसार, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड आणि शास्ती जमा करण्यास प्राधिकृत केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना (वाहतूक) दंड आणि शास्ती वसूल करण्यासाठी पावती पुस्तके दिली जातात. दंड आणि शास्ती जमा केल्यावर वाहतूक विभाग किंवा CP /SP यांचे संबंधित कार्यालय यांच्या मार्फत ती रक्कम कोषागार/बँक यामध्ये भरणे आवश्यक होते आणि पावती पुस्तक संपल्यावर त्यांचे लेखांकन करण्यासाठी आणि ती सुरक्षित ठेवण्यासाठी ती जिल्हा वाहतूक मुख्यालयाकडे पाठविणे आवश्यक होते. पावती पुस्तक देणे आणि ती परत प्राप्त होणे यावर एका नोंदवहीद्वारे संनियंत्रण ठेवायचे होते.

CP, नागपूर आणि CP, ठाणे यांच्या कार्यालयातील पावती पुस्तक निर्गमन नोंदवह्या आणि पावती पुस्तिका यांच्या तपासणीत काही बाबी अशा आढळून आल्या की, पावती पुस्तिका देताना त्या घेणाऱ्याकडून त्याची पोच घेण्यात आली नव्हती, पूर्ण झाल्यावर पावती पुस्तिका परत देण्यात आल्या नव्हत्या तसेच आधी देण्यात आलेली पावती पुस्तके प्राप्त करण्याआधीच नवीन पावती पुस्तके देण्यात आली होती.

पावती पुस्तिका देणे आणि परत प्राप्त करणे यावरील संनियंत्रणामध्ये ढिलाई असण्यामुळे शासकीय महसुलाचा गैरवापर होण्याची संभावना आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पोलीस आयुक्त, नागपूर शहर

पोलीस आयुक्त, नागपूर शहर कार्यालयाचे लेखा परिक्षण महालेखाकार, मुंबई यांच्याकडून सन २०१२-२०१३ मध्ये घेण्यात आलेले होते. सदरहू लेखा परिक्षण आक्षेपाच्या अहवालात वाहतूक विभागातर्फे जमा करण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम जमा करण्याची पावती (सर्वसा. ११३ म.व.ई.) संदर्भात आक्षेप घेतला आहे.

सदर आक्षेपाचे अनुषंगाने पोलीस आयुक्त, नागपूर शहर कार्यालयाने सदरचे पावती पुस्तक हाताळणेबाबत वाहतूक शाखेशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना तसेच भांडार शाखेतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यालयाचे आदेश क्र.पोआना/लेखा-१/३/लेखा आक्षेप २०१२-१३/२०१६, दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ अन्वये कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

तसेच पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी त्यांच्या दिनांक ३ सप्टेंबर २०१६ च्या पत्रान्वये सदर आक्षेपाप्रमाणे लेखा परिक्षण कालावधीत वाहतूक शाखेतील अधिकारी/कर्मचारी यांनी चूक केली असेल तर त्यांचे कसूरी अहवाल पाठविण्याबाबत पो.उप.आ.,वाहतूक, नागपूर शहर यांना निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पुढील कार्यवाही करण्याची तजविज ठेवली आहे.

पोलीस आयुक्त, ठाणे शहर

सद्यःस्थितीत ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या ५७२ चौ.कि.मी. इतक्या विस्तिर्ण कार्यक्षेत्रातील वाहतुकीचे नियमन ठाणे शहर वाहतूक विभागाकडून करण्यात येते. त्याकरिता वाहतूक विभागाची एकूण १८ ट्रॅफिक युनिट कार्यरत आहेत. कसुरदार वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस आयुक्त, ठाणे कार्यालयाकडून जीईएन पावती पुस्तके युनिट कार्यालयास पुरविताना पावती बुक क्र.पावती क्रमांक, दिल्याचा दिनांक, प्रभारी अधिकारी यांचे नाव/हुद्दा, पुस्तक कोणाच्या ताब्यात दिले त्यांचे नाव व स्वाक्षरी, वापरुन संपलेले पुस्तक ताळमेळ घेण्यासाठी केव्हा प्राप्त झाले, त्यातून किती रक्कम जमा झाली इत्यादीबाबतच्या नोंदी त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखावरील रजिस्टरमध्ये सविस्तरपणे घेण्यात येतात.

कसुरदार वाहनचालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई केल्यानंतर जमा झालेली रक्कम संबंधित ट्रॅफिक युनिट कार्यालयाकडून " ००५५-पोली " या लेखाशिर्षाखाली चलनाद्वारे बँकेमार्फत नियमित शासन भरणा करण्यात येते. याकरिता प्रत्येक युनिट स्तराव ररोजकिर्द (Day Book) ठेवण्यात आले असून जमा झालेल्या दंडात्मक रक्कमा व शासन भरणा केलेल्या इत्यादींचा ताळमेळ या रोजकिर्दमध्ये ठेवण्यात येतो. तसेच हा ताळमेळ स्थानिक कोषागार कार्यालयाकडून दरमहा प्रमाणित करून घेण्यात येतो.

ज्यावेळी जीईएन पावती पुस्तके वापरुन संपतात, त्यावेळी नवीन जीईएन पावती पुस्तके मिळण्याची लेखी मागणी युनिट कार्यालयाकडून पोलीस आयुक्त, ठाणे कार्यालयाकडे करण्यात येते. कसुरदार वाहनचालकांविरुद्धची कारवाई सातत्याने चालु ठेवणे आवश्यक असल्याने पुरविण्यात आलेली सर्व जीईएन पुस्तके एकाचवेळी जमा करणे शक्य होत नाही. त्यामुळे कारवाईसाठी आवश्यक असलेली जीईएन पावती शिल्लक ठेवून उर्वरित वापरुन संपलेल्या पावती पुस्तकांतील पावत्या व त्याद्वारे जमा रक्कमांचा ताळमेळ घेऊन त्याबाबतच्या नोंदी रजिस्टरमध्ये घेण्यात येतात.

परंतु वापरण्यात येणाऱ्या जीईएन पुस्तकांची संख्या विचारात घेता, वापरलेली पुस्तके जमा करून ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त, ठाणे कार्यालयाकडे पुरेशी जागा उपलब्ध नाही. यास्तव ताळमेळ घेतलेली (वापरुन संपलेली) पावती पुस्तके पोलीस मॅन्युअल भाग-२, परिशिष्ट-१४, नियम क्र.२५५ व परिशिष्ट १५ क्र. ६ मधील तरतुदीनुसार युनिट कार्यालयाच्या अभिलेखावर जतन करण्यासाठी पोलीस आयुक्त, ठाणे कार्यालयातील वाहतूक विभागाचे लेखी पत्राद्वारे क्र. पोउपा/वाहतूक/प्रशा-१/२९९९६/२०१६, दिनांक ६ सप्टेंबर २०१६ अन्वये पाठविण्यात आले आहे. त्याप्रमाणे कारवाई त्यांच्या युनिट कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

६.१५ परिच्छेद क्र. ७.३.९. कोषागारातील नोंदी बरोबर जमांचा ताळमेळ न घेणे

महाराष्ट्र कोषागार नियमांतील नियम क्र.९८(२) (V) मधील तरतुदीनुसार शासकीय अधिकाऱ्यांनी शासनाच्या वतीने प्राप्त केलेल्या आणि कोषागारात जमा केलेल्या सर्व रकमेचा संबंधीत कोषागार अधिकाऱ्यांनी लेखांकित केलेल्या आकडेवारी बरोबर ताळमेळ घेऊन त्याची नोंद ठेवणे आवश्यक होते.

चाचणी तपासणी केलेल्या कार्यालयातील अभिलेख्यांच्या तपासणीत असे निदर्शनास आले की, आठ CP (अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, सोलापुर आणि ठाणे) आणि ६ SP (अमरावती, औरंगाबाद, नांदेड, पुणे, सोलापूर आणि ठाणे) यांच्या कार्यालयात एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ दरम्यान एकदाही ताळमेळ घेतला गेला नव्हता. तसेच ज्या तीन CP (मुंबई, सोलापूर आणि ठाणे) आणि SP ठाणे मध्ये ताळमेळ घेतला गेला होता. तिथे सप्टेंबर, २००८ ते डिसेंबर, २०११ दरम्यान वेगवेगळ्या कालावधीतील एकूण रु.६.०४ कोटींची जमा लेखाकिंत न झाल्याचे संबंधीत कोषागाराने कळविले होते. यांचा तपशील विवरण क्र. १५ मध्ये दिला आहे.

हे निदर्शनास आणून दिल्यावर CP मुंबई यांनी जून, २००८ ते ऑगस्ट, २००८ या कालावधीचा ताळमेळ करून घेतल्याचे व वाहतूक विभागाशी संबंधीत रु.७९.५९ लाख जमेचे लेखांकन करून घेतल्याचे कळविले. (नोव्हेंबर, २०१३) इतर कार्यालयाकडून कार्यवाही बाबत या अहवाल प्रतिक्षीत आहे.(जानेवारी, २०१४) :

विभागाने भरणा केलेल्या रक्कमेचा कोषागाराच्या नोंदी बरोबर ताळमेळ न घेतल्याने विभागामध्ये रोख रकमेचा गैरवापर होण्याचा धोका उत्पन्न झाला.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

२/१२ ते ३/१३ या कालावधीत जमा रक्कमेचा ताळमेळ अधिदान व लेखा कार्यालयाकडून प्रमाणित करून घेण्यात आला आहे.

परंतु माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये एकूण ८ चलनाच्या एकूण रु.१,७८,९४,३५३ एवढ्या रक्कमपैकी ७ चलनाच्या जमा ताळमेळ करण्यात आला असून एका चलनाची रु. ५२,४६,७७८ एवढी रक्कम दुसऱ्या लेखाशिर्षाखाली अधिदान व लेखा कार्यालयाकडून जमा झालेली असल्याने सदर पदांतरीत नोंदीना शासनाकडून मंजुरी प्राप्त करून घेणे असल्याने अधिदान व लेखा कार्यालयाकडून सदर प्रकरणातील पत्र प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात येत आहे.

वाहतूक व सशस्त्र पोलीस ताडदेव (ल.विभाग) २) शाखेने अनुक्रमे ०६/०८ ते ०८/०८, १२/०८, १२/०८, ०७/११, ८/११ आणि १/१२ ते ३/१३ या कालावधीत व २/१२ ते ३/१३ या कालावधीत जमा रकमेचा ताळमेळ अधिदान व लेखा कार्यालयाकडून व महालेखाकारांकडून प्रमाणित करून घेण्यात आला आहे.

वाहतूक व सशस्त्र पोलीस ताडदेव (ल.विभाग) २) शाखेच्या संबंधित कोषगाराने कळविल्याप्रमाणे जमांचे न झालेले लेखांकनाबाबत रक्कमांचा ताळमेळ झाला असून त्याबाबतचे अधिदान व लेखा कार्यालयाचे व महालेखाकारांचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. (रु. २१,६७,००० चलन क्र. १००७ दिनांक १७ मार्च २००९ रु.३८,४३,००० चलन क्र. २७०१४ दिनांक २९ सप्टेंबर २००९ आणि रु.१९,४९,००० चलन क्र.३६०१३ दिनांक १४ जानेवारी २००९ त्याचप्रमाणे सशस्त्र पोलीस ताडदेव (ल.विभाग) २) यांचे कडून फेब्रुवारी, २०१० ते ऑक्टोबर, २०१० या कालावधीत १६ चलनाद्वारे रु. ५,१९,७०,२१६ रक्कम भरली गेली.) तसेच पदांतरीत नोंदीचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, मुंबई या कार्यालयाकडून अधिदान व लेखा कार्यालयास दिनांक ४/१०/२०१६ रोजी सादर करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त, ठाणे शहर

सन २००८-२००९ ते २०१२-२०१३ या कालावधीतील जमा रकमेचा ताळमेळ न घेण्यात आल्याबाबत आक्षेप घेण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र कोषागार नियमातील कलम ९८(२) अन्वये महसुली रक्कमांचा कोषागार कार्यालयाकडून ताळमेळ घेण्याची कार्यवाही ठाणे वाहतूक विभागाकडून नियमित करण्यात येत आहे.

जमा झालेल्या दंडात्मक रक्कमेचा व शासन भरणा केलेल्या रक्कमेचा ताळमेळ ठेवण्यासाठी प्रत्येक युनिट स्तरावर रोजकिर्द (Day Book) ठेवण्यात आले आहे.

रोजकिर्दीतील नोंदी व शासन भरणा केलेल्या रक्कमचा यांची सांगड घालून ताळमेळ घेण्यासाठी कोषागार कार्यालयास ट्रॅफिक युनिट स्तरावर दरमहा रिपोर्ट सादर करण्यात येतो. कोषागार कार्यालयाकडून याबाबतची पडताळणी करून घेऊन तसे प्रमाणपत्र प्राप्त करून अभिलेखावर ठेवण्यात येते.

या कार्यालयाचे आदेश क्र.पोउपा/वानिशा/४०/१४/दिनांक ९ जानेवारी २०१६ क्र.पोउपा/वानिशा/१५/३०/२०१४, दिनांक ७ जून २०१४ अन्वये संबंधीत प्रभारी अधिकारी पडताळणी नियमित करून घेण्याची समज देण्यात आली आहे.

आक्षेप घेण्यात आलेल्या कालावधीचा कोषागार कार्यालयाशी ताळमेळ घेऊन त्याबाबतचे भिवंडी व उल्हासनगर या युनिटचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात आले. उर्वरित कोळसेवाडी नौपाडा, ठाणेनगर, कोपरी, मुंब्रा, कळवा, डोंबिवली व अंबरनाथ या युनिट कार्यालयाकडील चलन पडताळणी प्रमाणपत्रे मिळणे कमी संबंधित कोषागार कार्यालयाकडे विनंती करण्यात आली आहे. परंतु पडताळणी करावयाचा कालावधी हा २००८ चा असल्याने व याबाबतचे अभिलेख उपलब्ध होण्यास आणखी एक महिन्याचा कालावधी लागणार असल्याचे कोषगार कार्यालयाने सुचित केले आहे. याबाबतची पडताळणी पाठपुरावा करून पूर्ण करून घेण्यात येत आहे.

३/२००८ ते १२/२०१३ कालावधीचा उल्हासनगर वाहतूक विभागाचा ताळमेळ कोषागारासोबत घेण्यात आला आहे. सदर बाबत या कार्यालयाचे पत्र क्र. ठाआ/लेशा/लेअ/थीमॅटिक ऑडीट १३/२००७/२०१५ दिनांक २० फेब्रुवारी २०१६ अन्वये उपमहालेखाकार/एस.आर.ए.मुंबई यांना कळविले आहे.

खाली नमूद केलेल्या घटकांनी काही कालावधीचा ताळमेळ घेतला आहे. ताळमेळ घेतलेल्या व प्रलंबित ताळमेळ कालावधीचे तपशीलवार विवरणपत्र खालीलप्रमाणे नमूद करत आहे :—

सद्यःस्थितीत ताळमेळ बाबतचा तपशील खालीलप्रमाणे पो.आ. ठाणे यांनी सादर केला आहे :—

अ.क्र.	पोलीस स्टेशनचे नाव	ताळमेळ घातलेला कालावधी	ताळमेळ न घेतलेला कालावधी	शेरा
१.	मुंब्रा ट्रॅफिक युनिट	निरंक निरंक निरंक	४/२००८ते ३/२०१० ६/२०१० ते ७/२०११ ९/२०१२ ते ३/२०१३	कोषागार अधिकारी, ठाणे यांना अहवाल जाक्र.५ जुलै १६ दिनांक ६ सप्टेंबर २०१६ अन्वये सादर केला आहे. परंतु पडताळणी होणेस १ महिन्याचा कालावधी लागेल असे कळविले आहे.

अ.क्र.	पोलीस स्टेशनचे नाव	ताळमेळ घातलेला कालावधी	ताळमेळ न घेतलेला कालावधी	शेरा
२.	कळवा ट्रॅफिक युनिट	निरंक	४/२००८ ते ६/२००८	कोषागार अधिकारी, ठाणे यांना अहवाल
		निरंक निरंक निरंक निरंक	११/२००८ ते ३/२०१० ५/२०१० ते ६/२०१० ८/२०१० ते १२/२०११ १/२०१३ ते ३/२०१३	जा क्र.२७०/२०१६ दिनांक ६ सप्टेंबर २०१६ अन्वये सादर केला आहे. परंतु पडताळणी होणेस १ महिन्याचा कालावधी लागेल असे कळविले आहे.
३.	कोळसेवाडी ट्रॅफिक युनिट	१०/२००८ ते ३/२००९	४/२००९ ते २/२०११	बाजूस नमूद काही चलनांचे पडताळणी अहवाल प्राप्त झाले असुन ते यासमवेत सादर केले आहेत.
			१२/२०११ ते ३/२०१२	
			रु.१७३०० चलन क्र.२८/१३.५.२०११	
			रु.८५०० चलन क्र.२९/१४.५.२०११	
			रु.८६०० चलन क्र.९९/२५.८.२०११	
			रु.४६१०० चलन क्र.१०२/२.९.२०११	
			रु.७२०० चलन क्र.१०३/३.९.२०११	
			रु.६३०० चलन क्र.१०६/८.९.२०११	
			रु.१०९०० चलन क्र.१०७/१०.९.२०११	
४.	ठाणे शहर	१/२०१३ ते ३/२०१३ ४/२०१२	१२/२००८ ते २/२०११ ६/२०११	कोषागार अधिकारी, ठाणे यांना अहवाल सादर केला आहे. परंतु पडताळणी होणेस १ महिन्याचा कालावधी लागेल असे कळविले आहे.
५.	नौपाडा ट्रॅफिक युनिट	१/२०१३ ते ३/२०१३	८/२०१० ते ७/२०११	कोषागार अधिकारी, ठाणे यांना अहवाल जा.क्र.४९५/१६ दिनांक ७ सप्टेंबर २०१६ अन्वये सादर केला आहे. परंतु पडताळणी होणेस १ महिन्याचा कालावधी लागेल असे कळविले आहे.
६	कोपरी ट्रॅफिक युनिट	निरंक	४/२००९ ते ३/२०१०	कोषागार अधिकारी, ठाणे यांना अहवाल जा.क.३७५/१६ दिनांक ६ स्प्टेंबर २०१६ अन्वये सादर केला आहे. परंतु पडताळणी होणेस १ महिन्याचा कालावधी लागेल असे कळविले आहे.

अ.क्र.	पोलीस स्टेशनचे नाव	ताळमेळ घातलेला कालावधी	ताळमेळ न घेतलेला कालावधी	शेरा
७	अंबरनाथ ट्रॅफिक युनिट	निरंक	११/२००८ ते १२/२००९	कोषागार कार्यालयात अहवाल सादर केला आहे. परंतु पडताळणी होणेस १ महिन्याचा कालावधी लागेल असे कळविले आहे.
८.	भिवंडी ट्रॅफिक युनिट	१/२०१० ते ३/२०१०	रु. ३०००० चलन क्र.१७६/२९/११.२०१० रु. ९७०० चलन क्र.१७७/३०.११.२०१० २/२०१२ ते ८/२०१२	पडताळणी पूर्ण करणेत आली आहे.
९.	उल्हासनगर ट्रॅफिक युनिट	३/२००८ ते १२/२०१३		पडताळणी पूर्ण करणेत आली आहे.
१०.	डोंबिवली ट्रॅफिक युनिट	४/२००८ ते ३/२०१३		कोषागार अधिकारी, ठाणे यांना अहवाल सादर केला आहे. परंतु पडताळणी होणेस १ महिन्याचा कालावधी लागेल असे कळविले आहे. पोलीस आयुक्त, पुणे शहर.

माहे एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ च्या ताळमेळा बाबतची कार्यवाही प्राधान्याने कोषागारात संबंधितांना पाठवून करून घेण्यात येत असून सदर कालावधीतील संबंधित लेखा अधिकारी व लिपिक यांनी कार्यभार पाहिलेला असल्याने त्यांनी केलेल्या कसूरी बबात चौकशी करून कसुरीमध्ये दोषी आढळल्यास कार्यवाही करत आहोत.

दिनांक ३ सप्टेंबर २०१० ते ३१ डिसेंबर २०१० पर्यंतचे काम लेखापरिक्षणाच्या दरम्यान करून घेण्यात आले होते. उर्वरित चलनाची पडताळणी करण्याचे काम सुरू आहे. पूर्ण होताच तात्काळ अहवाल पाठवित आहोत.

दिनांक १ एप्रिल २०१२ पासून महसुली जमाचे ताळमेळाचे काम कोषागार कार्यालयाकडून पो.आ. पुणे शहर या कार्यालयाकडे आल्यामुळे त्यांच्याकडून वेळोवेळी करून घेण्यात आलेले आहे.

सद्य:स्थितीमध्ये मे, २०१६ पर्यंत महसुली जमा ताळमेळाचे काम झालेले असून सदर काम प्रलंबित न राहील याची दक्षता घेण्यात येत असल्याबाबत पो.आ.पुणे शहर यांनी अहवाल सादर केला आहे.

पोलीस आयुक्त, नागपूर शहर

याबाबत सादर आहे की, आक्षेप क्र.७.३.९ मध्ये नमूद केले आहे की, एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ पर्यंत महसूल जमा रकमेची ताळमेळ कोषागारातील अभिलेखाशी केलेला नसल्याचे नमूद केले आहे. त्याबाबतचे विवरण Appedndex-XVIII मध्ये दिले असल्याचे नमूद आहे. **(विवरण पत्र क्र. १५)** सदर Appedndex-XVIII ची प्रत महालेखाकार-२ नागपूर यांचे कार्यालयातून आणण्यात आली आहे. त्यात नमूद आहे की, पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर येथील खालील कालावधीतील महसुली जमा रकमेचा ताळमेळ कोषागारीशी झालेला नसल्याचे नमूद आहे.

मुख्य कार्यालय : माहे ०९/२०१२ ते ०३/२०१३

परवाना शाखा : माहे ०४/२०११ ते ०३/२०१३

याबाबत पो.आ. नागपूर शहर यांनी सादर केले आहे की, लायसन्स ब्रॅन्च मध्ये महसुली जमा रकमेकरिता माहे ०४/२०११ पासून स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. तत्पूर्वी सदरची रक्कम मुख्य कार्यालयातील रोखपाल यांचे मार्फत शासन जमा करण्यात येत होत्या. त्याचे जमा रकमेचा ताळमेळ मुख्यरोखपाल यांच्याकडून होता होता. माहे ३/२०१३ पर्यंतचा शासकीय जमा रकमेचा ताळमेळ कोषागार, नागपूर यांच्याशी परवाना शाखेकडून पूर्ण करण्यात आलेला आहे.

मुख्य कार्यालय रोखपालशाखा येथील माहे ९/२०१२ ते ३/२०१३ पर्यंतच्या शासकीय जमा रकमेचा ताळमेळ कोषागार, नागपूर यांचेकडील अभिलेखाशी करण्यात आला आहे. तसेच सद्य:स्थितीत माहे ६/२०१६ पर्यंतचा ताळमेळ पूर्ण करण्यात आलेला असल्याबाबतचा पो.आ. नागपूर यांनी अहवाल सादर केला आहे.

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर

एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ या कालावधीतील मार्च, २०१३ (९/२००८ ते ३/२०१०, ५/२०११, ४/२०१२ ते ३/२०१३ या कालावधीतील वगळून) चलनाची पडताळणी कोषागार कार्यालयाकडून त्या वेळी करून घेण्यात आल्याचे अभिलेखावरून दिसून येते.

जानेवारी, २००९ ते मार्च, २०१३ या कालावधीतील चलन भरणा केलेल्या माहितीचा तपशील कोषागार कार्यायालकडून प्राप्त करून घेण्यात आला असून त्या आधारे (९/२००८ ते ३/२०१०, ५/२०११ ते ८/२०११, ४/२०१२ ते ३/२०१३) या कालावधीत भरणा करण्यात आलेला जमा रकमांची तसेच २००८ ते २०१३ मध्ये उर्वरित चलनाची पडताळणी करण्याबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

सध्या शासन निर्णय क्र.संकिर्ण १०१०/क्र.क्र.६५/कोषा प्र.-५ दिनांक १८ नोव्हेंबर, २०१० नुसार कोषागार कार्यालयाकडील चलनाचा तपशील (Data) प्रत्येक महिन्यात pdf फाईल मध्ये प्राप्त करून घेण्यात येतो. त्या आधारे पोलीस ठाण्याकडील व कार्यालयाकडून भरणा करण्यात आलेल्या चलनाची/रकमाची पडताळणी करून क व ख नमुन्यात कोषागारात माहिती सादर करून त्याबाबतची त्यांची प्रमाणपत्र प्राप्त करून अभिलेख्यावर ठेवण्यात येत असल्याबाबत पो.आ.सोलापूर शहर यांनी अहवाल सादर केला आहे.

पोलीस आयुक्त, नाशिक शहर

परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दिनांक १/४/२००८ ते ३१ मार्च २०१३ (एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३) या कालावधीतील महसुली जमा या कार्यालयाच्या अधिपत्याखाली पोलीस ठाणे, एकूण ११ शहर वाहतूक शाखा, परवाना शाखा यांनी चलनाद्वारे कोषागारामध्ये भरणा केलेला आहे. सदरच्या महसुली जमा रकमेचा कोषागाराकडून जमा रकमेचे पडताळणी केल्याबाबतचा पत्र व्यवहार पोलीस ठाणे या संबंधित शाखेकडे असल्याने महालेखापाल, मुंबई यांचे लेखापरिक्षणाच्या वेळी संबंधित पोलीस ठाणे कायदा व सुव्यवस्था यामध्ये व्यस्त असल्या कारणाने पो.आ.नाशिक या कार्यालयाकडून उपलब्ध करून देता आली नाही. या प्रकरणी खालीलप्रमाणे महसुली जमेची पडताळणी करण्यात आलेली आहे.

वित्तीय वर्ष	महसुली जमा रक्कम
२००८-२००९	४४,५६,९५८
२००९-२०१०	४५,२०,३१०
२०१०-२०११	१,०२,९२,७४४
२०११-२०१२	१,६०,५९,०५८
२०१२-२०१३	३,३५,०२,६८०

वरील महसुली जमा रकमेची नाशिक कोषागार कार्यालयाकडून पडताळणी करून घेण्यात आली आहे. सदर कार्यपद्धती ही यापुढे चालू ठेवण्याची दक्षता घेण्यात आलेली असल्याबाबत पो.आ.नाशिक शहर यांनी अहवाल सादर केला आहे.

पोलीस आयुक्त, अमरावती शहर

नमूद आक्षेपानुसार एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ या कालावधीतील महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ चे नियम ९८ (२) (९) नुसार जमा रकमेचा ताळमेळ कोषागारासोबत घेतला नव्हता असे नमूद केले आहे. परंतु या कार्यालयाचे अभिलेखानुसार १ एप्रिल २००८ ते ३० एप्रिल २००९ या कालावधीतील कोषागार कार्यालयाकडून जमा महसूलाचा ताळमेळ घेतला नसल्याचे दिसून येते. सदर कालावधीतील कार्यरत कर्मचारी श्री.अशोक वा.जोशी कार्यालय अधीक्षक तथा आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यरत होते. ते दिनांक ३१ जुलै २०११ रोजी सेवानिवृत्त झाले त्याचप्रमाणे श्री.मनोहर महादेवराव भुसाटे हे रोखपाल म्हणून कार्यरत होते. ते दिनांक ३१ नोव्हेंबर २०१० ला सेवानिवृत्त झालेले आहेत. विभागीय चौकशी नियम पुस्तिका नियम १९९१ मधील प्रकरण बारा मधील नियम १२.३ चे पोट-नियम १ (ब) मध्ये असे नमूद केले आहे की, अशी कार्यवाही सुरू करण्यापुर्वीच्या ४ वर्षांपेक्षा अधिक कालावधीत घडलेल्या रक्कमेसंबंधीतील गैरवर्तणुकीबद्दल असता, कामा नये. त्यांना सेवानिवृत्त होऊन ४ वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाल्याने त्यांच्यावर कार्यवाही करता येत नाही. परंतु सदर कालावधीतील ताळमेळ या कार्यालयामार्फत ७ दिवसात करून त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून नियमितपणे कोषागारासोबत ताळमेळ घेण्यात येत असल्याबाबत पो.आ.अमरावती शहर यांनी अहवाल सादर केला आहे.

पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर

माहे एप्रिल, २००८ ते मार्च, २०१० पर्यंतचे चलनाद्वारे शासन जमा करण्यात आलेली रकमेचे चलन पूर्वी पडताळणी करण्यात आलेले नव्हते ते आज दिनांक ३ सप्टेंबर २०१६ रोजीस कोषागारास प्रमाणित करण्याकरिता पाठविण्यात आलेले आहे.

सदर चलन कोषागाराकडून प्रमाणित करून प्राप्त होताच पुनश्च पडताळणी चलन अहवाल सादर करण्यात येईल. तसेच सदर कालावधीतील चलन पडताळणी का करून घेण्यात आली नाही याबाबत प्राथमिक चौकशी आदेशीत करण्यात येऊन संबंधित अहवाल शिस्तभंगाविषयक कार्यवाही करीत असल्याबाबत पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांनी कळविले आहे.

एप्रिल, २०१० ते मार्च, २०१३ पर्यंतच्या कालावधीसाठी शासन जमा करण्यात आलेल्या रक्कमांचे चलन औरंगाबाद कोषागाराकडून प्रमाणित करून घेण्यात आलेले असल्याबाबत पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांनी अहवाल सादर केला आहे.

पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण

सन २००८-२००९९ ते २०१२-२०१३ या कालावधीत शासन कोषागारात पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण कार्यालयाकडून परिशिष्ट ३ प्रमाणे १,९२,४३८ चा भरणा करण्यात आलेला आहे. सदर रक्कमांचे चलन पडताळणीसाठी चलनांचे विवरणपत्र चलनासह कोषागार कार्यालय, ठाणे येथे पाठवून चलनाची पडताळणी करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. कोषागारातून चलन पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करून घेवून पूर्तता करित आहोत असे पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी कळविले आहे.

सन २००८-२००९ ते सन २०१२-२०१३ या कालावधीची चलन पडताळणी झाली आहे किंवा कसे याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.प्रलि/लेशा/चलन पडताळणी/०१६ दिनांक ९ सप्टेंबर २०१६ अन्वये सर्व संबंधितांकडून चलन पडताळणी झाली असल्यास त्याबाबतचे चलन पडताळणी प्रमाणपत्र मागविण्यात आलेले आहे. चलन पडताळणी झालेली नसल्याने त्याबाबतचा खुलासा मागविण्यात आला आहे. सदर खुलाश्याचे अवलोकन करून कसुरी असल्यास संबंधतींवर कार्यवाही करण्यात येईल.

तसेच यापुढे नियमाप्रमाणे चलन पडताळणी करून जमा ताळमेळ प्रमाणपत्र कोषागाराकडून प्राप्त करून घेवून तो कार्यालयाचे अभिलेखावर जतन करून घेण्याची तजवीज ठेवली आहे. असे पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी कळविले आहे.

पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण

महाराष्ट्र कोषागार अधिनियमाच्या नियम ९८ (२) (५) नुसार शासनाच्या वतीने शासनाच्या अधिकाऱ्यांना स्विकारलेली रक्कम कोषागारात भरणा केल्यानंतर ती संबंधित कोषागाराकडून पडताळणी करून सदर जमा रकमेचा ताळमेळ सन २००८-२००९ ते २०१२-२०१३ पर्यंत घातलेला असून त्याबाबत दक्षता घेतली आहे.

तसेच वेळोवेळी सदर जमा रकमांचे ताळमेळ घालून अभिलेखावर ठेवण्याची तजवीज ठेवली असल्याबाबत पो.अ.औरंगाबाद ग्रामीण यांनी अहवाल सादर केला आहे.

पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण

याबाबत स्पष्टीकरण सादर करण्यात येते की, कोषागारात जमा करण्यात आलेल्या रकमांची सन २०१० ते २०१६ या कालावधीतील जमा रकमांची पडताळणी खालील नमूद केलेल्या दिनांकास करून घेण्यात आलेली आहे.

अ.क्र.	चलन भरणा केलेला महिना	पडताळणी करून घेतलेला दिनांक
१.	एप्रिल, २०१०	२३/११/२०१०
२.	मार्च, २०१०	२६/०९/२०११
३.	मे, २०१०	२३/११/२०१०
४.	जून, २०१०	२३/११/२०१०
५.	जानेवारी, २०११	४/२/२०१२
६.	फेब्रुवारी, २०११	४/२/२०१२
७.	मार्च, २०११	४/२/२०१२
८.	मे, २०१२ ते ऑक्टोबर, २०१२	२५/५/२०१६
९.	मे, २०१३ ते मार्च, २०१४	२५/५/२०१६
१०.	मे, २०१४ ते मार्च, २०१५	२५/५/२०१६
११.	मे, २०१५ ते एप्रिल, २०१६	२५/५/२०१६

वरील तपशील पाहता एप्रिल, २०१० ते मार्च, २०११ पर्यंतची पडताळणी वेळीस करून घेण्यात आलेली आहे. तथापि, सन २०१२ पासून चलन पडताळणीची प्रक्रिया ऑनलाईन झाल्याने पुणे कोषागाराने त्यांचे स्तरावर न ठेवता २०५५ या लेखाशिर्षाखालील जमा रकमांची पडताळणी करून घेण्याचे काम पोलीस आयुक्त, पुणे कार्यालयाकडे सोपविलेले आहे. त्यामुळे पुढील चलन पडताळणीचे कामास विलंब झालेला आहे यापुढे चलन पडताळणीचे काम वेळच्या वेळी करण्याची दक्षता घेण्यात येत असल्याबाबत पुणे ग्रामीण यांनी कळविले आहे.

पुणे ग्रामीण यांनी अधिक स्पष्टीकरणार्थ खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

कोषागारात जमा करण्यात आलेल्या रकमांबाबतची चलन पडताळणी ही मूळ परिच्छेदात एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ या कालावधीतील चलन पडताळणी न केल्याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. सदरचा मुद्दा हा पो.अ.पुणे ग्रामीण कार्यालय, शिक्रापूर व हवेली पोलीस स्टेशन यांचे कडील असून पो.अ.पुणे ग्रामीण व शिक्रापूर पोलीस स्टेशन यांचेकडील चलन पडताळणीचे काम पूर्ण झालेले असून हवेली पोलीस स्टेशन कडील मुद्दा प्रलंबित आहे. याबाबत संबंधित प्रभारी अधिकारी यांना दिनांक १२ सप्टेंबर २०२६ च्या बिनतारी संदेशान्वये संबंधित चलन पडताळणी केल्याची कागदपत्रे दिनांक १४ सप्टेंबर २०१६ पर्यंत कार्यालयात सादर करण्याबाबत पोलीस अधिक्षक, पुणे ग्रा.यांनी कळविले आहे. गणपती उत्सवामुळे संबंधित बंदोबस्त कामामध्ये व्यस्त असल्याने तद्नंतर चलन पडताळणी केल्याची कागदपत्रे उपलब्ध करून तसा अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवली असल्याबाबत तसा अहवाल पो.अ.पुणे ग्रामीण यांनी सादर केला आहे.

पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण

सन २००८ ते २०१३ या कालावधीत या घटकामध्ये खाजगी व्यक्ती किंवा संस्था यांना विनंती करून सशुल्क पोलीस संरक्षण पुरविण्यात आले होते. त्याअनुषंगाने पुरविण्यात आलेल्या संरक्षण पुरविण्यात आले होते. त्याअनुषंगाने पुरविण्यात आलेल्या संरक्षणापोटी जी रक्कम संबंधितांकडून शासनास (या कार्यालयास) जमा करण्यात आलेली आहे. ती रक्कम चलनाने शासनास भरणा करण्यात आलेली आहे. उपरोक्त नमूद कालावधीत शासकीय रक्कम भरणा केलेले या कार्यालयाचे चलन प्रत व कोषागार कार्यालयाकडील चलन प्रत याची पडताळणी करणे आवश्यक होते. (Non Reconsilation of Receipts with Treasury Records) सदर चलन पडताळणी १.वरीष्ठ श्रेणी लिपिक आर.जे.माने नेमणूक महिला पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर २ वरिष्ठ श्रेणी लिपीक पत्की (सेवानिवृत्त) ३. वरिष्ठ श्रेणी लिपिक आर.ए.चौरे नेमणूक महिला पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर यांनी त्यावेळी केलेली नाही. म्हणून या कसुरीबाबत यांचे विरुद्ध या कार्यालयाकडील आदेश क्र.६५-इ/प्रा.चौ/कसुरी/माने-पत्की-चौरे/२०१६/५६५३ दिनांक ३ सप्टेंबर २०१६ अन्वये प्राथमिक चौकशी आदेशीत करण्यात आली असून प्राथमिक चौकशी अधिकारी म्हणून पो.नि.नांवदे ने जिविशा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आता सन २००८-२०१३ या कालावधीत पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षण जमा करण्यात आलेल्या या कार्यालयाचे अभिलेखा वरिल चलन प्रती व कोषागार कार्यालयाकडील अभिलेख पडताळणीसाठी विशेष पथक (पोलीस कर्मचारी व लिपीक कर्मचारी) गठीत करण्यात आले असुन त्याअनुषंगाने सन २००८ ते २०१३ या कालावधीतील अभिलेख शोधून कोषागार कार्यालयाशी पडताळणी करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याचे पो.अ.सोलापूर ग्रामीण यांनी कळविले आहे.

पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण

नमूद आक्षेपानुसार एप्रिल, २००८ ते मार्च, २०१३ या कालावधीतील महाराष्ट्र कोषगार नियम १९६८ चे नियम ९८ (२) (९) नुसार जमा रकमाचा ताळमेळ कोषागारासोबत घेतला नव्हता असे नमूद केले आहे. परंतु या कार्यालयाचे अभिलेखानुसार १ एप्रिल २००८ ते ३० एप्रिल २००९ या कालावधीतील कोषागार कार्यालयाकडून ताळमेळ घेतला नसल्याचे दिसून येते. सदर कालावधीतील कार्यरत कर्मचारी श्री.आर.पी.आकोडे कार्यालय अधिक्षक तथा आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यरत होते. ते दिनांक ३१ मे २०११ रोजी सेवानिवृत्त झाले आहे.

विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील प्रकरण बारा मधील नियम ३ चे पोट नियम १ (ब) असे नमूद केले आहे की, अशी कार्यवाही सुरू करण्यापुर्वीच्या अधिक कालावधीत घडलेल्या रकमेसंबंधी गैरवर्तणूक बद्दल किंवा गैरवर्तना बद्दल असता, कामा नये. त्यांना सेवानिवृत्त होऊन ४ वर्षापेक्षा अधीक कालावधी झाल्याने त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करता येत नाही.

श्रीमती आर.सी.ठाकुर तत्कालीन रोखपाल यांनी १ एप्रिल २००८ ते ३० एप्रिल २००९ या कालावधीतील कोषागार कार्यालयाकडून ताळमेळ घेतला नसल्याचे दिसून येते. सदर कालावधीतील कार्यरत कर्मचारी आर.सी.ठाकुर या दिनांक ३१ जानेवारी २०१५ रोजी सेवानिवृत्त झाल्या आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्त वेतन नियम १९८२ मधील नियम क्र.२० नुसार पोट नियम (२) त्यांच्या विरुद्ध कार्यवाही सुरू करण्यापूर्वीच्या ४ वर्षापेक्षा अधिक वर्षाच्या कालावधीत घडलेल्या घटनेसंबंधातील ती असता, कामा नये. परंतु सदर कालावधीतील ताळमेळ नियमितपणे करण्यात येत आहे.

जमा करण्यात आलेले वर्ष	कोषागार मधून पडताळणी दिनांक
२००९	०२/६/२०२०, ३/८/२०१०
२०१०	२/६/२०१०, ३/८/२०१०, १९/११/२०१०, १४/२/२०११
२०११	१४/२/२०११, २१/५/२०११, १६/९/२०११, २३/११/२०११, २५/१/२०१२
२०१२	२५/१/२०१२, २२/३/२०१२, ८/५/२०१२, १७/९/२०१२, ६/१२/२०१२
२०१३	११/३/२०१३, २७/५/२०१३, ३०/५/२०१३, ४/९/२०१३, २५/११/२०१३

सद्य:स्थितीत कोषागारामध्ये जमा करण्यात आलेल्या रकमेची नियमित पडताळणी करून ताळमेळ घेणे सुरू असल्याबाबत पो.अ.अमरावती ग्रामीण यांनी अहवाल सादर केला आहे.

पोलीस अधिक्षक, नांदेड ग्रामीण

लोकलेखा समितीच्या सदर लेखाआक्षेपामधील माहे एप्रिल, २००८ ते माहे मार्च, २०१३ या वित्तीय वर्षाचे ताळमेळ महालेखापाल, नागपूर यांचे लेख्याशी पूर्ण झालेला आहे व त्याबाबतचे ऑनलाईन प्रमाणपत्र कार्यालयीन अभिलेख्यावर आहे. जानेवारी ते मार्च, २००९ या तीन महिन्याचे एप्रिल, २००९ ते मार्च, २०१० या एका वित्तीय वर्षाचे ताळमेळ महालेखापाल, नागपूर यांचे वेबसाईटवर ऑनलाईन उपलब्ध नसल्यामुळे पडताळणी कामी कोषागार कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे, अद्याप सदरचा पडताळणी अहवाल अप्राप्त होताच मा.पोमस, मुंबई यांना त्वरत कळविण्यात येईल असे पो.अ.नांदेड यांनी कळविले आहे. उर्वरित एप्रिल, २००८ ते डिसेंबर, २००८ या नऊ महिन्याचे रेकॉर्ड शोधण्याचे काम चालू आहे. संबंधित कर्मचाऱ्यांचे याबाबत खुलासे मागविण्यात आलेले आहे. सदर नऊ महिन्याचे रेकॉर्ड प्राप्त होताच त्यांची ताळमेळ पडताळणी करून अहवाल सादर करण्यात येईल. तसेच सध्या महसूल जमा लेख्यांचे ताळमेळ अद्यायावत ठेवण्यात येत असल्याबाबत पो.अ.नांदेड ग्रामीण यांनी अहवाल सादर केला आहे.

६.१६ परिच्छेद क्र. ७.३.१० निष्कर्ष

लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, इतर राज्यांमध्ये तैनात केलेल्या एस.आर.पी.एफ.जवानांसंबंधी माहिती DGP कार्यालयात उपलब्ध नव्हती. याबाबतीत कोणतीही नोंदवही त्या कार्यालयाने ठेवली नव्हती.पुढे, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक कार्यालयांच्या चाचणी तपासणीतून असे उघडकीस आले की, त्यांच्या कार्यकक्षेत तैनात केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवरील खर्चाच्या वसुलीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी मागणी आणि संकलन नोंदवह्या ठेवल्या जात नव्हत्या. प्रवर्ग निहाय तैनात केलेले पोलीस कर्मचारी, केलेली मागणी, वसूल रक्कम, वसूल करावयाची उर्वरित रक्कम इत्यादी तपशील विभागाकडे उपलब्ध नव्हता. परिणामी, एकूण प्रलंबित वसुली, केलेली मागणी, केलेला पाठपुरावा इत्यादी निर्धारण करण्यासाठी आवश्यक असलेली, तैनात केलेले पोलीस कर्मचारी आणि तैनातीवरील खर्चाची वसुली यांची एकंदर माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २००८ रोजी संपलेल्या वर्षाच्या महसुली जमेच्या अहवालात वरील त्रुटींचा उल्लेख करण्यात आला होता. तरीही सातत्याने अनियमितता घडत आहेत.

संनियंत्रण तसेच पोलिसांवरील खर्चाची वसुली करण्यासाठी समयोचित पाठपुराव्याच्या अभावामुळे मोठ्या प्रमाणात थकबाकीचा संचय झाला ही बाब निदर्शनास आणून दिल्यावर पोलिसांवरील खर्चाची थकबाकी, वसुली इत्यादी तपशील देणारी नियतकालीक विवरणपत्रे सादर करण्याविषयी डीजीपी, मुंबई यांनी सर्व पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांना सूचना जारी केल्या. (मे, २०१३).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

पोलीस संरक्षण शुल्कातील प्रलंबित वसुलीकरिता सर्व घटक कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयात स्वतंत्र पथक नेमून वसुलीबाबतची कार्यवाही तातडीने करून अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत सर्व घटक कार्यालयांना वेळोवेळी सुचित करण्यात आलेले आहे. वसूल केलेली बंदोबस्त शुल्काची रक्कम हा शासनाचा महसूल असल्याने सदरहू रक्कम योग्यरित्या शासनजमा करण्याची कार्यवाही करण्याबाबत घटकांना सूचना दिलेल्या आहेत. इतर संस्था (बँका/इतरसंस्था/महानगरपालिका/इतर निमशासकीय कार्यालये) योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जातो. तैनात करण्यात आलेल्या बंदोबस्ताच्या पदांचा योग्य तो तपशील नोंदविण्याबाबत घटक कार्यालयांकडून प्रयत्न करण्यात येतो.

पोलीस विभागाद्वारे राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था हाताळणे हे काम प्राधान्याने पार पाडले जाते. संरक्षण खर्च प्रतिपूर्तीकरिता नियमांच्या अधिन राहून सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. आवश्यक तेथे रक्कम वसुलीबाबत महाराष्ट्र रिलायझेशन ऑफ लॅड रेव्हेन्युसन १९६७ अधिनियम अंतर्गत कार्यवाही करण्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास पत्रव्यवहार करण्यात येतो.

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिव तसेच इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

परिच्छेद क्र. ७.३ " पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणावरील खर्चाची वसूली "

६.१७ परिच्छेद क्र. ७.३.१ " प्रस्तावना " :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने विचारणा केली की, राज्यातील व्यक्ती/स्थानिक संस्था/सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/बँका/रेल्वे यांना तसेच राज्याबाहेरील इतर प्रशासने/संबंधित व्यक्ती यांना त्यांच्या संरक्षणार्थ पुरविलेल्या पोलीस बळासाठी त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या रकमांचा समावेश पोलीस जमामध्ये होते. संरक्षणार्थ पुरविलेल्या व्यक्तीकडून सुरक्षा शुल्काची वसुली झाली नाही तर ही सुरक्षा विभागाने कोणत्या आधारावर संबंधित व्यक्तीना दिलेली आहे? यावर अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांनी सांगितले की, ज्यावेळी महालेखाकार आक्षेप काढतात, त्यांच्या परिच्छेदामध्ये त्याची व्याप्ती, प्रस्तावना म्हणजे त्याकरिता काय तरतूद आहे, कोणत्या रेटवर ती तरतूद आहे? याची माहिती पॅरामध्ये प्रिस्क्राईब केलेली असते. पहिले दोन पॅरे आहेत, ते त्याच्याशी संबंधित असतील, तर तरतूद ईंडिकेट करते. यामध्ये व्हायोलेशन नंतर येते.

पण समितीचा मुद्दा असा आहे की, या सर्व लोकांना जी सुरक्षा पुरविण्यात आली त्याचा आधार काय होता, वैयक्तिक सुरक्षा दिली असेल तर वेगळा मुद्दा आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, कॅटेगराईज्ड, नॉन-कॅटेगराईज्ड अशा दोन सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात येतात. जी सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात येत आहे, त्याबाबत केंद्र शासनाने निकष ठरवून दिलेले आहेत. त्याप्रमाणे कॅटेगराईज्ड केले जात आहे. ज्यांना सुरक्षा प्रदान करण्यात येते, ते जे कॅटेगराईजेशन आहे, केंद्र शासनाकडून पण त्यांना कॅटेगराईज्ड केले जाते. ते विभागाला कळवितात, यांना कॅटेगराईज्ड केलेले आहे, त्याप्रमाणे सुरक्षा पुरविण्यात यावी. राज्य शासनही कॅटेगराईजेशन करते. सर्वसाधारणपणे हे जे कॅटेगराईजेशन आहे. मुख्यत्वे करून ज्या केसेससंदर्भात ज्यांनी निर्णय घेतले असतील किंवा काही कारवाई केली असेल त्या संदर्भात त्यांच्या सुरक्षिततेला काही धोका संभवतो अशी धारणा झाली तर कॅटेगराईज्ड करून सुरक्षा पुरविली जाते. दुसरा विषय असा आहे की, अनेकदा खाजगी व्यक्ती त्यांना पण काही प्रकारचा धोका संभवतो किंवा त्यांच्याकडून विभागाला अर्ज प्राप्त होत असतो किंवा आपल्या आकलनामध्ये असे दिसून येते की, त्यांना धोका आहे. या परिस्थितीत पण लोकल युनिट जी आहेत, ती सुरक्षा पुरवू शकते. नॉन कॅटेगराईज्ड सुरक्षेसंदर्भात जो मुद्दा आलेला आहे, सन २००८ चे परिपत्रक आहे. आता हायकोर्टात जी केस झाली, त्या अनुषंगाने हायकोर्टाच्या सूचनेप्रमाणे ते त्या परिपत्रकानुसार सुधारण केलेल्या आहेत.

लोकल लेव्हलवर थ्रेट पर्सेप्शन जज करतात का ? काही ठिकाणी असे लक्षात येते की, स्वतः लोक मला थ्रेट आहे, असे सांगतात. मग ते सुरक्षेची मागणी करतात. याचे विश्लेषण कोण करते ? समाजामध्ये खूप लोक असे दिसतात की, जे अँन्टी सोशल आहेत, अशा बिझनेसमध्ये आहेत, की त्यामध्ये त्यांचे व्यवहार चांगले नाहीत, त्याकरिता ते सुरक्षेची मागणी करतात. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, यासंदर्भात जो शासन निर्णय आहे, तो हायकोर्टात माननीय तत्कालीन मुख्य न्यायाधीश यांच्यासमोर हा विषय आला होता. याच्यामध्ये खूप ऊहापोह झाला. समितीने जो मुद्दा मांडलेला आहे, तो मुद्दा पण तेथे समोर आला होता. या संदर्भात महालेखाकार यांनी स्वतः या विषयात लक्ष घालून त्याचा परामर्श घेऊन त्यांनी एक ठराव तयार केला. तो ठराव शासनाने मान्य केला. नंतर हायकोर्टाला तो सादर केला. तो शासन निर्णय जारी केलेला आहे. शासन निर्णयाची प्रत **(विवरण पत्र क्र. १६)**

त्याअनुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, If a protection is provided at a particular level, it has to be scrutinized at upper level यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, It is scrutinized at the level of Director General of Police. दिनांक ४ जानेवारी,२०१८ रोजी हे नवीन परिपत्रक इश्यू झालेले आहे. हायकोर्टाच्या मान्यतेने त्यामध्ये स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत की, प्रत्येक स्तरावर कमिटी राहील. प्रत्येक स्तरावरील कमिटी या सर्वांचा आढावा घेऊन संरक्षण पुरवायचे आहे किंवा नाही हे ठरवावे. थ्रेट पर्सेप्शन आहे किंवा नाही याचा अंदाज घेऊन ते सुरक्षा देतील. किती सुरक्षा द्यायची, किती कालावधीसाठी द्यायची याचा निर्णय घेतील. प्रत्येक एसपी, कमिशनर, राज्य स्तरावरील डीजी यांच्या अंतर्गत एक-एक कमिटी आहे. या कमिटीने घेतलेले निर्णय योग्य आहेत किंवा नाही हे तपासण्यासाठी राज्य स्तरावर एक कमिटी झालेली आहे. हे परिपत्रक आम्ही आता दिनांक ०४ जानेवारी, २०१८ रोजी इश्यू केलेले आहे.

समितीने उदाहरणादाखल सांगितले की, समजा एखाद्या जिल्ह्यातील एका व्यक्तीला वाय सुरक्षा मिळाली व ती सुरक्षा त्यांच्याकडे महिनाभर होती आणि नंतर एकदम ती सुरक्षा मागे (वीड्रॉ) घेण्यात आले. पण सदर त्या व्यक्तीस सुरक्षा का मिळाली व ती नंतर का मागे घेण्यात आली याचे कारण काहीच कळले नाही. याबाबत लोक स्थानिक लोक लोकप्रतिनिधींना विचारणा करतात. याअनुषंगाने समितीने विचारणा केली की ज्यांना सुरक्षा पुरविण्यात येतात त्या संदर्भात विभागाकडून सहा महिन्यात किंवा वर्षाभरानंतर आढावा घेण्यात येतो का ? तसेच, ज्यांना सुरक्षा पुरविण्यात

येते ते ऑन पेमेट किंवा नॉन पेमेटवर बेसीसवर केली जाते का ? नॉन पेमेंट हा अपवादात्मक विषय आहे. क्रिमीनल असेल तर अपवादात्मक परिस्थिती सुरक्षा देण्यात येईल असे जी.आर.मध्ये आहे असे समितीने नमूद केले असता याबाबत अपर मुख्य सचिव यांनी खुलासा केला की, हा विषय हायकोर्टासमोर आला होता. त्यात शासनाने अशी भूमिका घेतली होती की, त्यांच्या कृत्यामुळे धोका झाला असेल तर त्या संदर्भात पण विचार करण्यात येईल. हायकोर्टात सूचना अशी आली की, आपण जो उल्लेख केलेला आहे, तो आपण वगळून टाकावा म्हणून हा उल्लेख आपण वगळलेला आहे. ज्यावेळी ही समिती आकलन करेल, या सगळया गोष्टींचे आकलन करून मग ते पर्सेप्शन निर्माण झालेले आहे, याचा विचार करून संरक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

यामध्ये असे नमूद केलेले आहे की, ५० हजार रुपयापर्यंत उत्पन्न असलेल्यांना मोफत व त्यावरील उत्पन्न असलेल्यांना चार्ज घेणार, यामागचे लॉजिक काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिव यांनी सांगितले की, हाय कोर्टच्या एजी साहेबांनी हे परिपत्रक ड्राफ्ट केलेले आहे. त्यानंतर हायकोर्टाला सादर केलेले आहे, त्याला हायकोर्टाची मान्यता मिळालेली आहे. गृह विभाग, एजी, हायकोर्ट यांनी मिळून ही ५०००० रुपयांची रक्कम ठरविलेली आहे. संरक्षण खर्च काय असावा आणि सुरक्षा देणे किंवा न देणे व सुरक्षा दर यात ताळमेळ असला पाहिजे. जर शासनाचे दर खूप अधिक असले तर सुरक्षततेची आवश्कता असूनही शुल्क भरु शकत नाही म्हणून तो वंचित राहता कामा नये. हे करीत असताना भूमिका अशी घेतली होती की, पहिल्यांदा सुरक्षा मिळणे हा देखील कोणाचा हक्क होऊ शकत नाही. संरक्षण देणे हे राज्याचे कर्तव्य ठरते. व्यक्तिगत सुरक्षा देणे हे कर्तव्य नाही. विशेष परिस्थितीत जर हे क्रमप्राप्त झाले तर शासनाची व्यवस्था काय असावी या संदर्भात हा शासन निर्णय काढलेला आहे. ५०,००० रुपये मर्यादेंतर्गत एक साधारण कॉन्स्टेबल तर संरक्षणाकरिता राहणार नाही. त्यांचा मासिक खर्च ५०,००० रुपयांपर्यंत जाऊ शकतो. ५०,००० रुपयांपर्यंत इन्कम असणा-यांना सुरक्षा देत असताना त्याचे इन्कम आहे, त्याच्या किती टक्के त्याची कमाई आपण सुरक्षा खर्च म्हणून घेतली, असे होऊ नये हे या मागील लॉजिक आहे.

ही चर्चा आता हायकोर्टात झालेली आहे. हायकोर्टाच्या ऑर्डरसंबंधी बोलण्यावर शासनाला मर्यादा आहेत असे समितीने नमूद केले असता, अप्पर मुख्य सचिव यांनी सांगितले की, या विषयावर जवळ जवळ एक वर्ष सारख्या मुख्य न्यायाधीश महोदयांकडे बैठका झाल्या हिअरिंग झाल्या, महालेखाकार स्वतः अपिअर झाले. महालेखाकार यांचे जे मत आहे, तीच भूमिका शासनाने मांडलेली आहे. विभागाने पॉलिसी ठरविली पाहिजे हे खरे आहे. न्यायपालिकेला घटनेने अधिकार दिलेले आहेत. कोणत्याही पॉलिसीविषयी मिमांसा व सूचना ते शासनाला करू शकतात. एवढाच इश्यू झाला की, या केसमध्ये न्यायपालिकेमध्ये थेट निदेश दिलेले नाहीत हिअरिंगच्या माध्यमातून सूचना दिल्या त्या सूचनेच्या अनुषंगाने भूमिका घेतलेली आहे.

हा परिच्छेद येण्याचे कारण असे आहे की, ज्यांना सुरक्षा दिली त्यांनी सुरक्षा दिल्यानंतर त्याचे शुल्क भरले नाहीत. म्हणजे वसुलीबाबतचा हा परिच्छेद आहे. परिच्छेदाचा उगम पाहिला तर एक महिन्याचे पैसे ॲडव्हान्स भरायला पाहिजे. बँक अकाऊंटचे डिटेल वगैरे भरायला पाहिजे. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता, अप्पर मुख्य सचिव यांनी याबाबत सांगितले की, या विषयाबद्दल खूप मिमांसा झाली आहे. मुख्य न्यायाधीश महोदयांची सूचना अशी होती की, जर कोणी पेमेंट केले नाही तर सुरक्षा काढली पाहिजे, पण या विषयाबाबत विभागाला असे वाटायचे की, थ्रेट पर्सेप्शन जेनुईन आहे, पैसे भरण्याबाबत वाद आहेत, केवळ पैसे भरले नाहीत म्हणून विभागाने सुरक्षा काढून घेणे हे योग्य ठरणार नाही, असे विभागाचे मत होते. कारण जर समजा दुर्दैवाने काही घटना घडली तर विभागाने सुरक्षा द्यायला पाहिजे होती. सुरक्षा देण्यात आली नाही म्हणून असे घडले असे होता कामा नये. विभागाने दोन गोष्टी विभक्त केल्या. Protection will only be based on threat perception. It will continue till the threat continues. The payment will be based on ability to pay. The recovery of the dues will be an independent exercise. Withdrawal of protection will not be used to enforce recovery. This was our position. Finally this has got reflected in the G.R. The Court has also accepted this. कोर्ट देखील विभागास सांगू शकले नाही की त्यांनी पैसे भरले नाहीत, म्हणून विभागाने प्रोटेक्शन काढले पाहिजे.

पोलीस स्टेशनमध्ये शेकडो लोकांनी असे अर्ज रजिस्टर केले असतील की, त्यांना काही ना काही थ्रेट आहे. त्यातील काही केसेस जेन्युईन असतात. थ्रेटमध्ये कधी त्यांना मारहाण होते, कधी त्यांना गंभीर जखमा होतात, तर काहींचा मृत्यूही होतो. ज्यांचे उत्पन्न ५० हजार रुपयांच्या खाली आहे, त्यांना सुरक्षा देण्याबाबत सु-मोटो निर्णय का करीत नाही ? पण शासन असा निर्णय करून शकणार नाही. जेन्युईन प्रकरण असेल तर त्याकरिता एक वेगळी सोय असली पाहिजे. याबाबत उदाहरण देताना सांगितले की, समजा एखाद्या लोकप्रतिनिधींना थ्रेट आहे. परंतु तो पैसे भरत नाही मात्र विभागास असे वाटत असेल की, त्याची थ्रेटची तक्रार जेन्युईन आहे. त्या लोकप्रतिनिधींकडे शासनाचा एकही पोलीस नसतो. परंतु, ही केस जेन्युईन आहे व सुरक्षा दिली पाहिजे असे विभागाला वाटत असेल आणि तो पैसे भरत नसेन तर त्याला ३/६ महिन्यांची नोटीस त्याकरिता द्यावी. लोकप्रतिनिधी आहे म्हणून किंवा त्यांची कोणाकडे तरी ओळख आहे म्हणून किंवा त्याचे एक स्टेटस आहे त्यामुळे तो पैसे भरत नसतानाही त्याला सुरक्षा मिळणार असेल तर, या देशातील गरीब माणसांच्या संदर्भात न्यायाधिशांनी का सांगितले नाही ? त्यांनी ते देखील सांगितले पाहिजे. एखादा पदाधिकारी, अधिकारी किंवा शासनकर्ता असेल तर परिस्थिती वेगळी आहे. जेन्युईन थ्रेट असल्यावर शासनाची भूमिका असेल तर हे पैसे

भरणारच नाही. त्यामुळे शासनाने या बाबत निर्णय करताना जेन्युईन थ्रेट असेल तर या संदर्भात ३, ६, ९ महिने अशी काही तरी कालमर्यादा टाकावी. तसेच अशीही एक अट आहे की, ॲडव्हान्स दिल्यानंतरच सुरक्षा दिली पाहिजे. मात्र त्याचे पालन केले जात नाही. कमिटीची कॅटेगरी करतात तो वेगळा मुद्दा आहे. कमिटीशिवाय ज्या लोकांना सुरक्षा दिली जाते त्यांच्याकडून ॲडव्हान्समध्ये पैसे घेणे बंधनकारक आहे असा नियम आहे. असे समितीने नमूद केले.

६.१७ ७.३.३.१ "इतर राज्याकडून तेथे तैनात केलेल्या पोलिसावरील खर्चाची वसुली न होणे"

इतर राज्यामध्ये तैनात केलेल्या पोलिसावरील खर्चाची रक्कम रु. ३८.३२ कोटी होती ज्यापैकी वर्ष १९६८ ते २००८ या मधील वेगवेगळा कालावधीशी संबंधित रु.२२.१२ कोटी रक्कम पाच वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित होती. तसेच सन २००८-२००९ ते २०१२-२०१३ दरम्यान वेगवेगळ्या कालावधीत १२ राज्यामध्ये तैनात केलेला **SRPF** जवानावरील एकूण रु. १६.२० कोटी खर्चाची रक्कम वसुलीसाठी प्रलंबित होती. सदर २२ कोटी १२ लक्ष व १६ कोटी २० लक्ष रुपयांपैकी ५ कोटी ४९ लाख रुपये वसूल झाले आहेत. महालेखाकारांनी असा मुद्दा काढला आहे की, ३८ कोटी ४९ लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या वसुलीबाबत विभाग मागणीच केलेली नाही. याबाबतची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी समितीला अवगत केले की, याबाबत राज्यांशी नियमितपणे पत्रव्यववहार केला जातो. बऱ्याच राज्यांकडून येणे बाकी आहे. जसे केरळकडून फार कमी म्हणजे दीड लाख एवढी रक्कम येणे बाकी आहे. मात्र ती त्यांच्याकडे सन १९८९ पासून प्रलंबित आहे. याबाबत विभागाकडून पत्रव्यवहार केला जातो. मात्र जो ताळमेळ व्हायला पाहिजे की, हा पैसा परत आला ते होत नाही. तसेच, थोड्या-थोड्या स्वरुपामध्ये दरवर्षी काही रक्कमा मिळत जातात. काही राज्यांच्या बाबतीत विभागाला डिमांड पाठविण्याच्या अगोदर विभागाला ती महालेखाकार कार्यालयाकडून तपासून पाठवावी लागते. एकूण ४ राज्याची आताच म्हणजे १९ जानेवारी २०१८ ला विभागाकडे प्रमाणपत्र आलेली आहेत. या आठवड्यामध्ये सदर प्रमाणपत्र त्या संबंधित राज्यांना पाठवून देण्यात येतील.

पैसे आले किंवा नाही आले, समायोजन होणार की नाही होणार हा वेगळा मुद्दा आहे. पण विभाग डिमांडच करीत नाही. ३८ कोटी रुपयांच्या वसुलीची डिमांड रेज केलेली नाही. वसुलीची २२ कोटी रुपयांची एक फिगर आहे व १६ कोटी रुपयांची दुसरी फिगर आहे. मात्र ३८ कोटी रुपयांपैकी ठरावीक रकमेची वसुली केलेली आहे. कर्नाटक, पंजाब, उत्तर प्रदेश, गुजरात व बिहारकडून काही पैसे आलेले आहेत. मात्र इतर राज्यांकडे विभागाने डिमांड रेज केली आहे काय? महालेखाकारांकडून प्रमाणपत्र घेऊन विभागाला डिमांड रेज करावी लागते. महालेखाकार कार्यालयाच्या विभागाकडे डिमांड पेंडिंग आहे की नाही, डिमांड केली असल्यास किती रकमेची केलेली आहे ? आता विभागीय प्रतिनिधींनी केवळ ४-५ राज्यांची माहिती दिली आहे व ती रक्कम ७ कोटी रुपयांपेक्षा अधिक नाही. या व्यतिरिक्तची माहिती समितीला दिलेली नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, सर्व डिमांड्स रेज झालेल्या आहेत. एकूण प्रलंबित ६९ कोटी ६८ लाख रुपयांची आहे.

समितीचा मुद्दा असा आहे की, सन २०१३ पर्यंतचे जे ऑडिटचे परिच्छेद आले, त्यानुसार आपण ३८ कोटी रुपयांची डिमांड रेज केली पाहिजे होती. विभागाने त्याच्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, फक्त ७ कोटी रुपयांची डिमांड केलेली आहे आणि हे देखील नमूद केले आहे की, विभागाने ३-४ राज्यांकडून ५ कोटी ४९ लाख रुपये मिळालेले आहेत. हा सर्व रिपोर्ट एक वर्षापूर्वीचा असल्याचे दिसून येते. याबाबतची अद्ययावत माहिती काय आहे. ही डिमांड रेज न करण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांनी समितीस सांगितले की, सर्व डिमांडस रेज झालेल्या आहेत.

डिमांड रेज करण्याकरिता महालेखाकाराकडून जे सर्टिफिकेट घ्यावे लागते ते घेतले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांनी सांगितले की, महालेखाकाराकडून ४ राज्यांची सर्टिफिकेटस दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी आलेली आहेत.

हे सन २००८ व त्याच्या पूर्वीपासूनचे आहे. आता समितीची साक्ष लागल्यामुळे कारवाई सुरू झाली आहे की, त्यावेळेपासून वसुलीबाबत कारवाई केली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, विभागाने वेळोवेळी आढावा घेतला व मागणी केलेली आहे. केवळ काही राज्यांच्या बाबतीत महालेखाकारांकडे प्रमाणपत्र मागितले होते. महालेखकारांनी त्यावर सी.आर.सी.कोड देण्यास सांगितल्यानंतर तो दिला गेला व त्यानंतर ती मागणी आता केली जात आहे. त्या संदर्भात डी.जी. ऑफिसकडून सर्व राज्यांशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. विषय एवढाच आहे की, यामध्ये जी वसुली झाली पाहिजे ती त्या राज्यांना प्राप्त होणाऱ्या बजेटवर अवलंबून असते.

हा वसुलीचा मुद्दा नाही. विभागाकडे युनिटकडून सर्व डिटेल्स आले पाहिजेत. ते डिटेल्स आल्यावर महालेखाकारांकडून त्याची एन्डॉर्समेंट करून घ्यावी लागते, प्रमाणपत्र घ्यावे लागते. त्या सर्व कामांमध्ये खूप दिरंगाई झाल्याचे दिसून येत आहे. विभागाची मागणीपत्र गेली नाही तर वसुली कशी होणार? डी.जी.ऑफिस किंवा मंत्रालयाकडून डिमांड रेज करून, सर्व पत्रव्यवहार करून त्या राज्यांशी चर्चा केली गेली पाहिजे. युनिटपासून

महालेखाकारापर्यंतचा प्रवास व त्यामध्ये होत असलेली दिरंगाई व त्यामुळे डिमांडला होणारा विलंब टाळला पाहिजे. मात्र ५-१० वर्षे विलंब झालेला आहे. त्याची कारणे काय आहेत, महालेखाकारांकडे एवढा विलंब का होतो? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता यावर महालेखाकारांनी खुलासा केला की, महालेखाकार कार्यालय याचा आढावा घेतला आहे. एक तर काही व्हाऊचर्सचे डिटेल्स नसतात, सी.आर.सी. कोड नसतो, त्यामुळे काही पत्रव्यवहार होतो. यामध्ये मुंबईच्या बाहेरील व मुंबईतील पी.ओ. कडून काही डिटेल्स येतात. त्यांच्याकडून तीन महिन्यांनी (क्वार्टरली) किंवा महिन्यांनी (मंथली) रिकन्सीलेशन असा पाठपुरावा होत नाही. मग फक्त महालेखाकार कार्यालयामार्फत पत्रव्यवहार करण्यात येतो. नियमित बैठक घेतल्या तर, या कामामध्ये बऱ्याच प्रमाणात करंट सिच्युएशनवर येता येईल. I would like to request all the Officers of Home department to see that there is a system of monthly reconciliation. At present there are many hurdles in the system there is no follow-up. When we ask for voucher details ते मिळाले नाहीत तर ते थांबून राहते. मुंबईच्या पी.ओ. कडून डिटेल्स येत नाहीत, अशाच बऱ्याचशा गोष्टी यामध्ये आहेत.

त्याअनुषंगाने पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी समितीस अवगत केले की, सन २००९ मध्ये जालन्याच्या कंपन्या पाठविल्या आहेत. सप्टेंबर, २०११ व सप्टेंबर, २०१२ मध्ये पाठविलेल्या कंपन्यांचे देयक मार्च, २०१० मध्ये पाठविले आहे. अशी २-३ महिन्यांमध्ये दिलेली देयके आहेत.ते डी.जी. ऑफिसकडून महालेखाकारांकडे जाते. त्यामुळे या सर्व जुन्या बाबतीत महालेखाकार कार्यालय ते डी.जी.ऑफिसकडून एजीकडे जाते. त्यामुळे या सर्व जुन्या बाबतीत महालेखाकार कार्यालयाकडून १-२ वर्षांचा फरक पडतो. यासंदर्भात समितीने महालेखाकारांना विचारणा केली की, याला विलंब लागण्याची कारणे काय आहेत ? यावर महालेखाकारांनी खुलासा केला की, महालेखाकार कार्यालयामध्ये याबाबत २-३ वर्षांपूर्वी हायर लेव्हलला मिटिंग झाली होती. त्यावेळेस अशी विनंती होती की, पार्ट बटालियन किंवा ग्रुप प्रमाणे एस.ओ.ई. न पाठविता डी.जी.पी.नी महालेखाकारांना जर एक कन्सोलिडेटेड एस.ओ.ई. पाठविला तर बरे होईल. आम्ही त्या कन्सोलिडेटेड एस.ओ.ई.ची वाट पाहत आहोत. जे पार्ट एस.ओ.ई.झाले ते तसेच प्रलंबित राहिले हे एक कारण आहे.

महालेखाकारांनी जे सांगितले त्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव यांनी समितीस सांगितले की, या संदर्भात एक बैठक घेऊन ही पद्धत सुरळीत कशी होऊ शकेल, हे निश्तिच करण्यात येईल. याबाबत अतिरिक्त माहिती अशी आहे की, महाराष्ट्र राज्यांचे बल दुसरीकडे जाते व दुसऱ्या राज्यांचे बल महाराष्ट्र राज्याकडे येत असते. याबाबत केंद्रिय गृह सचिवांचे एक पत्र सर्व राज्यांना गेलेले आहे. केद्रांने असे सांगितले की, त्यांनी पाठविलेला सी.आर.पी.एफ., सी.ए.पी.एफ. वगैरे आहे तर सर्व राज्यांकडून त्यांना ३६ हजार कोटी येणे आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, महाराष्ट्र राज्याला केंद्राला किती पैसे द्यावयाचे आहेत ? यावर अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, महाराष्ट्राला केंद्राला १४८२ कोटी रुपये द्यावयाचे आहेत. ऑथॉरिटीचे, फोर्सेसचे देणे-घेणे सुरूच असते हे समायोजन असते. त्यामुळे महालेखाकारांनी जी सूचना केली आहे, त्या अनुषंगाने त्यांच्या समवेत चर्चा करून याची पद्धत अजून सुरळीत कशी होईल याबाबतची व्यवस्था करण्यात येईल.

या ५ कोटी ४९ लाख रुपयां व्यतिरिक्त आणखी काही वेगळे पैसे आले आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, तेवढेच पैसे आले आहेत.

वसुलीचे प्रमाण खूप कमी आहे. तसेच, समायोजनही होत नाही. केवळ पत्रव्यवहार करून काही वसुली होणार नाही. हायर लेव्हलवर, मंत्रालय लेव्हलवर, डी.जी.पी. लेव्हलवर याचा पूर्ण आढावा घेऊन अकाऊंटिंग सुरळीत होण्यासाठी संबंधित राज्य सरकारशी शासनानेही चर्चा करावी. कारण ५९ कोटी रुपये बाकी आहेत. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले की, ही पद्धत सुरळीत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल. मात्र वसुलीचा विषय हा राज्याच्या बजेटवर अवलंबून आहे. त्यामुळे पत्रव्यवहाराच्या माध्यमातूनच प्रयत्न करता येईल. तसेच महालेखाकाराकडे असलेल्या प्रमाणपत्रात प्रलंबितेबाबत देखील महालेखाकारांसमवेत चर्चा करून हे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

६.१८ परिच्छेद क्रमांक ७.३.३.२. : “ शासकीय रेल्वे पोलिस (GRP) प्रती खर्चाची मागणी न करणे ”

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या अखेरीस तिन्ही घटक कार्यालयांचे मिळून रु.३०१,०६,३८,६४० इतकी रक्कम रेल्वे प्रशासनाकडून मिळणे प्रलंबित आहे. त्याच बरोबर लोहमार्ग आस्थापनेवरील तिन्ही घटक मिळून ५४० पदांना रेल्वे प्रशासनाने मंजुरीच दिलेली नाही, ज्यांना विभागाकडून पेमंट करण्यात येत आहे. यामध्ये राज्य शासन आणि रेल्वे यांचे ५०-५० शेअरिंग आहे. यादृष्टीने एक अपील सन २००८ ते दिनांक ३१ मार्च, २०१३ यापैकी दिनांक १ एप्रिल २०१० ते दिनांक ३१ मार्च २०१३ व सन २०१२-२०१३ ही विवरणपत्र तयार केली गेली नाहीत, ही बाब समितीच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, या परिच्छेदाचे ३ भाग आहेत. प्रथम भागामध्ये अकाऊंटिंगचा प्रॉब्लेम होता. रेल्वेकडे आऊटस्टँडिंग ड्यूज १५० कोटी रुपये असताना विभागाने १४७ कोटी रुपये दाखविले होते. यामध्ये ३ कोटी रुपयांची तफावत होती. ही अकाऊंटींगची चूक होती व त्यानंतर रेल्वेला रिवाईज स्टेटमेंट पाठविलेले आहे. ही चूक मान्य आहे.

तथापि, विभागाकडून प्राप्त झालेला लेखी उत्तर नमूद केले आहे की, २०४.८१ कोटी रुपयांची मागणी केली गेली, त्यापैकी १२४.३९ कोटी रुपये मिळाले. मग आता १५० कोटी व १४७ कोटी ही नवीन फिगर कोठून आणली आहे ? यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, २७४ कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. पूर्वी जे आऊटस्टँडिंग ड्यूजचे स्टेटमेंट पाठविले होते, त्यामध्ये २७४ कोटी रुपये नमूद केले होते.

याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, " Rs.193.90 Crores pending from 1979-80 to 2007-08 to 2008-09 and balance recovery of Rs.150.42 crores for period 2008-09 to 2012-2013. " एकूण १९३ अधिक १५० कोटी रुपये दोन वेगळया कालावधीचे आहेत. सन १९७९-८० ते २००७-०८ पर्यंतची रक्कम १९३.९० कोटी रुपये असून सन २००८-०९ ते २०१२-१३ पर्यंतची रक्कम १५०.४२ कोटी रुपये आहे. १५० करोड़ रुपये फिगर्स पूर्वीचे १९३ करोड़ रुपये फिगर्स है प्रलंबित दाखवले याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, १९३ कोटी रुपये प्रलंबित आहेत, त्याबाबत अडचण अशी आहे की, गृह विभागाकडून बिल देण्यात येते, परंतु रेल्वेकडून नेहमी बिलाची प्रतिपूर्ती होते असे नाही.

जी बिले येतात ती वेगवेगळ्या कार्यालयांना पाठवून देण्यात येतात. Why you are not making a centralize system? You can do the accounts at central point. असे समितीने सूचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे योग्य आहे पण विभागाची सुद्धा अशी अडचण होती की, ही बाब विभागाने फार कॉम्प्लेक्स करून ठेवली होती. आता त्यात सुधारणा करण्यात येत आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर येथे तीन वेगवेगळी युनिट आहेत आणि ४ वेगवेगळया रेल्वे आहेत. सेंट्रल, वेस्टर्न, एससीसी आणि एसईईसी अशा चार वेगवेगळी युनिट त्यांची बिले पाठवितात, त्याची माहिती महालेखाकार कार्यालयाला कळविण्यात येते. ही कॉम्प्लिकेटेड सिस्टीम होती. पुढील सहा महिन्यात ही पद्धत सुरळीत होईल. पुढच्या वेळी एवढे कन्फ्युझन राहणार नाही. ते सर्व कार्यालयामध्ये सेंट्रलाईज असले पाहिजे. तेथून महालेखापाल आणि रेल्वेला कळविले गेले पाहिजे. रेल्वेकडून सुद्धा पैसे येण्यामध्ये विलंब होतो. दुसरा प्रकार म्हणजे विभागाचे रेल्वेकडे जे ठरावीक ड्यूज आहेत ते त्यांच्याकडून दिले जात नाहीत ५४० व्यक्तींचे ड्यूज आहेत. महाराष्ट्रात रेल्वेकरिता १९८० ते २०१८ या ३८ वर्षाच्या काळात फक्त ६४० व्यक्तींची वाढ झाली आहे. त्यापैकी मुंबई पोलिसांकरिता १०० व्यक्ती नियुक्त केल्या गेल्या आहेत. ठाण्यामध्ये व नवी मुंबईमध्ये नवीन पोलीस आयुक्तालये निर्माण झाली. परंतु लोहमार्ग विभागाकडे फक्त १०० माणसांची वाढ झाली आहे. उर्वरित महाराष्ट्राकरिता ५४० माणसांची वाढ शासनाकडून झाली आहे. रेल्वे विभागाकडून जेव्हा ५० टक्के रक्कम दिली तेव्हाच मनुष्यबळ दिले जाणार आहे, जेव्हा सीआरबी, रेल्वे बोर्ड चेअरमन त्या पदांना मान्यता देणार आहे. आतापर्यंत फक्त १०० पदांना मान्यता दिली गेली आहे. त्यापोटी देय रक्कम मिळत आहे. परंतु ५४० पदांसाठी साधारणपणे १० कोटी रुपये दरवर्षी दिले पाहिजेत, ती रक्कम प्रत्येक वर्षी ॲड होत आहे, परंतु रेल्वेकडून दिली जात नाही सध्या रेल्वेकडे बिल प्रलंबित आहे त्याची लिस्ट विभागाकडे आहे.

एकुण ५४० पदांना रेल्वे प्रशासनामार्फत मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे हा मुद्दा वादाचा आहे. ५४० पदे मंजूर नसतील तर विभागाने थकबाकी मागणी केली तरी पदे मंजूर केली नसल्यामुळे रेल्वे प्रशासनाकडून ती नाकारली जाऊ शकतात. परंतु प्रत्यक्ष ते फोर्स वापरत आहेत. केंद्रीय रेल्वे मंत्री महाराष्ट्राचे आहेत. त्यांच्याबरोबर बैठक घेऊन विषय मार्गी लावण्यात यावा असे समितीने सूचित केले असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, वसुलीचा विषय हा महत्त्वाचा आहे. तसेच गृह विभागाच्या दृष्टीने मुंबईतील रेल्वे वाहतुकीची सुरक्षितता देखील अत्यंत महत्वाची आहे. त्यासमोर इतर विषय मागे पडतात. रेल्वे सुरक्षा बल (रेल्वे प्रोटेक्शन फोर्स) तयार केलेला आहे, त्यांची भूमिका अशी आहे की, रेल्वेच्या मालमत्तेची देखभाल करणे, तेथे गुन्हे न होणे आणि कायदा व सुव्यवस्था राखणे याची जबाबदारी राज्य शासनाकडे दिली आहे. जरी मेमोरंडम ऑफ अण्डरस्टॅंडिंगनुसार रेल्वेने ५० टक्के रक्कम देण्याचे मान्य केले असले तरी ही जबाबदारी गृह विभागालाच सोसावी लागेल. रेल्वे मान्यता देईल किंवा नाही यावर गृह विभाग अवलंबून राहू शकत नाही. जवळजवळ ५०० होमगार्ड मुंबई उपनगर तथा महिलांच्या रेल्वे डब्यामध्ये कायम उपस्थित राहतील म्हणून नियुक्त केले आहेत. त्याचा खर्च राज्य शासन सोसत आहे. गृह विभाग रेल्वे सुरक्षिततेचा आढावा घेतला तेव्हा असे दिसून आले की, अजूनही सुधारणा होणे आवश्यक आहे. हा विषय बाजूला ठेवून ३०० माणसे राज्य सुरक्षा महामंडळामार्फत राज्य शासनाच्या खर्चाने त्यांना उपलब्ध करून दिलेली आहेत.

गृह विभागाने अतिरिक्त (ॲडिशनल) फोर्स उपलब्ध करून दिला त्याबद्दल हरकत नाही, ते योग्य आहे. पण मुद्दा असा आहे की, जी पदे मंजूर आहेत त्या पदांच्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम रेल्वे प्रशासनाकडून येणे क्रमप्राप्त आहे. त्यामध्ये गृह विभागाने कमी पडता कामा नये. गृह विभाग त्याची जबाबदारी योग्यरित्या पार पाडीत आहे. परंतु ४२० कोटी रुपये अजूनही येणे बाकी आहे असे दिसून येते, त्याची डिमांड केली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता अप्पर मुख्य सचिव यांनी सांगितले की, खर्चाचा ताळमेळाचे काम केले आहे. इतक्या वर्षात कधी प्राप्त झालेली नव्हती, जवळजवळ ८५ कोटी रुपये मागील वर्षी त्यांच्याकडून प्राप्त झाले आहेत. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. रेल्वे विभागाने देखील ही जबाबदारी मान्य करावी यासाठी त्यांच्याशी गृह विभागाच्या पातळीवर, शासन पातळीवर पत्रव्यवहार झालेला आहे. बैठक देखील झालेली आहे. ही मागणी सन २०१६-१७ पर्यंत सादर केली आहे. रेल्वे प्रशासनाचे प्रत्येक वर्षी ८० ते ९० कोटी रुपये दिले पाहिजेत. ते कधी ५० कोटी रुपये देतात.

सन २०१०-११ पासूनची लेखा प्रमाणपत्रे प्राप्त झाली नसल्यामुळे प्रतिपूर्तीची देयके सादर करणे शक्य झाले नाही. आजमितीस कोणत्या कालावधीचे लेखा प्रमाणपत्र मिळाले नाही, ज्यामुळे गृह विभाग मागणीसाठी रेज करु शकलेला नाहीत, त्यात अडचण काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ या तीन वर्षाचे लेखा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून सन २०११-१२ व सन २०१२-१३ चे प्रमाणपत्र आता सादर केले आहे. सन २०१३-१४ ते २०१६-१७ पर्यंतची बाकी आहे. २ ते ३ वर्षांचा कालावधी ते घेतात. रेल्वेचे चार वेगवेगळे विभाग आहेत. ते जोपर्यंत प्रमाणपत्र देत नाही तोपर्यंत मुद्दा प्रलंबित राहणार आहे. हा शासन ते शासन ट्रॅन्झॅक्शन आहे. सन २०१३-१४ ते २०१६-१७ पर्यंतची बाकी आहे.

रेल्वे प्रशासनाकडून प्रलंबित रक्कम ४२० कोटी कोणत्या तारखेपर्यंतची आहे? तसेच ३१ मार्च २०१७ पर्यंतची संपूर्ण डिमांड गृह विभाग रेज केली आहे. मग रेल्वे प्रशासनाकडे किती डिमांड प्रलंबित आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१६-१७ व २०१७-१८ ची डिमांड सादर केली आहे.

खर्चाचा ताळमेळ (रिकन्सीलिएशन) करून प्रमाणपत्र घेऊन डिमांड रेज केली ती फिगर किती आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागाचे उत्तरप्राप्त झाले नाही.

मुद्दा असा आहे की, ज्यांना गृह विभाग सुरक्षा पुरविणे, त्यांच्यासाठी किती लोक तैनात केले हे विभागाने रेल्वे प्रशासनामार्फत कन्फर्म करून घेतले पाहिजे. कारण नंतर ते फिगर डिस्प्यूट करतात.या सिस्टीममध्ये विभागाने काय सुधारणा केली. How do you get it confirmed from them about the number of people deployed with them? कारण सगळे क्लेम्स त्या फिगरवर अवलंबून असतात.

रेल्वे प्रशासनाकडे मनुष्यबळ पदस्थापनेवर आहे. ५४० व्यक्तीना पाठविले असेल तर त्यापोटी पैसे द्यावे लागणार आहेत. याबाबत जर अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांनी रेल्वे बोर्डाशी चर्चा केली तर यातून मार्ग निघू शकतो. जेवढा फोर्स तैनात केला आहे त्याचे पैसे दिले का? अशी विचारणा समितीने केली जाते अपर मुख्य सचिव गृह विभाग यांनी सांगितले की, जी पदे आस्थापनेवर (इस्टॅब्लिशमेंटवर) आहेत. ५४० पदे वगळून इतर फिगरबद्दल वाद असण्याचे कारण नाही. तथापि, जी पद्धत आहे ती क्लिष्ट आहे. दरमहा पगारावर किती खर्च झाला त्याचा हिशोब करून तो महालेखाकार कार्यालयाला सादर करायचा. त्यांच्याकडून मान्य करून घेतल्यानंतर रेल्वेला कळवायचे. त्यांना बजेट मिळाले तर ते पैसे देतात. म्हणून सन १९८० पासूनचे विषय प्रलंबित आहेत. या पद्धतीमध्ये काही सुधारणा होते का याबाबत विभाग प्रयत्नशील आहे. रेल्वे प्रशासनाने ठोक रक्कम द्यायचे कबूल केले तर हा एसओईचा विषय निघून जाईल.

रेल्वे प्रशासनाकडून प्रलंबित वसुली ४२०, ४६, १५, २९७ एवढी आहे पण सन २०१७ पर्यंतची फिगर किती आहे याबाबत माहिती कळवावी. असे निदेश समितीने दिले असता सदर माहिती समितीस सादर करण्यात येईल असे विभागाकडून आश्वस्त करण्यात आले.

समितीस आश्वस्त केल्याप्रमाणे विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

" दिनांक १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २०१३ या कालावधीत वसूल करावयाची रक्कम रु.२७४ कोटी असून त्यापैकी रु.१२७ कोटी रक्कम वसूल झाल्याचे व प्रलंबित रक्कम १४७ कोटी त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1 April 2008 to 31 mar 2013					
year	total claim received	amount amount	adjusted receiced	total dues (2-5)	outstanding
1	2	3	4	5	6
Mumbai	1,78,30,63,784	98,86,87,231	3,71,76,601	1,02,58,63,832	75,71,99,952
Pune	17,45,91,459	13,79,98,812	10,30,921	13,90,29,733	3,55,61,726
Nagpur	79,04,42,017	10,76,90,462		10,76,90,462	68,27,51,555
	2,74,80,42,017	1,23,43,76,505	3,82,07,522	1,27,25,84,027	1,47,55,13,233

तथापि १/०४/२००८ ते ३१/०३/२०१३ या कालावधीत वसूल करावयाची रक्कम रु.२७४ कोटी असून त्यापैकी रु.१५० कोटी रक्कम वसूल करणे प्रलंबित आहे. त्याप्रमाणे सुधारित प्रलंबित १५० कोटी रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1 April 2008 to 31 mar 2013					
year	total claim received	amount amount	adjusted receiced	total dues (2-5)	outstanding
1	2	3	4	5	6
Mumbai	1,78,30,63,784	98,86,87,231	3,71,76,601	1,02,58,63,832	75,71,99,952
Pune	17,45,91,459	13,79,98,812	10,30,921	13,90,29,733	3,55,61,726
Nagpur	79,04,42,017	7,90,03,075		7,90,03,075	71,14,38,942
	2,74,80,42,017	1,23,43,76,505	3,82,07,522	1,24,38,96,640	1,50,42,00,620

याबाबतीत असे सादर करण्यात येते की, रेल्वे प्रशासनाकडे प्रलंबित असलेली रक्कम रु. १,५०,४२,००,६२० असून रु.१,४७,५५,१३,२३३ ही रक्कम विविध कार्यालयामधील लेखा शाखेतील कर्मचाऱ्यांकडून एकत्रित अहवाल सादर करताना अनवधानाने दर्शविण्यात आली होती. त्याबद्दल या कार्यालयाकडून दिलगिरी व्यक्त करीत आहे.

२. दिनांक ३१ मार्च २०१३ च्या अखेरीस प्राप्त रकमा व वसुल करावयाच्या रकमांच्या विवरणपत्रानुसार २०१०-११ पासूनचे लेखा प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २०१३ पूर्वी प्राप्त झाली नसलेले प्रलंबित रकमांच्या मागणीची देयके रेल्वेप्रशासनास सादर केलेली नव्हती. तथापि, आता २०१४-१५ पर्यंतची सर्व लेखा प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयाकडून प्राप्त झालेली असून २०१४-१५ पर्यंतच्या रकमांची मागणी संबंधित रेल्वे विभागाकडे करण्यात आलेली आहे.

३. दिनांक २३ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या लोकलेखा समितीच्या बैठकीमध्ये माननीय लोकलेखा समिती अध्यक्ष यांनी प्रलंबित ४२० कोटी रक्कम ही कोणत्या कालावधीची आहे व सदर रकमेची रेल्वे विभागाकडे मागणी केलेली आहे काय याबाबत चर्चा करण्यात आली.

त्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, तिन्ही घटक कार्यालयाची मिळून रक्कम रु.४२० कोटी नसून ती रु.३०१ कोटी आहे. या कार्यालयाचे पत्र क्र.अपोमर्स (लोह/सलेअ/२०१६/१७२५, दिनांक १२७.२०१६ अन्वये २०१६-१७ या आर्थिक वर्षाअखेरीस तिन्ही घटक कार्यालयाचे सन २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या मागणीसह रु.३०१०६३८६४० इतकी रक्कम रेल्वे प्रशासनाकडून मिळणे प्रलंबित असल्याचे कळविण्यात आले आहे. दिनांक १२.७.२०१६ चे पत्र सादर करतेवेळी सन २०१५-१६ चे लेखा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नव्हते. माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये सन २०१५-१६ चे लेखा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून तद्नंतर सन २०१५-१६ च्या रकमेची मागणी रेल्वे प्रशासनाकडे (रु. १,२२,३९,५३,५३८) करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ ची मागणी केल्यानंतर व २०१७-१८ या आर्थिक वर्षात (दिनांक १६ जानेवारी २०१८ पर्यंत) रेल्वे प्रशासनाकडून रु. ३३,८५,३५,८४३ (धनादेशाद्वारे व समायोजनाद्वारे) रक्कम प्राप्त झालेली आहे. सद्यःस्थितीत दिनांक १६ जानेवारी २०१८ पर्यंत रेल्वे प्रशासनाकडून रु. ३,८९,६०,५६,३३५ इतकी रक्कम प्राप्त होणे प्रलंबित आहे. सोबत विवरणपत्र (सहपत्र-१) सादर करण्यात येत आहे.

४. सन २०१६-१७ चे लेखा प्रमाणपत्र महालेखापाल यांचेकडून मिळणेकरीता सर्व घटक कार्यालयांकडून प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. लेखा प्रमाणपत्र मिळणेकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे. २०१६-१७ चे लेखा प्रमाणपत्र प्राप्त झालेवर सन २०१६-१७ च्या रकमेची मागणी रेल्वे प्रशासनाकडे करण्यात येईल.

५. प्रत्येक वर्षात रेल्वे प्रशासनाकडून देय असलेली रक्कम, त्यांच्याकडून प्राप्त झालेली रक्कम व त्यांच्याकडे प्रलंबित थकबाकीच्या सविस्तर तपशिलबाबतचे सहपत्र सोबत जोडली आहे. त्याचप्रमाणे १९७९-८० पासून आतापर्यंत रेल्वे प्रशासनाकडून रु.३,८९,६०,५६,३३५ येणे प्रलंबित आहे. ही रक्कम प्राप्त करून घेण्याकरिता सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

६. शासकीय लोहमार्ग पोलीस (GRP) मधील अधिकारी व कर्मचारी यांच्या आस्थापनेवरील खर्चाच्या ५०% हिस्सा-जर अशी पदे रेल्वे प्रशासनाच्या मंजूरीने निर्धारीत केली असतील तर, केंद्र सरकारच्या रेल्वे मंत्रालयाने ५०% हिस्सा देण्याची तरतूद रेल्वे वित्तीय कोड खंड-१ मधील परि ८५६ अनुसार आहे. अशी ५०% हिश्श्याची रक्कम १.४.१९७९ पासून देय ठरते. जेव्हा राज्य शासनाकडून लोहमार्ग पोलिसांच्या विभिन्न घटकांमध्ये निकडीनुसार नवीन पदे निर्माण केली जातात तेव्हा अशा नव्या पदांना रेल्वे बोर्डाची मंजुरी घेणे आवश्यक असते. ज्यायोगे नवीन पदांवरील खर्चाच्या ५०% रकमेची प्रतिपूर्ती रेल्वे प्रशासनामार्फत होऊ शकेल. अर्थातच जर अशा पदांच्या निर्मितीला/नवीन पदांना रेल्वे बोर्डाची मंजुरी नसेल तर मात्र अशा पदांवरील खर्चाच्या ५०% रकमेची प्रतिपूर्ती रेल्वे प्रशासनाकडून केली जात नाही.

लोहमार्ग पोलीस घटकांतर्गत पोलिसांच्या महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या सर्वच्या सर्व पदांना रेल्वे प्रशासनाची मंजुरी नसल्याने रेल्वे प्रशासन वर नमूद नियमानुसार ५०% हिश्श्यांच्या पूर्ण रक्कमा रेल्वे पोलीस घटकांना अदा केली जात नाही. परिणामी दरवेळी रकमा प्रलंबित असल्याबाबत महालेखापाल कार्यालयाकडून आक्षेप नोंदविले जातात. लोहमार्ग पोलिसांच्या तिन्ही घटकांत मिळून सन १९७९-८० नंतरच्या राज्य शासनाकडून मान्यता मिळालेल्या ६४० पदांना रेल्वे बोर्डाची मंजूरी प्राप्त नव्हती. तदनंतर ६४० पदांपैकी १०० पदांना रेल्वे बोर्डाची मान्यता मिळाली असल्याचे पत्र २०११/sec(CA) 50/12 दिनांक २८/७/२०१४ प्राप्त झाले. त्यामुळे त्या पदांकरीता ५०% खर्च रेल्वे प्रशासनाकडून प्राप्त होतो. तथापि उर्वरित ५४० पदांना रेल्वे प्रशासनाची मान्यता मिळणे प्रलंबित असल्याने सदर पदांवर होणारा १००% खर्चाचा बोजा महाराष्ट्र शासनास सोसावा लागत आहे. तो खर्च अंदाजे दरवर्षासाठी ३८ करोड इतका आहे. म्हणून सदर ५४० पदांना रेल्वे प्रशासनाची मंजूरी मिळण्याबाबत या कार्यालकडून आपणास तसेच महाराष्ट्र शासन व रेल्वे प्रशासनास पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर ५४० पदांचा तपशील सहपत्र-२ मध्ये सादर केला आहे.

७. रेल्वे पोलीसांकडून रेल्वेसाठी फक्त रात्रीच्या वेळी महिला कंपार्टमेंटमध्ये एस्कॉर्ट सुरक्षा पुरविली जाते, परंतु त्याकरिता वेगळे शुल्क आकारले जात नाही.

८.५० टक्के प्रतिपूर्तीच्या रकमा रेल्वेप्रशासनाकडून लवकरात लवकर मिळाव्यात याकरिता शासन स्तरावरून कार्यवाही होणेस विनंती आहे. ”

६.१९ परि.क्र. ७.३.३.३ इंडियन प्रिमीयर लिग (IPL) आणि इतर क्रिकेट स्पर्धा दरम्यान तैनात केलेल्या पोलिसावरील खर्चाची वसुली.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने विचारणा केली की, इंडियन प्रिमीयर लीग (IPL) व इतर क्रिकेट स्पर्धा यासाठी किती खर्च लागला त्याची तपासणी (व्हेरीफिकेशन) कोण करतो? यावर अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, हा सन २०१६ मधील आयपीएलचा विषय आहे. तेथे फोर्स किती वापरला, तो विभागाच्या कामासाठी नव्हता, मॅचसाठी नव्हता तर तो ट्रॅफिकसाठी व कायदा आणि सुव्यवस्थेसाठी वापरला आहे. दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी पद्धत सुटसुटीत करण्यासाठी एक निर्णय घेतला. आयपीएल टी २० वन डे मॅचकरिता मुंबईमध्ये बंदोबस्त ठेवण्यासाठी ६० लाख रुपये लागतील. बंदोबस्त किती पुरवायचा ही जबाबदारी गृह विभागाला राहील. टेस्ट मॅच असेल तर ५० लाख रुपये लागतील. नागपूर, पुणे व नवी मुंबई येथे अनुक्रमे ४० व ३५ लाख रुपये लागतील. रक्कम निश्चित करून दिल्यामुळे वाद कमी झाले. या वर्षी दहा टक्के वाढ करण्यात आली आहे. दहा टक्के वाढ ही प्रत्येक मॅचसाठी आहे. आयपीएल आणि टी-२० हे प्रत्येक दिवसासाठी. यामध्ये वन द्व डे मॅच असेल तर मुंबईसाठी ६० लाख रुपये शुल्क आकारणी सुरक्षेसाठी करण्यात येते.

How do you calculate this figure of Rs. 60 lakh? ६० लाख रुपयाची गणना (Calculate) विभागाने कशी केली अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की मागील मॅचमध्ये मुंबई आयुक्तांना याबाबत सांगण्यात आले की, बंदोबस्त तैनातीसाठी किती रुपये शुल्क लागेल. प्रत्येक बंदोबस्तासाठी साधारणपणे What is your deployment. त्याच्या आधारे त्यांना सांगण्यात आले की, किती रुपये मॅचसाठी शुल्क आकारले पाहिजे. पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या सुचनेनुसार सदर दर ठरविण्यात आलेले आहेत.

नागपूर उच्च न्यायालयामध्ये याबाबत एक प्रकरण सुरू आहे असा मुद्दा समितीने उपस्थित केला असे अपर मुख्य सचिव यांनी याबाबत खुलासा केली की, नागपूर येथे जे प्रकरण दाखल करण्यात आले त्यामध्ये दोन मुद्दे होते. त्यामध्ये असे सांगितले होते की, स्टेडीयमच्या बाहेरचा जो पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात येतो, त्या बंदोबस्ताची शुल्क आकारणी संस्थेकडून का करण्यात येते, असा एक मुद्दा होता. त्यावर विभागाने अशी भूमिका सांगितली की, स्टेडीयमच्या बाहेरील बंदोबस्त हा नॉर्मल बंदोबस्ताचा भाग असल्यामुळे त्यावर शुल्क आकारणी करण्याचे कारण नाही.

पण स्टेडीयमच्या बाहेर बंदोबस्त हा मॅचसाठी तैनात करावा लागतो. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता याबाबत अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, विभागाला सर्वसमावेशक भूमिका घ्यावी लागते. महाराष्ट्रामध्ये जर मॅच घेतलीच नसती तर बंदोबस्त तैनात करण्याची आवश्यकता राहिली नसती. परंतु महाराष्ट्रामध्ये मॅच व्हावयास पाहिजेत. कारण या माध्यमातून महाराष्ट्रातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळते. तसेच अर्थव्यवस्थेला देखील चालना मिळते. दुसरा मुद्दा असा होता की, नागपूरमध्ये एका मॅचसाठी शुल्क आकारणी करावयाची की एका सत्राची असा तो मुद्दा होता. या प्रकरणामध्ये नागपूर येथील मॅचचे उर्वरित शुल्क भरण्याचे कबूल करण्यात आलेले असून उच्च न्यायालयाने त्यांना सहा महिन्यांची मुदत दिलेली आहे.

विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर यांची एक कोटी ५४ लाख रुपये इतकी रक्कम प्रलंबित आहे. असे समितीने नमूद केले असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले या प्रकरणामध्ये न्यायालयाने विदर्भ, क्रिकेट असोसिएशन, नागपूरला प्रलंबित रक्कम भरण्यासाठी सहा महिन्यांची मुदत दिलेली आहे. त्याप्रकरणामध्ये न्यायालयाने आदेश दिल्यानंतर सांगण्यात आले की, They have given quitest to that issue. The Court said let us give the quitest to the issue.

विदर्भ क्रिकेट असोसिएशनकडे किती मॅचेसची शुल्क आकारणी प्रलंबित होती. अशी विचारणा समितीने केली असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले. यामध्ये न्यायालयाने विदर्भ क्रिकेट असोसिएशनला उर्वरित रक्कम भरण्यास सांगितले आहे. यासाठी सहा महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे.

पुढील मॅचेसाठी बंदोबस्ताची आकारणी ॲडव्हान्समध्ये घेण्यात येणार आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, " Concerned cricket body shall make payment of flat rate within one month of holding the cricket match ". सदर फ्लॅट रेट लागू झाल्यानंतर वेळेवर पेमेंट मिळत आहे.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाला रुपये २.६५ कोटी ही रक्कम सन २०११ मध्ये खेळविण्यात आलेल्या वर्ल्ड कप क्रिकेट सन २०११ च्या सामन्याकरिता पुरविण्यात आलेल्या बंदोबस्ताची असून पूर्ण रक्कम रुपये २,६५,४९,८८५ इतकी आहे. सदर रक्कम आयोजकाने अदा केली असून वसुली पूर्ण झाली आहे. विदर्भ क्रिकेट असोसिएशन नागपूर यांची वसुली झाली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, अतिरिक्त महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, नागपूर येथे एप्रिल २०१० मध्ये झालेल्या मॅचेसची वसुली ही विदर्भ क्रिकेट असोसिएशन नागपूर यांच्याकडून न करता ती मुंबई क्रिकेट संघटना (बीसीसीआय) यांच्याकडून करण्यात येणार आहे. कारण ती मॅच ही आय.पी.एल.तर्फे घेण्यात आलेली होती.

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांची विदर्भ क्रिकेट असोसिएशन, आयपीएल-२०१० ची पोलीस संरक्षणाची प्रलंबित रक्कम रु.०.२० करोड इतकी होती वसूल झाली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता अतिरिक्त पोलीस महासंचालक (प्रशा) सांगितले की, पोलीस आयुक्त, नागपूर यांची वसुली झालेली आहे.

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांची दिनांक ५/४/२०१० ते दिनांक १०/४/२०१० व दिनांक १२/४/२०१० या कालावधीची विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूरची रु.१.५४ कोटी इतकी रक्कम प्रलंबित होती. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, यावर अतिरिक्त पोलीस महासंचालक (प्रशा) यांना सन २०१० ची दोन कोटी ८१ लाख ७२ हजार आणि त्यावरील व्याज एक कोटी ५४ लाख २८ हजार रुपये आहे.

सन २०१० च्या मॅचेसचे पैसे येणे प्रलंबित आहे, याबाबत माहिती देताना अतिरिक्त पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, या वसुलीसाठी बी.सी.सी.आय. सोबत अनेकवेळेस पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. सदर मॅचेस ह्या आय.पी.एल. च्या असल्यामुळे व्ही.सी.ए. यांनी सांगितले की, त्या मॅचेसची वसुली बी.सी.सी.आय. कडून करण्यात यावी.

समितीने पुढे विचारणा केली की, प्रलंबित वसुली बी.सी.सी.आय. का देत नाही ? यावर अतिरिक्त पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, याकरिता जिल्हाधिकारी यांच्याकडे आर.आर.सी. साठी पत्र पाठविण्यात आलेले आहे.

पुढील काळामध्ये जर त्या ठिकाणी मॅचेस झाल्या तर त्यांना सुरक्षा पुरविण्यात येणार किंवा कसे ? कारण जो पर्यंत प्रलंबित देणी शासनाला मिळत नाही, तो पर्यंत पुढील मॅचेससाठी सुरक्षा पुरविण्यात येणार नाही, अशी भूमिका विभागाने घ्यावयास पाहिजे. असे समितीने सूचित केले असता अपर मुख्य सचिव यांनी त्यास सहमती दर्शविली.

तसेच विभागाने आता प्रत्येक मॅचसाठी दर ठरविलेले आहेत. त्यामुळे आता यापुढील होणाऱ्या मॅचेसच्या सुरक्षेच्या बंदोबस्ताची शुल्क आकारणी ॲडव्हान्समध्ये घेण्यात यावी. असे देखिल समितीने सूचित केले असता अतिरिक्त मुख्य सचिव यांनी समितीला आश्वासित केले की, समितीची सूचना बी.सी.सी.आय. यांना कळविण्यात येईल. तसेच त्यांनी एक महिन्याच्या आत शुल्काची आकारणी करण्यात यावी, असे देखिल विभागाने कळविलेले आहे.

Why they are not paying it in advance? If the match is get cancelled then you refund the advance amount. असे समितीने नमूद केले असता अतिरिक्त मुख्य सचिव यांनी सांगितले की, As far as recovery from B.C.C.I. is concerned we will take this issue at the government level and have resolution on this. I am not aware of the exact nature of the recovery but we will see that there is resolution on this. Meanwhile, we will inform them that future protection will not be given for matches till the recovery of the dues.

पुणे येथे IPL स्पर्धांच्या वेळी तैनात केलेल्या पोलिसांवर झालेला खर्च देण्यासाठी सहारा अडव्हेंचर स्पोर्टस लि.ही IPL फ्रॅन्चायझी जबाबदार आहे. CP यांनी सत्रांच्या आधारावर रु.१.९४ कोटींची मागणी केली आणि नंतर फ्रॅन्चायझीने विनंती केल्यावर एका स्पर्धेसाठी केलेली संपूर्ण तैनात ही एकच सत्र असल्याचे गृहीत धरुन केलेल्या तैनातीच्या प्रत्यक्ष कालावधी विचारात न घेता मागणीची रक्कम कमी करून रु.१.१२ कोटी एवढी निश्चित केली. परिणामी, रु.८२ लाख एवढी कमी मागणी केली गेली. असे आक्षेप महालेखाकारांनी घेतली आहे. याबाबत खुलासा

करता अतिरिक्त पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, सदर मॅच ही सन २०१२ मध्ये पुणे ग्रामीण यांच्या क्षेत्रामध्ये घेण्यात आली होती. त्यामध्ये दिनांक ८ एप्रिल, २०१२ ते १९ मे, २०१२ या कालावधीमध्ये एकूण ८ मॅचेस झालेल्या आहेत. या मॅचेससाठी पुरविण्यात आलेल्या बंदोबस्ताची शुल्क आकारणी एक कोटी, १२ लाख १६ हजार ९५६ एवढी होती. त्यावर सेवाकर आकारुन एक कोटी २६ लाख ३ हजार ३७२ एवढी रक्कम सहारा यांच्याकडून वसूल करण्यात आलेली आहे. यामध्ये बंदोबस्त पुरविण्यासाठी ज्यावेळेस सुरक्षादलांना रिर्हसल आणि सूचना करण्यासाठी बोलविण्यात येते त्याचा देखील खर्च महालेखापालांनी या बंदोबस्तामध्ये अंतर्भूत केलेला आहे. यामध्ये वसूल करण्यात आलेला बंदोबस्त हा त्या मॅचेससाठी वसूल करण्यात आला आहे.

शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे ४ कोटी ६४ लाख रुपये आकारावयास पाहिजे होते. पोलीस आयुक्त यांनी १ कोटी ९४ लाख रुपयांची मागणी केली होती. त्यामध्ये पुनर्विचार करून १ कोटी १२ लाख रुपये निश्चित केले. योग्य बंदोबस्तासाठी योग्य शुल्क आकारले पाहिजे, ही समितीची भूमिका आहे. शासनाला परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावयास पाहिजे. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता अपर मुख्य सचिव यांनी याबाबत खुलासा केला की, सुरुवातीला ८२ लाख रुपयांची मागणी करण्यात आली. त्यानंतर सरावासाठी जो बंदोबस्त लावण्यात आला तो लावू नये, अशी भूमिका घेण्यात आली आणि त्यानुसार पोलीस बंदोबस्ताची मागणी कमी करण्यात आली. त्यामुळे कमी करण्यात आलेल्या मागणीचे शुल्क लावण्यात आलेले नाही. प्रशिक्षणासाठी जो खर्च आकारण्यात आला तो लावू नये, अशी मागणी होती. त्यामुळे सदर रक्कम कमी करण्यात आलेली आहे. याबाबत अधिक खुलासा करता अतिरिक्त पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी समितीला अवगत केले की, महालेखापालांच्या आक्षेपांमध्ये असे म्हटलेले आहे की, पोलीस आयुक्त, पुणे यांनी एक कोटी ९४ लाख रुपयांची जी मागणी केली आहे, ती चुकीची आहे. यामध्ये चाललेले मॅचेस हे दिनांक ८ एप्रिल, २०१२ ते दिनांक १९ मे, २०१२ या कालावधीमध्ये झालेले होते. परंतु प्रत्यक्ष मॅचसाठी ज्या दिवशी बंदोबस्त पाहिजे होता त्यावरुन जी शुल्काची मोजणी केली ती एक कोटी १२ लाख रुपये एवढी आहे. ही मोजणी डिप्लॉयमेंटच्या आधारे करण्यात आलेली आहे.

सर्व मॅच ह्या टी -२० स्वरुपातील असल्यामुळे आणि प्रत्येक मॅचचा वेळ चार तास आणि मॅचपूर्वी तीन ते चार तास असा वेळ होता. त्यामुळे यामध्ये एकूण आठ ते नऊ तासांचा संपर्ण दिवसाचा कालावधी होता. हा एक पाळीचा बंदोबस्त असल्याने एका पाळीचे बंदोबस्त शुल्क आकारण्यात आलेले आहे. त्यामुळे पूर्व तयारीसाठी किंवा ब्रिफिंगसाठी बोलावून देखील त्याचे शुल्क कमी केलेले आहे. विभागाने जी शुल्क आकारणी केली आहे, ती शासनाच्या परिपत्रकानुसार केलेली आहे

पण १ कोटी ९४ लाख रुपये पोलीस आयुक्त, पुणे यांनी मागितलेले आहेत. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता अतिरिक्त पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, ही चुकीची मागणी झालेली आहे, असे दिसून येत आहे. महालेखापालांच्या आक्षेपामध्ये असे म्हटलेले आहे की, फ्रँचाईजींनी केलेल्या विनंतीवरुन एकाच स्पर्धेसाठी केलेली तैनात ही एकच रात्र असल्याचे गृहीत धरून केलेल्या तैनातीचा प्रत्यक्ष कालावधी विचारात न घेता मागणीची रक्कम कमी करण्यात आली आहे.

मॅचेस घेणाऱ्या या सर्व संस्थांना सवलत देण्याची आवश्यकता नाही. मॅचेससाठी फार मोठया प्रमाणात बंदोबस्त लागत असतो. त्यामुळे जी आता शुल्क आकारणी करण्याचे ठरविण्यात आलेले आहे, ते या सर्वांचा विचार करून शुल्क आकारणी करण्यात येत आहे काय ? विभागाने परिपत्रकानुसार जी शुल्क आकारणी करण्याचे ठरवीले आहे त्यामध्ये प्रत्यक्षात शुल्क आकारणी जास्त होत असेल आणि परिपत्रकानुसार ती जर कमी घेण्यात येत असेल तर याबाबत विभागाने विचार केलेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, पुर्वी काटेकोरपणे शुल्क आकारणी करण्यात येत असे. परंतु आता ढोबळस्वरुपात शुल्क आकारणी करण्यात आलेली आहे. तसेच पोलीस आयुक्त, पुणे यांनी शुल्क आकारणीसाठी मोजणी केलेली आहे. समजा वानखेडे स्टेडीअममध्ये मॅच असेल तर त्यासाठी किती पोलीसांचा बंदोबस्त लागेल या सर्वांचा विचार करून त्यांनी यासाठीचे दर ठरविलेले आहेत. या दरांमध्ये दर वर्षी दहा टक्के वाढ करण्यात येणार आहे.

काही काही वेळेस मॅचेससाठी सुरक्षा कमी पडते. परंतु त्यानंतर पुन्हा जास्त सुरक्षेची आवश्यकता लागते. अशा वेळेस सुरक्षा वाढविण्यात येते काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये जे परिपत्रक काढण्यात आलेले आहे ते एक वर्षासाठीच लागू असते. जर यामध्ये बंदोबस्त वाढविण्याची आवश्यकता लागत असेल तर ते वाढविता येतो. मुंबईमध्ये जर मॅच असेल तर ६० लाख रुपये बंदोबस्त शुल्क आकारणी केली जाते. जवळजवळ ३६०० लोकांसाठीचा हा बंदोबस्त असतो. सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर बंदोबस्ताचे दर निश्चितपणे वाढविण्यात येणार आहेत.

महालेखापालीच्या आक्षेपामध्ये आणखी एक मुद्दा दिलेला आहे की, तैनातीची संख्या कमी दर्शवुन विभागाने चुकीच्या रकमेची मागणी केली आहे असे मत समितीने व्यक्त केले.

६.२० परिच्छेद क्र. ७.३.३.४ खाजगी व्यक्ती :

खाजगी व्यक्तीच्या सुरक्षा देण्यासंदर्भात समितीने विचारणा केली की, महाराष्ट्रात किती लोकांना नॉन कॅटेगराईज्ड सुरक्षा दिलेल्यांची यादी मिळू शकते का ? यावर अतिरिक्त मुख्य सचिव यांनी सांगितले की, या संदर्भातील कोर्टाला लागेल तेवढीच माहिती सादर केली जाते. ही माहिती गोपनीय आहे. आता अनेकदा काही लोकांना संरक्षण देण्यात येते, नंतर त्या संरक्षणामध्ये बदल होत असतो. सर्वसाधारणपणे कोणाला संरक्षण आहे, कोणाला नाही अशी एकत्र माहिती उपलब्ध होऊ नये म्हणून विभागाकडून ती यादी देण्यात येत नाही.ीही माहिती उपलब्ध झाली तर ज्यांना सुरक्षा दिलेली आहे त्यांना टार्गेट करणारे आहेत ते टार्गेट करतील म्हणून ही माहिती गोपनीय आहे.

यामध्ये पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे, ठाणे ग्रामीण व पालघर येथील वसुली संदर्भातला मुद्दा आहे. मुंबईचे खाजगी व्यक्तीचे संरक्षण फी शुल्क १,२३,००,००० रुपये इतके होते असे समितीने निदर्शनास आणून दिले असता असता सहायक पोलीस आयुक्त (प्रशा) यांनी सांगितले की, मुंबईत दिलेल्या संरक्षण शुल्कात चार लोकाचे रु. ८१,३८,५७० रुपये माफ केलेले आहे. त्यामुळे या परिच्छेदामधली वसुली खूप कमी आहे. चार लोकाचे सुरक्षा शुल्क माफ केले त्यापैकी एक शरद एस पवार असून ते नगरसेवक आहेत. दुसरे श्री. सुनिल जैन यांची सुरक्षा फी माफ केली कारण श्री.सुनिल जैन यांचे भाऊ श्री.प्रदिप जैन याचा खून झालेला आहे. अबु सालेमची देखिल केस यासंदर्भात होती. त्यामध्ये कन्व्हिक्शन झालेले आहे. तो यामध्ये साक्षीदार होता.

सुरक्षा शुल्क माफ करण्याचे निर्णय कोणत्या स्तरावर घेतले जातात ? अशी विचारणा समितीने केली असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, पोलिस आयुक्त (सीपी) स्तरावर हे निर्णय घेतले जातात. सुरक्षा पण पोलिस आयुक्त यांचे मार्फत दिलेले आहे.

सुरक्षेकरिता पुन्हा पुन्हा तोच सुरक्षा रक्षक ठेवला जातो. काही दिवसांनी तो घरातील नोकरासारखा होतो. हे सुरक्षा रक्षक बदलले पाहिजे. असे मुद्दा समितीने उपस्थित केला आहे. विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत नवीन परिपत्रक इश्यू झालेले आहे, त्यानुसार प्रत्येक तीन महिन्यांनी सुरक्षा रक्षक बदलणे बंधनकारक आहे. परंतु हे घडत नाही.

रु. १.२३ कोटी रुपयाच्या वसुली संदर्भात सह पोलीस आयुक्त (प्रशा) यांनी सांगितले की, याच्यामध्ये टोटल १,२३,००,००० रुपयामधून २०,५७,५८९ रुपये इतकी रक्कम एकूण सात लोकांची वसूली पूर्ण केलेली आहे. दोन लोकांकडून अंशतः वसुली झालेली आहे. यामध्ये श्री.एस.पवार आहेत. एस.पवार यांचा नगरसेवक पदाचा जो कालावधी होता, त्याची माहिती करण्यात आलेली आहे. इतर फी त्यांच्याकडून वसूल केलेली आहे. थकित संरक्षण शुल्क २०,७४,००० रुपये इतके आहे. आता चार लोकांचे सुरक्षा शुल्क माफ केलेले आहे. आता राहिलेले जे २०,७५,००० रुपये आहे, त्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे आरआरसी प्रोसेस केलेली आहे. ती चालू आहे.

ही माहिती जुनी आहे याबाबत सद्यःस्थिती काय आहे ? संरक्षण शुल्क ॲडव्हान्समध्ये का घेण्यात येत नाही ? आता ही सुरक्षा का सुरु झालेली नाही ? अशी विचारणा समितीने केले असता सह पोलीस आयुक्त (प्रशासन) यांनी सांगितले. सन २०१८ मध्ये नवीन शासन निर्णय आलेला आहे, त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

पण सन २०१८ च्या पूर्वीची वसुली तर वसूल करणे बाकी असेल ना, ॲडव्हान्सचा नियम तर जूना आहे. नवीन शासन निर्णयाचे यामध्ये कारण सांगू नये. ॲडव्हान्स वसूलीचा जुनाच नियम आहे. ॲडव्हान्समध्ये वसुली शुल्क घेतलेच पाहिजे. वसूलीच्या प्रकरणांना संरक्षण द्यायचे आणि वसूलीसाठी फिरायचे हे योग्य नाही आणि नंतर येथे रिप्लाय द्यायचे हे योग्य नाही असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असते. अप्पर मुख्य सचिव यांनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली याबाबत खुलासा केला की, ॲडव्हान्समध्ये घ्यावे अशी तरतूद पूर्वीही होती, एवढेच आहे की, ज्यावेळेस थ्रेट पर्सेप्शन ॲनॅलिसिस जे आहे, ते एकतर कंपलेंट किंवा आपले जे लोकल युनिट्स आहेत, त्यांच्याकडून येत असतात. थ्रेट एमिनंट दिसले तर पैसे वसूल करण्यासाठी थांबून राहणे शक्य होत नाही. त्या दृष्टीने मग लगेच प्रोटेक्शन त्यावेळीच दिले जाते. हा विभागासाठी अत्यंत नाजूक प्रश्न आहे.

प्रलंबित वसुली संदर्भात सह पोलीस आयुक्त (प्रशा) यांनी समितीस अवगत केले की, मुंबई शहरामध्ये एकुण ४२ लोकांची वसुली प्रलंबित आहे. त्याची रक्कम ५,३३,२८,७५२ रुपये इतकी आहे. ही माहिती डिसेंबर, २०१७ पर्यंतची आहे. त्यामधील प्रकरणासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयास पत्रव्यवहार केलेला आहे. याच्यामध्ये एक-दोन मयत झालेले आहेत, त्यांच्याबाबत काय करायला पाहिजे त्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केला जाणार आहे मुंबईमध्ये २३१ लोकांना सुरक्षा दिलेली आहे.

ठाणे व पालघर तालुक्यातील वसुली संदर्भात अपर पोलिस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले. ठाणे शहरामध्ये एकूण १० व्यक्तींचे पैसे येणे बाकी होते, त्यात पाचची पूर्ण वसुली झालेली आहे. दोघांची अंशतः वसुली झालेली आहे. अंशतः आणि जे बाकी राहिलेले होते असे सात जण आहेत.

ठाणे तालुक्यातील एकूण १३ खाजगी व्यक्तींना पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाची एकूण रक्कम रु. १०३,६२,२२८ पैकी रु.१६,६८,२२० इतकी रक्कम वसूल झाली असून उर्वरित रक्कम रु. ८६,९४,००८ वसुल होणे प्रलंबित आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता पोलिस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले. ठाणे शहरामध्ये ६९,१७०० रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. दोन खाजगी व्यक्तींकडून अर्धी रक्कम म्हणजे २,४६,४७४ एवढी वसूल करण्यात आलेली आहे. १.०९ करोडपैकी ७१ लाख रक्कम ही वसूल करण्यात आलेली आहे. बाकीच्या लोकांसंदर्भात जिल्हाधिका-यांकडे पाठवून आरआरसीची प्रोसेस चालू केलेली आहे.

पोलीस आयुक्त, ठाणे ग्रामीण या भागामध्ये किती लोकांना सुरक्षा सेवा दिलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता पोलीस महानिरीक्षक संचालक (प्रशा) यांनी समितीने अवगत केले की, सन २०१६ च्या लेखापरीक्षण अहवालात मुंबई वगळता महाराष्ट्रात ५११ लोकांना संरक्षण दिलेले आहे. आता यातून सेपरेटली काढून केवळ ठाणे जिल्हाची माहिती समितीस नंतर सादर करण्यात येईल. ठाणे ग्रामीण आणि पालघर ठाणे ग्रामीणकडे आता केवळ एकच प्रोटेक्टी उरलेला आहे. दोन्ही मिळून ठाणे ग्रामीणमध्ये एकच प्रोटेक्टी आहे. २०५९१ रुपये ३.६० करोडपैकी थकीत होते. आता त्याचे व्याज मिळून ८२७८८ रुपये थकीत आहे. ते आरआरसीकरिता गेलेले आहे. पालघरमध्ये तीन प्रकरणे आहेत. त्यात एकामध्ये कोर्टात मॅटर पेंडिंग आहे एक पीआयएल केलेले आहे त्याच्या विनंतीवरुन ते प्रोटेक्शन देण्यात आलेले आहे. त्याच्यावर कसलीही रिकव्हरी करण्यात येऊ नये. अजूनही मॅटर कोर्टामध्ये पेंडिंग आहे. पण बाकीच्यांमध्ये उर्वरित एकाची पूर्ण वसूली झालेली आहे. आणि दुसऱ्याची जी होती, त्याचे कॅल्क्यूलेशन जे आहे ते चूक झालेले आहे. ते साडे नऊ टक्के व्याजाची गणना वार्षिक अशी व्हायला हवी होती. ती गणना पर मंथ अशी गणना केली. ती रक्कम इनफ्लेटेड अमाऊंट आलेली आहे. महालेखाकारांनी त्यांच्या ऑब्झर्व्हेशनमध्ये असे म्हटलेले आहे की, ती फार फुगीर रक्कम होती. ती ६६ लाख लाख रुपये एवढीच आहे. ३.४४ करोडच्या ऐवजी ६६ लाखापैकी ३३ लाख रुपयांची वसूली झालेली आहे. उर्वरित ३३ लाख रुपये वसूल व्हावयाचे आहे, त्याची देखील आरआरसीकरिता प्रोसेस चालू झालेली आहे.

आरआरसीमधून काही पैसे मिळाले की नाही ? की आरआरसी करून विभाग त्याची जबाबदारी संपवित आहोत ? यावर अप्पर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, एका माणसाकडे ६६ लाख रुपये होते, तो देखील कोर्टात गेला होता, कोर्टाने विभागाच्या बाजूने आदेश दिले की, हे वसूल करण्यात यावे. त्या व्यक्तीला सांगितले की, पैसे परत करण्याचे श्येड्यूल देण्यात यावे. पहिला हप्ता त्याचा १३.५ लाखाचा होता, त्याप्रमाणे त्याने भरला त्यानंतर प्रत्येक महिन्याला १,३०,००० देणार असे म्हणत होता. ३३.५ लाख रुपये भरल्यानंतर तो पैसे भरायचा थांबलेला आहे. आता या सर्वांची सुरक्षा बंद केलेली आहे

वसुलीसाठी केवळ आरआरसी पाठवून होत नाही तर त्यासाठी पुढे फॉलो अप घेतला पाहिजे. सर्व प्रकरणामध्ये आरआरसीचे पैसे वसूल होतात का ? अशी विचारणा समितीने केली असता अप्पर मुख्य सचिव यांनी सांगितले. याबाबत मुंबई व मुंबई उपनगर प्रमुख यांची बैठक घेतली होती. त्यांना सूचना दिलेल्या आहेत. या अनुषंगाने समितीने सूचित केले की, आरआरसी संदर्भात सूचना देण्यासाठी विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली तर बरे होईल. यावर अप्पर मुख्य सचिव यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयास काही सूचना केल्या होत्या, त्यांनी काही प्रमाणात कारवाई केलेली आहे.

सुरक्षा देण्याच्या आधी संबंधितांकडून कन्सेंट घेतो का ? Because they are raising disputes that we never asked for the security cover. What is the decision taken by the department after these court cases ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमात केली असता अप्पर मुख्य सचिव यांनी सांगितले आता कोणी सुरक्षेची मागणी केली असो किंवा नसो थ्रेट पर्सेप्शन असेल युनिट कमांडरला असे वाटले की यांना सुरक्षा द्यावयाची आहे तर ते देतात. मागणी केली असेल किंवा आपले इनपूट असेल तर देण्यात यावे, अशी ती व्यवस्था आहे. काही ठिकाणी त्यांनी हा डिस्प्यूट रेज केलेला आहे. संबंधित व्यक्तीनी मागणी केलेली नाही. पण त्यांना प्रोटेक्शन दिलेले आहे. हा लोकल युनिट आहे की त्यांचे पर्सेप्शन आहे, त्यांना गरज वाटली त्यांना ते पर्सेप्शन देतात. सन २००८ च्या परिपत्रकामध्ये असे म्हटले होते की, आपण स्वतः सुरक्षा दिली असेल तर आकारु नये. आता असे केलेले आहे की, आपण सुरक्षा देणार त्याच्या पेयिंग कॅपॅसिटीवर शुल्क आकारणार तो म्हणू शकतो की, मला सिक्योरिटीची गरज नाही, मला देऊच नका हा विषय थोडासा विभागाचा दृष्टीने नाजूक ठरतो.

६.२१ परिच्छेद क्र. ७.३.३.५ महानगरपालिका :

नागपूर, पुणे, मुंबई, पिंपरी-चिंचवड औरंगाबाद नांदेड, नागपूर, पुणे, मिरा-भाईंदर इ.महानगरपालिकांनी कार्यालयामध्ये पोलीस तैनातीवरील रक्कम भरली नाही. पण लहान स्थानिक संस्था आहेत त्यांनी सर्वांनी पैसे भरले आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, अमरावती, नाशिक, सोलापूर एवढ्यांनी पैसे दिलेले आहेत.

मुंबईचे ४१५ लाख रुपये बाकी आहेत, त्याचे समायोजन झालेले आहे का ? याबाबत अप्पर पोलीस महासंचालक यांनी सांगितले की, त्याचाही प्रस्ताव पाठविलेला आहे. ऑक्टोबर, २००९ ते मार्च २०१२ पर्यंतची ही फिगर आहे. गृह विभागाने सन २०१७ पर्यंतचे फिगर्स पाठविलेले आहे. १८.४२ लाख रुपयांचे फिगर्स हे वॉटर चार्जेसच्या अगेन्स्ट आहे. ते होऊन जाईल.

दहा-दहा वर्षे पैसे भरत नाही. पैसे न भरण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने रु.५३,५२,०८१ इतके पैसे भरलेले आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिका बाकी आहे.

पिंपरी-चिंचवडने ३ कोटींपैकी २.१८लाख रुपये दिल्याचे विभागाने लेखी उत्तरात नमूद केले आहे याबाबत अपर पोलीस महासंचालक (प्रशा) पोलिसांनी यांनी सांगितले की, पिंपरी-चिंचवड, नांदेड, औरंगाबाद, नागपूर यांचे जे काही वॉटर बिल दाखविलेले आहे, त्याच्या अगेन्स्ट या रकमा समायोजन करण्याची प्रक्रिया चालू आहे. एकूण रक्कम १३.१३ कोटी रुपये एवढी डयू होती कॉर्पोरेशकडून ६.७ कोटी रुपये वसूल झालेले आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे वॉटर बिल इतके होणार का? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाकडून जे देणे आहे, ते मिळालेले नाही.

वसुलीसंदर्भात विभागाकडून कोणत्या प्रोसेसचा अवलंब करण्यात येतो? हा सन २००९ ते सन २०१३ चा विषय आहे. आता याला ५ वर्षांचा कालावधी झालेला आहे. त्यामुळे याबाबत कोणती कारवाई करण्यात येणार आहे. केवळ नोटीस देऊन, पत्रव्यवहार केला म्हणजे ड्युटी संपली असे आहे काय ? असे समितीने नमूद केले असता अपर मुख्य सचिव यांनी समितीस अश्वस्त केले की, जी मागणी बाकी आहे त्याबाबत कळविण्यात येईल व पिंपरी-चिंचवडशी संपर्क साधून वसूली करून घेण्यात येईल.

You can also detect the grant they are received from the Government. समितीने नमूद केले असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, नॉर्मली नगर विकास विभाग ते मान्य करीत नाही. याबद्दल पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेशी बोलून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

ज्यावेळेस अतिक्रमण हटाओची मोहिम सुरू होते त्यावेळेस गृह विभागामार्फत संरक्षण घेतले जाते. संरक्षण नाही दिले तर संबंधित महानगरपालिका काहीच करू शकत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, अतिक्रमण हटाओ मोहिमेला संरक्षण द्यावे असे अनेकदा कोर्टाचे आदेश असतात. त्यामुळे गृह विभागाला ते देणे आवश्यक ठरते. पिंपरी-चिंचवडच्या बाबतीत असे आहे की, निवडणूकीत अगोदर कोर्टाने तेथे फार कडक अशी भूमिका घेतली होती व सर्व अतिक्रमणे काढून घ्यावीत, असे सांगितले होते.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून रक्कम वसूल झालेली आहे. काही रक्कम अद्याप वसूल व्हायची आहे. या संदर्भात पाठपुरावा करून वसुली करून घेण्यात येईल. तसेच नांदेड येथील वसुलीचे प्रमाण शून्य आहे. नांदेडची आर्थिक परिस्थिती चांगली नाही असे अपर मुख्य सचिव यांनी समितीस अवगत केले

विभागीय सचिवांनी दिलेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, नांदेड महानगरपालिकेच्या वसुलीसंदर्भात विभागाने दिलेले कारण काही उचित होऊ शकत नाही. कदाचित पाठपुरावा करण्यामध्येही लॅक्युना दिसत असेल आता यातून मार्ग कसा निघणार ? नांदेड महानगरपालिका पैसे देणार नाहीत आता या गोष्टीला ६ वर्षे झाली आहेत. यावर अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, याबाबत नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे. याबाबत नगर विकास विभागाशी बोलणे हा शेवटचा पर्याय आहे.

या संदर्भात समितीने उदाहरण दाखल सांगितले की, भंडारा नगरपालिकेला जर पोलीस फोर्स पाहिजे असेल तर ते ॲडव्हान्समध्ये पैसे जमा करतात. सदर महानगरपालिकेने अनेकदा प्रयत्न केला. मात्र गृह विभाग अगोदर पैसे भरण्यास सांगतात. मग सर्व ठिकाणी एकच नियम लावला पाहिजे. कोर्टाचे आदेश हा वेगळा मुद्दा आहे. जनरलमध्ये विभागाने हा नियम लावावा की, ॲडव्हान्समध्ये पैसे भरावेत मग आम्ही मदत करू. Whenever there are orders given by the Hon'ble High Court then you should abide by that Orders. But why you are giving benefit of this point in other cases where the concerned authority who are purposefully defaulter in such cases ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, हा वसुलीबाबतचा विषय आहे. ज्याच्याकडे वसुली प्रलंबित आहे त्याबाबत नगर विकास विभागास सांगण्यात येईल की, या महानगरपालिका/ नगरपालिकेस यांच्याकडे पैसे आलेले नाहीत. नगर विकास विभागाच्या माध्यमातून ही वसुली वसूल करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तथापि, ज्यावेळी हे संरक्षण दिले त्यावेळी कोणती परिस्थिती होती त्याप्रमाणे हा निर्णय घेतला असेल.संरक्षण देणे हे त्यावेळेच्या परिस्थितीवर अवलंबून असते त्यामुळे गृह विभाग एकदम ताठर भूमिका घेऊ शकणार नाही. मात्र वसुली करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

या परिच्छेदासंदर्भात महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले की, This recovery which we pointed out is still the year 2012-2013 only. The main point is, there is no details and no monitoring of the demands raised, महानगरपालिकांना जी सुरक्षा पुरविण्यात येते त्याबाबत विभागाने किती डिप्लॉयमेंट केले, कॅडरवाईज डिप्लॉयमेंट, डिमांड पेंडिंग रिकव्हरी हे सर्व डिटेल्स नव्हते. महालेखाकार कार्यालयाकडे रेकॉर्ड मधून लेटरच्या बेसिसवर हे काढले आहे. आता या सिस्टममध्ये काही सुधारणा केली आहे काय ? याबाबत अपर पोलीस महासंचालक यांनी सांगितले. हल्लीच गृह विभागाने स्ट्रॅटिजी सपोर्ट सिस्टम अशी एक कॉम्प्युटराईज प्रोसेस सुरू केली आहे. हळूहळू त्यामध्ये एक एक गोष्टी ॲड होत चालल्या आहेत. महालेखाकारांनी सांगितल्याप्रमाणे डिप्लायॅमेंट नीट रेकॉर्ड करीत नाही हा मुद्दा देखील या सिस्टीममध्ये घेण्याबाबत विचार करण्यात येईल.

६.२२ परिच्छेद क्रमांक ७.३.३.६. : बँका तसेच इतर शासकीय बिगर शासकीय संस्था :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना सह पोलीस आयुक्त (प्रशा) यांनी समितीला सांगितले की, बँक व इतर शासकीय-बिगर शासकीय संस्थांची विभागाकडे एकूण ४ कोटी ७१ लाख रुपयांची वसुली बाकी आहे. या संदर्भातील रेव्हेन्यु रिकव्हरी सर्टिफिकेट संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या समवेत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. यामध्येही आय.आर.सी. करण्यात आलेली आहे.

वसुलीमध्ये पोलीस विभागच कोठे तरी कमी पडत आहे असे समितीला वाटते. बँकाकडून वसूल करणे यामध्ये संरक्षण देण्याचा विषय कोठे आहे, बँकाकडून रक्कम वसूल केले पाहिजे असे समितीने नमूद केले असता याबाबत अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी खुलासा केला की, या पर्टीक्युलर कॉलमच्या रिकव्हरीमध्ये जास्त बँका नाहीत. फक्त अलाहाबाद बँक- नागपूर, व पंजाब नॅशनल बँक या दोन बँका या लिस्टमध्ये आहेत. मात्र अदर एन.जी.ओ. जसे सी.बी.आय., रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया याबाबतसुद्धा फक्त जे अकाऊंटमध्ये पैसे भरायचे होते, त्याबाबत माहिती हवी होती. पोस्ट ऑफिस, एम.एस.ई.बी., एम.आय.डी.सी., यांच्याकडून या रिकव्हरीज They are largely State Government Bodies.

बँक या गव्हर्नमेंट बॉडी असेल किंवा सेंट्रल गर्व्हनमेंट बॉडी असेल पण जर विभागाला वसूल करायचे असेल तर येथे वसुली संदर्भात प्रलंबितता दिसेल पण जर वसुली नाही करायची असेल तर समितीला काही म्हणायचे नाही. मात्र जर प्रलंबित असेल तर रिकव्हरीमध्ये डिपार्टमेंट कमी पडते. You should process in that direction. मत समितीने व्यक्त केले असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, १७७७ पैकी ८८२ रिकव्हर झालेले आहेत. उर्वरित रिकव्हरीमध्ये मुंबईतील ४ कोटी ७० लक्ष आहेत. नांदेड येथील १ कोटी २५ लाख आहेत. अशा २-३ ठिकाणी जास्त पेन्डसी आहे. We will specifically ask the units to pursue and to recover the said amount.

ही सर्व वसुली मूलतः बँकांची आहे या शासकीय व सेंट्रल गर्व्हनमेंट संस्था आहे. मात्र ५-५ वर्षे वसुली होत नाही. यामध्ये जेथे वाद असेल ते सोडविले पाहिजे. फक्त करस्पॉन्डन्स करून काही होणार नाही. पुढची काही तरी कारवाई विभागाने प्रस्तावित केली पाहिजे. या संदर्भात एक बैठक घेऊन एस.पीं.ना सर्व पेन्डन्सी संपविण्यास सांगावे असे समितीने सूचित केले असता अपर मुख्य सचिव यांनी समितीला आश्वासित केले की, We will take it.

एस.पी. नांदेडमध्ये एम.आय.डी.सी.कडे सर्वात जास्त रक्कम मागितली आहे. त्यानंतर रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, नांदेड एअरपोर्ट व एम.आय.डी.सी. याबाबत करस्पॉन्डन्स झालेला आहे मात्र रिकव्हरी झालेली नाही. यासंदर्भात अधिक माहिती देताना अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, बहुतेक विषय असा असेल की, ज्यावेळेस प्रायव्हेटाईज केले त्यावेळेस रिलायन्सने एम.आय.डी.सी.चे ३०-४० एअरपोर्ट एकत्र घेतले होते. बहुतेक त्या करारामध्ये सिक्युरिटीचा खर्च कोणी करावा, याबाबत साशंकता असेल व तो डिस्प्युट तेथे सुरू असेल. एम.आय.डी.सी.चे नॉन फंक्शनल एअरस्ट्रीप्स त्यांनी त्यावेळेस विकत घेतले होते. आता शिर्डी येथे जेव्हा विमानसेवा सुरू केली, त्यावेळेसही हा विषय आला की, कोणी खर्च करावा. कदाचित तो विषय असेल. But we will take it up and pursue the recovery.

या अनुषंगाने महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले की, ही वसुली करण्यात यावी. कारण You have to right off then if it is not recoverable. Because the S.P. has raised the demand for recovery. अपर मुख्य सचिव यांनी पुन्हा हेच सांगितले. We will take it up and pursue the recovery.

मुंबई पोर्ट ट्रस्टची एक पेंडिंग केस आहे, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अगेन्स्ट एक मोठा क्लेम पेंडिंग आहे. We were also involved in it indirectly because of that independent audit business. त्यामध्ये काही प्रोग्रेस झालेला नाही. The Port Trust is

getting away by raising disputes. Please present the current status to the PAC on this issue. बाब महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता सह पोलीस आयुक्त (प्रशा) यांनी सांगितले. Right now, I don't have the data with me. Later on, I will send the report to you. तथापि, सदरहू माहिती अद्याप अप्राप्त आहे.

६.२३ परिच्छेद क्रमांक ७.३.४ : पोलिसांवरील खर्चाच्या सहाव्या वित्त आयोगाच्या थकबाकी वसुली न होणे :

उपरोक्त परिच्छेदा संदर्भात अपर मुख्य सचिव यांनी समितीला अवगत केले की, सहावा वित्त आयोग हा सन २००९ मध्ये लागू केला. सन २००६ ते सन २००९ या दरम्यानचे अरिअर्स रेज करून त्या युनिटकडून वसूल करावेत, असा आक्षेप आहे. पण आता अशी डिमांड रेज करणे, फारसे योग्य ठरणार नाही. या संदर्भात शासनाचे आदेश मिळवून त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

तथापि, लेखी उत्तरात नमूद केले की, संबंधित खाजगी व्यक्ती व स्वायत्त संस्था या शुल्क भरण्यास तयार नाही. यावर अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, ज्यावेळेस सुरक्षा दिली त्यावेळेस संबधितांना कळविण्यात आले होते. आता रिवाईज झाल्यानंतर असे सांगावयाचे की, रिव्हीजन झालेले आहे व ३ वर्षांचे किती अरिअर्स तयार झालेले आहेत ते कळवावे तर सद्यःस्थितीत ते व्यवहार्य ठरणार नाही. त्यामुळे याबाबत विभाग शासनाचे आदेश मिळवणार आहोत.

६.२४ परिच्छेद क्रमांक ७.३.५. : पोलिसांवरील खर्चाची चुकीची संगणना :

या परिच्छेदामध्ये आहार भत्त्याचा इशु आहे. पुणे येथे पुन्हा सहाव्या वेतन आयोगातील आहार भत्त्याच्या फरकाची रक्कम ३३.५२ लाख प्रलंबित होती. त्यातील ११ लाख वसूल झालेले आहेत तर ११ लाख प्रलंबित आहेत. असे अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले.

पण स्पष्टीकरणात्मक ज्ञापनातील उत्तरातही १६ लाख १४ हजार रुपये प्रलंबित आहे असे नमूद केले आहे. यावर अपर पोलीस महासंचालक यांनी सांगितले की त्यानंतरही अजून २ लाख ७६ हजार ६४० रुपये वसूल झालेले असून आता एकूण प्रलंबितता ११ लाख १५ हजार ६६० इतकी आहे. हा तोच सहाव्या वेतन आयोगाचा आहार भत्त्याचा विषय आहे. त्यामध्येही वाढ झाली असेल, त्यामुळे ते चेक करावे लागेल. त्यामुळे आपण जर फरक मागत असू व जर पॉलिसी डिसीजन होणार असेल की, सहावा वेतन आयोग फक्त सन २००९ पासून पुढे घ्यावा तर मग यामध्ये पुन्हा फरक पडेल. वसुली निम्मी झालेली आहे व उर्वरित रिकव्हरी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

ठाण्याच्या संदर्भात विभागाने एकदम व्हेग उत्तर दिलेले आहे. " सन २०१२-१३ ची अंदाजे रक्कम रु. १,२६,९२३ असल्याचे दिसून येते. यानुसार सन २००८-२०१२ पर्यंत अंदाजित सरासरी रक्कम रु. ५,०७,६९२ एवढी होऊ शकते. सदर कालावधीची अचूक परिणगना करून पुढील २ ते ३ दिवसांत पूर्तता करण्याची तजवीज ठेवलेली आहे." असे उत्तर विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात नमूद केले आहे. लोकलेखा समिती समोर असे उत्तर देता येते काय ? असे मत समितीने नाराजी व्यक्त केले व विचारणा केली की, असे उत्तर कोणी दिले आहे, याकरिता कोण जबाबदार आहे. यावर अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, सदर उत्तर कॉपी पेस्टमुळे झाले आहे व त्याबाबत त्यांनी समितीची क्षमा मागितली.

सर्व परिगणना केली आहे की नाही, ठाण्याच्या वसुलीसंदर्भात कल्याण-डोबिंवली महानगरपालिकडे डिमांड केली की नाही ? याबाबतची सद्यःस्थिती सांगावी. कारण विभागाचे उत्तर एकदम व्हेग आहे. असे समितीने नमूद केले असता, अपर मुख्य सचिव यांनी समितीस आश्वासित केले याबाबतची अद्यायावत माहिती समितीला देण्यात येईल. तथापि, सदरहू माहिती अद्याप अप्राप्त आहे.

६.२५ परिच्छेद क्र. ७.३.६ पोलिसांवरील वसुली योग्य खर्चाचे समायोजन :

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचेकडील रु.१५.३७ लक्ष इतकी रक्कम थकीत होती. औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा यांचेकडील विद्युत व घरभाडेच्या थकीत रकमेपैकी दिनांक ११ मे २०१७ रोजी रु. १९,७४,१४१ इतकी वसुल झाली आहे. उर्वरित रक्कम वसुल करण्याची तजविज ठेवली आहे. असे विभागाचे उत्तरात नमूद केले आहे. हे उत्तर तरी विभागाचे बरोबर आहे का अशी विचारणा समितीने केली असता, हे उत्तर देखील चुकीचे आहे. याबाबत अद्ययावत माहिती समितीला सादर करण्यात येईल असे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी समितीस अश्वासित केले. तथापि, सदरहू माहिती अद्याप अप्राप्त आहे.

६.२६ परिच्छेद क्रमांक ७.३.७ रोकड व्यवस्थापनातील अनियमितता :

६.२७ परिच्छेद क्र. ७.३.८ पावती पुस्तके पाठविणे आणि परत मिळवणे यावर अपुरे नियंत्रण :

उपरोक्त परिच्छेदामध्ये कॅशबुकमध्ये नोंदी न करणे, अकाऊंटिंग व्यवस्थित न करणे इत्यादी आक्षेप घेण्यात आलेले आहेत. याबाबत अपर मुख्य सचिव यांनी खुलासा केला की, आता विभागाची सिस्टीम ग्रासमध्ये शिफ्ट होत असल्यामुळे यापुढे हा विषय उद्‌भवणार नाही.

रुपये १००० च्या अनियमिततेबाबत विभागाने संबंधिताविरुद्ध कारवाई केली आहे. १०० कोटी रुपये वेळेवर वसूल केले नाहीत त्यांच्याविरूद्ध काहीच कारवाई नाही हे संयुक्तिक वाटते का? आयपीएल मॅचच्या अनुषंगाने करोडो रुपयांवर पाणी सोडले, कोणावर कारवाई केली नाही. सिस्टीमच्या दृष्टीने दडपण असले पाहिजे.असे मत समितीने व्यक्त केले असता, अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, हा विषय ग्रासवर शिफ्ट झाल्यामुळे निश्चितपणे दडपण राहणार आहे.

आता गृह विभागाचे काम चांगले चालले आहे परंतु मागील काळात नियमांचा भंग झालेला आहे. ग्रासमुळे पुढे सुधारणा होईल हे मान्य आहे. परंतु पूर्वी भोंगळ कारभार होता असे वाटत नाही का? असे मत समितीने व्यक्त केले असता अपर मुख्य सचिव यांनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली व समितीला अवगत केले. इतक्या मोठया फोर्समध्ये कोणतेही काम १०० टक्के होऊ शकत नाही. काही चांगले काम देखील होऊ शकते. म्हणूनच लोकलेखा समिती सारखी बॉडी या ठिकाणी बसलेली आहे त्यामध्ये दुरुस्त्या होत राहतात. कोणत्याही मुलाला १०० पैकी १०० गुण मिळतील असे नसते १०० पैकी ९० गुण मिळाले तर १० गुण कमी मिळाल्याबद्दल जर आपण भाष्य करीत बसलो तर ९० गुण मिळाल्याचे कौतुक राहणार नाही असा हा विषय आहे. त्यामुळे विभाग सचिव म्हणून त्यांनी महालेखाकार महोदयांना विनंती केली की, जे काम झाले त्याचा देखील उल्लेख होणे आवश्यक आहे. परंतु महालेखाकारांचा एकूण गाभा असा आहे की, त्यांना मुद्दे काढायचे असतात.

अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांनी व्यक्त केलेले उक्त भावनासंदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, महालेखाकाराचे काम आक्षेप काढणे हेच आहे. तसेच महालेखाकार यांनी देखिल समितीस सांगितले की, विभागीय सचिवांनी व्यक्त केलेल्या भावनाशी ते सहमत नाही. कारण महालेखाकारांनी त्याच अहवालात जिथे वसुली झाली आहे ती बाब नमुद केली आहे.

यासंदर्भात अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, ज्यावेळी कोणत्याही विषयाबद्दल आकलन केले जाते त्याचे आकलन पूर्णपणे व्हावे, चांगले झाले त्याचा उल्लेख पण असावा. चुकले आहे ते समितीसमोर आहे व त्याबद्दलच चर्चा करण्यात येते.

या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, विभागाचे असे म्हणणे आहे की, ९० टक्के चांगले काम झाले, १० टक्के प्रोसीजर लॅप्सेस झाले ते विचारात घेऊ नये असे आपले म्हणणे आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, यावर अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, तसे विभागाचे अजिबात म्हणणे नाही. १० टक्के समितीसमोर येते आणि त्यावरुन समितीचे पूर्ण कारभाराचा निष्कर्ष काढला तर ते योग्य होणार नाही असे विभागाला म्हणायचे होते.

Whatever I spoke is limited to this para. I am not talking of entire Home Department. I am speaking only on issues raised by the A.G. कॅशबुक ठेवले नाही किंवा त्या संदर्भात आकलन नाही, हा जो निष्कर्ष आहे तसे नाही. महालेखाकाराने सॅम्पल ऑडिट आहे and PAC is also commenting on this. These are only few instances. However, there are much more things happening which are not coming before the A.G., as well as, the PAC. या स्पेसिफिक मुद्यामध्ये पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्याकडून अर्जदार व्यक्तीकडून आलेले बँकेचे डिमांड ड्राफ्ट सहा-सहा महिने खात्यामध्ये जमा केले नाहीत. डीडी रिसिव्हींग ब्रँच अकाऊंट ब्रँचला ३०-३० दिवस डीडी पाठवित नसेल तर ग्रास सिस्टीममध्ये हा विलंब कसा दूर होणार आहे? कॅशबूक नसल्यामुळे मिसअॅप्रोप्रिएशनचे चॅन्सेस असतात. समिती या ठिकाणी कोणावर कारवाई करण्यासाठी बसलेलो नाही. तर सिस्टीम कशी दुरुस्त करता येईल याचा विचार समिती करते.

समितीने विचारणा केली की, यापुढे फक्त कॅश पेमेंट घेण्यात येणार आहे काय? यावर अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, बरेच इश्यू आहेत. ट्रॅफिक विभागाकडील पेमेंट वेळेवर जमा होत नाही. पैसे रेव्हेन्यू बाजूला जमा केले जातात ते कॅशबुकप्रमाणे जमा होतात की नाही हा मेजर मुद्दा होता हा इश्यू ग्रासमुळे नक्की इम्प्रूव्ह होईल.

ज्या रिसिप्टसाठी पूर्वी डीडी घेण्यात येत होता आता कॅश घेणार आहात त्यामुळे त्याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे असे समितीने सूचित केले असता, अपर मुख्य सचिव, यांनी सांगितले की, As far as E-Challan is concerned, the money will go directly into the Bank, there will be no cash or D.D.

पावती जमा होत नाही, पावत्यांचा रेकॉर्ड नाही, पावत्या ठेवण्यासाठी जागा नाही असेही उत्तर दिले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, अतिरिक्त मुख्य सचिव यांनी सांगितले की, ग्रासमुळे हा विषय यापुढे राहणार नाही. आता ई-चलन केले आहे. मागील काळात जे झाले आहे त्याबाबत पावत्यांचा रेकॉर्ड ठेवण्याची सिस्टीम नव्हती का? सिस्टीम रेग्युलर आहे. त्याची प्रोसीजर मॅन्युअलमध्ये प्रिस्क्राईब आहे. नवीन पुस्तके देताना पूर्वीची पुस्तके जमा करून घेतली पाहिजेत, अशीच सिस्टीम आहे.

परंतु वापरण्यात येणाऱ्या जीईएन पुस्तकांची संख्या विचारात घेता, वापरलेली पुस्तके जमा करून ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त, ठाणे कार्यालयाकडे पुरेशी जागा उपलब्ध नाही. यास्तव ताळमेळ घेतलेली (वापरुन संपलेली) पावती पुस्तके पोलीस मॅन्युअल भाग-२, परिशिष्ट-१४, नियम क्र. २५५ व परिशिष्ट १५ क्र.६ मधील तरतूदीनुसार युनिट कार्यालयाच्या अभिलेखावर जतन करण्यासाठी पोलीस आयुक्त, ठाणे कार्यालयातील वाहतूक विभागाचे लेखी पत्राव्दारे क्र.पोउपा/वाहतुक/प्रशा-१/२९९६/२०१६, दि.०६/०९/२०१६ अन्वये पाठविण्यात आले आहे. त्याप्रमाणे कारवाई त्यांच्या युनिट कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

ते समितीला मान्य आहे. परंतु त्या पुस्तकांचा हिशोब जुळला पाहिजे. विभागाकडे पावती पुस्तकांचा हिशोब जुळून येत नाही. तसेच पावती पुस्तके ठेवण्यासाठी जागा नाही असे देखील विभागाने त्याच्या लेखी उत्तरात नमूद केले ही बाब समितीने निदर्शनास आणून दिले व विभागास विचारणा केली की, The Books of Accounts had not been maintained and now you are putting all the things in GRAS. याबाबत अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, पूर्वीची सिस्टीम त्या काळासाठी योग्य होती. लोकसंख्या ३ कोटी होती. गुन्हयांची संख्या कमी होती. सिस्टीम अपुरी पडते म्हणून इलेक्ट्रॉनिक पद्धतीचा स्वीकार केला जात आहे. त्या माध्यमातून कमी कर्मचारी वर्गाच्या सहाय्याने कमी वेळात अधिक चांगली कार्यवाही करता येणार आहे. कोणताही विषय घेत असताना पुढील दिशेने काय दिग्दर्शन करता येईल ते करण्यात यावे.

जी पावती दिली जाते त्यापोटी भरणा केलेली रक्कम किती कालावधीत शासन जमा झाली पाहिजे? रक्कम भरणा केली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, रक्कम भरली आहे. यापुढे ई-चलनचा वापर होणार आहे. प्रत्येक ट्रॅफिक कॉन्स्टेबलकडे इन्स्ट्रुमेंट दिलेले आहे. त्या माध्यमातून क्रेडिट वा डेबिट कार्डद्वारे पेमेंट स्वीकारले जाणार आहे.

६.२८ परिच्छेद क्र. ७.३.९ कोषागारातील नोंदी बरोबर जमाचा ताळमेळ न होणे

सप्टेंबर २००८ ते डिसेंबर २०११ दरम्यान वेगवेगळ्या कालावधीतील एकूण रु.६.०४ कोटीच्या जमा लेखांकित न झाल्याने संबंधित कोषागाराने कळविले होते. या ६.०४ कोटी रुपयांपैकी किती रक्कमेचे रिकन्सीलिएशन झाले आहे अशी विचारणा समितीने केली असता, अपर पोलीस महासंचालक यांनी सांगितले की, सर्व खर्चाचा ताळमेळ झालेला आहे.

ठाणे विभागाचे रिकन्सीलिएशन झालेले आहे काय? यावर अपर पोलीस महासंचालक (प्रशा) यांनी सांगितले की, रक्कमनिहाय माहिती उपलब्ध होण्याकरिता वेळ द्यावा लागेल. पोलीस आयुक्त, ठाणे अंतर्गत मुंब्रा, कळवा, कोळसेवाडी, ठाणे, नौपाडा, कोपरी वाहतूक यापैकी ठाणे शहर, अंबरनाथ, डोंबिवली (पूर्व) वाहतूक यांचा ताळमेळ झालेला आहे.

ठाणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नांदेड, पुणे या सर्व ठिकाणची रिकन्सीलिएशनची सद्याची परिस्थिती काय आहे तसेच सोलापूर, अमरावती (ग्रामीण) यांची लेटेस्ट सिच्यूएशन आठ दिवसांत समितीला कळवावी असे निदेश समितीने दिले असता, समितीस माहिती सादर करण्यात येईल असे विभागाकडून अश्वस्त केले तथापि, सदरहू माहिती अद्याप अप्राप्त आहे.

महालेखाकार कार्यालयाने लेखापरीक्षणात जे निष्कर्ष काढले आहेत त्याच्याशी समिती पूर्णपणे सहमत आहे. ग्रासचे उदाहरण आपण दिले ते पुढील काळासाठी लागू आहे. परंतु मागील काळात ज्या अनियमितता झाल्या त्याबाबत समिती गंभीर आहे. पोलीस विभाग अनुशासनासाठी प्रसिद्ध आहे. लेखा पद्धतीमध्ये ज्या चुका झालेल्या आहेत त्यामध्ये दुरुस्ती करून काम करणे अपेक्षित होते. रेल्वे विभागाकडून जी रक्कम येणे आहे त्याबाबत शासन स्तरावरून पाठपुरावा होत नाही तोपर्यंत थकबाकी वाढत जाणार आहे, त्यामुळे कार्यवाही करणे आवश्यक आहे असे समितीने सुचित केले.

मुंबईच्या संदर्भात आणि उर्वरित महाराष्ट्राच्या संदर्भात ऑडिट अकाऊंटींगसाठी नोडल ऑफिसर कोण राहणार आहेत? यावर अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, मुंबईसाठी डीसीपी (एचक्यू) आणि महाराष्ट्रासाठी आय.जी.(ॲडमिन) काम पाहतील.

अभिप्राय व शिफारशी :

६.२९ परिच्छेद क्र. ७.३.३.१ " इतर राज्यांकडून तेथे तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची वसुली न होणे "

अभिप्राय :

इतर राज्यांमध्ये तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची प्रलंबित रक्कम रु.३८.३२ कोटी होती ज्यापैकी वर्ष १९६८ ते २००८ यामधील वेगवेगळ्या कालावधीशी संबंधीत रु.२२.१२ कोटी रक्कम पाच वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित होती. संबंधित राज्यांकडून यापैकी रु.१४.५२ कोटीची मागणी केली गेली. उर्वरित रक्कमेचे लेखापरिक्षा प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्याने ती प्रलंबित होती. विभागाने अपूर्ण माहिती सादर केल्यामुळे तसेच दस्तऐवज सादर न केल्यामुळे लेखापरीक्षा प्रमाणपत्रे दिली गेली नव्हती. तसेच, विभागाने वर्ष-निहाय आणि राज्य-निहाय अशाप्रकारे सादर केलेल्या आकडेवारीमध्येही तफावत होती. वर्षनिहाय विवरणपत्राप्रमाणे रु.२२.११ कोटी रक्कम प्रलंबित होती, तर, राज्य-निहाय विवरणपत्र रु.२१.७४ कोटी प्रलंबित असल्याचे दर्शवित होते. आकडेवारीच्या या दोन संचांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तसेच सन २००८-०९ ते २०१२-१३ दरम्यानच्या वेगवेगळ्या कालावधीत १२ राज्यांमध्ये तैनात केलेल्या SRPF जवानांवरील एकूण रु.१६.२० कोटी खर्चाची रक्कम वसुलीसाठी प्रलंबित होती. पोलीस महासंचालक कार्यालयात माहिती संकलित केली जात नसल्याचे आढळून आले. म्हणूनच, पोलिसांवरील प्रलंबित खर्चाचा तपशील सहज उपलब्ध नव्हता. ज्यामुळे सन १९६८ पासूनच्या कालावधीशी संबंधित खर्च मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदरहू परिच्छेदांतर्गत इतर राज्यांकडून तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची वसुली न होणे तसेच झालेल्या खर्चाची प्रलंबित रक्कम अद्यापही वसूल होऊ शकली नाही. त्यामुळे शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यात अधिक गंभीर बाब म्हणजे या कोट्यवधी रुपयांच्या वसुलीची विभागाने मागणीच केलेली नाही. अशा बऱ्याच राज्यांकडून ही रक्कम येणे असून यासाठी केवळ पत्रव्यवहार करण्याशिवाय दुसरे कोणतेही प्रयत्न विभागाकडून करण्यात आले नाही. तसेच ही वसुली सन १९८९ पासून प्रलंबित आहे. अन्य राज्याला रकमेची मागणी करण्याअगोदर महालेखाकार कार्यालयाकडून खर्चाचे विवरण तपासून यासंदर्भात लेखा प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय ही मागणी करता येत नाही. काही प्रकरणात तपशील तपासणीकरिता व प्रमाणपत्राकरिता महालेखाकार कार्यालयाकडे पाठविण्यात आले नाही तर काही प्रकरणे महालेखाकार कार्यालयाकडे प्रमाणपत्रासाठी प्रलंबित आहेत. केवळ समितीने विभागाची ही बैठक लावल्यामुळे ही मागणी करण्यात येणे व प्रमाणपत्र प्राप्त करणे या कामासाठी गती देण्यात आली. अन्यथा महालेखाकारांनी सदरहू आक्षेप सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी नोंदवूनही विभागाने याची दखल घेतली नाही. समितीची बैठक लागल्यामुळे विभागाने आता रु.६९.६८ कोटी रकमेची मागणी केली आहे. महालेखाकारांकडे अशी प्रमाणपत्रे देण्याची प्रलंबित राहण्याचे कारणे काय ? अशी विचारणा समितीने केली असता यासाठी संपूर्ण आवश्यक कागदपत्रे, देयके, सी.आर.सी.कोड न दिल्यामुळे ही प्रमाणपत्रे प्रलंबित असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारशी :

६.३० निवडणुका, धार्मिक कार्यक्रम, दंगली इत्यादी प्रसंगी कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी केंद्र सरकार/इतर राज्य सरकारे यांच्याकडून विनंती केली गेल्यास इतर राज्यांमध्ये पोलीस तैनात केले जातात. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य (DGP) यांनी जारी केलेल्या आदेशानुसार महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असलेल्या राज्य राखीव पोलीस दलामधून (SRPF) पोलीसांना इतर राज्यांत तैनात केले जाते. DGP यांनी १९ मे, २००३ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार राज्याबाहेरुन SRPF च्या समादेशकांनी तैनातीवरील COP चे खर्चाचे विवरणपत्र (SOE) तयार करणे आवश्यक असते. अशाप्रकारे प्राप्त झालेल्या DGP एकत्र करून प्रमाणन करण्यासाठी त्या राज्याच्या महालेखाकारांकडे त्या पाठवायच्या असतात. यावर पोलीस महासंचालक कार्यालयाने माहितीचे संकलन करण्याची तसेच खर्चाचे विवरणपत्रे तयार करण्याची जबाबदारी अतिरिक्त DGP यांची होती. तथापि, इतर राज्यांमध्ये तैनात केलेल्या पोलिसांच्या खर्चाचे विवरणपत्र तयार करणे आणि त्याचे एकत्रिकरण करणे यासाठी विहित केलेल्या पद्धतीचा अवलंब न केल्याने आणि याविषयी पाठपुरावा न केल्याने इतर राज्यात तैनात केलेल्या पोलिसांवरील रु. ३८.३२ कोटी खर्च वसुल झाला नाही ही वस्तुस्थिती कायम राहते. इतर राज्याकडून तेथे तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची वसूली न होणे हे महसुलाच्यादृष्टीने अत्यत गंभीर आक्षेप महालेखाकारांकडून नोंदविण्यात आले आहेत. परिणामी, विभागास अपेक्षित असलेला मोठा महसूल वसूल करता आला नाही.

या सर्व मागणी व वसुलीला आता अमर्याद विलंब झालेला आहे. विभागाने या वसुली प्रकरणी केवळ पत्रव्यवहार करणेशिवाय दुसऱ्या कोणत्याही पर्यायांचा अवलंब केला नाही. जे विभागांतर्गत कमकुवत देखरेख दर्शविते. या वसुलीसाठी कोणतेही नियोजन, आढावा व लक्ष्यपूर्तीसाठी उपाययोजना केल्याचे समितीला दिसून आले नाही. बऱ्याच प्रकरणी अनेक राज्यांतर्गत ही वसुलीची रक्कम केवळ समायोजन करण्याची आवश्यकता आहे. तो ताळमेळ तात्काळ केल्यास ही वसूलपात्र रक्कम कमी होऊ शकेल. तसेच रकमेची मागणी करण्याची सध्या अस्तित्वात असलेली कार्यपद्धती अतिशय क्लिष्ट व किचकट असून या कार्यद्धतीमध्ये सुटसुटीतपणा आणल्यास ही अधिक गतीशीलपणे राबविणे शक्य आहे. यासाठी आवश्यकती उपाययोजना करण्यात यावी. अत:विभागाने अन्य राज्यांकडून वसूलपात्र रकमेच्या मागणीची देयके तात्काळ महालेखाकार कार्यालयाकडे पूर्ण तपशिलासह लेखा प्रमाणपत्रांसाठी सादर करावे. सदरहू प्रमाणपत्र प्राप्त करून तातडीने अन्य राज्यांना या रकमांची मागणी करण्यात यावी. यासाठी विभागाने महालेखाकार कार्यालयाकडे लेखा प्रमाणपत्रासाठी खर्चाचे विवरणपत्र हे तुकड्यांमध्ये न पाठविता एकत्रितरीत्या पाठविल्यास महालेखाकारांना ही

प्रकरणे एकत्रितरित्या निकाली काढता येतील. त्यामुळे ही पद्धत अधिक सोपी व सुरळीत करण्यात यावी. तसेच विभागाच्या अधिकाऱ्यांनी देखील मासिक अथवा त्रैमासिक आढावा बैठक महालेखाकार कार्यालयासमवेत नियमितरीत्या घेतल्यास ही प्रकरणे तातडीने निकाली काढता येतील व त्यानंतर ही मागणी अन्य राज्यांना तातडीने करून ही वसुली वा समायोजन तातडीने करता येईल. अतः त्याअनुषंगाने कार्यपद्धती निश्चित करण्यात यावी व या रकमांचा ताळमेळ तातडीने घालण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.३१ परिच्छेद क्र. ७.३.३.२ " शासकीय रेल्वे पोलीस (GRP) प्रती खर्चाची मागणी न करणे "

अभिप्राय :

भारतीय रेल्वे वित्तीय संहितेच्या खंड-१ मधील परिच्छेद ८५६ आणि MPM खंड-२ च्या नियम १३८, १३९ नुसार शासकीय रेल्वे पोलीस (GRP) बळाची एकूण संख्या रेल्वेच्या सहमतीने निर्धारित केली असल्यास रेल्वे मध्ये तैनात केलेल्या GRP कर्मचाऱ्यांवरील खर्च राज्य शासन आणि रेल्वे यांनी ५०:५० टक्के प्रमाणात विभागून करायचा होता.

विभागाकडून रेल्वेला पुरविण्यात आलेल्या GRP च्या खर्चाच्या ५० टक्के एवढी म्हणजेच एकुण रु.२७४.८१ कोटीची मागणी केली गेली होती ज्यापैकी फक्त रु.१२४.३९कोटी वसूल करण्यात आले. (ज्या तारखांना मागणी केली गेली आणि वसुली करण्यात आली त्याची नोंद अभिलेख्यांमध्ये उपलब्ध नव्हती.) तसेच शासकीय रेल्वे पोलिसांच्या खर्चाचे विवरणपत्र ADGP (रेल्वे) यांनी तयार करणे अपेक्षित होते. पुण्यासाठी १ एप्रिल,२०१० ते ३१ मार्च, २०१३ आणि मुंबईसाठी २०१२-१३ या कालावधीची विवरणपत्रे तयार केली गेली नव्हती. म्हणूनच या क्षेत्रांकडून संबंधित कालावधीसाठी देय असलेली रक्कम विभागाला निश्चित करता आली नाही आणि तिची मागणीही करता आली नाही.

तसेच सन १९७९-८० पासून शासकीय रेल्वे पोलिसांच्या तैनातीवरील खर्चापोटी एकुण रु.१९३.९० कोटीची मागणी वसुलीसाठी प्रलंबित होती. परंतु थकबाकीच्या वसुलीसाठी पर्याप्त पाठपुरावा करण्यात आला नव्हता. अशा मोठ्या प्रमाणातील थकबाकीची कारणे आणि थकबाकीच्या वसुलीसाठी विभागाने केलेले प्रयत्न याविषयीची माहिती जरी मागवली होती तरी विभागाने ती सादर केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

गृह विभागाने रेल्वेला राज्यातील पोलिसांची कुमक पुरविली आहे त्यामुळे रेल्वेकडून प्रलंबित असलेली ही मोठ्या प्रमाणात वसुली असून महालेखाकारांनी हा आक्षेप सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरिता नोंदविला असून समितीने याची साक्ष आता सन २०१७-१८ मध्ये घेतलेली असताना मध्यतरींच्या कालावधीत विभागाने या आक्षेपांची कोणतीही दखल घेऊन तातडीने वसुली करण्याचा कोणताही प्रयत्न केल्याचा समितीला दिसून आले नाही. त्यामुळे ही वसुली मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहे. रेल्वेकडून ही प्रलंबित वसूली सन १९७९-८० पासून शिल्लक असून केवळ समितीची साक्ष लागल्यामुळे विभागाने यासंदर्भातील रकमेची मागणी करण्याबाबतचे पत्र रेल्वेला पाठविले आहे. सन १९७९ पासून ही रक्कम प्रलंबित असण्याची कारणे समितीने विचारली असता गृह विभागाकडून ही देयके सादर केल्यानंतर रेल्वेकडून ही प्रतिपूर्ती नियमित व पूर्णपणे होतेच असे नाही. या रकमेच्या वसूलीसंदर्भात सध्या अस्तित्वात असलेली कार्यपद्धती अत्यंत क्लिष्ट व किचकट असून ही पद्धत सुरळीत व सोपी करण्याची आवश्यकता आहे. तसेच रेल्वे आस्थानांवरील तिन्ही घटकांसाठी राज्य शासनाकडून जेवढा पोलीस फोर्स पाठविण्यात येतो त्या पदांना रेल्वे प्रशासनाने मंजुरी देणे आवश्यक आहे. ज्या पदांना रेल्वेकडून मंजूरी प्राप्त आहे अशाच पदांचा ५० टक्के भार रेल्वे उचलते. व ज्या पदांना रेल्वेची मान्यता नाही त्या पदांचा १०० टक्के खर्च हा राज्य शासनाला सोसावा लागतो. सन १९८० ते आजतागायत एकूण ६४० पोलिसांची सेवा रेल्वेला पुरविण्यात आलेली आहे. त्यातील केवळ १०० पदांची मान्यता रेल्वेने दिलेली असून फक्त त्याचाच ५० टक्के खर्च रेल्वेने उचलला आहे व उर्वरीत ५४० पदांची मान्यता रेल्वेकडून दिली जात नसल्यामुळे त्याची प्रतिपूर्ती रेल्वेकडून होत नाही. त्यामुळे ही वसुली मोठ्या प्रमाणात दिसून येत असून त्या आधारेच महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविले आहेत. जर या ५४० पदांना रेल्वेकडून मान्यताच मिळालेली नाही तर तांत्रिकदृष्ट्या या खर्चाची जबाबदारी रेल्वे निश्चितच उचलणार नाही. परंतु रेल्वेने जर प्रत्यक्षात या पोलिसांच्या सेवा वापरल्या असतील तर केवळ तांत्रिक अडचणींचे कारण दाखवून अशाप्रकारे रेल्वेला आपली जबाबदारी टाळता येणार नाही. या उपर समितीने सदरहू साक्ष लावेपर्यंत या पदांच्या मान्यतेसाठी राज्य शासनाने केंद्र शासनासोबत कोणतेही प्रयत्न केले नाहीत त्यामुळे हा विषय निकाली निघू शकला नाही. सदरहू बाब ही केंद्र शासन व राज्य शासनाच्या अखत्यारितील असून सामोपचाराने व एकत्रित बसून निर्णय घेणे शक्य असतानाही त्यासाठीचे प्रयत्न करण्यात आलेले दिसून येत नाहीत. पोलीसांचा खर्च कोणी करावा यापेक्षा रेल्वे वाहतुकीची व नागरिकांची सुरक्षितता ही अत्यंत महत्त्वाची आहे. व या बाबी कुठल्याही तांत्रिक वा प्रशासकीय बाबींसाठी थांबवून ठेवता येण्यासारख्या नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे व कदाचित या भूमिकेमुळे रेल्वे मार्गावर घडलेले अपघात, घटना व कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती पाहता पोलीसांची कुमक वेळोवेळी रेल्वेला पुरविण्यात येते व तत्कालीन परिस्थितीत ही बाब योग्य देखील ठरते. परंतु आवश्यकता असेल तेव्हा पोलिसांची ही कुमक रेल्वेने वापरून घ्यायची व वर्षानुवर्षे या पदांना मान्यता द्यायच्या नाहीत. परिणामी याअनुषंगाने येणारी आर्थिक जबाबदारी सहमती नसल्याचे तांत्रिक कारण सांगून रेल्वे टाळतच राहणार व वर्षानुवर्षे महालेखाकारांनी घेतलेले हे आक्षेप अनिर्णितच राहणार ज्यातून कोणतीही फलनिष्पती निर्माण होणार नाही व ही सर्व परिस्थिती पाहता प्रलंबित वसूली हा विषय निश्चितच अमर्याद कालावधीकरिता दुर्लक्षित राहील. सुरक्षिततेच्यादृष्टीने ही परिस्थिती प्राधान्याने हाताळण्यामध्ये समितीचे कोणतेही दुमत नाही. परंतु याच अनुषंगाने करावयाची वसुलीदेखील नियोजनबद्ध पद्धतीने व समन्वयाने व सामोपचाराने वेळोवेळी करणे आवश्यक आहे. समितीने साक्ष घेईपर्यंत यातून कोणताही मार्ग गृह विभागाने व रेल्वेने काढलेला नव्हता. अतः रेल्वे व गृह विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यासोबत बैठक घेऊन हा प्रश्न तात्काळ निकाली काढण्याची व सुधारित पदसंख्येला मान्यता घेण्याची आवश्यकता आहे. रेल्वे विभागाकडून या अनुषंगाने प्राप्त होणारा निधी हा अतिशय अल्प आहे. व ही तफावत वेळेत निर्णय न घेतल्यास वेळोवेळी वाढतच जाणार.

तसेच रेल्वेला सदरहू रकमेचे मागणीपत्र सादर करण्यासाठी यासंदर्भातील खर्चाचे विवरणपत्र संपूर्ण कागदपत्र व दस्तावेजांसहित प्रथमतः महालेखाकारांना सादर करून त्यांचेकडून लेखा प्रमाणपत्र घेतल्यशिवाय ही मागणी नोंदविता येत नाही. अनेक प्रकरणांमध्ये गृह विभागाने या लेखा प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारी कागदपत्रेच महालेखाकारांकडे सादर केलेली नाहीत. तसेच कोणत्या कारणास्तव ही मागणीपत्रे प्रलंबित आहेत याचा कोणताही पाठपुरावा केला नाही. त्यामुळे रकमेची मागणीच विभागाला करता आली नाही. रेल्वेकडून वसूलपात्र रक्कमेबाबतची अद्ययावत माहिती समितीने घेतली असता सद्य:स्थितीत दिनांक १६ जानेवारी, २०१८ पर्यंत रेल्वे प्रशासनाकडून रुपये ३८९ कोटी ६० लाख ५६ हजार ३३५ इतकी रक्कम वसूलपात्र असल्याचे व त्यासंदर्भात सतत पाठपुरावा करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारशी :

६.३२ (१) रेल्वेमध्ये तैनात केलेल्या शासकीय रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांवरील खर्च राज्य शासन आणि रेल्वे यांनी ५०:५० टक्के या प्रमाणात विभागून करण्याबाबत सहमतीने निर्धारीत केले आहे व त्याअनुषंगाने रेल्वेने जेवढ्या पोलिसांच्या पदसंख्येला मान्यता दिलेली आहे तेवढ्याच पदांची ५० टक्के आर्थिक जबाबदारी रेल्वे स्वीकारते. सद्य:स्थितीत रेल्वेकडे राज्य शासनाचे एकूण ६४० पोलीस कार्यरत असताना रेल्वेने केवळ १०० पदांना मान्यता दिलेली असल्यामुळे केवळ त्यांचाच आर्थिक खर्च ५० टक्के रेल्वे स्वीकारते व उर्वरित ५४० पदांचा संपूर्ण १०० टक्के खर्च हा राज्य शासनाला सोसावा लागत आहे. पदसंख्येच्या मान्यतेचा निर्णय अमर्याद कालावधीकरिता अनिर्णीत राहिल्यामुळे वसूलपात्र रकमेमधील तफावत वेळोवेळी वाढतच जात असून दरवर्षी महालेखाकारांकडून याबाबत निश्चितच आक्षेप नोंदविण्यात येतील. महालेखाकारांनी सदरहू आक्षेप सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात नोंदविले असतानाही समितीची साक्ष लागेपर्यंत दरम्यानच्या कालावधीत विभागाने यासंदर्भात मार्ग काढण्यासाठी कोणतेही ठोस प्रयत्न केल्याचे समितीला दिसून आले नाही. वास्तविकतः केंद्र शासन व राज्य शासन यामधील हा विषय असून सामोपचाराने, समन्वयाने, वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हा विषय वेळेत निकाली काढून रकमेची अंतिम निश्चिती करून त्यासंदर्भातील वसुली करणे आवश्यक असताना विभागाने तसे केल्याचे दिसून आले नाही. केवळ समितीची साक्ष लागल्यामुळे वसूलपात्र रकमेची निश्चिती तसेच त्यासाठी महालेखाकार कार्यालयाकडून आवश्यक असणारी लेखा प्रमाणपत्रे व त्यानंतर रेल्वेकडे रक्कमेची मागणी नोंदविणे ही कार्यपद्धती विभागाकडून घाईघाईने केल्याचे समितीसमोर दर्शविण्यात आले. या सर्व कार्यपद्धतीसाठी विभागाकडे पर्याप्त कालावधी उपलब्ध असताना याबाबतचा कोणताही तोडगा अद्यापही विभागाने काढला नाही व केवळ पत्रव्यवहारापर्यंतच हे प्रयत्न मर्यादीत राहिले. त्यामुळे तांत्रिक बाबींचा आधार घेऊन आर्थिक जबाबदारी टाळणे वेळोवेळी रेल्वेला शक्य होत आहे. वास्तविकतः गृह विभागाने रेल्वे पोलीसांना वेळोवेळी दिलेल्या पोलिसांच्या सेवा रेल्वेकडून स्वीकारलेल्या असतानाही रेल्वेला केवळ तांत्रिक बाबींच्या आधारे आता ही जबाबदारी टाळता येणार नाही. हे दोन्ही शासनाचेच विभाग असल्यामुळे यातून वेळेत तोडगा काढला नाही तर या रक्कमेची वसुली अधिकच कठीण व अशक्यप्राय होऊ शकते. नागरिकांची सुरक्षितता व त्यातून उदभवणारी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती प्राधान्याने हाताळणे ही निश्चितच या दोन्ही विभागाची जबाबदारी आहे व त्या भूमिकेतूनच वेळोवेळी ही पोलीसांची कुमक राज्य शासनाकडून कोणत्याही तांत्रिक व आर्थिक बाबींचा आधार न घेता तातडीने पुरविण्यात येते. व तत्कालीन परिस्थितीत या सर्व बाबी अतिउच्च प्राधान्याने हाताळणे आवश्यक असल्यामुळे घेतलेला निर्णय अतिशय योग्य व समर्थनीय ठरतो. परंतु याचा अर्थ नियमानुसार वसूलपात्र रक्कम प्राप्त करून घेण्यासाठी गृह विभागाने कोणतेही प्रयत्न करू नये असा होत नाही. अतः गृह विभाग व रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकत्रित बसून विचारविनिमयाने व सामोपचाराने कालबध्द पद्धतीने यावर निर्णय घेण्यात यावा व निश्चित वसूलपात्र रक्कम अंतिम करण्यात यावी व त्यातून समायोजित करण्यायोग्य रक्कम समायोजित करण्यात यावी व उर्वरित वसूली तातडीने करून या लेख्यांचा ताळमेळ करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी तसेच भविष्यात या रकमेच्या आकारणीबाबतची कार्यपद्धती व निकष बदलून ठोक रक्कम रेल्वेकडून स्वीकारण्याबाबतच्या पर्यायांचा देखील अभ्यास करून योग्य तो निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

६.३३ (२) **रेल्वेकडून घ्यावयाच्या रकमेची निश्चिती व त्याच्या वसूलीबाबतचे प्रकरण गृह विभागाच्या स्तरावरूनदेखील गांभिर्याने हाताळण्यात आले नाही. या मागणीची निश्चिती वेळेत करून खर्चाचे विवरणपत्र व त्यासाठीची आवश्यक कागदपत्रे एकत्रितरीत्या महालेखाकारांना सादर करून त्यांचेकडून लेखा प्रमाणपत्रे घेऊन वेळोवेळी ही मागणी विहित कालावधीत करणे बंधनकारक असतानाही कोटयावधी रुपयांची मागणी रेल्वेकडून करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या या तांत्रिक बाबींची पुर्तता विभागाने न केल्यामुळे देखील ही वसुली प्रलंबित आहे. विभागाने त्यांना प्राप्त होणाऱ्या महसुलाबाबत कायम सजग व सतर्क असणे आवश्यक असताना या बाबींकडे विभागाचे निश्चितच अमर्याद कालावधीपर्यंत दुर्लक्ष झाले आहे. विभागाने तातडीने या सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता करण्यात यावी. तसेच महालेखाकारांकडून लेखा प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्याची कार्यपद्धत सुलभ व सुटसुटीत करण्यात यावी. केवळ कागदपत्रे पाठवून न थांबता प्रकरणांचा मासिक अथवा त्रैमासिक आढावा घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने याचा पाठपुरावा करण्यात यावा. यासाठी अद्ययावत संगणकीय कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात यावा व खर्चाचा त्रैमासिक ताळमेळ घालण्यात यावा. थकबाकीचा निपटारा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न जरी करण्यात येत असले तरी नियोजनाअभावी यात मोठ्या प्रमाणात विस्कळीतपणा**

असल्याचे दिसून येते. हे प्रयत्न विभागाने महालेखाकार व रेल्वेसमवेत एकजुटीने न केल्यामुळे रेल्वेकडून मोठ्या प्रमाणात थकबाकीची वसूली प्रलंबित आहे. अत: गृह विभाग, महालेखाकार व रेल्वे प्रशासन यांनी एकत्रितरित्या व एकजुटीने या प्रकरणी तोडगा काढून ही वसूली तातडीने निरंक करण्याच्या दृष्टीने तात्काळ पावले उचलावीत व याप्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.३४ परिच्छेद क्र. ७.३.३.३ " इंडियन प्रिमियर लीग (IPL) आणि इतर क्रिकेट स्पर्धा दरम्यान तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची वसुली "

अभिप्राय :

IPL आणि इतर क्रिकेट स्पर्धाच्या ठिकाणी सुरक्षा पुरविण्यासाठी आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी पोलीस तैनात केले जातात व अशा तैनातीसाठी आठ तासांचे एक सत्र या प्रमाणात पोलिसांवरील खर्चाच्या वसुलीचा दर आधारलेला असतो.

त्याअनुषंगाने मुंबई क्रिकेट संघटना (BCCI) यांचेकडून रुपये २.६५ कोटी, विदर्भ क्रिकेट संघटना, नागपूर यांचेकडून रु.०.२० कोटी व विदर्भ क्रिकेट संघटना, नागपूर (ग्रामीण) यांचेकडून रुपये १.५४ कोटी अशी एकूण रु.४.३९ कोटी रक्कम प्रलंबित होती. तसेच वर्ष २००८ मध्ये मुंबई येथे घेतल्या गेलेल्या IPL स्पर्धासाठी केलेल्या पोलीस तैनातीचा तपशील आणि खर्चाच्या मागणीचा तपशील लेखापरिक्षकांना सादरही करण्यात आला नाही किंवा तो अभिलेख्यांमध्येही आढळून आला नाही. म्हणूनच, पोलिसांवरील खर्चाची प्रलंबित रक्कम निश्चित करता येऊ शकली नाही.

तसेच पुणे येथे IPL स्पर्धांच्या वेळी तैनात केलेल्या पोलिसांवर झालेला खर्च देण्याची जबाबदारी सहारा अडव्हेंचर स्पोर्टस लि.या IPL फ्रॅन्चायझी कंपनीची आहे. या स्पर्धासाठी सत्रांच्या आधारावर रु.१.९४ कोटीची मागणी केली असता फ्रॅन्चायझीने विनंती केल्यावर एका स्पर्धेसाठी केलेली संपूर्ण तैनात द्वद्ध एकच सत्र असल्याचे गृहीत धरुन केलेल्या तैनातीचा प्रत्यक्ष कालावधी विचारात न घेता मागणीची रक्कम कमी करून रु.१.१२ कोटी एवढी निश्चित केली.परिणामी रु.८२ लाख एवढी कमी मागणी केली गेली. तसेच तैनातीचे कमी तास दर्शवून विभागाने चुकीची मागणी निर्धारीत केली होती. परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार रु.४.६४ कोटी प्रत्यक्ष खर्च झाला आहे. अशाप्रकारे, मार्गदर्शक सूचना न अनुसरल्यामुळे रु.३.५२ कोटी रक्कम कमी प्राप्त झाली. तसेच दि.२० डिसेंबर, २०१२ रोजी भारत आणि इंग्लंड संघांदरम्यान खेळल्या गेलेल्या क्रिकेटच्या ट्वेंटी-२० स्पर्धाकरिता अतिरिक्त सत्रांसाठी तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाची वसुली न केल्यामुळे रु.१७.०२ लाखाची कमी वसुली झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

अशाप्रकारे इंडियन प्रिमीयर लीग वा इतर क्रिकेट स्पर्धा दरम्यान देण्यात आलेल्या पोलिसांवरील खर्चाची मोठया प्रमाणात वसूली प्रलंबित असल्याचे समितीला दिसून आले. या आक्षेपांमधील पुणे व नागपूर येथील संपूर्ण रक्कमेची वसुली झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच नागपूर (ग्रामीण) अंतर्गत रक्कमेच्या वसुलीसंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली असता सदर रक्कम सहा महिन्याच्या मुदतीत टप्याटप्याने भरण्याचे आदेश न्यायालयाने विदर्भ क्रिकेट संघटना, नागपूर यांना दिलेले आहेत व ही वसूली सुरू असल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले.

तसेच मुंबई येथील आक्षेपित रुपये २.६५ कोटीची रक्कम वसूल झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. त्याचप्रमाणे नागपूर येथे एप्रिल, २०१० मध्ये झालेल्या आयपीएल मॅचेसची वसुली विदर्भ क्रिकेट असोसिएशन नागपूर यांचेकडून न करता ती मुंबई क्रिकेट संघटना (BCCI) यांचेकडून करण्यात येणार असून ही रक्कम BCCI ने अद्यापही भरलेली नसल्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे महसूली थकबाकी वसुली (Revenue Recovery) म्हणून करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे पत्र पाठविण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच जोपर्यंत ही प्रलंबित देणी शासनाला प्राप्त होत नाहीत तोपर्यंत पुढील मॅचेससाठी सुरक्षा न पुरविण्याबाबतही विचार करावा असे मत समितीने दर्शविले असता त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली. तसेच पुणे (ग्रामीण) येथे आयपीएल मॅचेससाठी सत्रांच्या आधारे रुपये १.९४ कोटीची मागणी विभागाने केली होती. पंरतु फ्रॅन्चायझीने केलेल्या विनंतीनुसार एकाच स्पर्धेसाठी केलेली संपूर्ण तैनात ही एकच सत्र असल्याचे गृहित धरुन ही रक्कम कमी करून रु.१.१२ कोटी एवढी निश्चित करण्यात आली व त्यावरील सेवा कर मिळून एकूण १ कोटी २६ लाख ३ हजार ३७२ वसूल केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे रु.४ कोटी ६४ लाख एवढी आकारणी करणे आवश्यक असल्याचे महालेखाकार यांचे म्हणणे असताना ही वसुलीची रक्कम केवळ रु.१ कोटी १२ लाख निश्चित करण्याची कारणे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, या सर्व मॅचेस या T-२० असल्यामुळे केवळ चार तासांचा हा एक सामना असून हा एका पाळीचा बंदोबस्त असल्याचे गृहित धरुन ही आकारणी करण्यात आली आहे व त्यातून पूर्वतयारीसाठी अथवा ब्रीफींगसाठीचा कालावधी वगळण्यात आला असून शासनाच्या परिपत्रकानुसारच ही आकारणी केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

६.३५ सदरहू परिच्छेदांतर्गत नोंदविण्यात आलेले आक्षेप हे अतिशय गंभीर असून महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर व केवळ समितीने साक्ष लावल्यामुळे यातील अधिकाअधिक वसुली करण्यात आली. IPL-20 हे सामने तर संपूर्णतः व्यावसायिक स्वरुपाचे असताना व यातून मोठ्या प्रमाणात या संस्थांना निधी प्राप्त होत असताना अशी वसुली प्रलंबित राहण्याचे कोणतेही कारण नाही. तसेच यात कोणतीही सवलत या संस्थांना देण्याची आवश्यकताही नाही. विभागाने नियमानुसार ही आकारणी व वसुली करणे क्रमःप्राप्त आहे. अतः सदरहू परिच्छेदान्वये वसूलपात्र असलेली प्रलंबित रक्कम तात्काळ वसुल करण्यात यावी व ती वसूल न झाल्यास अन्य पर्यायांचा अवलंब करण्यात यावा व तरीही ही वसुली न झाल्यास अंतिमतः पुढील मॅचेससाठी पोलीस बंदोबस्त न पुरविण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. परंतु असे करताना कोणत्याही प्रकारची कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होणार नाही याची देखील समांतर पातळीवर दखल घेण्यात यावी व ही संपूर्ण रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी. दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी विभागाने ही जुनी आकारणीची पद्धत बंद करून सुटसुटीत कार्यपद्धतीचा अवलंब केलेला असून या सर्व मॅचेससाठी देण्यात येणाऱ्या पोलीस बंदोबस्ताकरिता एकत्रित रक्कम निश्चित करण्यात आलेली असून ती अग्रिमरित्या विभागाकडे भरुनच अशाप्रकारे पोलीसांचा बंदोबस्त पुरविण्यात येतो. त्यामुळे भविष्यात या बाबी व आक्षेप उदभवण्याची शक्यता कमी आहे. तरीही सदरहू परिच्छेदांतर्गत प्रलंबित रक्कमेचा ताळमेळ तात्काळ पूर्ण करून ही वसुली करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.३६ परिच्छेद क्र. ७.३.३.४ " खाजगी व्यक्ती "

अभिप्राय :

खाजगी व्यक्तींना पुरविलेल्या पोलीस संरक्षणाविषयीची तपशीलवार नोंद संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये ठेवली जाते. महाराष्ट्र पोलीस नियमपुस्तिकेच्या परिच्छेद ४८४ नुसार जरी खाजगी व्यक्तींना संरक्षणासाठी पुरविलेल्या पोलिसांचा खर्च आगाऊ वसुल करावयाचा असतो तरीही अशाप्रकारे आगाऊ वसुली करण्यात आली नव्हती किंवा त्यासाठी कुठलीही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली नव्हती. खाजगी व्यक्तींना पुरविलेल्या पोलीस संरक्षणाचा तपशील चाचणी तपासणी केलेल्या सर्व कार्यालयांतून मागवला गेला. परंतु, मुंबई आणि ठाणे व्यतिरिक्त इतर एकाही कार्यालयाने ही माहिती सादर केली नाही.

ठाणे येथे १९ व्यक्तींना पुरविलेल्या पोलीस संरक्षणावरील खर्च आजतागायत वसूल करण्यात आलेला नव्हता. परिणामी सहाय्यक पोलीस आयुक्त, ठाणे येथे रु.३.६३ कोटी आणि पोलीस आयुक्त, ठाणे येथे रु.१.०९ कोटी एवढी खर्चाची वसुली झाली नाही. तसेच CP मुंबई मध्ये १७ व्यक्तींना पुरविलेल्या पोलीस संरक्षणाप्रित्यर्थ रु.१.२३ कोटी एवढ्या खर्चाची आजतागायत वसुली करण्यात आली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

खाजगी व्यक्तींना विभागाकडून देण्यात येणाऱ्या पोलीस संरक्षणाबाबत देखील मोठ्या रक्कमेच्या वसुलीचा प्रश्न या परिच्छेदांतर्गत प्रलंबित आहे. सदरहू परिच्छेदान्वये मुंबई १.२३ कोटी, ठाणे (शहर) येथील १.०९ कोटी व ठाणे (ग्रामीण) ३.६३ कोटी इतक्या वसुलीसंदर्भातील हा आक्षेप असून मुंबई येथील रु.२०,५७,५८९ इतकी एकूण ७ लोकांची रक्कम वसूल केली आहे. २ लोकांकडून अंशतः रक्कम वसूल झालेली आहे. तसेच मुंबईत संरक्षण दिलेल्या ४ लोकांचे रु.८१,३८,५७० इतकी रक्कम माफ करण्यात आलेली आहे. तसेच जवळजवळ रु.२०,७८,६८० इतकी वसुली प्रलंबित असून त्याकरिता जिल्हाधिकारी यांचेकडे महसूली थकबाकी (Revenue Recovery) ची प्रक्रिया सुरु करण्यात आली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत मुंबई शहरामध्ये एकूण ४२ लोकांची रु.५,३३,२८,७५२ इतकी वसुली प्रलंबित आहे. व या प्रकरणासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे महसुली थकबाकीसाठी पत्रव्यवहार केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच ठाणे (शहर) येथील रु.१.०९ कोटीपैकी रु.७१ लाख वसुली करण्यात आलेली आहे. एकूण १० व्यक्तींपैकी ५ ची वसूली पूर्ण झालेली आहे, दोघांची अंशतः वसुली झालेली आहे. उर्वरीत वसुली प्रलंबित आहे व त्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे महसूली थकबाकीसाठी कार्यवाही सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. समितीने या सर्व आक्षेपांवर विस्तृत चर्चा केली असून त्यातील काही रक्कम वसुल झाली आहे असे समितीसमोर सांगण्यात आले. उर्वरीत वसूलपात्र रक्कमेसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे कार्यवाही सुरु असल्याचे व काही प्रकरणात ही गणना चुकल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच सन २०१८ मध्ये आता नवीन शासन निर्णयाद्वारे यात सुधारणा करण्यात आली असून ही रक्कम आता अग्रिमरित्या घेण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले असता या अगोदर देखील ही रक्कम अग्रिमरित्या घेण्याची तरतूद असतानाही विभागाने त्याची अंमलबजावणी योग्यरित्या केली नसल्याचे आक्षेप समितीने नोंदविले.

शिफारस :

६.३७ खाजगी व्यक्तींना देण्यात येणारी सुरक्षा व त्या अनुषंगाने आकारावयाचा खर्च व त्याची वसूली या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविले आहेत.खाजगी व्यक्तींना देण्यात येणारी सुरक्षा हा अतिशय वादग्रस्त परंतु संवेदनशील विषय असून त्या अनुषंगाने आकारावयाचे शुल्क, द्यावयाची सवलत व त्या अनुषंगाने करावयाची वसूली यासंदर्भात प्रकरणनिहाय निर्णय घेतेवेळी नेमकी स्वीकारावयाची भुमिका या बाबींमुळे मोठ्या प्रमाणात ही वसूली प्रलंबित आहे. मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (BP Act) कलम ४७ आणि ४८ तसेच MPM च्या खंड III मधील परिच्छेद क्रमांक ४८४ नुसार व्यक्ती/खाजगी संस्था यांना सुरक्षेसाठी पुरविलेल्या पोलिसांवर झालेल्या खर्च आगाऊ वसुल करायचा असतो. परंतु ज्यावेळेस जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असते अथवा प्राप्त झालेली धमकी या आधारे सुरक्षा प्राधान्याने देणे आवश्यक असते तेव्हा अग्रिम रक्कम घेण्याबाबतच्या तरतुंदीची अंमलबजावणी करणे विभागास तत्कालीन परिस्थितीत अडचणीचे ठरते. विभागासाठी हा अत्यंत नाजूक विषय असून तत्कालिन परिस्थितीत पैशासाठी सुरक्षा देणे थांबविणे विभागाला शक्य होत नाही. व त्या भुमिकेतूनच सुरक्षा प्राधान्याने देण्यात येते परंतु सुरक्षा व्यवस्था घेतल्यानंतर अथवा त्याचा उपभोग करून झाल्यानंतर त्या व्यक्तीची ही रक्कम भरण्याची तयारी राहत नाही व ते यास टाळाटाळ करतात ही देखील वस्तुस्थिती आहे. हा विषय अत्यंत काळजीपूर्वक व प्रकरणनिहाय हाताळणे आवश्यक असून सर्व प्रकरणांमध्ये सरसकट व एकच निर्णय घेऊन चालणार नाही. सद्यःस्थितीत एखाद्या व्यक्तीने सुरक्षेची मागणी केली असेल व ती सुरक्षा जर विभागाने पुरविली नाही व त्यादरम्यानच्या कालावधीत त्या व्यक्तीच्या जिवीतास कोणताही धोका झाल्यास ती जबाबदारी थेट गृह विभागावर येऊ नये या कारणास्तव देखील तातडीने ही सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात येते. यातील १०० टक्क्यांपैकी सर्वच प्रकरणांमध्ये अशी आपत्कालिन परिस्थिती असतेच असे नाही. परंतु जर असे काही झाल्यास त्याची थेट जबाबदारी विभागावर येऊ नये यादृष्टीने देखील ही सुरक्षा विभागाकडून सरसकट पुरविण्यात येते. अनेक प्रकरणांत केवळ सुरक्षा व्यवस्था मिळविण्यासाठी देखील धमक्यांसारख्या काही बाबी घडवून आणण्यात येत असल्याची देखील शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत विभागाने हे विषय अतिशय काळजीपूर्वक हाताळणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत अस्तित्वात असलेल्या या अतिमहत्त्वाच्या सुविधेचा व शासकीय यंत्रणेचा गैरफायदा खाजगी व्यक्तींनी घेऊ नये याची किमान काळजी विभागाने घेतली पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच सदरहू आक्षेपित प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात वसूलीची रक्कम प्रलंबित आहे. ही रक्कम तातडीने विभागाने वसूल करण्याची आवश्यकता असताना तसे करण्यात आले नाही. विभागाने अमर्याद कालावधीकरिता केवळ पत्रव्यवहारच केलेला आहे व आता मात्र त्या संपूर्ण रक्कमेची वसूली महसूली थकबाकी (Revenue Recovery) म्हणून करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार करण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. केवळ पत्र पाठवून विभाग शांत बसू शकत नाही. या रकमेच्या वसूलीची स्वतःची जबाबदारी टाळण्यासाठी केवळ जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्र पाठवून विभाग हा विषय संपवू शकत नाही तसेच विभाग आपली जबाबदारी टाळू देखील शकत नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडे महसूली थकबाकी म्हणून ही वसुली करण्याचा पर्याय हा अंतिम पर्याय असताना विभागाने या पर्यायाचा अवलंब घाईघाईने करणे निश्चितच अपेक्षित नाही. विभागाने या प्रलंबित प्रकरणांमध्ये आता जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्र पाठविली आहेत तर या सर्व प्रकरणांचा मासिक आढावा विभागाने घेऊन ही सर्व वसूली तात्काळ करण्याबाबत पाठपुरावा करून ही वसूली तात्काळ पूर्ण करून समितीस ३ महिन्यांत कळविण्यात यावे. तसेच भविष्यात याअनुषंगाने अस्तित्वात असलेल्या तरतूदींची प्राधान्याने अंमलबजावणी करावी अशी समितीची शिफारस आहे.

६.३८ ७.३.३.५ " महापालिका "

अभिप्राय :

तैनात केलेल्या पोलिसांचा प्रवर्ग-निहाय तपशील, मागणी केलेल्या वसुलीची प्रलंबीत रक्कम इत्यादी दर्शविणाऱ्या कुठल्याही नोंदवह्या विभागात ठेवण्यात आल्या नव्हत्या आणि खर्चाच्या वसुलीस संगणकीकृतही करण्यात आले नव्हते. त्याचप्रमाणे वसुलीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी वरील तपशील असणारे कोणतेही नियतकालीक विवरणपत्र विहित केले नव्हते. तसेच महानगरपालिका कार्यालयांमध्ये तैनात केलेल्या पोलिसांवरील रु.४५.०१ कोटी एवढ्या खर्चाची वसुली करण्यात आली नव्हती. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये (MCGM) तैनात केलेल्या पोलिसांच्या खर्चाचा तपशील उपलब्ध नव्हता. तसेच सोलापूर महानगरपालिकेमध्ये तैनात केलेल्या पोलिसांवर रु.२.९३ कोटी खर्चाची वसुली प्रलंबीत होती. तसेच नांदेड वाघाळा महानगरपालिकेला पुरविलेल्या पोलिसांवरील रु.२१.३१ लाख खर्चाची वसुली प्रलंबित होती असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

मुंबई, ठाणे, ठाणे (ग्रामीण), नाशिक, नागपूर, नांदेड, औरंगाबाद, सोलापूर, अमरावती, पुणे इत्यादी महानगरपालिकांमध्ये दिलेल्या पोलीस तैनातीच्या खर्चाची एकूण रक्कम रु.४५.०१ कोटी या महानगरपालिकांनी भरलेली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. यातील

अमरावती, नाशिक आणि सोलापूर यांच्याकडून पूर्ण रक्कम वसूल झालेली आहे. परंतु उर्वरीत महानगपालिकेच्या रकमा पूर्णपणे भरलेल्या नाहीत. सन २००९ ते २०१२ या कालावधीतील हे आक्षेप असून १०-१० वर्षे जर महानगरपालिका पैसे भरत नाही तर याबाबत विभागाने आजपर्यंत काय कारवाई केली ? अशी समितीने विचारणा केली असता, या प्रकरणी पत्रव्यवहार केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. महानगरपालिकांना अतिक्रमण हटविण्यासाठी वेळोवेळी गृह विभागामार्फत पोलीसांचे संरक्षण घेणे क्रमप्राप्त ठरते. अशा आवश्यक प्रकरणी दिलेल्या पोलिसांवरील खर्चाच्या रक्कमेची वसूली विभागाने इतकी वर्षे करणे आवश्यक होते. तरीही ही पूर्णतः वसूली झालेली नाही. यातील कित्येक रक्कम विभाग व महानगरपालिकेमध्ये समायोजित होण्याची शक्यता असताना ते देखील करण्यात आले नाही. नांदेड येथील वसूली तर शून्य असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः ही रक्कम अग्रिमरित्या भरुन मग पोलीस कर्मचारी देणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी होत नाही. या रकमेच्या वसूलीसाठी विभागाने काय प्रयत्न केले ? असे समितीने विचारले असता यासंदर्भातील पत्रव्यवहार सुरु असून ज्यावेळी हे संरक्षण दिले त्यावेळी कोणती परिस्थिती होती यावर विभागाची भुमिका अवलंबून असते. त्यामुळे विभाग एकदम ताठर भुमिका घेऊ शकत नाही. मात्र वसूली करणे आवश्यक असून नगरविकास विभागामार्फत ही वसूली करण्याचा प्रयत्न आहे असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

६.३९ महानगरपालिकांना देण्यात येणाऱ्या पोलींसासाठीचा खर्च मोठया प्रमाणात थकीत आहे व विभागाने याच्या वसूलीबाबत कोणतीही ठोस कारवाई केल्याचे समितीला दिसून आले नाही. एवढेच नव्हेतर पोलीसनिहाय तपशिल, मागणी केलेला कर्मचारी वर्ग, वसूलीची प्रलंबित रक्कम इत्यादी माहितीसंदर्भातील नोंदवह्या देखील तयार करण्यात आल्या नव्हत्या. त्यामुळे वसूलीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी कोणतीही यंत्रणा व उपाययोजना विभागाने तयार केल्याचे दिसून येत नाही. यातील कित्येक रक्कम महानगरपालिकेसोबत समायोजित करणे शक्य असताना त्याचीदेखील निश्चिती करून वसूलीची रक्कम कमी करण्याचा प्रयत्न विभागाने केला नाही व वसूली देखील केली नाही. सन १९९३-१९९८ दरम्यान जारी केलेल्या शासन निर्णयांमधील खर्चाची आगाऊ वसुली करण्याविषयीच्या सूचनांचे जर पालन केले गेले असते तर अशाप्रकारे स्थानिक संस्थांकडून मोठ्या प्रमाणात वसुली प्रलंबित राहण्याची जी परिस्थिती सध्या उद्भविली आहे ती टाळता आली असती. विभाग त्यांना प्राप्त होणाऱ्या महसूलाबाबतचे विषय गांभीर्याने हाताळत नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. अतः या सर्व महानगरपालिकांसोबत नगरविकास विभागामार्फत एकत्रितरित्या बसून संपूर्ण रक्कम वसुलीसंदर्भात तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.४० परिच्छेद क्र. ७.३.३.६ " बँका तसेच शासकीय व बिगर शासकीय संस्था "

अभिप्राय :

विविध बँका तसेच इतर शासकीय आणि बिगर शासकीय संघटनांकडे तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चापैकी एकूण रु.१६.७७ कोटी रक्कमेची वसुली मे, २०१३ पर्यंत प्रलंबित होती. या कार्यालयांनी वसुलीसाठी वेळोवेळी पाठपुरावा केला असल्याचे दर्शविणारी कुठलीही नोंद अभिलेख्यांमध्ये नव्हती. तसेच, जानेवारी, २०१३ ते जून, २०१३ या कालावधीत महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती महामंडळ लि. येथे तैनात केलेल्या पोलिसांवरील खर्चाच्या प्रलंबित वसुलीची माहिती उपलब्ध नव्हती. या सर्व खर्चाची आगाऊ वसुली करणे आवश्यक होते. परंतु असे न केल्यामुळे मोठ्या प्रमाणात थकबाकीचा संचय झाला. सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने एकूण वसुलपात्र रक्कमेपैकी तुर्त रु.४ कोटी ७१ लाख रुपयांची वसूली बाकी असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच या संदर्भात महसूली थकबाकी (Revenue Recovery) संदर्भात जिल्हाधिकारी यांचेसमवेत पत्रव्यवहार करण्यात आला असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

६.४१ बँका तसेच इतर शासकीय व बिगर शासकीय संस्थांकडून घ्यावयाच्या कोट्यावधी रुपयांच्या रकमापैकी बरीचशी रक्कम थकीत आहे. पोलीस कर्मचारी बाहेर दिल्यानंतर त्यांच्या अनुषंगाने वसूल करावयाच्या खर्चाच्या रकमेबाबत गृह विभाग निश्चितच कमी पडत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. शासकीय , निमशासकीय कार्यालयासंदर्भात एकवेळ समिती समजू शकते. परंतु बँकांकडून ही वसूली न करण्याचे कोणतेही कारण नाही. बँकाकडून ही रक्कम तातडीने वसूल होणे आवश्यक असताना यातही थकबाकी शिल्लक आहे. विभागाने ही सर्व वसूलीची प्रकरणे अतिशय गांभीर्याने हाताळणे आवश्यक आहे. पाच ते सात वर्षे ही वसुली जर बँकाकडून होत नसेल तर विभाग आणखी किती वर्षे केवळ पत्रव्यहार करत राहणार आहे. त्यापुढील कारवाई विभागाने करणे अभिप्रेत असताना विभागाने यासंदर्भात एकत्रित बैठक घेऊन ही थकबाकीची रक्कम निरंक करण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. या सर्व प्रकरणांमध्ये विभागाने एकत्रितरित्या तोडगा काढून तात्काळ ही वसुली या सर्व बँकाकडून तसेच संस्थांकडून करावी तसेच यात काही अडचणी असल्यास त्यातून समन्वयाने मार्ग काढावा व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.४२ परिच्छेद क्र. ७.३.४ " पोलीसांवरील खर्चाच्या सहाव्या वित्त आयोगाच्या थकबाकीची वसुली न करणे "

अभिप्राय :

दि.१ जानेवारी, २००६ पासून महाराष्ट्र शासनाने सहावा वित्त आयोग लागू केला. या संदर्भात दि.१४ जानेवारी, २०१० रोजी पोलीस महासंचालकांनी जारी केलेल्या परिपत्रक सूचनांनुसार, खाजगी व्यक्ती आणि इतर संस्थांच्या सुरक्षेसाठी तैनात केलेल्या पोलिसांच्याबाबतीत सुधारित दरामुळे निर्माण झालेल्या रक्कमेतील फरकाची वसुली, १ जानेवारी, २००६ पासून करण्याची कार्यवाही करायची होती. परंतु याबाबतीत कोणतीही कार्यवाही केली गेली नव्हती. तसेच, वसूल करायची फरकाची रक्कमही निश्चित करण्यात आली नव्हती. लेखापरिक्षणादरम्यान ती परिगणित केली असता वसुलीयोग्य फरकाची रक्कम CP पुणे येथे रु.५.८१ कोटी, SP नाशिक येथे रु.९५.२९ लाख आणि SP पुणे येथे रु.१६.३८ लाख असल्याचे निदर्शनास आले. तैनात केलेल्या पोलिसांविषयीची आवश्यक माहिती उपलब्ध नसल्याने SP सोलापूर येथे फरकाची रक्कम परिगणित करता येऊ शकली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

शिफारशी :

६.४३ सदरहू आक्षेप हे सहावा वित्त आयोग लागू झाल्यानंतर त्याअनुषंगाने करावयाच्या वाढीव खर्चाच्या फरकाच्या रकमेसंदर्भात आहे. परंतु सदरहु सहावा वित्त आयोग हा सन २००६ पासून लागू झालेला असून सहाव्या वित्त आयोगाच्या अनुषंगाने आता ही आकारणी करून फरकाची रक्कम निश्चित करून त्या शासकीय, निमशासकीय बिगर शासकीय अथवा खाजगी व्यक्तींना ही फरकाची मागणी करणे हे इतक्या वर्षानंतर योग्य ठरणार नाही. तसेच संबंधित खाजगी व्यक्ती अथवा स्वायत्त संस्था हे शुल्क भरणार देखील नाहीत. त्यामुळे या संदर्भात शासनाचे आदेश घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. वास्तविकतः अशा प्रकारे सहाव्या वित्त आयोगानुसार जर ही आकारणी वाढीव रकमेने विभागाला अनुज्ञेय ठरत होती तर ही मागणी विभागाने त्याच वेळी करणे आवश्यक होते. परंतु विभागाने ती केली नाही. महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर या बाबी विभागाच्या निदर्शनास आल्या. तसेच सदरहू आक्षेप हे केवळ नाशिक, पुणे, सोलापूर या जिल्ह्यापुरते घेतलेले आहेत. नाशिक येथील फरकाची रक्कम भरण्यात देखील आली आहे. अतः नियमानुसार अशा फरकाची रक्कम वसूलपात्र ठरत असल्यास ती वसूल करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच महालेखाकारांनी आक्षेपित केलेल्या जिल्ह्याव्यतिरिक्त अन्य जिल्ह्यांमध्ये काय कार्यपद्धती अवंलबिण्यात आली होती याचा देखील विभागाने आढावा घ्यावा व त्या-त्या वेळी जर त्या-त्या जिल्ह्यांनी सहाव्या वेतन आयोगानुसार वाढीव रक्कमेची मागणी केली असेल तर अशी मागणी सदरहू आक्षेपित जिल्ह्यांमध्ये न करण्याबाबतची चौकशी करण्यात यावी व शासन स्तरावरुन यासंदर्भात योग्य तो व्यवहार्य निर्णय घेण्यात यावा व राज्यात सर्वत्र एकसमानरित्या या तरतूदीची अंमलबजावणी होईल याची विभागाने दक्षता घ्यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.४४ परिच्छेद क्र. ७.३.५ " पोलिसांवरील खर्चाची चुकीची संगणना "

अभिप्राय :

माहे ऑगस्ट,२०११ मध्ये जारी झालेल्या शासन निर्णयानुसार अल्पोपहार भत्त्याचा समावेश पोलीस कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये केला गेला होता. पोलिसांवरील खर्चाचा दर विहित करण्यासाठी जारी केलेल्या त्यानंतरच्या परिपत्रकात देखील खर्चाचा एक भाग म्हणून अल्पोपहार भत्त्याचा समावेश केला गेला होता.अशा प्रकारे ज्या दराने पोलिसांवरील खर्च वसूल करायचा होता त्यामध्ये अल्पोपहार भत्ताही समाविष्ट होता. परंतु पुणे येथे, बँका आणि इतर शासकीय/निमशासकीय संस्थांकडून पोलिसांवरील खर्च वसूल निमशासकीय संस्थांकडून पोलिसांवरील खर्च वसूल करताना रु.३३.५२ लाख एवढ्या अल्पोपहार भत्त्याची वसुली करण्यात आली नव्हती. तसेच दि.३ जानेवारी, २००० आणि १४ जानेवारी, २०१० रोजी जारी केलेल्या परिपत्रक सुचनांनुसार, सरासरी वेतन (पदाच्या वेतनश्रेणी वर आधारित), श्रेणी वेतन, घरभाडे भत्ता, इतर भत्ते, रजा वेतन अंशदान, निवृत्ती वेतन अंशदान इत्यादीवर खर्च संगणित केला जातो. यावरुन एकाच वेतनश्रेणीतील परंतु भिन्न मूळ वेतन असणाऱ्या कोणत्याही दोन पोलिसांच्या बाबतीत पोलीस संरक्षणाचा खर्च एकच असणे आवश्यक असताना ठाणे येथील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला तैनातीसाठी पुरविण्यात आलेल्या पोलिसांनी प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या वेतनावर पोलिसांचा खर्च संगणित करण्यात आला होता, जे उपरोक्त परिपत्रकातील सुचनांशी सुसंगत नव्हते. तसेच प्रत्यक्ष प्राप्त केलेल्या वेतनावर खर्चाची वसुली केली गेल्याने जे पोलीस कर्मचारी शासकीय निवासस्थानात वास्तव्य करत होते त्यांच्या संबंधात घरभाडे भत्ता वसुल करण्यात आला नव्हता. पोलिसांवर झालेल्या खर्चाच्या चुकीच्या संगणनेमुळे झालेली कमी वसुली, आवश्यक माहिती उपलब्ध नसल्याने निश्चित करता येऊ शकली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

शिफारशी :

६.४५ सहाव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय असलेल्या आहारभत्त्याच्या फरकाच्या रकमेसंदर्भात हे आक्षेप नोंदविले आहेत. यातील पुणे येथील ३३.५२ लाख वसूलपात्र रकमेपैकी अंशतः रक्कम प्राप्त झाली असून सद्यःस्थितीत एकूण ११ लाख १५ हजार ६६० इतकी रक्कम प्रलंबित असून थकीत रक्कम वसूलीची कारवाई सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच जिल्हा ठाणेसंदर्भात केलेली परिगणना ही अत्यंत ढोबळ व दिशाभूल करणारी असल्याचे आक्षेप समितीने नोंदविले असता यासंदर्भात अद्ययावत माहिती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले. परंतु सदरहू माहिती समितीस अद्यापही अप्राप्त आहे. अतः महालेखाकारांनी आक्षेपित परिच्छेदान्वये तातडीने ही वसुली करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.४६ ७.३.६ " पोलिसांवरील वसुली योग्य खर्चाचे समायोजन "

अभिप्राय :

ठाणे महानगरपालिकेला (TMC) पुरविलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा खर्च प्रदान करताना त्यामधून रु.१.२९ कोटी मालमत्ता कराची रक्कम वजा करण्यात आली होती. तसेच नागपूर येथे महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. (MSPGCL) यांना पुरविण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवरील खर्चाची प्रतिपूर्ती करताना पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानांच्या भाडे आणि वीज यावरील खर्चाप्रित्यर्थ रु.१५.३७ लाख वजा करून रक्कम प्रदान करण्यात आली होती. मुख्य लेखाशिर्ष ००५५ अंतर्गत पोलीस जमांमधून अशाप्रकारे वजावटीस मान्यता देण्यामुळे अंदाजपत्रकात खर्चाची विभागणी लेखांकित करताना विसंगती निर्माण होईल आणि पोलीस जमा कमी प्रमाणात दर्शविल्या जातील असे आक्षेप महालेखाकारांनी नमूद केलेले आहेत.

शिफारशी :

६.४७ महालेखाकारांनी सदरहू आक्षेप ठाणे व नागपूर करिता नोंदविले असून ठाणे संदर्भात सदरहू वसूलपात्र रकमेचे ठाणे महानगरपालिकेला पोलीस दलाच्या वसाहती, पोलीस स्टेशनच्या मालमत्ता करापोटी ठाणे महानगरपालिकेला देय असलेली रक्कम वजा केल्याचे कळविले आहे. व या प्रकरणी ठाणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच नागपूर येथील थकीत वसुलीबाबत विभागाने लेखी उत्तरामध्ये दिलेली माहिती अत्यंत मोघम व संदिग्ध स्वरुपाची असल्याने अद्ययावत माहिती समितीने सादर करण्यासाठी विभागास कळविले आहे. परंतु अद्यापही ही माहिती समितीस अप्राप्त आहे. अतः या दोन्हीही आक्षेपित प्रकरणी विभागाने तातडीने वसुली अथवा समायोजनाची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच समायोजनाची कार्यवाही करताना विहित कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा व अंदाजपत्रकात खर्चाची विभागणी लेखांकीत करताना विसंगती निर्माण होणार नाही याचीही दक्षता घेण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीस शिफारस आहे.

६.४८ ७.३.७ " रोकड व्यवस्थापनातील अनियमितता "

अभिप्राय :

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम क्रमांक ८ (१) नुसार शासकीय अधिकाऱ्यांनी प्राप्त केलेली किंवा त्यांच्याकडे जमा करण्यात आलेली संपूर्ण रक्कम त्यांनी दोन दिवसात कोषागार/बँक यामध्ये जमा करणे आवश्यक होते. तसेच, नियम ९८(२) नुसार प्रत्येक आर्थिक व्यवहाराची नोंद रोकड पुस्तिकेत त्वरीत घेणे आवश्यक असते आणि प्रत्येक दिवसाअखेर रोकड पुस्तिकेचा ताळेबंद घेऊन ते कार्यालय प्रमुखांकडून स्वाक्षांकित करून घेणे आवश्यक असते. परंतु नागपूर आणि अमरावती येथे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (CVC) प्रदान करण्यासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कापोटी प्राप्त झालेले अनुक्रमे रु.१७,७०० आणि रु.१,०८० रुपयांचे धनाकर्ष (DD), निर्धारित बँकांमध्ये मुदत उलटून गेल्यावर जमा करण्यात आल्याने ते वटवता आले नव्हते. तसेच हे DD पुर्नविधीग्राह्यतेसाठी संबंधित व्यक्तींना पाठवले गेले नव्हते.

तसेच नागपूर कार्यालयातील वाहतूक विभागात चार प्रकरणांमध्ये वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींकडून वसूल केलेल्या रु.७५,००० रोकड रक्कमेचा भरणा करण्यात जवळजवळ ११७ दिवसांचा विलंब झाला होता. ज्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी रक्कमा प्रत्यक्षपणे स्वीकारली होती त्यांच्याकडून तिचा भरणा करण्यात विलंब झाल्यामुळे असे घडले होते. तसेच अमरावती येथे दोन प्रकरणांत वसूल केलेल्या रु.५६,२०३ रक्कमेची रोकड पुस्तिकेत नोंद घेण्यात अनुक्रमे तीन आणि सात दिवसांचा विलंब झाला होता. तसेच, नऊ प्रकरणांत रुपये ८९,४३१ रक्कमेचा शासकीय कोषागारात भरणा करण्यात ६ ते १७ दिवसांचा विलंब झाला होता. अमरावतीच्या आशेगाव पोलिस ठाण्यात २३ ते २६ दिवसांच्या विलंबाने शासकीय कोषागारात रक्कमेचा भरणा करण्यात आल्याची प्रकरणे आढळून आली.

ठाणे येथे प्राप्त झालेल्या सर्व DD एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीनंतर कोषागारात भरणा करण्यात आला होता. तसेच रु.१,६०० किंमतीच्या १२ DD च्या बाबतीत संबंधित रक्कम कोषागारात भरण्यात आल्याच्या पुष्ट्यर्थ अभिलेख्यांमध्ये चलन उपलब्ध नव्हते. भाईंदर पोलिस ठाण्यात तीन ते २९ दिवसांच्या विलंबानंतर रक्कम शासकीय लेख्यांमध्ये भरण्यात आली होती. तसेच औरंगाबाद येथे जून, २०१२ नंतर कोषागारात जमा करण्यात आलेल्या रक्कमेचे चलन जरी उपलब्ध होते तरी रोकड पुस्तिका ठेवली जात नव्हती. रोकड पुस्तिका उपलब्ध नसल्याने, संबंधित व्यक्तींकडून प्राप्त झालेले सर्व DD कोषागारात भरले गेले तसेच लेखांकित केले गेले अथवा नाही याची पडताळणी होऊ शकली नाही. तसेच नांदेड येथेही प्राप्त झालेल्या DD चा शासकीय लेख्यांमध्ये भरणा करण्यात २९ ते १२९ दिवसांचा विलंब झाला होता. तसेच सोलापूर यांच्या कार्यालयातील चारित्र्य पडताळणी विभागात रोकड पुस्तिका, चलन नोंदवही आणि पावती पुस्तिका ठेवली जात नसल्यामुळे जमा केलेल्या रक्कमेचे योग्य प्रकारे लेखांकन केले जात नव्हते. तसेच पुणे येथे CVC जारी करण्यासाठी आकारलेल्या रु.३.४९ लाख रक्कमेची नोंद रोकड पुस्तिकेत घेण्यात आली नव्हती. तसेच महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ अंतर्गत अनिवार्य असल्याप्रमाणे रोकड पुस्तिकेतील रोख शिल्लकीची पडताळणी आणि प्रमाणीकरण केले गेले नव्हते. त्याचप्रमाणे रोकड पुस्तिकेत काही ठिकाणी उपरिलेखन आणि खाडाखोड करण्यात आली होती ज्यास कार्यालय प्रमुखांनी स्वाक्षांकित केले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

शिफारशी :

६.४९ सदरहू आक्षेप हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून आर्थिक शिस्तीला धरुन नसून वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारे आहेत. महालेखाकारांनी आक्षेपित केलेली सर्व प्रकरणे ही रोकड व्यवस्थापनातील त्रुटी दर्शविणारी असून नियमानुसार हे लेखे अद्ययावत न केल्यामुळे सार्वजनिक निधीत अफरातफर अथवा गैरव्यवहार झाल्याचा धोका निश्चितच संभवतो व ही शक्यता नाकारता येणार नाही. या सर्व रोकड व्यवस्थापनामध्ये मोठया प्रमाणात त्रुटी व अनियमिततेमुळे महालेखाकारांनी गंभीर आक्षेप नोंदविले असून या सर्व त्रुटींचा थेट परिणाम हा विभागाकडे प्राप्त होणाऱ्या महसूलावर निश्चितच झालेला आहे. तसेच काही प्रकरणांमध्ये अनियमितताच झालेली असून शिस्तभंगविषयक कार्यवाही देखील प्रस्तावित करण्यात आली आहे. तर काही ठिकाणी केवळ खुलासे घेण्याची कार्यवाही करून प्रकरण मिटविण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. तर काही ठिकाणी केवळ समज देऊन विषय मिटविण्यात आला आहे. तर काही ठिकाणी विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. महालेखाकारांनी आक्षेप घेतलेल्या या सर्व प्रकरणांमध्ये निश्चितच गैरव्यवहार झालेला असण्याची पूर्ण शक्यता लक्षात घेता या सर्व बाबींची विभागाने चौकशी करावी व सर्व संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच या परिच्छेदांतर्गत वसूलपात्र रकमेची तात्काळ वसुली करण्यात यावी. विभागाने हे लेखे अद्ययावत करावे व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व संपूर्ण वित्तीय कामकाज हे अद्ययावत संगणकीय अज्ञावलीच्या माध्यमातून करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.५० परिच्चेद क्र. ७.३.८ " पावती पुस्तके पाठवणे आणि परत मिळवणे यावर अपुरे नियंत्रण "

अभिप्राय :

प्रचलित पद्धतीनुसार, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड आणि शास्ती जमा करण्यास प्राधिकृत केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना (वाहतूक) दंड आणि शास्ती वसूल करण्यासाठी पावती पुस्तके दिली जातात. दंड आणि शास्ती जमा केल्यावर ती रक्कम कोषागार /बँक यामध्ये भरणे आवश्यक होते आणि पावती पुस्तक संपल्यावर त्यांचे लेखांकन करण्यासाठी आणि ती सुरक्षित ठेवण्यासाठी ती जिल्हा वाहतूक मुख्यालयाकडे पाठविणे आवश्यक होते. पावती पुस्तक देणे आणि ती परत प्राप्त होणे यावर एका नोंदवहीद्वारे संनियंत्रण ठेवायचे होते. परंतु नागपूर आणि ठाणे येथे पावती पुस्तिका देताना त्या घेणाऱ्याकडून त्याची पोच घेण्यात आली नव्हती, पूर्ण झाल्यावर पावती पुस्तिका परत देण्यात आल्या नव्हत्या तसेच आधी देण्यात आलेली पावती पुस्तके प्राप्त करण्याआधीच नवीन पावती पुस्तके देण्यात आली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

शिफारशी :

६.५१ महालेखाकारांनी सदरहू आक्षेपित बाबी अतिशय गंभीर स्वरुपाच्या असून पावती पुस्तिका घेणे आणि परत प्राप्त करणे यावरील संनियंत्रणाच्या अभावामुळे शासकीय महसूलाचा गैरवापर होण्याची पूर्व संभावना आहे. अशा कार्यपद्धतीमुळे या पावती पुस्तकाच्या माध्यमातून निश्चितच गैरव्यवहार होण्याची पूर्ण शक्यता आहे. अतः या प्रकरणांची विभागाने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.५२ परिच्छेद क्र. ७.३.९ " कोषागारातील नोंदी बरोबर जमांचा ताळमेळ न घेणे "

अभिप्राय :

महाराष्ट्र कोषागार नियमांतील नियम क्र.९८(२) (V) मधील तरतुदीनुसार शासकीय अधिकाऱ्यांनी शासनाच्या वतीने प्राप्त केलेल्या आणि कोषागारात जमा केलेल्या सर्व रकमेचा संबंधीत कोषागार अधिकाऱ्यांनी लेखांकित केलेल्या आकडेवारी बरोबर ताळमेळ घेऊन त्याची नोंद ठेवणे आवश्यक होते.

आठ CP (अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, सोलापुर आणि ठाणे) आणि सहा SP (अमरावती, औरंगाबाद, नांदेड, पुणे, सोलापूर आणि ठाणे) यांच्या कार्यालयात एकदाही ताळमेळ घेतला गेला नव्हता. तसेच ज्या तीन CP (मुंबई, सोलापूर आणि ठाणे) आणि SP ठाणे मध्ये ताळमेळ घेतला गेला होता. तिथे एकुण रु.६.०४ कोटींची जमा लेखांकित न झाल्याचे संबंधीत कोषागाराने कळविले होते. हे निदर्शनास आणुन दिल्यावर CP मुंबई यांनी जून, २००८ ते ऑगस्ट, २००८ या कालावधीचा ताळमेळ करून घेतल्याचे व वाहतुक विभागाशी संबंधीत रु.७९.५९ लाख जमेचे लेखांकन करून घेतल्याचे समितीला कळविले.

शिफारशी :

६.५३ (१) विभागाने भरणा केलेल्या रक्कमेचा कोषागाराच्या नोंदी बरोबर ताळमेळ न घेतल्याने विभागामध्ये रोख रकमेचा गैरवापर होण्याचा धोका उद्‌भवतो. खर्चाचा नियमित ताळमेळ करणे विभागावर बंधनकारक असताना खर्चाचा ताळमेळ न घेणे ह्या बाबी आर्थिक शिस्तीला धरुन नसून वित्तीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आहेत. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत असून विभागाने प्रशासकीय व आर्थिक शिस्त निश्चितच जपावी व भविष्यात असे आक्षेप टाळावे तसेच अस्तित्वात असलेली यंत्रणा अधिकाअधिक अद्ययावत, पारदर्शक व नियमानुसार कार्यरत करण्यासाठी योग्य तो प्रयत्न करण्यात यावा तसेच ठाणे, औरंगाबाद, अमरावती, सोलापूर, अमरावती (ग्रामीण) नांदेड, पुणे या सर्व ठिकाणाची खर्चाच्या ताळमेळाची सद्यःस्थिती काय याबाबतची माहिती समितीस सादर करण्यात येईल असेही समितीस आश्वासित करण्यात आले परंतु ती आश्वाासित माहिती समितीस प्राप्त झाली नाही. अतः विभागाने या सर्व बाबींचा आढावा घेऊन, खर्चाचा ताळमेळ पूर्ण करून समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

६.५४ (२) गृह विभागाच्या या संपूर्ण परिच्छेदांवर समितीने विस्तृत साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, इतर राज्यांमध्ये तैनात केलेल्या एस.आर.पी.एफ.जवानांसंबंधी माहिती पोलीस महासंचालक कार्यालयात उपलब्ध नव्हती. याबाबतीत कोणतीही नोंदवही त्या कार्यालयाने ठेवली नव्हती.पुढे, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक कार्यालयांच्या कार्यकक्षेत तैनात केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवरील खर्चाच्या वसुलीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी मागणी आणि संकलन नोंदवह्या ठेवल्या जात नव्हत्या. प्रवर्ग निहाय तैनात केलेले पोलीस कर्मचारी, केलेली मागणी, वसुल रक्कम, वसूल करावयाची उर्वरित रक्कम इत्यादी तपशिल विभागाकडे उपलब्ध नव्हता. परिणामी, एकूण प्रलंबित वसुली, केलेली मागणी, केलेला पाठपुरावा इत्यादी निर्धारण करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती, तैनात केलेले पोलीस कर्मचारी आणि तैनातीवरील खर्चाची वसुली यांची एकत्रित माहिती प्राप्त होऊ शकली नाही. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षाच्या महसुली जमेच्या अहवालात वरील त्रुटींचा उल्लेख करण्यात आला होता. तरीही सातत्याने अनियमितता घडत आहेत. संनियंत्रण तसेच पोलिसांवरील खर्चाची वसुली करण्यासाठी समयोचित पाठपुराव्याच्या अभावामुळे मोठया प्रमाणात थकबाकीचा संचय झाला. गृह विभागासारख्या शिस्त अपेक्षित असलेल्या विभागाकडून अशाप्रकारे बेशिस्त कारभार नक्कीच शोभनीय नाही. महालेखाकारांनी नोंदविलेले उपरोक्त सर्व आक्षेप विभागांतर्गत नियोजन, नियंत्रण व समन्वयाचा अभाव दर्शविणारे असून विभागाच्या कोटयावधी रुपयाच्या महसूलाचे नुकसान करणारे आहे. या सर्व आक्षेपातून विभागाने योग्य तो बोध घेऊन त्याअनुषंगाने भविष्यातील कार्यपद्धतीचे नियोजन करावे, त्यावर योग्य ते नियंत्रण ठेवावे व आर्थिक बाबींशी निगडीत व्यवहार शक्यतो मानवी हस्तक्षेपाशिवाय व अद्ययावत संगणकीय कार्यप्रणालीच्या आधारे करण्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी व या आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी. तसेच विभागाने त्यांचेकडे प्राप्त होणाऱ्या महसूलाबाबत सजग व सतर्क राहावे. तसेच सदरहु परिच्छेदांतर्गत विषयांमध्ये द्यावयाच्या पोलिसांसंदर्भात पोलीस सुरक्षा बल स्वतंत्ररित्या निर्माण करणेबाबतच्या शक्यतांची पडताळणी करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा. जेणेकरून नियमित पोलीस दलाचा यासाठी वापर करणे विभागास टाळता येईल अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

परिशिष्ट VI

कब्जा हक्क मूल्याची कमी आकारणी बाबतचे विवरण
(संदर्भ: परिच्छेद 4.2.4.2)

(राशि ₹ मध्ये)

[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible] (चौरस मीटर मध्ये)	[illegible] ASR [illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11
1	जमीन33/2008/ पीके/22/जे-6 दिनांक 31.08.09	प्रवरा फळे बागायत उत्पादन प्रक्रिया संस्था, लोणी, खुर्द	मौजा-खडकेवाके तालुका- रहाता गट न.416	1,30,200	150-प्रति वर्गमीटर	भोगवटा	फळ प्रक्रिया व्यवसाय	24,78,750	10000X75X70% = 5,25,000 1,20,200X75X60% = 54,09,000 एकूण: 59,34,000 50% of 59,34,000 = 29,67,000	4,88,250
2	---	कार्यकारी अभियंता, एमएसईबी, नाशिक	मौजा-येसगांव तालुका-कोपरगांव गट नं. 2/2/1	6,000	180	भोगवटा	वाणिज्यिक	3,96,000	4,000X90X90%= 3,24,000 2000X90X80%=1,44,000 एकूण: 4,68,000	72,000
3	---	कार्यकारी अभियंता, एमएसईबी, संगमनेर	मौजा-करंजी(बु) तालुका-कोपरगांव गट नं. 604	6,000	180	भोगवटा	वाणिज्यिक	2,88,000	4,000X90X90% = 3,24,000 2,000X90X80% = 1,44,000 एकूण: 4,68,000	1,80,000
4	3607/423/पीकेएस-227/जे-5 दिनांक:12.5.09	एपीएमसी, पलुस	पलुस 279/1	20,000	340	भोगवटा	बाजार क्षेत्रात विस्तार	4,75,000	10,000X170X60% = 10,20,000 10,000X170X50% =8,50,000 एकूण: 18,70,000	13,95,000

परिशिष्ट VI (पुढे चालू)

1	2	3	4	5	6	7	8	9	10	11
5	जमीन-3609/ यूओआर2653/ पीकेएस/276/जे-5 दिनांक:01.07.09	एमएसआरटीसी,पलुस	पलुस 160	15,000	340	भोगवटा	बस स्थानक	2,86,500	10,000X170X60%=10,20,000 5,000X170X50% = 4,25,000 एकूण: 14,45,000	11,58,500
6	जमीन-3697/191/पीकेएस-513/जे-5 दिनांक 23.08.07	बीएसएनएल, तासगांव	तासगांव 129/A/1	4,000	270	भोगवटा	टॉवर	6,54,400	2,000X270X80% = 4,32,000 2,000X270X70% = 3,78,000 एकूण = 8,10,000 (8,10,000 - 30,000++) = 7,80,000 (अ) =7,80,000 वर आकारणीय व्याज 2008 - 7,80,000X12.75%=99,450 2009 - 7,80,000X12.25%=95,550 2010 - 780000X11.75%=91650 2011 - 7,80,000X12.50%=97,500 2012 - 7,80,000X14.75%=1,15,050 2013 - 7,80,000X12.50%X6/12 = 48,750 एकूण= 5,47,950 (ब) एकूण (अ+ब) =13,27,950	6,73,550
					एकूण			45,78,650	85,45,950	39,67,300

(+) वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार (ASR) दर. सिद्धगणकाच्या सूचना क्र.30 अनुसार स्तंभ 10 मध्ये नमूद केलेल्या बाजार मूल्य निर्धारणासाठी स्तंभ 6 मध्ये दर्शविलेल्या दराच्या 50 टक्के विचारात घेतले आहे.

(++) ₹ 30,000 अगोदरच ताबा घेतेवेळी भुगतान केले.

परिशिष्ट VII

भाडेपट्टा दराची कमी वसुली दर्शविणारे विवरण पत्र

(संदर्भ: परिच्छेद 4.2.4.3)

(राशि ₹ मध्ये)

अ.क्र.	शासन आदेश क्र.	कोणाला वाटप केले	सीटीएस/गट क्र.	क्षेत्रफळ	वर्ष	बाजार मूल्य	आकारणीय भाडेपट्टा दर	वसूल करण्यात आलेले भाडेपट्टा दर	कमी वसूल करण्यात आलेले भाडेपट्टा दर
1.	3607/250/ पीकेएस 221/जे -5, दिनांक: 22-10-2008	एपीएमसी, तासगांव	तासगांव 60/1A, 61, 63, 71/1A, 72	1,17,700	2008	10,000X110X70% = 7,70,000 1,07,700X110X60% = 71,08,200 एकूण = 78,78,200	78,78,200X12.75% = 10,04,471	0	10,04,471
					2009	-- वरील प्रमाणे --	78,78,200X12.25% = 9,65,080	0	9,65,080
					2010	-- वरील प्रमाणे --	78,78,200X11.75% = 9,25,689	0	9,25,689
					2011	-- वरील प्रमाणे --	78,78,200X12.50% = 9,84,775	0	9,84,775
					2012	-- वरील प्रमाणे --	78,78,200X14.75% = 11,62,035	0	11,62,035
					2013	-- वरील प्रमाणे --	78,78,200X14.50% = 11,42,339	0	11,42,339
			एकूण				61,84,389	0	61,84,389
2.	जमीन-3407/810/ पीकेएस - 24 /जे - 5 दिनांक:20-06-09	एसएसआरटी सी, पलूस	पलूस 9	350	2009	1,900X350 = 6,65,000	6,65,000X12.25% = 81,463	29,155	52,308
					2010	-- वरील प्रमाणे --	6,65,000X11.75% = 78,138	0	78,138
					2011	-- वरील प्रमाणे --	6,65,000X12.50% = 83,125	0	83,125
					2012	-- वरील प्रमाणे --	6,65,000X14.75% = 98,088	0	98,088
					2013	-- वरील प्रमाणे --	6,65,000X14.50% = 96,425	0	96,425
			एकूण				4,37,239	29,155	4,08,084
			एकूण बेरीज				66,21,628	29,155	65,92,473

परिशिष्ट VIII

कमी वसुली झालेले अनर्जित उत्पन्न दर्शविणारे विवरण

(संदर्भ: परिच्छेद 4.2.7.1)

(राशि ₹ मध्ये)

अ.क्र.	विक्रेत्याचे नाव	सर्वे/गट क्र.	विकलेली जागा (हेक्टर मध्ये)/ कारण	आयुक्तांचे आदेश क्र आणि तारीख	दस्तावेज क्र./वर्ष	बाजार मूल्य	मोबदला	वसूली झालेले अनर्जित उत्पन्न	भूधारकाद्वारे आधीच भरणा झालेले कब्जा हक्क मूल्य	आकारणीय अनर्जित उत्पन्न	अनर्जित उत्पन्नाची कमी वसूली (स्तंभ 11 - स्तंभ 10)
1	2	3	4	6	6	7	8	9	10	11	12
मेसर्स झाफझा मुंबई व्यापार पार्क (इंडिया) प्रायवेट लिमिटेड											
1	खारूभाई हीरामन कांबळे आणि 5 अन्य	पिसर्वे 23/0आणि 24/0	1-14-8 0-18-0 अ-कृषिक	एमएस/के-2/जमीन - 2/सीआर- 398 ते 413 दिनांक-25-03-10	4562/ 2010	55,78,000	74,70,000	--	--	4,00,25,156	4,00,25,156
2	बुध्य के. म्हात्रे	पिसर्वे 25/1	0.40 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4517/ 2010	14,28,000	20,50,000				
3	नाथा यू. म्हात्रे आणि 4 अन्य	पिसर्वे 25/2	0.735 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4566/ 2010	3,67,500	41,34,375				
4	कृष्णा सी. म्हात्रे	पिसर्वे 26/2	0.41 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4518/ 2010	4,92,000	27,16,250				
5	नारायण सी. कांबळे	पिसर्वे 31/0	0.579 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4559/ 2010	18,77,800	32,56,875				

परिशिष्ट VIII (पुढे चालू)

1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
6	बाबुराव के. कांबळे	पिसर्वे 32/0 आणि 33/0	0.993 0.845 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4522/ 2010	51,02,160	99,98,625				
7	बलराम के. पाटिल	पिसर्वे 38/3	0.432 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4521/ 2010	14,25,000	24,03,000				
8	हरिश्चंद्र ए. कांबळे	पिसर्वे 16/0	0.80 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4524/ 2010	23,52,000	54,00,000				
9	गणेश आर. कांबळे	पिसर्वे 49/2(1)	0.45 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4516/ 2010	18,90,000	27,56,250				
10	भरत ए. पाटील	पिसर्वे 68/0	0.456 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4526/ 2010	5,52,000	27,31,875				
11	जनार्दन डी. पाटील	पिसर्वे 89/2	0.40 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4525/ 2010	4,80,000	23,50,000				
12	इस्माईल ई. शेख आणि 7 अन्य	धनसार 66/बी/6	0.878 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4527/ 2010	10,44,000	42,80,250				
13	केन्द्रया यू. तारे	तुर्भे 22/1	0.35 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4520/ 2010	10,80,000	13,78,125				
14	गजानन यू. तारे	तुर्भे 22/2	0.31 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4523/ 2010	9,64,800	12,20,625				

परिशिष्ट VIII (पुढे चालू)

1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
15	बळीराम यू. तारे	तुर्भे 22/3	0.31 अ-कृषिक	-- वरील प्रमाणे --	4519/ 2010	9,64,800	12,20,625				
			एकूण			2,55,98,060	5,33,66,875			4,00,25,156	4,00,25,156
				करनाला महिला रेडिमेड गारमेंट आणि वस्त्र उद्योग औद्योगिक सहकारी संस्था							
1.	श्री मधुकर एम. भोयर	सरसई 59/2	5.07 अकृषक	एमएसके-2/जमीन-2/सीआर-651/2010 दिनांक : 21.04.12	2267/ 2008	65,30,160	1,53,41,000	--	--	1,15,05,750	1,15,05,750
			एकूण			65,30,160	1,53,41,000	--	--	1,15,05,750	
			एकूण बेरीज			3,21,28,220	6,87,07,875			5,15,30,906	

परिशिष्ट IX

अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली दर्शविणारे विवरण पत्र

(संदर्भ: परिच्छेद 4.2.7.2)

(राशि ₹ मध्ये)

अ.क्र.	विक्रेत्याचे नाव	खरेदीदाराचे नाव	गाव/गट क्र.	विकलेली जागा (हेक्टर मध्ये) प्रकार	उपनिबंधकांचे आदेश क्र. व दिनांक	दस्तऐवज क्रमांक	बाजार मूल्य	मोबदला	वसुली केलेले अनर्जित उत्पन्न	शासनाद्वारे नामांकित भावाप्रमाणे जमीन किंमत मूल्य	आकारणीय अनर्जित उत्पन्न	अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली (स्तंभ 12 - स्तंभ 10)
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
1	श्यामराव टी. भोगम	अर्पना व्ही. रेडेकर	वड्डवाडी, करवीर 27-A/22	3.19 कृषि	जमीन/के/एसआर/89 दिनांक 03/09/07	5941/ 2007	7,65,600	2,00,000	1,11,400	0	3,82,800	2,71,400
2	बृहस्पति एस. भोसले	जितेन्द्र व्ही गायकवाड	वड्डवाडी, करवीर 27/4	3.19 कृषि	जमीन/के/एसआर/202दिनांक 30/12/09	1432/ 2010	7,66,000	8,00,000	1,91,400	0	4,00,000	2,08,600
3	लक्ष्मण कांबळे	गोपाल एस. पाटील	गिरगाव 1499	0.66 कृषि	जमीन/के/एसआर/245 दिनांक 21/09/2010	6888/ 2010	1,77,540	2,00,000	48,180	0	1,00,000	51,820
4	श्रीमती शताबाई ए. कांबळे	आनंद आर. करीम	नेर्ली करवीर 201-ए, 202, 304	5.47 9.88 7.36 कृषि	जमीन/के/एसआर/175, 177 & 178 दिनांक19/12/2008	438/2009	78,67,200	1,34,10,000	39,33,600	0	67,05,000	27,71,400
5	हिन्दराव ई. धंगे	भाग्यश्री जे. पाटील	हणबरवाडी करवीर 407	0.33 कृषि	जमीन/के/एसआर/282 दिनांक 24/12/2010	2/2011	1,23,000	1,23,000	30,291	0	61,500	31,209

परिशिष्ट IX (पुढे चालू)

1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
6	श्रीपती एच. ढाले	श्रीमती उमा अरुण पाटील	नेर्ली करवीर 195-ए	6.25 कृषि	जमीन/के/एसआर/174 दिनाक 19/12/2008	439/ 2009	66,26,400	1,12,95,000	33,13,200	0	56,47,500	23,34,300
7	परशुराम डी. ढाले	श्रीमती उमा अरुण पाटील	नेर्ली करवीर 199	8.81 कृषि	जमीन/के/एसआर/176 दिनाक 19/12/2008							
8	कैरबा डी. कांबळे	श्यामराव जी. राजगिरे	हणबरवाडी करवीर 61	0.795 कृषि	जमीन/के/एसआर/173 दिनाक 15/11/2008	6203/ 2008	2,06,700	2,10,000	47,700	0	1,05,000	57,300
9	दीपक पी. उगारे	प्रफुल्ल आर. शाह	तामगांव, करवीर 111	6.67 कृषि	जमीन/के/एसआर/256 दिनाक 27/12/2010	486/ 2011	27,51,375	28,50,000	9,82,991	0	14,25,000	4,42,009
10	कृष्णकांत डी सरनाईक	शेखर बी. राणे	कळंबे चे करवीर 357-बी	0.41 कृषि	जमीन/के/एसआर/150 दिनाक 07/08/2008	2987/ 2008	3,47,475	75,000	1,15,825	0	1,73,738	57,913
11	प्रकाश अरविंद कुलकर्णी पॉवर टुल्स	तेसीतीरा मॉटी (आई) प्राईवेट लिमिटेड	तामगाव, करवीर 139	4.00 अकृषक	जमीन/के/एसआर/139 दिनाक: 09/04/2008	1450/ 2008	71,40,000	1,33,33,330	14,25,000	0	99,99,998	85,74,998
12	रामचंद्र एस. फाल्के	सचिन आर. झावर	तामगांव, करवीर 665	1.50 कृषक	जमीन/के/एसआर/295 दिनाक30/11/2011	19/2012	24,85,000	25,00,000	8,38,637	0	12,50,000	4,11,363
13	श्रीकांत ए. संकपाल	जोतीराम जे. गुजर	शिंगणापूर करवीर 78	0.23 अकृषक	जमीन/के/एसआर/214दिनांक: 30/12/2009	908/ 2010	1,47,000	1,50,000	60,375	0	1,12,500	52,125
14	रंगराव एस. चौहान	सागर डी. रठार	शिंगणापूर करवीर 79/2	3.01 अकृषक	जमीन/के/एसआर/134 दिनांक: 17/04/2008	14 दस्तावेज	12,47,615	13,20,000	7,90,125	0	9,90,000	1,99,875

परिशिष्ट IX (पुढे चालू)

1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
15	भाऊ बी. संकपाल	नागेश एस. दिगनकर	शिंगणापूर करवीर 78	0.46 अकृषक	जमीन/के/एसआर/230 दिनांक	2925/ 2009	12,57,670	12,50,000	1,26,788	0	9,43,252	8,16,464
16	कृष्णा भाऊ मांग	सर्जेराव बी. पाटील	खुपीरे ते करवीर 1898	0.50 अकृषक	जमीन/के/एसआर/24 दिनांक 07/08/2008	2603/ 2008	2,78,190	2,78,190	63,750	0	1,39,095	75,345
17	धोंडी टी. संकल	नागेश एस. दिगनकर	शिंगणापूर करवीर 78	0.46 अकृषक	जमीन/के/एसआर/229 दिनांक17/02/2009	2929/ 2009	12,57,670	8,50,000	1,26,788	0	9,43,252	8,16,464
18	बाजीराव एम. सांकपाळ	शिवाजी एस. शिंदे	शिंगणापूरकरवीर 78/1	0.46 अकृषक	जमीन/के/एसआर/107दिनांक10/04/2008	11 दस्तावेज	7,39,305	8,05,000	1,20,750	0	6,03,750	4,83,000
19	श्रीमती सिरबाई एन. कांबळे	प्रदीप पी. इंगोले	शिंगणापूर करवीर 75	0.46 अकृषक	जमीन/के/एसआर/106 दिनांक: 08/04/2008	17 दस्तावेज	15,81,111	13,08,830	1,20,750	0	1185833	10,65,083
20	विश्वास बी. सांकपाळ	शिवाजी एस. शिंदे	शिंगणापूरकरवीर78 ,70/17	0.13 0.32 अकृषक	जमीन/के/एसआर/105 दिनांक: 02/04/2008	8 दस्तावेज	5,36,410	6,40,000	1,18,125	0	4,80,000	3,61,875
21	आनंदराव एस. चौहान	चंद्रकांत बी. कोरे	शिंगणापूर करवीर 79/1	3.10 अकृषक	जमीन/के/एसआर/88 दिनांक: 01/09/2007	55 दस्तावेज	42,06,991	46,01,018	6,78,960	0	34,50,764	27,71,804
22	शंकर बी. पाटील	संग्राम व्ही. शेवले	हलासवाडी करवीर 467, 520,571, 572	16.33 कृषि	जमीन/के/एसआर/217 दिनांक :31/12/2009	5 दस्तावेज	41,74,500	52,32,081	15,30,938	0	26,16,041	10,85,103
23	श्रीमती बालाबाई व्ही. यादव	रितु आर. देवेकर	करवीर 1372/2	1.86 कृषि	जमीन/के/एसआर/168दिनांक26/08/2008	5200/ 2008	27,64,974	21,15,000	10,55,550	0	13,82,487	3,26,937

परिशिष्ट IX (पुढे चालू)

1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
24	वसंत डी. पालके	श्रीमती ज्योत्स्ना डी. शिंदे	ननदवाल करवीर 522	2.00 कृषि	जमीन/के/एसआर/62 दिनांक :31/10/2007	54/ 2008	2,90,000	2,90,000	1,20,000	0	145000	25,000
25	संदीप आर. मिरजे	अनीता डी. पवार	मुदशिंगी करवीर 330/ B-5	1.60 कृषि	जमीन/के/एसआर/116 दिनांक : 31/12/2007	3164/ 2009	15,39,000	7,84,000	3,90,400	0	7,69,500	3,79,100
26	मुरारी एस.पाटिल	दयानंद वी. शिंदे	गिजावणे गडहिंग्लज 147/2/1	0.20 अकृषक	कक्ष-3/एसआर/53/08 दिनांक : 05/03/08	2013/ 2008	9,46,920	10,20,000	0	0	7,65,000	7,65,000
27	राजाराम एल. तोडकर	शालन एच. कोंड्स्कर आणि इतर	गिजावणे गडहिंग्लज 147/1	0.80 अकृषक	जमीन/के/एसआर/249 दिनांक : 21/9/2010	14 दस्तावेज	29,54,000	29,55,000	99,750	0	22,16,250	21,16,500
28	मारुती वी. कांबळे	वंदना ए. केसरकर	गिजावणे गडहिंग्लज 147/5	1.52 अकृषक	जमीन/के/एसआर/179 दिनांक17/12/2008	1258/ 2010	21,28,500	21,28,500	1,51,800	0	15,96,375	14,44,575
29	राजमहम्मद एच. नदगावे	अलकाताई एस. तिवाले	कळंबे करवीर 123-B/6	1.70 कृषि	जमीन/के/एसआर/198दि नांक: 21/12/2009	288/ 2010	10,14,885	10,15,000	3,83,040	0	5,07,500	1,24,460
30	आनंदा एन. पाटील	भूषण एम. राऊत	उजलाईवाडी करवीर 183	0.42 अकृषक	जमीन/के/एसआर/197 दिनांक: 31/03/2009	4123/ 2009	21,24,800	27,00,000	19,00,800	0	20,25,000	1,24,200
31	प्रकाश पादू गायकवाड	कैलाश एस. सुर्वे	वाकाडी पनवेल 35, 38	1.944 कृषि	एलबी/कक्ष-2/जमीन-2/सीआर- 630 दिनांक : 07-09-2012	12587/ 2012	18,38,000	1,27,00,000	23,32,775	0	63,50,000	40,17,225

परिशिष्ट IX (पुढे चालू)

1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13
32	सुरेश आर. ताब्वेकर	दीपक एस. गोसर	वारवाई पनवेल 92/3	1.06 कृषि	एलबी/कक्ष-2/जमीन-2/सीआर- 283 दिनांक: 12-11-2009	1057/ 2010	21,50,000	50,00,000	6,35,862	0	25,00,000	18,64,138
33	श्रीमती जैनाबाई यू. पटेल	अशोक बी. ठागेड	कोप्रोली पनवेल 27/1a	0.283 अकृषक	एलबी/कक्ष-2/जमीन-2/सीआर-253 दिनांक13-07-2009	6263/ 2009	28,30,000	45,00,000	2,83,290	0	33,75,000	30,91,710
34	श्रीमती यमुना के. वाघे	सूर्यकांत एस. वाडकर	मोरबे पनवेल 195/2	0.22 अकृषक	एलबी/कक्ष-2/जमीन-2/सीआर-486 दिनांक : 23-08-2010	4874/ 2012	3,19,500	1,49,490	1,12,118	0	2,39,625	1,27,507
35	आईजैक मोजेस शाहपुरकर	राजेश पी. गायकवाड	रेवदांडा अलीबाग 122, 1a,b	0.316 कृषि	एलबी/कक्ष-2/जमीन-2/सीआर-117 दिनांक : 1-08-2007	3911/ 2007	2,85,000	4,75,000	94,138	0	2,37,500	1,43,362
36	अरसलान एफ. तैयबजी	दीपक एन. दरयानी	विहीम अलीबाग 992	0.101 कृषि	एलबी/कक्ष-2/जमीन-2/सीआर- 199 दिनांक : 11-11-2008	5535/ 2008	1,56,000	17,00,000	1,30,290	0	8,50,000	7,19,710
37	नवीनचंद्र आर. आचरेकर	श्रीमती अंजली व्ही. तलवार	टोकवाडे अलीबाग 263	0.77 कृषि	एलबी/कक्ष-2/जमीन-2/सीआर-112 दिनांक : 13-01-2010	244/ 2010	28,37,550	16,00,000	13,76,500	0	14,18,775	42,275
एकूण							6,88,61,881	10,05,63,439	2,38,41,886		6,20,93,035	3,82,51,149

१६०

परिशिष्ट X

आकारणीय मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी चे तपशील दर्शविणारे विवरण पत्र

(संदर्भ: परिच्छेद - 4.2.8)

(राशि ₹ मध्ये)

[illegible]	[illegible]	वाटप केलेल्या जागेचे क्षेत्रफळ (चौ.मी. मध्ये)	[illegible]	[illegible]	आकारणीय मुद्रांक शुल्क	आकारणीय नोंदणी फी	एकूण आकारणीय मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी
1	2	3	4	5	6	7	8
1	MTDC	63,300	ओडवान गट क्र.424 आणि 425	33,53,778	67,075 (2%)	30,000 (1%)	97,075
2	ओम सहकारी गृहनिर्माण सोसायटी	1,770	कोल्हापूर, ई-वार्ड सीटीएस क्र. 29के/1	4,10,685	20,534 (5%)	4,107 (1%)	24,641
3	श्री ज्योतिर्लिंग सहकारी दुग्ध व्यवसायिक संस्था	200	हणबरवाडी गट 104/A	11,000	220 (2%)	110 (1%)	330
4	श्री सद्गुरू विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट	2,100	करवीर सीटीएस 697/A आणि 697/B	21,26,250	1,06,313 (5%)	21,263 (1%)	1,27,576
5	अपंग पुनर्वसन संस्था	8,000	उंचगाव 264/A, कोल्हापूर	1,76,000	3,520 (2%)	1,760 (1%)	5,280
6	MSEDCL, पारसतोला, तहसील साकोली	8,000	पारसटोला गट क्र.87, भंडारा	13,20,000	26,400 (2%)	13,200 (1%)	39,600

परिशिष्ट X (पुढे चालू)

1	2	3	4	5	6	7	8
7	MSEDCL, वलाड, तहसील साकोली	8,000	वलाड गट क्र.176, भंडारा	13,20,000	26,400 (2%)	13,200 (1%)	39,600
8	MSEDCL, पिंगलाई, तहसील भंडारा	8,300	पिंगलई गट (क्र.586 एनपी), भंडारा	72,25,000	2,89,000 (4%)	30000 (1%)	3,19,000
9	गेल (इंडिया) लिमिटेड	16,430	बोर्ले, तालुका पनवेल 111, 112, 113, 137	1,00,22,300	2,00,446 (2%)	30,000 (1%)	2,30,446
10	मेसर्स व्हल्यूएबल प्रोपर्टी प्राईवेट लिमिटेड	5,50,290	चिखले, लोनीवाली, तालुका पनवेल, 5,10,13,2341,111,154, 159,166,167, 171	24,20,21,719	24,20,217[1]	30,000 (1%)	24,50,217
11	तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट, कोलाड	32,374	गोवे, तालुका रोहा, 80	8,16,976	16,340 (2%)	8,170 (1%)	24,510
12	अनिल गवाजी चास्कर (पूर्व सेवानिवृत्त)	4,000	शिरढोण पनवेल 139	2,10,793	8,432[2]	2,108 (1%)	10,540
13	गौरव रवि घई	300	सासवणे, तालुका अलीबाग, 300	1,14,000	2,280 (2%)	1,140 (1%)	3,420

[1] विशेष वसाहतीसाठी मुद्रांक शुल्कामध्ये 50 टक्क्यांची सूट.

[2] कृषी जमिनीसाठी 4 टक्के.

परिशिष्ट X (पुढे चालू)

1	2	3	4	5	6	7	8
14	मेसर्स महाराष्ट्र सिमलेस लिमिटेड	4,700	सुकेळी, तालुका रोहा, 54	6,95,500	13,910 (2%)	6,955 (1%)	20,865
15	सचिव, प्रवरा हॉर्टीकल्चर उत्पादन आणि विक्री शेतकरी को-ऑपरेटिव्हस सोसायटी, लोनी (कु)	1,30,200	खडकेवाके 416, राहता	29,67,000	59,340 (2%)	2,9670 (1%)	89,010
16	श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट	15,000	मंजूर 353, तालुका कोपरगाव	14,34,375	28,688 (2%)	14,344 (1%)	43,032
17	कार्यकारी अभियंता, MSEB, नाशिक	8,100	कुंभारी (हिंगणी) 463 तालुका कोपरगाव	4,39,000	8,780 (2%)	4,390 (1%)	13,170
18	कार्यकारी अभियंता, MSEB, नाशिक	6,000	येसगांव 2/2/1, तालुका कोपरगाव	4,68,000	9,360 (2%)	4,680 (1%)	14,040
19	कार्यकारी अभियंता, MSEB, संगमनेर	6,000	करंजी (बु) तालुका कोपरगाव	4,68,000	9,360 (2%)	4,680 (1%)	14,040
20	भारती विद्यापीठ	6,000	येडावी (पलूस) 1796	1,65,000	3,300 (2%)	1,650 (1%)	4,950
21	भारती विद्यापीठ	4,600	पलूस 70/ए/3/1	87,860	1,757 (2%)	879 (1%)	2,637
22	श्री वसंतदादा पाटिल ब्लड बँक	301.60	मिरज 9545, 5854	16,44,000	82,200 (5%)	16,440 (1%)	98,640

परिशिष्ट X (पुढे चालू)

23	APMC, पलूस	20,000	पलूस 279/1	18,70,000	37,400 (2%)	18,700 (1%)	56,100
24	MSRTC, पलूस	15,000	पलूस 160	14,45,000	28,900 (2%)	14,450 (1%)	43,350
25	APMC, तासगांव	1,17,700	तासगांव 60/1, 61, 63, 71, 72	70,90,380 (90% of 78,78,200)	1,41,808 (2%)	30,000 (1%)	1,71,808
26	MSRTC, पलूस	350	पलूस 9	5,98,500 (90% of 6,65,000)	11,970 (2%)	5,985 (1%)	17,955
27	BSNL, तासगांव	4,000	तासगांव 129/1/1	8,10,000	32,400 (4%)	8,100 (1%)	40,500
	एकूण						40,02,332

विवरण पत्र क्र. ६

शासकीय जमिनी संस्था/व्यक्तींना विविध प्रयोजनार्थ अकृषिक वापराकरीता प्रदान करतावेळी त्या जमिनीचे मुल्यांकन निश्चित करताना <u>अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत.....</u>

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः जमीन-०१/२०१४/प्र.क्र.०४/ज-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
दिनांक : २० फेब्रुवारी, २०१६

संदर्भ :-

१) शासन निर्णय क्रमांकः जमीन-१०/२००२/प्र.क्र.३८७/ज-१, दि.२९.५.२००६
२) शासन परिपत्रक क्रमांकः जमीन-११/२००७/प्र.क्र.९८/ज-१, दि.३१.१२.२००७
३) शासन निर्णय क्रमांकः जमीन-११/२००७/प्र.क्र.९८/ज-१, दि.२९.४.२००८
४) शासन निर्णय क्रमांकः जमीन-११/२०१३/प्र.क्र.५०२/ज-१, दि.२८.१.२०१४

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतूदी अन्वये आणि शासनाने विहित केलेल्या धोरणानुसार शासकीय जमिनी वेळोवेळी संस्था/व्यक्तींना विविध प्रयोजनार्थ अकृषिक वापराकरीता प्रदान करण्यात येतात. विविध अकृषिक प्रयोजनांकरीता प्रदान करावयाच्या शासकीय जमिनी अभिलेखात शासकीय जमीन म्हणून नमूद असतात आणि अशा शासकीय जमिनींचे मूल्य दर हे सर्वसाधारणपणे कृषिक कारणासाठीचे दर म्हणून वार्षिक मूल्य दर तक्त्यात नमूद केलेले असतात. अशाप्रकारे प्रदान केलेल्या शासकीय जमिनींचा संभाव्य अकृषिक वापर होणार असताना देखील अनेकदा वार्षिक मूल्य दर तक्त्यातील या जमिनींच्या हस्तांतरण समयी संभाव्य अकृषिक मुल्यांकन विचारात घेतले जात नाही, त्यामुळे शासनाच्या महसूली उत्पन्नाचे नुकसान होते. यास्तव, शासकीय जमीन कोणत्याही संस्था व व्यक्तीकडे अकृषिक प्रयोजनार्थ हस्तांतरीत करण्यास परवानगी/मंजूरी देताना त्या जमिनीचे मुल्यांकन प्रचलित कृषिक दराने करावे अथवा संभाव्य अकृषिक वापराचा विचार करता अकृषिक दराने करावे, याबाबत स्पष्ट सूचना देण्याची आवश्यकता आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम १९७१ मधील तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारात शासकीय जमिनी विविध अकृषिक प्रयोजनांकरीता प्रदानान्वये हस्तांतरण करताना आकारावयाच्या मुल्यांकनाबाबत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने शासकीय जमिनी विविध अकृषिक वापरांकरीता संस्था/व्यक्तींना प्रदान करता वेळी त्या जमिनीचे मुल्यांकन निश्चित करताना अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत या विभागाच्या

नियंत्रणाखालील क्षेत्रीय यंत्रणांना व संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सविस्तर सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

१.१ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम १९७१ मधील तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारात शासकीय जमिनी विविध अकृषिक प्रयोजनांकरीता संस्था व व्यक्तींना कब्जेहक्काने किंवा भाडेपट्ट्याने देताना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार त्याचे भोगवटामुल्य किंवा यथास्थिती भुईभाडे ठरविण्या कामी अशा जमिनीच्या बाजारमुल्याचा आधार घेताना ग्राह्य धरावयाच्या बाजार मूल्याबाबत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने या विभागाच्या नियंत्रणाखालील क्षेत्रीय यंत्रणांना व संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे सविस्तर मार्गदर्शक निर्देश देण्यात येत आहेत :-

अ) नागरी क्षेत्राच्या वार्षिक मूल्यदर तक्त्यामध्ये नमूद जमिनीचे दर हे विकास आराखड्यामध्ये नियोजित निवासी/वाणिज्यिक/औद्योगिक इत्यादी अकृषिक वापर विचारात घेऊन अशा जमिनीसाठी तसेच शेती/ ना विकास विभागातील जमिनीसाठी वेगवेगळे दर ठरविलेले असतात. त्यामुळे **जेथे विकास आराखडा मंजूर आहे तेथे, वार्षिक मूल्यदर तक्त्यामध्ये ज्या मूल्य विभागात संबंधित शासकीय जमीन समाविष्ट आहे. त्या मूल्य विभागातील दर** विचारात घेण्यात येवून अशा जमिनीचे मुल्यांकन करण्यात यावे.

आ) **नागरी क्षेत्राच्या प्रभाव क्षेत्रामध्ये प्रादेशिक योजना मंजूर असल्यास** त्यामधील निवासी/वाणिज्यिक/ औद्योगिक इत्यादी **अकृषिक भूवापरासाठी** अथवा **प्रादेशिक योजना मंजूर नसल्यास** विकासाची संभाव्यता विचारात घेऊन **संभाव्य बिनशेतीचे** दर व **प्रत्यक्ष बिनशेती जमीन असल्यास बिनशेतीचे दर** वार्षिक मूल्यदर तक्त्यात नमूद असतात. त्यामुळे **अशा प्रभाव क्षेत्रामध्ये संबंधित शासकीय जमीन कोणत्या मूल्य विभागात येते त्या मूल्य विभागासाठी अथवा लगतच्या मूल्य विभागासाठी असलेला संभाव्य बिनशेतीचा दर** विचारात घेण्यात येवून अशा जमिनीचे मुल्यांकन करण्यात यावे.

इ) ग्रामीण क्षेत्रामध्ये सविस्तर मूल्य विभाग नसतात, शेत जमिनीसाठी आकाराप्रमाणे शेती/ बागायतीचे दर वार्षिक मूल्यदर तक्त्यात नमूद असतात, तर बिनशेती जमिनीसाठी संपूर्ण गावासाठी एकच दर नमूद असतो व **हायवेवरील जमिनी** व **औद्योगिक बिनशेती संभाव्यता** असलेल्या जमिनीसाठी वेगळे दर नमूद असतात. त्यामुळे **ग्रामीण क्षेत्रामधील शासकीय जमिनीसाठी संभाव्य बिनशेती** वापराचा विचार करुन तसेच सदर जमीन **हायवेवर** आहे **अथवा इतरत्र** आहे याचा विचार करुन त्या जमिनीचे मूल्यदर ठरविणे आवश्यक राहील.

(i) **हायवेवर नसलेल्या शासकीय जमिनीच्या** संदर्भात वार्षिक मूल्यदर तक्त्यासोबत याअनुषंगाने देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार येणा-या **बिनशेती दराच्या ५०%** इतका मूल्य दर विचारात घेऊन अशा जमिनीचे मुल्यांकन करण्यात यावे.

(ii) **हायवेवरील शासकीय जमिनीसाठीचे** दर ठरविताना वार्षिक मूल्यदर तक्त्यात यापूर्वीच **संभाव्य बिनशेतीचे** दर गृहीत धरण्यात आले असल्याने, सदर दराच्या पुन्हा ५०% करण्याची आवश्यकता नसून, वार्षिक मूल्य दर तक्त्यात अशा जमिनीच्या दर्शविलेल्या **पूर्ण दराने** जमिनीचे मूल्य काढण्यात यावे. तसेच **औद्योगिक कारणासाठी** शासकीय जमीन निर्गत करण्यात येत असल्यास व सदर गावासाठी वार्षिक मूल्यदर तक्त्यात औद्योगिक संभाव्य बिनशेतीसाठी दर दिला असल्यास सदर दराच्या पुन्हा ५० % करणेची आवश्यकता नसून, वार्षिक मूल्यदर तक्त्यात नमूद असलेल्या **पूर्ण दराने** मूल्यांकन करण्यात यावे.

१.२ संस्था व व्यक्तींना शासकीय जमीन विविध अकृषिक प्रयोजनांकरीता कब्जेहक्काने किंवा भाडेपट्टयाने देताना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार त्याचे भोगवटामुल्य किंवा यथास्थिती भुईभाडे ठरविण्या कामी अशा जमिनीच्या बाजारमुल्याचा आधार घेताना वरील निर्देशात नमूद केल्यानुसार जमिनीचे असे बाजारमुल्य निश्चित करण्यात यावे.

२.० संदर्भाधीन क्र.१ आणि ४ येथे नमूद शासन निर्णय क्र.जमीन १०/२००२/प्र.क्र.३८७/ज-१, दि.२९.५.२००६ व शासन निर्णय क्रमांक-जमीन-११/२०१३/प्र.क्र.५०२/ज-१, दि.२८.१.२०१४ अन्वये शासकीय जमिनीच्या हस्तांतरणापोटी शासनास देय अनर्जित रक्कमेचा हिस्सा किंवा यथास्थिती अधिमुल्य वा नजराणा निश्चित करताना **ज्या दिवशी अशा जमिनीचा प्रत्यक्षात हस्तांतरणाचा नोंदणीकृत व्यवहार झाला/होणार असेल त्या दिवशीच्या वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे तसेच त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे** संबंधित जमिनींचे मूल्यांकन करण्यात यावे, आणि अशी येणारी मूल्यांकनाची रक्कम व प्रत्यक्ष व्यवहारात दर्शविलेली रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या रकमेवरच अनर्जित उत्पन्न किंवा यथास्थिती अधिमुल्य वा नजराणा रक्कमेची परिगणना करण्यात यावी.

३.० भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या भाडेपटटयाचे नूतनीकरण करताना किंवा शासकीय जमिनीच्या हस्तांतरणासाठी अथवा वापरात बदल करण्यासाठी अनर्जित उत्पन्नातील शासनाचा हिस्सा किंवा यथास्थिती अधिमूल्य वा नजराणा वसूल करताना, तसेच शासकीय जमिनींच्या बाबतीतील शर्तभंग नियमानुकूल करताना किंवा धारणाधिकार रुपांतरीत करताना किंवा अन्य शासकीय प्रयोजनासाठी शासकीय जमिनीच्या बाजारमूल्याचा आधार घेत असताना अशा जमिनीचे बाजारमुल्य निश्चित करण्यासाठी देखील या शासन निर्णयात नमूद मूल्यांकनाचे तत्व अवलंबविण्यात यावेत.

४.० संदर्भाधीन क्र.३ येथे नमूद महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.जमीन-११/२००७/प्र.क्र.९८/ज-१, दि.२९.४.२००८ हा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे. यापुढे शासकीय जमिनीचे मुल्यांकन करताना वरीलप्रमाणे **वार्षिक मूल्यदर तक्ता व त्यासोबतच्या मार्गदर्शक सुचनानुसारच** बाजारमूल्य निश्चित करण्यात यावे.

५.० सदर शासन निर्णय हा महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५०५/२०१५/व्यय-९,दि.३०/१२/२०१५ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२२०१५२५००१८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manu Kumar Srivastava

Digitally signed by Manu Kumar Srivastava
DN: c=IN, o=All India Services, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Manu Kumar Srivastava
Date: 2016.02.20 19:53:07 +05'30'

मनु कुमार श्रीवास्तव
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य (१), मुंबई.
१३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य (२), नागपूर.
१४. सर्व जिल्हाधिकारी/अप्पर जिल्हाधिकारी

१५.वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
१६.सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
१७.सर्व सह सचिव/ उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८.कक्ष अधिकारी (ल-१), संगणक शाखा, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवड नस्ती (ज-१)

विवरण पत्र क्र. ७

परिशिष्ट XV

स्वामित्वधनाच्या विलंबाने प्रदानाकरिता देय व्याजाची परिगणना

(संदर्भ: परिच्छेद 7.2.7)

स्वामित्वधनाच्या प्रदानाचा संबंधित महिना	प्रदान करावयाच्या स्वामित्वधनाची रक्कम ( )	प्रदानाचा नियत दिनांक	प्रदानाचा प्रत्यक्ष दिनांक	विलंब दिवसांमध्ये	देय व्याज ( )
1	2	3	4	5	6
एप्रिल-08	6,17,76,459	01 एप्रिल 2008	27 मे-2008	56	22,74,728
मे-08	6,99,75,979	01 एप्रिल 2008	29 जून 2008	89	40,95,033
जून-08	7,40,06,276	01 एप्रिल 2008	29 जुलै 2008	119	57,90,738
जुलै-08	7,06,98,327	01 जुलै 2008	26 ऑगस्ट-08	56	26,03,248
ऑगस्ट-08	5,03,61,160	01 जुलै 2008	27 सप्टेंबर 2008	88	29,14,048
सप्टेंबर-08	5,99,68,088	01 जुलै 2008	28 ऑक्टोबर 2008	119	46,92,298
ऑक्टोबर-08	7,52,76,417	01ऑक्टोबर 2008	27 नोव्हेंबर 2008	57	28,21,319
नोव्हेंबर-08	7,87,58,736	01 ऑक्टोबर 2008	27 डिसेंबर 2008	87	45,05,431
डिसेंबर-08	7,88,48,391	01 ऑक्टोबर 2008	29 जानेवारी 2009	120	62,21,462
जानेवारी-09	8,14,51,191	01 जानेवारी 2009	26 फेब्रुवारी 2009	56	29,99,189
फेब्रुवारी-09	7,28,28,022	01 जानेवारी 2009	21 मार्च 2009	79	37,33,067
मार्च-09	8,99,18,006	01 जानेवारी 2009	24 एप्रिल 2009	113	66,81,031
एप्रिल-09	7,52,24,222	01 एप्रिल 2009	28 मे 2009	57	28,19,363
मे-09	7,49,35,393	01 एप्रिल 2009	25 जून 2009	85	41,88,170
जून-09	8,12,33,293	01 एप्रिल 2009	27 जुलै 2009	117	62,49,400
जुलै-09	7,97,32,425	01 जुलै 2009	27 ऑगस्ट 2009	57	29,88,328
ऑगस्ट-09	7,99,92,328	01 जुलै 2009	27 सप्टेंबर 2009	88	46,28,597
सप्टेंबर-09	7,49,28,511	01 जुलै 2009	27 ऑक्टोबर 2009	118	58,13,631
ऑक्टोबर-09	8,39,08,472	01ऑक्टोबर 2009	26 नोव्हेंबर 2009	56	30,89,671
नोव्हेंबर-09	8,66,79,269	01ऑक्टोबर 2009	25 डिसेंबर 2009	85	48,44,540
डिसेंबर-09	8,71,72,846	01ऑक्टोबर 2009	28 जानेवारी 2010	119	68,20,977
जानेवारी-10	9,33,05,142	01 जानेवारी 2010	25 फेब्रुवारी 2010	55	33,74,333
फेब्रुवारी-10	8,11,07,879	01 जानेवारी 2010	25 मार्च 2010	83	44,26,490
मार्च-10	9,14,65,195	01 जानेवारी 2010	29 एप्रिल 2010	118	70,96,697
एप्रिल-10	6,78,12,678	01 एप्रिल 2010	28 मे 2010	57	25,41,582
मे-10	6,91,56,466	01 एप्रिल 2010	26 जून 2010	86	39,10,656
जून-10	5,93,84,300	01 एप्रिल 2010	30 जुलै 2010	120	46,85,655
जुलै-10	6,50,34,650	01 जुलै 2010	26 ऑगस्ट 2010	56	23,94,701
ऑगस्ट-10	5,34,75,757	01 जुलै 2010	28 सप्टेंबर 2010	89	31,29,431

परिशिष्ट XV (पुढे चालू)

1	2	3	4	5	6
सप्टेंबर-10	5,18,67,037	01 जुलै 2010	28 ऑक्टोबर 2010	119	40,58,418
ऑक्टोबर-10	7,46,61,773	01 ऑक्टोबर 2010	26 नोव्हेंबर 2010	56	27,49,190
नोव्हेंबर-10	7,15,76,708	01 ऑक्टोबर 2010	30 डिसेंबर 2010	90	42,35,772
डिसेंबर-10	8,54,49,523	01ऑक्टोबर 2010	28 जानेवारी 2011	119	66,86,133
जानेवारी-11	8,02,52,799	01 जानेवारी 2011	25 फेब्रुवारी 2011	55	29,02,293
फेब्रुवारी-11	8,10,22,670	01 जानेवारी 2011	17 मार्च 2011	75	39,95,639
मार्च-11	8,36,97,135	01 जानेवारी 2011	28 एप्रिल 2011	117	64,38,947
एप्रिल-11	7,90,08,087	01 एप्रिल 2011	26 मे 2011	55	28,57,279
मे-11	7,73,16,017	01 एप्रिल 2011	28 जून 2011	88	44,73,738
जून-11	7,76,82,767	01 एप्रिल 2011	28 जुलै 2011	118	60,27,331
जुलै-11	8,14,85,627	01 जुलै 2011	26 ऑगस्ट 2011	56	30,00,457
ऑगस्ट-11	7,03,75,651	01 जुलै 2011	25 सप्टेंबर 2011	86	39,79,598
सप्टेंबर-11	6,89,85,001	01 जुलै 2011	28 ऑक्टोबर 2011	119	53,97,840
ऑक्टोबर-11	9,06,40,189	01 ऑक्टोबर 2011	28 नोव्हेंबर 2011	58	34,56,744
नोव्हेंबर-11	8,98,48,567	01 ऑक्टोबर 2011	29 डिसेंबर 2011	89	52,57,987
डिसेंबर-11	9,56,49,055	01 ऑक्टोबर 2011	28 जानेवारी 2012	119	74,84,211
जानेवारी-12	10,07,82,761	01 जानेवारी 2012	27 फेब्रुवारी 2012	57	37,77,283
फेब्रुवारी-12	8,71,65,745	01 जानेवारी 2012	27 मार्च 2012	86	49,29,044
मार्च-12	9,12,05,634	01 जानेवारी 2012	27 एप्रिल 2012	117	70,16,587
एप्रिल-12	6,88,67,390	01 एप्रिल 2012	26 मे 2012	55	24,90,547
मे-12	10,37,15,650	01 एप्रिल 2012	28 जून 2012	88	60,01,300
जून-12	8,97,92,486	01 एप्रिल 2012	27 जुलै 2012	117	69,07,871
जुलै-12	7,25,79,117	01 जुलै 2012	25 ऑगस्ट 2012	55	26,24,779
ऑगस्ट-12	6,08,52,149	01 जुलै 2012	27 सप्टेंबर 2012	88	35,21,089
सप्टेंबर-12	7,89,97,341	01 जुलै 2012	25 ऑक्टोबर 2012	116	60,25,441
ऑक्टोबर-12	8,98,96,940	01 ऑक्टोबर 2012	25 नोव्हेंबर 2012	55	32,51,067
नोव्हेंबर-12	10,62,73,317	01 ऑक्टोबर 2012	27 डिसेंबर 2012	87	60,79,416
डिसेंबर-12	11,84,41,221	01 ऑक्टोबर 2012	29 जानेवारी 2013	120	93,45,499
जानेवारी-13	13,64,35,631	01 जानेवारी 2013	26 फेब्रुवारी 2013	56	50,23,822
फेब्रुवारी-13	12,73,67,887	01 जानेवारी 2013	26 मार्च 2013	84	70,34,895
मार्च-13	15,13,93,674	01 जानेवारी 2013	27 एप्रिल 2013	116	1,15,47,397
एकूण	**4,91,17,01,427**				**28,09,61,438**

परिच्छेद क्र. ५.१.४ विवरण क्र. ८

परिशिष्ट-१

वर्ष	आक्षेपित		मान्य		वसुल	
	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम
२००७-०८	६३३	०.९१	६३३	०.९१	३८५	०.३७
२००८-०९	१,०८०	१.४७	१,०८०	१.४७	७३४	०.८
२००९-१०	३,११६	४.५	२,७०३	४.१५	२२७७	२.१४
२०१०-११	७६५	३.२५	६३५	१.६१	५०३	०.८१
२०११-१२	४७९	०.९२	४७८	०.८१	३७९	०.५५
एकूण	**६,१५३**	**११.०५**	**५५२९**	**८.९५**	**४२७८**	**५.४७**

परिच्छेद क्र. ५.३.१ विवरण क्र. ९

परिशिष्ट-२

भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांचा महसूली जमा अहवाल सन २०१२-१३

५.३.१. मोटार वाहन कराची वसूली न करणे.

अनु.क्र.	कार्यालयाचे नाव	प्रारुप परि.क्र.	स्थानिक लेखा परिक्षण क्र	परिच्छेद क्र.	आक्षेपित		वसुल		प्रलंबित	
					प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम
१	लातूर	१३	१८१०९/१०-११	३	२६	११२९५४७	११	५२५१५७	१५	६०४३९०
			१८१०९/१०-११	४	२८	३०३३९५	१४	१४९५५३	१४	१५३८४२
			१८७१३/११-१२	१	८	३७४७४९	७	३३७३४९	१	३७४००
			१८७१३/११-१२	२	११	१६९१८४	९	११५७२५	२	५३४५९
२	औरंगाबाद	१३	१८१४५/१०-११	१	२०	९२९९७८	६	२०४८४९	१४	७२५१२९
			१८१४५/१०-११	२	५५	३९९८२९	५	३००६९	५०	३६९७६०
	एकूण			६	१४८	३३०६६८२	५२	१३६२७०२	९६	१९४३९८०
१	धुळे	१४	१६८६१/०७-०८	१	१७	१४९४२६	१२	९३०९८	५	५६३२८
२	पुणे	१४	१८२१७/१०-११	६	३१	११८९११२	१०	४१७७१५	२१	७७२११७
			१८२१७/१०-११	७	३४	१७४६१०	३४	१७४६१०	०	०
३	कोल्हापूर	१४	१८५४९/११-१२	२	१२	१६९६२१	६	८२९७५	६	८६६४६
			१८५४९/११-१२	९	१२	३८६४४१	५	१९५०४१	७	१९१४००
४	अकलूज	१४	१८६६७/११-१२	१	४२	५३७३८७	३४	४०७७७४	८	१२९६१३
	एकूण			६	१४८	२६०७३९७	१०१	१३७१२१३	४७	१२३६१८४
१	मुंबई (प.)	१८	१८१३२/१०-११	२	८	४७२१०७	१	२८०५२	७	४४४०५५
			१८१३२/१०-११	४	६	५४३६९	१	१२१५०	५	४२२१९
२	अहमदनगर	१८	१८१८०/१०-११	२	१२	९११२८१	१२	९११२८१	०	०
			१८५४८/११-१२	१	२४	२९८३२०	२२	२७४०२०	२	२४३००
३	श्रीरामपूर	१८	१८१९१/१०-११	१	१२	१७७१४७	११	१६३७८३	१	१३३६४
			१८५४६/११-१२	२	१७	१४४१११	१७	१४४१११	०	०
	एकूण			६	७९	१२३७३४३	६४	७१३४०५	१५	५२३९३८
१	वाशी	२१	१८२२४/१०-११	१	३	१०७२४०	१	२२४४०	२	८४८००
२	परभणी	२१	१८७२६/११-१२	२	२९	५५७८३८	१४	३१३९७४	१५	२४३८६४
			१८७२६/११-१२	४	३	१२७४५	३	१२७४५	०	०
३	कल्याण	२१	१८७६५/११-१२	३	८	९४४९१	३	१३३६५	५	८११२६
			१८७६५/११-१२	५	१	३३४४०	०	०	१	३३४४०
			१८२२३/१०-११	१	१०	२१५१५०	२	४४२५०	८	१७०९००
			१८२२३/१०-११	३	३९	७०८००	३२	५६८००	७	१४०००
	एकूण			७	९३	१०९११७०४	५५	४६३५७४	३८	६२८१३०
१	पिंपरी-चिंचवड	२३	१८२३१/१०-११	५	१६	२०८५२३	२	२४३००	१४	१८४२२३
			१८२३१/१०-११	६	८	२९२७८७	५	२०२०६३	३	९०७२४
२	बारामती	२३	१८२३२/१०-११	१	१	५८९००	०	०	१	५८९००
			१८२३२/१०-११	३	४	४३४३३	२	२०८८७	२	२२५४६
३	जळगाव	२३	१८४९१/१०-११	२	३	८४०७०	३	८४०७०	०	०
			१८४९१/१०-११	३	१२	१४७१२५	१२	१४७१२५	०	०
	एकूण			६	४४	८३४८३८	२४	४७८४४५	२०	३५६३९३
१	रत्नागिरी	४०	१८६२४/११-१२	१	२७	४२७३१८	१७	२५४९१९	१०	१७२३९९
			१८६२४/११-१२	३	६	३२५२४	५	२२९२४	१	९६००
२	सातारा	४०	१८५७४/११-१२	२	२७	२८१८५६	२७	२८१८५६	०	०
			१८५७४/११-१२	३	२	८४७२८	२	८४७२८	०	०
	एकूण			४	६२	८२६४२६	५१	६४४४२७	११	१८१९९९
१	पिंपरी-चिंचवड	४१	१८८२१/११-१२	२	२०	१०४६४८७	११	५००५६१	९	५४५९२६
			१८८३१/११-१२	५	२०	३२४४३७	१२	२११५६७	८	११२८७०
	एकूण			२	४०	१३७०९२४	२३	७१२१२८	१७	६५८७९६
१	नांदेड	४४	१८०८९/१०-११	१	१७	२३२४८०	१०	११५५३७	७	११६९४३
			१८०८९/१०-११	३	४	१११९३०	०	०	४	१११९३०
			१८७३३/११-१२	१	५	४५९६६८	०	०	५	४५९६६८
			१८७३३/११-१२	२	४	१५४७८२	३	११२७८२	१	४२०००
			१८७३३/११-१२	३	११	९५५०३	९	६०८५३	२	३४६५०
	एकूण			५	४१	१०६२५६३	२२	२८९१७२	१९	७७२३९१
१	औरंगाबाद	४५	१८७८८/११-१२	१	१३	७०६८९७	०	०	१३	७०६८९७

			१८७८८/११-१२	२	४०	३११९८५	०	०	४०	३११९८५
एकूण				२	५३	१०२६०८२	०	०	५३	१०२६०८२
१	अंबेजोगाई	५७	१८११०/१०-११	१	३८	५१८६४०	१७	९५८८४	२१	४२२७५६
			१८११०/१०-११	२	१	३७०००	०	०	१	३७०००
			१८११०/१०-११	३	२	२७२२५	०	०	२	२७२२५
२	नंदुरबार	५७	१८५०२/१०-११	१	१९	२६२६३८	१६	१८२७००	३	७९९३८
३	उस्मानाबाद	५७	१८७४४/११-१२	१	४	१५४४५	४	१५४४५	०	०
			१८७४४/११-१२	२	४	१०३७७	२	५०६६	२	५३११
			१८७४४/११-१२	३	२३	३८६२९०	१७	२५५४२०	६	१३०८७०
			१८७४४/११-१२	४	२९	१८६१००	१४	८३४००	१५	१०२७००
एकूण				८	१२०	१४४३७१५	७०	६३७९१५	५०	८०५८००
१	सोलापूर	५८	१८११२/१०-११	२	१४	९५२८३	०	०	१४	९५२८३
			१८६८६/११-१२	१	३६	४७६८१७	१९	२४६२७४	१७	२३०६२३
			१८६८६/११-१२	४	१०	१०४०००	४	४२०००	६	६२०००
२	हिंगोली	५८	१८७४३/११-१२	१	१७	२५२२२६	०	०	१७	२५२२२६
			१८७४३/११-१२	४	१	३२४००	०	०	१	३२४००
३	मुंबई	५८	१८७६३/११-१२	३	११२	६२५३२०	०	०	११२	६२५३२०
	(प.)		१८७६३/११-१२	४	१५	८०२७१३	०	०	१५	८०२७१३
एकूण				७	२०५	२३८८८३९	२३	२८८२७४	१८२	२१००५६५
अंतिम एकूण					१०३३	१७११५५१३	४८५	६९६१२५५	५४८	१०२३४२५८

परिशिष्ट-३

५.३.२ आयात वाहनावरील एकरकमी कराची कमी आकारणी

अनु. क्र.	कार्यालयाचे नाव	प्रारुप परि.क्र.	स्थानिक लेखा परिक्षण क्र	परिच्छेद क्र.	आक्षेपित		वसुल		प्रलंबित	
					प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम
१	कोल्हापूर	२५	१८५४९/११-१२	१	५	१३०७२८२	०	०	५	१३०७२८२
२	बारामती	२५	१८२३२/१०-११	१	१	३४०३५२	०	०	१	३४०३५२
एकूण					**६**	**१६४७६३४**	**०**	**०**	**६**	**१६४७६३४**

५.३.३ महसुलाचा भरणा करण्यातील विलंबामुळे व्याजाची हानी

अनु. क्र.	कार्यालयाचे नाव	प्रारुप परि.क्र.	स्थानिक लेखा परिक्षण क्र	परिच्छेद क्र.	आक्षेपित		वसुल		प्रलंबित	
					प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम
१	मुंबई (पश्चिम)	४२	१८७६३/११-१२	१	१३७	१५९५६६६	८	९३७५७	१२९	१५०१९०९
एकूण					**१३७**	**१५९५६६६**	**८**	**९३७५७**	**१२९**	**१५०१९०९**

५.३.४ न वटलेल्या धनादेशांच्या प्रकरणात मोटार वाहन कराची न झालेली वसुली

अनु. क्र.	कार्यालयाचे नाव	प्रारुप परि.क्र.	स्थानिक लेखा परिक्षण क्र	परिच्छेद क्र.	आक्षेपित		वसुल		प्रलंबित	
					प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम
१	वाशी	१९	१७५१८/०९-१०	४	११	२९५४०१	६	१७७५३५	५	११७८६६
२	मुंबई (पश्चिम)	१९	१७५२०/०९-१०	१	२१	७६६५६४	०	०	२१	७६६५६४
			१८१३२/१०-११	१	४६	१७०३९०९	०	६८७९४३	४६	१०१५९६६
			१८७६३/११-१२	२	३९	१३२९११२	०	०	३९	१३२९११२
एकूण				**४**	**११७**	**४०९४९८६**	**६**	**८६५४७८**	**१११**	**३२२९५०८**
१	ठाणे	२०	१७६०४/०९-१०	२	३०	१११६४९१	२	३०८३९	२८	१०८५६५२
२	कल्याण	२०	१८७६५/११-१२	४	१	११७५३०	१	११७५३०	०	०
एकूण				**२**	**३१**	**१२३४०२१**	**३**	**१४८३६९**	**२८**	**१०८५६५२**
एकूण					**१४८**	**५३२९००७**	**९**	**१०१३८४७**	**१३९**	**४३१५१६०**

५.३.५ शासकीय महसुलाचा दुर्विनियोग

अनु. क्र.	कार्यालयाचे नाव	प्रारुप परि.क्र.	स्थानिक लेखा परिक्षण क्र	परिच्छेद क्र.	आक्षेपित		वसुल		प्रलंबित	
					प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम	प्रकरणे	रक्कम
१	धुळे	६४	१८८०२/११-१२	१	३	१५९८१६	३	१५९८१६	०	०
एकूण					**३**	**१५९८१६**	**३**	**१५९८१६**	**०**	**०**
अंतिम एकूण					**१३२७**	**२५९२७६३६**	**५०५**	**८२२८६७५**	**८२२**	**१७६९८९६१**

परिच्छेद क्र- ५-३-३ विवरण क्र- ११

ई-चलन प्रत

063505 A/c 611

2011C6312

नमुना म.ज.नि. ६

लेखा क्रमांक 71 01

चलन क्रमांक 0 0 1 2

आहरण व संवितरण अधिकारी 0 0 0 4 5 2

विभाग / उपविभाग 7 1 0 1

या ठिकाणच्या कोषागारात / उपकोषागारात भरण्यात आलेल्या रोख रकमेचे ब्युरा

भारतीय स्टेट बँकेत / भारतीय रिझर्व बँकेत

भरणा करणाऱ्याने भरावयाचे	विभागीय अधिकाऱ्याने किंवा कोषागाराने भरावयाचे	कोषागारात / उपकोषागारात / स्टेट बँकेत / भारतीय रिझर्व बँकेत भरावयाचे
ज्याच्या वतीने रक्कम भरण्यात आली आहे त्या व्यक्तीचे नाव / पदनाम आणि पत्ता- (मैदा बाबा) सांताक्रुझ मुंबई	लेखाचे वर्गीकरण 0055 Police मुख्य शीर्ष Police Receipt / 105 उप मुख्य शीर्ष State Headquarter Police लघु शीर्ष (01)(01) Collections उप शीर्ष Payment for services	दिनांक / रुपये / 2016
भरणा करणाऱ्यामार्फत प्रतिनिधीचे तपशील आणि भरणा करणाऱ्याचे नाव IPL चॅम्पियनशिप	लेखाचा सांकेतांक 0 0 5 5 0 ...	कोषागार 26549585 / CREDIT / चलन क्रमांक
भरणा केलेली रक्कम रु. 2,6549,585/- (अक्षरी) रुपये दोन कोटी पासष्ट लाख एकोणपन्नास हजार आठशे पंच्याऐंशी / भरणा करणाऱ्याची स्वाक्षरी / दिनांक Nitin ...	वरील माहिती बरोबर आहे. पैसे स्वीकारावे व पावती द्यावी. / दिनांक / Sr. Administrative Officer and Drawing and Disbursing Officer, Office of the Commissioner of Police, Brihan Mumbai	11 MAY 2016 / दिनांक / BANK OF INDIA

9532121025

True copy

Sr. Administrative Officer and Drawing and Disbursing Officer
Office of the Commissioner of Police, Brihan Mumbai

(१२४) परिच्छेद क्र ८.३.३.५ । दिवस ४ क्र. ७२

बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.उप आयुक्त/अनि/१/३ दिनांक 27.05.2015

मा. सह पोलिस आयुक्त(प्रशासन),
पोलिस मुख्यालय, मुंबई.

DCP HQ-II
DCP AP Tardeo

विषय : बृहन्मुंबई महानगरपालिकेस मालमत्ता करापोटी येणे असलेल्या रक्कमेचे पोलिस मनुष्यबळासाठी महानगरपालिकेकडून देणे असलेल्या रक्कमेपोटी समायोजनेबाबत.

महोदय,

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन विभागास संरक्षणार्थ पुरविण्यात देणा-या मनुष्यबळाच्या वेतन व भत्त्याच्या देयकांपोटी मा. पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांस डिसेंबर २०१४ पर्यंत देणे असलेल्या एकूण रु.३४,४३,९९,०८४/- रक्कमेपैकी मा. पोलिस आयुक्त यांच्या अखत्यारित असलेल्या विविध विभागातील मालमत्तांचा मालमत्ता कर रु. २९,०४,३७,९२१/- बृहन्मुंबई महानगरपालिकेस अधिदान करण्यापोटी पुस्तकी समायोजन करण्यासंबंधीच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने, मा. म.न.पा. आयुक्त यांच्या दि.३०.०३.२०१५ च्या मंजुरीने पोलिस मनुष्यबळापोटीच्या एकूण रु.२९,०४,३७,९२१/- रक्कमेचे धनादेश दि. ३१.०३.२०१५ रोजी करनिर्धारक व संकलक यांस देऊन पुस्तकी समायोजन करण्यात आलेले आहेत; त्यामुळे मा. पोलिस आयुक्त यांच्या विविध विभागातील मालमत्ता करांची ३१.०३.२०१५ पर्यंतची रक्कम समायोजित झालेली आहे. प्राप्त रक्कमेच्या मूळ पावत्या लवकरच आपल्या कार्यालयात सादर करण्यात येतील.

मा. पोलिस आयुक्त कार्यालयास(शासनास) उर्वरीत रकमेचा परतावा लवकरच करण्यात येईल व त्याबाबत यथावकाश कळविण्यात येईल.

आपल्या माहितीसाठी सविनय सादर.

पोलीस आयुक्त
बृहन्मुंबई यांचे कार्यालय
कक्ष १ (नोंदणी शाखा)
नोंदणी क्र. RI-4706
दिनांक
कार्यालय

7160
02.06.15
(122)

27-5-2015

(स्वाक्षरी)
उप आयुक्त (अतिक्रमण निर्मुलन)

I.W. No 1243 /3/ CP/Admn./ 2/
Dt. 1 6 /2015

क्र.सआ/अनि/शहर/49 दिनांक

सहाय्यक आयुक्त (अतिक्रमण
निर्मुलन) शहर यांचे कार्यालय
एफ/दक्षिण विभाग कार्यालय इ
खोली नं.44, तिसरा मजला,
डॉ.आंबेडकर रोड ,परळ,
मुंबई-400 012.

प्रति,
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-1),
कक्ष-14(अर्थ व निरिक्षण शाखा),
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

विषय :- बृहन्मुंबई महानगरपालिकेला मालमत्ता करापोटी येणे असलेल्या रकमेचे पोलीस मनुष्यबळासाठी महानगरपालिकेकडून देणे असलेल्या रकमेपोटी समायोजनबाबत

संदर्भ :- जा.क्र.414/पोआ/कक्ष-14/2016 दिनांक 01.04.2016.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपले वरील संदर्भित अनु.क्र.1 वरील पत्र पहावे. सदर पत्रामध्ये न कल्यानुसार सशस्त्र पोलीस मरोळ मुख्यालयातून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन विभाग संरक्षणार्थ पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाच्या वेतन व भत्त्याच्या संरक्षण आकाराच्या देयक मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या दिनांक 30.3.2015 रोजीच्या मंजुरीनुसार सन 2014-15 च्या आहि अर्थसंकल्पातून बृहन्मुंबई महानगरपालिका सह करनिर्धारक व संकलक विभाग यांना मालमत्ता करापो शासनाकडून येणे असलेल्या देयकांशी पुस्तकी समायोजन करण्यात आले. त्यानुसार करण्यात आलेल पुस्तकी समायोजनेचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

अनु.क्र.	समायोजन करण्यात आलेली पोलीस देयकांचा कालावधी	देयकाची रक्कम
1	जानेवारी 2006 ते मार्च 2008 (5 व्या व 6 व्या वेतन आयोगाच्या वेतन फरकाची देयके)	रु. 6, 48 ,60,192/-
2	एप्रिल 2008 ते मार्च 09 (5 व्या व 6 व्या वेतन आयोगाच्या वेतन फरकाची देयके)	रु. 2, 68 ,57,371/-
3	एप्रिल 2009 ते ऑगस्ट 09 (5 व्या व 6 व्या वेतन आयोगाच्या वेतन फरकाची देयके)	रु. 1, 18 ,24,716/-
4	सप्टेंबर 2009 ते डिसेंबर 09 (5 व्या व 6 व्या वेतन आयोगाच्या वेतन फरकाची देयके)	रु. 1, 03 ,73,152/-
5	जानेवारी 10 ते मार्च 10 (5 व्या व 6 व्या वेतन आयोगाच्या वेतन फरकाची देयके)	रु. 1, 34 ,47,456/-
6	जानेवारी 13 ते फेब्रुवारी 13 महागाई भत्त्यातील फरक	रु. 3 ,45,795/-

परिशिष्ट XVII

बँका, शासकीय आणि बिगर शासकीय संस्थाकडून वसूल करावयाच्या रक्कमेच्या थकबाकीचा तपशिल

(संदर्भ:परिच्छेद 7.3.3.6 पहा)

अनु.क्र	कार्यालयाचे नाव	बँकेचे /शासकीय/बिगर शासकीय संस्थेचे नाव	कालावधी	वसूल न झालेली रक्कम (₹ लाखात)
1	पोलिस आयुक्त, ठाणे	बँक ऑफ महाराष्ट्र	12/08 ते 03/13	117.40
2	पोलिस अधीक्षक, ठाणे	भारतीय स्टेट बँक	24.02.12	0.10
3	पोलिस आयुक्त, नागपूर	अलाहाबाद बँक	01/13 ते 03/13	18.22
		भारतीय रिझर्व बँक	01/13 ते 03/13	76.11
		जनरल पोस्ट ऑफिस	01/13 ते 03/13	3.43
		शहर पोस्ट ऑफीस	01/13 ते 03/13	2.27
		CBI	10/11 ते 03/13	116.19
		CIO (SIB)	03/13	3.79
		राष्टीय अग्निशमन सेवा महाविदयालय	04/12 ते 06/12	47.33
4	पोलिस आयुक्त, सोलापूर	मुख्य टपाल कार्यालय	04/11 ते 03/13	5.14
5	पोलिस अधिक्षक, सोलापूर	उजनी कलवा	11/5/12 ते 20/5/12	4.63
6	पोलिस आयुक्त, मुंबई	माझगाव डॉक लि.	07/08 ते 08/10	40.09
		आयकर कार्यालय, चर्चगेट	10/10 ते 03/13	74.72
		बँक ऑफ महाराष्ट्र, गिरगाव	07/12 ते 03/13	18.40
		सिंडीकेट बँक, नरीमन पॉइंट	07/12 ते 03/13	30.14
		सॅनिटरी पोलिस (FACO/DPT)	07/08 ते 12/11	202.96
		BPT (BEST) रेल्वे	04/08 ते 12/11	131.99
		अलाहाबाद बँक, बांद्रा	04/12 ते 03/13	20.79
		सेंट्रल बँक ऑफ इंडिया	07/12 ते 03/13	24.27
		नागरी सुरक्षा (फोर्ट)	01/10 ते 03/13	179.59
		ऑल इंडिया रेडियो	04/12 ते 03/13	24.04
		IOB, नरीमन पॉइंट	01/13 ते 03/13	11.61
		UBI, नरीमन पॉइंट	01/13 ते 03/13	15.17
		सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बांद्रा	06/10 ते 03/13	84.09
		सेंट्रल बँक ऑफ इंडिया, (मुख्य शाखा)	07/12 ते 12/12	20.90
		स्पेशल ब्यूरो, नरीमन पॉइंट	01/13 ते 03/13	16.29
		CBI	01/13 ते 03/13	17.90

परिशिष्ट XVII (पुढे चालू)

अनु.क्र.	कार्यालयाचे नाव	बँकेचे शासकीय/बिगर शासकीय संस्थेचे नाव	कालावधी	वसूल न झालेली रक्कम (₹ लाखात)
		शासकीय शिपींग कार्यालय	01/12 ते 03/13	12.40
		RBI, बांद्रा	07/12 ते 03/13	30.14
		कॉर्पोरेशन बँक, फोर्ट	01/13 ते 03/13	16.24
		युको बँक, विलेपार्ले	01/13 ते 03/13	11.61
		बँक ऑफ इंडीया, प्रभादेवी	01/13 ते 03/13	11.61
		प्रादेशिक मुद्रांक डेपो	10/10 ते 12/10	2.34
		बँक ऑफ महाराष्ट्र, बांद्रा (पूर्व)	01/13 ते 03/13	4.65
		सेंट्रल बँक ऑफ इंडीया, खेरनगर	07/12 ते 03/13	30.14
		बँक ऑफ बडोदा, भांडूप	01/13 ते 03/13	13.92
		बँक ऑफ बडोदा, गोरेगाव	01/13 ते 03/13	13.92
		युको बँक, नरीमन पॉईंट	01/13 ते 03/13	12.77
7	पोलिस आयुक्त, पुणे	GPO, PNB, MSEB, सिटी पोस्ट, RTO, खडकी पोस्ट, पिंपरी पोस्ट	04/09 ते 03/13	67.65
8	पोलिस अधिक्षक, नाशिक	भारतीय खादय निगम, मनमाड	09/09 ते 06/12	7.16
		जलविदयुत केंद्र, MSEPC, वैतरणा नगर	06/12 ते 02/13	9.91
9	पोलिस अधिक्षक, नांदेड	MIDC, नांदेड	10/08 ते 10/09	66.40
		रिलायंस इन्फ्रास्ट्रक्चर, नांदेड एअर पोर्ट	10/11 ते 01/12	5.79
		रिलायंस इन्फ्रास्ट्रक्चर	06/12 ते 01/13	52.84
		MIDC, नांदेड	10/2008	0.33
			एकूण	**1,677.38**

बँका, शासकीय आणि निमशासकीय संस्थांकडून वसूल करावयाच्या रकमेच्या थकबाकीचा तपशील
परिच्छेद क्र. ७.३.३.६

अ.क्र.	उपक्रमाचे नाव	बँक/शासकीय/निमशासकीय संस्थेचे नाव	कालावधी	परताव्यानुसार वसूल न झालेली रक्कम (₹ लाखात)	वसूल झालेली रक्कम पूर्ण रुपयांत	वसुली बाकी पूर्ण रुपयांत	संस्थेस जादा दिलेली वसूल करावयाची रक्कम पूर्ण रुपयांत	
	[illegible] मर्यादित, मुंबई	१. [illegible] बँक लि.	०६/०८ ते ०८/१०	४०.०६	१६८४४७७	०	२०१४५३१	जादा रक्कम [illegible] प्राप्त झाली आहे, म्हणून वसुली पूर्ण झाली आहे.
		२. [illegible], मर्कटाइल	१०/१० ते ०३/१३	७४.७३	०	७४७३०००	०	७४,७३,०००/-
		३. बँक ऑफ महाराष्ट्र निर्मल	०७/१२ ते ०३/१३	१८.४०	०	१८४००००	०	१८,४०,०००/- (पत्र क्र. २५४२/१६ दि. ०६/१२/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		४. सिंडिकेट बँक नरिमन पॉइंट	०७/१२ ते ०३/१३	३०.६४	३०६४०००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		५. [illegible] FACULTY	०७/०८ ते १२/११	२०७.६५	[illegible]	०	८६४७७०३	दि. ३१/०८/१० पासून संरक्षण बंद असून जादा दिलेली रक्कम ₹ ८६,४७,७०३/- म्हणून वसूल करणे [illegible].
		६. [illegible]	०४/०८ ते १२/११	१३२.९१	०	१३१९१०००	०	१,३१,९१,०००/- (पत्र क्र. २५६३/१६ दि. १५/०७/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		७. [illegible] बँक, चांदा	०४/१२ ते ०३/१३	२०.७९	११८०९२२	९१८०७८	०	९,१८,०७८/- (पत्र क्र. २५५४/१६ दि. २७/०९/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		८. [illegible] बँक ऑफ इंडिया	०७/१२ ते ०३/१३	२४.२७	२४२७०००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		९. नागरी सुरक्षा (फोर्ट)	०१/१० ते ०३/१३	१७९.५९	०	१७९५९०००	०	१,७९,५९,०००/- (पत्र क्र. २५५५/१६ दि. २७/०९/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		१०. [illegible] इंडिया	०४/१२ ते ०३/१३	२४.०४	६९५०९६	१७०७९०४	०	१७,०७,९०४/- (पत्र क्र. २५६०/१६ दि. २७/०९/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		११. [illegible], नरिमन पॉइंट	०४/१३ ते ०३/१३	११.६२	११६२०००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		१२. [illegible], नरिमन पॉइंट	०४/१३ ते ०३/१३	१५.१७	१५१७०००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		१३. [illegible] बँक ऑफ इंडिया, चांदा	०६/१० ते ०३/१३	८४.०९	८४०९०००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		१४. सेंट्रल बँक ऑफ इंडिया (मुख्य शाखा)	०७/१२ ते १३/१३	२०.९०	२०९००००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		१५. [illegible] नरिमन पॉइंट	०१/१३ ते ०३/१३	१६.९९	१६९९०००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		१६. [illegible]	०१/१३ ते ०३/१३	१७.९०	१२०८६०८	०	५८१३९२	अभिलेखाप्रमाणे नमूद कालावधीतील रक्कम ₹ १२,०८,६०८/- अशी आहे. पूर्ण रक्कम वसूल झाली आहे.
		१७. शासकीय [illegible]	०१/१३ ते ०३/१३	१४.४०	११४५३३	२९५४६७	०	२,९५,४६७/- (पत्र क्र. ३२५३/१६ दि. २७/०९/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		१८. [illegible], चांदा	०७/१२ ते ०३/१३	३०.६४	[illegible]	११६१२२४	२३३९४१	अभिलेखानुसार जादा झालेली रक्कम रु. २,३३,९४१ अशी असून वसुली बाकी असलेली रक्कम ११,६१,२२४/- (पत्र क्र. २५५८/१६ दि. २७/०९/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		१९. [illegible] बँक, फोर्ट	०१/१३ ते ०३/१३	१६.२४	१६२४०००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		२०. युको बँक, [illegible]	०१/१३ ते ०३/१३	११.६१	०	११६१०००	०	११,६१,०००/- (पत्र क्र. २५५१/१६ दि. २७/०९/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		२१. बँक ऑफ इंडिया, प्रभादेवी	०१/१३ ते ०३/१३	१२.६२	१२६२०००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		२२. [illegible]	१०/१० ते १२/१०	२.३४	०	२३४०००	०	२,३४,०००/- (पत्र क्र. २५६२/१६ दि. २७/०९/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		२३. बँक ऑफ महाराष्ट्र, (मांडवी पूर्व)	०१/१३ ते ०३/१३	४.६५	४६५०००	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		२४. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, [illegible]	०४/१२ ते ०३/१३	३०.५८	१८५४२८७६	११६१२२४	०	११,६१,२२४/- (पत्र क्र. २५५७/१६ दि. २७/०९/२०१६ अन्वये स.प.नो. ठाडदेव यांचेकडून वसुलीकरिता पत्र पाठविण्यात आले आहे.)
		२५. बँक ऑफ महाराष्ट्र, [illegible]	०१/१३ ते ०३/१३	१३.१२	१३१२४३०	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		२६. बँक ऑफ बडोदा, [illegible]	०१/१३ ते ०३/१३	१३.१२	१३१२४२०	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.
		२७. युको बँक, [illegible]	०१/१३ ते ०३/१३	१२.७७	१२७८८६६	०	०	वसुली पूर्ण झाली आहे.

परिशिष्ट XVIII

शासकीय महसूलाचा कोषागार अभिलेख्यांशी ताळमेळ घेतला गेला नसल्याचे दर्शविणारे विवरणपत्र

(संदर्भः परिच्छेद 7.3.9 पहा)

अनु. क्र.	कार्यालयाचे नाव	विभाग/शाखा	ज्या कालावधीचा ताळमेळ घेतला गेला नव्हता तो कालावधी	संबंधित कोषागारांनी कळविल्याप्रमाणे रक्कमा न झालेले तपशील
1	पोलिस आयुक्त, मुंबई	वाहतूक	06/08 ते 08/08, 12/08, 07/11, 08/11 आणि 01/12 ते 03/13	₹ 21,67,000 चलन क्र.1007 दि. 17.03.2009, ₹ 38,43,000 चलन क्र. 27014 दिनांक 29.9.2009, आणि ₹ 19,49,000 चलन क्र. 35013 दिनांक14.01.2009
		LA II, ताडदेव	02/12 ते 03/13	फेब्रुवारी 2010 ते ऑक्टोबर 2010 या कालावधीत 16 चलनाव्दारे ₹ 5,19,70,216 रक्कम भरली गेली
2	पोलिस आयुक्त, ठाणे	मुंब्रा वाहतूक	04/08 ते 03/10 06/10 ते 07/11 09/12 ते 03/13	-
		कळवा वाहतूक	04/08 ते 06/08 11/08 ते 03/10 05/10 ते 06/10 08/10 ते 12/11 01/13 ते 03/13	-
		कोळसेवाडी वाहतूक (कल्याण)	10/08 ते 02/11 12/11 ते 03/13	₹ 17,300 चलन क्र. 28 दि.13.5.11 ₹ 8,500 चलन क्र. 29 दि.14.5.2011 ₹ 8,600 चलन क्र. 99 दि.25.8.2011 ₹ 46,100 चलन क्र.102 दि.2.9.11 ₹ 7,200 चलन क्र. 103 दि.3.9.11 ₹ 6,300 चलन क्र. 106 दि.8.9.11 ₹ 10,900 चलन क्र. 107 दि.10.9.11
		ठाणे शहर वाहतूक	12/08 ते 02/11 06/11, 08/12 04/12 ते 06/12 01/03 ते 03/13	₹ 9,000, चलन क्र. 94 दिनांक 20.5.10 ₹ 20,000 चलन क्र. 224 दिनांक 18.1.12 ₹ 17,500 चलन क्र. 425 दिनांक .1.11.12
		नौपाडा वाहतूक	08/10 ते 07/11 01/13ते 03/13	-
		कोपरी वाहतूक	04/09 ते 03/10 06/10, 02/11,03/11,03/12 06/12 ते 03/13	₹ 2,700 चलन क्र. 9 दिनांक 13.4.2010 ₹ 3,300 चलन क्र.30 दिनांक 10.5.10 ₹ 3,900 चलन क्र. 121 दिनांक 30.8.10 ₹ 1,000 चलन क्र. 122 दिनांक .31.3.10
		अंबरनाथ वाहतूक	11/08 ते 12/09	-

परिशिष्ट XVIII (पुढे चालू)

अनु. क्र.	कार्यालयाचे नाव	विभाग/शाखा	ज्या कालावधींचा ताळमेळ घेतला गेला नव्हता तो कालावधी	संबंधित कोषागाराने कळविल्याप्रमाणे जमांचे न झालेले लेखांकन
		भिवंडी वाहतूक	01/10 ते 03/10 02/12 ते 08/12	₹ 30.000 चलन क्र.176 दिनांक 29.11.2010 ₹ 9.700 चलन क्र..177 दिनांक 30.11.2010
		उल्हासनगर वाहतूक	ताळमेळाचे अभिलेख उपलब्ध नाही	-
		डोंबिवली (विष्णूपूर) वाहतूक		-
		डोंबिवली (पूर्व) वाहतूक		-
		कुंपारवाडी वाहतूक	04/08 ते 07/11 01/13 ते 03/13	-
		नारपोली वाहतूक	03/12, 08/12 आणि 03/13	-
		कासारवडवली वाहतूक	04/08 ते 07/11 11/11 ते 02/12 08/12 ते 01/13 आणि 03/13	-
		वागळे इस्टेट वाहतूक	12/08 ते 05/09 08/09 ते 03/10 09/10 ते 07/11 09/12 आणि 12/12 ते 03/13	-
3	पोलिस अधीक्षक, ठाणे	पी.एस.काशिमीरा	10/08 ते 03/13	₹ 11,000 दि. 18.09.2008
		वसई वाहतूक	04/12 ते 08/12 01/13 ते 03/13	₹ 19,700 चलन क्र.74/20.08.10 ₹ 28,500 चलन क्र.184/29.11.10 ₹ 48,600 चलन क्र.. 120/5.10.10 ₹ 23,600 चलन क्र.120/5.10.10 ₹ 18,600चलन क्र. 28/28.04.11
		SP ठाणे पी.एस. भाईंदर	04/08 ते 03/13 12/08, 04/10 08/10 ते 03/13	₹ 2,338 चलन क्र.5938077 दि. 22.7.2010
		काशिमीरा वाहतूक	04/08 ते 12/10 08/11 ते 03/13	₹ 22,500 चलन क्र.9/27.05.11 ₹ 17,600 चलन क्र.29/12.7.11
4	पोलिस आयुक्त, पुणे		04/08 ते 03/13	-
5	पोलिस अधीक्षक पुणे	SP ग्रामीण	05/11 ते 03/13	-
		पी.एस. शिक्रापूर	06/12 ते 03/13	-
		पी.एस.हवेली	04/08 ते 03/11 06/12 ते 03/13	-

परिशिष्ट XVIII (पुढे चालू)

अनु. क्र.	कार्यालयाचे नाव	विभाग/शाखा	ज्या कालावधीचा ताळमेळ घेतला गेला नव्हता तो कालावधी	संबंधित कोषागारांनी कळविल्याप्रमाणे जमाचे न झालेले लेखांकन
6	पोलिस आयुक्त, नाशिक	वाहतूक पोलिस	07/12 ते 03/13	-
		पी.एस.सातपूर	04/08 ते 03/13	-
		पी.एस. नाशिकरोड	08/12 ते 03/13	-
		पी.एस. आडगाव	06/11 ते 03/13	-
		पी.एस. पंचवटी	01/13 ते 03/13	-
		पी.एस. सरकारवाडा	12/10 ते 03/13	-
7	पोलिस आयुक्त, नागपूर	मुख्यालय	09/12 ते 03/13	-
		परवाना शाखा	04/11 ते 03/13	-
8	पोलिस अधिक्षक, नांदेड	नैतिकता पडताळणी शाखा	04/08 ते 03/13	-
9	पोलिस आयुक्त औरंगाबाद	मुख्यालय	04/08 ते 03/10 आणि 12/12 ते 03/13	-
10	पोलिस अधिक्षक औरंगाबाद	मुख्यालय	04/08 ते 03/13	-
11	पोलिस आयुक्त, सोलापूर	वाहतूक शाखा	04/08 ते 03/10 08/11 आणि 03/12 ते 03/13	₹ 28,300 चलन क्र. 158/11 दिनांक 22.10.2011 आणि ₹ 32,000 चलन क्र. 209/11 दिनांक 27.12.2011
		परवाना शाखा	04/08 ते 03/13	-
		नैतिकता पडताळणी शाखा	04/08 ते 03/13	-
		लेखे शाखा	04/08 ते 03/13	-
12	पोलिस अधिक्षक, सोलापूर	वाहतूक शाखा	04/11 ते 03/13	-
		नैतिकता पडताळणी शाखा	04/08 ते 03/13	-
13	पोलिस आयुक्त अमरावती	वाहतूक (पश्चिम)	09/09 ते 07/10 03/11 ते 07/11 11/12 ते 03/13	-
		वाहतूक (पूर्व)	10/12 ते 03/13	-
		CP मुख्यालय	04/08 ते 03/11	-
14	पोलिस अधिक्षक अमरावती	पी.एस. परतवाडा	04/09 ते 03/11 09/11 ते 10/11 आणि 08/12	-
		पी.एस. आशेगाव	04/09 ते 03/11	-
		पी.एस. अचलपूर	04/09ते 06/10	-
				एकूण : 6,03,83,954

परिच्छेद क्र. ७.३.१ विवरण क्र. १६

जीवीतास धोका असणाऱ्या व्यक्तींना पोलीस संरक्षण देण्याबाबत मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.एसयुटी-१०१४/प्र.क्र.२४९/विशा-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- ०४ जानेवारी, २०१८

संदर्भ : शासन परिपत्रक, गृह विभाग क्र.एस.एस.ए./१०/२०००/१/विशेष-४ दि.०३.०१.२०००

प्रस्तावना:-

राज्य शासनाने संदर्भीय दिनांक ३ जानेवारी, २००० रोजी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकान्वये जीवीतास धोका असणा-या खाजगी व्यक्तींना पोलीस संरक्षण देण्याबाबत मार्गदर्शक सूचना विषद केल्या आहेत. सन २०१६ मध्ये याविषयाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.७७/२०१६ च्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २० सप्टेंबर, २०१७ रोजी असे आदेश पारित केले आहेत की, राज्य शासनाने संदर्भीय परिपत्रकान्वये देण्यात येणाऱ्या पोलीस संरक्षणाची व्याप्ती / मर्यादाबाबत सूचना / मते मागविण्यात यावीत व या परिपत्रकाचा पुनर्विचार / पुन:परीक्षण करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करावा. त्यानुसार राज्य सरकारने सर्व संबंधित हितधारकांशी विविध मुद्यांवर विचारविनिमय/ चर्चा करुन, त्यांचे मत घेऊन सदर परिपत्रकाचा पुनर्विचार/ पुन:परीक्षण केले आहे. याबाबत संबंधितांनी व्यक्त केलेल्या मतांचा योग्य तो विचार करुन जीवीतास धोका असणाऱ्या व्यक्तींना पोलीस संरक्षण देण्याबाबत नवीन मार्गदर्शक सूचना तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

जीवीतास धोका असलेल्या व्यक्तींना पोलीस संरक्षण देण्याबाबत शासनाचे दि.३ जानेवारी, २००० चे परिपत्रक व त्यापूर्वीची सर्व परिपत्रके या शासन निर्णयानुसार अधिक्रमित करण्यात येत असून खालीलप्रमाणे नवीन मार्गदर्शक सूचना विषद करण्यात येत आहेत.

१. सर्वसाधारण परिस्थितीत, एखाद्या व्यक्तीला हक्क म्हणून किंवा केवळ पद्धत म्हणून पोलीस संरक्षण मिळू शकणार नाही. तसेच पोलीस संरक्षण ही काही वस्तू नाही की जी, खरेदी करता येईल तसेच सेवाही नाही की जी सेवाशुल्क अदा करुन मिळवता येईल. परंतु जर एखाद्या योग्य प्रकरणात, एखाद्या व्यक्तीच्या जीवीतास खरोखरच धोका असेल किंवा धोका असण्याचे काही कारण असेल, तर जनहित जपण्यासाठी, सदर व्यक्तिला पोलीस संरक्षण देणे व त्याला असलेल्या धोक्याला अनुसरुन पोलीस संरक्षणाची व्याप्ती वाढविणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे, यात कोणतीही शंका नाही. अशा प्रकरणामध्ये जीवीतास धोका असण्याचे कोणतेही कारण / परिस्थिती असेल व धोक्याचे प्रमाण कितीही असले तरी त्याला संरक्षण देणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. अशा प्रकारच्या धोक्याचे स्वरुप विचारात घेऊन पोलीस संरक्षण दिले पाहिजे किंवा नाही, तसेच किती

प्रमाणात दिले पाहिजे, संरक्षणाचा कालावधी किती असला पाहिजे किंवा कोणत्या दर्जाचे / वर्गाचे पोलीस संरक्षण दिले पाहिजे याचा निर्णय घेण्यात यावा.

२. या शासन निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची पूर्तता झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला पोलीस संरक्षण दिले जाऊ नये. सदर मार्गदर्शक सूचना सर्व खाजगी व्यक्तींना, तो / ती कोणीही असेल किंवा कोणत्याही पदावर कार्यरत असेल किंवा पद सांभाळत असेल, त्यांना पोलीस संरक्षण देण्यासाठी लागू राहतील. सदर मार्गदर्शक सूचना शासकीय पद धारण केलेली व्यक्ती, संविधानिक पदावरील व्यक्ती तसेच ज्यांना गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार यापूर्वी संरक्षण पुरविण्यात आले आहे किंवा ज्यांना असे संरक्षण देणे गरजेचे आहे अशा व्यक्तींस लागू होणार नाहीत.

३. या मार्गदर्शक सूचनांनुसार एखाद्या व्यक्तीस पोलीस संरक्षण देतांना, त्या व्यक्तीचे सामाजिक स्थान / प्रतिष्ठा काय आहे याचा विचार न करता, केवळ त्याच्या जीवीतास असणा-या धोक्याचे स्वरुप व परिमाण याचा विचार करण्यात यावा. संबंधित पोलीस अधिक्षक किंवा पोलीस आयुक्त हे (त्या-त्या प्रकरणानुसार) पोलीस संरक्षण द्यायचे किंवा नाही हा निर्णय घेण्यास सक्षम असतील व तो त्यांचाच अधिकार असेल.

४. एखाद्या व्यक्तिला पोलीस संरक्षण द्यायचे किंवा नाही, त्याची व्याप्ती व कालावधी किती असेल हा निर्णय संबंधित पोलीस अधिक्षक किंवा पोलीस आयुक्त (त्या-त्या प्रकरणानुसार) यांनीच घ्यावा. तसेच, पोलीस संरक्षण देऊ केलेल्या व्यक्तीस सदर संरक्षण कसे व किती असावे याची हक्क म्हणून मागणी करता येणार नाही.

५. एखाद्या व्यक्तीच्या जीवीतास धोका आहे अशी विश्वासार्ह माहिती प्राप्त झाल्यानंतर किंवा कोणत्याही व्यक्तिकडून लिखित स्वरुपात तशी तक्रार मिळाल्यानंतर, अशी माहिती / तक्रार याची सत्यता तपासण्याकरिता अत्यंत तातडीने प्राथमिक चौकशी केली जावी. या तपासणीमध्ये, केवळ सदर धोक्याचा प्रकार व गांर्भीय याचा विचार न करता सदर धोक्याचे स्त्रोत याचाही विचार करण्यात यावा. जर अशा माहितीमध्ये / दाव्यामध्ये / तक्रारीमध्ये सकृतदर्शनी तथ्य आढळले तर धोक्याच्या स्वरुपास अनुसरुन आवश्यक ते पोलीस संरक्षण तातडीने पुरविण्यात यावे.

६. प्राथमिक चौकशीनंतर पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाबाबत प्रकरणांची लवकरात लवकर सविस्तर चौकशी करण्यात यावी. अशा चौकशीत प्राप्त माहिती / दावा किंवा तक्रारीमध्ये तथ्य आढळले नाही तर पुरविण्यात आलेले पोलीस संरक्षण तात्काळ काढून घेण्यात यावे.

७. या उलट सविस्तर चौकशीत प्राप्त माहिती/ दावा किंवा तक्रारीमध्ये पुरेसे तथ्य आढळल्यास, सदर धोक्याचे स्वरुप व गांभीर्य विचारात घेऊन पोलीस संरक्षणाची व्याप्ती व कालावधी निश्चित करण्यात यावा.

८. पोलीस संरक्षण पुरविण्यात आलेल्या प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक स्तरावर खालील समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीने दर तीन महिन्यांनी बैठक घेऊन पोलीस संरक्षण पुरविण्यात आलेल्या व्यक्तींना असणाऱ्या धोक्याचा आढावा घ्यावा व त्यानुसार त्या व्यक्तींस पुरिवण्यात आलेले पोलीस संरक्षण वाढवायचे किंवा कमी करायचे किंवा पूर्णत: काढून घ्यायचे याचा निर्णय घ्यावा.

अ) पोलीस आयुक्त स्तरावरील समिती

१.	पोलीस आयुक्त / सह पोलीस आयुक्त	अध्यक्ष
२.	अतिरिक्त पोलीस आयुक्त / पोलीस उपायुक्त (विशेष शाखा)	सदस्य सचिव
३.	पोलीस सह आयुक्त / अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा)	सदस्य
४.	पोलीस उपायुक्त (संबंधित परिमंडळ)	सदस्य

ब) जिल्हा स्तरीय समिती

१.	पोलीस अधिक्षक	अध्यक्ष
२.	पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय)	सदस्य
३.	पोलीस उप अधिक्षक / पोलीस निरीक्षक (संबंधित युनिट) स्थानिक गुन्हे शाखा	सदस्य सचिव
४.	पोलीस निरीक्षक (जिल्हा विशेष शाखा)	सदस्य

९. पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली खाली दर्शविल्याप्रमाणे एक राज्यस्तरीय आढावा समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीने दर सहा महिन्यांनी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधिक्षक यांनी पोलीस संरक्षण देण्यासंदर्भात घेतलेल्या निर्णयांचा आढावा घ्यावा. सदर आढावा घेतल्यानंतर, संबंधित व्यक्तीचे पोलीस संरक्षण चालू ठेवायचे की नाही, त्याची व्याप्ती, पोलीस संरक्षण काढून टाकायचे की नाही याबाबतचा अंतिम निर्णय घ्यावा व हा निर्णय संबंधित पोलीस अधिक्षक किंवा पोलीस आयुक्त (त्या-त्या प्रकरणानुसार) यांना कळविण्यात यावा. सदर निर्णय प्राप्त झाल्यानंतर, संबंधित पोलीस अधिक्षक किंवा पोलीस आयुक्त यांनी त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

क) पोलीस महासंचालक स्तरावरील राज्यस्तरीय समिती.

१.	पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई	अध्यक्ष
२.	अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य

३.	आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य सचिव
४.	विशेष पोलीस महानिरीक्षक (संबंधित परिक्षेत्र)	सदस्य
५.	संबंधित पोलीस आयुक्त किंवा प्रतिनिधी	सदस्य
६.	विशेष पोलीस महानिरीक्षक (व्हीआयपी सुरक्षा)	सदस्य

(टीप : समितीच्या अध्यक्षांच्या अनुपस्थितीमध्ये, अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई हे समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतील.)

१०. एखाद्या प्रकरणी कोणत्याही मा.न्यायालयाने (मा.उच्च न्यायालयासह) दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीचा किंवा कार्यवाहीचा भाग म्हणून एखाद्या व्यक्तीस पोलीस संरक्षण पुरविण्यात आले असेल, तरीही पुरविण्यात आलेल्या अशा पोलीस संरक्षणांच्या प्रकरणांचे पुनर्विलोकन सदर समितीने करावे. तसेच पुनर्विलोकन केल्यानंतर बदललेल्या परिस्थितीनुसार अशा व्यक्तीस यापुढे पोलीस संरक्षण पुरविणे आवश्यक नसल्याचे जर समितीचे मत झाल्यास, सदर बाब तात्काळ संबंधित मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून, त्या व्यक्तीस पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाचा पुनर्विचार किंवा सदर पोलीस संरक्षण काढून घेण्याबाबतची विनंती मा.न्यायालयास करण्यात यावी. तसेच सदर व्यक्ती त्याला/ तिला पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाचा गैरवापर करत असल्याची बाब निदर्शनास आल्यास, सदर बाब / वस्तुस्थिती योग्य त्या कागदपत्रांसह संबंधित मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून, पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाचा पुनर्विचार किंवा पूर्वी दिलेले आदेश मागे घेण्याबाबत मा.न्यायालयास विनंती करण्यात यावी.

११. पोलीस संरक्षण पुरविण्यात आलेल्या व्यक्तीने, जर संरक्षणासाठी तैनात असलेल्या पोलीसांना तिच्या / त्याच्या सोबत एखाद्या विशिष्ट प्रसंगी एखाद्या विशिष्ट ठिकाणी येण्यास प्रतिबंध / मनाई केल्यास, सदर बाब संबंधित पोलीस कर्मचाऱ्याने लेखी स्वरुपात संबंधित पोलीस अधिक्षक किंवा पोलीस आयुक्त, (त्या-त्या प्रकरणानुसार) यांना त्वरित कळवावी. जर, अशा प्रकारचा लेखी अहवाल पुन्हा पुन्हा प्राप्त होत असेल, तर संबंधित पोलीस अधिक्षक किंवा पोलीस आयुक्त (त्या-त्या प्रकरणानुसार) यांनी सविस्तर चौकशीनंतर, या एकमेव कारणास्तव सदर व्यक्तीस पुरविण्यात आलेले पोलीस संरक्षण काढून घेण्याचा निर्णय घेता येईल.

१२. जिवीतास धोका असलेल्या व्यक्तीस पोलीस संरक्षण देण्याकरिता आवश्यक असलेला कर्मचारीवर्ग हा संबंधित पोलीस मुख्यालयाकडूनच पुरविण्यात यावा. दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होऊ नये म्हणून एखाद्या ठराविक पोलीस ठाण्यातील कर्मचारीवर्ग पोलीस संरक्षणाकरिता पुरविण्यात येऊ नये. तसेच, पोलीस मुख्यालयाकडून असे कर्मचारीवर्ग पुरविल्याने एका पोलीस मुख्यालयांतर्गत, विविध व्यक्तींना देण्यात येणाऱ्या पोलीस संरक्षण व्यवस्थेची एक मध्यवर्ती यंत्रणा उभी करता येईल. अशा प्रकारच्या कर्तव्यामध्ये नियुक्त केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची किमान दर तीन महिन्यांनी बदली करण्यात यावी.

१३. एखाद्या प्रकरणामध्ये कायद्याची योग्य ती प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर असे आढळून आले की, संबंधित व्यक्तीच्या जीवाला धोका आहे, तर अशी व्यक्ती जोपर्यंत शुल्क / मोबदला देत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला पोलीस संरक्षण देता येणार नाही असे म्हणणे अयोग्य व अव्यवहारिक ठरेल. तसेच एखाद्या व्यक्तीच्या जीवाला धोका असेल व ती व्यक्ती पोलीस संरक्षणापोटी लागणारे शुल्क भरत असेल किंवा नसेल तरीही, त्या व्यक्तीचे संरक्षण करणे हे राज्य शासनाचे कर्तव्य आहे. तथापि, याचा अर्थ असा होत नाही की, जी व्यक्ती पोलीस संरक्षणापोटी लागणारे शुल्क भरण्यास सक्षम आहे, अशा व्यक्तीस नि:शुल्क पोलीस संरक्षण देण्यात यावे. एखादी व्यक्ती अशा पोलीस संरक्षणाचे शुल्क देण्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल तर, जनतेच्या पैशातून (public exchequer) अशा संरक्षणाचा खर्च करुन, प्रामाणिक करदात्यांचा पैशाचा अपव्यय करणे योग्य ठरणार नाही. एखाद्या व्यक्तीस त्याच्या विनंतीवरुन पोलीस संरक्षण पुरविण्यात आले, तर अशा व्यक्तीकडून संरक्षणापोटी "सुरक्षा शुल्क" वसूल करण्याची तरतूद, मुंबई पोलीस कायदा, १९५१, कलम ४७ मध्ये आहे. त्यामुळे या शासन निर्णयानुसार, ज्या व्यक्तीस पोलीस संरक्षण पुरविण्यात येईल, त्यांना सदर संरक्षणापोटी शुल्क भरणे बंधनकारक आहे. यापुढे पोलीस संरक्षणापोटी आकारण्यात येणा-या शुल्कास संक्षिप्तपणे "संरक्षण शुल्क" असे संबोधिले जाईल.

१४. सदर संरक्षण शुल्क, खाली दिलेल्या सूत्रानुसार ठरविण्यात येईल आणि ते शुल्क ज्या व्यक्तीस पोलीस संरक्षण पुरविण्यात आले आहे त्यास लागू होईल. सदर सूत्रानुसार येणारे शुल्क त्या व्यक्तीकडून वसूल करण्यात यावे.

तथापि, एखाद्या व्यक्तीच्या आयकर प्रपत्रानुसार त्याचे मासिक उत्पन्न रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) पेक्षा कमी असेल तर त्याला सदर संरक्षण शुल्क लागू होणार नाही. तसेच ज्या व्यक्तीस पोलीस संरक्षण पुरविण्यात आले आहे, त्या पोलीस संरक्षणासाठी आकारण्यात येणारे संरक्षण शुल्क हे त्याच्या / तिच्या आयकर प्रपत्रानुसार असलेल्या स्थूल उत्पन्नाच्या १५% पेक्षा अधिक असू नये.

१५. सदर संरक्षण शुल्क ठरविण्याकरिता व पुरविण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाचा खर्च वसूल करण्याकरिता खालील सूत्र वापरावे. त्यानुसार पोलीस संरक्षणासाठी नियुक्त केलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे सरासरी वेतनाचे मूल्य खालील सुत्राप्रमाणे काढण्यात यावे.

अे = एम + (५/६ - एक्स/७ x डी)

अे = सरासरी वेतन
एम = वेतनश्रेणीतील कमीत कमी टप्पा
एक्स = वेतनश्रेणीतील वेतनवाढीचा काळ
डी = वेतन श्रेणीतील कमाल व किमान टप्पयातील फरक

एकूण वेतनाची रक्कम काढताना वरीलप्रमाणे परिगणना करुन आलेल्या रकमेमध्ये महागाई भत्ता / घरभाडे भत्ता / स्थानिक पूरक भत्ता/ प्रवास भत्ता मिळवून एकूण वेतन काढण्यात यावे. तसेच संबंधित पोलीस / अधिकारी यांच्या प्रशिक्षणावर झालेला खर्च तसेच त्याला मिळणारे अनुषंगिक इतर लाभ लक्षात घेता, एकूण वेतनामध्ये त्याच्या ५०% एवढी रक्कम जमा करुन संरक्षणासाठी दयावयाची एकूण मासिक रक्कम काढण्यात यावी. तसेच एका दिवसाचे वेतन काढण्यासाठी ३० दिवसांचा महिना समजण्यात यावा.

तसेच हे ही स्पष्ट करण्यात येते की, पोलीस कर्मचाऱ्यासोबत जर पोलीसांचे वाहनही संरक्षणाकरिता दिले असल्यास, ते वाहन चालवण्याचा / इंधनाचा खर्च, वाहनाच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च व वाहनचालकाचे वेतन इ. सर्व खर्च, वरीलप्रमाणे काढलेल्या रकमेमध्ये जमा करुन येणारी एकूण रक्कम ही संरक्षण दिलेल्या व्यक्तीकडून वसूल करण्यात यावी.

महागाई भत्ता हा दर सहा महिन्यांनी वाढत असल्यामुळे, दरवर्षी १ जुलै रोजी प्रत्येक पदासाठी वरील सुत्राप्रमाणे आकारावयाच्या संरक्षण शुल्कामध्ये ५% ची वाढ करुन सदरचे संरक्षण शुल्क पुनर्निधारीत करावे व त्यानुसार वाढीव शुल्क आकारण्यात यावे.

१६. संसद / विधानसभा/ विधान परिषद सदस्य यांना त्यांचे कर्तव्य बजावत असताना त्यांच्या कामकाजाच्या अनुषंगाने जर पोलीस संरक्षण पुरविण्यात आले असेल, तर अशा प्रकरणी त्यांना पोलीस संरक्षणासाठी संरक्षण शुल्क लागू होणार नाही.

तसेच शासकीय, निमशासकीय व महामंडळाच्या सेवेत कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचारी यांना त्यांची शासकीय कर्तव्ये बजावत असताना, जर पोलीस संरक्षण पुरविण्यात आले असेल तर अशा अधिकारी / कर्मचारी यांनासुध्दा पोलीस संरक्षणासाठी संरक्षण शुल्क लागू होणार नाही.

परंतु असेही स्पष्ट करण्यात येते की, सदर अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या शासकीय कर्तव्य बजाविण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी पोलीस संरक्षण पुरविण्यात आले असल्यास, सदर पोलीस संरक्षणासाठी वरील सूत्राप्रमाणे संरक्षण शुल्क आकारुन, त्या अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून वसूल करण्यात यावे.

१७. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींच्या सुद्धा जीवीतास धोका असू शकतो. तथापि, बहुतांश वेळा हा धोका त्यांच्या बेकायदेशीर कृत्ये, दुष्कृत्ये व गैरवर्तन यामुळेच निर्माण झालेला असतो. अशा व्यक्तींस पोलीस संरक्षण पुरविल्यास ते त्याचा दुरुपयोग करण्याची शक्यता असते किंवा या संरक्षणाचा उपयोग अधिक गुन्हे करण्यासाठी करु शकतात. तथापि, एखाद्या विशेष आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये किंवा एखाद्या विशेष प्रसंगी किंवा विशिष्ठ ठिकाणी, जर अशा व्यक्तीच्या जीवीतास खरोखरच धोका असेल आणि त्या व्यक्तीने पोलीस संरक्षण मिळावे म्हणून रीतसर अर्ज केला असेल तर, संबंधित पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त (त्या-त्या प्रकरणानुसार) यांना सर्व संबंधित बाबींचा विचार करुन तसेच त्याच्या जीवीतास असणाऱ्या धोक्याचे गांभीर्य ओळखून त्यानुसार, सदर व्यक्तीस पोलीस संरक्षण पुरविण्याबाबत निर्णय घेण्याची मुभा राहील.

१८. ज्या व्यक्तीस पोलीस संरक्षण पुरविण्याचे निश्चित झाले आहे, त्याच्याकडून त्यापोटी आकारण्यात येणारे संरक्षण शुल्क प्राप्त होईल याची हमी राहावी याकरिता सदर व्यक्तीकडून, तीन महिन्याच्या संरक्षण शुल्काची रक्कम बँक गॅरंटीच्या रुपाने आगाऊ जमा करणे बंधनकारक राहील. सदर व्यक्तीने किंवा त्याच्या वतीने इतर व्यक्तीने तीन महिन्यांच्या संरक्षण शुल्काइतकी रक्कम जमा केल्यानंतरच त्याचे पोलीस संरक्षण चालू ठेवण्यात यावे. जर एखाद्या व्यक्तीस पोलीस संरक्षण पुरविण्यात आले असेल व ती व्यक्ती तीन महिन्याइतकी संरक्षण शुल्काची रक्कम आगाऊ भरण्यास नकार देत असेल तर संबंधित पोलीस अधिक्षक किंवा पोलीस आयुक्त (त्या-त्या प्रकरणानुसार) यांनी अशा प्रकरणाचा तातडीने आढावा घेऊन सदर व्यक्तीस पुरविण्यात आलेले पोलीस संरक्षण पुढे चालू ठेवण्याची आवश्यकता आहे किंवा नाही याबाबत निर्णय घ्यावा.

१९. एखाद्या व्यक्तीकडून संरक्षण शुल्काची रक्कम येणे बाकी असेल तर ही थकबाकी दंडात्मक कारवाईद्वारे किंवा त्याने दिलेल्या बँक गॅरंटीच्या रकमेतून वसूल करावी. पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त यांनी थकीत संरक्षण शुल्काच्या रकमेची वसुली जमीन महसूल थकबाकी समजून प्राधान्याने वसुल करण्याबाबतची कार्यवाही करावी.

२०. पोलीस संरक्षण पुरविण्यापूर्वी सदर व्यक्तीच्या सर्व बँक खात्याचा तपशील तसेच त्याच्या नावावर असणाऱ्या इतर मालमत्तेचा तपशील प्राप्त करुन घेण्यात यावा, जेणेकरुन संरक्षण शुल्क थकित झाल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल (जमीन महसूल वसुली

संदर्भातील) कायदा १९६७ अंतर्गत नियम १७(२) नुसार जमीन महसूलाची थकबाकी समजून सदर थकित संरक्षण शुल्काची रकक्म वसूल करावी.

२१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर मार्गदर्शक सूचना सर्व संबंधित पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे यांच्या निदर्शनास आणून, त्यांची काटेकोरपणे व तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत त्यांना सूचना दयाव्यात.

२२. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेली जनहित याचिका क्र.७७/२०१६ मध्ये महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनाच्या वतीने या प्रकरणी शासन निर्णयाचे इंग्रजी प्रारुप मा.उच्च न्यायालयात सादर केले होते. सदर प्रारुपास मा.उच्च न्यायालयाने सहमती दर्शविली आहे. हा शासन निर्णय इंग्रजी शासन निर्णयाचा मराठी अनुवाद असल्याने, या शासन निर्णयामध्ये काही संदिग्धता उदभवल्यास, इंग्रजी शासन निर्णयाचा सुलभ संदर्भासाठी अवलंब करण्यात यावा.

२३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक क्र.२०१७११२११७१७४५७०२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Hussein Alimiya Mukadam

Digitally signed by Hussein Alimiya Mukadam

(हुसेन अ. मुकादम)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रत :

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद/विधानसभा), विधानभवन, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. मा.महाअधिवक्ता, उच्च न्यायालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृह विभाग, मुंबई
१०. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मुंबई
११. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१२.सर्व पोलीस आयुक्त
१३.आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.विशेष पोलीस महानिरीक्षक (सर्व परिक्षेत्र)
१६.सर्व पोलीस अधीक्षक
१७.निवडनस्ती , गृह विभाग/कार्या.विशा-४

परिशिष्ट-ब

(शा.म.मु.) एचबी ३२८५—२६ (८००–३-२०१८)

सोमवार, दिनांक ८ जानेवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायं. ४-४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(५) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(६) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :

श्री. विजयकुमार गौतम, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

साक्षीदार

श्री. मनोज सैनिक, प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या महसुली जमा क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.५.३ संदर्भात प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १६ जानेवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायं. ५-०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(९) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१०) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

(११) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१२) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

(२) श्री. राजदिप सिंह, महालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :

श्री. विजयकुमार गौतम, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार

महसूल व वन (महसूल) विभाग :

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या महसुली जमा क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.४, ४.२, ७.२.४ संदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २३ जानेवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायं. ४-५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) श्री. सुनिल देशमुख, वि.स.स.

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(८) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

(९) श्री.विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :

श्री.विजयकुमार गौतम, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार

(१) श्री. सुधीर श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, गृह विभाग

(२) श्री. रजनीश सेठ, प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या महसुली जमा क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.७.३ संदर्भात अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २४ जानेवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(३) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(४) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(५) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(६) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(८) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(९) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

(२) श्री. जी. के. पार्डीकर, महालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :

श्री. विजयकुमार गौतम, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार

मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या महसुली जमा क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.६.४ संदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग तसेच परिच्छेद क्र. ७.२.७ संदर्भात प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे सायं. ४-०० वाजता सुरु होऊन सायं. ५-४५ वाजता स्थगित झाली.

उपस्थिती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(४) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(५) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(७) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(८) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(९) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(४) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी

(५) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील महसूल व वन (महसूल), गृह, गृह (परिवहन) विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई